म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १५५०६८

REFBK-0012753
REFBK-0012753

स्थळप्रत.
या ग्रंथ संग्रहा
अनुक्रम 33472 वि. काव्य
क्रमांक १५७८६ नों. दि. 93/11/62

अनुक्रम 33८72 ... वि: ...
क्रमांक 9565 ... नोंदणी 13-7-82

कविवर्य

# मोरोपंतांचे समग्र ग्रंथ

## ११

# स्फुट काव्यें

## ( भाग दुसरा )

संपादक

**अनंत काकबा प्रियोळकर**

डायरेक्टर, मराठी संशोधनमंडळ

सहकारी संपादक

**पं. बाळाचार्य खुपेरकर**

**श्री. दामोदर विनायक जोशी**

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा क 92593

REFBK-0012753

REFBK-0012753

मराठी संशोधनमंडळ,

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, नायगांव क्रॉस् रोड, मुंबई १४.

१९६२

प्रथमावृत्ति

१९६२

किंमत ५ रुपये

मुद्रकः— म. शं. साठे, दि प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी, वाई (जि. सातारा).
प्रकाशक :—अ. का. प्रियोळकर, डायरेक्टर, मराठी संशोधनमंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, नायगांव क्रॉस् रोड, दादर, मुंबई १४.

# प्रस्तावना

कविवर्य मोरोपंतांच्या समग्र ग्रंथांचा हा अकरावा खंड ( स्फुट काव्यांचा दुसरा भाग ) प्रसिद्ध होत आहे, याबद्दल आम्हांला संतोष होतो. मोरोपंतकृत ज्या काव्यांच्या त्यांच्या हातच्या मूळ प्रती सांपडल्या नाहींत त्यांचा तिसरा भाग छापत असून तो लवकरच प्रसिद्ध होईल.

कै. रामकृष्णपंत पराडकर यांनीं सुरू केलेलें हें प्रकाशनकार्य त्यांच्या निधनानंतर सहा वर्षांनीं पुरें होत आहे. ज्यांच्या आग्रहामुळें हें काम आम्हीं प्रथम हातीं घेतलें, त्या पं. बाळाचार्य खुपेरकर व रा. दामोदर विनायक जोशी यांच्या सहकार्यामुळेंच तें सिद्धीस जात आहे, याबद्दल त्या दोघांचे आम्ही आभार मानतों.

पहिल्या भागाच्या प्रस्तावनेंत ज्या दोन योजनांचा आम्हीं उल्लेख केला होता, त्या दोनही योजना मूर्त स्वरूपांत आल्या आहेत, हें येथें नमूद करण्यास आम्हांस अत्यंत समाधान वाटतें. पहिली म्हणजे पंतांच्या स्वतःच्या हातच्या व त्यांनीं संग्रहीत केलेल्या इतर हस्तलिखितांचीं उपलब्ध सर्व बाडें पंतांच्या वंशजांकडून मुंबई विद्यापीठाच्या स्वाधीन करण्यांत आलीं आणि त्यांच्या सुरक्षिततेबद्दल आतां बिलकूल धास्ती राहिलेली नाहीं. अभ्यासकांस तीं आतां मोकळीं आहेत. दुसरी योजना म्हणजे आमचे सहकारी, ज्यांची प्रस्तुत ग्रंथाच्या संपादनांत पुष्कळच मदत झाली त्या पंतभक्त रा. दामोदर विनायक जोशी यांनीं पंतवाङ्मयप्रकाशनाकरितां विद्यापीठाला देऊं केलेली पंचवीस हजार रुपयांची देणगी मुंबई विद्यापीठाकडे जमा झाली आहे. पराडकरांची आवृत्ति बाजारांत विकत मिळत नसल्यामुळें मोरोपंतांच्या स्वहस्तलिखितांवरून नवी आवृत्ति काढण्याकरितां विद्यापीठानें एक समितिही नेमलेली आहे. ह्या प्रकाशन-कार्यास लवकरच सुरुवात होईल.

मूळ हस्तलिखितांवरून मोरोपंतांचीं काव्यें छापतांना कोणतें धोरण अवलंबिलें आहे, याचा निर्देश या स्फुट काव्यांच्या पहिल्या भागांत केलेलाच आहे. त्याची येथें पुनरुक्ति करण्याचें कारण दिसत नाहीं.

या हस्तलिखितांपैकीं कांहींतील अक्षरांचें वळण जरा निराळें दिसतें. परंतु तें एकाच हातचें असावें, असें पं. खुपेरकरांचें मत पडलें. अभंग व पदें

यांच्या हस्ताक्षराबद्दल मात्र रास्त शंका आहे. ( पृष्ठ ३३७ पहा ). मूळ हस्तलिखितांच्या फोटोस्टाटवरून प्रस्तुत संहिता निश्चित केली आहे. आतां मूळ हस्तलिखितेंच उपलब्ध झाल्यामुळें या प्रश्नाचा जास्त विचार करतां येईल. या काव्यांची नवी आवृत्ति काढतांना नव्या संपादकांनीं या गोष्टीकडे लक्ष द्यावें म्हणून याचा येथें मुद्दाम निर्देश करीत आहें.

मोरोपंतांचा हस्तलिखितसंग्रह मुंबई विद्यापीठामध्यें एकत्रित झाला आहे. ज्यांच्याजवळ स्वतः पंतांच्या हातचीं किंवा त्यांच्या काव्यांचीं इतरांनीं लिहिलेलीं हस्तलिखितें असतील, त्यांनींहि तीं मुंबई विद्यापीठाला द्यावीं; म्हणजे पंत-वाङ्मय-संशोधनाचें मुंबईमध्यें एक उत्कृष्ट केंद्र निर्माण होईल. पंतांच्या समग्र मुद्रित वाङ्मयाचा संग्रहही मुंबई विद्यापीठ करीत आहे.

अशाप्रकारें प्रमुख कवींचीं संशोधनकेंद्रें ठिकठिकाणीं स्थापन झालीं पाहिजेत. समर्थभक्त कै. शंकरराव देव यांनीं रामदासांच्या वाङ्मयाचें संशोधन-केंद्र धुळें येथें स्थापन केलें. प्रा. शं. वा. दांडेकर यांच्या प्रयत्नानें नेवासें येथें ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाचें असें संशोधन-केंद्र निर्माण होण्याची शक्यता वाटते. रा. बळवंतराव घाटे यांनीं औरंगाबाद येथें एकनाथसंशोधनमंदिर उभें केलें आहे. डॉ. वि. भि. कोलते वगैरे संशोधकांनीं महानुभावपंथीयांच्या साहाय्यानें एकंदर महानुभावीय पोथ्या एकत्र करून नागपूर येथें महानुभाव-वाङ्मयाचें संशोधन-केंद्र स्थापन करावें. तुकाराम-वाङ्मयाचें असें केंद्र पंढरपुरास स्थापन होणें इष्ट आहे. गोमंतक हें परदेशी जेझुईतांच्या मराठी वाङ्मयाच्या संशोधनाचें चांगलें केंद्र होईल. मराठी संशोधनमंडळानें या बाबतींत पुष्कळसें कार्य यापूर्वींच केलेलें आहे.

पुणें विद्यापीठानें प्रस्तुत दोन खंडांच्या प्रकाशनाकरितां मंजूर केलेल्या उदार देणगीचा मागच्या खंडांत निर्देश केलेलाच आहे. महाराष्ट्रसरकारनें देऊं केलेल्या देणगीबद्दलही ही संस्था कृतज्ञ आहे.

आषाढ शु. ११ शके १८८४<br>
दि. १३ जुलै १९६२

अ. का. प्रियोळकर

# अनुक्रमणिका


| विषय | | ग्रंथसंख्या | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| प्रस्तावना | | | आरंभींचा ३ |
| **१. भगवन्नाममाहात्म्य** | | | |
| (१) नामसुधाचषक | | १२६ | १ |
| (२) नामरसायन | | ११६ | १७ |
| (३) नाममाहात्म्य | | १०७ | ३१ |
| **२. रामायणांतील प्रकरण** | | | |
| (१) अहिल्योद्धार | | ३८ | ४६ |
| **३. महाभारतांतील प्रकरण** | | | |
| (१) दुर्वासभिक्षा | | २३६ | ५३ |
| **४. भागवतांतील प्रकरणें** | | | |
| (१) अवतारमाला | | ३१० | ७२ |
| (२) ध्रुवचरित्र | | १०७ | १०५ |
| (३) प्रल्हादविजय : | प्रथम विजय | ९३ | ११६ |
| ,, ,, | द्वितीय विजय | ३२ | १२६ |
| ,, ,, | तृतीय विजय | ६५ | १२९ |
| ,, ,, | चतुर्थ विजय | ५४ (५१+३) | १३७ |
| (४) अमृतमथन : | अध्याय पहिला | ६९ | १४३ |
| ,, ,, | अध्याय दुसरा | ५४ | १५३ |
| ,, ,, | अध्याय तिसरा | ३५ | १५९ |

| विषय | ग्रंथसंख्या | पृष्ठांक |
| --- | --- | --- |
| ( ५ ) वामनचरित्र | १९९ | १६४ |
| ( ६ ) भक्तभूषण | १११ | १८८ |
| ( ७ ) गोपीप्रेमोद्गार | ११ | २१३ |
| ( ८ ) गोपीगोडवा | ६९ | २१५ |
| ( ९ ) भृगुचरित्र | ४९ | २२६ |
| (१०) गिरित्रमोक्ष | ४२ | २३८ |
| **५. ऐतिहासिक व्यक्ति** | | |
| ( १ ) अहल्यास्तवन | ६ | २५० |
| **६. आत्मकथनपर** | | |
| ( १ ) आर्याकेकावलि | १७४ | २५२ |
| ( २ ) रामरीति | १०३ | २७० |
| ( ३ ) सन्मनोरथराजि | ७१ | २८१ |
| ( ४ ) 'संशयरत्नावली'च्या पूर्वीची काव्यलहरी | ९ | २९२ |
| ( ५ ) संशयरत्नावली | ५० | २९४ |
| ( ६ ) अश्वधाटीदशक | १० | ३०१ |
| ( ७ ) गंगावकीली | १०९ | ३०४ |
| ( ८ ) विष्णुपदवकीली | १०० | ३१८ |
| ( ९ ) आशंसाष्टक | ८ | ३३० |
| (१०) स्मरणी | १३ | ३३१ |
| (११) प्रांत-प्रार्थना | १८ | ३३३ |

| विषय | ग्रंथसंख्या | पृष्ठांक |
|---|---|---|
| ७. अभंग व पदें | | |
| ( १ ) अभंग | ५ | ३३७ |
| ( २ ) पदें | ५६ | ३३९ |
| एकूण ग्रंथसंख्या | २६५५ | |

# मोरोपंतकृत स्फुट काव्यें

## १. भगवन्नाममाहात्म्य

### ( १ ) नामसुधाचषक[१]

( गीतिवृत्त )

स्वप्रत्ययासि आली मात्रा[२] बहु वेचितां, न जे वेचे[३],
तीच्या दानें करिसी[४] अमरचि जन आत्मपादसेवेचे. १

शंभो ! श्रीरामाच्या नामातें नित्य सेविसी, बापा !
त्याच्या बळेंचि हरिसी पापिजनाच्या क्षणें महापापा[५]. २

वैद्यांतर[६] समुपेक्षुनि[७] जो दीन वरी तुजें गृहाजिर[८] तें,
औषध त्यासचि देसी कीं अन्योपायनिःस्पृहा[९] जिरतें. ३

---

१. भगवन्नामरूप अमृताचा (चषक) पेला. पंतांनीं स्वतंत्र प्रतिभेनें निर्मिलेला यांतील आर्यामृतरस सुमधुर व अमृतत्वदायक आहे. २. भगवन्नामरूपी मात्रा. ३. न जे वेचे=जी खर्च होत नाहीं; झिजून संपत नाहीं. ४. याचा कर्ता 'हे शंभो ! तूं'. ५. मोठ्या पातकास. हीं महापापें पुढीलप्रमाणें आहेतः— ब्रह्महत्या, सुरापानं, स्तेयं, गुर्वंगनागमः। महांति पातकान्याहुः तत्संसर्गश्च पंचमम् ॥ (मनुस्मृति ११।५४). ६. दुसरा वैद्य. ७. टाकून. ८. घराचें आंगण. ( तुझें वास्तव्यस्थान ). ९. दुसरे इलाज करण्याविषयीं निरिच्छ, अशाला.

आलें दिव्य रसायन जेह्वांपासूनि हें तुज्या हाता,
जालें तेह्वांपासुनि नाम तुला ‘ वैद्यनाथ ’ हें ताता ! ४
विषदाह नाम शमवी, माथांची[1] दिव्यवीचिमत्सरिता[1]
ती सागरीं प्रवेशे, होय[2] शशी क्षीण, तीचि मत्सरिता. ५
म्हणती तापातें हरि[3], परि न प्रभुनामसम हिमाचळ तो,
मारि प्राणी त्राणीं[4], पटु नाम म्हणोनि न महिमा चळतो. ६
मृदुशीत लागती, परि अहि अहित क्रूर दूर सोडावे,
श्रीरामनामसख्यावरि खळसंगासि हात जोडावे. ७
त्वत्सुत विघ्नघ्न कसा ? देति न जे खळ जपों तपों दीना,
दोंदीं नागवर शिथिल करुनि बळें त्यांत विघ्न कोंदीना ! * ८
दृग्दहनें विश्व जळे, परि हरिलें तेज मन्मथें वा ! तें
नामचि मिरवी, जिरवी, दे न अयःपिंड[5] जन्म थेंबातें. ९
म्हणती मंगळशील ज्ञाते तुज शंकरा !, मना मसणीं
जह्वि आवडी, तह्वीं कीं तर्पिसि बहु रंक रामनामसणीं[6]. १०

---

१. मस्तकावर असलेली स्वर्गांतील लाटायुक्त नदी– गंगा. २. अन्वयः– शशी क्षीण होय, ( आणि ) तीचि ( तिची = त्या गंगेची ) मत्सरिता ( मात्सर्य-सुद्धां क्षीण होय. ) ( हालाहलविषप्राशनानें झालेला शिवाच्या शरीराचा दाह श्रीरामाच्या नामामुळें शांत झाला. म्हणून त्याच्या डोक्यावरील गंगेनें अपमानित होऊन सागरांत प्रवेश केला, त्याच्या शिरोभागींचा शीतकर चंद्र क्षीण झाला आणि गंगेचा मत्सरहि क्षय पावला, हा भावार्थ ). ३. हरण करतो; घालवितो. ४. रक्षणाच्या कामामध्यें. *. स्पष्टीकरणः– हे शंभो ! तुझा पुत्र विघ्नहर्ता कसा म्हणावा ? कारण, दीनलोकांना जपतपामध्यें त्रास देणाऱ्या दुष्टांचा नाश तो करीत नाहीं; इतकेंच नव्हे तर नागानें विळखा घातलेलें आपलें दोंदिल पोट सैल करून त्यांत त्या दुष्टांच्या विघ्नांना तो कोंबूनहि ठेवीत नाहीं ! ५. लोखंडाचा गोळा. ६. रामनामरूपी उत्सवामध्यें.

श्वशुरपितामह-मूर्धच्छेदन[1] पुरदाह[2] उग्रविषपान[3],
साधूंत रामनामग्रहणें शंभो ! तुझाचि बहु मान. ११
गोडी प्रभुनामीं, कीं दयिताधरबिंबचुंबनीं गोडी ?
उभयरसज्ञोक्ति खरी, शुकमुखयतिपतिमतीं[4] दुजी[5] थोडी. १२
विश्वगुरो ! ज्यां देसी सुक्षेत्रीं रामनाम-उपदेश,
त्यांला ' बहु धन्य ' म्हणे तो जो ध्रुवनाम साधु सुपदेश[6]. १३
आम्हीं चातक, पातकहर नाम अमृत, उदार तूं अब्द,
यावेगळया वरांतें देतां तुज कुजन लाविती शब्द. १४
रामाचें नामचि धन, जन धन म्हणती जयासि तें खोटें,
मोटें प्रेम धरिति जे, त्यांचीं हें दुष्ट चिरवितें पोटें. १५
नामधनेंचि वरधनिक सेव्य जगा तूं, विलोकितां वृत्ति
भिक्षाशन, भस्मभुजगभूषा, प्रावरण एक इभकृत्ति[7]. १६
न रमति तुझे उपासक पळही जे सद्विवेक विप्र धनीं
कीं प्राकृतेंहि तेणें मेल्यावरिहि न निवे कवि प्रधनीं[8]. १७
ज्याचा प्रभुनामधनें प्राकृतधननाशकंप टाकविला,
त्या समशीलास 'सखा' म्हण, न दुज्या वित्तलंपटा कविला. १८

---

१. श्वशुर ( शंकराचा सासरा, दक्ष ) + पितामह ( ब्रह्मदेव ) + मूर्धच्छेदन ( शिरश्छेद ). शंकरानें आपला सासरा दक्ष, आणि ब्रह्मदेव यांचा शिरश्छेद केल्याच्या कथा आहेत. ( मंत्रभागवत, चतुर्थस्कंध, आर्या २८-६५ पहा; स्फुट काव्यें, भाग १ ला या पुस्तकांतील पृष्ठ ५७ वरील क्रमांक ७ ची टीप पहा ). २. त्रिपुरास जाळणें. ( स्फुट काव्यें, भाग १ ला या पुस्तकांतील पृष्ठ १६२ वरील क्रमांक ८ ची टीप पहा ). ३. हालाहलविषाचें प्राशन. ४. शुकप्रमुख संन्यासिश्रेष्ठ यांच्या मताप्रमाणें. ५. दुसरी ( दयिताधरामृताची). ६. उत्तम स्थानाचा स्वामी; अढळपदाचा प्रभु. ७. हत्तीचें कातडें. ८. ( जीवनविषयक ) युद्धांत.

जें ईश्वरा ! रुचे तुज, तेंचि किमपि आणखी निवेदीन,
न प्राकृतें धनें, प्रभुनामें जैसा, तसा निवे दीन. १९

उत्तम धनदानें यश, उत्तम तूं वरद, उत्तम स्वामी,
उत्तम कळिकाळहि बहु, उत्तम पात्रांत दीनही हा मीं[1]. २०

तपसी जपसी उग्रा ! उग्रा रघुवीरनाममंत्रास,
भूतपते ! भूतबळें तुजपासुनि पावती न संत्रास. २१

मोह हरी म्हणती, परि सर्वांचें नाममंत्र मन मोही,
येणें जो मुनिगुरुवर[2] परमेश्वर मोहिलासि तूं तोही. २२

या विश्वमनोमोहनमंत्रें केले तुवां स्ववश योगी,
गौरी बाळा भुलली, मानी सद्रत्नहार वर भोगी[3]. २३

याचि महामंत्रें त्वां सर्व महासिद्धि किंकरी[4] केल्या,
गेल्या भवदाज्ञेनें रंकाप्रति हात जोडुनी ठेल्या. २४

परम प्रसन्न झाला शुद्धा ! हा मंत्रराजराज तुला,
प्रेमा तुझा मिळाला यास जसा रंग साजरा[5] जतुला[6]. २५

शंभो ! रंभोर्वश्याद्यमरी करिती पुढें पसा दासी,
यत्पीकपानकामें[7] ती प्रार्थी त्वत्पदप्रसादासी. २६

या रामनाममंत्रें उतरिसि तत्काळ काळसर्पातें,
मणिमंत्रभेषजांतर[8] दुर्हर कंदर्पभूतदर्पातें[9]. २७

---

१. मी मोरोपंत. २. मुनिश्रेष्ठ. ३. (तुझ्या गळ्यांतील) सर्प. ४. दासी. ५. चांगला, शोभणारा. ६. लाखेला. ७. ज्याची थुंकी झेलण्याच्या इच्छेनें; ज्याची खुशामत करावी म्हणून. ८. हातांत मण्यांची माळ घेऊन उच्चारलेल्या मंत्ररूपी औषधाहून दुसरें (औषध). ९. मदनोत्पन्न गर्वाला.

या रामनामसुरसें तर्पिसि तूं करिसि सूपकारातें[1],
तृप्तिप्रदत्व कैंचें शीतकरा[2], अमृतसूपकारा[3] तें ? २८
नामधनें आंत सधन, वेषें मूढांसि सांग, पण साचें
दारिद्र्य न्हे, वरदा ! नीरस वरि जेंवि आंग पणसाचें. २९
सैंधव-खिल्य[4] उदधितें तेंवि मिळो हाहि रंक रामातें,
कीं जेंवि पय पयातें; उपदेशीं मंत्र शंकरा ! मातें. ३०
श्रीरामनाममंत्रें भारीं[5] कामाहि[6] अमितफट[7] काळा,
साधुमनें मोहिसि, परि यश घे मोहूनि याहि फटकाळा[8]. ३१
भक्षीना आखूतें[9] त्वत्कंठींचाहि हार पवनाश[10],
त्याहि गुहशिखी, मंत्र न होऊं दे भक्तभाग्यलवनाश* ३२
बळियाचकजा[11] माथां परि गिरिराजात्मजा[12] न सासूया[13],
मंत्र नसता, न पीती तव वेषा सबहुमान सासू[14] या† ३३

---

१. उत्तम उपकारातें. २. चंद्राला. ३. अमृताची पाकनिष्पत्ति करणाऱ्याला ( स्वैंपाक्याला ). ४. सैन्धवखिल्य या नांवाचा ऋषि. ५. मारून टाक; मंत्रवश कर. ६. मदनरूपी सर्प. ७. मोठी फणा ज्यास असा. ८. दुष्टाला. ९. उंदराला. १०. वायुभक्षक (सर्प). * अन्वयार्थ :- त्वत्कंठींचाहि हार (असा) पवनाश (सर्प) आखूतें ( गणपतीच्या उंदराला ) भक्षीना; त्याहि ( पवनाशाला सुद्धां) गुहशिखी (कार्तिकस्वामीचा मोर) (भक्षीना). (सर्प, उंदीर, मोर हे परस्पर-शत्रु असतांना एकमेकांना मारक कसे होत नाहींत ? तर याचें कारण ) ( तुमचा नाम-) मंत्र भक्तभाग्यलवनाश (भक्तांच्या भाग्याचा थोडासुद्धां नाश ) होऊं न दे ( होऊं देत नाहीं ). ११. बळि + याचक + जा = बळिराजाजवळ त्रिपादभूमिदान मागणारा असा जो वामन ( विष्णु ) त्याच्या ( पाया ) पासून उत्पन्न झालेली ( विष्णुपदी, गंगानदी ). १२. पर्वतश्रेष्ठकन्या ( पार्वती ). १३. ( स + असूया ) मत्सरी. १४. स + असु ( प्राणांसहवर्तमान, जीवाभावानें ) † स्पष्टीकरणः- शंकराच्या डोकीवर गंगा बसली आहे, तरी

अनुचर पिशाच, भूषण मूर्धस्रक्सर्प[1], गगनपट[2] कटिला,
नगराजप्रियदुहिता मंत्रबळें भाळली तुला जटिला. ३४
जे सप्त कोटि होते त्वद्धृदयीं प्रथममंत्र ते ज्यातें
पाहुनि सर्व निघाले, भ्याले प्रभुनाममंत्रतेजातें. ३५
नाममहामंत्रार्थ व्रत वरिलें काय हें सदारानें[3] ?
जटिलें दिगंबरें त्वां धरिलीं तुहिनाद्रिचीं[4] सदा रानें. ३६
नाम महामंत्रमयचि जपतां जालासि तूं उगा, राया !
चित्तें सृष्टयवनलया[5] लागेना पक्ष्मही[6] उगाराया. ३७
तूं नामामृतसागर नामधनकुबेर नामतंतुपट
त्वन्मूळें नामाला शोभा, नामेंहि बा ! तुला दुपट. ३८
नवसंगमदयिताधरचुंबन कीं सरस राम हें नाम ?
बा ! मन्मथशत्रो[7] ! वद, कोठें पावे रसज्ञ विश्राम ? ३९
नाश तमाचा नामें कीं त्वन्नयनत्रयें[8] ? नतास वदा.
सवदा[9] तव दासोचित, कोण प्रभुजी ! अहो ! महोत्सवदा ? ४०

---

पार्वतीला त्याबद्दल मत्सर वाटत नाहीं. कारण तुझ्याजवळील रामनाममंत्रामुळें ती भारलेली आहे. तो मंत्र नसता तर हा तुझा विचित्र वेष तिनें आपल्या नेत्ररूपी मुखानें मोठ्या कौतुकानें व जीवाभावानें प्राशन केला नसता. (स + बहुमान व स + असू). **पंत**लिखित दुसरा पाठ—" जरि न भुलति तव रूपा, न पाहती सबहुमान सासू या. "

१. मस्तकीं माळेसारखा असणारा सर्प. २. आकाशरूपी वस्त्र ( नग्नपणा ). ३. सस्त्रीक (पार्वतीसह) अशा त्वां. ४. तुहिन + अद्रिचीं = हिमगिरीचीं. ५. उत्पत्ति, रक्षण व नाश हीं करण्यासाठीं. ६. डोळ्यांची पापणीसुद्धां. ७. मदनाचा शत्रु अशा हे शंकरा ! (हें विशेषण येथें साभिप्राय योजिलें आहे). ८. तुझ्या तीन डोळयांनीं. [ श्वेतभानु ( चंद्र ), बृहद्भानु ( अग्नि ), आणि भानु ( सूर्य ) हे शिवाचे तीन डोळे आहेत ]. ९. देवघेव.

शशिसूर्यानळतेजस्त्रय[1] नेत्रत्रय[1] तुजें दुजें नाम,
सर्वप्राणिसुखप्रद यांमध्यें कोणतें भलें धाम[2] ? ४१
झांकुनि नेत्रें बसतां, मानुनियां शरण, कोप टाकवि, तें;
हें[3] नामधाम हित पथ दाखवितें, भीति-कोप टाकवितें. ४२
नामामृतेंचि सर्वहि आप्तानाप्तांसि तोष दे, वांचे
अमृतें प्रसिद्ध केले धर्मासुमतिप्रमोष[4] देवांचे. ४३
सत्य रसज्ञोत्तम तूं, नाम वरुनि, काम सांडिला तुछ,
वत्स प्रस्नवपूर्ण[5] स्तन सोडुनि चुंबिनाचि गोपुछ[6]. ४४
सर्वविवेकिमुकुटमणि तूं जोडुनि रामनामवरवित्त,
जाऊं न देसि भयमदविरहद विषयांतराकडे चित्त. ४५
भलता नामसुवर्ण क्षेत्रीं घे, तूंहि देसि भलत्यातें
ये पात्रत्व अपात्रा, मुक्ति म्हणे मद्गृहासि ' चल ' त्यातें. ४६
नामसुवर्ण प्रेमें देतोसि यथेछ नित्य काशींत,
राशींत द्रव्याच्या न तिळ उणेंपण न याचकाशींत[7]. ४७
अमृतें विश्वहि तर्पी, परि होय क्षीण न, प्रभा वाढे,
हें[8] नामधाम अद्भुत, याच्याचि तम स्वयें पडे दाढे. ४८
निःशेष करि कुमतिला, ताप न दे, उग्र होय न कदापी,
हें[9] नामधाम निरुपम, जगती[10] याच्या अनुग्रहें पापी. ४९

---

१. ( पृष्ठ ६ वरील क्रमांक ८ च्या टीपेंत दिलेल्या नांवाप्रमाणें ) चंद्र, सूर्य व अग्नि यांच्या तेजाचें त्रिकूट असे तीन डोळे. २. तेज, स्थान. ३. अर्काधिकं- **पंत**. ४. धर्म+असु+मति+प्र+ मोष=धर्म, प्राण व बुद्धि यांचें हरण करणारे ( चोर ). ५. पान्ह्यानें पूर्ण भरलेले ( स्तन ). ६. गाईचें शेपूट. ७. याचकाला दिलेल्या आशीर्वादांत. ८. चंद्राधिकं- **पंत**. ९. अनलाधिकं- **पंत**. १०, जगतात.

वरदा ! वर दासांतें प्रेमें दिधले अदेयही[1] मागें,
यास्तव मज मन माजें म्हणतें ‘ श्रीरामनामवर मागें ’. ५०
परम अनावर माजें मन, मज याचें न सोसवे रुसणें,
देसिल तरि अगदीं दे, देवा ! देवूं नको मला उसणें. ५१
दुर्लभ नामवरातें पावुनि, जरि हा असाधु माजेल,
माजो, केलें पावो, वरद कर तुजा यशें विराजेल. ५२
सुदृढ प्रेमगुण करा, सूक्ष्महि न तदंतरीं असो सांधा,
प्रभुनामरत्न कंठीं घट्ट तुम्हीं पट्ट करें बरें बांधा. ५३
श्रीमंत सेवकांतें देती सद्रत्न, हेम, नेपथ्य[2]
शोभा तेचि तयांची, कृपणचि मानिति न हें मनें पथ्य. ५४
मीं बहु जपेन यातें, परि मजवरि बा ! तुझी असो दृष्टि,
सांडेल कसें ज्याच्या स्वयशस्तेजें प्रकाशली सृष्टि ? ५५
स्वामिप्रसाद होतां रंकहि होतो सुवस्तुला योग्य;
क्षाळिति यथेछ गांगें[3] स्वांगें जन, जें तुम्हां शिरोभोग्य. ५६
राहेल पदानिकटचि हा न, भवन्नामरत्न पळवील,
पळवील तरी आठां[4] मूर्तींतुनि एकमूर्ति कळवील. ५७
म्हणसील अर्पितों, परि झगडेल करील विघ्न दोंदील[5],
द्या मोदक पुष्कळसे, जठरीं पांचा[6] करींहि[6] कोंदील. ५८

---

१. अदेयही ( देण्याला योग्य नाहींत असे सुद्धां ) – **पंत**लिखित दुसरा पाठ–अदेय तर. २. पोषाक. ३. गंगोदकानें. ४. आठ मूर्ति– शाकुंतल नाटकाच्या पहिल्या अंकांत शंकराच्या ह्या आठ मूर्ति वर्णिल्या आहेत. ‘ क्षितिर्जलं तथा तेजो वायुराकाशमेव च । यष्टार्कश्च तथा चंद्रो मूर्तयोष्टौ पिनाकिनः ॥ ’ यष्टा=यज्ञकर्ता. ५. ढेरपोट्या ( गणपति ). ६. पांच हातांनीं ( चार हात व एक सोंड यांनीं ).

म्हणसील दानसमयीं साध्वी दावील लोभ वा नीती
जी निजदान[१] न वारी, हें कसि वारील हो ! भवानी ती[२] ? ५९
आहेत नामरत्नें तुमच्या कंठीं सहस्र तीं ठेवा,
त्यांतूनि एक हें द्या देवा ! भावें करीन मीं सेवा. ६०
ज्यांसि दिलीं ते दासचि, त्यांचा कैसा करूं नको हेवा ?
हे वादाची जागा, न्यायें सांगेन वाद मीं देवा ! ६१
धरितां लोभ असा जरि तरि कैसी आप्तकामता राहे ?
सप्त वितस्ति[३] शिळा भवसिंधूंत लिहोनि नाम तारा हे. ६२
ज्ञाता, गळांचि पडतां, वारी भलत्यापरी लचांडाला,
येतां धांवत, गंगा काय वितृष्ण न करील चांडाला ? ६३
लटिकें काय भिववितां बाळासि मला, अहो शिव स्वामी ! ?
जेंवि भगीरथ गांगा, सेविन नामामृता शिवस्वा मीं. ६४
सत्राजिता[४] न पचला, नाहीं आलें यश, स्यमंतकदा[५],
तरि तो तापकराचा[६] तापकरचि[६]; करिल हें[७] न अंत कदा. ६५

---

१. या प्रकरणांतील आर्या ८४ मधील टीप क्र. ३ पहा. २. **पंत**लिखित अन्यपाठ– " जी साध्वी तुजही दे, हें कां नेदील हो ! भवानी ती ? " ३. विती. ४. सत्यभामेच्या बापाला. ५. स्यमंतक नांवाचा मणि देणाऱ्याला (सत्राजिताला). ६. अन्वयार्थः– तरि तापकराचा ( सूर्याचा ) तो ( मणि ) तापकरचि (झाला). ( कथासंदर्भ– सूर्यमित्र सत्राजिताला सूर्यप्रसादेंकरून मिळालेला स्यमंतक मणि चोरल्याचा आरोप श्रीकृष्णावर सत्राजितानें केला. वस्तुस्थिति अशी कीं, तो मणि धारण करून मृगयेसाठीं गेलेला सत्राजिताचा भाऊ प्रसेन याला सिंहानें मारिलें; परंतु हें सत्राजिताला माहित नव्हतें. म्हणजे तो मणि सत्राजिताला तापदायकच ठरला ). ७. रामनाम.

चोरी प्रभुधन[1] पापी खंडुनि[2] घे[2] राहु कारटा काया[2],
सर्वस्वें वस्तु न भी द्याया कीं साहुकार टाकाया. ६६
कां आवरितां ? सोडा नामा मद्दुरितसेवनीं तरळा,
प्याले सकळ सुर अमृत, प्यालां देवा ! तुम्हीं कसे गरळा ? ६७
बंधु[3] विषधराशन[3] परि साधु तुम्हींही म्हणा भला खगपा[4]
आम्हीं कवी, नवीना रीति नव्हे, छाटितोंच लाख गपा. ६८
अजि ! हें ज्याचें त्याचें, याचा[5] ठायीं कसें नसो शील ?
नाम स्वजनातिक्रम करि, तो कळिकाळ हें न सोसील. ६९
तुजपासीं ' माग ' म्हणे मज नित्य भवार्त हें मन ' गरा ' जें
प्यालासि, तेंचि भेषज दे, कार्य[6] नसेचि हेमनगराजें[6]. ७०
दे रामनामसर्वस्वाचें मज दान बा ! नको अन्य,
दात्या हा त्याग महा, देत्या घेत्याहि जन म्हणो ' धन्य ' . ७१
' द्या द्या ' म्हणतां जैसा मीं तैसे बा ! तुम्हींहि उबगाना;
आयिकतां दीनाच्या किति काकुळतीस जेंवि शुभ गाना ? ७२
अर्थिमनोरथपूर्ति श्रेष्ठ यशस्कर, तसें न तप माना,
वरदा ! स्मर[7] दाहातें योग्य तसा काय मींहि अपमाना ? ७३
ज्यासि पुसाल म्हणेलचि तो, ' याचककाम पूरवा, हूं, द्या,
अव्यय भव्य यशस्कर नामसुधोद्दामपूर वाहूं द्या. ' ७४
नलगेचि अमृतमेवा, देवा ! ठेवा करा बरा जतन,
स्वामी ! हा मीं नामीं सस्पृह, साधीन आपुलें वतन[8]. ७५

---

१. प्रभूचें धन म्हणजे अमृत. २. आपलें शरीर कापून घेता झाला. ३. विषधर + अशन = विष धारण करणारा जो सर्प त्याला खाणारा ( गरुड ), आणि तुम्ही शंकर विष पिणारे; म्हणून गरुड तुमचा भाऊ. ४. गरुडाला. ५. याच्या. ६. सुवर्णपर्वतराज मेरूकडून कार्य ( करावयाजोगें ). ७. मदन. ८. स्वामित्वाचें ठिकाण.

कां भीतां ? द्या नाम क्ष्वेडाची[1] बा ! धरूं नका शंका,
अंकालंकारातें[2] रक्षी मृग नाभिच्या[3] जशा पंका[3]. ७६

कर्ण[4], दधीचि[5], शिबि[6] प्रभु तो जो सोसी शिरीं नव क्रकच[7]
सत्यव्रतदात्यांचा देवा ! वज्रहि करी न वक्र कच. ७७

तुमचें निष्ठुरपणही लाजवितें भूतनायका ! पविला,
भक्षावयासि बाळक मातेकरवीं न काय कापविला[8] ? ७८

श्रीरामनामचिंते ! त्वां ज्याचा देह वाळवीला गे !
हरिसि मरणभय त्याचें, इतर मरे ज्यास वाळवी लागे. ७९

शंभो ! अंभोजातें मधुप विसंबेल[9], तूं न नामातें,
न वदसि तरि कळवावें करुनि करांबुजविधूनना[10] मातें. ८०

देसील परि विसरवी, जरिहि सुधाकर विधू[11], न नामासी,
मृतिभय न धरि, न पाहे मधुरसभुक्[12] करविधूनना[13] मासी.[12] ८१

गावूनि नाम नटसि त्यजुनि स्त्रीपुत्रमित्रजनशंका,
देवा ! दे वात्सल्यें वर[14] वाटतसे तसेंचि मज रंका. ८२

---

१. विषाची. २. चंद्रातें. ३. नाभिच्या पंका–कस्तूरीला. ( हरिणाच्या बेंबींत कस्तूरी सांपडते, असें म्हणतात ). ४. सहजकवचकुंडलें कापून देणारा सूर्यपुत्र कर्ण. ५. वृत्रासुराला मारण्यासाठीं वज्र तयार करण्याकरितां इंद्राला स्वतःच्या अस्थि देणारा महान् ऋषि. ६. आश्रयार्थ आलेल्या कपोत पक्ष्याचे प्राण वांचविण्यासाठीं श्येनपक्ष्याला स्वतःच्या शरीराचें मांस करघतीनें कापून देणारा उदार राजा ( शिबि ). ७. करवत. ८. सत्त्वपरीक्षेसाठीं श्रियाळराजाच्या राणीनें ( चांगुणेनें ) आपल्या मुलास मारिलें, ही ब्रह्मोत्तरखंडांतील कथा येथें अनुसंधेय आहे. ९. विसरेल; टाकील. १०. हस्तकमलाच्या कंपनाला. ११. चंद्र. १२. मध सेवणारी मासी (माशी). १३. हात हालविण्याच्या क्रियेला. १४. योग्य.

33292

सारूप्यदान[१] देउनि गौरविला शंकरा ! जसा नंदी,
दे नामपारितोषिक मज, मींहि प्रभुवरा ! तुझा बंदी[२]. ८३
'नोहें मीं अंधक[३], वृक[४], दशमुख; उपमन्युहूनि[५] दीन असें'
चित्तीं निश्चित समजो नामवरप्रद दयानदीन[६] असें. ८४
म्हणसील, 'वरें झाले बहु मत्त करूनि मद्यजन[७] नीच.'
केळ क्रमेळकां[८] विष, धर्मज्ञा दे न मद्य जननीच[९]. ८५
उग्रप्रकृतिहृदय तें केंवि वरदनायका ! द्रवे यांचें ?
दुग्धप्रदासि निर्विष होइल मुख काय काद्रवेयांचें[१०] ? ८६
नामवरें विद्याकुळवित्तवयोरूपशक्तिमद उतरे,
धुतरे[११] इतर वर म्हणों, कीं पायसवर[१२], कुशील ते[१३] कुतरे. ८७

---

१. सरूपतामुक्तिरूपी दान. २. स्तुतिपाठक. ३. अंधकासुर. रूपमती पार्वतीला या दुष्टानें पळवून नेण्याचा प्रयत्न केला, तेव्हां शंकराचें व याचें घनघोर युद्ध झालें. शेवटीं हतवीर्य झाल्यावर तो शंकराचा भृंगी नामक सेवक बनला. ( सौरपुराण अध्याय २९ ). ४. वृकासुर. "ज्याच्या माथां कर ठेविन तो प्राणी मरो" असा वर शंकराकडून या राक्षसानें मिळविला. त्याची प्रचीति पाहण्यासाठीं तो शंकरावरच प्रयोग करूं लागला. शेवटीं यानें स्वतःच्याच माथीं आपला हात ठेवला व आत्मघात करून घेतला. ५. हा व्याघ्रपादनामक ऋषीचा पुत्र. गरीबीमुळें त्याच्या आईनें त्याला पाण्यांत पीठ कालवून दूध म्हणून दिलें होतें. ६. दया+नदी+इन=दयारूपी नदीचा स्वामी, दयासागर. ७. माझें पूजन. ८. उंटांना. [ उंट केळी ( च्या झाडां ) हून उंच झाले तरी ती त्यांना विष देत नाहीं. ] ९. "धर्मज्ञा दे न मद्य जननीच" या पाठाऐवजीं **पंत**लिखित दुसरा पाठ "दे न शिशुसि अहित मद्य जननीच" असा आहे. १०. सर्पांचें. ११. धोतऱ्यासारखे मादक. १२. उत्तम खीर ( तसे नामवर ). १३. इतर वर. ( कुशील कुतरे ).

दुर्मतिकळावतींचे[1] अनुचर त्यांचेचि तीर्थरूप ढवे[2],
केवळ मूर्ख म्हणावे तरि त्यांला अर्थशास्त्रही पढवे. ८८
शंभो ! अंभोदाची सर्वत्रहि सम जसी पडे वृष्टी,
'साधु असाधु' म्हणेना, तैसीच तुझी दयावती दृष्टी. ८९
विश्वगुरो ! भजकांतें देउनि वर करिसि चित्त तुष्ट, पणें;
परि पाप[3] ताप पावति, लाविति तुजलाहि बोल दुष्टपणें. ९०
आद्या ! आर्या ! आप्ता ! आत्म्या ! दे रामनामसंनिधिला[4],
निरवीं[5] मग मज मोहध्वांत-मिहिर[6] साधुधाम-संनिधिला[7]. ९१
मधुरतर म्हणुनि सस्पृह बहु जालें चित्त बावळें नामीं,
यावांचुनि देसिल जरि सर्व धनप-वित्त[8] बा ! वळेंना मीं. ९२
अर्थिजनांतें म्हणती दाते उघडें करूनि अररा[9] 'या',
देशी काशीमध्यें तूंहि श्रीरामनामवर राया ! ९३
तुमचा अभयवरप्रद तापापह[10] सुप्रमोदकर वाळा,
कर वाळा वाहा कां ? दासशिरीं द्या, त्यजूनि करवाळा[11]. ९४

---

१. दुर्बुद्धिरूप वेश्यांचे. २. मूळशब्द 'ढवा'. विट; साजिंदा, गाणारणीचीं वाद्यें वाजवणारा. ३. पापी लोक. ४. संनिधि = ठेवा. ५. स्वाधीन कर. ६. मोहरूपी अंधाराला सूर्याप्रमाणें (असें जें साधुधाम). ७. (साधुधामाच्या) सांनिध्याला, समीप, जवळ. ८. धनप + वित्त = कुबेराचें धन. ९. कपाटाला. १०. (त्रि) ताप हरण करणारा. ११. अन्वयार्थः– करवाळा त्यजूनि (तरवारीला फेकून देऊन) कर वाळा कां वाहा ? (हातांत वाळा कां धारण करतां ? तो हात) दासशिरीं द्या. (पहिल्या अर्धांत सांगितल्याप्रमाणें, तुमचा वाळा जरी अभय देणारा, त्रिताप हरण करणारा व आनंददायक आहे, तरी त्यापेक्षां तुमचा कर = हात (पुढील क्रमांक ९५-९६ या दोन आर्यांत सांगितल्याप्रमाणें) भक्तांचे सर्व मनोरथ पूर्ण करील असा वरप्रद आहे.

देवा ! ऐसें म्हणसी, ‘ नामवरादीष्टसिद्धि परमा जे
शरणागतासि देती लोकांत अनंत साधु कर माजे. ९५
वर द्यावयासि सिद्धचि केले म्यां साधुमूर्ति कर वरते,
जा घे, बहु उत्सुक तुज द्याया त्वत्कामपूर्तिकर वर ते. ’ ९६
हें सत्यसार संमत सुज्ञां संतांसि सर्वसाधुकरा !
समसदय तुम्हीं सादर सदाशिवा ! सेवकेष्टसाधु करा. ९७
साधुचरण साधु-उदर साधुहृदय साधुहस्त साधुमुख
साधुनयन साधुश्रुति किंबहुना साधुमूर्ति साधुसुख[१]. ९८
पुसतांचि मुख्य तत्व प्रेमें होवूनि साश्रु ‘ तत्वांची
गति[२] तूं ’ हें सद्रूपें केलें मूढांसि बा ! श्रुत त्वांचि. ९९
तरती तारिति भजकां, देती घेतीहि हें यश पथानें,
साधु तुझे चरण वरद, त्यांसहि जे दुष्ट हेय[३] शपथानें[४]. १००
आळ हठें घे ज्याची[५], लावावा त्याचि तो पृथुक[६] थानीं,
आकार रसैक्यांच्या कैसा हो ! समजतो पृथु कथानीं ? १०१
दासांचा हठ विजयी करितोचि तुज्या हठासि तो गोळा,
भृत्यजिता ! करुणाब्धे ! न स्मरसी सुज्ञनाथही भोळा ? १०२
रामाचें नाम अमृत, तूं घनसा, मीं हठींहि चातकसा,
परमोदारा ! देवा ! होवूं देसील दीनघात कसा ? १०३
‘ पितरांपासीं न तसा, तुजपासीं जेंवि दासहठ चाले ’
आले सांगत ऐसें वृद्धचि, उपदेश ते मला झाले. १०४

---

१. या सर्वांचा कर्ता ‘ तूं ’ अध्याहृत– **पंत**. २. आधार. ३. सोडण्यास योग्य. ( मूळ क्रियापद ‘ हा ’ = सोडणें ). ४. हा शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे. ५. ज्या थानाची. ( बालक डावीकडील किंवा उजवीकडील जो मोठा थान असेल तो प्यावयास पाहिजे असा हट्ट आईजवळ धरतो. दुसऱ्या अर्धाचा अन्वयः– ( आईनें सेवन केलेल्या ) रसैक्यांच्या कथांनीं ( हृदयविकास पावलेला तिच्या स्तनाचा) पृथु (मोठा) आकार (त्या बालकाला) कैसा हो! समजतो ? ६. बालक.

सेवा-केवा[1] माझा किति शितिकंठा ! अहो ! महादेवा ! ?
मेवा दे वात्सल्यें जननी, जननीतिनेंचि दे ठेवा. १०५
जों मुग्ध, दुग्धजीवन तों देउनि तेंचि पोषिती पितर,
करुणा तरुणावरि मग करिति असी, तो धणी स्वयें, इतर. १०६
माताचि अन्नपूर्णा, विश्वंभर तूंचि तात विश्वास,
श्रीरामनामसंनिधि योग्या मज द्याल हें सविश्वास. १०७
रुसला कुमार अंबान्नेंहेंही म्हणति साधु 'न समजला',
तें वृत्त मोहितें[2] परि[2], धृति दे उपमन्यु[3]–भक्तिरस मजला. १०८
शंभो ! दिधलें नसतां येतें वदनासि रामनाम कसें ?
टपतचि असतें पातककणभक्षणलक्ष दक्ष हें बक-सें. १०९
'द्या द्या' म्हणतों त्याचा भाव असा कीं मुखीं असो अंतीं,
संतीं सदा म्हणावें, 'नामप्रेमा मयूरवरपंतीं.' ११०
प्रकटी प्रथम भगीरथ[4] नृप लोकीं सुरनदी सती आर्या,
तसि हे मयूर नाहीं तरि सर्वांला न दीसती आर्या. १११

---

१. सेवेचा मोठेपणा. ( सेवा+केवा हा संस्कृतप्राकृत शब्दांचा समास आहे ). २. "मोहितें परि" याबद्दल **पंत**लिखित अन्यपाठ "मोह दे क्षण". दुसरें अर्थ असेंहि आहे:– "तें वृत्त मोह करि, परि परिहरि......" ३. पृष्ठ १२ वरील टीप क्र. ५ पहा. ४. सूर्यकुलोत्पन्नसगरराजाचा पणतु. यानें एक हजार वर्षें तपश्चर्या करून स्वर्गांतील गंगा पृथ्वीतलावर आणली. म्हणूनच तिला 'भागीरथी' म्हणतात. 'भगीरथ' नसता तर 'भागीरथी' प्रकट झाली नसती, त्याचप्रमाणें '**मयूरपंत**' नसते तर 'आर्या' अवतीर्णच झाली नसती; हे **पंतां**चे स्वाभिमानोद्गार सार्थ नाहींत, असें कोण म्हणेल ! पुढील क्रमांक १२२ या आर्येंतहि **पंतां**नीं आपल्या काव्यामृतानें अखिल विश्वतृप्तीची मनीषा बाळगली आहे; ती तो दयाघन परिपूर्ण करो.

उचित प्रचार भासो रसिकांस प्राकृतांत[1] आर्यांचा
युष्मद्वरेंचि होतो सत्कार प्राकृतांत[2] आर्यांचा[3]. ११२
गद्यें वोव्या सवया दोहांतें सर्व जाणती लोक,
श्लोक प्रिय त्यांस जयां प्रसन्न तूं पुण्यपूर्वकश्लोक[4]. ११३
आर्यानाथा[5] ! आधीं छंदःशास्त्रांत पिंगळाचार्यां[6]
आर्याराध्या[7] देवा ! त्यांचि पढविली मनोहरा आर्या. ११४
आर्यासुधा बुधानीं आकंठ प्राशिलीच धन्यानीं,
कानीं मात्र परिशिली होती हो ! ती सती तदन्यानीं. ११५
ते हे सुधा बुधानीं मज लुब्धाला दिली सदा त्यानीं,
केलों[8] पात्र दयेला आधीं, मग मीं किलीस दात्यानीं. ११६
साधुप्रसाद आर्यामृतरस रसिकां सख्यांसि दाखवितों,
राखवितों मर्यादाहि यथामति मीं बळेंचि चाखवितों. ११७
सुखद प्रचार रसिकां वाटेल प्राकृतांत आर्यांचा,
तुमच्या वरेंचि जेंवि व्रजवासिप्राकृतांत आर्यांचा. ११८
आर्यावृत्तक्षीरीं युष्मन्नुतिशुद्धशर्करा प्राज्य,
वरि वोतिलें यथेष्ट स्वछ श्रीरामनाम भव्याज्य[9]. ११९
'भेटो रसिक, लवहि जो ग्रंथा, चषकांत[10] नूरवि, प्राशी'
ऐसा वर दे वरदेश्वरचरणा ! मज मयूरविप्रासी. १२०

---

१. सामान्य लोकांत. २. मराठी काव्यांत. ३. आर्यावृत्तांतील कवितांचा. ( वास्तविक **पंतां**ची आर्या ही बहुंशीं गीतिवृत्तांतच रचलेली आहे ). ४. पुण्यश्लोक, ( जनार्दन ). ५. भवानीपते ! ६. छंदःशास्त्रकर्त्या पिंगल नांवाच्या आचार्याला. ७. श्रेष्ठांनीं पूज्य मानलेली. ८. कर्मणि प्रयोग. येथें कर्मपद द्वितीय पुरुषी आहे. ९. भव्य+आज्य=उत्तम तूप. १०. पेल्यांत.

उघडा[1] करितां होइल दूषकखलदृष्टिमक्षिकापात[2]
रसिकासि शोधितों मीं, तों चषकावरि असो तुझा हात. १२१
अथवा रसिकपते ! तूं प्राशन याचें करीं जगन्नाथा !
होईल विश्व तृप्त, स्वामी ! मीं ठेवितों पदीं माथा. १२२
या चषकें नामामृत साधुश्रोत्राननें शिवा पी हो !
उचित महादेवा ! तुज सेव्या, देवांसि अमृतवापी हो. १२३
' सेवा हो ! सेवा हो ! ' म्हणतां अत्यादरें उठे शंका
शुद्ध स्वादूम्नेंहि श्रीमज्जनतृप्ति, दुष्करा रंका. १२४
आर्या दयिताचि तुझी, आत्मस्तुति भलतसीहि तुज इष्टा,
शिष्टाश्रया न म्हणसी राघवनामाहुनीं सुधा मिष्टा. १२५
जे साक्षाज्जगदंबाबिंबाधरचुंबनासि विसरविती
ते हे स्वमतरसवर प्राशीं रसिका ! प्रमोदविसर[3] विती[4]. १२६

---

## ( २ ) नामरसायन[5]

( गीतिवृत्त )

श्रीमद्रामपदांबुजमधुपवरा ! मारुते ! महाबाहो !
या दीनावरि सदय, त्यजुनि उदासीनतेसि, तूं बा ! हो. १
सुरकार्यकरप्रभुचा तूं मूर्तिधर प्रताप, खळकाळ;
श्रीवाल्मीकिकवीश्वरगीतचरित्र प्रपन्नजनपाळ[6]. २

---

१. चषक उघडा करितां. २. निंदकखलाची दृष्टि हाच मक्षिकापात. ३. आनंदाचा समूह. ४. प्रसविणारी. ५. भगवन्नाम हें सर्वसंसाररोगपरिहारक रसायन ( औषध ) होय, या भावनेनें **पंतांनीं** हें रसाळ काव्य रचिलें. यांतील कल्पनाविलास मनोहर आहे. ६. शरणागत किंवा दुःखपीडित जनांचा रक्षणकर्ता.

रामप्रभुचा मूर्त प्रेमा तूं शुद्ध भव्यकाय कपी;
म्हणउनि तुझ्या गुणांतें कविगुरुवाल्मीकि विप्रनायक पी. ३
व्यसनार्णवांत बुडतां सुग्रीवा साधुला महाप्लवगा[1]
तारावया सहायें मेळविला त्वांचि राम हा प्लव[2] गा ! ४
स्त्रीरत्नातें विरहीं राम, जसा कृपणजन धना, शोची[3].
त्याचा शोक हरि तुझें तेज, जसें भानुचें तमा शोची[4]. ५
प्रभुनें बहु पाठविले निजरत्नाचा करावया शोध,
तो[5] धन्या त्वां केला, लाजविले सर्वही महायोध. ६
शतयोजन मकरालय गोष्पद-सा लंघितां, महातनु ती
पाहुनि, नभीं सुरांहीं केली, जोडूनि तूज हात, नुती. ७
प्रभुधनहरमथनाविण जेंवि जितखगेंद्रपक्षभुज[6] ! वाटे[7]
छायाग्रहादिविजयें[8] तुछें विस्मय तसा न तुज वाटे. ८
कांति प्रदीपकलिका[9] धरि पहिली पावतां जसी तेला;
ये त्वत्प्रापितवल्लभसंदेशें[10] पूर्वतेज सीतेला. ९
तव दर्शन तें साक्षात् रामपदाचेंचि होय देवीला;
वरि सुख तिचें मन, जसें कृपणाचें पावतांचि ठेवीला. १०

---

१. मोठ्या वानराला. २. नौका. ३. शोक करी. ४. तेज. ५. तो (शोध). अन्वयार्थः- त्वां धन्या ( तूं धन्य अशा हे ! मारुते ! ) तो ( शोध ) केला. ६. जिंकले आहेत गरुडाचे पंख व भुज अशा (हे मारुते ! ). ७. वाटेंत. ८. स्पष्टीकरणः- सिंहिका राक्षसीनें तुझ्या छायेचें ग्रहण केल्यामुळें तूं तिजवर मिळविलेल्या क्षुद्र विजयाचें तुला आश्चर्य वाटलें नाहीं. ( सावली पकडून मूळ वस्तूचें आकर्षण करून घेणें ही किमया अद्भुत खरीच ! ) [ आर्याभारत वनपर्व अ. ३ आर्या ७४ पहा. तसेंच स्फुटकाव्यें भाग १ ला या पुस्तकांतील पृष्ठें ८७–८८ वरील क्रमांक ११ ते १५ या कविता पहा ]. ९. दिव्याची ज्योत. १०. तूं आणिलेल्या नवऱ्याच्या ( श्रीरामाच्या ) निरोपानें.

लंकेचा अरि तूंचि प्रभुभक्त, न वह्निपवन[1] लंकारी;
तूझेंचि विष्टपातें[2] लंकादाहोत्थ[3] यश अलंकारी. ११
त्वत्तात वायु, तत्सख दहनांहे, दशमुखनिदेशकर[4] पुर तें
जरि जाळिते स्वयें, तरि धैर्य न आयुष्यचि त्वरित पुरतें. १२
अनळाऽनिळां मिळाला निर्भय आश्रय जईं तुझें पुछ,
तुछ क्रव्यात्पुर[5] किति ? विध्यंडहि[6] ज्यांसि तूळ[7], सुमगुछ[8]. १३
जो खळ, नरमांसाशनपति[9], यतिरक्तासमेत मद्या पी,
तो जाणे काय ? सुकवि डोलति भवदुक्तिहींच[10] अद्यापि. १४
प्रियकथनप्रमुदितरघुकुलपरिवृढदृढभुजीं, तुजीं अंगें
आलिंगुनि, वरिलें सुख, भुजगवरीं[11] जेंवि मलयरुहसंगें[12]. १५
वांचविला प्राणांतव्यसनीं आणोनि ओषधीगिरिला.
तूं पविकवच म्हणोनि न खळसिंहें राम शरनखीं चिरिला. १६
व्यसनीं रामादि म्हणति तुजला, ' बा ! धांव, पाव हनुमंता ! '
हंता तूंचि खळांचा, यश पावो, काळ होय अनुमंता[13]. १७
सुग्रीवांगदजांबवदादिसुवीरप्रतापदहनासी.
दे उत्तेजन तव बळपवनचि, गिळितां पलाशगहनासी[14], १८

---

१. अग्नि व वायु. 'न वह्निपवन लंकारी' याबद्दल **पंत**लिखित दुसरा पाठ 'अनिळशिखी न लंकारी'. २. जगाला. ३. लंकादाह + उत्थ = लंकेच्या दहनापासून उत्पन्न झालेलें. ४. रावणाची आज्ञा मान्य करणारें. ५. ( क्रव्य + अद् + पुर ) मांसभक्षक रावणाचें नगर. ६. विधि + अंडहि = ब्रह्मांडसुद्धां. ७. कापूस. ८. फुलांचा घोंस, झुबका. ९. राक्षसांचा राजा. १०. तुझ्या ( आपल्या ) उक्तींनींच. ( हनुमन्नाटकांतील भाषणांनींच ). ११. श्रेष्ठ सर्पांनीं. १२. मलयपर्वतावरील ( चंदन ) वृक्षांच्या समागमानें. १३. अनुमोदन देणारा. १४. राक्षसरूप अरण्यास.

बा ! प्लवगांत[1] तुवांचि व्रतमुख्य ब्रह्मचर्य वागविलें.
जागविलें मन योगीं; जगदुपकारार्थ देह भागविलें. १९

तव विक्रमाविणें, पळभरिहि, न येतींच खळबळें वळणी[2].
श्रीमद्रामायणरस रसिकांला स्पष्ट लागता अळणी. २०

बा ! तूंचि लक्षरक्षःकक्षक्षयदक्ष[3]; एक वणव्याचि;
परि परतलासि, कीं मुनिकृतनृपवरविजय[4] ते कवण वाची ? २१

बा ! कपिसिंहा ! समरीं सर्वाहितघातकारिपुछा[5] गा !
न क्षणहि लागता, त्या वधितां कृतपातका[6] रिपुछागा[7]. २२

कर जोडूनि विनवितों तुजला बा ! दीनदासमुदा[8] ! मीं
रक्षीं मजहि स्वभुजीं, व्यसनार्तत्राणशश्वदुद्दामीं[9]. २३

दीन व्यसनीं बुडतां, ताराया साधुहात–नाव[10] रिती[10].
नावरिती; सत्स्त्रीकृत पापिजनाला न यातना वरिती २४

येतील समर्थाच्या कार्यासि समर्थ; काय तें चित्र ?
तो धन्य, स्तवनोचित, जो दीनजळासि दुग्धसन्मित्र. २५

आहेसि याचि लोकीं रामप्रभुचा बहिश्चर[11] प्राण;
मज बहु तुजा भरवसा कीं बा ! करिसील तूं परित्राण. २६

---

१. वानरांमध्यें. २. वळणीस, वठणीस. ३. लक्षावधि राक्षस हेंच गवत, त्याचा नाश करण्यास समर्थ. ४. वाल्मीकीनें वर्णिलेले श्रीरामाचे विजय. ५. सर्व शत्रूंचा नाश करणाऱ्या पुच्छाला. ६. पापात्म रावणाला. ७. शत्रुरूप बोकडाला. ८. दीनदास + मुद् + दा = गरीब सेवकाला आनंद देणाऱ्या ! ९. व्यसनार्तत्राण + शश्वत् + उद्दामीं = संकटांत पडलेल्यांच्या संरक्षणाविषयीं सदोदित उच्छृंखळ अशांमध्यें (स्वभुजीं). १०. साधूचा हात हीच रिती नाव. ११. शरीराबाहेर हिंडणारा.

‘ श्रीरामा ! जय रामा ! जय जय रामा ! ’ अशाचि हाकानीं
सुप्तहि पशु शिशु उठती; गेला तुझिया न नाद हा कानीं ? २७
कलियुगगतजनवचनश्रवण श्रवणा[1] न योग्य हें कळतें.
जळतें अघ जेणें, तें रामाचें नाम काय हो ! मळतें ? २८
जेथें जेथें कीर्तन, तेथें तेथें उभाचि तूं असती.
श्रीरामनामसद्रसपानीं अतिहावरा कसा बससी ? २९
वर्ण गुणांतर न गणुनि, एकीं ठेऊनि दृष्टि मधुपानीं,
चुंबावेंचि भलतसें कुसुम प्रेमें रसज्ञमधुपानीं. ३०
तैसें निजहितजीवन जेथें श्रीरामनाम नांदे तें
हो भलतें मुख, सुख बहु रसिकांच्या तत्परां मनां देतें. ३१
बहु मानस दासांवरि, साधुनि काम हित, सज्ज नवनौका.
बहुमान सदा सांवरि, साधु, निकामहित, सज्जन, वनौका !* ३२
ऐसें कवि तुज गाती; दिससी परि तूं गुणें न वानरसा;
वा नर साधिति अमृत त्वद्भजनें, स्वर्ग हा नवा न रसा. ३३
तूं साक्षात् स्मरहर हर जालासि सहाय निजसहायासी;
हा या सीताविरहीं कीं स्वसखा हरि[2] न हो महायासी[3]. ३४

---

१. कानाला. * अन्वयार्थः — ( तुझें ) दासांवरि बहु मानस ( मन, लक्ष ), ( त्यांचें ) काम हित ( इच्छित कल्याण ) साधुनि ( त्यांना परतीरावर नेण्यासाठीं तुझी ) नवनौका ( नेहमीं ) सज्ज ( असते ). ( हे ! ) वनौका ! ( अरण्यवासी वानरा, मारुते ! ) साधु निका ( चांगला ) महित ( पूज्य ) ( व ) सज्जन ( दासांचा ) बहुमान सदा सांवरि. ( हें तुला सांगणें नकोच. कारण तसाच तूंहि आहेस ). हें पद्य समुद्गक नामक यमकाचें उदाहरण आहे. पद्याच्या सकल अर्धाची पुनरावृत्ति झाली असतां हें यमक होतें. असें यमक **पंतांनीं** कोठें-कोठें वापरलें आहे. ( आर्याभारत, वनपर्व, अध्याय ८ वा, आर्या ५० पहा ). २. विष्णु ( श्रीराम ). ३. अतिकष्टी.

वृकवरदानाद्यमितव्यसनीं[१] जाला सहाय आंगानें;
कां गा! नेणसि तूं प्रत्युपकृतिचा समय; ऐकतां गानें? ३५

निववाया भक्ततृषा, निरुपमलीलासुधा नवि प्रसवा;
नव सेव्यसेवकत्व स्वीकारुनि रक्षितां सविप्रसवा[२]. ३६

निःसंशय शंकर तूं; या लीला ज्या तुज्या, न कीशातें[३]
शोभति; बा! होत्याहि न बहुमान्या जातु[४] जानकीशातें. ३७

पंकांत दैवयोगें जी पावाया श्रमा, रुते गाय,
तीचा उद्धर्ता जो, त्यासि सकळ लोक मारुते! गाय[५]. ३८

करिती सकुटुंब महादुष्काळीं दीनजन उपासा जे,
तैशांवरि सकृपांहीं जी केली, तीच बहु कृपा साजे. ३९

जो सभय म्हणेल वनीं, 'मज दीना वधिति चोर वीरा! हे!'
तें ऐकुनि, अभय न दे जो, त्याची काय थोरवी राहे? ४०

स्वस्वामीचा सेवक म्हणवी, पण वीतभक्तिनीति[६] खळ,
ऐसाहि शत्रु मुक्त न करुनि विरे बुध, जळीं जसें डिखळ. ४१

स्वस्वामिनाम पावन; लागों देती न त्यासि बोल भले.
कीं काळजींहि[७] काळव्याळगरळदिग्धशर[८] तसा न सले. ४२

---

१. वृक+वरदान+आदि+अमित+व्यसनीं = (शंकरानें) वृकासुराला दिलेल्या वरदानामुळें प्राप्त झालेल्या अनेक संकटांचे वेळीं हररक्षणार्थ हरि पुढें आलेला आहे (कृष्णविजय अध्याय ८८ पहा). २. स+विप्र+सवा = ब्राह्मणासह यज्ञाला. ३. वानराला. ४. कधींहि. ५. गातो, स्तवन करतो. ६. भक्ति व नीति यांनीं रहित. ७. काळजांत सुद्धां (मूळशब्द 'काळीज' याची सप्तमी). ८. काळसर्पाच्या विषानें माखलेला बाण.

कवि वृद्ध कथिति, ' पूर्वी होता पांथैककाळ[1] खळ, कोळी;
तो वाल्मीकि कवीश्वर; यद्घनगांची[2] सुरर्षि करि होळी.' ४३
तैसें त्वांहि करावें, तारावें मज; भले तुम्हीं दोघे
फुकट विमळ यश मिळतां, टाकी मागें कुधी, सुधी तो घे. ४४
जलदोदारप्रभुनें[3] तर्पावे सर्व सारखे दास;
न्यूनाधिकप्रसादें धरि सेवकचित्त फार खेदास. ४५
जालें स्मरशरपातें हृदय शतछिद्र, जेंवि बा ! धिरडें;
सीतेसि रामविरहीं, तैसेंचि मलाहि पढवि आधि रडें. ४६
अज्ञानदशमुखें मज या भवसिंधूंत कोंडिलें क्रूरें;
शूरें घ्यावा माजा त्वांचि समाचार सत्कृपापूरें. ४७
बा ! उद्धरीं मला; मीं पापी, लटिकेंचि कोण निंदुनि घे ?
मिथ्या दुःख मिरवितां, नेत्रांतुनि काय अश्रुबिंदु निघे ? ४८
प्रभु तुज ठेउनि गेला, स्वस्थ स्वपदासि; त्वां तयामागें
जागेंचि असों द्यावें मन दीनजनावनीं महाभागें. ४९
प्रभु दीनबंधु; तदधिक जपतां[4] दीनासि, तत्प्रसाद घडे;
जपतां[5] नामासिच, परि होतां बोभाट, केह्वड्यास पडे ? ५०
आधीं नित्य जपावें दीनातें, फावल्यास नामातें;
ऐसें भूतदयान्वित जें, बहुमत होय दास्य रामा तें. ५१
किति जपसी नामातें ? जालें वश, तुज कधीं न सोडील.
गोडी लक्षुनि राहे प्रेमासवपानलुब्ध[6] खोडील[7]. ५२

---

१. वाटसरूंचे प्राण घेणारा. २. ज्याच्या पातकरूप पर्वतांची. ३. मेघासारख्या उदार धन्यानें. ४. काळजी घेतली असतां. ५. जप करितां. ६. प्रेमरूप मद्याच्या प्राशनास आसक्त. ७. खोडकर.

रामयशोमृत सेवुनि तृप्त न होती कवी, अधासी ते.
राहों द्या, जरि न तसे साधु तुम्हीं, तरि कसे बधा[1] सीते ? ५३
प्रभुमूर्ति, प्रभुभक्ति, प्रभुचरित, प्रभुयश, प्रभुस्तोत्रें
सेवुनि, अतृप्त तुमचीं नव्हति अधासी दृगंगवाक्श्रोत्रें[2] ? ५४
हनुमंता ! भगवंता ! स्तविती कवि ती तुजी प्रकृति सारे;
कीं प्रभुपदप्रसादें केलें विश्वांत पात्र तुज बा ! रे ! ५५
पडलों तुझियाचि गळां, कीं येसी तूंचि संकटीं कामा;
रामा चिंतित नहती देवी ? कीं विसरलीच तन्नामा ? ५६
म्हणसील लंघिला, परि परिमित तो सिंधु एकशतगावें[3]
तरि अपरिमितेंहि भवें[4] त्वदतुळदृगबिंधनांत[5] न तगावें. ५७
दयिताभिज्ञानामृतदानोदारा[6] ! अशक्यकार्यकरा !
वानी[7] बा ! नीतिपटो ! तुझियाचि सदा सभार्य आर्य करा. ५८
तो अभयंकर, सुखकर, तव कर सर्वत्र सम, समर्थ असो.
प्रणतशिरीं पळभरि तरि, जलजावरि जेंवि राजहंस, बसो. ५९
अशुचि अयोग्य वसाया, योग्य तुझ्या बा ! पदासमीप शुची;
म्हणुनि उपानत्तनु[8] हें स्नेहें[9] योग्या पदास; मीं पशुचि. ६०

---

१. वश व्हा. २. नेत्र, वाणी व कान. ३. शंभर योजनें. ४. संसारानें. ५. त्वत्+अतुल+दृश्+अप्+इंधनांत=तुझें अतुल दृष्टिरूप जें उदक तेंच काष्ठ त्यांत. ६. दयिता+अभिज्ञान+अमृतदान+उदारा ! (रामाच्या दयितेला (सीतेला) खूण म्हणून मुद्रिकेचें अमृतदान देणाऱ्या उदारा !). ७. वर्णन करी. ८. उपानह् (प्रथमा एकवचन ‘उपानत्’) रूपी शरीर. ९. प्रेमानें (पक्षीं, तेलानें).

करितां पुढें स्वदासें निजदेह स्थूळ सूक्ष्म हे मोचे[१],
तरि राय काय पाय प्रेमें द्याया तयांत[२] संकोचे ? ६१
नसते उदंड दंडानुग्रहपात्रें[३] जगांत खळ पापी,
तरि यश कसें उपजतें ? तूंचि न तव्र धवहि[४] ज्या सदमृता पी. ६२
या जी ! उद्धार करा दीनाचा; पाहतां किती अंत ?
संत न अंत पहाती, हातीं असतां समर्थ भगवंत. ६३
दवडाया दीनांचीं दुःखें, सर्वस्व वेचिती संत.
संतप्तां निववी घन, वन शृंगारी वकारवान्संत[५]. ६४
पुष्कळ भाग्य; न वेचे लुटितां विश्वेंहि भाग लक्षावा[६];
रक्षावा कृपणेंचि; व्ययवान्[७] अर्थ न परार्थ लक्षावा[८]. ६५
यावें, दर्शन द्यावें, बोलावें, डोलवूनि डोलावें,
वाटे स्व'मंत्ररामायण' निज नाटक तुम्हींच तोलावें[९]. ६६
प्राकृत म्हणोनि निर्भर हांसोत अतज्ञ, नीच, मत्कृतिला.
परि जाणसील बा ! तूं रसिककविवरा ! मनीं चमत्कृतिला. ६७
प्राकृत म्हणोनि कां हो ! पाहों ना म्हणति धरिति संत रती ?
प्रभु नर, वानर तूं, हें म्हणतां, काय न सुखासि[१०] अंतरती ? ६८

---

१. जोडे. २. 'प्रेमें द्याया तयांत' या शब्दांऐवजीं **पंत**लिखित दुसरा पाठ– 'स्थापाया स्वोचितांत' असा आहे. ३. शिक्षा व कृपा यांच्या योग्यतेनें. ४. धनीसुद्धां, ( श्रीरामचंद्रसुद्धां ). ५. वकारवान् संत= वसंत –**पंत**. ६. पांचवा, सातवा याप्रमाणें "लक्षावा" हें "वा" प्रत्ययांत क्रमवाचक संख्या-विशेषण. ७. खर्च होणारा ( अर्थ-संपत्ति ). ८. मानावा. ९ तुलना करून घ्यावें. येथें **पंत** आपल्या 'मंत्ररामायणा'ची योग्यता 'हनुमन्नाटका' इतकी आहे, असें दर्शवीत आहेत. १०. 'काय न सुखासि' याऐवजीं **पंत**लिखित दुसरा पाठ– 'स्वसुखा न काय' असा आहे.

तुमच्या पदप्रसादें फार चमत्कार अर्थयमकांचे
त्यांत प्रभुयश, तद्वशजगदुद्धाराधिनेंचि[1] यम कांचे[2]. ६९
निजपदुसेवकवदनें, आपणही, पढवितात कीरा[3] जे,
'तत्कलभाषण[4]' म्हणती 'अमृताहुनि मधुर' कौतुकी राजे. ७०
वीणा, वेणु, जडचि[5], परि, वाजवित्याची कळाचि बोलवित्ये;
अन्यांची काय कथा ? ती वादकमस्तकेंहि डोलवित्ये. ७१
जड बहु, कठिनहृदय, परि सजितां भूषार्ह होय जेंवि हिरा,
कीं सिंधुचेंचि तें, दे हिम, मधुर, स्वच्छ तोय जें विहिरा[6]. ७२
बा ! मारुते ! रुते जें स्पर्शेंचि मना, जसें करा कुशळ[7],
वचन तसें न मुखा यो[8]; या शिष्याचें असें करा कुशळ. ७३
दुर्लभ आयुष्य, तया विषयव्यसनीं[9] वृथा न सारु[10] चिर[11].
'रुचि रघ्वीश्वरचरितीं सतत असो,' सुवर दे असा रुचिर. ७४
भीमा[12] ! भी माजें मन कीं 'मंद असें' न विनवितां चुकलों.
सुकलों तरि मीं चातक करुणामेघा ! स्वजीवना[13] मुकलों. ७५
प्रायः पामर पटुहि प्रभुतेजें प्रार्थनेंत चुकतात;
तरि सत्प्रभुप्रसादाप्रति पहिल्या पात्रते न मुकतात. ७६

---

१. प्रभुयशाला वश झालेल्या जगाचा उद्धार झाल्यामुळें होणाऱ्या दुःखानें. २. धास्ती घेतो; भितो. ३. पोपटाला. ४. त्याचें (पोपटाचें) मधुर भाषण. ५. निर्जीव. ६. मोठा झरा. ७. लाकूड, गवत, वन्य तृण इत्यादींचें अति बारीक कूस, (सूक्ष्म अग्र). ८. येवो. (ग्राम्य भाषणांत येणारें 'ये' धातूचें विध्यर्थी रूप). ९. भोग्य वस्तूंच्या आसक्तींत. १०. खर्च करो. याचा कर्ता 'हा' म्हणजे 'मी' मोरोपंत. ११. चिरकाल, फार वर्षें. १२. मारुति हा रुद्रावतार म्हणून त्यास 'भीमें' म्हटलें आहे. १३. पाण्याला (पक्षीं, जीविताला).

वदतां कविकोटींत स्खलन[1] न तुजसारिख्याचि सु-कवीतें;
अन्यां सन्यायांहीं स्पष्ट प्रभुचेंचि तेज चुकवीतें. ७७
चुकणें भूषण आम्हां, भूषण करणें क्षमा तुम्हां देवा;
अनुरागें, कीं रागें, करचरणांभोज[2] या शिरीं ठेवा. ७८
चित्तांतूनि खरी जरि रुचि रामयशीं असेल या दासीं;
तरि हो तुजशीं मजशीं, अंबुधिशीं भेटि जेंवि यादासीं[3]. ७९
ज्याच्या चरितश्रवणीं हृदय द्रवतें तुझें सदा साधो !
प्रिय तन्नामचि मज जरि, तरि चिंतित कार्य एकदा साधो. ८०
मच्चिंतित हेंचि, तुझें प्यावें पदपद्ममधु यथाकाम;
कां मन रामनताचें न वळेल श्रवण जालिया नाम ? ८१
दीनासि आंजनेया ! ने या संसारसिंधुच्या पारा
मज; करितां[4] श्रवण, मनन, मन न स्थिर होय, बा ! बरा पारा. ८२
ज्याकरवीं सत्संग स्वात्मज्ञानें कुतर्क टाकवितो,
होय समर्थ कराया स्ववश मना मत्तमर्कटा कवि तो. ८३
त्वां ज्या सदुपायें मन वश केलें, तेहि शत्रु कपिपा[5] ! सा[6];
तो मज उपदेशावा; तद्भिन्नामृतरसींहि न पिपासा. ८४
तूं रामदास, मींही, तूं म्हणसी ' राम राम ' बा ! मींही;
तूं मुक्त, बद्ध मीं कां ? रीति बरी काय रामनामीं ही ? ८५
आधीं रा, मग म, असे अव्यवहित[7] वर्ण दोन नामाचे
उच्चारितसें स्वामी ! ते उफराटेचि[8] काय कामाचे ? ८६

---

१. चूक. २. कर + चरण + अंभोज = करकमल किंवा चरणकमल. (अंभोज=कमल). ३. मत्स्याशीं, माशाशीं. ४. 'मज; करितां' या शब्दांऐवजीं **पंत**लिखित दुसरा पाठ– 'काय करूं ?' ५. वानरांच्या पालनकर्त्या ! ६. सहा (कामादि). ७. मध्यें कांहीं नसलेले, अगदीं नजिकचे. ८. वाल्याकोळी म आणि रा असे उलटे वर्ण म्हणत होता, तरी तो तरला, या कथेकडे कवीचें लक्ष्य आहे.

मी 'राम राम' म्हणतों; उच्चारी वर्ण कोण उफराटे ?
वाटे शंका प्रथमचि, यास्तव जावूं नयेचि त्या वाटे. ८७
श्रोत्यांस प्रिय, सुप्रिय, वक्त्यांस सदैव मंगळ, श्राव्य,
त्या व्यक्ता वर्णक्रममार्गा लंघी न गुरु[१] न वा काव्य[२]. ८८
राहो वाल्मीकिकथा, पडलें[३] मार्जेचि मज अहो ! आतां;
सांगा, पावन करितें पाप्याला नाम हें कसें गातां ? ८९
गातां तुम्हीं कसें हें ? गावें आम्हीं कसें वरें नाम ?
सामर्थ्य प्रकटीना हें काय ? तुम्हांविना जसा राम. ९०
तरि बा ! ऐसें जालें, तूं आणिक रामनाम यां संग
होतां, अघघ्नपण[४] ये, चूर्णहरिद्रादिभव[५] जसा रंग. ९१
आहेचि योग दोघां, क्षय नोहे विषयवासनापंका
झाला कसा ? दिसा ना, शांति न ये यावरूनि आशंका. ९२
वाल्मीकिशुद्धिकाळीं बा ! तूं होतासि काय ? कीं भिन्न
वर्णक्रम सम तोही म्हणतां झालाचि संशय छिन्न. ९३
नाम स्वतंत्र पातकनाशीं, तैसेंचि तूंहि सद्रत्न;
हेंचि स्वीकारावें; तरि चुकतो काय नित्य मद्यत्न ? ९४
मित्रें मिळतां, तेह्वां करितां दासाघनाश लवलाहें;
तुज 'नामरविछवि' कवि म्हणति; पहा स्वपदिं दीन लवला हें. ९५
जेथें नामनिधान प्रभुचें, तद्रक्षणीं सदा दक्ष,
लक्ष क्षणहि न चुकतां, तेथें वसतोसि तूं महायक्ष. ९६

---

१. बृहस्पति. २. शुक्राचार्य. ३. 'पडलें' याचा कर्ता 'कोडें' असा घ्यावा. ४. पापनाशनता. ५. चुना व हळद एकत्र केल्यानें उत्पन्न होणारा (लाल रंग).

जेथें साधुरसज्ञप्रवरा ! तूं कपिमुनीश्वरा ! बा ! गा !
तेथें प्रभुनाम वसे, भाग्य न सोडी जसें महाभागा. ९७
तुज नाम आवडे बहु, आवडसी तूंहि जीवना नामा;
वत्सावांचुनि वाळे, वत्सासहि पोषतोषकर, आमा[१]. ९८
तूं वायु वायुपुत्रा !, नाम सखा होय योग्य पावक-सा.
मत्कर्मलक्षकक्षक्षयदक्षा[२] ! हो सहाय, पाव कसा. ९९
दोष न लागो म्हणउनि, दोघांचे[३] उघडिलेचि कान नतें
म्यां; कीं तुम्हांस हांसे माजें जें तुछपापकानन तें. १००
दृढ लिंगदेहदुर्गाश्रित[४] कामाद्यहित हे अनावर हो !
यांचा क्षय, लंकालयदुष्टांचा[५] जेंवि, द्या मनावर, हो ! १०१
श्रीवाल्मीकिकवीश्वर वाखाणी विजय तो जसा, देवा !
तच्छिष्य मींहि भावें वर्णीन तुम्हांसि, हे घडो सेवा. १०२
प्रेम, प्रतिभा, शिक्षा[६], रीति पहा, आयका बरें कवन.
पवनप्रियपुत्रा ! बा ! म्यां हें केलें न निजगुणस्तवन[७]. १०३
श्रीमद्भागवतश्रीदशमस्कंधांत[८] दिव्य कृष्णकथा
त्या नूतन लिहिल्या मीं; वाचूं ? ऐका; रुचेल कर्णपथा. १०४

---

१. (मातेचा) स्तन. २. माझीं लाखों दुष्कर्मे हेंच जणूं गवत, त्याचा क्षय करण्याविषयीं जागरूक (अशा मारुते !). ३. वायूचे (मारुतीचे) आणि पावकाचे (नामाचे). वायु आणि अग्नि हे पापरूपी अरण्याचे नाशक होत. ४. लिंगदेहरूपी किल्ल्याचा आश्रय करून राहिलेले स्थूल, सूक्ष्म (लिंग) आणि कारण असे तीन प्रकारचे देह वेदांतवादी पंडित मानतात. पंचमहाभूतांनीं हे देह बनले आहेत. ५. लंका हेंच आलय (स्थान) ज्यांचें त्या रावणादि दुष्टांचा. ६. शिक्षण. ७. माझ्या गुणांची स्तुति. वास्तविक **पंतांनीं** येथें आपल्या काव्यगुणांची स्तुतिच केली आहे. ८. भागवताच्या दशमस्कंधांत संपूर्ण कृष्णचरित्र आहे. **पंतांनीं** रचिलेल्या या चरित्रग्रंथाचें नांव 'कृष्णविजय' उर्फ 'बृहद्दशम' असें आहे.

श्रीमद्विष्णुपुराणीं पाहुनि, अत्यंत आदरें रचिला
'प्रह्लादविजय' नाम ग्रंथ; पहा; नगचि मणिगणीं[1] खचिला. १०५

जैमिनिकृताश्वमेधस्थित 'कुशलवचरित' वर्णिलें आहे;
बा ! हे रीति पहावी; मज तों वाटे सुधानदी वाहे. १०६

वाचीन 'मंत्ररामायण' आधीं मींच, मग तुम्हीं वाचा;
वाचा वाचाया बहु झड घाली; ग्रंथ सत्य नावाचा. १०७

'संशयरत्नावळि,' 'सत्सत्कृति[2],' 'केकावळी,' 'चषक[3]' आर्या
त्वां ऐकावे ग्रंथ, प्रेमें प्याव्याचि 'रामनामार्या[4]'. १०८

'आर्यामुक्तामाळा' दावीन, परंतु जरि न मागाल;
लागाल प्रभुकंठीं घालूं, फुगवील कीं रमा[5] गाल. १०९

तुमच्या[6] पदप्रसादें, सद्गुरुनें जें असेल पढवीलें,
तें बा ! तुम्हांसि दाविन 'नामरसायन,' जपोनि कढवीलें. ११०

येइल मनासि, तरि द्या आज्ञा गाया स्वबाहुमहिम्यातें[7].
दाखविलें निज कवन श्रीमदनंताख्य[8] साधुसहि ग्यां तें. १११

---

१. हिऱ्यांच्या समूहानें. २. 'साधुसत्कार' नांवाचा ग्रंथ. ३. 'नामसुधाचषक' नांवाचा ग्रंथ. ४. यालाच 'नाममाहात्म्य' असें दुसरें नांव आहे. ५. मीं रचिलेली 'आर्यामुक्तामाला' जर तुम्ही प्रभुकंठीं ( विष्णूच्या गळ्यांत ) घालूं पहाल, तर रमा ( लक्ष्मी ) रागानें गाल फुगवील. कारण विष्णूच्या कंठास आलिंगून राहण्याचा फक्त लक्ष्मीचाच अधिकार आहे; तो माझी 'आर्यामुक्तामाला' हिरावून घेते कीं काय ? असें तिला वाटेल. ६. मारुतीच्या. ७. आपल्या बाहूंच्या महिम्याला. मारुतीच्या आज्ञेनें **पंतांनीं** 'श्रीहनुमन्नुति' हें काव्य 'नामरसायना'नंतर केलें असावें. ( स्फुटप्रकरणें भाग १ ला या पुस्तकांतील पृष्ठें ८६ ते ९० पहा ). ८. अनंत पाध्ये. हे **पंतांचे** गुरु होत.

रघुनाथपंत कोशे संप्रति गेले समीप सेवेला[1];
प्रेमें सिंचित होते या कवना ते, सखे जसे वेला. ११२
श्रीनारायणभक्त[2] ज्ञाते, श्रीपांडुरंगपदभक्त;
सेजारीं मीं त्यांच्या; पुसतां कथितील वृत्त ते व्यक्त. ११३
नित्य पुराणकथांचें यांसि, तुम्हांसहि, असे सम व्यसन[3].
करितिल अनंतनारायणबावा सर्वगुणसमुल्लसन[4]. ११४
दुर्गुण असेल तो हे कैसे कथितील? साधु कीं दृष्टी
पाहे आत्मानुभवें, असतांही दोष, राममय सृष्टी. ११५
आधीं पुसोनि यांला, मग तूंही ज्ञानदृष्टिनें पाहें;
मीं दास मयूरेश्वरपंतहि दृष्टीपुढेंचि कीं आहें. ११६

---

## ( ३ ) नाममाहात्म्य[5]

( गीतिवृत्त )

भागवतांच्या सुहृदा! नामा! तूं हरिसि सर्वपापदर.
यास्तव सदया! वरदा! दीनें म्यां पसरिला तुला पदर. १
दैवें तुजसीं सत्सहवासांत नवीच ओळखी पडली.
तूझ्या मधुरतरगुणीं अतिचंचळ चित्तवृत्तिही जडली. २

---

१. संप्रति समीप ( तुमच्याजवळ ) सेवेला गेले. म्हणजे नुकतेच मरण पावले. २. 'भक्त' ऐवजीं 'भट्ट' असा पर्याय **पंतांनीं** सुचविला आहे. ३. आसक्ति, छंद, नाद. ४. 'सर्वगुणसमुल्लसन' या ऐवजीं **पंतांनीं** 'साधुगुणसमुल्लसन' असा पर्याय सुचविला आहे. समुल्लसन = प्रकटीकरण. ५. या काव्याला 'रामनामार्या' असेंहि म्हणतात. ( "नामरसायन" मधील पृष्ठांक ३० वरील क्रमांक १०८ ची आर्या पहा ).

नारद्वाल्मीकिशुकव्यासादि सखे तुझे तुला भजती.
मित्र[1] तुझें म्हणवाया, कैंची दीनास योग्यता मज ती ? ३
परि[2] तूं राघवनामा ! बहुवत्सळ, साधुगीतगुण, थोर.
म्हणउनि सखा म्हणें तुज मीं दीन, जसा पयोधरा मोर. ४
सर्वत्र स्नेह तुझा सम, समयीं संकटीं पुढें होसी.
परमपदीं बैसविसी रंकहि, देउनि सुलग्न तूं जोसी. ५
तूं मात्र रामनामा ! कामा येसी, न पाहसी दोष.
दुसरे सखे सखेद त्यजिती, करिती नयच्युतीं रोष. ६
पात्र रघूत्तमनामा कामारि[3] जसा निजप्रसादास,
केला त्वां कामजितस्वांत[4] दयास्पद जसा तसा दास. ७
रघुपतिनामा ! महिमा केवळ वर्णावया न मीं, न शके
वाल्मीकिहि, जें गरुडा न लंघवे[5]. लंघिजे कसें मशकें ? ८
रामें निजप्रजांतें बहु सुख दिधलें, तसेंचि तद्राज्य.
नामा ! त्यामागें त्वां विश्वाला दाविलें सुख प्राज्य. ९
नामा ! या मातानीं ताह्रीं थानींहि लाविलीं मरती.
त्वदपत्यें दुस्तर-भवसिंधूंत जडांसि तारिती तरती. १०
नामा ! रामाचें तूं दीनजनत्राणलुब्ध कारुण्य.
कीं त्या स्वामरतरुच्या[6] उदारतेचेंचि मूर्त तारुण्य. ११
नामा ! यामागें तो त्वत्सम झाला नसे, नसे आतां
होणेंहि नसे; अमृता लाजवि ज्याचें विशुद्ध यश गातां. १२

---

१. 'मित्र' शब्द संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे. २. 'परि तूं राघव-नामा ! बहु' या शब्दांऐवजीं **पंत**लिखित दुसरा पाठ 'परि, दीनबंधु माझा तूं' असा आहे. ३. शंकर. ४. कामानें (मदनानें) जिंकलें आहे स्वांत (चित्त) ज्याचें तो. ५. 'न लंघवे' याबद्दल **पंत**लिखित दुसरा पाठ 'दुर्गम तें'. ६. स्वर्गसंबंधीं कल्पवृक्षाच्या.

नामा ! रामाहुनि तूं सदय; स्तुतिवाक्य हें न दासाचें.
न म्हणें, सत्य म्हणो मन बापा ! करुणासुधानदा ! साचें. १३
नामा ! स्वाम्यधिकनुतिस्तव[1] कोप तुझ्या मनीं न यो, ध्याती–
श्रीरामातेंचि कवी, कीं वैकुंठासि ने अयोध्या ती. १४
एक अयोध्या नेली, तर्हि मागें पुष्कळ प्रजा उरली.
तीची तव प्रसादें अमृतरसास्वादनस्पृहा[2] पुरली. १५
त्वांचि दिलें दीनांतें साधुनि वैकुंठ आपुलें वतन.
पतन प्रळयप्रयुतीं[3] न घडे, ऐसेंचि करिसि तूं जतन. १६
रामें तात त्यजिला शोकीं याहून कोण अत्याग[4] ?
नामें त्वां तद्धर्मावन[5] केलें न करितांचि तत्त्याग. १७
श्रीरामें एक क्रतु[6] रक्षुनियां, एक सुखविला विप्र[7].
पावविले[8], पावविसी, अमित क्रतु सांग[9] सिद्धिला क्षिप्र. १८
विश्वामित्र मुनी दे नेउनि रघुनायका यश क्रतुला,
नामा ! शतमखसिद्धिस सद्धेतु, म्हणे न काय शक्र, तुला ? १९
प्रभु सप्तवितस्ति[10] शिळा तीही भवमृगजलार्णवीं[11] तारी.
नामा ! त्वां लवणोदधिमध्यें गिरि अमित तारिले भारी. २०

---

१. (तुझ्या) स्वामीची (रामाची) अधिक स्तुति केल्याकारणानें. २. अमृतरसाचा स्वाद घेण्याची इच्छा. ३. प्रयुत = दशलक्ष. ४. अति + आग = मोठा अपराध. ५. त्याच्या (दशरथाच्या) धर्माचें रक्षण. ६. यज्ञ. ७. ब्राह्मण (विश्वामित्र). ८. 'पावविले पावविसी' याबद्दल **पंत**लिखित दुसरा पाठ 'नामा नेले नेसी' असा आहे. ९. स + अंग = सर्व अंगोपांगांसह; यथास्थित. १०. सात विती (लांबीची). ११. संसाररूप मृगजलाच्या सागरामध्यें.



मराठी
33872

श्रीरामें क्षत्रियकुळकाळ, तुवां जिंकिला जगत्काळ,
तो भवचापचि[1] खंडी, तूं भवभवपाशजाळ[2] तत्काळ. २१
श्रीरामाच्या कंठीं घाली जनकाख्यनृपतिची बाळा;
तुझिया गळां सुरासुरनरवरसद्वृत्ति घालिती माळा. २२
विश्वस्तप्रतिपालन, दुर्जनचित्तप्रसादन[3] स्वैर
केलें, आणि न केलें पुण्यजनेश्वरकुळीं[4] तुवां वैर. २३
जे शरणागत घालिति बा ! नामा ! त्वत्पदीं मिठी प्राज्य,
कल्पशतींही न सरे ऐसें देसी तयांसि साम्राज्य. २४
थोर, समर्याद, सरस, कुलज, गभीराशय[5], स्वपथवर्ती
तो लंघिला न, बद्धहि केला, न दिल्ही स्वगोत्रजा अर्ती[6]. २५
न्हाउनि पावककुंडीं[7] आल्यावरि शरण, जोडुनी हात,
स्वीकृति करितासि सख्या ! नामा ! तरि, न प्रसाद, तो घात. २६
खळकृतदोषारोपें जरि तवपदसेवनासि अंतरती,
प्राणसख्या ! नामा ! मग साध्वी[8] सन्मंडळी कसी तरती ? २७
लंघविली मर्यादा भीतां, नमितां, बळेंचि जरि विधिनें[9],
तरि न त्यागिसि सुहृदा ! नामा ! त्वां पाळिलें दयानिधिनें. २८

---

१. शंकराचें धनुष्य ( सीतास्वयंवराचे वेळीं रामानें मोडिलेलें ). २. शंकराचें संसारपाशरूप जाळें. ३. प्रसादन=शुद्धीकरण. ४. पुण्यजन (=राक्षस) + ईश्वर + कुळीं =रावणाच्या कुळाचे ठिकाणीं. ५. गंभीर चित्त ज्याचें असा. ६. पीडा. ७. ( सीतेनें केलेल्या ) अग्निप्रवेशदिव्यांत. ८. " साध्वी ... तरती ? " या पाठाऐवजीं **पंत**लिखित दोन पाठ असे आहेत- (१) " दासी नतमंडळी कसी तरती ? " इति वरं; (२) " दीना नतमंडळी०". ९. दैवानें.

त्वत्पदवियोगघटिका युगशतगुर्वी तवाश्रितां होय.
श्रीरामवानराचें नाम नरा परि सधैर्य बहु हो य[1]. २९
राक्षस निष्ठुर, वानर अतिचंचळ, ऋक्ष[2] मंद, राहो तें.
दास्य स्मरतां कैसें सदसद्विपदब्धिमंदरा[3] होतें ? ३०
तुज विषयकामवशमति सेवाया सुमधुरासि अनुसरती.
त्वां बहु विटंबितां, कसि अबळजनांची मनोव्यथा सरती ? ३१
नामा ! सामात्य प्रभु गेला स्वपदांतरासि ज्या काळीं,
दे अधिकार तुज निजप्रतिनिधिला कीं, सुखें प्रजा पाळीं. ३२
नामा ! यामागें तों त्वत्सम राजा न ऐकिला कोणीं.
देसी कर प्रजांतें स्वपदहि; त्या जाति सोडुनि क्षोणी[4]. ३३
रंजविले लोक सकळ सामें, दानें, जसे असु ज्ञानें;
कंटक सुमृदूपायें स्ववश करावे कसे असुज्ञानें[5] ? ३४
नामा ! या माहात्म्यें निरुपम तूं सद्धना ! अगा ! रामीं
सादर दासींहि; म्हणुनि गातों तुज सुमतिच्या अगारा मीं. ३५
कामाहितविश्रामा[6] भाविकजनबाळजीविका[7] धामा[7] !
नामा ! रामाबाई आईचा अमृतपूर्ण तूं आमा[8]. ३६
नामा[9] ! जामाता तूं करिसी निज दास, आत्मजा मुक्ती
देसि, म्हणूनचि पुष्कळ गौरविसी; सूचली भली युक्ती. ३७

---

१. य=यश. २. अस्वल. ३. साधु व असाधु यांच्या विपत्तिरूप समुद्रांतील मंदरपर्वताला. ४. पृथ्वी. ५. अपंडितानें. ६. मदन हा ज्याचा अहित त्या शंकराला सुखविणाऱ्या ( नामा ! ). ७. निष्ठावान् व भोळे अशा लोकांना आधारभूत अशा तेजा ! ८. स्तन. ९. अन्वयार्थः- नामा ! निज दास ( आपल्या दासाला ) तूं मुक्ती ( हीच ) आत्मजा ( कन्या ) देसि ( आणि त्याला ) जामाता ( जांवई ) करिसी.

नामा ! बा ! माज्या तूं अधनाशक्तांसि लावुनी कासे,
मायानदींत तारिसि फुकट सदा; मज विचित्र हें भासे. ३८
नामा ! कामाद्यरिपरिभव[1] भवनस्थाबळासहायास[2]
सुकरचि तव प्रसादें; देसी बळ खळबळा सहायास[3]. ३९
तृष्णानदींत अधना तारिसि तूं नामराज नावाडी.
तोचि उदार, सदनीं जो क्षुधिता पामरा जना वाढी. ४०
नामा ! रामाचा तूं विश्वासू काय मुख्य जासूद ?
पाठविला वाढाया अमृत शशी[4] प्रथम, तूं दुजा सूद[4]. ४१
नामा ! बा ! माहेरा न्याया आलासि काय तूं मूळ[5] ?
न सुचेचि कामधाम, प्रकट स्वांतासि लाविलें खूळ. ४२
नामा ! रामाचा तूं प्रसाद[6], विसरसि बुधा ! न दीनातें.
कीं झालासि अमृतकर[7] सुत त्या करुणासुधानदीनातें[8]. ४३
प्रभुपदिं भवसिंधूद्धृत[9] मुक्तांची नित्य एक लाखोली
वाहसि, जाणसि कुशळा ! भवाब्धिची तूंचि एकला खोली. ४४
‘ आम्हां रामप्रभुच्या गाईचा तूंचि रक्षिता गोप
भो ! पद्महस्त ! साधो ! ’ एवं वाक्यें तुला नसो कोप. ४५

---

१. कामादि (सहा) शत्रूंचा तिरस्कार. २. भवनस्था+अबळासहायास=घरांत राहणारास व स्त्री सोबती ज्याला त्यास. ३. सोसण्यासाठीं. ४. चंद्र. पहिला अमृत वाढणारा चंद्र. दुसरा अमृत (मोक्ष) देणारा तूं सूद (नामरूपी वाढपी). ५. (माहेरचें) बोलावणें, निमंत्रण. ६. “प्रसाद” ऐवजीं **पंत**लिखित पाठ ‘प्रेमा’. ७. चंद्र. ८. करुणासुधानदी+इनातें=दयारूप अमृतनदीचा स्वामी (सागर, जो राम) त्यातें. (नदी+इन=सागर). [अमृतमथनाचे वेळीं चंद्राची उत्पत्ति सागरांतून झालेली आहे]. ९. भवसिंधूंतून वर काढलेले (जे मुक्त त्यांची).

कीं भजकजीववृंदक्रीडेचें[१] हें निजोपवन[२], माळी
तूं नामा ! कुशळ, म्हणुनि दे तुज रक्षाधिकार वनमाळी. ४६
नामा ! रामानें तूं आम्हां दिधलासि साधु जामीन[३].
कीं सन्मनस्तडागीं आत्मा झाला असे तुजा मीन. ४७
तूं बापा ! पापाशन[४], नागाशन जेंवि होय पक्षीन[५].
भक्षूनि पापपर्वत, म्हणसि पुढ़ां काय कणहि भक्षीन ? ४८
पातकिजनसंसर्गें होतो शुचिशीळही महापापी.
व्यापी न त्वत्तनुला, कीं ते पुण्यांबुपूरिता[६] वापी. ४९
देसी पुण्यें, घेसी पापें, या वस्तुच्या खरेदीनें
श्री तुज, अमृता ! तृप्तें आशीर्वादचि दिहे खरे दीनें. ५०
त्वां ते अमरचि केले, जे जे भवराजयक्ष्मसुग्रास[७],
धन्य, प्रसन्न केलें बहुधा विद्यागुरूस उग्रास[८]. ५१
साचा चिंतामणि तूं; लोकश्रुत पामरेड्य[९] तो गोटा;
मिरवी यश अबुधांतचि; दावीना त्वज्जनासि मुख खोटा. ५२
दाटुनि भवसिंधुमधें[१०] कंठीं बांधील कोण तो धोंडा ?
न ठकवि कविमन केवळ[११], तो दैवहि, चौर्य हो क्वचित् कोंडा. ५३

---

१. भक्तप्राण्यांच्या समुदायाच्या विलासाचें. २. आपली बाग. ३. हमी किंवा ओळख देणारा. ४. पापभक्षक. ५. पक्षिन् (पक्षि)+ इन = पक्षिश्रेष्ठ (गरुड). ६. पुण्यरूप उदकानें पूर्ण. ७. संसाररूपी क्षयरोगाचे ( राजयक्ष्म्याचे ) उत्तम घास. ८. महादेवास. ९. पामर + ईड्य = दरिद्री माणसांनीं स्तुति केलेला. १०. मधें = मध्यें. ‘ मधें ’ हें मराठी बोलीभाषेंतील रूप **पंतां**च्या कवितेंत अगदीं क्वचित् आढळतें. ११. “ केवळ ...... कोंडा ” याबद्दल **पंतां**नीं पुढील तीन पर्याय सुचविले आहेत. ( १ ) ‘ हें धन, त्याकरवीं दैव चोरवी कोंडा ’, ( २ ) ‘ हें धन, विधिविभु दाटूनि चोरवी कोंडा ’, ( ३ ) ‘ हें धन, दैवप्रभु चोरवी बळें कोंडा ’.

स्वाश्रितकल्पित पुरवूं म्हणती, तीं तों निळाजिरीं झाडें;
वेडी[१] स्थावरता; खळवशता लघु; कां न मोडिलीं हाडें ? ५४
तूं अमृतशालि[२] नामा ! भगवज्जनवदनपद्म तें चाडें[३]
प्रेमळजनसुक्षेत्रें, भरिसि[४] पिकें, मिळसि आपुल्या पाडें. ५५
वृष्टि यथोचित सुमधुर रामायणनाम सत्कृती आद्या,
जी भवदुष्काळाच्या[५] पढवी राज्यामध्यें[६] महावाद्या. ५६
दैवें देतां घेती हर्षें पदरीं दशा जगन्निंद्या
भुलल्या तुज सुकविमती; म्हणती पाठाउ[७] फाटक्या चिंद्या. ५७
पुरुषोत्तम पुरुषांत प्रणतांवरि कामनानुरूपार्थीं
वर्षे; मंत्रोत्तम तूं मंत्रांत तसा, जसा गुरू[८] पार्थीं. ५८
कळिकाळीं मंत्रांचें तेज प्रतिवासर क्षया जाय.
तेज[९] चढे तुज नामा ! बहु माने काळ हा तुला काय ? ५९

---

१. 'वेडी स्थावरता … … हाडें' याबद्दल **पंत**लिखित दुसरा पाठ 'वेडीं, मुकीं, म्हणोनिच बा ! सदयें त्वां न मोडिलीं हाडें'. २. अमृतरूपी साळी (भाताचें झाड). ३. बीं पेरण्याकरितां नांगरावर बसविलेलें लाकडाचें पात्र. ४. 'भरिसि पिकें, … … आपुल्या पाडें' या शब्दांबद्दल **पंत**लिखित पुढील तीन पर्याय आहेत. (१) 'भरिसि पिकें अमित आपुल्या पाडें', (२) 'अनंत भवदुद्यमीं मिळे भाडें', (३) तो भवदुद्यम अनंत दे भाडें'. ५. भवदुष्काळाच्या' या शब्दाऐवजीं **पंत**लिखित 'भलि दुष्काळाच्या', 'कलिदुष्काळाच्या' असे पाठ आहेत. ६. 'मध्यें' असें म्हटल्यास एक मात्रा जास्ती होते. त्याऐवजीं वरील आर्या ५३ मधील 'भवसिंधुमधें' या शब्दावरील टीपेंत सांगितल्याप्रमाणें येथें 'राज्यामधें' असें म्हणावें. ७. पाटाव = चित्रविचित्र नक्षीचें रेशमी वस्त्र. ८. द्रोणाचार्य. ९. 'तेज चढे तुज……काय ?' या सबंध चरणाबद्दल **पंतां**नीं पुढील दोन पर्याय सुचविले आहेतः— (१) 'तेज चढे तुज नामा ! माने प्रकृतीस काळ हा काय ?' (२) 'तेज चढे तुज, बा ! हा काळ प्रकृतीस मानला काय ?'

नामा ! मामाकाकादादाबाबादि आप्त जन्माप्त[1],
स्नेही तेही तूंही; त्वत्स्नेहें परि जगत्रय व्याप्त. ६०
तूं हंस सत्सरीं, तूं मधुकरवर सज्जनास्यपद्मांत,
तूं[2] सर्वार्थ प्रकटिसि दीप ब्रह्मांडराजसद्मांत. ६१
दुष्टां कळिवांचुनि, तूं आवडसी फार साधुचित्तास;
तुज जपति[3] परमहंसहि नित्य, जसे कृपणलोक वित्तास. ६२
ज्ञानदरिद्रां[4] गमसी भर्म[5], बहु प्रेमळां खरा धर्म,
कामाद्यरिसमरीं सद्वर्म[6] मला, कळिस मात्र तूं मर्म. ६३
आम्हीं तुझियाचि पदीं घट्ट मिठी घातली; तपो[7] लोक,
आम्हां[8] तूं कोटि; तयां देवू सत्या फळा तपोलोक[9]. ६४
नामा ! तुझी उपश्रुति[10] उबगेना[11] क्षण दयावती धात्री
आम्हां बाळां भरवी अमृतरसें भरुनि हरिकथापात्री. ६५

---

१. जन्मप्राप्त. २. 'सर्वार्थ प्रकटिसि, तूं' असाहि पाठ **पंतांनीं** 'दोंत एक घ्यावें' असें लिहून सुचविला आहे. ३. (१) जप करतात. (२) रक्षण करतात. ४. ही ६३ क्रमांकाची सबंध आर्या **पंतांनीं** पुढीलप्रमाणें लिहिली आहे:— भर्म ज्ञानदरिद्रा, धर्म अशक्तास, नर्म अत्यार्ता । मर्म खळा, कर्महता शर्म, महा वर्म मज तुझी वार्ता ॥ ५. सुवर्ण. ६. उत्तम कवच. ७. तप करो. ८. 'आम्हां तूं कोटि ...... तपोलोक' या पाठाऐवजीं **पंत**लिखित दुसरा पाठः—'बा ! वैकुंठा ! तुजहुनि अधिक न विधिलोक, किति तपोलोक ?' ९. पृथ्वीतलावरून अंतरिक्षाकडे जाणारा सहावा लोक. स्वर्ग, पृथ्वी व पाताळ हे तीन लोक प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं पृथ्वीच्या वर व खालीं सात सात लोक कल्पिले आहेत. पृथ्वीवरून अंतरिक्षाकडे जाणाऱ्या सात लोकांचीं नांवें अनुक्रमानें:- भूर्लोक, भुवर्लोक, स्वर्लोक, महर्लोक, जनर्लोक, तपर्लोक, सत्यलोक. पृथ्वीच्या खालील सात लोकांचीं नांवें अनुक्रमानें-अतल, वितल, सुतल, रसातल, तलातल, महातल, पाताल. १०. दिव्य वाणी. ११. 'उबगेना क्षण' याबद्दल **पंत**लिखित दुसरा पाठ – 'नुबगे क्षण बहु'.

नामा! आम्हां तसि तव संगति, अंधा जना जसी यष्टी
अवलंबिल्या, न होवूं देसी निजमार्ग चालतां कष्टी. ६६
आम्हां दीनजनांचें नामा! तूं पाठिबळ समुत्साही.
करिसि कृपाचि, न कोपसि, मूर्खपणें केलिया स्वकुत्साही[१]. ६७
यद्रसनापीठीं तूं ठेविसि पद, त्यासि वरि महापदवी.
सुकवि सुखवी क्रमोपक्रमसमयचि[२], निरुपम स्तुती वदवी. ६८
यद्रसनाग्रीं नाचसि तूं होवुनि सुप्रसन्न नटसा रे!
नाचों लागति त्याचे भवपाशविमुक्त पितर चट सारे. ६९
स्वाश्रितकमलवनाच्या बोधार्थ[३] करी रवि प्रकाशाला.
नामा! दिव्यवसंता! हा[४] त्यजिसि करीर-विप्र[४] काशाला? ७०
धुतल्याही पुण्यजळें, मीं वरचेवरि मळेंचि[५] करि-शील[५],
नाममहामात्रा[६]! मज पुनरपि निर्मळ बळेंचि करिशील. ७१
ग्रीष्मीं मरुपथिका[७] दे भेटि झरा उत्तमा त्रिवाळयाचा;
जो विमळ, मधुर, शीतळ, नांदेहि सुवास माजि वाळयाचा. ७२
बा! नामा! तूं जीवन दीनां, मीनां सदा जसा उदधी.
आम्हां[८] विष, अमृत दुजें मीनांसहि, सुमधु सुपय हो सुदधी. ७३

---

१. 'स्वनिंदाही' असाहि **पंत**लिखित दुसरा पाठ आहे. परंतु पहिल्याच पाठाला त्यांनीं 'इति मुख्यः' असें म्हटलें आहे. २. क्रमाचा प्रारंभ-समयच. ३. जागृतीसाठीं. ४. नेपत्याच्या झाडासारखा ब्राह्मण (मी मोरोपंत). नेपत्याच्या झाडाला वसंत ऋतूंत पालवी फुटत नाहीं; तर उलट त्याचीं पानें गळून जातात. ५. हत्तीला कितीहि धुतलें तरी पुन्हां तो अंगावर माती उधळून घेतो हा त्याचा स्वभाव. त्याप्रमाणें मीहि वारंवार मलिन होत आहें; असा भाव. ६. नामरूपी (हत्तीच्या) महाता! ७. मारवाड देशांतील वाटसरूला. ८. अन्वयार्थः- (दुजें नाम) आम्हां विष, दुजें अमृत (मग तें) सुमधु, सुपय, सुदधी हो, मीनांसहि (विष).

मातृस्तन्यावांचुनि शिशुचा कृश होय वरदुधें काय.
बाळकपाळक जननीस्नेहचि, बोलोनि बहु बुधें काय ? ७४
सुमधुर उच्चार तुझे अमृताचे गोड म्हणति जे घोंट.
युक्तिश्रुतिसदनुभवप्रतिकूळमती[1] न साधु, ते थोंट[2]. ७५
नामामृता ! तुझा रस तृषितांतें[3] तृप्ति दे वपु निवेसी;
आम्हीं कथेसि वर्णूं; वर्णोत चकोर देव पुनिवेसी. ७६
तृप्ति सुखें अनुभविती रसवेत्ते लोक साखरेंत रसें;
रणगति[4] गीति हय हरिण जाणति; गुण तो कसा खरें[5] तरसें ? ७७
नामा ! तुझ्या रसाहुनि दुसरा रस लेश सेविना सुकवी.
मानसतटचातक, घनविरहीं जरि मुख सुके, पुह्मं सुकवी. ७८
ये बहु गोड रसें बहु वीट, म्हणुनि सेविती लवण-आलें.
तूं न तसा; नामरसा सेडुनि विषयांकडे कवण आलें ? ७९
एका तुझ्या गळां बहु जड पडले; भवसमुद्रही खोल;
नामा ! बा ! माझ्या तरि[6] तारिसि, परि मूर्ख लाविती बोल. ८०
भवकासारीं[7] स्वाश्रितयूथासह[8] साधु नामगज पोंहे.
पाहों सादर, बा ! दर न धरीं, लीला मना ! मग जपों हे. ८१
प्रकटे साकेतसरीं[9] नवमेघश्याम रामतामरस[10].
त्याचा सेविति गुणपरिमळहृत मुनिमधुपराज नामरस. ८२

---

१. सारासार विचार, वेदवाक्य आणि सज्जनांचे अभिप्राय यांच्याविरुद्ध बुद्धि असणारे. २. ठक, फसवे लोक. ३. 'तृषितांतें तृप्ति' याबद्दल **पंत**लिखित पर्याय 'तृप्ति जनां थोर' असा आहे. ४. अन्वयार्थः– रणगति (व) गीति (अनुक्रमें) हय (घोडे) (व) हरिण जाणति. ५. गाढवें. ६. होड्या, नावा. ७. संसाररूप सरोवरांत. ८. आपल्या आश्रितलोकरूपी कळपासह. ९. अयोध्यारूप सरोवरांत. १०. रामरूप कमळ.

रामपदीं नामपदीं लेशहि कविदृष्टिला दिसे न उणें.
अधिकचि कांहीं नाहीं तरि, कपिवर[१] न भुलताचि नामगुणें. ८३
नामा ! ज्या मारुतिच्या श्रीमन्मुनिगीत रामवल्लीला[२]
आल्या कोमल कलिका त्या त्वद्रुचिदा सकामवल्लीला[३]. ८४
कपि कवि वरी तुजचि, कीं बंधुवरि[४] दयाक्षमाद्यधाम[५] रुसे.
तव चरण नतीं रुक्ष न जाले, देवूनि आसरा, मरुसे[६]. ८५
भ्याला कपि कीं, ज्यांचा नयधर्मज्ञांसि मान्य अत्याग[७];
त्यागी स्त्री-बंधूही, स्थापुनि माथां बळेंचि अत्याग[८]. ८६
होय कवीश्वरनुत कृतिमतिनेंचि, न जातिनेंचि, तो कपिसा.
नामा ! बा ! मारुतिगुण जाणसि; जाणे न तत्व लोक पिसा. ८७
नामा ! महामहंता ! हा मेळविला भला नवा चेला.
दे तनुमन-वाचेला; न प्रार्थी भोजना न वा चेला[९]. ८८
द्रवलें न मन, न नयन, प्रेमामृत चाखिलें न गल्लीं[१०] तें.
त्वदपरिचयेंचि सेविति जन धनिकांच्याचि नित्य गल्लींतें. ८९
विसरेना तुज सुजनप्राणसख्या ! क्षणहि दास वानरही.
विसरे तुलातुला[११] मलरहितगुणा[१२] वरद वासवा नरही. ९०

---

१. मारुति– **पंत**. २. ‘श्रीमन्मुनिगीत रामवल्लीला’ याऐवजीं **पंत**लिखित दुसरा पाठ ‘मुनिगीता शेषतल्पवल्लीला’ असा आहे. ३. ‘त्वद्रुचिदा सकामवल्लीला’ याऐवजीं **पंत**लिखित दुसरा पाठ ‘त्वद्रुचिदा सकल्पवल्लीला’ असा आहे. ४. “बंधुवरि......रुसे” या चरणांबद्दल **पंत**लिखित पर्याय असे आहेत. (१) ‘न गणूनि दयाक्षमांस राम रुसे’ इति मुख्यः (२) ‘निर्मळ सौमित्रिदास राम रुसे’ इत्यभिवरं. ५. दयाक्षमा यांचें आद्यस्थान (श्रीराम). ६. मारवाड देशासारखे. ७. अ + त्याग = न टाकणें (सहवास, समागम). ८. अति + आग = मोठा अपराध. ९. वस्त्राला. १०. गालांत, गालांनीं. ११. तुलनेला अतुल (अशा वासवाला). १२. निर्मल गुणाच्या (वासवाला).

निजमार्गपरिभ्रष्टां बाळां सांभाळुनी परावासा[1]
नेसि सदाप्ता ! नामा ! परि भाससि दुर्जना परावा-सा[2]. ९१
जे लोक बंधुला[3] तुज सादर पीती न, वायसाराती[4]
ज्या दृष्टिधी न, ते व्यवहार करि शिवाशिवाय, सारा ती. * ९२
तुज सेवितील कैसे खळ भूत ? अहो ! तुवां महामंत्रें
खळपहिरण्यकशिपुचीं काढविलीं आत्मगुरुकरें[5] अंत्रें. ९३
नामा ! स्वामात्या तुज, राज्यभरोद्वहनयोग्यशक्तीस[6],
निजजनधनभवनपरित्राणाधिकृतिहि[7] विशुद्धभक्तीस[8] . ९४
काळहि चोरूं न शके, सरति न हरिल्याहि कीं अनंत धनें.
जपतां कृपण गुरूत्तम सम दोघेही; किती अधीर मनें ! ९५

---

१. पर + आवासा = उत्तमस्थानाला. २. परक्यासारखा. ३. बंधुल= सुंदर; मनोहर; असा जो तूं त्या तुला. समस्तं वा -- **पंत**. ४. वायस + अराति = कावळ्यांचा शत्रु ( घुबड ). याला दिवसा दिसत नाहीं, म्हणूनच याला ' दिवान्ध, दिवाभीत ' म्हणतात. * अन्वयार्थः- ( वायसारातीप्रमाणें = घुबडाप्रमाणें ) ज्या दृष्टिधी न, ती सारा ( डोळ्यांवरील पटलामुळें निरुपयोगी होय ). ते ( ती ) व्यवहार करि, ( परंतु ते ) शिवाशिवाय ( कल्याणकारक नाहींत असे असतात ). हे मनोहर नामा ! जे लोक तुझें आदरयुक्त सेवन करीत नाहींत ते घुबडाप्रमाणें दृष्टिज्ञानविरहित असतात. त्यामुळें त्यांचे व्यवहारहि कल्याणकारक होत नाहींत, हा भावार्थ. या आर्येच्या दुसऱ्या चरणांत ' दृष्टिधी ' या शब्दाऐवजीं **पंतां**नीं ' दृष्टयधी ' असें लिहिलें आहे. हा बहुधा हस्तदोष असावा. ५. नरसिंहाच्या हातून. ' आत्मगुरुकरें ' याऐवजीं **पंत**लिखित पाठ ' पोट फाडुनी ' असा आहे. ६. राज्यभार वाहण्याविषयीं योग्य सामर्थ्य ज्याचें अशास. ७. स्वभक्तरूप जें द्रव्यगृह त्याचा रक्षणाधिकारहि. या पाठाबद्दल **पंत**लिखित दुसरा पाठ ' निजजनधनभवनपरि प्रभु दे विकृतिहि विशुद्धभक्तीस. ' ८. **पंत**लिखित दुसरा पाठ न स्वीकारल्यास गीति ९४ व ९५ यांचें युग्म जाणावें.

एक निधिद्वार धरी, अलस स्वामी असा कसा मोळा ?
तदितर निधिसमवन[१] ...... भोळा न राज्य करि गोळा. ९६
कीं बहु उदार जरि पति, तरि नयनिपुणें गुरुप्रधानानें[२],
प्रभुकुशळार्थ, प्रभुता मिरवावी तच्छिरोपधानानें[३]. ९७
नामा ! उदार तूंही अप्रतिमचि; तोलितां न येसि उणा;
धर्में रक्षिसि गुरुधन; या सुतपें तुजहि लाभ होय दुणा. ९८
नित्य महाराज तुम्हीं स्वामी; नाम प्रधानपंत अजी ;
सोडवितां जलधींत ग्राहग्रस्ता[४] गजांसमेत गजी. ९९
स्वामी ! नारदबावा ! परम प्रिय त्या तुम्हीं, तुम्हां तोही.
कलहैकफळप्रतिपादक[५] सूचकशास्त्रपटु न कां मोही ? १००
भलत्यांच्या कर्मासीं स्वप्रभुसीं लाविसी कलह सद्या.
तेणें तुज, कीं त्वां त्या, नकळे चट लाविली समनवद्या[६]. १०१
वशउनि निजगुरुराजा, निजगुरुगुरुचेंहि राज्य आक्रमिलें;
एवं कलहविनोदें हा काळ बरें तुम्हीं सदा क्रमिलें; १०२
नामा ! तूं प्रबळ खरें, तुज वाटावें बरें, अशा भावें
लुडबुड करी भवत्प्रियसख सदनीं, तें कितेक सांगावें ? १०३

---

१. यापुढील अक्षरें खोडून पुढें ' मखदीत...' असें **पंतांनीं** लिहिलें आहे. त्यामुळें सहा मात्रात्मक शब्द कमी पडून बरोबर अर्थ लागत नाहीं. २. येथें **पंतांनीं** हस्तदोषानें 'गुरुप्रधाननें' असें लिहिलें आहे. ३. त्या राजशिराला उशीसारखा जो प्रधान त्यानें. ४. मगरानें धरलेली ( गजी = हत्तीण ) ५. 'प्रतिपा दक' असें म्हणावें लागत असल्यानें येथें यतिभंग झाला आहे. ६. सम्+अनवद्या=उत्तम, निर्दोष. यानंतर क्रमांक १०२ ची आर्या 'निर्णय-सागर' प्रतींत अधिक आहे. ती पुढीलप्रमाणें:—" त्रिभुवनराज्य प्रभुचें प्रतिनिधिनें त्वां स्वहस्तगत केलें; भोळ्या दिगंबराचें आक्रमिलें वतन, जळ जसें तैलें."

या काळांत भरभर[1] स्वामी ! तूझीच, कीं धणी हातीं;
घेसी आश्रितकामें एकामें[2] करुनि नुलवती[3] पातीं. १०४
दे दीनबंधु ! तुझिया दुर्लभ नामप्रसाद जों हातीं,
दीनजनाहीं तुजसीं तों, त्या भाग्यांत, लाविलीं नातीं. १०५
आर्जव करिति सदा बहु कवि; कवितानिपुण सेविती तुज ते;
मोटी आवडि दाविति; जाणों हा रस न चाखितां सुजते ! १०६
सर्वांमिष्टपदार्थांमध्यें तूं फार मिष्ट नामरसा !
पामर[4] साच्युत सांबहि तुज सेविति, जेंवि भृंग तामरसा[5]. १०७

---

१. भरभराट, उदयकाळ. २. एकदम. ३. न उघडवती. ४. 'पामर साच्युतसांबहि तुज सेविति' याबद्दल **पंत**लिखित दुसरा पाठ 'पामर सादर सेविति हरिहरही' असा आहे. ५. कमलाला. यानंतर पुढील दोन आर्या 'निर्णयसागर' प्रतींत आढळतात; त्या पुढें दिल्या आहेतः–

सनकादि बंधु चवघे, नारद, शुक, शंभु, मारुती चेले
नेले भुलवुनि, गेले संसारांतूनि, फार वश केले. १०८
रसिकासि वेड लावायाची विद्या तुला असे पाठ,
कीं ऐशा 'नामार्या' गाय मयूरेश एकशेंआठ. १०९

# २. रामायणांतील प्रकरण

## (१) अहिल्योद्धार[1]

( गीतिवृत्त )

श्रीमद्रामप्रभुच्या तीर्थास्पदभव्यपादकंजरजा[2]
नमन असो, कवि म्हणती शरणागतदीनवज्रपंजर[3] ज्या. १
दूषी शक्र बळें ज्या साध्वीला आदरूनि विटलीला[4],
जें उद्धरी तिला बहुनिंदितनिजजीवितासि विटलीला[5], २

---

१. संस्कृत ग्रंथांत ' अहल्या ' असें नांव आढळतें. मराठींत ' अहल्या ' व ' अहिल्या ' अशीं दोन्ही नांवें रूढ आहेत. अहल्या ही गौतमाची पत्नी. इंद्रानें गौतमाचें रूप घेऊन तिला भ्रष्ट केलें. हें कळतांच गौतमानें इंद्राला व अहल्येला शाप दिले. ' तूं शिला होऊन पडशील. एक हजार वर्षांनीं रामचंद्र येऊन तुला चरणस्पर्शानें उद्धरील. तेव्हां तूं स्वस्वरूपधारण करशील,' असा शाप त्यानें अहल्येस दिला. त्याप्रमाणें घडून आल्यावर अहल्येनें मोठ्या कृतज्ञतेनें श्रीरामाची स्तुति केली. ती या काव्यांत **पंतांनीं** ग्रथित केली आहे. या काव्यांत त्यांच्या प्रतिभासामर्थ्याचें, भक्तिरसाचें व कल्पनाशक्तीचें उदात्त स्वरूप प्रकट झालें आहे. २. तीर्थांचें स्थान आणि कल्याणरूप जें चरणकमलरज ( धूलि ) त्याला. ३. शरण आलेल्या दीनांचा वज्र ( अभेद्य, न मोडणारा ) पंजर ( पिंजरा ). ४. विट + लीला = जारलोकांची क्रीडा. ५. ( जी जीवितास ) विटली, कंटाळली, तिला. ( आर्या २ व ३ यांचें युग्म आहे ).

तें प्रभुपदनीरजरज वंदुनि गातों पवित्र तल्लीला,
जीला सज्जन सादर सेविति सोडूनि कल्पवल्लीला. ३
प्रभुला गाधिज[१] सांगुनि पूर्वकथा मुनिवधूसि[२] उद्धरवी.
पावे श्री ती नलिनी जैं उगवे रामरायशुद्धरवी. ४
स्पर्शमणिस्पर्शानें लोहाची मूर्ति कांचनी[३] होती[४],
प्रभुपदरेणुस्पर्शें होय सुशीळा शिळाचि जी हो ! ती. ५
जी बहुत करित होती पदरज वंदावया नवस, तीतें
वंदी सानुज राम प्रभु, दे आनंद तो नव सतीतें. ६
भगवान् गौतम आला जो सुज्ञ उमापतिप्रतिम, हर्षी
उद्धरितांचि प्रभुच्या चरणरजें त्या सतिप्रति, महर्षी. ७
पूजी गाधिजमुनिला नमुनि अहल्या, म्हणे, ' न आग[५] मनीं
धरिलें, सत्यदयार्णव ! मार्गी श्रमलां सुदूर आगमनीं. ' ८
आधीं गाधिजमुनिला, मग ती अत्यादरें तया[६] अर्ची,
ज्याचें पदरज झालें निजदुरितनगीं, जसें तृणीं अर्ची[७]. ९
झाडी केशांनीं प्रभुचरण, ध्याती शिवादि सुर ज्यांतें,
गोळा करूनि पदरीं सादर बांधी नमूनि सुरज्यांतें[८]. १०
प्रक्षाळूनि प्रभुच्या चरणांतें तीर्थतोय सांचविलें,
माथां वाहुनि केलें प्राशन, पात्रीं न लेश वांचविलें. ११
स्वतपोयोगोपस्थितसाहित्यें[९] ती सती अळंकारी,
शोभे प्रेमार्चिततनु[१०] मनुजाकृति देव नतकळंकारी[११]. १२

१. विश्वामित्र ऋषि. २. गौतमजाया अहल्या हिला. ३. सुवर्णमय. ४. होत्ये. ५. अपराध. ('आगस्' नपुंसकलिंगी शब्द). ६. श्रीरामचंद्राला. ७. अग्निज्वाला. ८. चांगल्या पवित्र धूलीला. ९. आपल्या तपोरूप योगानें प्राप्त जें साहित्य तेणेंकरून. १०. भक्तिभावानें पूजिलेली ज्याची तनु असा श्रीराम. ११. नम्र झालेल्यांच्या पापाचा नाशकर्ता.

शीतळ सुगंध, निर्मळ जळ, बहु सुस्वादुरस फळें अर्पी,
प्रेमरसेंचि अहल्या त्या अमृतांधप्रभूत्तमा[१] तर्पी. १३
नत आपणासि झाला म्हणऊनि करूनि अंजली लाजे[२],
वर्णी मातृशताधिकसदया[३] प्रभुपादकंजलीला[४] जे[५]. १४
'बापा ! पापाचळपविपद्रेणो[६] ! मीं असी कुधी कुलटा,
विश्वगुरो ! त्वां केला प्रथम नमस्कार[७] मज कसा उलटा ? १५
पुण्यश्लोक शिवादि प्रणति करुनि पसरिती पदर ज्यातें
पात्र कसें केलें मज अ-सतीला या अशा पदरज्यातें ? १६
या[८] पायांपासुनि जी झाली सुखशुद्धिदा नदी, नांदे,
सांगति संत, शिवशिरीं, ती सद्गतिबुद्धिदान दीनां दे. १७
यांचा ठायीं धरिला संतत निष्कंप भाव सुज्ञानीं,
यांला कीं म्हणताति ध्यातृजनतमोविभावसु[९] ज्ञानी. १८
जे पाय मायबाप ब्रह्मयाचे, दृग्द्वयें[१०] रमा तृषितें[१०]
प्राशी ज्यांसि, मिळाले कैसे ते श्वशुर[११] गौतमा ऋषितें ! १९

---

१. अमृतरूपी अन्नरसाचें प्राशन करणाऱ्या देवांमध्यें जो श्रेष्ठ राम त्याला (अंधस् = अन्न). २. अहल्या लाजली. कारण रामानेंच तिला प्रथम नमस्कार केला होता. (गीति ६ पहा) ३. शंभर मातांहून अधिकपट दया करणारी (लीला). ४. रामचरणकमलांची लीला. ५. अहल्या. ६. पापरूपी पर्वताला वज्राप्रमाणें ज्याच्या पायांची धूलि आहे, अशा (श्रीरामा!). [आर्या क्रमांक १५ ते ३३ यांत अहल्येनें श्रीरामाची स्तुति केली आहे]. ७. आर्या क्रमांक ६ चरण दुसरा पहा. ८. या म्हणजे तुझ्या (श्रीरामाच्या = विष्णूच्या) पायांपासून गंगानदी अवतीर्ण झाली आहे म्हणूनच तिला "विष्णुपदी" म्हणतात. ९. ध्यान करणाऱ्या जनांच्या (अज्ञानरूपी) अंधाराला सूर्यासारखे. १०. तृषितें दृग्द्वयें = तहानलेल्या दोन्ही डोळ्यांनीं. ११. गौतम ऋषि हा अहल्येचा पति.
(या टीपेचा पुढील भाग पृष्ठ ४९ वर पहा).

तूं बाप आजपासुनि, मीं कन्या, हें तुझ्या पदीं नातें
नांदो दे दाशरथे ! त्वां क्षणहि अव्हेरिलें न दीनातें. २०
लक्ष्मणजी ! आयकिलें वदली जें धर्मकन्यका कांहीं ?
द्यावें स्मरणचि आंदण, याहुनि द्यावें न अन्य काकांहीं[1]. २१
रडवाया निजकर्में सर्वसतींची सभा विटाळावें[2]
तें कां चुकेल ? कैसें अबळेनें प्रबळ भावि टाळावें ? २२
शांतिक्षमादि सद्‌गुण जग ज्यांचे ऐकतां निवे कानीं,
वेषप्रतारिता[3] हे शापावी या महाविवेकानीं ! २३
शाप न अनुग्रहचि[4] हा, म्हणुनचि तुज बा ! महायशा ! पाहे,
दूषित असेल गुरुला, दंडा[5], संकोच काय ? शापा हे. २४
आतां मनिं दुःख नसे, झाली स्वपतिव्रतांत कुत्सा हें,
कीं भेटलासि आंगें येउनि तूं तीर्थपाद उत्साहें. २५
वाटे, अन्याहि अशा गुरुशापा, व्हावया शिळा, लाहो,
हांसों नका अहो जी ! कवणा पदरेणु हा मिळाला हो ? २६
म्हणतील साधु ' साध्वी ' धन्यचि घेतील नाम हे माजें,
तें परिसाचेंचि खरें, ये लोहाच्या महत्त्व हेमा जें. २७

---

(मागील पानावरून पुढें चालू–) रामचंद्राच्या चरणांनीं अहल्येचा उद्धार केला म्हणून ते चरण तिचे जनक झाले. तेव्हां अर्थातच ते चरण गौतमऋषीचे सासरे झाले. परंतु हें घडलें कसें ? तर आपले चरण (म्हणजेच आपण श्रीरामचंद्र) दीनवत्सल आहांत; म्हणून या लहानसहान कार्यांत सुद्धां हेळसांड करीत नाहीं.

१. (तुम्हीं) लक्ष्मणकाकांनीं. २. अन्वय– सर्वसतींची सभा रडवाया, निजकर्में (मीं) विटाळावें, तें कां चुकेल ? ३. (कपट) वेषामुळें फसलेली (मी अहल्या). ४. उपकारच. ५. दंडा– दंडास पात्र करा.

त्वां पापशापतापव्यापन्ना[१] पद्मलोचना रामा[२]
हे रक्षिली, मुनीची कीर्तिहि भवबंधमोचना ! रामा ! २८

म्हणता[३] क्षीरधि 'मळली' जरि, शुद्ध करी न बायको मळता,
शुचिता चरणरजाची काय वदों ? आणि काय कोमळता ? २९

ज्याच्या एकेंचि रजें, मीं धन्या, हे असे जिला पाय
लागति, वर्णूं एका जिव्हेनें भाग्य[४] भूमिचें काय ? ३०

वाहे शिरीं पदरजें, सुकृत त्रिजगीं अनंत पवनाचें,
केलें वृष्टिहिमातप साहुनि जें तें खरें तप[५] वनाचें. ३१

मज चातकीस आधीं तर्पाया ओळले[६] परि जगाया
हे करुणाघन झाले, माझ्या भाग्येंचि कारण जगा या. ३२

याला[७], संरक्षाया, दिधलें म्यां सर्व आयु, धरणीतें,
द्यावें सद्वीरकरीं सद्यश जोडील आयुध रणीं तें.' ३३

---

१. व्यापन्ना- दुःखानें व्यापलेली; गांजलेली. २. स्त्री ( मी अहल्या ). ३. अन्वयः- क्षीरधि ( क्षीरसागर ) ( मला ) जरि 'मळली' म्हणता, ( तरि ) बायको ( मी स्त्री ) मळता ( मळतां ) शुद्ध न करी. पापक्षालन करणारा क्षीरसमुद्रहि माझ्यासारख्या स्त्रीला पापमुक्त=शुद्ध करूं शकला नाहीं, हें तात्पर्य. ४. रामचरणरजांचें केवढें हें माहात्म्य ! व त्यांना सदोदित धारण करणाऱ्या या भरतभूमीचें केवढें हें सुदैव ! ५. या अरण्यानें थंडी, वारा, ऊन सहन करून जें तप केलें, तें आज तुझ्या दर्शनानें सार्थकीं लागलें. ६. वळले; त्वरेनें धावून आले. ७. प्रभु रामचंद्राला. अन्वय- धरणीतें संरक्षाया याला म्यां सर्व आयु दिधलें. अर्थ- अहल्या म्हणत्येः- प्रभु रामचंद्राच्या हातून सर्व पृथ्वीचें संरक्षण व्हावें, म्हणून मी माझें सर्व आयुष्य त्याला अर्पण करित्यें. आपलें आयुष्य दुसऱ्याला देणें, हें प्रेमाचें मोठें लक्षण समजलें जातें. ( संदर्भाकरितां पहा- केकावलि श्लोक ५०; आर्याभारत आदिपर्व अध्याय ३ आर्या २६-४२ )

 १२०५३ ५१

जीणें केली स्वस्त्री स्वरजस्पर्शेंकरुनि धौतमती[1]
वर्णी श्रीरामाची पदयुगळी सन्मुनींद्र गौतम ती.

( वृत्त-स्रग्धरा )

'केला त्वां तीर्थपादें[2] निजचरणरजें आजि उद्धार, हा या
न स्त्रीचा, भूमिचाही स्थिर, अमितयुगें कीर्ति शुद्धा रहाया.
केलें श्रीमत्पदांच्या नखरशशिसुधासिंधुनें[3] धौत मातें,
जेणें कोपें अनंत स्वतप बुडविलें त्याहि या गौतमातें. ३५

झाला निंद्य त्रिलोकीं प्रभु ! शतमखही[4] यन्मनोवृत्ति कामीं,
केली होऊनि कोपा वश सुकृततपोराशिची मृत्तिका मीं.
त्याचें माझेंहि सर्व श्रुत विफळचि, जें पात्र या लाघवातें[5];
ज्या नाहीं दोष कांहीं यश तव चरणीं मात्र बा ! राघवा ! तें. ३६

रामा ! गातील हर्षेंकरुनि सुमहिमा विप्र या गाधिजाचा,
होऊनी[6] छात्र बा ! त्वां सकळहि हरिला क्षिप्र यागाधि ज्याचा.

---

१. धुऊन शुद्ध झालेली आहे जिची मति अशी. २. तीर्थाप्रमाणें पवित्र ज्याचे पाय अशा त्वां (रामचंद्रानें). ३. नखर+शशि+सुधासिंधुनें= (पायाचीं तेजस्वी) नखें हाच चंद्र, त्यापासून उत्पन्न होणाऱ्या सुधासिंधूनें ( अमृत-सागरानें ). ४. इंद्रसुद्धां. ५. अन्वयार्थः- गौतम म्हणतो, 'जें या लाघवातें ( लघुत्वाला ) पात्र ( तें ) त्याचें ( व ) माझेंहि सर्व श्रुत ( ऐकलेलें वेदविषयक सर्व ज्ञान ) विफळचि. बा ! राघवा ! ज्या कांहीं दोष नाहीं, तें यश तव चरणीं मात्र ( आहे ). ६. अन्वयार्थः-बा ! त्वां छात्र ( शिष्य ) होऊनी ज्याचा सकळहि यागाधि ( यज्ञामध्यें होणारा उपद्रव ) क्षिप्र ( लौकर, ताबडतोब) हरिला ( नाहींसा केला ), या ( त्या ) गाधिजाचा-विश्वामित्राचा सुमहिमा रामा ! विप्र हर्षेंकरुनि गातील.

शापव्यापत्समुद्रीं[1] बुडविलि पतिनें जी इला तारवाया,
आला घेऊनि येथें तव चरणसरोजद्वया[2] तारवा[2] या'* ३७

( अनुष्टुभ् वृत्त )

अहल्येच्या समुद्धारीं, देवानीं वाहिलीं फुलें,
तैसें रामासि रामाचें, यश म्यां वाहिलें मुलें[3]. ३८

---

१. शापानें व्यापलेल्या समुद्रांत. २. चरणकमलांची जोडी हेंच तारूं ( गलबत ) त्याला. ३. या काव्यांत **पंतांनीं** स्वतःला 'मूल' कल्पून आपल्याकडे किती लघुत्व घेतलें आहे तें पहा. हें छोटें खंडकाव्य रसिक जनांच्या अंतःकरणांत उन्नत भक्तीचें बीजारोपण करो, असें श्रीरामचंद्रापाशीं मागणें आहे.

* यानंतर दोन संस्कृत श्लोक आहेत. ते मुद्दामच येथें दिले नाहींत.

# ३. महाभारतांतील प्रकरण

## (१) दुर्वासभिक्षा[1]

(ओंव्या)

श्रीमद्वेदव्यासचरण । ज्ञान देती करितां स्मरण । संसारपंकांतूनि उद्धरण । केलें येणें विश्वाचें ॥ १ ॥ रचिला जयनामा[2] इतिहास । चतुर्वर्गाचा निवास । श्रवणपठणें भाविकास । भवसागरीं तारितो ॥ २ ॥ सर्व श्रुति सर्व स्मृति । जीं जीं शास्त्रें पुराणें असती । त्या सकळांतें महामती । भारतामाजि सांठवी ॥ ३ ॥ शब्दब्रह्मसागर मथिला । अमृतें इतिहासकलश भरिला । साधु शिष्यांच्या हातीं दिधला । जाड्यरोगार्तां[3] पाजाया ॥ ४ ॥ विष्णुयशःक्षीरसागर । भक्तमहिमासुधाकर । वर्णिला व्यासदेवें सादर । रस जाणती जाणते ॥ ५ ॥ अधर्में दुर्योधन क्षय । पावे, धर्में धर्म जय । संकटीं देव करुणालय । दास रक्षी हें कथिलें ॥ ६ ॥ जऱ्ही सहाय झाला देव । आलें घरा महावैभव । तऱ्ही आसक्त मनोभाव । नसावा हें कळविलें ॥ ७ ॥ झालें राज्य निष्कंटक । तऱ्ही धर्म पावे शोक । त्यासि सांगे भीष्म विवेक । पर्वद्वयविस्तरें ॥ ८ ॥ शांतिपर्वीं

---

१. या प्रकरणास "ब्राह्मणमाहात्म्य" असेंहि म्हणतात. (पुढें ओवी १२ वी पहा) आणि तेंच नांव अधिक शोभतें. २. जय=महाभारत नांवाचा. ३. मूढत्वरूप रोगानें पीडिलेल्यांना.

आपद्धर्म । राजधर्म मोक्षधर्म । अनुशासनिकीं दानधर्म । उपदेशिले विस्तारें ॥ ९ ॥ चतुर्वर्गांचा विवेक । पर्वत्रयीं अलौकिक । श्रवणमात्रें ना शोक । ऐसें कौतुक उपदेशीं ॥ १० ॥ दानधर्मीं आधीं अंतीं । कथिली हरिहरांची भक्ति । स्पष्ट जाणती महामती । अभेद शुद्ध प्रसाद ॥ ११ ॥ श्रीमद्विष्णुसहस्रनाम । सेवटीं सांगे साधूत्तम । त्याहीवरी बोले परम । प्रेमें 'ब्राह्मणमाहात्म्य' ॥ १२ ॥ व्यास पराशर वसिष्ठ । वाल्मीकी गाधिज ऐसे शिष्ट । श्रवण करिती परम श्रेष्ठ । श्रुतिस्मृतीचे सागर ॥ १३ ॥ जाह्नवी देवी ज्याचें पाद्य[1] । जो कीं उपनिषत्प्रतिपाद्य । ऐकों बैसे तो जगदाद्य । वासुदेवही त्या कथा ॥ १४ ॥ धर्म विचारी जोडूनि हस्त । भीष्म निवारी संशय समस्त । प्रश्नोत्तरें बहु प्रशस्त ! उदार वक्ता श्रोताही ॥ १५ ॥ समीप जाणोनि निधन । पिता जैसें आपुलें धन । पुत्रहस्तीं सावधान । असतां अर्पी प्रेमानें ॥ १६ ॥ तैसें देवव्रतें निर्मळ । धर्मासि कथिलें ज्ञान अखिळ । केलें इतरांचेंही कुशळ । धर्मनीतिनिपुणानें ॥ १७ ॥ धर्म म्हणे, 'गा ! अतुळप्रतापा ! । ज्ञानसागरा ! कुरुकुळदीपा ! । पितामहा ! मायबापा ! । धन्य झालों उपदेशें ॥ १८ ॥ आतां पुसतों महाराजा ! । उरला एक संशय माजा । तो दूर करीं महाभुजा ! । तुज भागविलें उदंड ॥१९॥ पूज्य वंद्य मुख्य कोण ? । कोणा वंदिसी तूं आपण ? । एव्हढें सांगोनि करीं निपुण । मजला पूज्यपूजनीं' ॥ २० ॥ भीष्म म्हणे, "भला गा पुत्रा ! । बरा प्रश्न केला पवित्रा ! । सद्गुणभ्रमरांच्या शतपत्रा[2] ! । योग्य पुससी धर्मज्ञा ! ॥ २१ ॥ सर्वांमध्यें पूज्य ब्राह्मण । हें तूं निश्चयें-

---

१. पायापासून जन्मलेली. २. कमला !

करूनि जाण । वाहतों पुत्रा ! तुझीच आण । संशय कांहीं न धरावा ॥ २२ ॥ ब्राह्मणांचे नमितां पाय । आयुष्याचा नाश न होय । यांचा ठायीं जैसा तनय । धरोनि विनय वर्तावें ॥ २३ ॥ ब्राह्मणांची सेवानौका । भवसागरीं तारित्ये लोकां । यांचे पाय जोडितां धोका । काळाचाही असेना ॥ २४ ॥ सर्वविद्याकळाधर[1] । अनर्घ्यसद्गुणरत्नाकर[2] । यांतें ब्रह्माहरिहर । परमादरें पूजिती ॥ २५ ॥ ब्राह्मण देवांचेही देव । आम्हीं पती ब्राह्मण धव । यांच्या आश्रयें गौरव । क्षत्रिय सर्वत्र पावती ॥ २६ ॥ ब्राह्मणवर्ण हें मस्तक । इतर हस्तपादादिक । असो राजा अथवा रंक । गतमस्तक तें शव ॥ २७ ॥ शोभा पराक्रम जीवन । लोकांत जसें मस्तकाधीन । तैसें नसतां ब्राह्मणभजन । अमंगळ वर्ण सर्वही ॥ २८ ॥ ऐक धर्मा ! कथा आतां । पूर्वी अर्जुन[3] भजला दत्ता । वरसामर्थ्यें आली सत्ता । सागरांत पृथिवीची ॥ २९ ॥ तो सहस्रार्जुन पावे गर्व । मानी तुच्छ लोक सर्व । म्हणे, 'मीं श्रेष्ठ मज गौरव । विप्रांहुनी बहु योग्य ॥ ३० ॥ ब्राह्मण माझ्या आश्रयें । न पावती संसारीं भयें । यांचा पाळक मीं निश्चयें । गोप जैसा पशूंचा ' ॥ ३१ ॥ तें ऐकतां कोपला पवन । म्हणे, ' तूं केवळ ज्ञानहीन । अर्जुना ! हो सावधान । बोलतां जिह्वा झडेल ॥ ३२ ॥ मूर्खा ! ब्राह्मण भास्कर । तूं खद्योत[4] पामर । आपला आपण बडिवार । करितां लज्जा तुज नसे ' ॥ ३३ ॥ अर्जुन म्हणे, ' रे ! तूं कोण ? ब्राह्मणमित्रा दावीं वदन ' । येरू

---

१. कळाधर = चंद्र. २. अमूल्य सद्गुणांचा सागर. ३. सहस्रार्जुन (कार्तवीर्य). ४. काजवा.

म्हणे, ‘ मीं पवन । देवदूत गर्विष्ठा ! ’ ॥ ३४ ॥ हैहय[1] म्हणे, ‘ रे पवना ! । फार वाखाणिसी ब्राह्मणा । कोण तो गुण तुझिया नयना । त्यांचा आला अद्भुत ? ॥ ३५ ॥ बोलसी धरूनि विप्र-पक्ष । आपलें तरी महत्व रक्ष । गोष्टी सांगोनि काय लक्ष । ब्राह्मण प्रत्यक्ष याचक ’ ॥ ३६ ॥ वायु म्हणे, ‘ रे कृतघ्नवरा ! । पावलासि ज्यापासूनि वरा । तो दत्त कोण पामरा ! ? । गुरुचा विसर नसावा ॥ ३७ ॥ ऐक ब्राह्मणांचें बळ । मग तूं वर्णीं क्षत्रियकुळ । श्रवणा योग्य नव्हसी खळ । परि सांगावें लागलें ॥ ३८ ॥ पूर्वीं अंगराज यजमान । कश्यपाला पृथिवीदान । देवूं, म्हणे तें जाणोन । दुःख मानी मेदिनी[2] ॥ ३९ ॥ कन्या न शिवे वृद्धा वरा । तैसी कश्यपाला धरा । म्हणे, ‘ देतां जाईन घरा । ब्रह्मदेवा पितयाच्या ’ ॥ ४० ॥ तें कश्यप समजे मनीं । अंतरीं शिरोनि ते मेदिनी । तीस सहस्र वर्षें मुनी । धरिता झाला निज तेजें ॥ ४१ ॥ बाहेर जैसा तैसाचि होता । कोण्हा न कळतां देवपिता[3] । ऐसें कौतुक दावूनि चित्ता । त्या पृथिवीच्या लाजवी ॥ ४२ ॥ मग ती धरणी जोडी हात । करी लाजोनि प्रणिपात । ‘ चुकलें कन्या मी, तूं तात । क्षमा समर्थें करावी ’ ॥ ४३ ॥ ‘ काश्यपी भूमि ’ यास्तव म्हणती । ऐसा कश्यप उदारकीर्ति । कोणा क्षत्रियाची शक्ति । ऐसी असे ? तूं सांगें ॥ ४४ ॥ सोमें पूर्वीं आपुली कन्या । दिल्ही उतथ्या विश्वमान्या । भद्राभिधाना परम धन्या । रूपें गुणें अप्रतिमा ॥ ४५ ॥ ती खेळतां उपवनीं । वरुणें नेली चोरूनि । तें जाणोनि नारदमुनी । उतथ्यातें जाणवी ॥ ४६ ॥ उतथ्य म्हणे, ‘ नारदा ! ।

---

१. सहस्रार्जुन. २. पृथ्वी. ३. कश्यप.

तूंच जावूनि सांग त्या मंदा। आकंठ भक्षितां विषकंदा; । कोणी नाहीं वांचला ' ॥ ४७ ॥ नारद सांगे तथापि वरुण । न सोडी जैसी गांठी कृपण । म्हणे, ' सुधापात्र कोण । तृषाक्रांत त्यागील ? ॥ ४८ ॥ झाला संग मिळालें मन । वियोग न सोसे अर्ध क्षण । नारदस्वामी ! तुम्ही सुजाण । समजावूनि जा सांगा ' ॥ ४९ ॥ नारद सांगे उतथ्यापासीं । ' देत नाहीं भद्रा पाशी[1], । सामें वदतां मज कंठासी । धरूनि वरुणें लोटिलें ' ॥ ५० ॥ कोपें खळबळला उतथ्य । म्हणे ' आयुष्य सरलें तथ्य । तरीच आग्रहें सेवितो अपथ्य । वारितांही सद्वैद्यें ' ॥ ५१ ॥ मग त्या उतथ्यें मुनिराजें । आपुल्या महातपस्तेजें । केलें कौतुक तें सहस्रभुजें । अर्जुना ! त्वां परिसावें ॥ ५२ ॥ सहा लक्ष ऱ्हदांभीतरीं[2] । होती वरुणाची जी पुरी । त्या उदकातें शुष्क करी । कल्पक्षयीं रवि जसा ॥ ५३ ॥ वरुणपुरीतें सागर । सोडूनि पळे बहु सत्वर । दुराचारियाचा शेजार । सोडी जैसा सज्जन ॥ ५४ ॥ तेव्हां वरुणाचे आप्त जन । म्हणती, ' द्यावें ब्राह्मणधन । हठें न देतां, आमुचें जीवन । शोषील तो काळार्क ' ॥ ५५ ॥ तथापि जळेश्वर न सोडी लोभा । उतथ्यमुनि करी क्षोभा । म्हणे, ' मूर्खा ! काय शोभा । तुज जायाच्या[3] भूषणें ? ' ॥ ५६ ॥ त्या वरुणाच्या पुरीप्रती । जात होती सरस्वती । तीतें म्हणे तो मुनिपती । ' सोडूनि देश, हो गुप्त ' ॥ ५७ ॥ आज्ञा मुनीची मस्तकीं वंदी । गुप्त होय सरस्वती नदी । जळाचा लेश उरों नेदी । उखर[4] केला तो देश ॥ ५८ ॥ ऐसा होतां निर्जळ देश । भय पावला नदीनदेश[5] । मस्तकीं धरी मुनि-

---

१. वरुण. २. डोहांच्या आंत. ३. उसन्या आणिलेल्या. ४. नापीक. ५. वरुण.

निदेश । सामर्थ्य कांहीं चालेना ॥ ५९ ॥ अद्यापि मरुदेश निर्जळ । तेथें पूर्वीं वरुणस्थळ । रुक्ष जालें धरणीतळ । मुनींद्राच्या प्रतापें ॥ ६० ॥ वरुणें भद्रानामक सती । नेउनि अर्पिली उतथ्याप्रती । वंदूनि म्हणे, 'कोप चित्तीं । शरणगताचा न धरावा ' ॥ ६१ ॥ उतथ्य म्हणे, ' अगा वरुणा ! । भिवों नको, केली करुणा । पंगू म्हणों नये अरुणा । अंधकारें सर्वथा ॥ ६२ ॥ कोठें गेला वीर्यमद । जेणें अपमानिला नारद ? । पुढें तरी ब्राह्मणपद । अभयप्रद स्मरावें ॥ ६३ ॥ बळवंताचें निज धन । पोटिसीं धरूनि करितां जतन । न जिरे केलियाही रोदन । लोक हांसती ऐकोनी ॥ ६४ ॥ माझी पत्नी म्यां साधिली । तुझी शक्ति वायां गेली । जा, तुजवरी म्यां दया केली ' । ऐसें म्हणे उतथ्य ॥६५॥ ऐसें उतथ्याचें तेज । अर्जुना ! म्यां कथिलें तुज । तूंही बोलावें बाहुज[१] । ब्राह्मणांहुनि न श्रेष्ठ ॥ ६६ ॥ अगस्त्यब्राह्मणाचा महिमा । आतां परिसावा नृपोत्तमा ! । असुरीं जिंकिला सुत्रामा[२] । सर्व देवां समवेत ॥ ६७ ॥ फिरती देव धरणीवरी । भ्रष्टैश्वर्य मानवांपरी । स्वधास्वाहाभाग[३] अरी । बळात्कारें भोगिती ॥ ६८ ॥ अगस्त्यासि गेले शरण । धरिती माथां मुनीचे चरण । सांगतां दुःख तो सकरुण । अभय देता जाहला ॥ ६९ ॥ तृणामध्यें जैसा अनळ । पेटला कोपें महाबळ । गगनापासूनि जैसे टोळ । जाळूनि पाडी असुरातें ॥ ७० ॥ कांहीं राहिले दानव शेष । सेविती धाकें दक्षिण देश । कोपला जाणों व्योमकेश[४] । त्रिपुरावरी देवार्थ ॥ ७१ ॥ कांहीं होते धरणी-तळीं । अश्वमेध यज्ञस्थळीं । त्यांतें यजमान तेव्हां बळी । अभय

---

१. क्षत्रिय. २. इंद्र. ३. पितरांना व देवांना दिलेला होमांतील भाग. ४. शिव.

देता जाहला ॥ ७२ ॥ ते मात्र वांचविले दानव । ऐसा अगस्त्याचा प्रभाव । ऐसा कोणी महानुभाव । क्षत्रिय कोठें सांग पां ? ॥ ७३ ॥ वसिष्ठाचा महिमा नृपा ! । ऐक सांगतों करूनि कृपा । खलीनाम दानव प्रतापा । ब्रह्मवरें पावले ॥ ७४ ॥ होतां ब्रह्मदेवाचा वर । तेणें अमृतसरोवर । ज्यांत बुडवितां शव सत्वर । जीवंत होय क्षणमात्रें ॥ ७५ ॥ देव करिती दीर्घसत्र । व्रतनियमें तें कर्शितगात्र । जाणोनि त्यांतें ते अमित्र । म्हणती, 'व्यसनीं मारावे' ॥ ७६ ॥ खलीदानव महावैरी । घेऊनि धांवले मोठे गिरी । देव समरीं परम घोरीं । जे जे मृत्यु पावले ॥ ७७ ॥ सरोवरीं टाकिती प्रेत । तत्क्षण होती ते जीवंत । करिती निर्जरांचा घात । संकट मोठें मांडलें ॥ ७८ ॥ इंद्रास शरण गेले सुर । म्हणती, 'काय करावा विचार ? ' । शक्र म्हणे, 'मुनीश्वर । वसिष्ठ आम्हां रक्षील' ॥ ७९ ॥ वसिष्ठाप्रति म्हणती, 'रक्षीं । केला पराभव विपक्षीं । आमुच्या सेनांचिया लक्षीं । समर्थ नाहीं एकही' ॥ ८० ॥ वसिष्ठ म्हणे, 'धरा धीर । रक्षील सर्वांसि सर्वेश्वर । हे काय मजपुढें पामर । पहा तपःसामर्थ्य ॥ ८१ ॥ कोपला साक्षात्प्रळयरुद्र । खवळला कल्पांतीं समुद्र । दग्ध केले सर्वही क्षुद्र । मुनीश्वरें ते असुर ॥ ८२ ॥ कैलासासि जातां गंगा । मुनीश्वरें ती महाभागा । आज्ञापिली सरोवरभंगा । करावया ते काळीं ॥ ८३ ॥ गंगेनें तो सरोवर । येऊनि भंगिला सत्वर । सरयूनाम पावे, सुर । मुनीश्वरातें वर्णिती ॥ ८४ ॥ रक्षिले वसिष्ठें सेंद्र देव । ऐसा अद्भुत विप्रप्रभाव । ऐसा कोण्ही भूमिधव । असेल तरी सांग तूं ॥ ८५ ॥ अत्रिचेंही तपोवीर्य । रक्षी देवांचें ऐश्वर्य । तेंचि आतां महाश्चर्य । अर्जुना ! तुजला सांगतों ॥ ८६ ॥

देवां दानवांसीं रण। पूर्वीं होय लोमहर्षण[1]। राहूनें केलें तेज क्षीण। चंद्रार्कांचें प्रतापें ॥ ८७ ॥ तेव्हां पडलें निबिड तम। देव पावले समरीं भ्रम। दानवांहीं न करितां श्रम। सहजें सुर जिंकिले ॥ ८८ ॥ करिती अत्रिची प्रार्थना। म्हणती 'स्वामी तपोधना!। अभय द्यावें अमरजना। नेलें दानवीं यश सारें' ॥ ८९ ॥ अत्री भास्कर सुधाकर। स्वयें होय तपःसागर। प्रथमरूपें[2] मुनीश्वर। दानवांशीं झगटला ॥ ९० ॥ प्रकाश केला, नाशिलें तिमिर। दानवांसीं करितां समर। देवही झाले युद्धीं समोर। मारिले शत्रु प्रतापें ॥ ९१ ॥ रक्षिले देव केला विजय। झाला दानवांचा क्षय। चंद्रार्क पावले बळोदय। सुरसमुदाय तोषविला ॥ ९२ ॥ अत्री सहाय तपोधन। चर्मवल्कल ज्याचें वसन। फळभक्षणें रक्षी प्राण। त्याचें सामर्थ्य हें ऐसें ॥ ९३ ॥ ऐसा क्षत्रियांत कोणी। असेल तरी बोल वाणी। किंवा जोडूनि दोन्ही पाणी। च्यवनप्रताप परिसावा ॥ ९४ ॥ 'अश्विनीकुमार सोमपान। करोत' ऐसें म्हणे च्यवन। शक्र म्हणे, एव्हढें वचन। आम्हांपासीं न चाले' ॥ ९५ ॥ येरू म्हणे, 'आमुचा बोल। कल्पांतींही नोहे फोल। सूर्यपुत्र हेही सुशील। योग्य सोमप्राशनीं' ॥ ९६ ॥ न ये इंद्राच्या तें मना। करावया च्यवनाच्या हनना। झाला सिद्ध निर्दय-मना। पर्वतवज्र घेउनी ॥ ९७ ॥ च्यवनें प्रोक्षोनि मंत्रित अंभ[3]। केला शक्राचा भुजस्तंभ। ज्याणें वधिले पाकजंभ[4]। मंत्रें तो शक्र खिळियेला ॥ ९८ ॥ निर्मिला मंत्रप्रतापें मद। वृत्रासारिखा अति

---

१. रोमांचकारक. २. सूर्याच्या रूपानें. ३. पाणी. ४. पाक आणि जंभ नांवाचे राक्षस.

उन्मद । ज्याचे शत योजन रद । दंष्ट्रा द्विशत योजनें ॥ ९९ ॥ तेणें ऐसें पसरिलें मुख । देवांसहित शतमख । जिह्वामूळीं पडिला धाक । होय सर्व लोकांसि ॥ १०० ॥ शक्रासि म्हणती सभय अमर । 'करावा मुनीला नमस्कार । आग्रह करितां सहपरिवार । भस्म आतां होतसों' ॥ १०१ ॥ इंद्रें दोन्ही कर जोडुनी । नमस्कारिला च्यवन मुनी । सोमपानीं त्यापासुनी । योग्य केले सुरवैद्य ॥ १०२ ॥ मदाचे केले भाग चारी । अक्ष, मृगया, पान, नारी । येथें ठेवी म्हणोनि चतुरीं । व्यसनचतुष्टय न धरावें ॥ १०३ ॥ ऐसा क्षत्रिय महाभाग । असेल तरी अर्जुना ! सांग । वृथा गर्वभारें उत्तमांग[1] । सिणवावें हें अनुचित ॥ १०४ ॥ जेव्हां मदें गिळिले देव । तेव्हां कपनामक दानव । हरिती देवांचें वैभव । धरा हरिली च्यवनानें ॥ १०५ ॥ ब्रह्मा विनविला अमरीं । 'आम्हीं अशक्त कपांच्या समरीं । संकटनाशी उपदेश करीं । पदच्युत जाहलों' ॥ १०६ ॥ ब्रह्मा म्हणे, ' परित्राण । तुमचें करितील सुब्राह्मण । त्यांसि जावें सत्वर शरण । माथां चरण धरावे ॥ १०७ ॥ अमरीं धावोनि धरितां पाय । ब्राह्मण म्हणती, ' सांगा, काय । दिधलें, मागाल तें अभय । आहे, बोला हृद्गत ' ॥ १०८ ॥ देव म्हणती, 'दानव कप । त्यांहीं हरिलें त्रिविष्टप[2] । आमचा न चाले प्रताप ! तुम्हीं सकृप व्हा आतां ' ॥ १०९ ॥ ब्राह्मणांहीं दिलें अभय । केला कपक्षयनिश्चय । कळतां दानवांहीं सामनय । तेथें कांहीं योजिला ॥ ११० ॥ धनीनामा धाडिला दूत । तो ब्राह्मणांतें भेटे त्वरित । म्हणे, ' तुम्हांऐसे सद्वृत्त । कप ते

---

१. शिर. २. स्वर्ग.

कैसे जिंकाल ? ॥ १११ ॥ जाणती वेद, करिती याग । सर्व भूमीं संविभाग । सत्य बोलती, महाभाग । ते कप कैसे जिंकाल ? ॥ ११२ ॥ वृथा मांस, वृथा दारा । न सेविती वृथाचारा । गुरुच्या चरणाब्जीं धरिला थारा । ज्यांच्या चित्तभ्रमरांहीं ॥११३॥ रजस्वलेशीं न रमती । प्रदीप्त पावकीं होमिती । दिवसा निद्रा न करिती । ते कप कैसे जिंकाल ? ' ॥११४॥ ऐसे कपांचे सद्गुण । धनी दूतनीतिनिपुण । वर्णी त्याचें करूनि श्रवण । म्हणती ब्राह्मण सक्रोध ॥ ११५ ॥ ' जे देव ते आम्हीं द्विज । दूता ! सत्य सांगतों तुज । जिंकूं कपांतें युद्धीं सहज । ऐसेंचि त्यांसि सांगावें ' ॥ ११६ ॥ कपांसीं विप्रांसीं झालें रण । सर्व दानव झाले क्षीण । विजयश्रीनें ते ब्राह्मण । रणस्वयंवरीं वरियेले ॥ ११७ ॥ ऐसा ब्राह्मणांचा प्रताप । नाशी सुरासुरांचा दर्प । गौतमें शक्रासि देऊनि शाप । कृपा केली पुनरपि ॥११८॥ अंगिरा शापी हुताशना । आहे ठावें महाजनां । अगस्त्य करी सिंधुप्राशना । ऐकिलें असेल हें त्वांही ॥ ११९ ॥ ब्राह्मणशापें लवणोदक[1] । झाला नदींचा नायक । तालजंघ क्षत्रियांतक । और्वब्राह्मण विख्यात ॥ १२० ॥ दंडकांचा राज्यनाश । ब्राह्मणें केला निःशेष । तूंही झालासि धराधीश । दत्तात्रेयप्रसादें ॥ १२१ ॥ ब्राह्मण असो कैसा तरी । गर्भस्थानही नमस्कारीं । कांहीं काळ वैभव जरी । भोगावेंसें वाटेल ' ॥१२२॥ अर्जुन म्हणे, ' गा जगत्प्राणा[2] ! । सावध केलें मज सुजाणा । भजेन सर्वस्वें ब्राह्मणां । ब्राह्मण माझे कुळदेव ॥ १२३ ॥ तुझा वोधसुधाकर । उदय पावतां मोहांधकार । कैसा राहेल ?

---

१. समुद्र. २. हे जगाच्या प्राणा ! वायो !

दया फार । केली, हानी चुकविली ' ॥ १२४ ॥ वायु म्हणे, ' गा विचक्षणा ! । क्षत्रधर्में सर्व ब्राह्मणां । रक्षीं आपुल्या इंद्रियगणा । फार न लगे सांगावें ॥ १२५ ॥ भृगुवंशव्यजनापासूनी[1] । भय होणार आहे म्हणोनि । आपुला प्रतापदीप हानी । न पावे तें करावें " ॥ १२६ ॥ दानधर्मी पवनार्जुन- । संवाद ऐसा परम पावन । यातें ऐकतील सज्जन । ब्राह्मणभक्त आदरें ॥ १२७ ॥ श्रीरामनंदन मयूरेश्वर । ब्राह्मणांचा निजकिंकर । न करितां ग्रंथाचा विस्तर । वदला यश विप्रांचें ॥ १२८ ॥ पवनार्जुनांचा संवाद । ऐकोनि पावला आनंद । धर्म श्रवणीं लागतां स्वाद । कर्णवदना ओढवी ॥ १२९ ॥ ' पुन्हां सांगा विप्रमहिमा । करुणासागरा नृपोत्तमा ! ' । धर्म म्हणे, ' सुधासमा । कथा सुखें सेवूंदे ' ॥ १३० ॥ भीष्म म्हणे, " ' गा धर्मराया ! । ब्राह्मणभक्ता धर्मतनया[2] ! । धन्य तूं श्रोता, माझ्या हृदया । आनंद वाटे सांगतां ॥ १३१ ॥ परि मीं वृद्ध बाणक्षत । रणीं पडलों जैसें प्रेत । बोलतों तोषें परंतु श्रांत । क्षणक्षणीं होतसें ॥ १३२ ॥ यास्तव ब्रह्मण्य देव हरी । यासि हा तूं प्रश्न करीं । सांगेल विप्रमहिमा मुरारी । जगद्गुरु स्वमुखेंचि ' ॥ १३३ ॥ धर्म विनवी कृष्णनाथा । म्हणे, ' पुरवीं मनोरथा । तुझ्या वदनें ब्राह्मणकथा । परिसावया इच्छितों ' ॥ १३४ ॥ कृष्ण म्हणे धर्मराया ! । ऐक बापा ! सद्गुणालया ! । जे म्यां पूर्वी रुक्मिणीतनया[3] । कथिली कथा निजमुखें ॥ १३५ ॥ ब्राह्मणांहीं आणिला कोप । प्रद्युम्न पावला

---

१. भृगुवंशोत्पन्न ( परशुरामकुलीन ) रूपी पंख्यापासून. २. यमपुत्रा ! ३. प्रद्युम्नाला.

संताप । तो मज पुसे यदुकुळदीप । तेंचि तुजला सांगतों ' ॥ १३६ ॥ ' ब्राह्मणांतें भजतां नित्य । सेवा करितां जैसा भृत्य । मला सांगा स्वमुखें सत्य । विप्रभजनीं फळ कोण ? ॥ १३७ ॥ भाव जैसा शिवार्चनीं । तैसाचि ब्राह्मणांच्या भजनीं । स्वयें पूज्य त्रिभुवनीं । विप्र, जनीं कां लवतां ? ॥ १३८ ॥ साहतां विप्रांचे अन्याय । धांवोनि धरितां मस्तकीं पाय । भिक्षुकांच्या भजनीं काय ? । फळ होतसे तें सांगा ' ॥ १३९ ॥ ऐसें ऐकोनि प्रद्युम्नवचन । मग मीं त्याचें जाणोनि मन । स्वानुभावाचें केलें कथन । कीं तो व्हावा सावध ॥ १४० ॥ ' वत्सा ! विप्रमहत्व तुज । सांगतों ऐक मनींचें गुज । माझ्या पुत्रांत महाभुज । तूंचि योग्य ह्या उपदेशा ॥ १४१ ॥ ब्राह्मण माझें निज धन । ब्राह्मण कल्याणांचें निधान । ब्राह्मणांचें चरणार्चन । परम पावन सर्वांसी ॥१४२॥ विप्रप्रसादें रणांगणीं । जिंकितों मीं शत्रुश्रेणी । लोकत्रयीं चक्रपाणी । मान्य विप्रप्रसादें ॥ १४३ ॥ आमुचा आराध्य महेश्वर । तोचि स्वयें धरणीसुर । समुद्रोदरीं माझें पुर । ब्राह्मणवरें तरलेंसे ॥१४४॥ जे जे ब्राह्मणांचे दास । ते ते जयलक्ष्मीचे निवास । रक्षितें संकटीं यदुकुळास । विप्रप्रसाद-सत्कवच ॥ १४५ ॥ आयुष्य कीर्ति यश बळ । ब्राह्मण-पूजेचें हें फळ । इतुकेंचि नव्हे गा ! केवळ । आत्मज्ञान हे देती ॥ १४६ ॥ उपमन्यूच्या आशीर्वचनें । दर्शन दिधलें त्रिलोचनें । पोटा आलासि तूं वरदानें । महेश्वराच्या कुळदीप ॥१४७॥ वसुदेव ब्राह्मणसेवक । माझा आजाही देवक । तुझा मातामह भीष्मक । ब्राह्मणभक्त विख्यात ॥१४८॥ एकदा श्रीदुर्वासामुनी । द्वारकापुरीं येउनी । कौतुक करिता झाला जनीं । तेंचि पुत्रा ! परिसावें ॥१४९॥ आहेत जे हे सर्वलोक । लोकपाळ जे इंद्रादिक । ते संपूर्ण ब्राह्मण-

पूर्वक । कैसें यांतें न भजावें ? ॥ १५० ॥ ब्राह्मणांचा कोप कांहीं । धरितां कल्याण होणें नाहीं । नौका फोडोनि कोण भुजाहीं । सागरातें तरेल ? ॥ १५१ ॥ ब्राह्मण म्हणजे महद्भूत । उभय लोकींही विख्यात । कोपतां क्षणांत कृतांत[१] । होती ब्राह्मण प्रतापी ॥१५२॥ भस्म करितील ब्रह्मांड । जैसा शुष्क गोमयपिंड । काळदंडासही ब्रह्मदंड । क्षणें शतखंड करील ॥ १५३ ॥ ब्रह्मांडाची घडामोडी । ज्यांच्या शक्तिला केवळ थोडी । यांच्या चरणरजांची जोडी । सर्व तीर्थं करिताती ॥ १५४ ॥ व्हाया उभय लोकीं कल्याण । आश्रय करावे ब्राह्मण । सन्मानकामुकें[२] अभ्यसन । सद्विद्येचें करावें ॥१५५॥ शीघ्रकोपी भगवंत । उदार जैसा उमाकांत । दुर्वासमुनीचें भिक्षावृत्त । तुजला नाहीं ठाउकें ॥ १५६ ॥ वर्णेंकरूनि हरिपिंगळ । नेसला चिंध्या अमंगळ । बिल्ववृक्षाचा दंड विशाळ । करीं मिरवी सर्वदा ॥ १५७ ॥ दीर्घ श्मश्रू, अत्यंत कृश । भिक्षुरूप व्योमकेश । सर्वां मनुष्यां तादृश । दीर्घ कोणी असेना ॥ १५८ ॥ तो योगिराज हिंडे पुरीं । म्हणे, ‘कोणी मजला घरीं । ठेवील काय दिवस च्यारी ? । राहावेंसें वाटतसे ॥ १५९ ॥ माझा स्वभाव बहु कोपन । करावें सर्वदा संगोपन । दुर्वासा हें कळतां जन । मान्य कैसे होतील ? ॥ १६० ॥ सर्वस्व मजला निवेदावें । पूजा करावी शुद्ध भावें । जें जें करीन तें सोसावें । हें कवणासि सोसेल ? ’ ॥ १६१ ॥ ऐशा गाथा गाय योगी । चत्वरीं[३] सभास्थानीं मार्गीं । सर्व ऐकती परि त्यालागीं । यावें कोणी न म्हणती ॥ १६२ ॥ त्यां तें परिसतांचि

---

१. यम. २. सन्मानाची इच्छा धरणाऱ्यानें. ३. अंगणांत.

पुत्रा ! । धांवोनि वंदिलें त्या पवित्रा । विप्ररूपा वायुमित्रा[1] । आलों गृहा घेऊनि ॥ १६३ ॥ केला सर्व जनाला बोध । कथिला मुनीचा दु:सह क्रोध । करविले नाना पदार्थ सिद्ध । मागेल ते ते द्यावया ॥१६४॥ वंदन करूनि त्या मुनिवर्या । सांगतों त्याची स्वैर चर्या । कांहीं घडली जी परिचर्या[2] । अनुग्रहें त्याच्याचि ॥ १६५॥ करूं बैसतां भोजन । सहस्त्रांचें भक्षी अन्न । तप्त लोहीं जैसें जीवन । भस्म करी तेजस्वी ॥ १६६ ॥ केव्हां भक्षी केवळ थोडें । थुंकोनि टाकी अन्न गोडें । म्हणे, 'झालीं गात्रें रोडें । व्यर्थ येथें राहिलों' ॥१६७॥ निद्रा आणि जागर । पुष्कळ करी ज्ञानसागर । केव्हां स्नानसंध्या-पर । केव्हां कांहीं करीना ॥ १६८ ॥ मीं आणिखी तुझी जननी । बैसों चरणसंवाहनीं[3] । जेव्हां निद्रा सेवी मुनी । आम्हीं रचिल्या मृदु सेजे ॥ १६९ ॥ स्नान संध्या भोजन । शयन पादप्रक्षालन । या या कर्मीं परिजन । आम्हांविना नावडे ॥ १७० ॥ रुक्मिणी ढाळी चामर । व्यजनें सेवीं मीं किंकर । अभ्यंग कराया मुनीश्वर । आज्ञा करी आम्हांसि ॥ १७१ ॥ कोप येतां जाळी फोडी । न्यायें वर्ततां काढी खोडी । यज्ञसूत्र जटा तोडी । वस्त्रें फाडी अभिनवें ॥ १७२ ॥ उगाचि हांसे, उगाचि रडे । शय्येवरूनि भूवरी पडे । कोपाग्नीनें सर्वदा कढे । कालियाविषें ऱ्हद[4] जैसा ॥ १७३ ॥ जाळी मुक्ताफळांचे हार । म्हणे, 'चूर्ण करितों फार । येणें तरी तांबूल सार । लागेल आम्हां भक्षितां' ॥१७४॥ निद्रा न येतां शय्या जाळी । बोलतां आधीं द्याव्या गाळी । त्या मुनीतें मीं वनमाळी ।

---

१. वायूचा मित्र अग्नि, त्याच्याप्रमाणें असणाऱ्याला. २. सेवा. ३. पाय चुरण्याच्या कामीं. ४. डोह.

कांपें नसतां अपराध ॥१७५॥ मागे भलतेंचि भलत्या वेळे । पळभरि कोपे पळभरि खेळे । नमना आणवी स्त्रियांचे मेळे । म्हणे, 'मातें छळितसां' ॥ १७६ ॥ केव्हां बैसे सिंहासनीं । केव्हां रुसोनियां स्मशानीं । केव्हां होय परममौनी । मूक बधिर जन्माचा ॥१७७॥ आज्ञेविना भोजन स्नान । आम्हां नसे पुत्रा! जाण । हस्त जोडोनि रात्रिदिन । पायांपाशीं असावें ॥१७८॥ केव्हां धरी दिव्यांबर । केव्हां केवळ दिगंबर । दिवसामध्यें वेष शंभर । तो भगवंत स्वीकारी ॥ १७९ ॥ नाहीं केली मुनीची निंदा । नमन त्याच्या पदारविंदा[1] । तद्गुणकीर्तन मज गोविंदा । करावेंसें वाटलें. ॥ १८० ॥ रात्रिदिवस नित्य जागा । रुक्मिणीसह त्या महाभागा । सेवीत होतों जैसी आंगा । छाया क्षणही न विसंबे ॥ १८१ ॥ ऐसें छळितां एके दिवसीं । इछा झाली पायसीं[2] । उष्ण उष्ण जैसें त्यासी । माने तैसें वाढिलें ॥ १८२ ॥ पायस भक्षूनि म्हणे, 'पुत्रा! । प्रसाद माझा आपुल्या गात्रा । शीघ्र लावीं, तुज सत्पात्रा । दान तैसें म्यां दिल्हें' ॥ १८३ ॥ तें मुनीचें प्रसादवचन । श्रवणीं पडतांचि पायसान्न । चरणापासूनि केशान्त चर्चन । तत्काळ केलें आदरें ॥ १८४ ॥ रुक्मिणीतें म्हणे मुनिराय । 'तूंही लावीं; पाहसी काय ? । केशापर्यंत आपुला काय । पायसानें सारवीं' ॥ १८५ ॥ आज्ञा केली दोघांजणीं । रथ आणवी त्याच क्षणीं । आम्हां तो मुनिशिरोमणी । योजी स्यंदनधुरेसी[3] ॥१८६॥ आपण बैसे रथावरी । प्रतोदातें[4] घेऊनि करीं । चालवी द्वारकेच्या

---

१. चरणकमलाला. २. खिरीविषयीं. ३. रथाच्या जोखडाला. ४. चाबकाला.

भीतरीं । राजमार्गें सर्वत्र ॥ १८७ ॥ द्वारकेंतें हाहाकार । तेव्हां लोक करिती फार । कांपती यादव सहपरिवार । ज्ञाते म्हणती, 'भिवों नका' ॥ १८८ ॥ वांटी याचकांतें रत्नांजळी । मार्गीं सुवर्णमणी उधळी । वर्षामेघाहुनि आगळी । औदार्यशक्ती स्वामीची ॥ १८९ ॥ मिरवे पुरींत जैसा नवरा । वंदिती लोक त्या मुनिप्रवरा । म्हणती याहुनि शक्ति अवरा[1] । महेंद्राची कोटिगुणें ॥ १९० ॥ पडली वैदर्भी सुकुमारी । म्हणोनि कोपोनि कशा[2] मारी । त्या ईश्वराला कोण वारी ? । उगाचि पाहें मीं जवळी ॥ १९१ ॥ मंद चालतां प्रतोद लावी । केवळ निर्दयपणासि दावी । अंतरीं करुणार्णव गोसावी । तो आमुचा कुळदेव ॥ १९२ ॥ वसुदेव बळदेव उग्रसेन । अक्रूरोद्धव सज्जन । कळों न देतां पुसती नयन । मुनीश्वराचें भय पोटीं ॥ १९३ ॥ म्हणे, 'पाहों उपवनें । मंद सुगंध शीत पवनें । आनंद पावेन कीं तीं भवनें । सर्वांकृतूंच्या शोभेचीं' ॥ १९४ ॥ पुराबाहिर नेला रथ । लंघितां परम त्वरेनें पथ । रुक्मिणीचा देह सव्यथ । स्खलन पावे पुनरपि ॥ १९५ ॥ रथावरूनि टाकी उडी । वैदर्भीला कोपें ताडी । म्हणे, 'काय झालें ? फुगडी । घातली ना माहेरीं ? ॥ १९६ ॥ नावडे माझें वचन भजन । क्षण सेवेसि विटलें मन । जातों आम्हीं तपस्विजन । पृथ्वी असे आमुची ॥ १९७ ॥ उदंड आहेत माझे दास । तेथें पुरवूं हा हव्यास । वाहतां च्यारी पाउलें रथास । सातां जागीं पडतसां' ॥ १९८ ॥ ऐसें बोले दावी राग । आडमार्गेंचि महाभाग । रुसोनि जातां पाठिलाग । केला आम्हीं दोघानीं ॥ १९९ ॥

---

१. कनिष्ठ. २. चाबूक.

असें गांठोनि धरिले पाय । तेव्हां हंसे तो मुनिराय । म्हणे, 'आतां उरलें काय ? । प्रसन्न झालों वर मागा ॥ २०० ॥ सत्वसागरा ! भला गा ! शौरी ! । झालों प्रसन्न मीं तुजवरी । जितक्रोधा तुझिये सरी । उतरे ऐसा तूं एक ॥ २०१ ॥ केला दाटोनि पुष्कळ छळ । दोष नाहीं पाहिला तिळ । यश हें तुझें बहु निर्मळ । क्षीराब्धीतें लाजवो ॥ २०२ ॥ वर मागावे जे मनांत । प्रसन्न झालों वरद-नाथ । पहा सामर्थ्य पारिजात । मला हात जोडितो ॥ २०३ ॥ अन्नाचिया ठायीं प्रीति । मनुष्यांची जैसी असती । त्याहूनि आवडि लोक धरिती । तुझिया ठायीं मद्वरें ॥ २०४ ॥ तुझ्या भजकां न शिवो शोक । तुझिया यशातें गावूत लोक । त्वत्प्रताप लोकालोक । पर्वतातें लंघील ॥ २०५ ॥ तुजपरीस सुप्रिय जना । दुसरें नसो यदुनंदना । करील विश्व तुझिया भजना । हा वर माझा तुज असे ॥ २०६ ॥ जें म्यां फोडिलें जें जाळिलें । तुझिया सदनीं जें नाशिलें । तें सर्वत्र तसेंचि संचलें । गृहा जातां पाहसी ॥२०७॥ पहिलें वस्तु मोलें गुणें । पाहतां भरेल पुष्कळ उणें । ब्राह्मणसेवा-योगनिपुणें । त्वां मज भावें हारविलें ॥ २०८ ॥ माझी कृपा कामकपिला[1] । प्रसन्न झाली वत्सा ! तुजला । नोहें छळक मीं ब्राह्मण भला । भक्तयशातें वाढवितों ॥ २०९ ॥ उच्छिष्ट पायसें चर्चिला देह । झाला अभंग निःसंदेह । झाला कल्याणाचें गेह । साधु स्नेह धरितील ॥ २१० ॥ पुत्रका ! परंतु पादतळें । कोमळें केवळ कमळदळें । राहिलीं, सर्वांग त्या वेगळें । वज्राभेद्य जाहलें ॥ २११ ॥ एव्हढें मात्र जाहलें खोटें । माझ्या मना लागलें मोठें ।

---

१. कामधेनु.

होणार तें तें चुकतें कोठें ? ' । ऐसें वदला मजप्रती ॥ २१२ ॥ रुक्मिणीतें म्हणे मुनी । ' वत्से ! ऐक तुझी वाणी । उघडिली वर-रत्नांची खाणी । अलंकारितों तुज आतां ॥ २१३ ॥ लोकीं ज्या ज्या असतील सती । त्या वर्णितील तुझी कीर्ति । न शिवो तुझिया देहाप्रती । जरा रोग वैवर्ण्य[1] ॥ २१४ ॥ पुण्य गंधाचें विलासगेह । तुझें असो सर्वदा देह । लोकत्रयीं तूं निःसंदेह । पावसील वर यश ॥ २१५ ॥ पतिप्रसाद अतिमात्र । पावेल कन्ये ! तुझें गात्र । उच्छिष्ट पायसा झालें पात्र । कल्याणभाजन यास्तव ॥ २१६ ॥ सोळा सहस्र सपत्नींमाजी[2] । आप्तजनांचिया समाजीं । तूंचि मुख्या हे घे माझी । आशीर्वाणी मस्तकीं ॥ २१७ ॥ तुजसीं पतीसीं नसो वियोग । सर्वदा भोगीं दिव्य भोग । पुत्र पौत्र महाभाग । पावसील मद्वाक्यें ' ॥ २१८ ॥ मस्तकीं ठेवूनि करपंकज[3] । मजला म्हणे तो मुनिराज । ' ऐसीच बुद्धि असों दे तुज । उपदेश हा आमुचा ॥ २१९ ॥ ब्राह्मण-चरणीं भाव । असों दे अभिनव । दया करील महादेव । विप्ररूप तुजवरी ' ॥ २२० ॥ ऐसें बोलोनि झाला गुप्त । वरामृतें केलें तृप्त । आम्हां भासे होतों सुप्त । स्वप्न पाहोनि जागलों ॥ २२१ ॥ देहीं नाहीं कांहीं क्लेश । आनंदें कोंदे सर्व देश । विप्ररूप व्योम-केश । प्रसन्न झाला यापरी ॥ २२२ ॥ स्वप्न पाहोनि जागा झालों । ना त्या आनंदसागरीं न्हालों । किंवा सुधा सेवूनि धालों । सदना आलों सदार ॥ २२३ ॥ जाळिलें भंगिलें वस्त्रपात्र । नाशिलें तें तें वस्तुमात्र । पाहतां गृहीं माझें गात्र । रोमांचित

---

१. कांतिहीनता, निस्तेजपणा. २. सवतींमध्यें. ३. करकमल.

जाहलें ॥ २२४ ॥ भाग्यालंकार त्याला ओप[1] । दिधली ज्याला नाहीं लोप । प्राकृतांला वाटे कोप । अनुग्रह स्वामीचा ॥ २२५ ॥ भरले कांचनरत्नकोश । राशि अन्नाचे निर्दोष । झाला द्वारकेला संतोष । चमत्कार पाहतां ॥ २२६ ॥ तेव्हांपासूनि गुप्त व्रत । धरिता झालों मीं अच्युत । करीन ब्राह्मणांचें वांछित । कायावाङ्मनें सर्वस्वें ॥ २२७ ॥ ब्राह्मणांतें साक्षात् शिव । जाणोनि भजतों मीं केशव । विप्रदर्शनीं मज उत्सव । जैसा दरिद्रा निधिलाभें ॥ २२८ ॥ तूंही पुत्रा ! ऐसेंचि करीं । विप्रभजनीं निष्ठा धरीं । सर्व कल्याणांतें वरीं । आज्ञा आदरीं गुरूची ॥ २२९ ॥ ऐसें प्रद्युम्नातें मागें । कथिलें तें त्वां महाभागें । पुशिलें म्हणोनि म्यां अनुरागें । धर्मराजा ! वर्णिलें ॥ २३० ॥ पितामहाची आज्ञा न मोडे । कीं मज पूज्य ऐसे थोडे । आणि तुमचा संतोष जोडे । घडे गुरूचें कीर्तन ॥ २३१ ॥ माझी आवडि येथें मोटी । जाणा तुम्ही खरी कीं खोटी । यज्ञांत साहित्य भूप कोटि । करितां उष्टीं मीं काढीं ॥ २३२ ॥ ब्राह्मणांचे धुतले पाय । तें म्यां स्वमुखें वदावें काय ? । ब्राह्मणांपेक्षां बापमाय । मजला अधिक न गमती ॥२३३॥ ब्राह्मणभक्त देवव्रत । तूंही ब्राह्मणचरणीं नत । वर्णील कोण तुमचें सुकृत । धन्य तुम्ही," प्रभु म्हणे. ॥ २३४ ॥ ऐसी दानधर्मी कथा । श्रवणमात्रें नाशी व्यथा । पुरवी श्रोत्यांच्या मनोरथा । श्रीरामात्मज हें जाणे ॥ २३५ ॥ श्रीदुर्वासमुनीची भिक्षा । दुःखदारिद्र्यशमनीं दक्षा । श्रवणमुखें रसिक हो ! भक्षा । मयूरेश्वर प्रार्थितो ॥ २३६ ॥

---

१. शोभा, चकाकी, जिल्हई.

# ४. भागवतांतील प्रकरणें

## (१) अवतारमाला[१]

( गीतिवृत्त )

### १. यज्ञवराहावतार

श्रीमद्विष्णुप्रभुचे अगणित अवतार, सार चोवीस;
साधुसभाकंठ म्हणे या शुभमाळेसि, 'तूंचि होवीस.' १
हें वर्णिलें यथामति हरिचें अवतारचरित जरि लवही,
तरि चतुर चित्रगुप्तहि[२] लिहिली कोरीच सर्व करिल वही. २
विधिनें नारदमुनिला जे, विश्व करावया पतितरहित,[३]
कथिले अवतार स्वप्रभुचे, गायीन ते अतितर हित. ३
स्वायंभुवमनुला करि आज्ञा द्रुहिण[४] प्रजा करायाची.
तो सिंधुमग्न भूस्थळ त्या सुवरमणिव्रजाकरा[५] याची; ४
भूद्धरणातें धाता सतत ध्यानांत आठवी; त्यातें
न सुचे, मग तो प्रार्थी, नेत्रें[६] झांकूनि आठ[६] वीत्यातें.[७] ५

---

१. श्रीमद्भागवतांतील स्कंध २ अध्याय ७ यांतील प्रकरणावरून ही "अवतारमाला" पंतांनीं गुंफिली आहे. २. चित्रगुप्त = प्राण्यांचीं पापपुण्यें लिहून ठेवणारा यमाचा लेखक. ३. पापी लोक नसलेलें (विश्व). ४. ब्रह्मदेव. ५. चांगले वर हींच रत्नें, त्यांच्या समुदायाची खाण अशा ब्रह्मदेवाला. ६. (चतुर्मुख ब्रह्मदेवाचे) आठ डोळे. ७. (ब्रह्मदेवाचा पिता) विष्णु, त्याला.

तोंचि निघे विधिनासेंतुनि, दर्शन दे, वराहतोक वनीं;
पक्ष तसा वाढे, जो सुकवींच्या, देव राहतो, कवनीं. ६
गगनीं तत्काळ प्रभु विधिदेवमुनिप्रमोदसह वाढे;
गर्जे; त्या नादाहीं शमले जे त्रिविध ताप बहु गाढे. ७
ब्रह्मादि म्हणति ज्याच्या चरणींचा एक रेणु शिर लाहो !
उदकीं शिरे; तडागीं, कविचित्तीं ये, करेणु[1] शिरला हो. ८
नादें हत दिग्गिभांचे[2] मग होतिल कां न कर्ण वरचील ?[3]
करितां कुक्षिविदारण, कां अंजळिला न अर्णव रचील ? ९
क्षिति उद्धरितां, प्रभुसीं युद्ध हिरण्याक्ष–आदि दैत्य करी,
परकंपदही तद्बळ न गणी जगदीश, जेंवि शैत्य करी.[4] १०
प्रभुसि प्रथम दितिज तो हांसे; मग बहु तयासि कोल[5] हरी;
प्रभुकीर्तिसम न होइल अमृतोदधिची, दया सिको, लहरी. ११
वधुनि हिरण्याक्षातें, व्यापारुनि[6] हरि सलील दाढेतें;
उद्धरि महितें, करि यश, जेणें निस्सीम भद्र वाढे तें. १२

## २. यज्ञावतार

श्रीपति रुचिप्रजापतिपासुनि आकूतिच्या स्वयें पोटा
आला सुयज्ञनामा; लोकीं प्रकटी प्रताप हा मोटा. १३
विष्णुसुयज्ञप्रभुची सहजा स्त्री होय दक्षिणाख्या, ती
अवतरली विश्वांत प्रकट करायासि दक्षिणा[7] ख्याती. १४

---

१. हत्ती. २. दिश् = दिक् = दिग् + इभ = ( अष्ट ) दिशांना असलेले ( कविकल्पित ) हत्ती. ( त्यांचीं नांवें:– ऐरावत, पुंडरीक, वामन, कुमुद, अञ्जन, पुष्पदंत, सार्वभौम, सुप्रतीक ). ३. वरच्यावर झुकलेले, वरती टवकारलेले. ४. हत्ती. ५. वराह, डुकर. ६. योजून. ७. उदार, श्रेष्ठ.

करि दक्षिणोदरीं सुत उत्पन्न सुयज्ञ, सुयम या नावें;
वानावें त्यासहि, कीं रविसम रविच्या करासि मानावें. १५
होउनि आपण इंद्र, त्रिभुवनपीडा द्विषद्भयासि हरी.
स्वायंभुवमनु मातामह तो यास्तव म्हणे तयासि हरी.[१] १६
कोलावतार पहिला प्रभुचा, यज्ञावतार हा दुसरा.
याच्या सुयशा सेविति सुकवि, जसे हंस मानसा सुसरा. १७

## ३. कपिलावतार

सुतपोनिधि प्रजापति कर्दम योगींद्र जो, तया धन्या
श्रीविष्णुप्रेरित शतरूपापति[२] देवहूति दे कन्या. १८
स्वीकारी कर्दम, कीं झाली पहिलीच भगवदाज्ञा त्या.
भाग्यसमृद्धिविमान प्रकटी मुनि, कल्पनग वदा ज्ञात्या. १९
धन्या कन्या पावे मूर्तिमती भक्ति, तत्समा[३] नव[३] ती,[३]
होय मनुसुता भाग्या प्रसवुनि हरि कपिलवत्स मानवती. २०
दे देवहूतिला, स्तनरस सेवुनि आत्मवित्त, कपिलास्य[४]
अद्यापि जया पावुनि सोडितसे सर्वचित्तकपि लास्य.[५] २१
मातेसि आत्मविद्या शिकवुनि, दे मुक्ति कपिल हा तिसरा.
अवतारश्रवण करुनि, गाउनि, हरिभक्त हो! भवा विसरा. २२

## ४. दत्तात्रेयावतार

चिरकाळ अपत्यार्थी दुष्करतर शुद्ध तप करी अत्री.
पत्रीशवाह[६] त्यातें भेटे, जो विश्वपोषिता सत्री. २३

---

१. इंद्र. २. स्वायंभुवमनु. ३. नव=नऊ (प्रकारची भक्ति), तत्समा ती (त्या भक्तीप्रमाणें ती). ४. कपिलाचें तोंड. ५. नाचणें. ६. पक्षिराज गरुड वाहन ज्याचें असा (विष्णु).

हर्षे मुनिवर विमुला पावुनि बहु जेंवि रंक संनिधिला;
किंवा बाळचकोर स्मरतां लाहुनि सुधांशुसन्निधिला.[1] २४
म्हणतां, 'माग' मुनि म्हणे, 'जाणसि तूं भक्तवत्सला! भावा,
म्यां त्वत्पदप्रसादें त्वत्तुल्य व्यक्त वत्स लाभावा.' २५
'कोऽन्यो[2] मत्तुल्योऽत्रे! तुभ्यं दत्तो मयाहमेव' असें
वदला; पद लाजविना त्या प्रभुचें परवदान्यलक्ष[3] कसें? २६
तो दत्तप्रभु चवथा अवतार; सुभुक्तिमुक्तिच्या दानें
यदुहैहयादि[4] धन्यचि केले ज्या विश्वपूज्यपादानें. २७

## ५. कुमारावतार

ब्रह्मा, आधीं विविधा सृष्टि करायासि, सुतप जें करि, तें
विपुल अखंडित भावें सर्व समर्पी प्रवर्तका हरितें. २८
तेणें सनत्कुमार प्रख्यात प्रथम मुनि, दुजा सनक,
तिसरा सनंदन, सनातन चवथा, होय हरि जगज्जनक. २९
ऐसीं कुमाररूपें चार धरी अजित, मोह पळवाया;
प्रलयांत लोपलें जें, लोकीं तें आत्मतत्त्व कळवाया. ३०
करुणा जीस म्हणावें, करिति कथुनि तत्त्व, हे कुमारचि ती
सुमुनिमति यदुपदेशीं स्थिति, जगदीशीं जसी उमा रचिती. ३१
साधुसभेचा मंगलतिलक कुमारावतार पंचम हा;
आत्माश्रितांसि देतो सुख, दावुनि तत्व, जेंवि मंच[5] महा.[6] ३२

---

१. चंद्राच्या सांन्निध्याला. २. 'हे अत्रे! माझ्यासमान दुसरा कोण आहे? मी स्वतःच तुझ्या पोटीं येतों.' ३. श्रेष्ठ उदारांची लक्षसंख्या. ४. हैहय=कार्तवीर्य (सहस्रार्जुन). ५. पलंग, माचा. ६. आनंदाला.

## ६. नरनारायणावतार

लक्षनुता दक्षसुता धर्माची जी मनःप्रिया मूर्ति,[1]
तत्सुत नरनारायण होय करि मुकुंद सत्स्पृहापूर्ति. ३३
श्रीबदरिकाश्रमांत स्वात्मसुखीं करुनि जे सुतप, रमते,
वक्रा शक्रा गमले निजपदहरमूर्तिचे सुत परम ते. ३४
पाठविल्या सुरपतिनें स्मरसेना अप्सरा महाकुटिला;
ज्यांहीं लीळेनें पण करुनि तपोधन जन क्षणें लुटिला. ३५
उर्वश्यादि सहस्र प्रभुपदपरिचारिका स्त्रिया धन्या
पाहुनि लज्जित झाल्या, नागरकन्यांपुढें जशा वन्या. ३६
तेथें कैंचा काम ? क्रोधहि जेथें कधीं न भासावा.
नरनारायणनाम त्रिभुवनहित सदवतार हा सावा.[2] ३७

## ७. वत्सलावतार

केला शब्दशरांहीं, मातेच्या सवतिनें, उरीं विद्ध,
इद्ध[3] ज्वलन तसा ध्रुव जाय वनीं व्हावया तपें सिद्ध. ३८
श्रीनारदमुनिदर्शितपथ यमुनातीरमधुवनीं तपला.
तप लाजविता झाला वृद्धांचें, बाळहि व्रता जपला. ३९
शिकवि, शिवुनि गल्ल दरें[4], ताप हरुनि सर्व, या स्तवनतातें.[5]
दे ध्रुवपद गुरु; म्हणउनि पोषावा गर्व यास्तव न तातें. ४०
माय, महाराज जनक, परि ज्या कोणी न होय हर्षद, या
शिशुसि सुखवि धावुनि विभु–घन चातक–दास अमृतवर्ष दया.[6] ४१

---

१. मूर्ति या नांवाची. २. सहावा. ३. पेटलेला. ४. शंखानें. ५. (प्रभु) स्तुतीमुळें नम्र झालेल्याला (ध्रुवाला). ६. अन्वयः– चातकदास विभुघन धावुनि अमृतवर्ष (अशी) दया (करुनि) शिशुसि सुखवि.

बाळ निववि‍ला पांचा वर्षांचा, जो मनांत तप्त महा.
बहुवत्सळ वरदोत्तम सद्‌गुरुचा सद्‌वतार सप्तम हा. ४२

### ८. पृथ्ववतार

वेननृप स्वीकारी आपणहि, पराहि निंद्य मार्ग वदे.
धर्मन्यायांसि पराभव, जेंवि क्षत्रियांसि भार्गव, दे. ४३
कुपितद्विजहुंकारप्रेता[1] व्हावेचि नरकपद वेना;
त्या सुत होउनि, तारी; प्रभुचें कारुण्य किमपि वदवेना. ४४
वृत्त्यर्थ जन तयाला, जैसे तातासि पृथुक[2], विनवीती.
दोही[3], समा करी क्षिति, दावी सद्रीति पृथुकवि[4] नवी ती ४५
केली दुहिता सुहिता करुनि धरा भूप म्हणति अन्या या
परि महदंतर, होऊं दे स्वग्रामाजिही न अन्याया. ४६
श्रीमत्त्रिभुवनपतिचा हा पृथु अवतार आठवा, याचा
महिमा आठवुनि दिला, म्यां साधुजनासि आठवायाचा. ४७

### ९. ऋषभावतार

लंघिति सुखें, स्मरुनियां ज्यातें, संसारकानना[5] भितरे,
प्रभु पुत्र ऋषभनामा होय, मग भवासि कां न नाभि[6] तरे ? ४८
योगींद्र मेरुदेवीसुत भगवान् ऋषभदेव; तत्तनय
भरतप्रमुख शत सुगुण, नव योगी; ज्यांसि मान्य दत्तनय. ४९
परदुर्वहलीलेनें आपण वाहोनि राज्यभर, तातें
ऋषभें दिधलें, सज्जनसंमत पाहोनि, राज्य भरतातें. ५०

---

१. रागावलेल्या ब्राह्मणांची दटावणी ओळखणाऱ्या ( वेनाला ).
२. बालक. ३. दूध काढी. ४. अतिशय ज्ञाता. ५. संसाररूपी अरण्याला.
६. ऋषभाचा पिता.

नतविषयवासना हरि ऋषभ प्रभु तो, जसा अहिमगु[१] रुजा,[२]
मुनि म्हणति परमहंसप्रवरशतोत्तम महामहिम गुरु ज्या. ५१
उन्मत्तजडपिशाच–स्थिति दावी ऋषभदेव अवसानीं;
व्हावें भस्म अघानीं ज्या सिवुनि शिखीस[३] जेंवि यवसानीं.[४] ५२
सेवित विषयविषाला, औषध, याचेंचि गायन, वमाया.
नवमा या अवताराहुनि वत्सीं न करि गाय नव माया. ५३

## १०. हयग्रीवावतार

भगवत्प्रीत्यर्थ करी पूर्वी चतुरानन स्वयें यज्ञ;
त्यांत प्रकटे भगवान्, हयशीर्षा स्मरुनि तरति ज्या अज्ञ. ५४
जो अखिलदेवतात्मा श्रुतिमय मखमय भवव्यथा हरितो,
विधियज्ञांत प्रकटुनि, करि कुतुकें, अद्‌भुता कथा हरि तो. ५५
तप्तकनकवर्ण प्रभु झाला लीलेंकरूनि वाजिशिरा,[५]
जो श्रितयादांसि म्हणे ‘ सत्सुखपीयूषसिंधुमाजि शिरा. ’ ५६
नासापुटांतुनि श्रुति तुरगमुखाच्या बहु प्रकट झाल्या,
प्याल्या ब्रह्मादिश्रुति[६] सुसुधाधाराचि त्या, परि न धाल्या. ५७
ऐसा त्रिजगद्‌गुरुचा तुरगग्रीवावतार; या दशमा
सेउनि सन्मन पावे, जैसें गंगाऱ्हदांत याद शमा.[७] ५८

## ११. मत्स्यावतार

द्रुहिण निजों लागे, तों तद्वदनांतूनि मूर्त ते वेद
बाहिर निघति, तयांतें हरुनि हयग्रीव असुर दे खेद. ५९

---

१. अ + हिम + गु = उष्णकिरण ज्याचे असा सूर्य. २. दुःख. (“आरोग्यं भास्करात् इच्छेत्” या वचनाकडे या दृष्टांताचा रोख आहे). ३. अग्नीला. ४. गवतांनीं. ५. अश्वमुख. ६. ब्रह्मादिकांचे कान. ७. शांतीतें.

तें दानवेंद्रचेष्टित जाणुनि, तत्काळ विश्वपाळ हरी
श्रुतिरक्षण[1], खळमर्दन, निजभक्तसुखार्थ मीनरूप धरी. ६०
द्रविडेश्वर सत्यव्रत नारायणचरणनीरजीं लीन
तर्पण करि कृतमालातटिनींत, तदंजळींत ये मीन. ६१
त्यजितां जळांत, विनवी त्या राजर्षीस निपट लघु दीन;
स्वकमंडलूंत ठेउनि, नेला तेणें निजाश्रमीं मीन. ६२
न पुरे उदंचन[2] तया, सरहि, महा मीन होय शत गावें.
बसउनि तरींत[3] तारी, त्या, होउनि तत्पदासि नत, गावें. ६३
तत्त्व समुद्रीं कथिलें प्रभुनें, कां तो[4] विहार न करावा?
खळ वधुनि, वेद विधिला दे, हा मत्स्यावतार अकरावा. ६४

## १२. कूर्मावतार

क्षीरधितें अमर असुर मथिती, पावावया अमृत, रत्नें;
मंदर मंथाभारें जाय तळीं, न धरवे परम यत्नें. ६५
क्षीरोदधींत पृष्ठीं घे मंदर देव, होय पृथु[5] कमठ.[6]
कीजे अर्थिमनोरथ, जो श्रीभगवत्प्रसाद पृथुक[7] मठ. ६६
नगपरिवर्तन पृष्ठीं कंडूयनसेंचि[8] तें सुखद भावी.
लावी पातीं, निद्रा घे प्रभु, लीला असी कितिक गावी? ६७
इष्टार्थ सर्व साधुनि, होउनि जो देवदेव कांसव, दे,
हित हाचि होय, ध्यावे चिंतामणिहूनि अन्य कां सवदे?[9] ६८

---

१. वेदांचें रक्षण. २. पाणी काढण्याचा पोहरा. ३. नौकेंत. ४. तो तसा समुद्रांत नौकाकर्षणरूप-**पंत**. ५. मोठा. ६. कांसव. ७. पृथुक = बाळक. बाळक मठ सेउनि प्रगल्भ होतात –**पंत** [ भगवंताचा प्रसाद हा लहान मुलांना बुद्धिमान् ( प्रगल्भ ) करणाऱ्या मठ धान्याप्रमाणें ( मटक्यांप्रमाणें ) आहे ]. ८. खाजविण्याप्रमाणेंच. ९. पदार्थ; व्यापार.

ज्याच्या श्रवणें स्मरणें सर्वांचा सर्व ताप वारावा,
त्या प्रभुचा हा मंदरगिरिधर कूर्मावतार बारावा. ६९

## १३. नृसिंहावतार

दितिज हिरण्यकशिपु विधिपासुनि वर, उग्र तप करुनि, साधी;
शक्रादि लोकपति नृप जे, त्यांसि करी, पदें हरुनि, साधी.[1] ७०
भगवद्भक्त शुचियशा प्रह्लाद, तया स्वपुत्ररत्नातें
माराया, करि शस्त्रज्वलनाहिविषादि नैक[2] यत्नातें. ७१
'ईश्वर मीं; कोण तुझा? कोठें तो? शीघ्र सांग, दाव, कसा.'
असिकर[3] पुत्रासि पुसे, क्षोभे कल्पांतकाळपावक-सा. ७२
'सर्वत्र.' 'स्तंभींही?' 'आहे,' म्हणतांचि तो तया ताडी;
तों त्यांतूनि प्रकटे नृहरि; नखाहींच तदुदरा फाडी. ७३
ज्या गातां दोषाहीं, जेंवि शशाहीं न सिंह घेरावा,
श्रितमोहविनाशक हा होय, नृसिंहावतार तेरावा. ७४

## १४. हरिसंज्ञकावतार

इंद्रद्युम्न महात्मा, जो पांड्यद्रविडसत्तम ख्यात,
तो होता, श्रीपतितें पूजूनि कुलाचलाश्रमीं ध्यात. ७५
प्रत्युत्थानप्रणति[4] न करितां, 'गज हो,' असें घटज[5] शापी.
हूहूसि म्हणे देवलमुनिही 'होसील नक्र तूं पापी.' ७६
झाला गज त्रिकूटीं, तो त्या नक्रें सरोवरीं धरिला;
करिला[6] गवेग[7] न सुटे; संस्कारें पूर्विल्या स्मरे हरिला. ७७

---

१. स+आधि=दुःखी; सचिंत. २. न+एक=अनेक. ३. तरवार हातीं असलेला असा (हिरण्यकशिपु). ४. भेटावयास आलेल्याला उठून नमस्कार करणें. ५. अगस्त्य ऋषि. ६. हत्तीला. ७. पकड.

धावुनि येउनि गरुडें, व्यापारुनि दिव्य आपुलें चक्र,
उद्धरिला, केला निजरूप करिवर स्वरूप तो नक्र. ७८
हरिसंज्ञकावतार प्रभुचा, शिवकोटिभवन चवदावा.
अमृतें गद, तपनें तम, एणेंही तेंवि भव नच वदावा. ७९

## १५. वामनावतार

अमृत न देउनि वंचुनि बळि अरिनीं मारिलाचि वांचविला,
गुरुनें प्रभाव अद्भुत दिधला, जो जपुनि सुचिर सांचविला. ८०
त्रिभुवनपति बळि होतां पुत्र पदच्युत, म्हणे अदिति ' हाय ! '
जाय शरण, तीस, करी वरदवरशरण्य तो अजित माय. ८१
वामन होय शताव्या हयमेधीं, त्रिपद भू बळिस याची.
गुरु वारी, परि देचि, प्रभुची तसि कीर्ति हरि कळिस याची.[१] ८२
सर्वस्वें प्रभुपदयुग होय; करि शिरें तृतीयपदपूर्ती.
वाटे बळी बळिच; कीं छळुनि करी द्वारपाळ सुखमूर्ती. ८३
प्रभु भक्ता निववि वरें, सुभटकरें शिवुनि कंधरा वाहा.
श्रीवामनावतार प्रेमळ सर्वस्व पंधरावा हा. ८४

## १६. हंसावतार

प्रभुला यमनियम धरुनि. भजला नारदसुरर्षि तो भावें.
श्रवण करुनि यश, कोणा साधुजनाचें न चित्त लोभावें ? ८५
होय प्रसन्न भजनें, दर्शन दे हंसरूप हरि त्यातें.
निजभक्तियोग सांगे, स्तवुनि शिरीं चरणरेणुधरित्यातें. ८६
जें आत्मतत्वदीपक भागवतज्ञान, साधन व्यक्त,
तें उपदेशी भगवान् हंस, करि कृतार्थ आपुला भक्त. ८७

---

१. अन्वय-प्रभुची (जसि) तसि याची (या बळीची) कीर्ति कळिस हरि.

सारासार निवडिता[1] भवमार्गींचा समर्थ बोळावा.[2]
घोळावा हृदयीं हा श्रितहित हंसावतार सोळावा. ८८

## १७. मन्ववतार

स्वायंभुवप्रमुख जे ख्यात मनु चतुर्दश प्रजापाळ
या रूपें प्रभु वर्ते, ज्या तिलकें भव्य भूमिचें भाळ. ८९
हानि करि अधर्माची, मनु होउनि देव, वृद्धि धर्माची.
दुर्जनदमनचरित्रें प्रकटी सत्कीर्ति सुखनि[3] शर्माची.[4] ९०
प्रभु मनु होउनि सादर परिपाळी सर्वकाळ साधूंतें.
प्रसवे पुत्र, म्हणति ते भूतप्रिय जें सदैव साधू तें. ९१
परम पतितही ज्याचें स्मरुनि मनीं पादसारस[5] तरावा,
निजसेतुरक्षकाचा[6] हा मन्ववतार सार सतरावा. ९२

## १८. धन्वंतर्यवतार

धन्वंतरि होय प्रभु, आयुर्वेद प्रवर्तवी लोकीं.
जैसी दयावती मति याची, माता तसी नसे तोकीं. ९३
जपतांचि, दूर करितें जें तापकरा जनामयशतातें;
कोठेंही मेळविलें न चिकित्सकराजनामयश, तातें. ९४
पूर्णायु होय या प्रभुवरभजनें जन, असे जरि लवायु;[7]
याच्या पदरेणुवरिल, अमृतघनाधिक, भलें करिल वायु. ९५
कीर्ति अपारा याची, गावें या सदयसत्तमा त्रात्या;
याच्या नामेंचि जना तारिति, ज्या वैद्यदत्त मात्रा त्या. ९६

---

१. निवडून देणारा, हुडकून देणारा. २. सोबती. ३. उत्तम खाण. ४. सुखाची. ५. चरणकमल. ६. आपल्या मर्यादांचें रक्षण करणाऱ्याचा. ( सेतु=मर्यादा ). ७. अल्पायुषी.

किति इतर ? ज्यापुढें क्षणमात्रहि संसारगदहि[1] न ठरावा,
धन्वंतरि अवतार प्रभुचा हा कीर्तनीय अठरावा. ९७

## १९. परशुरामावतार

जमदग्निपुत्र भार्गव राम, प्रभु होय, विप्र तापससा;
जेणें अर्जुन[2] वधिला, मृगराजें जेंवि विप्रताप[3] ससा. ९८
साहे न बळात्कारें हैहयपति[2] कामधेनुला हरि, तें
प्रभु परशुराम; धावुनि मारी माहिष्मतीपुरीं अरितें. ९९
अर्जुनसुत खळ नेती, छेदुनि, जमदग्निचें बळें शिर तें.
कथि साश्रु रेणुका, जें हृदयीं अद्यापि शल्यसें शिरतें. १००
बहु, पावले, तशा जमदग्निवधें, लाख विप्र तापातें.
त्यां, इतरांहि, खळांतें मथुनि, प्रभु दाखवि प्रतापातें. १०१
करि एकवीस वेळां क्षत्रक्षय, कश्यपासि दे वसुधा.
स्थळ घे, सारुनि सागर; सेविति कवि कीर्ति, जेंवि देव सुधा. १०२
हा भार्गवावतार प्रभुचा, एकें उणा विसावा हो !
कीर्तनकरित्या सुखकर, शुद्ध प्रेमळगुणा, विसावा हो. १०३

## २०. रामावतार[4]

रविवंशीं दशरथनृप; ये प्रभु पोटीं तदीय भार्यांच्या,
कौसल्या कैकेयी सुमति सुमित्रा सुनामकार्यांच्या. १०४
श्रीराम भरत लक्ष्मण शत्रुघ्न असे कुमार कवि चार,
रविच्या रश्मिपुढें तम, तेंवि टिके ज्यांपुढें, न, अविचार. १०५

---

१. संसाररूपी रोगसुद्धां. २. सहस्रार्जुन. ३. प्रतापरहित. ४. मूळ भागवतांत रामावताराचें वर्णन फक्त ३ श्लोकांत आहे; परंतु **पंत** रामभक्त असल्यामुळें त्यांनीं तें ११० आर्यांत विस्तृतपणें गाइलें आहे.

गाधिज येउनि, निजमख रक्षाया, रामलक्ष्मणां मागे;
त्या गेयचरित्रां, दे गुरुवचनें, भूप तो पदां लागे. १०६
विद्या बळा अतिबळा, अस्त्रें दे रामलक्ष्मणां भारी,
प्रभु ताटकेसि मार्गीं, मुनिच्या आज्ञेकरूनियां, मारी. १०७
विघ्न सुबाहु करि; हरि प्राणां त्या विप्रसत्तमारीच्या,[1]
शरपवनें शत गावें पाडी सिंधूंत मत्त मारीच्या. १०८
मिथिलापुरीस मुनिसह जातां, जैसा घनें महादाव,
प्रभुनें मार्गीं गौतमभार्येचा, नाशिला, शिलाभाव. १०९
विश्वामित्रप्रेरित[2], जनकमहाराजदर्शित धनुष्य
प्रभुचें[3], प्रभुवर भंगी, तन्नादें कांपले सुर-मनुष्य. ११०
सीतादिसुता चवघी चवघां रामादिकां, दिल्या जनकें.
ते देखिले सदुपयम[4] मंगळ सादर सनंदनें सनकें. १११
फिरुनि स्वपुरा येतां, दशरथहृदयासि भीति भार्गव दे.
कपटें त्र्यंबकभंगक्रोधें,[5] कटु, धरुनि राजमार्ग, वदे. ११२
करुनि त्र्यंबकभंग, छात्राच्याही करी परिभवातें.
नच मानावें, कर्म, प्रभुला, बहु मानलें परि भवातें. ११३
भूप वसिष्ठानुमतें, 'रामासि', म्हणे, 'स्वराज्य ओपावें.'
तों कैकेयीस वदे दासी, कीं, 'बळ धरून कोपावें.' ११४
'भरतासि राज्य चवदा वर्षें, वनवास आज रामातें,'
कैकेयी पतिस म्हणे, 'दे, नातरि, शीघ्र काजरा[6] मातें.' ११५

---

१. ब्राह्मणश्रेष्ठांच्या शत्रूच्या. २. हें 'प्रभुवर' याचें विशेषण. ३. शंकराचें. ४. उत्तम विवाह. ५. (रामकृत शिवधनुर्भंगामुळें) शिवाचा अपमान झाल्याच्या रागानें. ६. कुचला, विषारी बी.

गुरुसत्यधर्मरक्षणकामें, वरि गहन, देव, राज्यातें
सोडी, जें तें मानी जन, टाकुनि, दहन, दे वराज्यातें.[१] ११६
राज्याचा, सुख वाटे; दुःख, स्वीकार, न,[२] वनवासाचा.
सीतालक्ष्मणसहित प्रभुसि सुखविलास, नवनवा साचा. ११७
भेटुनि गुहकासि प्रभु, वटदुग्धें त्या स्थळीं जटा वळवी.
मळवी न द्युति, वल्कहि; नमुनि भरद्वाजमुनिस तें कळवी. ११८
शोकें नृपति मरे; बहु, मातेला भरत तप्ततनु गांजी;
धरि पाय चित्रकूटीं; त्यासि रुचे वृत्ति तीच, अनुगां जी. ११९
ऐके पितृमरण, नव्हे नवल, म्हणे साश्रु राम 'हा ! हा !' तें.
पिंडोदकदान तया दे, व्हाया पूर्णकाम हा, हातें. १२०
पावे भरत, प्रभुच्या चरणापासूनि पादुका नमनीं;
नंदिग्रामींच वसे, घाली स्मृतिचेंचि हा दुकान मनीं. १२१
अत्रि, सुतीक्ष्ण, घटज, शरभंग असे मुनि तपोनिधी रानीं
प्रभुनमन घेति सादर, चिंतावा जो जपोनि धीरानीं. १२२
मारुनि, शुचिता, उचिता गति, अतिदय, देव दे विराधाला;
तो प्रभुतें बहु वंदी, वर्णी यश; डोलवी शिरा, धाला. १२३
प्रभु मग पंचवटींत श्रीमद्गोदावरीतटीं राहे;
रावणभगिनी विधवा शूर्पणखा राक्षसी, वरूं पाहे. १२४
रामाज्ञेनें, तीच्या, तो लक्ष्मण कर्णनासिका कापी.
देव म्हणति, 'तद्रक्ता', करुनि प्रभुवर्णनासि, 'काका ! पी.'[३] १२५

---

१. वर+आज्यातें = उत्तम तुपाला. २. अन्वयः- राज्याचा स्वीकार सुख न वाटे; वनवासाचा (स्वीकार) दुःख (न वाटे). ३. अन्वयः– '(हे !) काका ! (कावळ्या !) तद्रक्ता पी' (असें) देव प्रभुवर्णनासि करुनि, म्हणति.

त्या तद्विरूपकरणें खर दूषण खवळले जनस्थानीं;[१]
चवदा सहस्र वधिले प्रभुनें, सुख मानिलें वनस्थानीं. १२६
भगिनीचें वैरूप्य प्रेक्षुनि, बहु कोपला सुरद्वेषी;
मारीचासि कनकमृगरूपें रामाश्रमाप्रति प्रेषी. १२७
पाहुनि म्हणे जनकजा, 'अत्यद्भुत हरिणमणि धरावा, हो!
साकेतपुरीं लालनपालनसत्कार हा बरा वाहो.' १२८
कामीसा प्रभु धांवे, कांतेच्या ऐकतांचि वाणीतें,
जह्नि कपट राक्षसाचें साचें तत्क्षण मनांत, आणी तें. १२९
चुकवी, पळे, निशाचर; त्यातें मर्मींच मार्गणें[२] हाणी.
'हा सीते ! हा लक्ष्मण !' ऐसी, प्रभुची तसी, वदे वाणी. १३०
कर्णद्वारें ती, त्या सीतेच्या मृदु मनांत, हाक, सिरे,
ती विधिस म्हणे, 'केली हानि अकस्मात् वनांत, हा ! कसि रे!' १३१
कथितांहि तत्त्व, सीता अश्राव्य अवाच्य वाक्य आयकवी.[३]
नायक वीरांचा तो, तीतें उटजीं त्यजूनि, जाय कवी. १३२
तोंचि दशमुखें सहसा येउनि, होवूनि दंभसन्यासी,[४]
धन्या सीता देवी हरिली, व्याघ्रें वनांत वन्या-सी. १३३
गृध्रपति जटायु म्हणे, सोडीं माझी दशानना ! सून;
घ्यावी, अन्यस्त्रीच्या अभिलाषें त्वां, दशा न नासून. १३४
बहु विकळ करी अरिला, रथ भंगुनि, पक्षचंचुनखरांहीं,
हांसुनि म्हणे, 'न माझीं शस्त्रें घेतील वंचुन खरा हीं.' १३५

---

१. दंडकारण्याचा एक भाग= पंचवटी नासिक या ठिकाणीं. २ बाणानें. ३. ह्याचें कर्म 'लक्ष्मण' ४. 'सन्यासी' मधील 'स'वर पंतांनीं अनुस्वार दिलेला नाहीं.

त्या दशरथमित्राच्या, खड्गें छेदूनि, पक्षमूळांतें,
सीतेसि हरी, उठवी वनदेवीमस्तकांत शूळांतें. १३६
मारुनि मारीचातें, फिरतां, सौमित्रि देखिला अजितें.
पुसतां कारण, सांगे प्रभुला जें काय बोलिली अजि तें. १३७
वाटे कृत्या जैसी, सीतारहिता तसीच दलशाला;
दारवियोग प्रभुला तो, जेंवि ध्वजवियोग कलशाला.[1] १३८
स्त्रैणविडंबनकामें[2], आत्मरत करी तदा विलापातें;
पळहि विराम, प्रभुच्या शोकाश्रूंच्या, न दाविला, पातें. १३९
करितां शोध सतीचा, क्षतपक्ष पतित जटायु आढळला,
जो मानिला प्रथम रवि पडला स्वरथावरूनि 'हा' ढळला! १४०
लावी, अश्रु पुसाया, घालाया मंद वात, हातातें;
प्रभु त्यासि पुसे, 'वरिला कोणापासूनि पात हा तातें?' १४१
'वत्सा! सीता नेली पापानें, मद्दशा असी केली,
रामा!...' ऐसें अर्धचि वदतां, तच्चेतना लया गेली! १४२
प्रभु आपण त्या पितृसखगृध्रवराची क्रिया करी, राहे.
संस्कारिति तेंवि जनीं, पुत्रहि न पित्याचिया शरीरा, हे. १४३
योजनहस्ता मारी, तारी, जगदीश तो कबंधातें.
हरि पातकिबंधातें प्रभु, जैसा तात तोकबंधातें.[3] १४४
निजचरणस्मरणपरा, मुनिसेवालब्धशुद्धि, जी शबरी,
तीस अतिथि होउनि, दे यतिपति, गति, देव जानकीश, बरी. १४५

---

१. कळसाला. २. (आपण) स्त्रीलंपट (अशी) फजिती (होईल) या कारणानें (राम विलापातें आत्मरत करी. रामानें शोक आंतल्याआंत जिरवून टाकला. तरीहि त्याचे अश्रु थांबले नाहींत). ३. मुलाला बांधलेल्या दोरीला.

बहु रम्य वनीं सीताविरही प्रभु तो विलोकितां पंपा,
कंपा पावे, ज्याचें ध्यान म्हणे दासषडहितां[1] ' संपा.' १४६

प्रसवे वातापासुनि ज्या सदपत्यास अंजना त्यातें,
ब्रह्मयासहि दुर्लभ जें, दे त्या प्रभुपादकंज नात्यातें. १४७

सुग्रीव ऋष्यमूकीं मारुतिनें प्रभुवरासि भेटविला;
नग[2] दाखविले, मैत्री केली, साक्षी हुताश पेटविला. १४८

भेदी, निजतेज्याचा प्रत्यय यायासि, सप्ततालीला.
वाळिवध करि; प्रभुची, स्वजनीं नुरवीच तप्तता, लीला. १४९

सुग्रीव वानरांतें प्रेषी, करवि प्रभुप्रियाशोध.
संपातिवचें[3] सागर लंघी तो वातसुत महायोध. १५०

शतयोजन मुख करि त्या, ठकउनि, देउनि सुखासि, सुरसेला,[4]
छायाग्रहासि[5] वधितां, हांसति, लावुनि मुखासि सुर सेला. १५१

विघ्नेश्वरप्रयाणीं कोण इतर विघ्न करिल सिंकून ?
मैनाकासहि लंघी; किति हें ? श्रमता न, काळ जिंकून. १५२

लंकेंत शिरे मारुति, तीच्या अधिदेवतेसि जिंतून;
सीतेसि अशोकवनीं पाहे, प्रभुतें मनांत चिंतून. १५३

पाहे, सीता करि दशवदना पाण्यापरीस पातळ, तें.
चित्तांत म्हणे, ' प्रभुला तरिच इचें विरहदुःख आतळतें.' १५४

---

१. दासांच्या षड्रिपूंना. २. (सीतेचे) दागिने. ३. संपाति = जटायूचा बंधु. ४. नागांच्या मातेला. ५. छायेच्या ग्रहणाला, आकर्षणाला. सीताशोधार्थ जात असतां समुद्रावर पडलेल्या मारुतीच्या छायेचें आकर्षण करून त्याची गति कुंठित करणाऱ्या सिंहिका राक्षसीला मारुतीनें मारिलें, अशी कथा आहे.

तो शिंशपातरुस्थित[1] जावूं दे त्या दशानना क्षुद्रा;
रुद्राराध्यप्रभुगुण वर्णी; मग नमुनि दे तिला मुद्रा. १५५
सीता चूडामणि दे; काकाचीही कथा खुणेस वदे.
'वत्स! चिरं जीव,' म्हणे. याहुनि तों सर्वही उणे सवदे. १५६
वन भंगुनि, अक्ष वधुनि, इंद्रजिदस्त्रासि सांपडुनि, धीर
बांधुनि घे; हरि अरिमद; पुर जाळुनि, सिंधु तरुनि, ये वीर. १५७
प्रभु आलिंगुनि निववी, मारुतिचें भाग्य काय वानावें?
याच्या सुयशाहुनि तों, अमृत कवीनीं उणेंचि मानावें. १५८
दिधलें महत्व, यश, सुख, उपमा विश्रांत ज्या न कीशा तें,
कीं प्रभु म्हणे, 'जिवविता या विरहीं तूंचि जानकीशातें.' १५९
सुग्रीवें मेळविलें प्लवगांचें बळ, अनंत ऋक्षांचें,[2]
ज्यांचें आयुध पर्वतशिखरांचें शालतालवृक्षांचें. १६०
तें बळ घेउनि, बैसे स्कंधीं श्रीराम पवनतनयाच्या.
गमनीं, पादन्यासें कां होइल शेष अवनत न याच्या? १६१
लक्ष्मणहि अंगदाच्या स्कंधीं श्रीरामसंमतें बसला;
वाटे उदयनगाग्रीं शारदपरिपूर्णचंद्रमा वसला. १६२
सागरतीरासि प्रभुसेनासागर अनंत, तो पावे,
ज्याच्या महाप्रतापें सप्तांचेही[3] प्रताप लोपावे. १६३
गजवर जसा ऱ्हदातें, सोडुन दावाकुळा अरण्यातें,
साधु बिभीषण, टाकुनि बंधूतें, शरण ये शरण्यातें. १६४

---

१. शिंशपा = अशोकाचें झाड. २. अस्वलांचें. ३. सातांचे सुद्धां, सात सागरांचे सुद्धां.

येतांचि शरण, दे त्या बहुमानुनि तो जगज्जनक लंका.
यश हें प्रक्षाळितसे आइकतां, कीर्तितां, जनकलंका. १६५
प्रभु कोपतांचि, जाणुनि, आणुनि सद्रत्नमय उपायन[1] तें
पदरज माथां धरिलें; मग कथिला सागरें, उपाय, नतें. १६६
प्रभुच्या आज्ञेनें, करि नळ जळनिधिमाजि, सेतु शत गावें.[2]
न तगावें अघ जेणें; विश्वें होवूनि ज्यासि नत गावें. १६७
झटुनि अहोरात्रत्रय, सेतुपथें प्लवगसैन्य तें उतरे.
गर्जुनि, सुगळभट म्हणति, 'कुमदें दुष्टा! दशानना! उत रे!' १६८
श्रीरामनयन लंघी, जह्नि तो दशतुंडहतक[3] लंकेला
संततिसह, बुडवाया गेला, घेवूनि गतकलंकेला.[4] १६९
प्रभुनें प्रताप कळउनि, शुद्ध यशस्कर विचार आठविला.
शत्रुकडे परभंगद अंगद सामार्थ शीघ्र पाठविला. १७०
अंगद हित सांगे; परि नच वाटे त्या मदाकुळास हित.
'मारा, धरा,' म्हणे खळमणि, बुडवाया पदा कुळासहित. १७१
धरिला, खळसचिवानीं, भुजदंडीं वाळिपुत्र हा, पटुनीं.
चूर्ण करि, उडुनि झाडुनि, चवघांसहि, तत्क्षणींच आपटुनी. १७२
प्रभु सांगे, 'त्रासप्रद, जैसा सदनीं गराक्ष[5] साप सदा,
तैसाचि जगीं हा; या जोडा नाहींच राक्षसापसदा.[6] १७३
शोधा लंका, शंका न धरा, प्राकार ढांसळा, खाणा.
जाणा भट हो! निज जय; धर्मच्युत हतचि; हें मनीं आणा.' १७४

---

१. नजराणा, भेट. २. गांव = एक योजन अंतर. ३. दहा तोंडांचा दुष्ट ( रावण ) ४. सीतेला. ५. विष आहे डोळ्यांत ज्याच्या, असा. ६. राक्षसांतील नीचाला.

'श्रीरामो जयति,' म्हणे 'सुग्रीवो जयति, लक्ष्मणो जयति,'
ऋक्षांची, प्लवगांची, सेना पावे महारणीं जय ती. १७५
विफळचि दशवदनाच्या, जें विविधायुध सुधार[1], सचिवांचें
कीं सेवितयासि म्हणे, 'सद्धर्मसुनय सुधारसचि, वांचें.' १७६
सुत, सचिव, सुभट, सेना, समरीं शमती सदैव; तरि माया[2]
करि; माया[3] जग टांचें[4], ज्या प्रभुचा, न समजेचि, गरिमा, या. १७७
श्रीरामें जरि वधिला, सुरपतिनें वृत्र तेंवि, घटकर्ण,
तरि, 'वारीन,' म्हणे, 'नरकपिपलपिंडें[5] हतप्रकटकर्ण.'[6] १७८
जरि इंद्रजित्सुतमणिक्षय केला लक्ष्मणें तरि न राहे,
मानी दशकंठ म्हणे, 'मस्तक लवतिल कसे अरिनरा हे ?' १७९
श्रीराम म्हणे, 'तेजें पूर्णहि जो काय सदरि पोकळ तो ?
पदरीं सुकृत जयाच्या, घातक त्यालाचि मद, रिपो ! कळतो.' १८०
निरुपम समरीं रामप्रभुनें अत्यंत तो खपविला हो !
हें चिंतुनि निजबोधें भवसा दशकंठ, तोख पवि लाहो. १८१
स्वविजय कळउनि, बसउनि शिबिकेंत, सती समीप आणविली.
न्हाणविली शिखिकुंडीं, शुद्धा सर्वां जनांसि जाणविली. १८२
शक्रकृतामृतवर्षें, समरनिहत सकळ उठविलें सैन्य.
प्रभुनें विश्वाचेंही, खलबलदलनें, निवारिलें दैन्य. १८३
बैसुनि पुष्पकयानीं, सबळ बिभीषणसुकंठसह, साजे,
करिते उणेचि झाले सिद्ध सुपुरुषार्थ[7] सर्व सहसा जे. १८४

---

१. तीक्ष्ण. २. कपट. ३. मावण्यास, राहण्यास. ४. तोटकें, अपुरें. ५. नर आणि कपि यांच्या मांसपिंडानें. ६. कटक+ऋण=सैन्याचें कर्ज. ७. धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या साध्य वस्तु; ( दुसरा अर्थ ) सुपुरुष जो राम त्याच्यासाठीं.

चाले पुष्पक वेगें, पवन जसा तत्समान, सत्वर तें.
कीं प्रभु म्हणे, ‘ पहाया शीघ्र भरतवत्स मानस त्वरतें.[1]’ १८५
नमुनि भरद्वाजातें, भेटुनि गुहकाभिधा निषादातें;
प्रेषी मारुतिस पुढें, वाराया बंधुच्या विषादातें. १८६
पद्म भरत, त्या दर्शन दे आधीं, पवनपुत्र तो अरुण;
मग पद्मबंधु भगवान् राम प्रभुवर्य, जो महाकरुण. १८७
श्रीराम प्रभु घनसा, निववी अतितप्त भरत चातकसा.
पातक सारी नामें विश्वाचें, तो करील घात कसा ? १८८
अंगार[1] भोग नीरस झाले, तैं त्या नको रसापा[2] हे
तो भरत रामचंद्र-प्रभुपादांतें चकोरसा पाहे. १८९
सुखउनि गुरुमुख सकळां, प्रभु भरताच्या स्वयें जटा उकली.
करि पुण्य यश असें, कीं नच हें गात्या जना दटाउ कली. १९०
कैकेयीतें वंदुनि, तच्चित्तांतील खेद तो काढी.
कौसल्येसि सुमित्रेसह मग जगदीश सुखसुधा वाढी. १९१
श्रीगुरु भरत सुमित्रापुत्र सुमंत्र प्रधान पुरवासी
राज्याभिषेक करिती, करुनि स्तुति वेद वाद्यसुरवासी.[4] १९२
सुग्रीवबिभीषणकृत उपकार स्वगुरुजवळि आठविले,
आपण, अलंकृत करुनि, ते सर्व स्वस्थळासि पाठविले. १९३
प्रेमें त्या मारुतिला चिरजीवित्व, स्वभक्ति, दे वर हा.
देउनि मणिहार, म्हणे, ‘ मत्कीर्तन जेथ, तेथ देव, रहा. ’ १९४

---

१. घाई करतें. ( मूळ क्रियापद ‘ त्वरणें ’ ). २. निखारे. ३. रसापा= पृथ्वीपति भरताला. ४. वाद्यांच्या सुरांमध्यें वास करणारे.

रामाच्या राज्यांत स्वप्नीं पावे प्रजा न शोकातें.
न पित्यातें, परि उटवी, निववुनि विप्रासि, विप्रतोकातें. १९५
पृथिवी पिके यथेप्सित; घन, जन चिंतिति तसें, सुखें वर्षे.
अहि, वृश्चिक, दंश[1], मशक, मत्कुणहि नसे, प्रजा सुखें हर्षे. १९६
किंबहुना[2] ? श्रीरामें म्हणुं दिधलें 'हाय !' कुतरिया नाहीं.
ज्याच्या सुधा यशांहीं, व्योमींच्या जेंवि कुतरि यानाहीं.[3] १९७
प्रभु रंजन प्रजांचें करुनि, करावें असें जना सिकवी
व्हाया लोकद्वयहित, हरिचरितें शोधिती[4] मनासि कवी. १९८
केलें आपणहि, जसें तातें रघुनें अजें दिलीपानें.
निजशुचिकीर्तिसुधेच्या, तृप्ति सदा सज्जना दिली, पानें. १९९
प्रभुच्या क्रतुची तुलना येइल शतमखक्रताहि न क्रतुला.
आकार सम दिसे परि, सरडा पावेल काय नक्रतुला ? २००
'आपण ईश्वर' न म्हणे, वर्ते गुरुधर्मविप्रभजनांत,
प्रभु उपदेशी सकळां, कीं ऐसा तो न विप्रभ[5] जनांत. २०१
भी प्रभु जनापवादा, शुद्धा दयिता तरी तिस त्यागी.
सद्यश धरुनि गोडी जोडी, सोडी न रीति, सत्या गी. २०२
निजयश रक्षाया, प्रियबंधु त्यागी, परि प्रतिज्ञा न.
नमितां सर्वांसहि दे, नुरवुनि कामाद्यरिप्रति, ज्ञान २०३

---

१. चिलट, डांस. २. फार काय सांगावें ! ३. 'तसी अनादरपात्र केली' अशी **पंत**लिखित चरणार्थपूर्ति आहे. या चरणाचा अन्वयार्थः- जेंवि व्योमींच्या यानाहीं ( आकाशांतील विमानांनीं ) कुतरि ( वाईट नौका ), ( तशी ) ज्याच्या यशांहीं सुधा ( अनादरपात्र केली ). ४. शुद्ध करितात. ५. निष्प्रभ, तेजोहीन.

अकरा सहस्र वर्षें साकेतीं विश्वपति करी राज्य.
ज्यांत स्मरे न मोक्षहि, ऐसें प्रभु दे जनां सुख प्राज्य. २०४
निजचरित अश्वमेधीं, ऐसें, आपण जनांसि आयकवी.
जें कुशलवांसि पढवी रामायणकाव्य आद्य रायकवी. २०५
भव्य महाकाव्य श्रीरामायण, चरित आपलें, परि तें
आपणहि श्रवण करी, कीं हें सर्वांसही सुखी करितें. २०६
राज्यपदीं बैसविले निजकुळनंदन कुशादि जे आठ,
ज्या वाल्मीकिवसिष्ठप्रोक्ता श्रुतिनीतिसत्कथा पाठ. २०७
मग गोप्रतारतीर्थीं श्रीसरयूमाजि सर्व आणून,
न्हाणून, जन विमानीं बैसविले, स्वपदसक्त जाणून. २०८
धांवोनि वर विमानीं, मार्जार जसें, तसें चढे कुतरें,
किंबहुना, त्यातेंही न म्हणेचि विमानदेवता ‘ उतरें. ’ २०९
तत्कीर्तन, योग जसा संप्रति वारूनि मोह, तारितसे;
ने स्वपदा जीव सकळ, देवांचा देव तो हतारि तसे. २१०
स्वसमसमर्थ श्रितहित निज मंगळधाम नाम, या महितें
ताराया, प्रभु ठेवी, पुर उद्धरि, न भरितांचि यामहि तें. २११
भक्तमयूर सुखविले सर्वहि करुणाघनें घनश्यामें,
पूरितसंश्रितकामें, श्रीरामें पुण्यकीर्तिच्या धामें. २१२
कर्णीं भरवा बरवा नरवानरवासवां विसावा हो.[1]
श्रीरामाचा त्रिभुवनपावन अवतार हा विसावा हो ! २१३

---

१. होउ–**पंत**.

## २१. कृष्णावतार[१]

असुरांशभूपसेनाभारें बहु भूमि पावली पीडा;
म्हणुनि विधाता विनवी वैकुंठा सत्वगांचिया नीडा. २१४
देता झाला सद्भय विधिला जो सर्वसाधुवसु[२] देव
करि करिवरवरद उचित निज जनकत्वासि साधु वसुदेव; २१५
प्रभु पुत्र रोहिणीचा होय, स्वांशेंकरूनि, तो राम;
मग पुत्र देवकीचा झाला कृष्ण स्वयें घनश्याम. २१६
हरि गोकुळासि गेला, प्रकटुनि कारालयांत कंसाच्या.
वायस यत्न करुनिही, गतिला रोधील काय हंसाच्या? २१७
त्या रोहिणीयशोदा मोही, प्रकटूनि, पूतना, माया;[३]
मारायास्तव पाजी उग्रविष-स्तन्य पूतनामा[४] या. २१८
जीवनहि न राहूं दे, गरळहि, विधिचा[५] न, हा जनक[५] थानीं;
दे अमृत पूतनेला; म्हणुनचि भुलले महाजन कथानीं. २१९
आपण होय मधुकरी[६], ज्या पद्म करी, रमा सती, नव, या
स्वपदें शकट उडवि विभु सुकुमारशरीर, मास तीन वया. २२०
ज्यासीं[७] माता बांधी, ओढित नेउनि तयाचि उखळा या,
प्रभुनें प्रवेश मध्यें केला, यमळार्जुनांसि उखळाया. २२१
विषजळपानें मेले जे पशुगोपाळ, सर्व दृष्टीनें,
ते तत्काळ उठविले जगदीशें, जेंवि अमृतवृष्टीनें. २२२

---

१. मूळ भागवतांत याचें वर्णन केवळ १० श्लोकांत आहे. त्याचा विस्तार **पंतांनीं** ५६ आर्यांत केला आहे. २. सर्वसाधूंचें धन ( असा देव ). ३. अन्वय- पूतना माया ( कपट ) प्रकटूनि त्या रोहिणीयशोदा मोही. ४. पवित्र आहे नाम ज्याचें त्यास. ५. विधिचा जनक = ब्रह्मदेवाचा पिता ( विष्णु ). ६. भ्रमरी. ७. ज्या ( उखळा ) बरोबर.

यमुना शुद्धा करि हरि, परि हरि मद; दमुनि कालियातें, हो !
दवडी; दे अभय, म्हणे प्रभु, 'दीन न,' शरण आलियातें 'हो.' २२३
यमुनातटनिद्रित पशुपाळांतें दावदहन ये खाया,
त्यातें पी प्रभु; किति तो ? काळहि न क्षम तयांसि देखाया. २२४
तैसेंचि गोप गोधन रक्षी प्रभु, दाव गिळुनि मुंजांत.[1]
निजजनविघ्नांत प्रभु हा, जैसा शरभदेव मुंज्यांत.[2] २२५
प्रेमें बांधुनि घे प्रभु, न पुरे ज्या बहुहि, बंधना, दावें;
तत्पदपद्मीं होउनि अळि, सेवित सुरसगंध, नांदावें. २२६
जो देव यशोदेतें दावी, जृंभित मुखांत, विश्वास,
त्या प्रभुच्याचि पदाब्जीं अचळ असो सर्व काळ विश्वास. २२७
करि उग्रवरुणपाशत्रासापासूनि मुक्त नंदातें,
तो देव सोडवू, दृढभवपाशांतूनि, याहि[3] मंदातें.[3] २२८
वधुनि मयसुता, व्योमा मुक्त करी गोपशिशु गुहारुद्ध
मोह मथुनि, मज संसृतिरुद्धा उद्धरुनि, यश करो शुद्ध. २२९
सदनव्यवहार दिवा, रात्रौ निद्रा, असा व्रतस्थ जन
तो वैकुंठीं नेला, स्मरतें अतिवत्सळा तयाचि मन. २३०
सप्त दिवस नग धरि हरि, गोकुळ बुडवूं शके न मघवा[4] तें.
या प्रभुच्या चरणरजां वरिल्या, नाशे अनंत अघ वातें. २३१
लसदमृतकरकरनिकरधवलरजनिमाजि[5] सबळ[6] मुरलीला
वाजवि, लाजवि गीतें[7] अमृत; करि वनीं हरि प्रचुर लीला. २३२

---

१. एका प्रकारच्या गवतांत. २. ग्रह, समंध, भूत इ. मध्यें. ३. या मंदाला = मला मोरोपंताला. ४. इंद्र. ५. लसत् + अमृतकर + करनिकर + धवल + रजनिमाजि = शोभायमान चंद्रकिरणांनीं शुभ्र झालेल्या रात्रीं. ६. बळरामासह. ७. गाण्यानें.

भजती जैशा यात्रा गंगायमुनाख्यसुसरिदोघांतें,
तैश्याचि रामकृष्णां गोपी; उपमा न दुसरि दोघांतें. २३३
त्या गोपी हाकुनि ने धनदानुग[1] शंखचूड; हरि त्यातें
मारुनि, मणि घे; कैसें पचतें प्रभुधन, बळेंचि हरित्यातें ? २३४
जो वत्स-वत्सप गिळी त्या, प्रभु दे, हरुनिया अघा, सुरसा;
ती करु करुणा करुणावरुणालय; मींही खळ अघासुरसा. २३५
असुर प्रलंब पृष्ठीं वाहे, पळवी, तनू धरी भारी;
तत्काळ तच्छिरातें शतचूर्ण करूनि, मुष्टिनें मारी. २३६
वधिला धेनुकनामा खररूपी असुर तालवनवासी.
धरि तो परि नच दावी ज्या ऐसी उग्रता लव नवासी.[2] २३७
गिळि, उगळी, विश्वाच्या, मानुनि शिशु निपट, वह्नि, बक, राया;
त्यातें चिरितां, प्रभुला म्हणति कविप्रवर 'सिंह', 'बकरा' या. २३८
लीलेनेंचि हरि वधी, ज्या भीती देवकोटि, केशीतें.
प्रभुभुजबळें खळ, जसा उष्मा प्रबळहि, न तो टिके, शीतें. २३९
करि गर्भपात गर्जुनि, वृषभासुर, त्याहि हरि अरिष्टातें[3]
मारी; तारी गोकुळ, भुजबळवातेंचि हरि अरिष्टातें. २४०
त्यां त्यांसि प्रभु मर्दी, ज्यांसि म्हणे कंस 'कुवलया[4] पीडा;'
रंगद्वारीं मारी, तद्दंतें, त्याहि कुवलयापीडा. २४१
मर्दी, स्ववधोद्यत जे, ते चाणूरादि सर्व मल्ल हरि.
'प्रभुकीर्तिपुढें धरुत,' क्षीराब्धि म्हणे 'न गर्व मल्लहरी.' २४२

---

१. कुबेराचा सेवक. २. नव+असी (नवा खड्ग, नवी तरवार). अन्वयार्थः– तो (धेनुकासुर) नवासी-ऐसी उग्रता धरि, परि ज्या (ज्याला) लव नच दावी, (त्या कृष्णानें तो असुर वधिला). ३. या नांवाच्या राक्षसाला. ४. कु+वलया=पृथ्वीला.

केश धरुनि पाडुनि, वरि पडुनि, वधी देव भोजराज्याला.[१]
सद्द्वेष्टा विपराक्रममति किंवा पुरुष तो जरा ज्याला. २४३
प्रभु मुचुकुंदासि यशा, जाय, करायासि आलय, वनातें.
तद्दृष्टिवज्रपातें, करि भगवान् भस्म कालयवनातें. २४४
भी ना, मर्मी शार्ङ्गच्युत[२] खरशरसर्प मुर डसवि, त्यातें,
त्या नरकाहि वधि, म्हणे जो तेजोराशि, 'मुरड,' सवित्यातें. २४५
जो वासुदेव म्हणवी, पौंड्रक, जड कां न तो तयाला ? हे
दे मुक्ति, जी सरूपा; साच्याची[३] सुगति, तोतया[४] लाहे ? २४६
शाल्व वधूनि समुद्रीं, प्रभु बुडवि तदीय यान सौभ[५] रितें.
प्रभुला सत्कीर्ति वरिति, नृपकन्या भुलुनि जेंवि सौभरितें.[६] २४७
वधिला द्विविद महाबळ कपि, जो सिंधूंत शिरुनि जळ उडवी,
बुडवी देश; शिलाहीं ग्राम, जसें पद्म गज पदें तुडवी. २४८
नैमिषजन बहु सुखवी, विश्वाचा[७], वधुनि बल्वलास, विता;[७]
निर्जीवन[८] करि अहिता, स्वकराहीं[९] जेंवि पल्वला[१०] सविता. २४९
शिशुपाळ दंतवक्र प्रभुनें, वारुनि कुमारशापातें
स्वद्वारप उद्धरिले; हें यश हरितें अशेष पापातें. २५०
दमिले यमिलेखर्षभगीतें[११], श्रीशें, प्रमत्त वृष सप्त;
तप्त प्रणत निवविले, गौतममुनिदार[१२] जेंवि पतिशप्त.[१३] २५१

---

१. कंसाला. २. धनुष्यापासून सुटलेले. ३. खऱ्याची. ४. खोटा. ५. शाल्वाच्या यानाचें (वाहनाचें) नांव. ६. सौभरि नांवाच्या ऋषीला. (ह्याला राजकन्यांनीं वरिल्याची कथा विष्णुपुराणांत आहे). ७. जन्म देणारा. ८. निष्प्राण; (पक्षीं जलहीन). ९. आपल्या हातांनीं; (पक्षीं आपल्या किरणांनीं). १०. डबक्याला. ११. इंद्रियनिग्रही व देवश्रेष्ठ यांनीं ज्याची स्तुति केली त्या (श्रीशें). १२. गौतम ऋषीची पत्नी (अहल्या). १३. पतीनें शापलेली.

गाती शुकादि सादर, वधिला विभुनें विदूरथ, कवी, तें
प्रभुयशचि बहु सुखवितें, वाहवुनि इतर विदूर[१] थकवीतें. २५२

रुक्मी विटंबिला, तरि करि कपटद्यूत, ‘ कोण मद्वधिला[२]
पावेल ? ’ म्हणे, प्रभुनें तो लीलेनेंचि, हरुनि मद, वधिला. २५३

पुण्यकुरुक्षेत्रीं, कुरु सृंजय कांबोज मत्स्य कैकेयां
वधुनि, सुगति दे भगवान्; त्यांही, जो काय गाय ऐके यां.[३] २५४

बळभद्र भीम अर्जुन या रूपें ईश्वरें रणीं मथिले,
नेले वैकुंठातें, ते धन्य म्हणुनि शुकादिकीं कथिले. २५५

वाजवुनि वेणु, जेव्हां यमुनापुलिनीं करी अनघ रास.
गोपींचें, देवींचें, न उमेचेंही स्मरे मन घरास. २५६

मार्जारा न शुकानीं भ्यावें, नकुळासही न उरगानीं.
खग मृग न चरति, किति हें ? भुलति प्रभुच्या, शिवादिसुर, गानीं. २५७

प्रभुवेणुरवश्रवणीं, नच चोंखिति, लाविले पृथुक[४] थानीं.
धेनु मधुरतानानीं भुलल्या, कविमति जशा पृथुकथानीं. २५८

न नदी वाहे, हें किति ? मानवती[५] जी, न मान[६] वाहे ती.
शिवतांचि मना मोही गीति, जसी जीन[७] मानवा हेती.[८] २५९

चुंबक लोहासि तसा, वेणु रवें जनमनासि आकर्षी.
इतरांची काय कथा ? प्रभुगानें चित्र होय नाकर्षी. २६०

---

१. अतिशय दूर. २. माझा शेवट करण्याला. ३. कुरुसृंजयादिकांस —**पंत**. ४. वत्स. ५. मानिनी स्त्री. ६. गर्व. ७. म्हाताऱ्या. ८. खड्ग.

33L92 Ch10

प्रकटी जग मोहाया, भगवदभिव्यक्ति[१] मोहरीतीतें;
जाणेल काय ? मोहन, अन्या जी शक्ति मोहरी ती, तें.[२] २६१
निववि यश जनासि, तसें अमृत न, शतमखमुखां[३] सुरां पानें;
जें अनुमोदुनि गाउनि पावावें वहु सुखां सुरापानें.[४] २६२
त्रिभुवनमंगळचरितें, श्यामब्रह्म स्वकौतुकें करितें.
परि तें नतभव हरितें, न रितें भाजन[५] भजेल जें सरितें.[६] २६३
प्रभु वदला, 'स्वयशोमृत पिवुनि, निवुनि, होचि धन्य, ये रसिका !'
आपण सिकोनि म्हणती, अन्यांसि पदार्थ अन्य 'येर सिका.' २६४
उद्धरि हरिच नृगातें[७], अघ करि जरि तिळसमान सरडा, या.
हें परिसुनि[८] न जडाचें कर्मी धरि चिळस मानस रडाया ! २६५
मिथिलेशाच्या, तेंवि श्रुतदेवाच्याहि जाय गेहास.
वर्णिसि हरिस न ? रसने ! कळिला येइल न काय गे हास ? २६६
रुचलेचि सुदामपृथुक[९], बहुतचि तें शाकपत्र[१०] अवशिष्ट;
प्रभुसि पशुपशिशु कवळहि देति, जसे भाग करुनि सव,[११] शिष्ट. २६७

---

१. भगवंताचें सत्स्वरूप, भगवंताचा आविष्कार. २. अन्वयार्थः–( मोहरीतीहून–आकर्षणशक्तीहून ) जी अन्या ( दुसरी ) शक्ति मोहरी ( प्रमाणें क्षुल्लक ), ती तें मोहन ( भगवंतानें मोहित केलेलें जग ) जाणेल काय ? ३. इंद्रप्रमुखां. ४. मद्यप्राशन करणाऱ्यानें. ५. पात्र. ६. सरि=झरा; ( झऱ्याला ); सरित्=नदी; ( नदीला ); ( पावसाची ) सर, ( त्या सरीला ). ( येथें "तें" वर अनुस्वार असल्यामुळें नदीवाचक अर्थ बरोबर वाटत नाहीं. ). ७. नृग हा वैवस्वतमनूचा पुत्र; ब्राह्मणशापामुळें हा सरडा झाला होता. ८. **पंत**लिखित दुसरा पाठ 'कळुनिहि.' ९. सुदाम्यानें दिलेले पोहे. १०. दुर्वास ऋषीनें योजलेल्या सत्त्वपरीक्षेचे वेळीं द्रौपदीनें श्रीकृष्णास दिलेलें भाजीचें पान. ११. यज्ञ.

92053

सिद्धांगराग[1] जेव्हां, आम्हां बंधूसि दे, वदे, वाहे;
वहु दासी कुब्जाही आवडती होय, देवदेवा हे.
ध्यावा, गावा, भावें हा श्रीकृष्णावतार, सुखहेतु.
रसिका एकविसावा एक विसावा भवांबुनिधिसेतु. २६९

## २२. व्यासावतार

उपरिचरवसुनृपाच्या वीर्यें मीनोदरोद्भवा कन्या,
सत्यवती नाम जिचें, दाशवरें[2] पोषिली सती धन्या. २७०
ती मीनगंध वारुनि, निर्मुनि योजनसुगंध तनु, उचिता.
सुवरें निजांगसंगा केली, देउनि पराशरें शुचिता. २७१
प्रसवे श्रीसत्यवती यमुनाद्वीपांत आशु[3] भव्यास;
वेद विभाग करी प्रभु हा, यास्तव नाम या शुभ व्यास. २७२
भव्य महाभारत हा रचिला इतिहास, पांचवा वेद;
याच्या श्रवणें, न उरे अज्ञान, तदुत्थ[4] सर्वही खेद. २७३
करुणाब्धि बेविसावा हा श्रीव्यासावतार, शुकतात;
सुकतात शोकसागर, यातें गातां, अनर्थ चुकतात. २७४

## २३. बुद्धावतार

असुर, श्रुतिच्या मार्गीं, सुदृढा निष्ठा सदैवही धरिती
सुतपोनुष्ठानें, ते निजविजयप्राप्तिकारणें, करिती. २७५
कामगमा[5] त्रिपुरांपरि सुपुरी निर्मूनि दे तयांस मय;[6]
न दिसे वेग तयांच्या आगमनाचा, कळेचि ना समय. २७६

---

१. उटी. २. मासे धरणाऱ्या कोळ्यानें. ३. तत्काळ. ४. त्यापासून उत्पन्न झालेले. ५. इच्छेप्रमाणें हवी तिकडे जाणारी. ६. असुराचें नांव.

श्रुतिपथबळें पुरींच्या साहित्यैंही, जगासि बुडवीती;
ते लोकपाळकांचें धैर्य, जसें तृण समीर, उडवीती. २७७
प्रभु होय, वेदनिष्ठा त्यांची बुडवावया, स्वयें बुद्ध,
शुद्धश्रुतिपथ दूषी, बुडवी असुरांसि, न करितां युद्ध. २७८
पाखंडवेष करि, उपदेशी पाखंड धर्म, उक्तींनीं;
बहु मोह लोभ, त्यांच्या, घाली बुद्धींत बुद्ध युक्तींनीं. २७९
त्या देवद्वेष्टयांच्या, मोहें लोभेंहि, मति अति भ्रमल्या;
श्रुतिदूषणोक्ति नानापरिच्या हरिच्या, तयां हिता गमल्या. २८०
श्रुतिपथनिष्ठा त्यागुनि, मानुनि पाखंडधर्म, असुर, हित,
झाले निःश्रीक[१], सकळ, शक्रें केलें रणांत असुरहित. २८१
कीकटदेशीं प्रकटुनि, सुरशत्रुसमूह युक्तिनें मथिला;
प्रख्यात तेविसावा ऐसा बुद्धावतार हा कथिला. २८२

### २४. कल्क्यवतार

होतिल पाखंडी द्विज सर्व, भ्रमतील जेधवां कलिनें,
मलिनें कर्में रुचतिल, जेंवि अलिकुलासि विकसितें नलिनें. २८३
सर्वस्व हरुनि, राजे शूद्र, श्रमद प्रजांसि होतील,
घटज जसा जळनिधिजळ, खळजन परधन मुखांत ओतील; २८४
संतांच्याही सदनीं कृष्णकथा पावतील लोपातें;
कीं अपराधावांचुनि खल करितिल विघ्न, धरुनि कोपातें. २८५
जेव्हां नच करिजेल श्रवण ‘स्वाहा[२]’ ‘स्वधा[२]’ ‘वषट्[२]’ कानें;
राहो दिजेल[३] लेशहि शत्रूंच्या[४] साधुगुण न षट्कानें.[४] २८६

---

१. निर्धन. २. ‘स्वाहा’ व ‘वषट्’ = देवांना हविर्भाग देतांना उच्चारावयाचे शब्द. ‘स्वधा’ = पितरांना हविर्भाग देतांना उच्चारावयाचा शब्द. ३. दिला जाईल. हा कर्मणि प्रयोग. ४. सहा शत्रूंच्या समूहानें.

तेव्हां कलिशास्ता प्रभुवर्य अवतरेल, शंभलग्रामीं;
जो नामें विष्णुयशा ब्राह्मणसत्तम, तयाचिया धामीं. २८७
ज्या पावाया सम्राट्, सर्वस्व त्यजुनि जाहले वल्की,[1]
होइल युगावसानीं, द्विजसुत नामें करूनि तो कल्की. २८८
वधिल खळांतें, पुनरपि कृतयुगधर्मप्रवृत्ति करिल हरी,
अमृतनिधिच्या, कराया शकति प्रभुकीर्तिची न सरि, लहरी. २८९
गातांचि चोविसावा हा कल्क्यवतार, पापहर पावे;
या विष्णुयशें जैसे ऐसे अमृतें न ताप हरपावे. २९०

## उपसंहार

भक्तहितजगन्नाथप्रेरित[2] रामात्मजें असे भावें
अवतार चतुर्विंशति लिहिले, श्रीविष्णुयश सदा गावें. २९१
जो प्रेरील प्रेमें गाया श्रीविष्णुच्या चरित्रास,
साक्षात् तो श्रीरामचि संसृतिचा, वारिता, परित्रास. २९२
सुकविमन न सोडी हरियश, जैसें तोक[3] थान, यागा[4] या,[5]
बहुतचि अंतर; विसरे जो सुरसिक तो कथा न या गाया. २९३
रसने ! श्रीकृष्णकथा गाया, जरि मुक्त तरिहि, शुक लागे,
ऐसें न करी जो, तो जन सुज्ञ असोनि काय चुकला गे ! २९४
हरिचरिताच्या पानें, गानें, भवपाश सुदृढही उकले;
मुकले सुखासि, ऐसें जे न करिति, पटुहि फार ते चुकले. २९५

---

१. वल्कल धारण करणारे (तपस्वी). २. भक्तहित जगन्नाथ हे पंतांचे मित्र होते, असें दिसतें. ३. लहान मूल स्तनपान करीत असतां मुलाची एकाग्रता होते व एक प्रकारची समाधि लागते; त्याप्रमाणेंच हरियश गातां सुकविमनाची स्थिति होते. ही वत्सलरसात्मक उपमा फारच बहारीची आहे. ४. यज्ञाला. ५. हरियशाला.

भगवान्नारद गातो हरिहरयश, वाजवूनि वीणा रे !
चित्ता ! ज्यातें नमिती सत्कृतिशमायणादि वीणारे.[१] २९६
चित्ता जेणें कामप्रमुखाहितसहित कळि वदे ' हा ! ', तें
हरियश चित्तीं, लटिकें स्पष्ट स्वप्रेम, कळिव देहातें. २९७
प्राणी कैसाहि असो, एणेंचि मना ! सुखें अजा[२] मिळतो;
' नारायण नारायण ' सुतभावें कीं म्हणे अजामिळ तो. २९८
भागवत म्हणे, ' गातो जो हरियश, सर्व साधु मानव तो,'
कोणी हो, भगवद्गुणगात्यातें सर्व साधु मानवतो.[३] २९९
सर्व रसिक कर जोडी, थोडी अन्यत्र, यांत बहु गोडी,
जातात सर्व खोडी; सोडी अघ, चित्रगुप्त लिपि खोडी. ३००
प्रभु अर्जुनासि सांगे, ' संसारीं नच बुडेल मद्याजी,[४] '
जनता तरे हरियशें, मळली असकृत् पिवूनि मद्या जी. ३०१
तरली द्वेषेंही, कीं जी अघबककेशिकंसखळजनता;
रे चित्ता ! मग दुर्गति कैंची श्रीकृष्णपादजळजनता ?[५] ३०२
ताप सरे, पाप हरे, ऐक अरे ! सदुपदेश, सर्व खरे,
म्हण, ' राम कृष्ण शंकर गोविंद मुकुंद देवदेव हरे ! ' ३०३
' राम हरे राम हरे राम हरे राम राम राम हरे ! '
चित्ता जपसि असें, तरि अत्यद्भुत हर्षहेतु हा मह[६] रे ! ३०४
' कृष्ण हरे कृष्ण हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे ! '
म्हण ऐसें; निःस्पृह जो, तोचि तरे, सर्वजात तृष्ण हरे. ३०५
' शिव शंकर मृड भव हर शशिशेखर नीलकंठ मदनारे ! '
आहे रसना स्वस्था, वद हे नामावळीच वदना ! रे ! ३०६

---

१. उत्पन्न करणारे. २. परमेश्वराला. ३. मान देतो. ४. माझें पूजन करणारा. ५. श्रीकृष्णाच्या पदकमलीं नम्र झालेल्याला. ६. उत्सव.

नरकजिदवतारांची[1] माला कंठींच नित्य पाळावी.
हे जैसी, तैसी प्रिय चिंतामणिनिर्मिता न माळा वी. ३०७
कविपिकनिकरप्रियकर[2] हरिचे अवतार, आम्रतरु, फळले.
भक्तमयूर सुखप्रद किंवा पीयूषमेघ हे वळले. ३०८
भगवदवतारमाळा हे, भगवंतासि अर्पिली भावें.
बहु या महाप्रसादीं सादर भगवज्जनें सदा व्हावें. ३०९
भगवद्यशोमृतार्णवलहरी अष्टोत्तर[3] त्रिशत[3] आर्या
या हरिजनप्रिया, प्रभुलीला जैशा शुकाहि, कृतकार्या. ३१०

---

## (२) ध्रुवचरित्र[4]

( छंद-साकी )

भक्तिस साधुचरित्रें हो ! बळ ये तरिस[5] अरित्रें[6] हो ! (ध्रुवपद)
उत्तानचरण राजा परम ख्यात त्रिजगीं हरिसा,
परिसा[7] मंदारासहि[8] ज्याचे आश्रित म्हणति न 'परिसा.[9]' १
ज्येष्ठा वधू सुनील सुनीतिच मूर्तिमती ती गुरुची,[10]
परम प्रिया कनिष्ठा जाया त्याची नामें सुरुची. २

---

१. नरकजित्+अवतारांची = विष्णूच्या अवतारांची. २. कविरूपी कोकिळांच्या समूहाला आवडणारे. ३. तीनशें आठ. ४. हें प्रकरण श्रीमद्-भागवत स्कंध ४ अध्याय ८-१२ यांतून **पंतांनीं** घेतलें आहे; व याला साकी छंद वापरला आहे. साकीच्या प्रत्येक अर्धांत चार मात्रांचा एक गण असे सात गण म्हणजेच अठ्ठावीस मात्रा असतात. ५. नावेस. ६. वल्ह्यानें. ७. स्पर्शमण्याला; लोखंडाचें सोनें करणाऱ्या दगडाला. ८. कल्पवृक्षासहि. ९. ऐका. १०. नवऱ्याची.

ज्येष्ठा स्त्री प्रसवली जया तो ध्रुव बाळक निष्ठेचा;
उत्तम नामा दुसरा तातप्रिय बाळ कनिष्ठेचा. ३
एका समयीं सुरुचिसुतातें अंकीं घेउनि राजा
लालन करीत बसला होता म्हणत 'रसा इतरा जा.[१]' ४
सिंहासनीं बसावें आपण असि वांछा ध्रुव वाहे,
पाहे भूप उगाचि, न घे कीं, ती सुरुचि निकट आहे. ५
परम कठिण ईर्ष्या[२] गर्ववती ती सुरुचि असें वदली,
जेणें साधुसभा बहु कांपे, वातें जैसी कदली.[३] ६
'वत्सा! दुर्लभ सिंहासन हें इछिसि बैसायातें,
उचित नसोनिहि आक्रमिसी तूं सहसा कैसा यातें? ७
राजसुतहि न पदोचित तूं कीं म्यां धरिलासि[४] न पोटीं,
होतासि मदात्मज, जरि असतीं पदरीं सुकृतें मोठीं. ८
अन्यस्त्रीसुत आपण ऐसें बहुधा नेणसि बाळा!
इछिसि दुर्लभ अर्थ म्हणोनचि, नुमजुनि हीना भाळा. ९
आराधिला अवंध्य मनोरथ व्हाया जो साधूनीं,
सुतपें आराधुनि तो ईश्वर तदनुग्रह साधूनी, १०
ये माझ्या पोटीं सिंहासनकाम मनीं जरि आहे.'
ऐसें सुरुचि वदे निष्ठुर तें बाळहि न ध्रुव साहे. ११
अहिसा खवळुनि मातेपासीं तेथुनि रडतचि गेला.
पुसतां, सुनीतिला श्रुत रोदनहेतु पुरजनें केला. १२

---

१. इतर रसांना 'जा' असें म्हणत होता. म्हणजे तो राजा वात्सल्य-रसानें भारावून गेला होता. २. असूया, मत्सर, द्वेष. ३. केळीचें झाड. ४. हा कर्मणि प्रयोग आहे.

दवदहनांत लता तैसी ती बाळा[1] शोकीं पडली,
आलिंगुनि बाळातें सोडुनि धैर्यातें बहु रडली. १३
ती बाळासि म्हणे, ' बापा ! हा न परापराध मानीं,
कीं द्यावा दोष परा आपण जोडुनि नराधमानीं. १४
बापा ! दुःख परा जो देतो जें भोगितसे तो तें,
पेरावें बीज जसें त्याचें प्राप्त फळ तसें होतें. १५
सत्य सुरुचि वदली वत्सा ! कीं माजीं कर्मं खोटीं,
म्यां हतभाग्येनें धरिलासी[2] प्रथम अभद्रीं पोटीं. १६
वाढविलासी[2] मग बापा ! तूं तंव अहितकरें स्तन्यें,
धन्य असें कैसें फळ होतें काय म्हणावें अन्यें ? १७
मी दुर्भगा नव्हें कैसी ? कीं पुत्रा ! मातें भार्या
दासीही म्हणतां बहु लज्जा वाटे राजा आर्या. १८
जैसी मी माता तैसीच प्राज्ञजनमतें सुरुची.
मजहुनिही तुजला बहु मान्या कीं ती दयिता गुरुची. १९
सत्य प्रिय हित वदली मत्सर सोडुनि तूं तेंचि करीं,
आराधीं श्रीहरितें तोचि श्रेष्ठ वरद सुरनिकरीं.[3] २०
उत्तम जसा तसा भद्रासन इछिसि तूं जरि तरि तें
प्रभुपदसारस आराधीं, हित बहु भजकाचें करितें. २१
ब्रह्मेंद्रादिहि झाले प्रभुतें आराधुनि सुपदेश.[4] '
ऐसा सुनीतिहि करी त्या ध्रुवबाळाला उपदेश. २२
त्यागी करावया रोमांचित धीरजना भवनातें,
ध्रुव बाळ निघे आराधाया नीरजनाभ[5] वनातें. २३

---

१. ती सुनीति राणी. २. हा कर्मणि प्रयोग आहे. ३. देवांच्या समुदायांत. ४. सु + पद + ईश = चांगल्या स्थानाचे धनी. ५. कमलनाभ विष्णु.

मायहि न म्हणे ध्रुवबाळाला, 'बहु ताप न हो, राहो,
कीं जी शरणागति प्रभुप्रति होय शुभद होरा[1] हो !' २४
संसृतिपारद परम विशारद भेटे श्रीनारद या,
शारदयामवतीश[2] चकोरीं तेंवि करी फार दया. २५
पुसुनि मुनि म्हणे, 'बा ! बाळ ! असें वच न कठिण सोसील.
येव्हांचि तुझें ऐसें, केवळ उग्र हठि नसो शील. २६
भूतसुहृत्तम[3], नियतिशरण[4] बुध, शांतिसचि सुरभि मानी,
बहु दुर्लभ परमेश्वर, त्यातें पावे न दुरभिमानी.' २७
ध्रुव बोले, 'सांगसि जें तूं तें सत्यचि सर्व स्वामी !
ऐकावें त्वां वदतों कांहीं सज्जनसर्वस्वा ! मीं. २८
साधुनि वृत्त्युपदेशामृत तें प्यावें कविकटकांहीं,[5]
न धरी सुरुचिदुरुक्तिशरशतछिद्रहृदयघट[6] कांहीं. २९
धर्माचें तत्त्व, तसेंचि, न हा जाणे बाल, नयाचें,
त्वां गुरुवरें करावें संप्रति समुचित लालन याचें. ३०
भगवद्दर्शन दुर्लभहि सुलभ व्हाया जी काय किली,[7]
ती तव हस्तीं आहे ऐसी कीर्ति तुझी आयकिली. ३१
बहु मानावें तोकें केलें आंग-उपायन[8] तातें.
बहु काय वदों ? सदय गुरुवरा ! सांग उपाय नतातें.' ३२
परम प्रसन्न होउनि भगवान् ज्ञानदयाराशि कवी,
भगवद्ध्यानार्चनमंत्र सुविधि राजकुमारा शिकवी. ३३

---

१. सुमुहूर्त. २. शरदृतूंतील रात्रीचा धनी (चंद्र). ३. प्राणिमात्रांचा आवडता मित्र. ४. दैव ज्याला शरण असा. ५. कवींच्या समूहांनीं. ६. सुरुचीच्या दुर्भाषणरूपी बाणांनीं शतशः विदीर्ण झालेला (माझा) हृदयरूपी घट. ७. किल्ली, (युक्ति). ८. आलिंगन.

ध्रुव नमुनि म्हणे, 'जातों आतां मी बापा ! यमुनेतें,
भगवद्दर्शन झालेंचि तुझे दिसतां पाय मुने ! तें.' ३४
जाउनि यमुनेप्रति तत्तीरीं रम्य मधुवनीं राहे,
आरंभी परपुरुषाराधन, शिशुहि बहु श्रम साहे. ३५
मुनि भूपाला भेटे, राजा पूजी मुनिला विधिनें,
त्यातें 'कां खिन्न ?' असें पुसिलें त्या ज्ञानदयानिधिनें. ३६
कथितां वृत्त सविस्तर त्याच्या होय भर विलापाला,
पुत्रविरहविषतरुचा विधिनें विपुल भरविला पाला. ३७
स्त्रीजित, निर्दय, निस्त्रप, ऐसें स्वमुखें बहु निंदुनि घे,
सुतशोकांत न तो नृप जाणों राहुमुखीं इंदु निघे. ३८
नारद म्हणे, 'सुतातें शीघ्रचि सिद्धार्थ पहाशील.
आहे क्षेमीं देवसुरक्षित तन्मान्य महाशील.' ३९
मुनिवचनें चिंता सोडावी, परि घडल्या अनयातें
स्मरुनि अनादरुनि भीतें तो नृप चिंती तनयातें. ४०
पांचा वर्षांचा ध्रुव उग्रीं नियमीं चळला न दरें,[1]
पहिल्या मासीं तो त्रिदिनांतीं खाय कपित्थें[2] बदरें.[3] ४१
दुसरे मासीं द्विगुणदिनांतीं[4] तो शीर्णें तृणपर्णें
भक्षुनि चिंती प्रभुसि, परिसिला होता जैसा कर्णें. ४२
तिसरे मासीं त्रिगुणदिनांतीं[5] पी केवळ तोयातें.
आशीर्वाद मुनीचा जो दे योगीं बळ तो यातें. ४३
मग तो चवथे मासीं द्वादश दिवसांतीं वातातें
प्राशुनि चित्तीं चिंती प्रेमें चतुराननतातातें.[6] ४४

---

१. भीतीनें. २. कवठें. ३. बोरें. ४. सहा दिवसांनीं. ५. नऊ दिवसांनीं. ६. ब्रह्मदेवाच्या पित्याला ( विष्णूला ).

पंचम मासीं एकपदें तो स्थाणुसम[१] उभा राहे,
हृदयीं भगवन्मूर्तीतेंचि, न तदितर कांहीं पाहे. ४५
विश्वस्वरूप हरिहुनि आपण भिन्न नसे या भावें
धरिला ध्रुवें समाधि[२] असेंचि ध्यान धराया यावें. ४६
त्याच्या प्राणनिरोधें झाला विश्वप्राणनिरोध,
भ्याले लोक सलोकप त्यांसि न लागे कारणशोध. ४७
व्यसनीं सर्वहि लोकेश शरण गेले लक्ष्मीपतितें,
यन्नामें शुचि व्हावें, चलन न होतां पक्ष्मीं[३], पतितें. ४८
ते प्रभुसि म्हणति, 'आम्हांसि तुझा मात्र असे विश्वास,
रक्षीं सदया ! प्राणनिरोधापासुनि या विश्वास.' ४९
दे अभय प्रभु, सांगे कारण जें कांहीं न कळे तें,
'जा स्वस्थ' म्हणे, 'पावविलें सुख हें कां हीनकळेतें ?' ५०
लोकेश स्वस्थानीं धाडुनि जगदीश्वर मग, पातें
न लवे तोंचि, मधुवनीं आला समधिष्ठुनि[४] खगपातें.[५] ५१
राहे पुढें उभा परमेश्वर परि तो ध्रुव पाहेना,
कीं अंतःस्फुरितप्रभुमूर्तिवियोग क्षण साहेना. ५२
त्या ध्रुवहृद्गतनिजमूर्तीतें तो प्रभुवर आकर्षी,
व्हाया प्रमुदित साधु श्रोते सुकवि ध्रुव[६] नाकर्षी. ५३
हृदयीं भगवन्मूर्ति न दिसतां पावे व्युत्थानातें,[७]
ध्रुव गडबडला चुकला शोधी, बाळ जसा थानातें.[८] ५४

---

१. खुंटासारखा, खांबासारखा. २. 'समाधि' हा शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे. ३. डोळयांच्या पापण्यांचे ठिकाणीं. ४. बसण्यासाठीं योजून. ५. गरुडाला. ६. कायमचे. ७. व्युत्थान=प्रतिरोध, समाधींतून जागें होणें. ८. ही उपमा व 'अवतारमाला' (पृष्ठ १०३) मधील आर्याक्रमांक २९३ यांतील उपमा, या दोन्ही किती वात्सल्यपूर्ण आहेत पहा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 33292 दि.
क्रमांक 9502 नों. 13-11-02



नेत्रें उघडी, घाबरला तो ध्रुव सहसा जों पाहे,
तों आंत जसी तसि बाहेर प्रभुमूर्ति उभी राहे. ५५
भी, परि सुनीतिसुत दंडापरि पडला, करि अंजलिही.
कीं बहु भाग्य ललाटीं श्रीगुरुनारदकरकंज[1] लिही. ५६
स्वगुरुगुरुचि शिकवु म्हणे; जाणों, शिकवि न या स्तवन मुनी;
स्तुतिवांछा धरुनि उगाचि पुढें राहे यास्तव नमुनि. ५७
ध्रुवमतिजाड्य ब्रह्ममयदरें स्पर्शुनि गाल हरी तें[2]
वात्सल्य असें परिसुनि जन हो ! हर्पुनि गाल हरीतें. ५८
जागविली निजली होती त्या बाळाची जी वाचा,
बोध दिला ऐसा लाजावा ज्या महिमा जीवाचा.[3] ५९
प्रभुनें शिशुसि शिकविलें जैसें निजवर्णन वेदास,
वाटे तो उच्चारी स्तवनीं शुचि वर्ण नवे दास. ६०
बाळमुखींचीं जरि अव्यक्तें अक्षररूपें साधीं
केवळ अमृतचि होती वत्सल गुरुजनकर्णीं आधीं. ६१
परमानुग्रह करुनि शिकविलें प्रभुनें भाषण मग तें
किती वर्णावें ? अमृत कसें हो ! त्या सूक्तिपुढें तगतें ? ६२
वाजविला वेणु तसा किंवा बहु शिक्षित हा शुकसा,
प्रभुला प्रमुदित मग न करील ध्रुव बाळक आशु कसा ? ६३
भगवान् प्रसन्न होउनि बोले, ‘ दिधलें तुजला पद तें,
सर्वपदश्रेष्ठ असें वत्सा ! विश्व जयातें वदतें. ६४

---

१. करकंज=करकमळ. २. अन्वय- तें ध्रुवमतिजाड्य ब्रह्ममयदरें (शंखानें) गाल स्पर्शुनि हरी (घालवी). ३. बृहस्पतीचा.

ज्यातें प्रदक्षिणा सप्तर्षि ग्रहमंडल करि वेढी,
जें ज्योतिश्चक्रीं, वृषचक्रीं[1], जेंवि विराजे मेढी.[2] ६५
आधीं वत्सा ! तूं येथुनि जा निजजनकाच्या भवनीं;
जातां तपोवनाप्रति देइल तुजला राजा अवनी.[3] ६६
छत्तिस सहस्त्र वर्षे करिसिल अवनीच्या अवनातें.[4]
नित्य मम भुजा परि; करितील प्रकृति तव स्तवनातें. ६७
उत्तम[5] मरेल मृगयेंत, सुरुचि दवदहनांत जळेल,
वत्सा ! हें न टळेल कदापि त्वत्कीर्तिहि न मळेल. ६८
बहुदक्षिण यज्ञांहीं मातें यजुनि, सुखें वससील.
मग तूं माझ्या सर्वामरमुनिवंद्य पदीं बससील.' ६९
ऐसा अत्यद्भुत वर देउनि गुप्त प्रभुवर झाला,
मग नातिप्रीत मनें तो ध्रुव तातपुरीप्रति आला. ७०
कर जोडुनि वार्ताहर सांगे 'ध्रुव आला' हे वार्ता,
ती राजाला झाली जैसी वृष्टि सुधेची आर्ता. ७१
वार्ताहरासि बहु मोलाचा मणिहार दिला भूपें,
रत्नाकरें प्रसन्नें रत्नें द्यावीं उदकें कूपें. ७२
नारदमुनिच्या विश्वासें ती वार्ता साची वाटे,
शोक सुतागमनें जेंवि घटज–तेजें सागर आटे. ७३
राजा भार्यापौरामात्यांसह सामोरा गेला;
तैं स्वनियतिवरि[6] तेंवि सुरुचिवरि न ध्रुव तो रागेला. ७४

---

१. बैलांच्या वर्तुळांत. २. मधला खांब, ज्याभोवतीं खळयावर बैल फिरतात तो. ३. पृथ्वी. ४. संरक्षणातें. ५. ध्रुवाचा सावत्र भाऊ. ६. आपल्या नशीबावर.

गुरुस सुरुचिस सुनीतिस वंदुनि भेटुनि निववी अंगें,
कीं आलें तापहरत्व श्रीमुनिभगवत्पदसंगें. ७५
सादर सुरुचि निरखि दिसलें न तदानन सा महिने तें.
ध्रुव मनिं म्हणे, 'अशा पदवीस न दान, न सामहि,[1] नेतें.' ७६
विरहद होउनि योगद झाला त्या यादा[2] अर्णव तो.
भगवज्जनसंगज परमोत्सव सांग[3] कसा वर्णवतो ? ७७
पुरजन न वर्णवे, वर्णवतो त्याचा तात कसा हो ! ?
ध्रुव म्हणतां चंद्र–चकोर असें कीं घन–चातकसा हो. ७८
नेला नगरीं तो ध्रुव गाजत वाजत मिरवित तातें;
माथां तत्कीर्तिवितानातें[4] त्रिभुवन मिरवि ततातें.[4] ७९
वर्णिति अत्यद्भुत भाग्य सदा सुरपन्नग राज्याचें;
अमृताचें वर्ष तसें निववी यश तन्नगरा ज्याचें. ८०
योग्य दशा पुत्राची राज्या, त्यागा आपुलि पाहे;
मग भगवद्भक्तीं सत्पात्रीं राजा स्वश्री वाहे. ८१
कृतकृत्यचि नृप झाला रत भगवंतीं सुत पाहूनी
गेला तपोवना, कीं अधिक न अंतीं सुतपाहूनी. ८२
वाटेल कसें परमपदप्रद तप कविला सामान्य ?
हें टाकुनि होय जडचि नेणुनि सपक[5] विलासा मान्य. ८३

---

१. शत्रूवर विजय मिळविण्याच्या उपायचतुष्टयापैकीं (साम, दान, दंड, भेद यांपैकीं) एक सुद्धां. २. मत्स्याला. ३. स+अंग=पूर्णपणें. ४. त्याच्या कीर्तीच्या ततातें (विस्तृत अशा) वितानातें (छतातें). ५. बेचव, गोडीरहित.

पावधि ताताच्या प्रकृतींचें मानस जें विसराला,[1]
तें विसरवि; हंसकुळाकरवीं मानस[2] जेंवि सराला.[3] ८४
तो उत्तम[4] मृगयेतें गेला, तेथें वधिला यक्षें,
व्हायाचें तें होयचि; कोणें भावि चुकविलें दक्षें ? ८५
गेहीं सुतशोक परम दुःसह म्हणुनि सुरुचि ती गहनीं
शिरली सद्यः[5] स्वतनुवियोगें व्हाया सुख दवदहनीं. ८६
क्षोभे ध्रुव बहु ज्याच्या चक्रध्वनिनें अरि तापावे,
त्या चढुनि रथीं यक्षपुरा षडहितमदहरिता[6] पावे. ८७
आले त्रयोदशायुत धावुनि गुह्यक[7] राक्षस यक्ष;
तींतीं बाणांनीं एकैका विंधी ध्रुव रणदक्ष. ८८
एकें एकें सा सा ऐसे त्यांहीं शर बहु लक्ष
पाठविले तेव्हां ध्रुव झाला दवदहनचि ते कक्ष.[8] ८९
प्रकट करिति बहु दुःसह जाणुनि यातें ते परमाया;
नारायणास्त्र योजी जें ध्रुव भ्याल्या त्या परमा या. ९०
गुह्यकपुर मर्दुनि ध्रुवानें मर्दाया अलकेला[9]
त्या राक्षसगुह्यकयक्षांच्या पतिवरिही चल[10] केला. ९१
तेव्हां त्याचा त्यासि पितामह मनु भेटुनिया वारी,
सत्क्षोभा शमवि सदुक्त, दवा घनमुक्त जसें वारी.[11] ९२
‘ एकाच्या अपराधें केला बहुतांचा घात कसा ?
तूं प्रभुपदनखचंद्रामृतरस पीता[12] कीं चातकसा. ९३

---

१. विस्ताराला, भव्यतेला. २. मानससरोवर. ३. (इतर) सरोवराला. ४. ध्रुवाचा सावत्रभाऊ. ५. तात्बडतोब. ६. (कामक्रोधादि) सहा शत्रूंचा गर्व हरण करणारा (ध्रुव). ७. कुबेराच्या संपत्तीचें रक्षण करणारे सेवक. ८. वाळलेलें गवत. ९. कुबेरपुरीला. १०, चाल, हल्ला. ११. पाणी. १२. पिणारा.

न क्षोभाया करितों अंजलि ईश्वरबंधुप्रति मीं.
त्या मेघें वर्षावें या मम वंशीं अंधुप्रतिमीं.[1] ९४
हरिभिन्न असें ज्याला कोणी ज्ञाता न वदे, हर तो
न क्षोभो, तद्भक्तजनाच्या भजनीं तव देह रतो.' ९५
निजपौत्रातें स्वायंभुव मनु सांगुनि ऐसें गेला.
ध्रुवभूपें चापन्यास करुनि अंजळि हरासि केला. ९६
शिवसखहि तया दर्शन देउनि पाहुनि हर्षें डोले.
लोलेक्षण तद्रूपीं होउन बहु मधुर असें बोले :- ९७
'साधो ! प्रसन्न झालों, वदला जें स्वायंभुव मनु तें
जनुतें[2] सफळ कराया केलें मान्य तुवां सुजननुतें.[3] ९८
यक्ष निमित्तचि उत्तमनिधनीं, यक्षवधीं तूंहि तसा;
काळाचें तें करणें राज्या तोचि अहितसा हितसा. ९९
बा ध्रुवराज्या ! मजपासीं त्या अभिमत वर मागावा.
हरिभक्ता ! तव महिमा व्हाया शुचिता परमा गावा.' १००
ध्रुव हें मागे, "मज शंभुभजकमुकुटमणे ! वर दे हा
मन्मतिस म्हणो, 'स्वपदीं' जेंवि श्रीस म्हणे देव 'रहा.'" १०१
तो धनद 'तथास्तु' असें वदला मग अंतर्हित झाला.
यापरि संपादुनि जय सुयश ध्रुव निजनगरा आला. १०२
षट्त्रिंशद्वर्षसहस्र[4] स्वप्रकृतीं ससुख प्राज्य
देउनि मग उत्कलनामक निज तनुजातें दे राज्य. १०३

---

१. विहिरीप्रमाणें. २. जन्माला. ३. सुजनांनीं स्तविलेल्या अशा (तुवां, तूं). ४. छत्तीस हजार वर्षें.

श्रीबदरिकाश्रमीं ध्रुव जाउनि हरितें चिंतित राहे.
नंदसुनंदप्रभुचे पार्षद[1] आले त्यांतें पाहे. १०४
त्यांहीं दिव्यविमानीं वाहुनि विष्णुपदाप्रति नेला.
ऐसा राजा ध्रुव जगदीशें उत्तमपदभाक् केला. १०५
देवर्षि म्हणे, "झाला बाळहि धन्य सुनीतिसुत पहा.
प्रभु न म्हणों दे दीना शिकवुनि शीघ्र सुनीति सुतप 'हा![2]' " १०६
राम दयाघन भक्तमयूरप्रियहित सर्वहि करितो.
दर्शन देउनि जें बहु दुःसह तें तापत्रय हरितो. १०७

## (३) प्रह्लादविजय[3]

(आर्यागीतिवृत्त[4])

प्रह्लादविजयो नाम ग्रंथोऽयं स्वस्तरुः[5] सताम्
भवतु श्रीशकृपया मनःसंकल्पसिद्धये. १

### प्रथम विजय

श्रीमत्प्रह्लादाची लीला गावी खनी सदाह्लादाची.
हरिचरणीं अनिश[6] मन स्थापुनि करितें भवानळाचें शमन. १
कश्यपमुनिची दारा, दिति दक्षसुता प्रसिद्ध परमोदारा,
तत्सुत हिरण्यकशिपु, ब्रह्मवरें होय मत्त तो देवरिपु. २
पीडी तो मंद रसा[7], वैरिबळीं होय सागरीं मंदर-सा;
करुनि बळें समराशी, पाडी शवशत्रुच्या नगासम राशी. ३

---

१. दूत. २. 'हाय हाय!' ३. विष्णुपुराणांतील (अध्याय १६ ते २०) प्रह्लादकथेच्या आधारें हें काव्य **पंतांनीं** रचिलें आहे. (पृष्ठ १४२ श्लोक ५० व पृष्ठ १४३ 'उपसंहार' पहा). ४. 'कृष्णविजया'च्या पहिल्या ५४ अध्यायांना वापरलेल्या ह्याच वृत्तांत हे चारहि विजय **पंतांनीं** लिहिले आहेत. ५. स्वर्गांतील वृक्ष, कल्पवृक्ष. ६. सतत. ७. पृथ्वी.

नरवीर्यतिमिरतरणी[१] अमरांलाही करी पराभूत रणीं.
जिंकोनि शतक्रतुला, आणी त्याच्या यशोमृता तक्रतुला.[२] ४
असुरप राजयशातें हरि, माजे शत्रुच्या पराजयशातें.[३]
आठहि दिगधिप दमुनी, त्रस्त करी सर्व सत्समाधिपद, मुनी. ५
पीत सुरारस, कळहा करूनि, सेवी सुराधिकार सकळ हा.
फिरती सुर मानवसे, स्वांशें त्यांच्या पदीं[४] विजयमान[५] वसे. ६
सेवी क्रतुभाग[६] जसा सुर, माजे धरुनि कामलोभा गजसा.
करुनि उपाय-नयातें, अहि देती रत्नमय उपायन[७] यातें. ७
शक्र, वसु, रवि प्रबळें दमिले, हरिलींच अन्यसुरविप्रबळें;
केलें भुवन वश, रणत्रासें मग येति देवमानव शरण. ८
जें कांहीं रुचिर जनीं तें घे; तद्भक्ति शत्रुखररुचिरजनी;[८]
कीर्ति हरी विश्वाची, सेवी रंभा तिळोत्तमा विश्वाची.[९] ९
नरलोकामरसहित त्रिजगीं मानी कुबुद्धि कामरस हित.
सेवी बहु विषयांतें; वाटे अमृतासमान तें विष यातें. १०
सेवी स्फटिकगृहाला समधिष्ठुनि एकदा महासुर हाला;
कामविनोदभ्रमदा मदिरा तत्प्रकृतिहूनि ते दभ्रमदा.[१०] ११
रंभा सुभगा नाचे; रस घे गंधर्वराजशुभगानाचे;
करुनि सभाजन[११], सारा[१२] तत्कीर्तिचि गाय तो सभाजन सारा. १२
तेथें कंद नयाचा, आला प्रह्लादनाम नंदन याचा;
नृपवचनें ज्याशि कवी[१३], ज्ञान-करें नित्य बाळपाठ्यें शिकवी. १३

---

१. मनुष्यांचें सामर्थ्य हाच अंधार, त्याला दूर करणारा सूर्य. २. ताकाची बरोबरी. ३. पराभवामुळें प्राप्त झालेल्या आनंदानें ( शात=आनंद ). ४. सिंहासनावर. ५. विजयी ( हिरण्यकशिपु ). ६. यज्ञांतील हविर्भाग. ७. नजराणा. ८. शत्रुरूपी सूर्याला रात्रीसारखी. ९. अप्सरेचें नांव. १०. थोडा मद आणणारी. ११. पूजन. १२. उत्तम. [ स्त्रीलिंगी रूप ] ( कीर्तिच ). १३. शुक्राचार्य.

जो गर्भीं निजला भें धरूनि, तेथेंचि नारदें निजलाभें
बोधुनि केला जागा, धरिला ज्याच्या मनें मुकुंदीं जागा.[1] १४
तो कवि सुतपा दास प्रभुचा, धरि कश्यपर्षिसुतपादास.[2]
तों आलिंगनदानें तातें केला सुखी प्रमोदनदानें;[3] १५
त्याशि म्हणे राजवर, ‘ प्राज्ञा ! पढलासि गुरुगृहीं आजवर;
तेथें वत्सा ! गमला पदार्थ जो सारभूत, तो सांग मला .’ १६
पुसतां ऐसें दितिजें, वर्णी प्रल्हाद असुरजन निंदिति जें.
‘ ताता ! हरिला गावें; संतत तत्पादसेवना लागावें; १७
लागावें या वाटे; हेंचि सदा सारभूत हृदया वाटे.
ज्यास न आदि न निधन, स्मरतों गातों सदैव तें ज्ञानिधन.’ १८
ऐसें जेह्वां कथिलें; तों पोळे कर्ण जेंवि कढल्या कथिलें.
दितिजें ज्ञानानयनें[4] क्रोधें केलीं अनूरुवर्णें[5] नयनें. १९
पुत्राध्यापकवदना पाहोनि म्हणे, ‘ अरे ! सुदुर्मतिसदना !
बाळक रिपुच्या भजनीं लावुनि, संपादिला बरा लाभ जनीं. २०
वधिलें माझ्या भ्रात्रा[6], तद्भजनीं लाविलें सुताच्या भावा.[7]
याणें रिपुला गावें, भला भला, ज्ञान काय हें सांगावें ? ’ २१
ऐकुनि भ्याला गुरु तें, मग विनवी कोपसर्पकालागुरुतें.[8]
‘ देवा ! न करीं क्रोध, स्वामी ! हा मीं नसेंचि केला बोध.’ २२

---

१. आश्रय. २. कश्यप ऋषीच्या मुलाच्या ( हिरण्यकशिपूच्या ) पायास. ३. आनंदाच्या मोठ्या प्रवाहानें. ४. ज्ञानचक्षूरहित. ५. ( अन्+ऊरु ) ज्याला मांड्या नाहींत, असा जो अरुण त्याच्या रंगासारखीं, लाल. ६. भावाला ( हिरण्याक्षाला ). ७. भक्तीला; श्रद्धेला; भावनेला. ८. कोपसर्प+(काला+अगुरु=) कालागुरु=कोपरूपी सर्पाला चंदनाप्रमाणें जो आवडणारा, त्याला ( हिरण्यकशिपूला ).

भूप म्हणे, "'रे बाला!' वद,[1] 'कोणीं शिकविलें असें हें?' बाला.[1]
गुरु म्हणतो 'मीं नाहीं कथिलें' तूं सांग सत्य निज वचनाहीं." २३
प्रह्लाद म्हणे, 'हृदयस्थित परमात्माचि मुख्य शास्ता सदय.
त्याविण कोणा कवणें, मज इतरांलाहि आत्मतत्व शिकवणें? २४
हृदयीं विष्णु जनाच्या; तो मार्गीं लावितो स्वपदभजनाच्या.
त्याचा प्रसाद मजला जाला; म्हणवूनि हा स्वलाभ समजला.' २५
दितिज म्हणे, 'रे कुमती! भ्रांति तुज्या मानसांत दुष्टा! रमती.
जगदीश प्रभविष्णु[2] प्रभु मीं, कैंचा मदन्य मूढा! विष्णु?' २६
प्रह्लाद म्हणे, 'तातें ऐकावें, करुनि सुस्थिर स्वांतातें.
जो कारण विश्वास, स्वयेंहि जो विश्व, जेथ मुनिविश्वास. २७
शब्दागोचर ज्याचें पद, न तमस्थान, जें न सत्वरजाचें.
तो परमेश्वर विष्णु त्रिजगन्नाथ स्वभक्तबाधाजिष्णु.[3]' २८
नृपति म्हणे, 'मीं असतां, परमेश्वर अन्य कोण तूजा, असता![4]
या चारें[5] मरशील, त्यागावें हें समस्त पामरशील.' २९
प्रह्लाद म्हणे, 'जनका! होतोसि व्यर्थ कोपमळभाजन कां?
माजाचि नव्हे धाता, तुजाहि; परमेश्वर त्रिलोकविधाता.' ३०
आयकतां असि वाणी, हृदया लागे खळाचिया असिवाणी.[6]
चावे दांत करकर, क्रोधें चोळी रिपुप्रणाशकर कर. ३१
'कोण कुबुद्धिप्रकर प्रवेशला याचिया मनीं घातकर?
लोटुनि सन्मति परती, कोणीं केला किशोर हा पापरती? ३२

---

१. 'बा' ला=(मला) बापाला वद=सांग. २. धनी, स्वामी. ३. जिष्णु = जिंकणारा; नाश करणारा. ४. हे दुष्टा! ५. चाळ्यानें. ६. तरवारीसारखी.

करितो वेडे चार, भ्रमला हा जाहला खरा संचार.[1]
वदतो अनुचित सारें, निघती वाक्यें मुखांतुनी निःसारें.' ३३
हें वदतां जनकानें, ऐके तो विष्णुभक्तिभाजन कानें.
नमुनि म्हणे, 'परिसा हो ! मन तुमचें कटुक मानितें परि साहो. ३४
माझेंचि हृदयकमळ प्रवेशला तो नसेचि गतशोकमळ[2]
मज तुज जनास विष्णु व्यापुनियां चेष्टवीतसे भ्राजिष्णु.'[3] ३५
आधीं भ्रम मधुपानें[4], त्यांतहि हरिपादनीररुहमधुपानें[5]
सत्वान्यगुणप्रकृती[6] कोपविला, ज्यास भीति सुर विप्र कृती. ३६
कोपानळांत काढा[7] होऊनि म्हणे, 'खळासि येथुनि काढा.
केली क्षमा उदंडा, गुरुकरवीं याशि बुद्धि शिकवा, दंडा.' ३७
त्या दैत्याहीं ज्ञानी नेला गुरुच्या गृहीं अतत्वज्ञानीं.
तो अध्यापकशाला सेवी, साधू धरील ताप कशाला ? ३८
तेथ पढे अनवरत[8] स्वोपाध्यायोक्त शास्त्र तें अनवरत.[9]
अन्य जना परि चर्या[10] दावी, गुरुची करी सदा परिचर्या.[11] ३९
त्यावर बहु काळानें नंदन बोलाविला असुरपाळानें.
प्रह्लादहि तातपदें वंदी भावेंकरूनि अहितातपदें.[12] ४०
आत्मकुमारा जवळी स्थापूनि, असें म्हणे असुरराज बळी :-
'गा वत्सा ! गाथा[13] रे ! जेथें माझें स्वचित्त सुभगा ! थारे.' ४१

---

१. भूतबाधा. २. गेला आहे शोकरूपी मळ ज्याचा असा. ३. तेजस्वी. ४. मद्यप्राशनानें. ५. हरिचरणकमलीं असणाऱ्या भ्रमरानें ( प्रह्लादानें ). ६. ( सत्त्वगुण सोडून दुसरे ) रजोगुण व तमोगुण असलेल्या प्रकृतिगुणांचा असा ( हिरण्यकशिपु ). ७. कढविलेल्या वनस्पतींचा अर्क. ८. निरंतर. ९. अ + नव + रत = पुराणपुरुषाचे ठायीं रमलेला ( प्रह्लाद ). १०. वागणूक. ११. सेवा. १२. अहित + आतप + दें = शत्रूंस ताप देणारीं. १३. कविता.

ऐशी आज्ञा तातें करितां जोडूनि हस्तजलजातातें.[१]
प्रेमेंकरूनि वाचे[२] प्रह्लाद म्हणे स्मरोनि पद देवाचे. ४२
'जेथुनि पुरुष[३] प्रकृती[४], स्थिर, चर, जो सर्वदा दयार्द्रप्रकृती,
जो वरद, रमावर हो! तो विष्णु सदा प्रसन्न आम्हांवर हो.' ४३
या गाथेच्या श्रवणें, पावे तो दुःख तें वदावें कवणें ?
पेटे अमर्षदावें[५], वांछी सत्पुत्रनाश, काय वदावें ? ४४
दैत्यांसि म्हणे, 'मारा; विलंब न करूनियां कुबुद्धि कुमारा.
खरशस्त्रसमूहानीं छेदा; हा वांछितो कुळाची हानी. ४५
आहार नवा चावा, स्वकुळांगार क्षणार्धहि न वांचावा.
मत्कुलमालिन्या या आज्ञा माजी तुमांसि जाली न्याया.' ४६
तेह्वां दानव हे ती आज्ञा घेवूनि काढिती नव हेती.[६]
पाहुनि खर तरवारी, ये सज्जनलोचनासि बहुतर वारी. ४७
स्वस्थ प्रह्लाद मनीं, यद्यपि ते सर्व सिद्ध जाले दमनीं.
देहीं आत्माजगर[७] व्यर्थचि शस्त्रास्त्रकाळ–अहिराजगर.[८] ४८
घेउनि शस्त्रप्रकरा, उंचलिती जेधवां रिपु क्षिप्र करा.
प्रह्लाद म्हणे, 'शमना[९] करा, सुखें हर्षवा धराधीशमना. ४९
शस्त्रसमूहामाजी, तुंम्हांत[१०], मदंतरीं हरी हे माजी[११]
वाणी असेल साची, तरि देह छेदितां तगेल असाची.[१२]' ५०
हें ऐकुनि एकामें[१३] करिती शूर प्रहार मारणकामें;
नीरद बहुतर वारी वर्षे तैशाच भासती तरवारी. ५१

---

१. हस्तकमलातें. २. वाचेनें; वाणीनें. ३. आत्मा. ४. सृष्टि. ५. क्रोधाग्नीनें. ६. तरवारी. ७. आत्मरूपी अजगर. ८. अहिराज + गर = सर्पराजाचें विष. ९. मर्दनातें. १०. या शब्दांतील "तुं" वर अनुस्वार दिल्यामुळें त्याला "दीर्घत्व" प्राप्त झालें आहे. ११. माझी. १२. असाच; आहे तसाच. १३. एकदम.

तरवारी खरधारा वर्षति बहु जेंवि वारिदाच्या धारा.
होती शब्द खणखण, व्योमीं उडती तुटोनि खंड सणसण. ५२
अच्युतदेहत्राणा[1] धरितां, शस्त्रें विनाश कैंचा प्राणा ?
जाला न लोम भंग, त्राता ऐसाचि साधुचा श्रीरंग. ५३
विष्णुस्मरणौषधिला धरितां वज्रें न काळदंडें वधिला,
प्राकृत शस्त्रें काय ? प्रल्हादाचा सुरम्य जाला काय. ५४
राय म्हणे, ‘ रे ! परत द्वेषिस्तुतिपासुनी[2] न हो पापरत.
देतों मीं अभय तुला, मूढमतीची किमर्थ धरितोसि तुला ?’ ५५
ऐशी असुरपतीची वाणी ऐके कुबुद्धिच्या सुपतीची.
सन्मतिनिधिवैश्रवण[3] प्रल्हाद म्हणे, ‘ पित्या ! करावें श्रवण. ५६
भयहर अनंत राया ! हृदयीं असतां भवांबुराशि तराया,
मज कैंची भीति जनीं ? मत्त्राणीं जागरूक तो दिनरजनी. ५७
भवभय हरिपदनखरें त्रात, जनीं होय लेश तापद न, खरें.
अभयद केशव कमलावर विष्णु जगन्निवास तो एक मला. ५८
भेद जिहीं न दवडिला, त्यांला तृण तेंहि होय भयनद वडिला !
भवतिमिरमहारविला[4] न भजोनि, तिहीं स्वलाभमणि हारविला.’ ५९
हा बुधमुक्ताहार, ज्ञानिजनाचा यथेष्ट अमृताहार,
जाला पविप्रहार, त्रिदशरिपूला स्वनंदनव्याहार.[5] ६०
बोलावी नृप सर्प, श्राद्धपतीचेचि[6] काय ते अपसर्प;[7]
त्यांसि म्हणे धृतदर्प, ‘ स्वसुत वधावा, शिवें जसा कंदर्प. ६१
चावा पापड-सा रे ! नाहीं तुंम्हांसि[8] लेश पाप, डसा रे !’
ऐसे ते अहि तातें नियोजिले नंदनाचिया अहितातें. ६२

---

१. विष्णुरूपी चिलखताला. २. शत्रूच्या स्तवापासून. ३. वैश्रवण=कुबेर. ४. संसाररूपी अंधकाराच्या मोठ्या सूर्याला. ५. आपल्या पुत्राचें भाषण. ६. यमाचे. ७. गुप्तदूत, हेर. ८. ( पृ. १२१ वरील टीपक्रमांक १० पहा. )

मग त्या मरुदशनाहीं[१] त्याचा सुकुमार देह गुरुदशनाहीं[२]
साराही कवळीला, तों भंग घडे रदांचिया कवळीला. ६३
श्रीहरिचरणाचि रती, ते तनु न तुटे, भुजंगमफणा चिरती.
मणि फुटती जशि लाही, भस्म करी तें क्षणांत तेज शिलाही. ६४
ऐशा संतापाशी पावुनि, जाऊनि त्या असंतापाशीं,
ते अहि वंदिति, जाला वृत्तांत निवेदुनि स्वयें दितिजाला. ६५
तो खळ पापाचारी दिग्गजही, टाकुनि त्रपा, पाचारी.
'मारा दंताघातें' म्हणे 'न पावाल हो ! तदंता घातें.' ६६
दिग्गज विगतनयाला दितिजाला नमुनि, त्याचिया तनयाला
पाडिति दंताघातें क्षितिवरि हरिचिंतनप्रशांताघातें.[३] ६७
करिति करी शतकोटिप्रखररदाहीं[४] प्रहार ते शतकोटि.
त्यांचे न कसे तुकडे होती ? याचें स्वचित्त भवसेतुकडे. ६८
त्या दानवदेवाचे निज पद वंदूनि नंदन वदे वाचे,
'मीं दिग्गजरदनाहीं न निमालों, काय विष्णु पारद नाहीं ?' ६९
दैत्य म्हणे, 'पापरता ! हो रे दुष्टा ! कुबुद्धिकूपा ! परता.
मरण जसें लाभसि, तें करुनि, समर्चीन शंकराला भसितें.' ७०
दानवदेव कयास[५] स्वयें करुनि, बाहुनि स्वसेवक यास
मारायाचा शिकवी उपाय, परि वारिना तधीं त्याशि कवी. ७१
'सेवक हो ! तनयाला होमा ज्वलनांत अन्य अंत न याला.
दहनचि जेविल यातें, पावो कुमती पतंग जेंवि लयातें. ७२

---

१. मरुत् + अशनाहीं = वायुभक्षकांनीं (सापांनीं). २. मोठ्या दांतांनीं. ३. देवाच्या स्मरणानें ज्याचें पाप नाहींसें झालें आहे, अशाला. ४. वज्रासारख्या तीक्ष्ण दांतांनीं. ५. बेत.

हा बहुधा मायावी, हे पीडा माजिया न धामा यावी.
या खळडिंभा[1] जा रे! घालुनियां शीघ्र लांकडीं भाजा रे!' ७३
आज्ञा हे निकरानें होतां, ते भृत्य मग धरूनि करानें
अमितेंधनभारचितेमध्यें[2] झाले स्वनाथडिंभा रचिते. ७४
ते निर्दयमानस 'खा यातें' ऐसें वदोनि, पवमानसखा[3]
लाविति, परि तो याशी धाकें न शिवे, तदा जसा तोयाशी. ७५
क्रोध तथापि तयाला न येचि, मग तो कथी कथा पितयाला,
'विष्णुभजन तापाला हरितें ऐसेंचि, दैत्यजनतापाला![4] ७६
पद्मनिकरकरकाहीं[5] समास्तृता[6] भू, शिखी न खरकर कांहीं.
भासे मजला भजनीं हरिच्या सुख फार, हाचि निज लाभ जनीं.' ७७
कविकायज[7] मानातें वाढउनी, म्हणति ते स्वयजमानातें,
'उचित तुज न कोपाया, पुनरपि करितों सुबुद्धिजनकोपाया. ७८
करुणाकंचुक तात त्यजिति न, जरि लेंकुरें सदा चुकतात.
अनुकंपापात्रास स्वसुतास असा दिजे न भूपा! त्रास. ७९
न सुटे हरिपक्ष महाबोधें तरि मर्दनाशि पाप क्षम हा.
कृत्या[8] मग माराया निर्मू, हे युक्ति फार सुगमा राया!' ८०
ऐकुनि यापरि सारें वचन, त्यजि हें कुकर्म तदुपरि सारें.
होय पुरोहितसामीं[9] शांत, म्हणे, 'बोध मानिला हितसा मीं'. ८१
देउनि कायज[10], मानें पाठविलें विप्रनायकां यजमानें.
मग शुभमतीशि कवि ती, हरिभक्ति सुटावया कुबुद्धि शिकविती. ८२

---

१. दुष्ट पोराला. २. पुष्कळ सर्पणाच्या ढिगाच्या चितेमध्यें. ३. वायुमित्र अग्नि. ४. हे! दैत्यसमूहाच्या पालका! ५. पद्मांचा समूह व गारा यांनीं. ६. आंथरलेली. ७. शुक्राचे पुत्र. ८. राक्षसी. ९. पुरोहितांनीं केलेल्या समजुतीमुळें. १०. पुत्र.

त्या सज्जनाशि कवणें हरिभक्तीहूनि अन्य बुद्धि शिकवणें ?
तिळहि नसे परवाची, सांगे आचार्य म्हणुनियां पर[1] वाची. ८३
अध्ययनविराम यदा होय, तदा बाळकांसहि निरामयदा[2]
चित्सुखहेतुक[3] विद्या कथी; म्हणे तो, 'स्वकीय चित्त कवि द्या.[4] ८४
जो सद्रिपुभस्म रणीं करि, हरि त्याच्या धरूनि लोभ स्मरणीं,
संसृतिपारावारा[5] तरा, असद्वासना[6] अपारा वारा. ८५
ब्रह्मचि या विश्वास, स्वमनीं जाणा धरूनियां विश्वास.
हरिचेचि सदा चरण ध्यावे, टाकूनि सर्व असदाचरण. ८६
चिंता तें सत्वर, जें तत्व नसे स्पर्शिलें तमःसत्वरजें;
जेथें शुक्तिरजत-सा[7] प्रपंच मिथ्या, तडाग रविकरज[8] तसा. ८७
तुम्हींच[9] सदा सहजें ब्रह्म असा नामरूपभेदासह जें,
हें कळतां उपरमती संसृति, विषयीं दिजे न याउपर मती. ८८
नरपशु हे कामरती धरूनि, पावोनि जन्मशोका, मरती.
द्रव्यास कळत्रास ध्याती, मग पावताति सकळ त्रास. ८९
मन तत्त्वीं द्याच, वदा हरिगुण, शिकणें किमर्थ विद्या चवदा ?
कवि चतुराननसम जे, मूढचि तेही, जरि स्वतत्त्व न समजे. ९०
जरि हित ऐकाल, टिका, तरि हरिभजनीं धरा विवेका; लटिका
कालव्यय कां करितां ? स्वहित त्यजितां किमर्थ लोकांकरितां ?' ९१

---

१. परंतु. २. ( रोगरहित असा ) परमेश्वर दाखविणारी. ३. ज्ञानसुख देणारी. ४. येथें 'द्या' या प्राकृत क्रियापदाच्या मागील 'वि' या अक्षरावर जोर द्यावा लागतो. असे प्रयोग **पंतां**च्या कवितेंत क्वचित् आढळतात. ५. संसारसमुद्राला. ६. दुष्टबुद्धि. ७. शिंप रुप्याप्रमाणें भासते, त्यासारखा. ८. सूर्याच्या किरणांपासून उत्पन्न झालेला; मृगजलाचा तडाग ( तलाव ). ९. ( पृष्ठ १२१ वरील टीपक्रमांक १० पहा ).

यापरि जगदीशाला चिंताया लाविलीचि अगदीं शाला.
ज्ञानाचा राशि कवि प्रह्लाद मुलांसि सद्विचारा शिकवी. ९२

( तोटकवृत्त )

तम नासुनि दैत्यपतोकरवी,[1] परमार्थसमागम तो करवी.
असुरात्मज सर्व उदारमती हरिच्या भजनींच सदा रमती. ९३

---

## द्वितीय विजय

( आर्यागीतिवृत्त )

गुरुच्या सदनीं चेष्टा प्रह्लाद अशी करी, न जी नीचेष्टा,[2]
ऐकुनि बहुधा कानें दानव दितिजास सांगती धाकानें. १
लागे वार्ता सकळा दैत्यपतीला, जशी गदार्तास कळा.
फोडचि कानीं जाला वृत्तांत न सोसवे क्षणीं राजाला. २
करिन परासू[3] दास स्वरिपूचा म्हणुनि, तो त्वरा सूदास[4]
आणुनि एकांताला, शिकवी यत्न स्वयेंचि तोकांताला.[5] ३
'सांगति वरविप्र कृती, तरि दुष्टाची न होय बरवि प्रकृती.
करितोचि सदा चार, स्वयेंचि कथितो परांशि असदाचार. ४
म्हणउनि भिन्ना माजी आज्ञा न करूनियां, सदन्नामाजी
देउनि विष, मारा जा,' सांगे ऐशीच युक्ति विषमा राजा. ५
सूदानें विष यातें समर्पिलें विष्णुभजनजितविषयातें.
जो हृदयामाजि रवी विपत्तमाचा[6], अनंत तो तें जिरवी. ६

---

१. दैत्यांच्या राजाचा बालक हाच सूर्य. २. नीचास आवडणारी.
३. मृत. ४. स्वयंपाक्याला. ५. बालकाच्या मरणाला (कारण होणारा).
६. संकटरूपी अंधकाराचा.

सूद तदा लवलाहें कथिती 'कुलदीप हा न मालवला' हें.
दैत्य मनीं भ्रमला हे वार्ता ऐकूनि, फार संभ्रम लाहे. ७

राजा पुरोहितातें सांगे, साधावया स्वकीय हितातें,
'या दोषाकरकृत्या[१] मारा निर्मूनियां भयंकर कृत्या.' ८

स्वपुरोहित सामानें, करिती मग त्यास बोध हितसा मानें.
'वत्सा! सुख दे वडिला, धरुनी त्याच्या मतीं पदीं आवडिला. ९

कश्यपमुनिसंतानप्रभव[२]! तुजा तात आप्तजनसंतान;[३]
होतां पितृसमशील, त्रिविष्टपीं[४] तूंहि यापरी रमशील. १०

परमगुरु तुजा तात, प्राज्ञ भले याचि सत्पथें जातात.
लाभ अनंतें काय? व्यर्थ न दीजे हठें यमातें काय.' ११

दितिजाच्या तोकानें आयिकतां बोध यापरी तो कानें,
करुनि स्मित, नमनानें गुरु तोषविले तदा प्रसन्नमनानें. १२

विनयेंच वदे त्यांतें, आणुनि कुरसीं रसत्व चवदे त्यांतें.
"बरवा उपदेश मला करितां, भ्रम याचि धर्मवादें शमला. १३

सत्य, प्रिय, हित, सारें ऐकुनि, तुमच्या पदांबुजीं अलिसारें[५]
मस्तक माजें लवलें; 'परि हरिनें काय?' हें कसें बोलवलें? १४

साधु पुरोहित! माजें, तुमजा सर्वज्ञ म्हणउनी हित माजें;[६]
सद्वृंद जया लवलें, 'काय अनंतें?' असें कसें बोलवलें? १५

---

१. दोषांची खाणच अशीं आहेत कृत्यें ज्याचीं अशाला. २. कश्यपमुनीचा पुत्र हिरण्यकशिपु, त्याच्यापासून जन्मलेल्या हे प्रह्लादा! ३. आप्तजनांचा कल्पवृक्ष. ४. त्रैलोक्यांत. ५. भुंग्यासारखें. ६. अन्वयः—(अहो) साधु पुरोहित! (तुम्ही) माजें (मदानें) सर्वज्ञ म्हणउनी माजें हित नुमजा (ओळखत नाहीं).

तुंम्ही[1] गुरु नमनाशी योग्य, वदा, जेंचि आवडेल मनाशी.
सर्वांहीं असुरजनीं बुद्धिविवेकक्षपाकरामारजनी.[2]" १६
दितिजशिशूची वाणी लागे त्यांच्या श्रुतीशि सूचीवाणी.[3]
धरुनी कोपा जळती गुरु ते, जैसे घृतें शिखी पाजळती. १७
गुरु म्हणती, 'तव रक्षा[4] अनळें होतां, वृथाचि केली रक्षा.[5]
हें ज्ञान नसे कळलें, यास्तव तेंव्हां कृपेशि मन आकळलें. १८
मान्य बरा होशील स्वपित्याला, हें तुजें न राहो शील.
करउनि अभ्यास कळा विद्या कथिल्या तुला असभ्या! सकळा. १९
तरि पापा! मरशील, त्यजिनाशि जरी असें स्वपामरशील.
माराया तुज कृत्या करितों उत्पन्न आज भीकरकृत्या.[6]' २०
प्रह्लाद वदे वाचे स्मरोनि पद दुःखदावदव[7] देवाचे,
'आत्मा त्राता, हंता[8] सदसद्वृत्तें,[9] तुम्ही त्यजाचि अहंता.' २१
या वचनें ते कृत्या निर्मिति साधूनियां यथाविधि कृत्या.
शूलधरा कामगती,[10] जाय वधायासि दितिजतोका मग ती. २२
दितिजशिशूला घात क्षिप्र घडाया करी स्वशूलाघात.
हरिचिंतनचंचूरा[11] स्पर्श करीतांचि जाहलें तें चूरा. २३
जो भक्तभवास हरी, तो हृदयीं ज्या वसे करुनि वास हरी;
तेथें पावेल पवी[12] भंग, असो शूल काळदंडा लपवी. २४

---

१. (पृष्ठ १२१ वरील टीपक्रमांक १० पहा.) २. बुद्धि व विवेकरूपी चंद्राला अमा (अमावास्येची) रात्र. ३. सुईसारखी. ४. राख. ५. रक्षण. ६. भयंकर आहे जिचें कृत्य अशी. ७. दुःखरूपी अरण्याला अग्नीप्रमाणें असणारे (देवाचे पद). ८. मारक. ९. बरीं वाईट कृत्यें. १०. इच्छेप्रमाणें पाहिजे तिकडे जाणारी. ११. हरिचिंतनांत तत्पर असलेल्या (प्रह्लादाला). १२. वज्र.

कृत्या मग माघारी मुरडे, कोपें जशीच खगमा[1] घारी.
होती विप्रसभा जी, तीतें ते करुनि कुपित मानस भाजी. २५
धरुनी भूतळ मळती, होतां दाहव्यथा बहू तळमळती.
निष्पापा पाप डसे कसें? स्वयें हेचि भाजले पापडसे. २६
तेव्हां या संतापें[2] आली करुणा द्विजांचिया संतापें.
पावे बहु तनु कंपा, सर्वां भूतीं भल्यांशि ये अनुकंपा. २७
त्यांला कर लावि, नतिप्रयुक्त भावें करी प्रभूला विनती.
हरिनें ते वांचविले, नाहींतरि लागतेचि तेवांच विले.[3] २८
ते सावध कवि जाले, हरिदासस्पर्शनेंचि ताप विजाले.
देती प्रह्लादातें आशीर्वादाशि, धरुनि आह्लादातें. २९
'दीर्घायु कुमारा! हो; अप्रतिहतवीर्यकीर्तिमहिमा राहो.
वृद्धि असो संततिला, भुवनीं वर्णूत सर्वदा संत तिला. ३०
जन तूज्या यश-शीला गावू. हांसो त्वदीय कीर्ति शशीला;
हे सुरगायक लीला धरूत कंठीं, करू विनाश कलीला.' ३१

(तोटक वृत्त)

उपकारविचिंतक विप्र वर बहु देउनि यास, कविप्रवर
कथिती दितिच्या तनया सकळ, न पडे मग त्या अनयास कळ. ३२

---

## तृतीय विजय

(आर्यागीतिवृत्त)

पूर्वकृतापाय,[4] तथा ते कृत्या दुःसहाहि जाली वितथा.[5]
नाहीं नंदनशमनीं उपाय म्हणुनी, सचिंत दैत्येश मनीं. १

---

१. आकाशांत फिरणारी. २. साधूपाशीं (प्रह्लादाजवळ). ३. तेवांच विले (विल्हे) लागतेचि=तेव्हांच नाश पावते. ४. पूर्वी केलेली पीडा. ५. व्यर्थ.

तो देवरिपु त्रास स्वमनीं धरुनी, असें पुसे पुत्रास :-
'मंत्रजनितसा[1] गमला प्रभाव, कीं सहज हा? सुता! सांग मला. २
मंत्रौषधीप्रभावें मृत्यु नसे, आपुल्याच कीं अनुभावें ?[2]
हें पुत्रा! वद साचें, जें कांहीं बीज जीवनाध्वंसाचें.[3]; ३
परिसुनियां त्या लपिता,[4] प्रह्लादें वंदिला त्रिदशकाल पिता.
मग कथिलें तें सारें, ध्यावें जो पीडिला असे संसारें. ४
'मंत्रादिजनित राया! प्रभाव न समर्थ मृत्युसिंधु तराया.
मरण महा दुःसह जें, तें कैसें लंघिजेल वीर्यें सहजें ? ५
जे लोक अनंतरती, तेचि मरणजन्मसिंधुमध्यें तरती.
ज्यांच्या लोकेश मनीं, शमनीं[5] कैंचा प्रभाव त्यांच्या शमनीं ?[6] ६
जे इंद्रियसंघाता जिंकुनि, न मनेंहि चिंतिती परघाता.
त्यांचा आयुष्य हरी, मग त्यांचे प्राण भूपते! कोण हरी ? ७
मीं तनुवचनमनाहीं परदुःखातें कदापि वांछित नाहीं.
अन्यजनीं मजमाजी एक हरी, हेचि बुद्धि शाश्वत माजी. ८
एकचि आत्मा सारा, त्यजिली म्यां भेदकल्पनाचि असारा.
हें अमृत ज्ञानिधन प्राप्त मला, कां घडेल सुज्ञा निधन ? ९
भेदचि माझा शमला, यास्तव नाहींच सर्वथा नाश मला.
म्हणउनि हरी भजावा, स्वपर असा भाव तो समूळचि जावा.' १०
प्रासादाच्या शिखरीं वाक्यें कथिलीं अशीं स्वताताशि खरीं.
तेव्हां दांत करारां चावी, फिरवी सुरारि नेत्र गरारां, ११

---

१. मंत्रापासून उत्पन्न झालेल्यासारखा. २. प्रभावानें. ३. जीवाचा नाश न होण्याचें. ४. भाषणाला. ५. यमाचे ठिकाणीं. ६. नाश करण्यामध्यें.

चोळुनि करें कराशीं, क्रोधाकुळ दानवेंद्र पातकराशी
देवारि पुरोगांतें[1] म्हणे, 'वधा सूनुतें स्वरिपुरोगातें. १२
देह न लेश तगावें याचें, प्रासाद आमचा शत गांवें.[2]
यापासुनि ढकला हो ! याच्या प्राणासि आज अंतक लाहो.' १३
नरनाथाज्ञा साची मानुनि तो लोटिला तिहीं तैसाचि,
परि वरचेवर धात्री[3] झेलुनि रक्षी, सुतासि जैशी धात्री.[4] १४
तेथहि मृत्यु पळाला, द्रव परि आला नसेचि त्या उपळाला;[5]
टाकुनि सर्वहि माया, नियोजवी शंबरासुराला माया. १५
'हे शंबरासुरा ! मीं केले बहु यत्न या कुपुत्रविरामीं.
परि न मरे हा पापी, याचें असुदुग्ध तूं तरी बापा ! पी.' १६
शंबर बोले, 'माजें वीर्य पहा, न गणि सूर्यवह्नियमा जें.
असती बहुविध माया, तूं स्वस्थ असें, विनाशितों अधमा या.' १७
बोलुनि हें मायावी तो कपटें[6] विष्णुसेवक शमाया वी.[6]
चिंती प्रह्लाद मनीं जो पटु मधुकैटभासुराच्या दमनीं. १८
भक्तोपद्रवशमनें पाठविलें चक्र दीनभद्रवशमनें,
मायासहस्रतम तें तेणें हरिलें क्षणें जगत्कांतमतें.[7] १९
जरि तडिदंबर[8] माया[9] करील, तरि काय काळ शंबरमाया ?
सर्वत्र सुजन सम जे, त्यांशि नसे नाश, हें कुबुद्धि न समजे. २०
करितो हा[10] प्रतिघात प्रकटोपायें, नयेचि याप्रति घात.
यास्तव गुप्तचि रिपुला माराया अन्य युक्ति योजी विपुला. २१

---

१. जवळ उभ्या राहणाऱ्या सेवकांतें. २. योजनें. (आठ ते नऊ मैलांच्या अंतरास एक योजन म्हणतात). ३. पृथ्वी. ४. दाई. ५. दगडाला. ६. कपटें वी = कपटें उत्पन्न करी. ७. विष्णूच्या आज्ञेनें. ८. विजेसारखें तेजस्वी वस्त्र असलेला. ९. दया. १०. प्रह्लाद.

संशोषकवायूतें सांगे शोषावया तनुभवायूतें;[१]
तो मग शीतज्वरसा शिरे तदंगीं करावया शुष्क रसा. २२
पवनाचा आढळला विकार, परि धैर्यपर्वत न हा ढळला;
धरणीधर[२] आठविला, तो त्याणें वायु सेउनी आटविला. २३
जीवनघस्मरविपदा[३] हरूनि, भक्ताशि आपुल्या स्मरवि पदा.
कारुण्यनदीनाचें[४] प्रभुचें व्रत हेंचि, जें अवन दीनाचें. २४
प्रल्हाद स्वस्थ मनीं, गेला गुरुच्या समीप विपदस्तमनीं.[५]
तो अनुदिन याशि कवी शुक्रकृता ' राजनीति ' सारी शिकवी. २५
स्वगुणें श्री बांधावी, जीणें संपूर्ण राज्यतृष्णा धावी.[६]
कीर्ति बरी साधावी, ऐशी नृपनीति शीकला मेधावी.[७] २६
गुरु विज्ञातनयाला[८] प्रल्हादाला सुरारिच्या तनयाला
नेउनियां ज्यापतितें[९] भेटवि, सुत शत्रु मानिला ज्या पतितें.[१०] २७
' जीणें श्री साधावी, ते शिकला राजनीति हा मेधावी,
जाला शास्त्री वेदी,' ऐसें आचार्य भूपतीशि निवेदी. २८
भूप म्हणे, ' प्रल्हादा ! विचारितों तें वदोनि दे आल्हादा.
हें सुनया ! सांगावें मित्रारिगणीं कसें नृपें वागावें ? २९
वद, मध्यस्थांमाजी वर्ताया नीतियुक्तिही परमा जी.
वृद्धिक्षयसाम्य असे काळ, तधीं भूपतीस नय कोण असे ? ३०
मंत्री अमात्य तनया ! वद कैसे सर्व वर्तवावे ? सुनया !
नीतिज्ञा ! बोलावें त्वां बाह्याभ्यंतरीं कसें चालावें ? ३१

१. तनुभव + आयूतें = पुत्राच्या आयुष्याला. २. शेष. ३. जीवित अधाशासारखें खाणारी विपत्ति. ४. दयासमुद्राचें. ५. संकट दूर झाल्यावर. ६. तृप्त करावी. ७. शहाणा, बुद्धिमान्. ८. नीति माहित असलेल्याला. ९. पृथ्वीपतीला ( ज्या = पृथ्वी ). १०. पापी हिरण्यकशिपूनें.

जो तस्कर पुरलोकीं, वर्तायाचा प्रकारही वद तो कीं.
शंकित दुष्टांत कसें वागावें ? सांग, पंडिताह्लादकसें. ३२
कृत्याकृत्यविधानें वद, गिरिजळविपिनवासिजनसंधानें.
कंटकशोधन[1] कानें ऐकावें, तेंहि सांगणें तोकानें. ३३
सामाद्युपाय सारे वद, आहे अन्य नीतिमार्ग कसा ? रे !'
प्रश्न असा जनकाचा ऐकुनि मानी मनांत सज्जन काचा. ३४
प्रह्लाद म्हणे, 'नीती सारी कथिली असे मला गुरुनीं ती.
न पडावें या वाटे, बापा ! ऐसें मनास माझ्या वाटे. ३५
मित्रामित्र[2] असावे तेह्वां नीतिप्रकार सर्व पुसावे.
एकचि आत्मा साचा, व्यर्थ श्रम कासया नयाभ्यासाचा ? ३६
तुज, मज, भूतामाजी एक हरी सत्य गोष्टि ताता ! माजी.
अरिमित्रकथा राया ! कैंची ? स्थळ तीस कोणतें थाराया ? ३७
रागद्वेष उमटती, जेथें हरिभक्तिमार्ग सारे सुटती.
हें टाकुनि, जनका ! मीं म्हणतों कीं यत्न साधिजे निष्कामीं. ३८
जेचि अविद्या सारी, भासे मूर्खांसि तेचि विद्येसारी.[3]
बाळक खद्योतातें[4] 'अग्नि' म्हणे, जाणिजे तसें हें तातें. ३९
तें कर्म जें न बाधे, ते विद्या जीमुळें विमुक्ती साधे.
कर्म दुजें दुःखार्थ, स्वामी ! विद्या दुजी तशीच अपार्थ.[5] ४०
विषयरसप्रवणाला राज्यधनाची स्पृहा नसे कवणाला ?
परि जें असतें भावी[6] तेंचि घडे, मूढ हें न चित्तीं भावी.[7] ४१
साधाया राज्यधनें, करितां उद्योग, पावले किति निधनें.
जें प्राप्त नसे कांहीं, तें यत्नें साधिजे कसें लोकांहीं ? ४२

---

१. शत्रु नाहींतसे करून टाकणें. २. अमित्र = शत्रु. ३. विद्येसारखी. ४. काजव्याला. ५. व्यर्थ. ६. होणारें. ७. मानी.

ज्यांला राज्य कराया शौर्यनयज्ञानलेश नाहीं राया !
तेही भूपति होती, जन्मांतरपुण्यपुंजफलगति हो ! ती. ४३
श्रीकामें याकरितां न करावा अलस पुण्यकर्म करितां.
यत्न समत्वीं करणें, असेल जरि मानसांत मुक्तिस वरणें. ४४
सुरनरखगमृगभुजगीं एकचि आत्मा, नसेचि भिन्न विभु जगीं.
हे मोक्षकरी समता भक्तभवध्वांतरविमुरारीस[1] मता. ४५
आत्मत्वें जो सारें पाहे, तो सोडिलाचि या संसारें,
मग कैंचा क्लेश वसे ? ज्याला जन सर्व भासले केशवसे.' ४६
ऐशीं सुखजनक वचें यमदंडाघातभीतसज्जनकवचें,[2]
तो विषयवसुरत[3] रुची न धरि, कुमति साउली त्यजी सुरतरुची.[4] ४७
तो असुरेश्वर चरणें ताडी हृदयीं सुतासि असदाचरणें,
सद्भाग्य सकळ हातें लोटूनि, करी निशादिवस कळ्हातें. ४८
प्रकटाप्रकटोपाया करि सत्सुतजीवनाशि आटोपाया,
परि न मरेचि, रमेना[5] चिंती, विषयांतरीं क्षणार्ध रमेना. ४९
चोळुनियां स्वकरांतें दितिपुत्र म्हणे तदा निदेशकरांतें,[6]
'बळ[7] ! विप्रचित्त[7] ! राहो[7] ! मजला चिंतार्णवांतुनीं तारा हो ! ५०
रमतो असाधुभजनीं, असाचि निर्मील मार्ग हा डिंभ[8] जनीं;
अहिपाशांहीं बांधा, मग्न करा सागरीं; निवारा बाधा. ५१

---

१. भक्तांच्या संसाररूपी अंधकाराचा सूर्य म्हणजे नाशकर्ता असा श्रीकृष्ण परमेश्वर, त्यास. २. यमाच्या सोट्याच्या तडाख्याला भ्यालेल्या उत्तम लोकांचें रक्षण करणारीं. ३. विषय व द्रव्य यांची आवड असलेला. ४. कल्पवृक्षाची. ५. रमा + इन = रमापति, त्याला. ६. आज्ञाधारकांना, सेवकांना. ७. बळ, विप्रचित्त, राहु हीं दैत्यांचीं नांवें. ८. पोरगा.

हे विप्रचित्त ! राहो न दुष्ट हा. हे बळासुरा ! हे राहो !
आतां त्वरा करा हो ! माझा संकल्प सर्वथैव खरा हो. ' ५२
हे दितिजाची वाणी आवश्यक होय त्यांशि वेदावाणी.
सारे यथोक्तकारी[1] टाकिति सद्रत्न सागरांत भिकारी. ५३
भूषण सुरादिकांचें हरिभक्तचि रत्न, मौक्तिकादिक काचें;
त्याच्या लाभें साचा रत्नाकर जाहलाचि पात्र रसांचा. ५४
सुमधुर भवहरलीला पीतां शमवावयाशि तापालीला,[2]
गळली शिशुची लाला,[3] तेंचि अमृत लाधलें नदीपालाला.[4] ५५
हरिभक्तप्रह्लाद-प्राप्तीनें होय सिंधुला आह्लाद;
जों चिंती बाळ हरी, तों प्रेमें काय त्याशि येती लहरी ! ५६
प्रह्लादाशि खळ बळी टाकिति, तों फार नीरराशि[5] खळबळी;
त्या पुष्करनाभरतें[6] स्वसुखानें आणिलें जडासहि[7] भरतें. ५७
हरिपदभक्तिविलासद्वेषी खळ गांजिती उगेचि मुलास.
अक्षोभ्य, जडप्रकृती,[8] क्षोभे दीनामुळेंचि दुःखित सुकृती ५८
कथिती दैत्य नृपातें, नीरनिधि क्षोभला किशोरनिपातें,[9]
त्यांस म्हणे तो अदय त्रिदशाधिपशत्रु वज्रसोदरहृदय.[10] ५९
' त्या दुर्मतिनगराशी[11] आछादा, करुनियां वरी नगराशी,[12]
पर्वतभारें चिरडो, निरुद्धनिःश्वास आत्मदोषेंचि रडो. ६०

---

१. सांगितल्याप्रमाणें करणारे. २. संकटपरंपरेला. ३. लाळ. ४. समुद्राला. ५. समुद्र. ६. कमलनाभ विष्णूच्या भक्तानें. ७. निर्जीवालासुद्धां; ( जडासहि = जलासहि = पाण्यालासुद्धां ). ८. निर्जीव; ( 'डलयोः अभेदः' या न्यायानें जलप्रकृती = जलमय ). ९. बालकाला (प्रह्लादाला) टाकल्यामुळें. १०. वज्राप्रमाणें कठिण हृदय असलेला. ११. दुष्टबुद्धीचें वसतिस्थान ( नगर ) अशाला, प्रह्लादाला. १२. पर्वतांचे ढीग.

करितील मत्स्यमकर ग्रास, तयांशीं करील कैसें मकर ?[१]
वर्षसहस्रेंहि तरी मरेल, होईल कोण जन तेथ तरी ?[२] ' ६१
दितिदनुसुत[३] अशि वाचा ऐकुनि, घेती निदेश त्या अशिवाचा.
त्यावरि पर्वत रचिती, केली त्या सागरीं विशालतर चिती.[४] ६२
चिंती प्रह्लाद मना स्थिर करुनी तेथ भक्तबाधादमना,[५]
बंधनगिरिभाराशी न गणुनियां संस्तवी महाभाराशी.[६] ६३

( दंडकवृत्त[७] )

' जय जय जनकामकल्पद्रुमा ! मामनोधीश्वरा[८] ! वामना ! भद्र-
नामा ! महर्षिस्तुता !
सकळदुरितजाळविच्छेदका ! काळविध्वंसका ! व्याळभक्ष्यासना ![९]
भाळदृक्सन्नुता ![१०]
शतधृतिसुरवासवाराध्यपादा ![११] समस्तेश्वरा ! दासपीडाहरा ! भास-
माना ! प्रभो !
बहुखरभवदावदग्धास[१२] बाधावनाम्रे ! जगत्पावना ! धांव गा ! पाव
ये क्षिप्र भो ! ' ६४

---

१. कपट; ढोंग. २. नौका. ३. दिति व दनु यांचे ( या कश्यपाच्या पत्नींचे ) पुत्र = राक्षस. ४. रास. ५. भक्तांचें संकट निवारण करणाऱ्याला. ६. महा + आभा + राशी = मोठ्या तेजाचा पुंज, अशाला ( विष्णूला ). ७. या पद्याचें वृत्त " अर्णदंडक " आहे. यांत दोन नगण व आठ रगण मिळून प्रत्येक चरणांत तीस अक्षरें असतात. ८. लक्ष्मीच्या मनाच्या ईश्वरा ! ९. सर्पभक्षक अशा गरुडाचें वाहन असलेल्या ! १०. शिवस्तुता !; ज्याच्या भालावर नेत्र आहे त्या शिवानें स्तविलेल्या ! ११. शतधृति ( ब्रह्मदेव ) + सुर + वासव ( इंद्र ) + आराध्य + पाद = ब्रह्मदेव, देव, इंद्र यांना उपासनायोग्य पाय ज्याचे अशा परमेश्वरा ! १२. अतिप्रखर अशा संसाराच्या वणव्यानें पोळलेल्यास.

( पंचचामर वृत्त )

असा सुरारिपुत्र सागरांत तेधवां स्तव
करूनियां त्यजी समस्त भेद हा अवास्तव,[१]
अनंत मींच हे धरूनि भावना समाधिला,
क्षणांत पावलाचि नाठवूनिया श्रमाधिला.[२] ६५

---

## चतुर्थ विजय

( आर्यागीतिवृत्त )

ऐसा प्रह्लाद मुनी योगानें ब्रह्म होय भेदा दमुनी.
सद्भावें पाप सरे, हृदयीं चिद्भा[३] अनादिरूपा पसरे. १
चिंतुनि अधोक्षजाला योगबळें तन्मय स्वयें तो जाला.
तों भवपाशहि तुटला, अधिक न अहिबंधनांतुनीं जरि सुटला. २
पावे क्षोभ नदीन,[४] त्रिभुवन जालें तदा अशोभन[५] दीन.
भासे कल्पासम ही वेळा, सेवी सकंप संत्रास मही. ३
पर्वतभार विराला, स्वप्नापरि तो श्रम क्षणांत जिराला;
मकरादिकीं न सळला,[६] नीरांतुनियां अलाबुसाचि[७] उसळला. ४
मग तो गतश्रमाधी सोडी येऊनियां तटाशि समाधी.
'हा मीं प्रह्लाद असें' जाणे योगींद्र आपणालागिं असें. ५
आत्मोद्धारकरातें वंदी जोडूनियां तदा स्वकरातें.
दितिजसुत समस्त वन स्वमुखानें गाजवी करीतां स्तवन. ६

---

१. खोटा. २. शारीरिक कष्ट व मानसिक दुःख, यांना. ३. चैतन्यज्योति. ४. नदी + इन = नदीचा स्वामी ( समुद्र ). ५. सौंदर्यरहित. ६. गांजला गेला. ७. भोपळ्यासारख्याच.

‘ हरि ! तुजिया स्तवना मीं अपटुचि, परि लुब्ध हृत्प्रियास्तव नामीं,
भक्तांच्या सुरतरुचे गावे गुण, हें मनास या[1] सतत[1] रुचे. ७
लक्ष्मी ज्या पदकमला सेवी, तें आवडे सदा पदक मला.
नलगे तापद कमला, असो तुझी भक्ति संहृतापदकमला.[2] ८
करुणापारावारा ![3] लागों देशी न सेवकांला वारा;
हृदयीं धरूनि जागा, दीनत्राणीं सदाहि अससी जागा. ९
धरुनि महा आदर ज्या वांछिति तूज्या विधीशही पादरजा,
तो तूं दयानदीना ! संरक्षिशि बा ! स्वयेंचि धाउन दीना. १०
करुनि तपा, वेदांतश्रवणें, काळेंकरूनि पावे दांत[4],
त्या श्रीकांतपदानें उद्धरिलें, न घडतां मला तप–दानें. ११
अज्ञानतिमिरतरणी[5] त्वत्पद देवा ! महाभवार्णवतरणी[5]
भक्ताचे अमरतरू कल्याण असोत यांमुळें लोक तरू.’ १२
सुरपतिविधिभवशमनप्रभु[6] तो स्तवितां मनांतुनी भवशमन,[7]
सगदाब्जारिदरवर[8] प्रकटे द्याया हरूनि सर्व दर[9] वर. १३
जलधरपटलसमानद्युति कौस्तुभकंठ पीतपटलसमान[10],
कारुण्यवदक्ष[11] महाभुज भुवनलयस्थितिप्रभवद[12] क्षम[12] हा. १४

---

१. ‘या सतत’ बद्दल **पंत**लिखित दुसरा पाठ ‘अनवरत’. २. आपच्च दुःखं मलश्चेति–**पंत.** आपत्ति, दुःख व पाप जिनें नाहींसें केलें आहे अशी ( भक्ति ). ( अक=दुःख ). ३. कृपासागरा ! ४. इंद्रियदमन. ५. तरणी = ( १ ) सूर्य; ( २ ) नौका. ६. इंद्र, ब्रह्मा, शिव व यम यांचा स्वामी. ७. संसारनाशक. ८. स + गदा + अब्ज + अरि + दरवर = गदा, कमल, सुदर्शन चक्र व उत्तम शंख यांसह. ९. भीति. १०. पीतपट + लसमान = पिवळ्या वस्त्रानें शोभणारा. ११. करुणायुक्त नेत्र असलेला. १२. भुवनांचा नाश, रक्षण व उत्पत्ति करण्याविषयीं समर्थ असलेला.

तो प्रह्लाद भ्रमला पाहुनि सुखमूर्ति संहृतादभ्रमला,[1]
पाहुनि संभ्रम लाहें,[2] नमुनि म्हणे, 'भेटलें कृपाभ्र मला हें. १५
दीनजनावनचतुरा! चतुरास्यशिवादिमस्तकीं तूंच तुरा;
करुणापारावारा! वाराया हो भवांबुदाला वारा. १६
हे निगमागमसारा[3]! साराया दक्ष तूंचि या संसारा,
तव कीर्ति सुधाधारा, धारा पीयूषरस समस्ताधारा. १७
जो भवपाश असे तो तोडावा दीनदुःखसागरसेतो!
तापाला माझ्या ने लयास निजपादपंकजें माजाने[4]! १८
तव महिमा आहे, तो गायाला दे मला रुची सुखहेतो!
भवसागरांत नाव श्रीकांता! एकमात्र तूजें नांव.' १९
स्तवन असें संतानें[5] केलें, तें ऐकिलें जगत्संतानें[6],
मग तो सुखजनकवचें[7] तोषविला भक्तराज सज्जनकवचें. २०
'धरुनि मम गुणासक्ती तूं अव्यभिचारिणीच केली भक्ती,
वत्सा! मीं तूजवर प्रसन्न आहें, अभीष्टसा माग वर. २१
जाल्या बाधा अतुला परि लवहि नसे मदीय विस्मरण तुला,
चिंतिसि मानसधामीं, यास्तव जालों प्रसन्न तूज बुधा! मीं.' २२
असि भवबंधकृपाणी[8] वाणी परिसूनि, चित्सुखाची खाणी,
आणी नयनीं पाणी, पाणी जोडूनि भक्त बहु वाखाणी. २३
'योनिसहस्रांत मला भ्रमतां, ही अच्युता! तुजी शांतमला[9]
भक्ति असो, वर दे हा, भास्वरदेहा प्रपूरितद्विरदेहा![10] २४

---

१. नष्ट केला आहे बहुत मल जिनें अशी (सुखमूर्ति). २. त्वरेनें. ३. वेद व शास्त्रें यांचें सार अशा (लक्ष्मीपते!). ४. लक्ष्मीपते! ५. साधूनें (प्रह्लादानें). ६. जगताच्या कल्पवृक्षानें. ७. सुखदायक शब्दानें. ८. संसारबंध छेदणारी तरवार. ९. नष्ट झाला आहे मळ जीपासून (अशी भक्ति). १०. पूर्ण केली आहे हत्तीची (गजेंद्राची) इच्छा ज्यानें अशा! (अच्युता!).

अविवेकांची रसदा विषयीं अनपायिनी जशी प्रीति सदा,
तैशी तुजिया भजनीं असो, मला हाचि नित्य निजलाभ जनीं.' २५
देव म्हणे, 'बाला! हें आहेचि, तुला अणीकही बा! लाहें,
परि दुसरा क्षिप्र वर प्रह्लादा! माग तूं स्वभक्तप्रवर.' २६
तेव्हां त्या वरदास प्रार्थी शिर ठेउनी पदावर दास,
'तवगुणगीतरतातें पीडा केली असे निरंतर तातें. २७
घडली पातकराशी देवा! तवपाददासपातकराशी,[1]
त्या माझ्या जनकमळक्षपणीं[2] करुणा करू तुझें पदकमळ. २८
करिं असुरास रमेना द्वेषीं ऐशाच दे वरास रमेना[3]!
हरिजनघातक नर कीं सेविति आकल्प[4] सर्व पातक नरकीं. २९
या अभयकृपादानें रक्षावें सर्वलोकनुतपादानें.'
जोडूनि अंजलीला, ऐसें विनवी त्रिलोकपावनलीला. ३०
ऐकुनियां मावर तें कारुण्य करी स्वभक्तिधामावरतें,
हें तव कामित साधो. वर बहु घे मागतोशि कां मित, साधो!? ३१
या धरणीवर मागें अलब्ध, ऐसा किशोरका! वर मागें,
दुर्लभ संपाद, पहा आलों मीं भक्तकामसुरपादप हा.' ३२
प्रह्लाद म्हणे, 'नामीं सर्व असे, अन्य योग्य जाणेंना मीं.
धर्मार्थकाममुक्ती त्वद्दासकरीं अशीच सत्य सदुक्ति. ३३
त्वद्भक्ति सुरव्रतती[5] यास्तव संसेविती सदा सुव्रत ती,
जेथें चित्त भुकेलें, तें देउनियां कृतार्थ मज विभु! केलें. ३४
सकळांला दुर्लभ जें, तें दिधलें, म्हणसि नित्य निर्विघ्न भजें,
तुज सुखमूर्ते! गावें, हेंचि दिलें. अन्य काय मीं मागावें? ३५

---

१. तव+पाददास+पातकर+अशी=तुझ्या पायांच्या सेवकाचा नाश जिनें होईल अशी. २. बापाच्या पातकाचा नाश करण्यामध्यें. ३. लक्ष्मीपते! ४. कल्पान्तापर्यंत. ५. कल्पवल्लि.

गौरविलें निज लाभें, आतां नाहीं जगत्त्रयीं मजला भें,
भ्राजिष्णो[1]! प्रभविष्णो[2]! भूष्णो[3]! जिष्णो[4]! नमो नमस्ते विष्णो!' ३६
प्रह्लादाची वाणी ऐकुनि ऐशी सुधाब्धिवीचीवाणी[5],
भुवनांबुजकासार[6] प्रभु बोले यापरि स्वभजका सार. ३७
'भक्तिसमन्वित शांत स्वांत तुजें मत्पदीं असो विश्रांत,
निर्वाणहि[7] पाव; न हो देहात्मभ्रांति; विष्टपीं[8] पावन हो.' ३८
ऐसा दयानिधान प्रह्लादीं करुनियां प्रसादाधान.
श्रीपति जगत्प्रधान प्रभु तो पावे क्षणांत अंतर्धान. ३९
मग निर्जरजनकाला[9] प्रह्लादहि जावुनी, नमी जनकाला,
बाष्पाकुळ नयन गळे, सुत धरिला पोटिशीं नृपें भुजयुगळें. ४०
सुतदर्शनामृता पी नयनयुगें असुरनाथ तो अनुतापी,
द्वेष समस्तहि विसरे, हरिप्रसादें करूनि करुणा पसरे. ४१
अभिमुख जरि सकलपती[10], तरि कालप्रमुख दुःखदायक लपती,
साधिति शत्रुजन मन, प्रिय करिती जोडुनी करांबुज नमन. ४२
विधिशापानळदग्धें बहु काळें कश्यपात्मजें अविदग्धें[11],
सुतमारण पुनरपि तें हरिवैरें करुनि मांडिलें अतिकुपितें. ४३
तेव्हां नृसिंहतनुतें धरुनि, श्रीशें सुरर्षिसंघातनुतें[12]
वधिला दितिसुत नखरें, केलें 'मद्भक्त अभय' हें वचन खरें. ४४

---

१. हे देदीप्यमाना! २. हे समर्था! ३. हे (खरोखर) होणाऱ्या! ४. हे जयशीला! ५. अमृतसिंधूच्या लाटेसारखी. ६. पृथ्वीरूपी कमलाला सरोवरासारखा. ७. मोक्षसुद्धां. ८. जगतामध्यें. ९. निर्जरजन + काला = देवलोकाचा काळ अशाला. (आपल्या जनकाला). १०. सर्वस्वामी ईश्वर. ११. मूर्खानें. १२. देवर्षिसमूहानें स्तविलेल्यानें.

'सर्वग सर्वव्यापी भक्तप्रतिपाळ' हें स्ववाक्य स्थापी,
भक्ति अधिक मींहि असें निजदासाधीन दाविलें तत्व असें. ४५
निजलीलाकल्पलताछायाश्रित पूर्णकाम होऊ भलता,
अवतारचरित्र हरी यास्तव दावूनि भक्तभवभीति हरी. ४६
प्रह्लादेंही राज्य प्रभुप्रसादेंकरूनि केलें प्राज्य,
बहु संपत्संततिला पावे, अद्यापि वर्णिती संत तिला. ४७
पापें पुण्यें सुटला जेह्वां अधिकारबंध सारा तुटला,
तेह्वां भगवद्ध्यानें पर निर्वाणासि पावला सज्ञानें. ४८

( तोटक वृत्त )

हरिपादयुगस्मरणप्रवणें भगवज्जनदिव्यकथाश्रवणें,
चतुरें रसिकें समय क्रमणें; सुख अन्य नसेचि भवभ्रमणें. ४९

( शार्दूलविक्रीडित वृत्त )

श्रीमद्विष्णुपुराणसागरसुधा प्रह्लादजीची कथा,
साधुश्रोत्रपथासि येउनि हरी संसाररोगव्यथा,
केलें सेवन यास्तव क्षणभरी आम्हां न माने पृथा[१],
हा काळव्यय चांगला इतरथा आयुष्य जातें वृथा. ५०

( शिखरिणी वृत्त )

हरिध्यानासक्त प्रकृतिविषयप्राप्तविकृती[२],
कृती[३] लक्ष्मीरामाकृतिभव[४] मयूरेश सुकृती[५].
तया दे हे वाणी प्रभु कमळपाणी, बुधमनीं
असो पीयूषाची लहरि भवसंतापशमनीं. ५१

---

१. प्रतीति, प्रचीति, खात्री. २. सृष्टींतील विषयांचे योगानें प्राप्त झाला आहे विकार ज्यास असा. ३. सद्गुणी. ४. लक्ष्मी व राम यांचा पुत्र (मोरोपंत). ५. सुदैवी.

### उपसंहार

( वृत्त–अनुष्टुभ् )

प्रह्लादविजयो नाम ग्रंथो विष्णुपुराणत:
मयूरेश्वरपंतेन सारं प्राश्य विनिर्मित: ॥
देशभाषानिबद्धोऽपि सेव्योऽयं रसवेदिभि:
पंकजं शैवलाऽऽछन्नं मधुपैर्नोज्झितं क्वचित् ॥

बहुधान्यपौष्यशुक्लाष्टमी शुक्रवासरेषु सत्सु तस्मिन्सदभीष्टकाले
श्रीमत्केशवगणेश- पंडितपदप्रसादादयं ग्रंथोऽगमत्समाप्तिमिति.[1]

खवेदाक्षिमितस्वछवृत्तमौक्तिकनिर्मित:[2]
प्रह्लादविजयग्रंथहारो लुठतु सद्हृदि ॥

[ १. प्रह्लादविजयग्रंथसमाप्तीची तिथि–शुक्रवार, पौष शु॥ ८ शके १६८०; ( दि. ५ जानेवारी १७५९ ) ]
याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि काव्यावर पंतांनीं रचनाकाल दिलेला नाहीं.

[ २. ख = १; वेद = ४; अक्षि = २ ‘ अंकानाम् वामतो गतिः ’ या न्यायानें या सबंध ग्रंथांत २४१ वृत्तमौक्तिकें आहेत ].

---

## ( ४ ) अमृतमथन[1]

### अध्याय पहिला

( गीतिवृत्त )

श्रीकांताच्या प्रेमें करिती त्या सद्यशासि पाठ कवी,
भक्तांसि अमृत पाजी; इतरांसि, जरी मनीं कृपा, ठकवी. १

---

१. देवदानवांच्या युद्धांत देवांचा पराभव होऊं लागला. म्हणून त्यांना प्रबळ करण्यासाठीं विष्णूनें त्यांजकडून समुद्रमंथन करविलें. त्यावेळीं समुद्रांतून चौदा रत्नांबरोबरच अमृत निघालें. तें विष्णूनें मोहिनीरूप धारण करून युक्तीनें देवांस पाजिलें. ही कथा या प्रकरणांत आहे. श्रीमद्भागवतांत आठव्या स्कंधांत ही कथा पांच अध्यायांत आहे; ती पंतांनीं तीनच अध्यायांत संक्षेपानें पण सुंदररीतीनें वर्णिली आहे.

[illegible] 33692

समरांत होत होते ज्या काळीं देववीर असु-रहित,
जैं होय उत्तरोत्तर बळिच्या[१] राज्यांत[१] सर्व असुर-हित, २
जैं स्वप्रसादमाळा न निजशिरीं, मत्तगजशिरीं स्थापी,
तोहि पशु पदें तुडवी, दुर्वासा म्हणुनि जिष्णुला[२] शापी. ३
निःश्रीक शक्र झाला, त्या श्रीमुनिच्या वरूनि शापातें.
तापद शाप न, वाटे ग्रासी तो राहु त्या निशापातें.[३] ४
शक्रादिलोकपाळ ब्रह्मयातें कळविती स्वतापा त्या.
तोहि म्हणे, 'या, कळवूं विश्वासह आमुच्या स्वतां पात्या.[४]' ५
क्षीराब्धितटीं जाउनि विनवि प्रभुला, घनासि चातकसा,
'पाव' म्हणतांचि पावे, होवूं देईल दासघात कसा ? ६
वपु अपुनर्भवदानें[५] रचिलें हरिनीळसारघनसारें[६]
वस्त्रयुग[७] कनकसारें,[८] जाणों स्मित अमृतधौतघनसारें.[९] ७
प्रभुवर विधिशर्वातें[१०] दावी कृतचंद्रकुत्सवदनातें,[११]
तेव्हां त्यांला वाटे तें मोक्षाहूनि उत्सवद नातें. ८

---

१. प्रल्हादाचा नातू जो बलि तो इंद्रपद घेऊन राज्य चालवीत असतां. २. इंद्राला. ३. निशा + पातें = चंद्राला. ४. रक्षण करणाऱ्याला (विष्णूला). ५. अ + पुनर् + भव + द = (भक्तांस) पुन्हा जन्म न देणारा, (त्यानें). ६. इंद्रनील मण्याचा सारभूत अंश असा जो मेघ, त्याच्या सारभूत अंशानें (तेजस्वी अशा कृष्णवर्णानें). ७. (एक नेसावयाचें व एक पांघरावयाचें) अशा वस्त्रांची जोडी. ८. सुवर्णाच्या सारभूत अंशानें; तेजस्वी पिवळ्या रंगानें. ९. अमृत + धौत (धुतलेल्या) घनसारें (कापरानें). (या आर्येंतील 'सारें' हा शब्द अंतीं असलेलीं तीनहि पदें तृतीयान्त असून त्यांचा संबंध 'रचिलें' या क्रियापदाकडे आहे). १०. ब्रह्मदेव व शंकर ह्यांस. ११. केली आहे चंद्राची निंदा ज्यानें अशा मुखास.

दक्षिण[1] अदक्षिणहि[2] रविशशिशतनुतरत्नकुंडल[3] हरीचें;
मधुरतदभयोक्तिपुढें[4] भाग्य किती अमृतकुंडलहरीचें ? ९
दृगघशमार्थ[5] नग[6], सकळशोभार्थ सुरम्य तोंड त्याला हो !
तदधरतुळापराधें[7] कां न अधःपतन तोंडल्याला हो ? १०
जें[8] मिरविति मलिनकुटिलपण, जरि मूर्धस्थ केशवाचे, तें
विपरीत फलद, कविच्या केवळ ते वर्ण्य केश वाचेतें. ११
सदमृतकरांकुरत्वें[9] प्रभुचा एकहि न वर्णवे दांत,
कविला धीर-भरवसा देसा एकहि न वर्ण वेदांत. १२
म्हणती[10] साहें वाक् शुकतिलपुष्पश्रीमदा न नासा जे
ते शिशु असें म्हणावें, शोभवुनि श्रीमदानना साजे. १३
असता मंगळ मंगळकर रवितेजहि न त्यापुढें उरतें,
म्हणतों तेणें नभसें, कौस्तुभमणिनें[11] विराजलें उर तें. १४

---

१. उजवें. २. डावेंसुद्धां. ३. शेंकडों सूर्य आणि चंद्र ह्यांनीं स्तविलेलें असें रत्नजडित कर्णभूषण. ४. मधुर अशा त्या कुंडलांच्या ( किंवा हरीच्या ) अभयोक्तीपुढें. ५. ( दृक् + अघ + शम + अर्थ ) पाहणाऱ्यांच्या दृष्टीचें पातक नाहींसें व्हावें म्हणून. ६. अलंकार. ७. त्या विष्णूच्या अधरोष्ठाशीं साम्य असल्याच्या अपराधानें. ८. अन्वयार्थ :—जरि केशवाचे मूर्धस्थ केश ( तरि ) जें मलिनकुटिलपण मिरविति तें विपरीत ( कुटिलपणाहून निराळें - म्हणजेच निर्मळ व सरळ ) फलद ( होय ), ( म्हणून ) ते ( केश ) केवळ कविच्या वाचेतें वर्ण्य. ९. चांगले व अमृतयुक्त असे किरणांचे अंकुर ( त्या दांतांपासून ) निघत असल्यामुळें. १०. अन्वयार्थ :-- शुकतिलपुष्पश्रीमदा ( मी ) न साहें ( अशी ) वाक् जे ( विष्णूची ) नासा म्हणती, ते ( नासा ) शिशु असें म्हणावें ( कारण ) श्रीमदानना शोभवुनि ( स्वतः ) साजे. ( आकारानें शुकनासिकेची व वर्णानें तिलपुष्पाची स्पर्धा करणारें विष्णूचें नाक, लहान मूल जसें आपल्या सान्निध्यानें आईबापांस शोभा देतें व स्वतःहि चांगलें दिसतें तसें, त्याच्या मुखालाहि शोभा देतें ). ११. कौस्तुभमणि मंगळाप्रमाणेंच लालभडक आहे.

बाहु सुलक्षण अभयद, भीतांचे सेतु, जे विभु[1] जगांचे,
दुष्टप्राणप्राशनकर्ते आचार्य जेंवि भुजगांचे.[2] १५
दृष्टजनताप विलया, स्वीकारुनि कूर्मदृष्टिनय[3], नेतीं,[4]
अनुकंपासुखशयनें[5] पंकजजयनें[6] प्रसन्न नयनें तीं. १६
व्यसनीं सुखें तरावें यत्स्मरणीं धरुनि आदरा जीवें,
कोण कवि न भुलला तीं वर्णूं जातां सुपादराजीवें ? १७
प्रभुच्या प्रादुर्भावीं सर्वां देवांत सारसभवाचीं,[7]
नेत्रें उघडीं होतीं कीं घ्याया तो तसा रस, भवाचीं.[8] १८
ससुरहरविधि म्हणे त्या, सदया वरदेश्वरा त्रिजगदाद्या,
'स्वामी ! मनोव्यथार्तां आम्हां शरणागतां सदगदा[9] द्या.' १९
साक्षी प्रभु त्यांसि म्हणे, "कळलें मज युष्मदिष्ट कामकरा;
सुर हो ! प्रथम बळिसवें मद्वचनें निजहितार्थ साम करा. २०
सर्पाखुन्याय[10] मनीं धरुनि करा साम शत्रुसीं पहिलें;
त्यांहीं तुम्हीं करावें क्षीरधिचें मथन मंदरें[11] वहिलें.[12] २१

---

१. नायक. २. भुजगांचे आचार्य=दीर्घत्व, वर्तुलत्व, सबलत्व हे आपले गुण सर्पांसहि शिकविणारे ( बाहु ). ३. कूर्मदृष्टीचा न्याय. ( कांसवें आपल्या दृष्टीनें आपल्या मुलांकडे पाहून त्यांचें पालनपोषण करितात, अशी समजूत आहे ). ४. नेणारीं. ५. दयेचीं सुखानें निजण्याचीं आंथरुणेंच अशीं. ६. कमलांस ( आकृतीनें ) जिंकणारीं. ७. कमलयोनि जो ब्रह्मदेव, त्याचीं. ८. महादेवाचीं. ( ती भगवन्मूर्ति पाहण्यास ब्रह्मदेव व महादेव यांचेच डोळे उघडे होते. बाकीच्या देवांचे डोळे तेजानें दिपले–मिटले होते ). ९. चांगल्या औषधास. १०. सर्प आणि उंदीर यांचा न्याय. ( करंडींत कोंडलेला सर्प बाहेरील उंदराचें आर्जव करून त्यानें पाडलेल्या भोंकांतून बाहेर येतो व मग त्या उंदरालाच खाऊन टाकतो, हा न्याय ). ११. मंदर नांवाच्या पर्वतानें. १२. त्वरित; निश्चयानें.

तृणवल्लिवीरुदोषधिभार[1] बहु क्षीरधींत सोडा हो!
मंथा[2] करूनि मंदरगिरि, वासुकिरज्जु त्यासि जोडा हो. २२
क्षीरधिमथनीं अद्भुत अमृतरस निघेल, अन्यही वस्तु,
निःस्पृहसे सर्व असा, ते जें म्हणतील तें म्हणा 'अस्तु.' २३
सुर हो! भिवों नका हो! प्रथमोत्था[3] विश्वदुःसहा गरळा,[4]
हित करि माय न म्हणतां बाळें कीं दे स्वदुग्ध, दे गरळा.[5] २४
तैसें पाजीन तुम्हां भक्तां त्या अमृतनाम सुरसा रे![6]
तेणें तत्काळ तुम्हीं अजरामरकाय व्हाल सुर सारे. २५
विफलश्रम रिपु म्हणतिल, 'नाहीं पडला मुखीं सुरस, हाय!'"
ऐसें वदोनि झाला अंतर्हित कौतुकी सुरसहाय.[7] २६
भगवदुपदिष्टमंत्रश्रवणमुदितचित्त कंजजपिनाकी,[8]
गेले स्वस्थानातें बळिच्या सदनासि साधिपति[9] नाकी. २७
सेंद्रसुरांतें पाहुनि ओढिति ते असुर शीघ्र तरवारी,
कीर्त्यर्ह[10] प्रह्लादप्रभुपौत्र[11] तयांसि शीघ्रतर वारी. २८
धवळसुकीर्तिदुशाला[12] टाकवुनि अकीर्तिकांबळीला जे,
पांघुरविते, न ते बुध, त्या[13] कर्मे तो न कां बळी लाजे? २९

---

१. तृण + वल्लि + वीरुत् + औषधि + भार = गवत, वेली, झाडेंझुडपें इ. ओषधींचा (वनस्पतींचा) समुदाय. २. रवी (दहीं घुसळण्याची). ३. प्रथम उत्पन्न झालेल्या. ४. विषाला. ५. मुलास खोकला वगैरे झाला असतां विडा किंवा दुसरीं औषधें वगैरे स्वतः चावून त्यांचा रस आई मुलास देते त्याला 'गरळा' म्हणतात. ६. 'रे!' हें संबोधनार्थी अव्यय संस्कृतांत एकवचनांत व बहुवचनांत वापरतात. येथें तें बहुवचनांत वापरलें आहे. ७. देवांस मदत करणारा. ८. ब्रह्मदेव व शंकर. ९. स+अधिपति=इंद्रासहवर्तमान. १०. कीर्तीला पात्र असा. ११. प्रह्लादराजाचा नातू (बळि). १२. दुशाला = शालजोडी. १३. तरवारी उपसण्याच्या कृत्यानें.

बळि भेटे शक्राला सत्कार करूनि साधु उत्सव दे,
‘ज्या अर्थें आलां तें सांगावें मज’ असें अकुत्स[१] वदे. ३०
हरि[२] गुरुवरें पढविली होती हितयुक्ति जी तसीच वदे;
ती त्या बळिच्या श्रुतिला, जिह्वेसि जसी सुधा तसी चव दे. ३१
साम करिति देवांच्या नेणुनि, ते असुर मंद, रागाला;
उन्मूलिति बाहुबळें क्षीरधिमथनार्थ मंदरागाला.[३] ३२
ते सबळ बाहु वाहुनि नेतचि होते जपोनि सुरसार्थ,[४]
त्यजिति पथीं बहुकंदरमंदरभरभग्न[५] दैत्यसुरसार्थ.[६] ३३
राहे पथीं कनकनग;[७] साहे न भरासि, कटक भागे, हें
जाणुनि तेथें येणें केलें त्या शक्तिकीर्तिभागेहें.[८] ३४
तो नग, मग जगदीशें गरुडावरि वाहिला, न हालवला;
तद्द्वारें एकाही पत्राचा[९] प्रांतही न ‘हा!’ लवला. ३५
क्षीरधितटीं उतरिला प्रभुनें गिरि, तें विचित्र न गमो जी!
कांडफळांतर्गत[१०] कण एक असें आपणासि नग मोजी. ३६
वासुकिला नेत्र[११] करुनि, मंदरगिरिला करूनियां मंथा,
आदरिला क्षीरधिच्या मथनाचा दैत्यसुरबळें पंथा. ३७

---

१. अनिंद्य. २. इंद्र. ३. मंदरपर्वतास. ४. अमृतासाठीं. ५. पुष्कळ गुहा असलेल्या मंदरपर्वताच्या भारानें पराभव पावलेला. ६. दैत्य व देव यांचा समुदाय. ७. सुवर्णाचल (मंदरपर्वत). ८. शक्ति + कीर्ति + भा + गेहें = शक्ति, कीर्ति आणि कांति यांचें स्थान अशा विष्णूनें. ९. (गरुडाच्या) पंखाचा. १०. कांड + फल + अंतर्गत = ब्रह्मांडरूपी फळाच्या आंतील. ११. रवीची दोरी.

असुर म्हणति, 'वदन धरूं, धरा तुम्ही सर्व देव पुच्छा या.
लाघवहेतुपथीं[1] पद न आमुची क्षणहि दे वपुछाया.[2]' ३८
सुर म्हणति मनीं, 'खळ हो, जें गर्वा व्यसन योग्य, भोगा तें,'
प्रकट वदति, 'बहु बरवें. घ्या सर्व तुम्हींच पूर्वभोगातें.[3]' ३९
भरमग्नगिरिस पृष्ठीं धरि,[4] होय क्षीरधींत कासवसा,
उपदेशी कीं, 'माझी स्वस्थ सुजन हो! धरूनि कास वसा.' ४०
यति म्हणति जया,[5] गतिचा हा जनक खरा, दुजा अजनक, मठ,[6]
झाला क्षीरधिमध्यें जड तारायासि तो अज, न कमठ.[7] ४१
पृष्ठीं कमळाधिक[8] गुरु[9] न गमे नग,[10] मेरुकल्पही[11] अजि!, तें
वर्णावें किति? धरिलें जें कछपवपु सुरार्थ त्या अजितें. ४२
गगनगदुग्धाब्धिमथनकुतुकप्रेक्षकसुरांत[12] राहूनी,
कवळी अजित नगाच्या डळमळतां मस्तकासि बाहूनीं. ४३

---

१. हलकेपणाला कारण अशा मार्गांत. २. अन्वयार्थ:— आमुची वपुछाया (देहाची सावली) लाघवहेतुपथीं क्षणहि पद न दे. (आमच्या शरीराची सावली (देखील), हलकेपणा येण्याला कारण अशा मार्गांत क्षणभरहि पाऊल ठेवीत नाहीं. सर्पाचें पुच्छ अमंगल आहे म्हणून तें आम्ही धरीत नाहीं, असें दैत्यांचें म्हणणें. देवांना हें म्हणणें आवडलें. कारण वासुकीच्या तोंडांतील विषाग्नीनें ते भाजून जातील असें त्यांस वाटलें). ३. (सर्पाच्या शरीराच्या) पुढील (तोंडाकडील) भागास. (भोग = सर्पशरीर). ४. याचा कर्ता 'अजित' (विष्णु). ५ ज्या विष्णूला. ६. आश्रय करण्याचा आश्रम. ७. कासव. ८. कमलाहून अधिक. ९. जड. १०. मंदराचल. ११. मेरुपर्वतासारखा असूनहि. अन्वयार्थ:—अजि! (अहो!) मेरुकल्पही नग (त्या कासवाला आपल्या) पृष्ठीं कमलाधिक गुरु न गमे. १२. गगन + ग + दुग्धाब्धि + मथन + कुतुक + प्रेक्षक + सुरांत = आकाशांत प्राप्त झालेल्या, क्षीरसागराच्या मथनाचें कौतुक पाहणाऱ्या, देवांत.

क्षीरधिमथनारंभीं त्या साधुहितें, असाधुच्या अहितें,<br>
बळ दिधलें देवांतें असुरांतें मंदराद्रितें अहितें.[१] ४४<br>
वासुकिच्या बहुनासामुखनयनांतूनि बहु गळे गरळ,<br>
तद्धूमानळहतरुचि[२] असुर गमति दावहत[३] जसे सरळ.[४] ४५<br>
वासुकिच्या श्वासविषज्वलनें तो देवगणहि होरपळे,<br>
एका[५] प्रभुला[५] पाहुनि विषवन्हि, जसाचि विधुसि[६] चोर, पळे. ४६<br>
भगवद्वश[७] घन वर्षति देवांवरि, कीं तसे न सेव्य जन,<br>
वीजिति भगवद्भक्तां वायु, भले धरुनियां जसे व्यजन. ४७<br>
सुर-असुर बहु श्रमले, अमृत निघेनाचि किमपि, मग हरि तो,<br>
मथन स्वयेंचि करि करिवरवरद[८] मुकुंद जो दुरित हरितो. ४८<br>
वारुनि सुरासुरचमू, अहिला परदेवता[९] तसें कवळी,<br>
बाळांसुतांस्नुषांतें वारुनि दधि गोपिका जसें, ढवळी. ४९<br>
क्षीरधिमथनीं प्रभुनें केवळ न स्वकचकुंडलें कटकें,<br>
डोलविलीं देवांचीं दैत्यांचीं साहिपतिशिरें[१०] कटकें. ५०<br>
प्रथम निघे हाळाहळ विषरस जो मृत्युजनक वणवासा,<br>
ज्या लोकपाळ भ्याले, त्याच्या घेईल जन कवण वासा ? ५१<br>
अत्युग्रवेगदु:सहविषसंग्रस्त प्रजापति शिवाला<br>
गेले शरण, यदंघ्रिस्मृतिनें जन भवदवार्तहि निवाला. ५२

---

१. अहि = सर्प जो वासुकि त्याला. २. त्या विषाचा जो धूम आणि अग्नि ह्यांनीं नष्ट झाली आहे कांति ज्यांची ( असे असुर ). ३. वणव्यानें जळलेले. ४. देवदाराचीं झाडें. ५. एकट्या ( फक्त ) विष्णूला. ६. चंद्राला. ( चोराणां चंद्रमाः रिपुः ). ७. विष्णूच्या स्वाधीन असणारे. ८. करिवर + वरद = गजेंद्रास वर देणारा. ९. श्रेष्ठ देव ( विष्णु ). १०. सर्पराज जो वासुकि त्याच्या शिरांसहवर्तमान.

म्हणती, ‘विश्वेशा ! या विषदहनें हें न विश्व करपावें.
आम्हां विपतापार्तां दासां होवूनि अमृतकर पावें. ५३
विश्वेश ! विश्वमूर्ते ! विश्वंभर ! विश्वकामकल्पतरो !
या गरळव्यसनीं हें जग भुजगग्रस्तभेककल्प[1] तरो.’ ५४
तत्काळचि करुणार्णव देव वतंसीकृतेंदुकळ[2] वळला,
तें विश्वप्राणहर व्यसन विलोकूनि फार कळवळला. ५५
गिरिजेसि म्हणे, “ देवि ! प्रणतार्तिहरे ! अहो अनादिसति !
मच्चरणान्य शरण्य[3] प्राणव्यसनीं न या जनां दिसती. ५६
ती प्रभुशक्ति वृथा, जी न हरी भय केलिया नमन दीनें,
काय असोनि दवडिला जरि तृषिताचा न तृट्श्रम[4] नदीनें ? ५७
‘प्राणादि सर्व वेंचुनि आर्तांचें करिति संत रक्षण हो !’
करुनि मज प्रणति म्हणति, ‘या व्रतनियमीं न अंतर क्षण हो.’ ५८
भूताभयद पुरुष जो, चूडामणि होय हो ! सुमेरुस तो,
शरणागता[5] न भयदावरि धर्म मुकुंदही उमे ! रुसतो. ५९
दीनांचें परिपालन हेंचि मज प्रभुसि कर्म देवि ! वर,
ऐसें सद्योगिमना[6] चिर वरिलेंही न शर्म दे विवर.[7] ६०
हरि सुप्रसन्न होतो येणेंचि, भवानि ! मींहि हरिशील;
धरिशील तूंहि हें व्रत जरि, तरि मन्मन समूळ हरिशील. ६१

---

१. सापानें गिळलेल्या बेडकासारखें ( जग ). २. वतंसीकृत + इंदु + कळ = शिरोभूषणासारखी केली आहे चंद्राची कळा ज्यानें असा, देव ( शिव ). ३. तारक. ४. तहानेमुळें होणारा श्रम. ५. अन्वय– उमे ! शरणागता भयदावरि न धर्म, मुकुंदही रुसतो. ( शरणागताला अभय देण्याऐवजीं भय देणाऱ्यावर धर्मच रुसतो असें नव्हे तर विष्णूचीहि अवकृपा होते ). ६. श्रेष्ठ योग्याच्या मनाला. ७. गुहा.

जग जगदीश्वरि ! वांचो, त्वदधरमधुसेंचि सेवितों विष मीं,
तो आप्तोत्तम, कामा ये जो धांवोनि अवसरीं विषमीं." ६२
गरळप्राशनकर्मा अनुमोदन दे सती प्रभावज्ञा,[1]
काय करावी त्या गरतिमिरें[2] प्रभुभास्करप्रभावज्ञा ?[3] ६३
हाळाहळगरळाच्या श्रीशंभु करी सलील आचमना.
आला तो सुरमणि परमार्थेच्छूंच्या, न अन्य काच, मना. ६४
कर्पूरनिभगळातें[4] नीळ करी परम मलिन हळहळ तें,
साधुसि विभूषणचि परि कविमन खळखळपणेंचि[5] हळहळतें. ६५
साधुमना न परहिताचरणीं घडल्याहि मरण तळमळवी,
मदकर्दमीं न सन्मति तिळभरि डावेंहि चरणतळ मळवी. ६६
'घालील तव यशावरि सकळ[6] सतीप्राणवल्लभा ! टकळा[7],'
शंभुपुढें विष्णु म्हणे धरुनि मुदुत्फुल्लगल्ल[8] भाटकळा.[9] ६७
त्या कर्माची कोण ज्ञाते करितील न प्रशंसा हो ! ?
म्हणती असाचि समयीं अभयद सकरुणशिरोवतंसा ![10] हो. ६८
प्राशन करितां स्मरहरकरगलितप्रखरतरगरलरस[11], तो
व्याळवरवृश्चिककुळीं अद्यापि सुदुःसहप्रकृति वसतो. ६९

---

१. ( शंकराचें ) सामर्थ्य जाणणारी. २. विष हेंच तिमिर ( अंधार ) त्यानें. ३. प्रभु + भास्कर + प्रभा + अवज्ञा = शिव हाच सूर्य त्याच्या तेजाचा अपमान. ४. कापरासारख्या ( म्हणजे शुभ्र ) गळयास. ५. दुर्जनाच्या दुष्टपणामुळेंच. ६. सकळ=सकळजन. ७. टकळा घालील=एकसारखा स्तुतिवाद चालवील. ८. मृद् + उत्फुल्ल + गल्ल = आनंदानें विकसित आहेत गाल ज्याचे असा ( विष्णु ). ९. भाटांची ( स्तुतिपाठकांची ) रीति. १०. सदय लोकांचें मस्तकभूषण ( म्हणजे श्रेष्ठ ) अशा शंकरा ! ११. स्मरहर + कर + गलित + प्रखरतर + गरलरस = मदनाचा नाश करणाऱ्या शंकराच्या हातांतून गळलेला अत्यंत प्रखर असा विषरस.

## अध्याय दुसरा

हरिली असी पुरहरें[1] प्राशुनि गरळासि ती सुरासुरभी,
मग मथितां क्षीरधिला प्रकटे अत्यंत भासुरा[2] सुरभी. १
जीणें[3] अर्थिजनाचा वंध्य मनोरथ कधीं न राहविला,
ती घेतली ऋषींनीं सुगतिद[4] मखसाधका[4] वरा हविला.[4] २
त्यानंतर प्रकटला नामें उच्चैःश्रवा धवल वाजी,
वदले तुरग परस्पर कीं, "हा अस्मद्धराधव[5] 'लवा जी !'" ३
बळि बोले, 'हा माझा. याचें मीं शोभवीन पल्याण[6].
करिन अरींचें अकुशळ, आप्त जनांचें समग्र कल्याण.' ४
चित्तीं म्हणे हरि[7], 'बळे ! देइल मज पद्मनाभ[8] या तुरगा.
म्हण म्हणसी तें, मन्मन गुरुशिक्षालंघना भयातुर गा !' ५
ऐरावतनाम चतुर्दंत गज निघे तसेंचि आणीक,
त्या दुग्धोदधिपासुनि कौस्तुभनामक अनर्घ्य[9] माणीक. ६
सुर म्हणति परस्पर ते रद पाहुनि त्या अशेषकरितिलकीं[10],
'हरनगशिखरांशीं[11] हे शुद्ध सरळ साधु सख्य करितिल कीं.' ७

---

१. मयासुरानें निर्माण केलेल्या तीन पुरांचा नाश करणाऱ्या शंकरानें. २. तेजस्विनी. ३. ज्या सुरभीनें (कामधेनूनें). ४. उत्तम गति देणाऱ्या यज्ञाला साधनभूत अशा होमद्रव्यांकरितां. (दूध, दहीं व तूप हीं होमद्रव्यें आहेत). ५. आमचा पृथ्वीपति. ६. खोगीर. ७. इंद्र. ८. कमलनाभ (विष्णु). ९. अमोल, ज्याची किंमत करतां येत नाहीं असें. १०. सर्व हत्तींना भूषणभूत अशा ऐरावताचे ठायीं. ११. महादेवाच्या (कैलास) पर्वताच्या शिखराशीं.

अनघ[१] सुवृत्त[२] सुरक्तप्रकृति[३] म्हणुनि जडहि[४] कौस्तुभ प्रभुला,
आवडला; सज्जन हो ! याचि गुणगणा दुज्या गुणा न भुला. ८
मग दुग्धोदधिकुक्षींतूनि निघे पारिजातनग[५] राया ! [६]
जो स्वर्गा भूषवितो, कामप्रद तूं जसा स्वनगरा या. ९
मग अप्सरा निघाल्या, ल्याल्या मणि, नेसल्या तनु[७] सुवासें,[८]
ज्यांहीं भ्रमर भुलविले सारससौरभसखें[९] तनुसुवासें १०
त्या उपरि श्री भुवनीं प्रकट कराया महा सुख निघाली,
निजकांतिनें दिशांतें झांकण ती दीप्तिची सुखनि घाली. ११
सादर सुरासुरानीं ती श्री बहु मानिली, जसी अलिनीं
कुटजकुसुमरससेवन करितां भाग्यें विलोकिली नलिनी. १२
महदद्भुतासनातें स्वकरें तत्काळ तीस मांडूनीं,
बसवी विनउनि सुरपति आत्ममहत्वाभिमान सांडूनीं. १३
गंगादिनद्या आल्या अभिषेकालागिं तोय आणूनीं,
ओषधि आणी क्षोणी श्रीचा अभिषेकसमय जाणूनीं. १४
शुचि पंचगव्य[१०] आणुनि विनउनि म्हणती पुनःपुन्हां गाई,
'साहित्य सर्व झालें, तीर्थजळें देवि ! शीघ्र न्हा गाई ![११]' १५

---

१. निर्दोष (पक्षीं–निष्पाप). २. चांगला वाटोळा (पक्षीं–सद्वर्तनशील). ३. चांगल्या लालभडक रंगाचा (पक्षीं–प्रीतियुक्त स्वभावाचा). ४. अचेतनसुद्धां (पक्षीं–मंद असूनहि). ५. पारिजात नांवाचा कल्पवृक्ष. ६. परीक्षिते ! (भागवतग्रंथाच्या श्रोत्या !). ७. तलम, बारीक. ८. उत्तम वस्त्रें. ९. कमलाच्या सुगंधाचा केवळ सखाच अशा (अंगाच्या सुवासानें). १०. गाईपासून उत्पन्न झालेले पांच पदार्थ– दूध, दहीं, तूप, गोमूत्र आणि शेण. ११. गा+आई ! = अगे बाई ! (येथें 'आई' हा शब्द मोठ्या आर्जवाचा व स्नेहाचा आहे).

मधुरस घेउनि आला मूर्त श्रीमान् ऋतूत्तम वसंत,
घन वाद्यें वाजविती, करिती अभिषेक दिगिभवर[1] संत. १६
ज्यातें पाहुनि 'आपण दास' असें तप्तहेमवर्ण वदे,
कौशेयांबरयुग्म[2] स्नानोत्तर त्या सतीस अर्णव दे. १७
श्रीवपु सहज रुचिर जें, सद्भावेंकरुनि विश्वकर्मा तें,
बहु भूषवी नगांनीं, वर्णी त्या फार विश्व कर्मातें. १८
दे वरुण वैजयंती,[3] सेउनि जीचें यथेष्ट मधु, परवा
इतररसाची न धरुनि, करिति सुमधुरा यदीय मधुप रवा. १९
वाणी श्रीस म्हणे, 'या त्वत्स्तनविश्लेष[4] न मणिहारा हो;
गंगापूर[5] सुरनगीं[6] जैसा तैसाचि रमणि ! हा राहो. २०
पद्मभवें पद्म दिलें, नागानीं कुंडलें दिलीं नमुनीं,
आशी दिल्या तिहीं जे ज्ञानी भगवत्पदीं निलीन मुनी. २१
श्रीदेवी मग चाले उत्पलमाळा सलील धरुनि करीं,
शोभे सुरासुरमणीं मूर्त मधुश्रीच जेंवि तरुनिकरीं. २२
गंधर्वयक्षचारणसिद्धसुरासुरगणांत ती पाहे
कीं आपणासि आश्रय कोण ध्रुव अतुळशुद्धगुण आहे. २३
जेथें जेथें सुतपश्श्रुतइत्यादीड्यगुण[7] जना दिसती,
तेथें तेथें पाहे बहुधा दोषासि ती अनादि सती. २४

---

१. दिग्+इभ+वर=(अष्ट) दिशांस असणारे गजश्रेष्ठ. २. किडयांच्या कोशांपासून झालेल्या रेशमीवस्त्रांची जोडी. ३. आपादलंबिनीमाला. ४. तुझ्या स्तनांचा वियोग. ५. गंगानदीचा (शुभ्र) प्रवाह. ६. देवांच्या मेरुपर्वतावर (हा सोन्याचा असल्यामुळें पिवळा आहे). ७. चांगली तपश्चर्या, विद्या इत्यादि स्तुत्य गुण. ('तप' व 'तपस्' असे दोन्ही शब्द 'तपश्चर्या' या अर्थी संस्कृतांत आहेत).

मराठी ग्रंथ ... त.

कोठें शुद्ध तप असे, परि दारुण नाशहेतु कोप महा,
दुर्वास:प्रभृतितपोधन सुभुजगमणिकरंडकोपम[१] हा. २५
कोठें सुरगुरुशुक्रप्रभृतींत ज्ञान बहु असे, परि तें
संगविवर्जित[२] नाहीं, परिपूर्णहि दूषितांबु पात्र रितें. २६
आहे महत्व बहु परि न द्रुहिणीं चित्तभूजय[३], न सोमीं,
भलता[४] वर वरुनि, म्हणों कैंवि, सुवर जरि नसे तरि नसो, मीं ? २७
जरि ईश्वरत्व दिसतें शक्रप्रभृतींत तरि न तें साचें,
होय[५] परापेक्ष कसा ईश्वर ? निववी न पान फेंसाचें. २८
जरि धर्म परशुरामप्रभृतींत असे, नसेचि भूतदया,
निजभर हरिला म्हणउनि चितू कल्याण एकभू तदया.[६] २९
न त्याग[७] मुक्तिकारण, झाला जरि तो कवि[८] प्रभूतद;[९] या
न शिबिप्रभृति मना ये; गाती जरि साधु विप्र भूतदया. ३०
कोठें वीर्य असे, परि तें परिहरिलें न काळवेगानें ?[१०]
पित्त[११] कृतवीर्यसुतमुखवीर्यकथांच्याचि[१२] चाळवे[११] गानें.[१२] ३१

---

१. सु + भुजग + मणि + करंडक + उपमा = मोठ्या सर्पाच्या मस्तकांतील मण्याच्या करंड्यासारखा. २. (सांसारिक) संबंधानें रहित. ३. (मनांत उत्पन्न होणाऱ्या) मदनावर मिळविलेला विजय. ४. भलतासलता, कोणता तरी. ५. अन्वयार्थ- (जो) परापेक्ष (दुसऱ्याची अपेक्षा करणारा) तो ईश्वर कसा ? ६. त्याच्या (परशुरामाच्या शुभ) दैवासाठीं. अय = दैव. ७. दान. ८. शिबिराजा. ९. पुष्कळ देणारा. १०. काळवेगानें न परिहरिलें ? काळाच्या गतीनें पराक्रम नष्ट होतात, हें तात्पर्य. ११. पित्त चाळवे = पित्त चाळवतें; मनःक्षोभ होतो. १२. कृतवीर्य + सुत + मुख + वीर्य + कथा = (कृतवीर्यसुत) कार्तवीर्य आदिकरून राजांच्या पराक्रमांच्या कथांच्याच गायनानें.

सनकादि समाधिनिरत, विषयांचें त्यांपुढें कसें[1] मांडे[1] ?
पीतामृतासि कैसें वश करितिल आपुल्या रसें मांडे[2] ? ३२
मार्कंडेयादि असे[3] दीर्घायु, परंतु तें नसो शील,
सोसील सर्वहि स्त्री, परि इंद्रियदमन हें न सोसील. ३३
जेथें इंद्रियलालन तेथें क्षण भरवसा न आयूचा,
काळाचा वेग जना दुःसह, अभ्रासि जेंवि वायूचा. ३४
कनककशिपुप्रभृतिला करिता झाला क्षणांत गट काळ,
सुगुणहि साधुद्वेष्टा तो केवळ दोषसिंधु फटकाळ.[4] ३५
इंद्रियदमनहि नाहीं, आयुष्याचाहि भरवसा आहे,
श्रुतिपूर्वोक्त न दोष, श्रीरुद्रीं म्हणुनि आणही वाहें.[5] ३६
परि तोहि अमंगळसा मसणीं भूतांत नग्न कां नांदे ?
बाळांच्या भस्मभुजगभूषण[6] हें नाम भीति कानां दे. ३७
ऐसा विचार करितां श्री श्रीपुरुषोत्तमासि पाहूनी,
चित्तीं म्हणे, ' सुमंगळ वर हाचि, न अन्य धन्य याहूनी. ३८
परि हा आत्मरत[7] प्रभु, याला माझी नसे तिळहि परवा,
पर वाहेन वपु पदीं, ऐसा कैंचा मिळेल वर बरवा ? ३९
जावें शरण प्रभुतें, जसि गेली सुरनदी नदीनातें,
शोभे महत्तमातें आश्रय करितां, न दीन दीनातें. ४०

---

१. कसें मांडे=कशी मांडणी होणार ? ( कारण विषयसुखाला ते निरुपयोगी ! ). २. मांडा=अतिशय पातळ पापुद्र्यांचें गव्हाचें पक्वान्न. ३. आहे. याचा कर्ता ' मार्कंडेयादि ' हा समुदायवाचक आहे. ४. स्वच्छंदी, अद्वातद्वा वर्तन करणारा. ५. (ही मी लक्ष्मी आण-शपथ-सुद्धां ) वाहतें. ६. राख व सर्प हींच आहेत भूषणें ज्याचीं तो. ७. स्वस्वरूपीं रममाण.

स्वरताहि मुकुंदातें वरित्यें कीं आधि हा सरो, वर हो,
स्नातातें निववी जरि अपरापेक्षक[1] सुधासरोवर हो. ४१
यद्यपि आत्मरत प्रभु हरि तरि वरिला, परासि न वरी हो !
कंठीं घालुनि माळा झाली श्रीविष्णुचीच नवरी हो ! ४२
श्रीला श्रीकृष्णप्रभु निज वक्षोमरकतालयीं[2] ठेवी,
शोभे सघनगगनतळगतविद्युद्वततिहूनि[3] ती देवी. ४३
श्रीची सुरांसि पूर्वाधिक बळगुणरूपशील दे दृष्टि,
ग्रीष्मीं दवदग्धद्रुमवरनिकरातें[4] जसी सुधावृष्टि. ४४
परजन[5] विगतश्रीक श्रीनयनें होय जेंवि दिनदीप,
महिमा क्षणांत आटे घटजकरें[6] जेंवि सर्वहि नदीप.[7] ४५
प्रीति सुरजनीं, माळा प्रभुकंठीं भव्यगुणसुखनि घाली,
मग वारुणी सुरा वहु विषयिजना द्यावया सुख निघाली. ४६
देवेशानुमतें ती असुरानीं कमळलोचना कन्या,
नेली कीं त्याचि जना अत्यनुरूपा तसी नव्हे अन्या. ४७
मग भगवान् धन्वंतरि ये घेउनि अमृतसुरसकलशातें,
तो नेला असुरानीं, म्हणती, 'हरिलींच सुरसकलशातें.[8]' ४८

---

१. अपर + अपेक्षक = दुसऱ्यांनीं इच्छिलेलें; किंवा अ + पर + अपेक्षक = दुसऱ्याची इच्छा न करणारें. २. वक्षस् + मरकत + आलयीं = वक्षावरील जो मरकतमणि त्याच्या ठिकाणीं. ३. स + घनं + गगनतळ + गत + विद्युद्वततिहूनि = मेघाशीं सहवर्तमान गगनमंडलांत असणाऱ्या अशा विद्युल्लतेहून. ४. वणव्यानें दग्ध झालेल्या वृक्षांच्या मोठ्या समुदायास. ५. शत्रुजन (दैत्य, दानव). ६. अगस्त्याच्या हातानें (केलेल्या एका आचमनानें). ७. समुद्र. ८. सुर + सकल + शातें = देवांचीं सगळीं सुखें.

होउनि विषण्णमानस सुर गेले शरण त्या शरण्यातें,
ज्याचें कल्पतरूंच्या लज्जा औदार्य दे अरण्यातें. ४९
अजित म्हणे, 'स्वस्थ रहा. करितों मीं कार्य योगमायेनें.'
न प्रार्थितांहि माता हरित्ये स्वापत्यरोग मायेनें. ५०
'आधीं मीं, आधीं मीं प्राशीन' म्हणोनि करिति कळहातें,
अमृत म्हणे, प्राशाया बहु झटतां त्यजुनि नीति खळ 'हा!' तें. ५१
प्रबळां[1] म्हणति अबळ, 'जे स्वसहाय विभागयोग्य सुर सारे,
त्यांसि न देतां कैसे प्राशूं म्हणतां स्वयेंचि सुरसा रे!?' ५२
तों प्रभुनें धरिलें स्त्रीरूप अधिक शतगुणें रमेपरिस,
ज्याच्या[2] पादरजीं, निजसामर्थ्य गणुनि उणें, रमे परिस. ५३
वर्णावी[3] काय कसी? उपमा विश्रांत सुंदरी तिस ती,
भेटुनि दे असुरांतें सहसा[4] सुंदोपसुंदरीतिस[5] ती. ५४

---

## अध्याय तिसरा

भुलले असुर समग्रहि सहसा अवलोकितां सुरमणीतें,
नेणुनि मायास्वीकृतयोषावेषा तया सुरमणीतें.[6] १

---

१. प्रबळ दैत्यांस ( अबळ दैत्य म्हणति ). २. अन्वयार्थ– परिस निजसामर्थ्य उणें गणुनि ज्याच्या ( ज्या प्रभूच्या ) पादरजीं रमे. ३. अन्वयार्थः– (ती) सुंदरी कसी काय वर्णावी ? विश्रांत तिस उपमा ती (होती). ४. एकदम, तत्काल. ५. सुंद व उपसुंद या राक्षसांच्या पद्धतीप्रमाणें. तिलोत्तमा नांवाच्या एकाच अप्सरेच्या प्रातीकरितां सुंद व उपसुंद हे भाऊभाऊ भांडले व मरण पावले, अशी कथा आहे. ( आर्याभारत, आदिपर्व, अध्याय ३८ पहा ). ६. देवश्रेष्ठ विष्णूला.

ते पुसती, 'सुंदरि! तूं कोणाची कोण? काय आलीस
श्रीस[1] पहाया किंवा आम्हां निववावयासि आलीस? २
विधिनें निर्मुनि आम्हांप्रति पाठविलीस सुखविलासार्थ?
हा दैत्यदानवांचा त्वां भेटुनि फार सुखविला सार्थ.[2] ३
आतळले न सुरासुर, तुज, पूर्वीं पाहिलीसचि न कोणीं;
आहे[3] उमा हरांगीं कां? बैसुनि राहिली शचि न कोणीं? ४
तो धन्य तूं जयाच्या करिसील अशून्य[4] सुदति! शयनातें;
तुजसीं सुमुखि! असावें पावाया नित्य मुदतिशय[5] नातें. ५
अनुकूळ सर्व आम्हीं तुज झालों दैत्य सुर सकल, शाला[6]
शोभीव दीपिकासी, घे या हस्तांत सुरसकलशाला. ६
कश्यपदायाद सकल आम्हीं सुरसार्थ भांडतों; भेद,
खेद नव्हे तेंचि करीं, शब्द तुझा सुबहुमत जसा वेद. ७
हास्य करुनि बहु, रुचिरापांगांहीं[7] सुररिपूंसि पाहोनीं,
कपटस्त्रीवेष प्रभु बोले पळभरि उगाचि राहोनीं. ८
'कश्यपदायाद तुम्हीं कैसे मज पुंश्चलीस[8] अनुसरतां?
विश्वास कामिनीचा पंडित न धरिति कदापि तनु सरतां. ९

---

१. (आपल्या) मैत्रिणीस (श्रीस). २. समुदाय. ३. दैत्यांना वाटलें, ती पार्वतीच आली. परंतु ती शिवाच्या अर्धांगीं आहे का? तर आहे; आणि शची (इंद्राणी) लज्जेमुळें कोणीं (कोपऱ्यांत) बसून राहिलेली नाहीं ना? तर नाहीं. तेव्हां ही तिसरीच कोणी तरी दिव्य अंगना असावी. ४. पूर्ण (आपल्या सांनिध्यानें). ५. अत्यानंद. ६. गृह, मंदिर. ७. रुचिर+अपांगांहीं=सुंदर अशा नेत्रप्रांतांनीं. ८. वेश्या, असती, तिला.

नव नव हुडकिति शालावृक[१] आणि स्वैरिणी स्त्रिया लोला,
यांचें सख्य अशाश्वत, सुररिपु हो ! होय कीं नव्हे बोला ?' १०
ऐसें वदतां प्रभुच्या पाहुनि रुचिरप्रभावहास्यातें,[२]
मानुनि विनोद करिती ते असुर हृतप्रभाव हास्यातें. ११
प्रभुनें तृप्त स्वयशें त्या अमृतें साधुसुर-सभाजन हो,[३]
म्हणुनि भुलविले, पर ते देती विनवूनि सुरसभाजन[४] हो ! १२
सस्मित देव म्हणे, 'हो ! श्रवण करा, स्थिर रहा, सुरस हा, या
वांटिन साधु-असाधुहि[५], जरि मान्य असां महासुर सहाया.[६] १३
केलें मान्य मनांतुनि तें सर्व, म्हणोनियां 'तथास्तु' तिहीं,
पूजुनि जगत्प्रभुसि, अनुसरुनि सुखें बंदिजनपथा स्तुतिहीं. १४
स्नानस्वस्त्ययनद्विजपूजनहवनादि[७] सर्व जें उक्त,
करिति सुरासुर होउनि त्या अमृतप्राशनींच ते युक्त.[८] १५
शोभविति बसोनि अमृतपानार्थी असुर-सुर सकलशाला,
तेथें योषिद्रूप प्रभु ये घेऊनि सुरसकलशाला. १६
कुंभस्तनी मदालसमधुरगति महाविभूतिची आली,
मूर्तिमती ती मंजुल गीतिच[९] जाणों मृगव्रजीं आली. १७

---

१. कुत्रा, मांजर, लांडगा, हरिण, कोल्हा, वानर इ. पैकीं कोणीहि प्राणी. २. रुचिर + प्रभावह + आस्यातें = सुंदर कांतीला धारण करणाऱ्या मुखास. ३. होत्रो ( म्हणून ). ४. अमृताचें पात्र. ५. बऱ्यावाईट ( कशाहि ) रीतीनें. ६. मी जी मदत करणारी, त्या मला. ७. स्नान + स्वस्त्ययन + द्विजपूजन + हवन + आदि = स्नान, कल्याण प्राप्त करून देणारें असें पुण्याहवाचन, ब्राह्मणांचें पूजन, होम इत्यादि. ८. उद्युक्त. ९ **पंतां**नीं आपल्याहि गीतीची ( आर्येची ) ही स्तुतिच केली आहे, असें म्हणणें उचित नाहीं काय ?

न उरीं दे भान पदीं जें जें वाजे गतींत नूपुर तें,
मणिभूषणें प्रकटिती तेज दिशांतहि, न तीं तनूपुरतें. १८
लीलाविलोकनस्मितनर्मांहीं न भुलला न आढळला,
त्यांत पदर तद्धैर्याकरवीं म्हणवावयासि हा! ढळला. १९
परदेवता विमोही ते देव असुर समस्त, नावरुनीं[१]
जो काय पदर ढळला अमृतकनकघटसमस्तनावरुनीं.[२] २०
दीपोद्भासित[३] धूमामोदित[४] शालेंत नीट ती महिता,
परदेवता तयांच्या बहुमानें पंक्ति बैसवी सहिता. २१
सुर असुरांत बसविले, बहु असुर सुरांतही प्रताराया,[५]
ज्यां पंक्तिभेद[६] घडला या स्वयशें तेहि विप्र ताराया. २२
बहु मानें, प्रिय वचनें, निकटस्थासुर अतिक्रमुनि जाय,
दूरस्थ सुरांतें दे अमृत, लहानांसि पय जसें माय. २३
बा! मोटयांमोटयांला सुलभा स्वप्नींहि न वसुधापा[७] जी,
परदेवता स्वयें ती यापरि भक्तांसि नव सुधा पाजी. २४
म्हणती, स्ववंचन करुनि देखत देतां परां[८] सुरस, 'हा!' ते;
परि तत्प्रेमें साहति, बहुधा न कधीं असें सुर सहाते. २५

---

१. न+आवरुनीं=न आवरून (पदर). २. अमृताचा जो सुवर्णमय कलश (तिचे हातांत होता) त्याच्यासारख्या गोल व विशाल स्तनांवरून. ३. दिव्यांनीं लखलखित केलेल्या अशा. ४. धूप लावून सुवासित केलेल्या अशा. ५. ठकवावयास. ६. अन्वयार्थः– ज्यां पंक्तिभेद घडला, ते विप्रहि या स्वयशें ताराया, सुर असुरांत बसविले. ब्राह्मणांना ह्या अमृतप्राशनपंक्तीचा लाभ झाला नाहीं, म्हणून त्यांस ह्या कथारूप स्वयशानें तारण्यासाठीं, सुर व असुर यांची एकच पंगत केली. ७. पृथ्वीपतीस (किंवा दुसरा अर्थ- 'बा! वसुधापा!' हे पृथ्वीपते! परीक्षिते!). ८. शत्रूंना (देवांना).

स्वकृतसमयपरिपालन[1], तत्स्नेह, स्त्रीविवाद निंद्य जनीं,
स्वप्रणयहि बहु तीचा ठायीं त्याचीहि भंगभीति मनीं. २६
'कृपण[2] पिवूं द्या पूर्वी, धीर तुम्हीं, क्षण बसा उगेचि, सहा,'
बहुमान असा करि, जो बंधचि केवळ, तयां तुटेचि न हा. २७
यास्तव अप्रिय किमपि न वदले दितिदनुतनूज कामुक ते,
नसते अभक्त जरि, तरि अमृतरसप्राशनासि कां मुकते? २८
त्या मोहसमुद्रांतुनि तेव्हां बाहेर एक राहु निघे,
सुररूप स्वीकारुनि, अमृतातें, रविशशींत राहुनि, घे. २९
त्या चंद्रार्कींहीं तो खळ सूचवितांचि अजित चक्रातें,
प्रकट करुनि शिर खंडुनि पाडी तत्काळ कपटिशक्रातें.[3] ३०
प्रभुनें ग्रह[4] केला, परि वैर स्मरतो तरीच हा, डास
घ्याया धांवे, ग्रासी; इतरा[5] कैंची तरी चहाडास? ३१
कपटप्रशमार्थ[6] करी, नसतां बळहीन देव, सोंगातें;
जें[7] वांछित वंध्यत्वें दासीं पळही न दे वसों गा! तें. ३२
प्रकटी असी प्रभु कपटलीला प्रबळांसमक्ष महिता, तें
अमृत सुरां दे, करिता कोण इतर यासम क्षम हितातें? ३३

---

१. आपणच केलेल्या नियमाचें रक्षण. (याच अध्यायांतील गीति १३-१४ पहा). २. दीन असे देव. (ह्या आर्यार्धांत मोहिनीचें भाषण आहे). ३. कपटिलोकांच्या नायकातें. ४. आकाशांतील ग्रह. ५. इतरा चहाडास कैंची तरी? (तारणारी नाव). चंद्रसूर्यासारख्यांना चहाडी केल्यामुळें ग्रहण लागणें हें शासन मिळालें; मग इतरांचा काय पाड? हें तात्पर्य. ६. दुष्टांच्या नाशार्थ. ७. अन्वयार्थः- गा! (परीक्षिते!) दासीं जें वांच्छित तें पळही वंध्यत्वें न वसों दे. (फलद्रूप करतो).

केलें श्रितकार्य मग प्रकट न कां तो स्वमूर्ति[1] करिल हरी ?
जाणों ती[1] त्या करुणामृतनिधिची कामपूर्ति[2] करि लहरी. ३४
अमितदयामृतमेघें लक्ष्मीकांतें हरूनि परगर्व,
भक्तमयूर निववि्ले, सफळ मनोरथतरू करुनि सर्व. ३५

---

## (५) वामनचरित्र[3]

( गीतिवृत्त )

श्रीभृगुवंशज मुनि जे शुक्रादि महासमर्थ ते, ज्यातें
न तुळा, बळिला देती त्या करुनि महाभिषेक, तेजातें. १
देति शिखिज[4] रथ, जेणें विश्वजयसुकीर्तिसंपदा सांचे;
राहों देतील कसे सद्गुरु अरिभयजकंप दासांचे ? २
ज्याच्या रवें विरावे सर्वारि, असा सुशंख भार्गव दे,
आधीं सर्वत्र जयप्रद ऐसा धर्मनीतिमार्ग वदे. ३
प्रह्लादप्रभुनें त्या सर्वासुरवीरमेदिनीपाळा,[5]
विजयार्थ स्वगळांची दिधली अम्लानपंकजा[6] माळा. ४

---

१. स्वमूर्ति. २. मनोरथ पूर्ण करणारी ( लहरी ). ३. प्रह्लादाचा मुलगा विरोचन, त्याचा मुलगा वैरोचन किंवा वैरोचनि. यासच 'बलि' असें म्हणतात. यानें शुक्राचार्याच्या मदतीनें नर्मदेच्या तटीं शंभरावा यज्ञ सुरू केला. तेव्हां इंद्राला मोठें भय वाटलें. त्यानें भगवान् विष्णूची प्रार्थना केली. तत्काळ विष्णूनें वामन-अवतार धारण करून बळीस पाताळांत ढकलिलें. ही कथा या प्रकरणांत सांगितली आहे. ( देवी भागवत स्कं. ४, अ. १६ व श्रीमद्भागवत स्कं. ८, अ. १८ पहा ). ४. अग्नीपासून उत्पन्न झालेला. ५. सर्व असुरश्रेष्ठांचा राजा जो बलि त्यास. ६. न कोमेजणारीं कमळें असलेली ( माळा ).

गुरुभार्गवचरणातें वंदुनि घे पुष्कळा बळि वराशी[1],
प्रह्लाद म्हणे, ‘ स्वयशें शत्रुयशांच्या सुखें वळिव राशी.’ ५
स्वर्गा गेला घेउनि धूलिपटलपिहितसूर्यभा[2] सेना,
न्यून प्रलयांबुधिहुनि[3] तो[4] गर्जदनेकतूर्य[5] भासेना. ६
अमरावतीस सहसा तो जितलयवारिवाह[6] वेढी गा !
बळि शक्राला, जैसा वात घनाच्या, न साहवे, ढीगा. ७
हरि[7] गुरुसि म्हणे, ‘ मज तूं सुज्ञांच्या[8] गुह्य हें कळिव राया[8] !
बा ! पावला न तपतां तेजा सहसा कसा बळि वरा या ? ’ ८
सुरगुरु म्हणे, ‘ महेंद्रा ! भार्गव झाले प्रसन्न या बळिला,
तच्चरण यासि बहुमत, सौगंधिकपद्म ते जसे अळिला. ९
प्रभुवांचुनि[9] अमर तुम्हीं सर्वेहि जिंकावयासि अक्षम या
मायावि-वरा;[10] द्यूतीं इतरांचे जेंवि कपट-अक्ष[11] मया.[12] १०
सोडा स्वर्ग व्यसनीं स्वत्राण करा, कसें तरि लपा जा;
त्या आपण हरिचें यश, इतरांही, ताप हा[13] हरिल, पाजा. ११
बा ! त्यांचि[14] भार्गवांच्या[14] हा[15] अपमानेंचि दंड पावेल,
जन वृद्धिस रक्षीना त्यजुनि गुरुसि, जेंवि मंडपा वेल[16]. १२

---

१. वर + आशी = उत्तम आशीर्वाद. २. धूलीच्या पटलानें झांकली आहे सूर्याची कांति जिनें अशी ( सेना ). ३. प्रलयकाळच्या समुद्रापेक्षां. ४. बलिराजा. ५. गर्जत् + अनेक + तूर्य = गर्जना करीत आहेत अनेक वाद्यें ज्याचीं असा. ६. जिंकले आहेत ( वेढा घालण्याच्या कामांत ) प्रलयकालचे वारिवाह = मेघ ज्यानें असा. ७. इंद्र. ८. हे ज्ञात्यांच्या राजा ! ( बृहस्पते ! ). ९. विष्णूशिवाय. १०. मायावि + वरा = मायावी लोकांत श्रेष्ठ अशा बळीला. ११. कपटानें टाकलेले फांसे. १२. मयासुरास. १३. हरि, विष्णु. १४. त्यांचि भार्गवांच्या = त्या भार्गवांच्याच ( भृगुकुलोत्पन्न ऋषींच्याच ). १५. बळि. १६. अन्वयार्थः- जेंवि मंडपा त्यजुनि वेल वृद्धीस रक्षीना, ( तेंवि ) जन गुरुसि ( त्यजुनि वृद्धीस रक्षीना ).

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ........... दि: ..........

ते शिष्य[1] स्वगुरुमतें जाया तत्काळ कानना, कास
घालुनि, तैशा उग्र व्यसनीं, त्यजितील कां न नाकास[2] ? १३
शक्रादि कामरूप[3] त्रिदश सकळही परोपरि लपाले,
निज विभव तिहीं त्यजिलें, ते वृक्षाहीं जसे वरिल पाले. १४
सुरधानीस[4] अधिष्ठुनि बळि लोकत्रय करी सुखें वश हो !
शत अश्वमेध करविति भार्गव म्हणती, 'जगीं भलें यश हो.' १५
अदिति[5] तळमळे परिसुनि दितिसुतकृतपुत्रपुरविनाशाला,
धृति न निववि; अभगेछित[6] चिंतामणिचीहि पुरविना शाला. १६
तीस समाधिविरतपति भेटे येवूनि बहु दिसां गेहा,
'कां दीना' हें पुसतां अदिति तया तापहेतु सांगे हा. १७
कश्यप पयोव्रतें[7] जगदीशाराधन तिला कथी, विधिनें
जें आपणासि पूर्वीं होतें उपदेशिलें दयानिधिनें. १८
म्हणती 'श्रिताकडे नच दावाया वदन ताप यो' व्रतती,[8]
प्रभुभक्ति[9] काय मग ? करि होउनि हरिपदनता पयोव्रत ती. १९
भगवान् पयोव्रतांतीं दर्शन देवुनि म्हणे अदितिला हो !
'जीच्या कुळें तुज दिलें हें दुःख सुकृतसुधानदि ! तिला हो. २०
होतों त्वत्पुत्र; यशें या हरिल तुझाचि कुक्षि तिमिरास,
सोडील कोण सुक्षिति ? जडहि त्यजती न कुक्षिति-मिरास[10] ?' २१

---

१. बृहस्पतीचे शिष्य, देव. २. स्वर्गास. ३. इच्छेप्रमाणें रूप घेणारे. ४. अमरावतीस- **पंत**. ५. कश्यपाची बायको, देवांची आई. ६. अभगा + इच्छित किंवा अभग + इच्छित = दुर्दैवी व्यक्तीनें (स्त्रीनें किंवा पुरुषानें) इच्छिलेलें. (हतभाग्य- **पंत**). ७ दूध पिऊन राहून करण्याच्या व्रतानें. ८. कल्पलता- **पंत**. ९. हरिभक्ति मग काय सांगावी ? - **पंत**. १०. कु + क्षिति + मिरास = वाईट जमिनीची वतनदारी.

यापरि वदला अदितिप्रणतस्तुतपादपद्म वरदेश,
झाला गुप्त जयास क्षीरधिहुनि भक्तसद्म वर देश. २२
बुध हो ! सत्कीर्तिकथन हा[1] कवि करितो; रमा, निवा सतिच्या
सुयशा सेउनि; पोटा आला हरि तो रमानिवास तिच्या. २३
आला विष्णु अदितिच्या गर्भी हें कंजजा[2] बुधा समजे,
येउनि तेथें स्तवनीं विधि वर्णी मधुर गुण सुधासम जे. २४
भाद्रपदशुक्लपक्षीं मध्याह्नीं द्वादशीदिनीं श्रवणीं
प्रकटे प्रभु वर्षाया अमृत जनीं स्वपदपंकजप्रवणीं. २५
मेघश्याम चतुर्भुज शंखगदापद्मचक्रधर शांत
प्रकटे पीतांबर धृतकौस्तुभमणि रम्यमुख रमाकांत. २६
प्रभुच्या प्रादुर्भावीं झाल्या विमला दिशा, प्रजा मुदिता,
गोद्विजसुरग्रहगणीं सुखशोभा ज्ञानसंपदा उदिता. २७
गंधर्व अप्सरा निज गुण अर्पुनि आदरें करिति सेवा,
सुर वर्षति पुष्पांतें; स्तविती बहु सिद्ध, साध्य, मुनि, देवा. २८
मग मायेनें नटसा वामन बटु होय, देव सोंगातें
घेउनि दुःख सुदुःसह जें भक्तजनीं न दे वसों गा ! तें. २९
संस्कार करिति मग उपनयनान्त स्वगुरुचे पर महर्षी,
झाला कश्यपमुनिचि न, सर्वहि त्या उत्सवीं परम हर्षी. ३०
सावित्री[3] सविता दे, भिक्षा जगदंबिका उमा त्याला,
दे ब्रह्मसूत्र[4] सुरगुरु, दंड तया सोम अर्पिता झाला; ३१

---

१. मी मोरोपंत. २. कमलोत्पन्न ब्रह्मदेव, त्यास. ३ सूर्य आहे देवता ज्याची असा गायत्री-मंत्र. ४. जानवें.

दुहिण कमंडलु, कश्यप मौंजी, अजिन[1] स्वयें तया धात्री,[2]
वाणीहि अक्षमाळा,[3] सप्तर्षी कुश,[4] कुबेर दे पात्री.[5] ३२
मायामाणवक[6] प्रभु विधिवद्वटुविहित नित्य होम करी,
चित्तीं म्हणे, 'स्वमाया हे कवळाया बळीस हो! मकरी.' ३३
मग हरि जाय बळिकडे जेथें श्रीनर्मदानदी नांदे,
जी सहज पान घडतां स्वर्गीं बहु शर्मदान दीनां दे. ३४
पावे तीच्या उत्तरतीरीं भृगुकच्छसंज्ञक[7] क्षेत्रीं,
देहीं वाहे तेज, प्रभुभाळींच्या[8] जसें महानेत्रीं.[8] ३५
त्या क्षेत्रीं हयमेध त्रिभुवनपति बळि करी शतावा[9] हो!
ज्या वदले गुरु, 'पोपू दानें कवि, अळिकरीशता[10] वाहो.' ३६
कपटबटु यज्ञवाटानिकट प्रकटे प्रभेकरुनि अर्क,
कीं शुचि,[11] सनत्कुमार,[12] प्रेक्षक भार्गव असा करिति तर्क. ३७
मखमंडपांत येतां वामन, धाम[13] न मुनिव्रजीं राहे,
तेजें धर्षित[14] झाले; ग्रह कोण असा रवीस जो साहे? ३८

---

१. चर्म. २. पृथ्वी. ३. रुद्राक्षांची माळा. ४. दर्भ. ५. झारी. ६. मायेनें बटु झालेला. ७. भृगुकच्छ या नांवाच्या. (यास हल्लीं 'भडोच' म्हणतात). ८. महादेवाच्या कपाळावरच्या तृतीय नेत्रांत. ९. शंभरावा. १०. गजेंद्रता-**पंत** (करि+ईश+ता). अन्वयार्थः- ज्या (बळीला) गुरु वदले, '(हा) कवि (दक्षिणेच्या) दानें (आम्हांला) पोषू; (आणि) अळिकरीशता (अलींनीं-भ्रमरांनीं युक्त अशी गजेंद्रता) वाहो (धारण करो).' (हत्तीच्या गंडस्थळावरील मद चाखण्यासाठीं भ्रमरांचे समूह असतात त्याप्रमाणें या बळीच्या सभोंवतीं दक्षिणेसाठीं याचकांच्या पंक्ति नेहमीं वावरोत). ११. अग्नि-**पंत**. १२. ब्रह्मदेवाच्या चार मानसपुत्रांपैकीं एक. १३. तेज. १४. पराभूत, धडकी भरलेले.

भार्गव सशिष्य उठले, सभ्य जनहि, अग्निहि स्वकुंडांत,
देहांत सर्व सात्विकभाव, 'नमस्तेऽस्तु' वर्ण तुंडांत. ३९
करिती शिरें परम ऋजु होउनि सर्वहि समान[1] वाम[2] नतें,
पूरचि होय, लववि परमस्तक वेतससमान[3] वामन तें. ४०
स्वकरें आसन मांडुनि, बहु मानें नमुनि वैसउनि बटुतें
गुरुहुनि शतगुण पूजी बळि, मेळविता न अन्य जन पटु तें.[4] ४१
श्रीचरण प्रक्षाळुनि वाहे सकुटुंब मस्तकीं सलिला,
जें शंकरतापापह[5] तीर्थांचें तीर्थ ताप दे कलिला. ४२
कर जोडूनि बळि म्हणे, 'सर्वब्राह्मणशिरोमणे ! आर्या !
वद वदनें वा ! आहें मीं सिद्ध करावया तुझ्या कार्या. ४३
ब्रह्मर्षींचें साक्षात् तनुधर तप तूं असें मला गमतें,
शमतें पळपळ चापळ[6], मन माझें पाहतां तुला रमतें. ४४
हें कुळ पवित्र झालें, तृप्तीतें आजि पावले पितर,
श्रितरक्षणपटु हरिसा तूं, तुजसम बटु न देखिला इतर. ४५
झाला सफळ ऋतु हा, सुहुत[7] हुताशन, समस्तही एणें.[8]
येणें केलें मूर्तें नादें त्वां, चित्त म्यां[9] दिलें एणें.[9] ४६

---

१. स+मान=साभिमान -**पंत**. २. वक्र- **पंत**. ३. वेताप्रमाणें. अन्वयार्थः- सर्वहि परम ऋजु (सरळ) होउनि वाम (वांकडीं) शिरें समान नतें करिती. वामन पूरचि होय. तें परमस्तक (शत्रूंचीं शिरें- समुदायवाचक एकवचन) वेतससमान लववि. ४. तें (पूजन). अन्वयार्थः- अन्य पटु जन तें न मेळविता=इतर हुशार माणसाला तें काम करतां आलें नसतें. ५. (विष-प्राशनामुळें झालेला) शंकराच्या अंगाचा ताप घालविणारें. ६. चांचल्य, चंचलता. ७. चांगला हविर्भाग दिलेला (हुताशन=अग्नि). ८. ह्यानें (ह्या तुझ्या आगमनानें). ९. म्यां एणें=म्यां हरिणानें.

अर्थी तूं गोधन, गृह, कन्या, सुग्राम, सुगज, रथ, वाजी,
घे देतों, तीहि करिन सफळा इच्छा असेल अथवा जी.' ४७
बटु बोले, 'या वंशीं म्हणता निःसत्व याचका नाहीं,
ऐसा पुरुष परिसिला वृद्धांच्याहि न, न याच कानाहीं. ४८
होती कनकाक्षयशें[1] चकितें देवेशमानवेशमनें,
हरि[2] त्याहि प्रबळाच्या, निजबाहुबळा न मानवे, शमनें. ४९
बंधुवधक्रोधाकुळ शूलधर हिरण्यकशिपु बा ! राया !
अंतकसा वैकुंठीं गेला धांवोनि हरिस माराया. ५०
त्यासि बहिर्दृष्टि असें जाणुनि, मायाविराज[3] हरि सुकवी
त्या उग्रव्यसनातें शिरुनि तयाच्याचि अंतरीं चुकवी. ५१
प्रह्लादसुत विरोचन तव तात, परां, घनां जसा वायु,
द्विजवेषसुरातें दे जाणुनिही सर्व आपुलें आयु. ५२
तूंही सुकीर्तिभाजन हा जन आला म्हणोनि याचाया;
त्रिपदपरिमिता वसुधा दे आजि पदें गणूनि याच्या[4] या.[4] ५३
जगदीश्वरा ! वदान्या ! उचितार्थपरिग्रहांत अघ नाहीं,
कण तीनचार चातक पी, परि केला न तृप्त अघनाहीं.[5]' ५४

---

१. हिरण्याक्षाच्या यशानें. (हा हिरण्यकशिपूचा भाऊ). २. विष्णु. अन्वयार्थः- हरि त्याहि प्रबळाच्या (प्रबळ अशा हिरण्याक्षाच्याहि) शमनें (मरणानें) निजबाहुबळा न मानवे. (आपल्या बळाबद्दल विष्णूला फारसा अभिमान वाटला नाहीं). ३. मायावि+राज=मोठा मायावी विष्णु. ४. या याच्या=ह्या माझ्या (पदें=पावलानें) ५. मेघावांचून इतरांनीं. या आर्यार्धाचें **पंत**लिखित स्पष्टीकरण पुढीलप्रमाणें आहे: - घनाहींच तर्पिला स्वल्पजलपानेच्छु चातक; न अन्याहीं. तसा तुवांचि जगदीश्वरें वदान्यें हा त्रिपदभूकाम पूर्णकाम करावा.

भूप म्हणे, 'द्विजपुत्रा! वृद्धबहुमता मुखें वदसि वाणी;
वालिशमति वाळचि तूं; असदसिहि[1] वरिच दिसे सदसिवाणी.[2] ५५
सर्वत्र विचक्षण तूं स्वार्थी अविचक्षण, प्रकट कळतें.
अटकळतें[3] बोलें बा! नुमजे जें स्वहित शीळ[4] फटकळ तें. ५६
आराधिला तुवां हा लोकेश्वरमुख्य साधु वचनाहीं,
गुरुकविपुढें असा तो वाटे वदला सुबुद्धि कच नाहीं. ५७
द्वीपचि[5] देणारा प्रभु, म्हणसि तया त्रिपदमात्र दे वसुधा;
गंधचि मागसि त्याला जो पुष्कळ पाजणार देव सुधा.[6] ५८
माझा याचक व्हावा पूर्णाखिलकाम नित्य सुखवासी,
तत्सम न चातकहि, कीं न परा, परि तो घनासि सुख वासी. ५९
घे तूं पटो! बटो! मजपासुनि मागोनि भूमि वृत्तिकरी,[7]
बळि अर्थिवृत्ति चालवि वहु दानें[8] जेंवि मधुपवृत्ति करी.[9]' ६०
वामन म्हणे, 'प्रिय विषय जितुके या त्रिभुवनांत आहेत,
तेही अजितात्म्याचा पूर्ण कराया न शकति वा! हेत. ६१
जो त्रिपद महीलाभें संतुष्ट त्रिभुवनेश्वरा! नाहीं,
होइल न सनववर्षद्वीपेंही[10] पूर्णकाम तो कांहीं. ६२
सप्तद्वीपवरांच्या इच्छेनें सर्वदा तळमळेल,
तृष्णामळें, न पावुनि सुविवेक, विरक्तिचें जळ, मळेल. ६३

---

१. असत् + असिहि = वाईट तरवारसुद्धां. २. सद् + असि + वाणी = उत्तम तरवारीसारखी. ३. अटकळींत येतें; समजण्यांत येतें. ४. शील. ५. समुद्रवेष्टित भूमि. ६. सुधेचा सुवासमात्र जसा अमृत पाजणाराला मागावा, तसें त्रिपदभूमि मज द्वीपप्रदात्यास मागतोस. –**पंत**. ७ जींत आपला निर्वाह होईल अशी. ८. (१) धर्मार्थ देण्यानें; (२) (हत्ती आपल्या) मदानें. ९ हत्ती. १०. नऊ खंडांसहित अशा द्वीपानेंसुद्धां. (वर्ष=नवखंड पृथ्वीचा प्रत्येक भाग).

सप्तद्वीपवरेश्वर ऐकतसों पृथुगयादिही बा ! जे,
अर्थाहीं कामाहीं तृष्णान्तातें न पावले राजे. ६४
संतुष्ट पुरुष सहजें लाभेंचि सुखेंकरूनि वर्ततसे,
होतात असंतुष्टा प्राप्त सकळ लोक असुखगर्त[१] तसे. ६५
भवहेतु असंतोषचि, संतोषचि मुक्तिकारणें होतो,
हाचि अमृतरस, दुसरा यापरि फेडी न पारणें हो ! तो. ६६
जो संतुष्ट यदृच्छालाभें[२] ब्राह्मण सदैवही असतो
वाढे तत्तेज, असा बहुतेजस्कर नव्हे सुधारस तो. ६७
द्विजतेज असंतोषें शमतेंचि ज्वलन जेंवि तोयांत,
हाळाहळांत दुर्गुण जो जैसा काय तेंवि तो यांत[३] ? ६८
यास्तव पदत्रयचि बहु, लोभें बुधचित्त चळवळेना कीं,
हितशत्रु दिव्यहि विषय म्हणति स्वपरासि 'चळ[४] ' बळे ! नाकीं.[५] ६९
वित्त प्रयोजनाधिक जें तें संरक्षणें असुख रचितें,
किंबहुना जो लोभी जन त्याचे सर्वथा असु खरचितें.' ७०
स्मित करुनि बळि म्हणे तो, 'घ्यावें बापा ! बटो ! यथाकाम.'
भूदान द्यावया घे जळपात्र न ओळखोनि तें धाम.[६] ७१
विष्णुमतातें जाणुनि भूदानाज्ञा तया न भार्गव दे,
वारावया प्रवर्ते, निज शिष्यातें प्रवृत्तिमार्ग वदे :- ७२

---

१. दुःखरूप ( **–पंत** ) खळगे. २. सहजगत्या मिळालेल्या लाभानें. ३. यांत जो जैसा दुर्गुण तेंवि तो हाळाहळांत ( असतो ) काय ? ४. भ्रष्ट हो ! **–पंत.** ५. अन्वयार्थः– ( हे ) बळे ! दिव्यहि ( स्वर्गांतीलसुद्धां ) हितशत्रु विषय स्वपरासि ( आपल्यावर आसक्त असलेल्या विषयिजनास ) नाकीं (स्वर्गांत) म्हणति, ' चळ ' ( स्वर्गपदापासून भ्रष्ट हो ! ). ६. तेज–**पंत.**

'हा हरि अदितितनय वरिवरि वदतो गोड आर्यसा, धाया;
कपटें पटु बटु होउनि आला अरि देवकार्य साधाया. ७३
नेणसि तूं साधु, धरुनि आला हा डाव, याप्रति; ज्ञाती,
आम्हांहि व्यसनीं त्वां केली पाडावया प्रतिज्ञा ती. ७४
सर्वस्व हरुनि देइल शक्रास, न विप्रमाणवक[१] साच;
जपतो स्वकार्यसाधक हा कपटकवि, प्रमाण[२], बकसाच. ७५
म्हणतो पदत्रय परि व्यापिल हा विश्वकाय विश्वास,
हो सावधान कपटिप्रभुचा धरितोसि काय विश्वास? ७६
ज्ञानें मला समजलि स्पष्ट कपटबुद्धि विष्णुची गूढा,
सर्वस्व यासि देवुनि, मग कैसा वर्तसील रे मूढा!? ७७
या द्यावाभूमींतें[३] आक्रमिल स्पष्ट दों पदांनीं हा,
सर्वस्वहानिखेदें करुनि म्हणावें कुळें[४] न दानीं 'हा!' ७८
पदयुग भरेल, करिसिल मग काय तृतीय बटुपद भराया?
बहुधा तूं विटलासि स्वमनीं मानूनि कटु पदभरा[५] या.[५] ७९
होइल तुझें प्रतिज्ञावचन असुरसत्तमा! जरि मृषा तें,
नेइल अधर्म नरकीं, ने जेंवि बळें कृषीवळ वृषातें. ८०
असुरश्रेष्ठा! जेणें होतो संपूर्ण वृत्तिचा अंत,
ज्यांत विचार नसे त्या दानातें न प्रशंसिती संत. ८१
कीं वृत्तिमान् पुरुष जो त्यासि घडे दान यज्ञ तप[६] कर्म[६],
बुडतां वृत्ति बुडे जन, जोडावा व्याकुळें कसा धर्म? ८२

---

१. ब्राह्मणाचा मुलगा, बटु. २. सत्य (समज). ३. अंतरिक्ष व पृथ्वी, यांस. ४. (तुझ्या) कुळानें. ५. या राज्यपदभारास-**पंत**. ६ तपः चित्तै-काग्र्यं कर्म पूर्त-**पंत**.

धर्मार्थकामकीर्तिस्वजनार्थ विभागितां स्ववित्तातें
या लोकीं परलोकीं पुरुषाच्या हर्ष होय चित्तातें. ८३
राज्या ! विरोचनसुता ! प्रकट तुझें सत्यधर्मपद शील,
अनृत कसें बोलावें ? हें जरि तूं सत्यसंध वदशील, ८४
तरि परिस, विचार करुनि, हित-अहित मनांत वेदवाद पहा,
सत्यचि पुष्पफळ, अनृतमूळ असा होय देहपादप हा.[1] ८५
असतां दृढमूळ द्रुम साहुनि आघातही सुखें वांचे,
मग वरिचेवरि त्याच्या ठाईं फळपुष्पसंपदा सांचे. ८६
केवळ सत्यें रिक्तचि जन निंद्यचि केवळ्यानृतें होय,
कांहीं तें कांहीं तें हित धरितां, वृद्धनीतिची सोय.[2] ८७
अनृत वदावें राया ! निःशंकचि वृत्तिसंकटीं, नर्मीं,
गोविप्रपरित्राणीं, जेंवि विवाहीं, न दोष या कर्मीं.' ८८
बळि गुरुसि म्हणे, 'स्वामी ! कथिला त्वां धर्म या जना सत्य,
हृद्रोगशमविता तूं शिष्यांचा सुज्ञराज नासत्य.[3] ८९
प्रह्लादपुत्रसुत मीं, कितव[4] जन तसा, कसा नकारातें
विप्रासि ऐकवूं बा ! लज्जा जें दुःख दे न कारा तें. ९०

---

१. अन्वयार्थः- (ज्याचें) सत्यचि पुष्पफळ, असा हा अनृतमूळ देहपादप (देहरूपी वृक्ष) होय. याचें तात्पर्य असें कीं, मनुष्याच्या देहरूपी वृक्षाचें पुष्प व फळ हें सत्य आहे. परंतु तो वृक्ष कायम राहण्यास अनृताचें (खोट्याचें) मूळ लागतेंच. २. व्यवस्था. याचें क्रियापद 'होते' अध्याहृत. ३. अश्विनीकुमार (हे देवांचे वैद्य आहेत). ४. कपटी, लबाड.

त्यजिला सुपात्रलाभें देहाच्या तत्क्षणींच जो भानें,
'नाहीं' म्हणेल कैसा तो हा प्राह्लादि वृत्तिलोभानें[1] ? ९१
पूर्वीं भू वदली कीं, अतिदु:सह सर्वभार साहेन,
परि मीं स्पष्ट अनृतपरनरभर परमोग्र पळ न वाहेन. ९२
नरक, दरिद्रत्व, पदभ्रंश, मरण, असुखसिंधु हो; मीं तों
यांपासुनि भीत नसें, जैसा बहु विप्रवंचना भीतों. ९३
गुरुजी ! धनादि जें जें तें तें सर्वहि मृता जना सोडी,
सोडूं नये स्वयें कां ? बा ! त्याची सांग काय गा ! गोडी ? ९४
जरि याचितार्थ द्यावें, सुखरोमांचाढ्य आंत वरि काय
तत्काळ याचकाचा जें न करी दान तेंहि तरि काय[2] ? ९५
साधु करिति सर्वस्वें भूतांचें श्रेय, दे वपु दधीची[3],
नेतात साधुची बा ! याचक संपत्ति, मेघ उदधीची. ९६
गुरुजी ! कापुनि देतां निज मांसहि उबगला न शिबि[4] कांहीं,
सुख साधुरीतिहीं जें दिधलें श्रांतासि तें न शिबिकांहीं.[5] ९७
ज्या दैत्येंद्रांहीं हे भू भोगिलि मथुनि शत्रु करवाळें[6],
त्यांचे गिळिले लोकहि, भोगहि, गिळिलें न एक यश काळें. ९८

---

१. अन्वयार्थः– ( याचक म्हणून ह्या वामनरूपी ) सुपात्रलाभें जो ( मीं –बळि ) देहाच्या भानें तत्क्षणींच त्यजिला, तो हा प्राह्लादि 'नाहीं' ( हा शब्द ) वृत्तिलोभानें कैसा म्हणेल ? २. अन्वयार्थः- जरि याचितार्थ द्यावें, ( पण ) जें दान याचकाचा काय ( शरीर ) आंत वरि सुखरोमांचाढ्य तत्काळ न करी, तेंहि तरि काय ( उपयोगी ? ). ३. ह्या नांवाच्या ऋषीनें वृत्रासुराच्या वधाकरितां वज्र करण्यासाठीं आपल्या देहांतील हाडें इंद्रास दिलीं, अशी कथा आहे. ४. ह्या नांवाच्या राजानें कपोतपक्ष्याचे प्राण वांचविण्यासाठीं श्येनपक्ष्याला आपल्या देहांतील मांस भारंभार दिलें, अशी कथा आहे. ५. पालख्यांनीं. ६. तरवारीनें.

युद्धीं देह[1] त्यजिते अनिवर्ती[1] पुरुष जे सुलभ अजि ते,
अति दुर्लभ सत्पात्रीं श्रद्धेनें सर्वही धन त्यजिते. ९९
दुर्गति जशांतशांचे सर्वस्वें काम पुरवितां आली,
कल्याणसंपदा, ती साक्षाल्लीची खरीखुरी आली. १००
मग या तुम्हां अशांचा करितां परिपूर्ण काम, आंगातें.
आलें दैन्य यशस्कर कीं अयशस्कर ? तुम्हींच सांगा तें. १०१
यास्तव देतों बटुला भूमि पदत्रय तुम्हीं वदा ' दे ' हें,
किति काळ अनुभविल हा[2] शिष्य[2] अनित्यें चळा पदा देहें ? १०२
जें याचकपण बहु लघु आला घेवूनि पूर्णकामहि[3] तें,
देवूं नको तया मीं व्हाया सत्कीर्ति तूर्ण कां महितें ?[4] १०३
वेदविधानज्ञ[5] तुम्हीं ज्यातें यजितां सदान यज्ञाहीं,
तो वरद विष्णु सत्कृत सर्वस्वें जो सदा नयज्ञाहीं. १०४
हरि हो !, अरि हो ! यासि क्षिति देतों, म्हणुं नकोचि 'हाय !' मुने !
मत्कीर्तिनें धवळतां विश्व म्हणो, अर्क मात्र ' हा यमुने ! '[6] १०५
नसतां अपराध मला जरिहि अधर्मंकरूनि अरिभावें[7],
बहु बंधनादिकेंही गांजिल, साहीन तेंहि तरि भावें. १०६

---

१. अनिवर्ती देह=पुन्हा परत न फिरणारे देह. २. हा शिष्य=मी (तुमचा शिष्य) बळि. ३. ज्याचे मनोरथ पूर्ण झाले आहेत असा, विष्णु. ४. पृथ्वीला. ५. वेदांत सांगितलेलें जाणणारे. ६. अन्वयार्थः– मत्कीर्तिनें विश्व धवळतां, अर्क (सूर्य) मात्र 'हा! (हाय हाय!) यमुने!' (असें) म्हणो. यमुना ही काळी असून सूर्याची प्रियकन्या आहे. माझ्या कीर्तीनें सर्वंध विश्व शुभ्र होईल, तेव्हां यमुनेलाहि शुभ्रपणा येऊन ती दिसेनाशी झाली म्हणजे सूर्याला हाय हाय ! करावें लागेल, हें तात्पर्य. ७. शत्रुत्वाच्या भावनेनें.

भ्याला[1], ब्राह्मण झाला[1], त्याचा वध तों नव्हे उचित मातें.
कीं प्रह्लादयशातें लावावा डाग कां शुचितमातें ?' १०७
कोपे मुनि, कंटक हितबोधातिक्रम नको पटा कविला,[2]
स्नेहानें गुरुकरवीं शिष्यहितार्थचि न कोप टाकविला. १०८
'ऐश्वर्यच्युत हो' हा दे त्या शिष्यास शाप शुक्र मुनी,
पावेचि पाव्लकाज्ञेप्रति दंडोचित दशा पशु क्रमुनी.[3] १०९
दैवचि तें; नाहीं तरि गुरुनें तैशासि काय शापावें ?
परि त्याचें सत्व म्हणे त्यातें 'सन्नायका ! यशा पावें.' ११०
पहिलें सोडुनि[4], लावी त्रिजगद्‌गुरुशीं च बलि तदा नातें,
दे विधिनेंचि, न होउनि सत्यापासूनि चलित, दानातें. १११
विंध्यावळि बळिची स्त्री, सिद्धा श्रद्धा जसी तसी होती,
श्रीचरणांवरि कांचनघटजळ सर्वस्वसहचि ती ओती. ११२
सुरगण बळितें स्तविती, पुष्पांच्या सर्व वर्षती वर्षें,[5]
कीं जाणोनिहि रिपुला विपुला संपत्ति अर्पिली हर्षें. ११३
त्या समयीं देवाहीं वर दुंदुभि शतसहस्र वाजविले,
लाजविले घन सागर, बहुतूर्यरवें[6] दिगंत गाजविले. ११४
वाढे वामन सहसा, कोंदे विश्वांत तनु असा फुगला,
झाला सल्लाभोत्सव ज्याला, राहेल तो कसा उगला ?[7] ११५

---

१. यांचा कर्ता 'विष्णु' अध्याहृत. २. अन्वयार्थः- हितबोधातिक्रम (हितकर अशा उपदेशाचें उल्लंघन हाच) कंटक कविला पटा (ज्ञाता पुरुष हाच पट = वस्त्र त्यास) नको (म्हणून) मुनि (शुक्राचार्य) कोपे. ३. उल्लंघून. ४. न गणुनि इति पाठः- **पंत**. ५. वर्षावानें. ६. पुष्कळ वाजंत्र्यांच्या नादानें. ७. उगीच.


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमत
काव्य
3329 चि

जाणों, म्हणे बळी, 'द्या सर्वस्व, महत्व आयकों, दावा;'
यास्तव दावी, नाहींतरि कां विश्वांत काय कोंदावा ? ११६

यद्विरहें[1] श्रीकरतळ[2], जळविरहें जेंवि याद, तळमळतें,
तत्कुचकुंकुमपंकें[3] जें विमळ सुरम्य पादतळ मळतें; ११७

सर्व महीतें व्यापुनि अधिक उरे एक अन्य पदकमळ,
सकळ उपरिभागाचा[4] क्षाळी सद्धृदयधन्यपदक[5] मळ. ११८

बळि भक्त धन्य केला, मग जाणों द्रुहिणपुत्र[6] आठविला,
श्रीचरण[7] सत्यलोकाप्रति तद्भाग्योदयार्थ पाठविला. ११९

नमुनि समुनिजन सात्विकभावाकुळ देव सत्यपति तातें
पाठविलें पद पूजी, जें सुपदप्रदचि[8] सत्य पतितातें. १२०

निःशेषही पितामह सेविल आपणचि तीर्थ तो कां तें ?
लोकांतें दे, द्यावा गुरुनें दुर्लभ पदार्थ तोकांतें. १२१

होय त्रिविक्रम[9] पुन्हां वामन तो विश्वविरचिना त्वष्टा,[10]
बळिस अहंकृतिहरणा लावी तिसऱ्या पदाचिया कष्टा.[11] १२२

---

१. ज्या पादतलाच्या वियोगानें. २. लक्ष्मीचा तळहात. ३. त्या लक्ष्मीच्या स्तनांवरील केशराच्या लेपानें. लक्ष्मी आपल्या नाजुक हातांऐवजीं मृदुस्तनांनीं विष्णूचें पादसंवाहन करीत असतां त्याच्या पायांना तिच्या स्तनांवरील केशराची उटी लागते व ते मळतात, असें कवीचें म्हणणें आहे. ( पहा– श्लोककेकावलि २४ ) ( गीति ११७–११८ यांचें युग्म आहे ). ४. अंतरिक्षाचा. ५. साधूंच्या हृदयाचें उत्तम भूषणच केवळ असें ( पदकमळ ). ६. ब्रह्मदेव हा आपला पुत्र. ७. विष्णूचा पाय. ८. मोक्षपद देणारें. ९. तीन लोकांचें विक्रमण ( आक्रमण ) करणारा म्हणजे त्यांना व्यापणारा. १०. प्रजापति. ११. दुःखाला. विष्णूला तिसरें पाऊल द्यावयाच्या काळजीनें बलि दुःखी झाला.

प्रभुवरि उठले बळिचें अरि वधुनि करावयासि असुर हित,[1]
ते विष्णुपार्षदांनीं[2] केले किति गर्वरहित असुरहित. १२३
बळिनें निवारिले मग गेले तेथुनि कितेक विवरांत,
प्रह्लाद बळिच बहुमत, असुरांत वसुनिहि, ते कविवरांत. १२४

भगवान् बळिस म्हणे, ' जा नरकीं, कीं दे भरूनि पद तिसरें.
काय जलधि ऐसें घनकाळीं तुछें उतोनि वदति सरें[3] ?' १२५
गरुड वरुणपाशांनीं,[4] प्रभुमत समजोनि, बळिस करकावी,
केव्हां ज्वाळाहि विती, जो परमोदार जलद करका[5] वी. १२६

बळिबंधन अवलोकुनि वदलें सुरवृंद सर्व ' हा ! हा ! ' तें,
बाळमळ जसी माता, हरि हरितो दासगर्व हा हातें. १२७
प्रभुसि बळि म्हणे, ' पुण्यश्लोका ! मीं तों स्वयें मृषा कांहीं,
वंचन तुझें करावें या भावेंकरुनि बोलिलों नाहीं. १२८

स्वविचारें मानिसि जरि मिथ्या सत्यासि तूं पर स्वामी,
करितों सत्य; न वारिन व्हाया अपकीर्ति कां परस्वा[6] मीं ? १२९
पदयुग भरे धनें, मग धनपति ? तदधिक न काय[7] बा ! पद या
दासशिरीं ठेव कसें ! न करिति तूं तेंवि मायबाप दया. १३०

---

१. अन्वयः – अरि ( विष्णु ) वधुनि बळिचें हित करावयासि असुर प्रभुवरि उठले. २. विष्णूच्या सेवकांनीं. ३. अन्वयार्थः– घनकाळीं उतोनि तुच्छें सरें ( आपण ) जलधि ( आहों ) ऐसें वदति काय ? पावसाळ्यांतील पाण्यानें फुगलेलीं क्षुद्र तळीं स्वतःला समुद्र म्हणवून घेतील काय ? बळीनें भलताच गर्व मनांत धरूं नये, असें भगवान् त्याला सुचवीत आहे. ४. वरुणाच्या पाशांनीं ( बंधनाच्या दोऱ्यांनीं ). ५. गारांना. ६. ऋणाला. ( त्रिपादभूमि दान देणें हेंच ऋण, त्याला ). ७. ( माझें ) शरीर.

नरकादिकांस नाहीं भीत जसा मीं असाधुवादास,
धुतला भला मलिन हा, प्रभुजी ! इतरहि असा धुवा दास. १३१
मीं बहु दुर्गुणचि, सुगुण एक प्रह्लाद, पौत्र हा मात्र,
नसतों भक्तकुलज तरि नच होतों या अनुग्रहा पात्र.' १३२
तों ये प्रह्लादप्रभु, त्यासि करी बद्ध बळि शिरें नमनें.
जाणों, म्हणे कदा तो गुरुपदपद्मांत अळि शिरेन मनें.[1] १३३
सहसा अश्रुभराहीं तो व्याकुळ होय सुकवि पुलकाहीं,[2]
पावे, नमुनि मुनिधनश्रीमत्पदपद्म, सुख विपुल कांहीं. १३४
प्रभुला प्रह्लाद म्हणे, 'दिधलें होतें तुवांचि पद यातें,
हरिलेंहि तुझेंचि तुवां, केवळ कारुण्य होय सदया ! तें. १३५
भुलवी ज्ञात्यांतेंही राज्यश्री स्पष्ट होय हाला हो;
प्रभुजी ! आतां बळि अळि या पदपद्मासवासि[3] हा लाहो.' १३६
विंध्यावळि[4] विनवाया ये, विधि विनवावयासि जों पाहे,
तीच्या बहुमानार्थ क्षणभरि चतुरास्य तो उगा राहे. १३७
राज्ञी बोले, 'प्रभुजी ! तुमचेंचि तुम्हांसि काय अर्पावें ?
कैसें जी ! जलदानें जलदानें सागरासि तर्पावें ? १३८
विश्वाचे उत्पादक परिपालक हेचि चरण संहरिते,
पडती[5], स्वामी आपण म्हणुनि करुनि दुरभिमान अंह, रिते.' १३९

---

१. अन्वयार्थः- जाणों तो ( बळि ) अळि ( भ्रमर ) गुरुपदपद्मांत ( आजाच्या- प्रह्लादाच्या चरणकमलाचे ठिकाणीं ) मनें कदा शिरेन ( असें ) म्हणे. २. रोमांचांनीं. ३. चरणकमलांतील आसव ( =मधु=मद्य ) त्याला. ४. बळीची बायको. ५. अन्वयार्थः- दुरभिमान ( धारण करणारे लोक ) आपण स्वामी म्हणुनि अंह ( पाप ) करुनि रिते पडती. ( विश्वाचा उत्पादक, परिपालक व संहारक तूं असतां दुरभिमानी लोक आम्हीच त्याचे धनी आहोंत असें म्हणण्याचें पापकर्म करून फसतात- लटके पडतात ).

ब्रह्मा म्हणे, ' प्रभो ! तूं या आतां सोड सत्यसंधातें,
हरिलें सर्वस्व कपट करुनि मग नव्हेचि योग्य बंधातें. १४०
स्वात्मार्पण केलें कीं श्रीचरणीं या स्वधर्मसत्वरतें,
प्रभुनें दावावें जें दीनजनीं वत्सळत्व सत्वर तें. १४१
अशठमति पुरुष या श्रीचरणीं वाहोनि भक्तिनें तोय,
दूर्वांकुरींहि पूजा करुनि सुखें पात्र सुगतिला होय. १४२
मग जो अविकळबुद्धि[1] त्रिभुवनसख्य कीं स्वदेहही वाहे,
हा हे बंधनपीडा पावे कैशी ? अयुक्त हें आहे.' १४३
भगवान् म्हणे, ' विधात्या ! माझ्या स्तुति करिति साधुरीतीची
आइक; ' सुधा सुधा ' जन म्हणती परि काय माधुरी तीची ? १४४
करितों अनुग्रह मनांतूनि जयावरि दयाभ्र मीं हरि, तों,
त्याच्या सर्वार्थातें, न पडों द्याया तया भ्रमीं, हरितों. १४५
अर्थांहीं मद होतां होय पुरुष बहु अनम्र बा ! धात्या !
अवमानितो जनातें मातेंही, ती पिशाचबाधा त्या. १४६
बहु पुरुषजन्म दुर्लभ, तेथें अत्यंत सर्वहानिकर,
पापांचा शापांचा तापांचा होय गर्व हा निकर. १४७
ऐशा गर्वाचा क्षय माझ्याचि अनुग्रहें अगा ! धात्या !
मदनुग्रहेंचि तरले यासि जसे सेतुनें अगाधा[2] त्या. १४८
आतां गतमद मत्पर झाला हा सविनया[3] विधे ! यातें,[3]
देइन जें बहु दुर्लभ हर्षें हासविन या विधेयातें.[4] १४९

---

१. निर्दोष आहे बुद्धि ज्याची असा ( बळि ). २. खोल, गंभीर अशा सागरास. ३. सविनया यातें = नम्रतेनें युक्त अशा याला. ४. विनयग्राही– **पंत.** विनय धारण करणाऱ्या बळीला.

अत्यद्भुत छळें या दुसरा जन कोण सत्य न त्यजिता ?
यानें शुचिसत्वबळें हारविलें मज अशाहि अत्यजिता.[१] १५०
हा बळि सत्वें समधिक या प्रह्लादा – पितामहापरिस,
कीं उतरला बहु कसा, म्हणसि कसा ? तरि पितामहा ! परिस. १५१
प्रह्लादाला होता गुरुचा माझाहि आश्रय पहा, या,
बळिला एकहि नव्हता मत्कृत अत्यद्भुत छळ सहाया. १५२
भलत्या सरोवरा बहु हंस त्यागुनि न मानसा वर्णी.
इंद्र करिन या, होतां मनु वैवस्वतसमान सावर्णी.[२] ’ १५३
प्रभुवर बळिस स्वमुखें प्रथम ‘ महाराज ! इंद्रसेन ! ’ असें,
संबोधन करुनि वदे करुणेच्या प्रीतिच्या द्रवोनि रसें. १५४
‘ येथुनि जाउनि हो तूं माझ्या आज्ञेकरूनि सुतलेश,[३]
सद्भक्ताहुनि अधिक प्रेमास्पद मज गमे न सुत लेश. १५५
प्रह्लादज्ञातींसह तूं सुतळा वसिव जा सुरमणीया,
रमविल तुज वसति जशी म्हणणारी कामुका सुरमणी ‘या.’ १५६
तेथें तुझा पराभव शकतिल न करावयासि लोकेश,[४]
सिंहाच्या नाकींचा जो पीडिल कोण सत्व तो केश ?[५] १५७
जे दैत्य लंघितिल तव शासन[६] त्यांतें वधील मम चक्र;
शक्र किति; काळहि न तुज निरखिल लोचन करूनि लव वक्र. १५८

---

१. अति + अजिता = कधींहि न जिंकलेल्याला ( मला ). २. वैवस्वत मनूसारखा सावर्णी मनु होईल तेव्हां. ( सावर्णी मनु हा चौदा मनूंपैकीं आठवा असून वैवस्वत मनूच्या पाठीमागून होणारा आहे ). ३. सुतल + ईश = सुतल पाताळाचा राजा. सप्तपाताळांचीं नांवें पुढीलप्रमाणें:– अतल, वितल, सुतल, महातल, रसातल, पाताल व तलातल. ४. लोकपाल ( इंद्रादि ). ५. सिंहाच्या नाकींचा जो केश तो कोण सत्व ( प्राणी ) पीडिल ? ६. आज्ञा, हुकूम.

निश्चिंत रहा सुतळीं रक्षीन सदा तुला सपरिवारा,
माता आपण मागे लागोंचि न दे मुलास परि वारा. १५९
असतांहि असुरसंगति धरिल विवेका मलापहा[1] शील,
कीं वीरा ! तूं सुतळीं सन्निहित[2] सदा मला पहाशील.' १६०
या सुवरें प्रल्हादप्रभुचा तो पौत्र महिवरेश तदा,
बद्धांजळि होय बहु प्रेमभरेंकरुनि गहिवरे शतदा. १६१
'परमेश्वरा ! तुज दिलें म्यां त्रिभुवन ? काय गोष्टि हे ? राहो,[3]
ज्याणें न पाहिले हे श्रीचरण, भ्रांति त्याचि येरा हो. १६२
या हस्तमस्तकांहीं तादृक्सद्भक्तिभाग्यहीनाहीं,[4]
प्रभुच्या श्रीचरणांला केला सम्यक्प्रणामही नाहीं. १६३
केवळ तदर्थ उद्यम, तोही न जपोनि साजरा केला,
तेणेंचि[5] स्वशुचियशें बहु दिधली आज लाज राकेला.[6] १६४
कीं साधिला अनुग्रह जेणें न पडेचि जीव शोकांत,
जो दुर्लभ यज्ञतपोदानांच्या कोटिनींहि लोकांत. १६५
अत्याश्चर्यंकर तुझा काय प्रणतिप्रभाव वर्णवतो ?
परम अगाध अपारचि वंदनमहिमा; असा न अर्णव तो. १६६
जो नीच असुर राजस त्यावरि ऐसा अनुग्रह; रित्यातें
पूर्ण करिसि घनसा, परि लाजविसी तूं अनुग्र हरि त्यातें.[7]' १६७

---

१ पापाचा नाश करणाऱ्या ( विवेकाला ). २. जवळ असणारा, निकटवर्ती. ३. एका बाजूला असूं द्या. कारण कीं, तिला फारसें महत्त्व देण्यांत अर्थ नाहीं. ४ म्हणण्यासारखी सद्भक्ति व भाग्य यांनीं हीन अशा ( हस्तमस्तकांहीं ). ५. त्या विष्णूनें आपण होऊनच. ६. पौर्णिमेला. ( पौर्णिमेच्या चांदण्यापेक्षां विष्णूचें यश अधिक शुभ्र, हें तात्पर्य ). ७. मेघाला. घनातें अतिवृष्टिविद्युदादिकें उग्रत्व-**पंत.**

ऐसें वदोनि बंधनमुक्त बळि प्रभुसि, विधिसि, रुद्रासी
वंदुनि सुतळीं शिरला पावुनि भगवत्प्रसादमुद्रासी.[1] १६८

पौत्र प्रसाद पावुनि सुटतां, प्रह्लाद तो वदे हरितें,
'प्रभुजी ! अपराधाहीं ज्यांचें तिळमात्रही न देह रितें; १६९

ज्या दुष्टांचें जन्म स्पष्ट जनीं 'हाय ! हाय !' वदवीतें,
ते हे खळ पावविले कैसे दाक्षिण्यदृष्टिपदवीतें ?[2] १७०

ब्रह्मादिकांसही बहु दुर्लभ कीं हा अनुग्रह; रहातें[3]
यश, जें शिरीं चढे त्या तारी होउनि अनुग्र हर हा[4] तें.' १७१

प्रभु त्यासि[5] म्हणे, 'वत्सा ! बळिसह सुतळीं रहा महाशील,
तूं मज गदाधरातें पौत्रद्वारीं सदा पहाशील. १७२

सज्ञाति सपौत्र सुखें वत्सा ! सुतलालयास जा, यजन
माझें करिसील सुचिर; वा ! न, न उतला[6] लयास जाय जन.' १७३

ऐसी आज्ञा होतां प्रभुतें नमुनि प्रदक्षिणा करुनीं,
प्रह्लादप्रभु गेला श्रीहरिपदपद्मरज शिरीं धरुनीं. १७४

भगवान् शुक्रासि म्हणे, 'भृगुसंततिदीपका ! तुवां तूर्ण
जें राहिलें करावें शिष्याचें यज्ञकर्म तें पूर्ण. १७५

यज्ञादि कर्म कांहीं थोडें कीं फार जें उणें होतें,
गुरुंनीं विलोकितां परिपूर्णत्वा पावतें गुणें हो ! तें.' १७६

---

१. भगवत्प्रसाद + मुद् + रासि (राशि) = भगवत्प्रसादजन्य आनंदाच्या राशि. २. सौजन्य आणि औदार्य यांनीं युक्त अशा आपल्या दृष्टीच्या मार्गाला. (गीतिक्रमांक १६९ व १७० यांचें युग्म आहे). ३. मागें रहातें अथवा अयोग्यासही तारिलें म्हणोन कविमुखीं वसतें - **पंत**. ४. (हा + तें = ) हातें, स्वहस्तें असेंही - **पंत**. ५. प्रह्लादास. ६. जो न उतला तो लयास न जाय - **पंत**.

शुक्र म्हणे, 'विश्वगुरो ! हें कर्म त्रिभुवनांत शोभावें,
यज्ञामें सांग[1] सकळ, सर्वस्वें पूजिलासि तो भावें. १७७

या यज्ञयशःश्रवणीं कविमनचि न, सर्व विश्व लोभावें;
यज्ञपुरुष जो साक्षात् सर्वस्वें पूजिलासि तो भावें. १७८

सांग[1] सुसंपूर्णचि हें कर्म, तथापि प्रभो ! तुझी आज्ञा
करितों मीं, कीं परम श्रेय तव निदेशपाळन प्राज्ञा.[2]' १७९

ऐसें वदोनि शुक्रें जें कांहीं कर्म राहिलें होतें,
संपादूनि यथाविधि विधिजनकपदींच वाहिलें हो ! तें. १८०

वामन याचक होउनि मागुनि बळिजवळि दे पद भ्रात्या,[3]
यापरि हरि करि कौतुक, गाती सत्कवि यशा अदभ्रा[4] त्या. १८१

व्हाया सदार कश्यप, लोकपतिहि,[5] लोकही, परम हर्षी
देवर्षि नारदादिक, राजर्षि, तसेचि जे पर महर्षी,[6] १८२

ब्रह्मा त्रिभुवनपतिला प्रार्थुनि करि लोकलोकपालपती,[7]
रविस जसे ग्रह पाहुनि, लोकप त्या साधुलोकपा लपती. १८३

प्रभुला घेउनि गेले वाहुनि विध्यादि ते सुर विमानीं.
कविजन बहु प्रहृष्टा विश्वा सारस,[8] तया[9] सुरवि[10] मानी. १८४

ब्रह्मा देवांसि म्हणे, 'सर्व तुम्हीं अरिस सुर भियाना[11] कीं ?
अधिका न सुधा, नच ती प्रभुसेवेपरिस सुरभि या नाकीं.' १८५

---

१. स + अंग = सह + अंग = संपूर्ण, अंगोपांगांसहित. २. सुज्ञा जनास – **पंत.** ३. भावाला, इंद्राला. ४. पुष्कळ. ५. अष्टदिक्पाल. ६. ( गीति-क्रमांक १८२–१८३ यांचें युग्म आहे ). ७. लोक आणि लोकपाल यांचा पति. ८. कमल. ९ वामनाला. १०. तेजस्वी सूर्य. ११. भियाना कीं ? = भीत नाहीं ना ? आतां तुम्हांला शत्रूची कसली भीति राहिली नाहीं ना ?

स्वस्थाना गेले ब्रह्मादि पुसोनि भक्तवशगा[1] ते.
अमृतासि न बहु मानिति, वामनविभुचें विशुद्ध यश गाते.[2] १८६
श्रीवैकुंठीं, स्वर्गीं त्या श्रीबळिच्याहि अनळस द्वारीं,
अद्यापि तसाचि असे दुरितांचा मूर्त अनळ, सद्वारीं.[3] १८७
छळहि करुनि उतरी जो माथां बहुकल्प भर वसायाचा,
प्रभुशील हें परिसुनिहि, नच धरिती अल्प[4] भरवसा याचा. १८८
प्रह्लादवंशजीं छळ करि कल्याणार्थ कनकपट[5] तो कीं,
करितो अहित पदार्थ त्यजवाया, स्पष्ट, जन कपट तोकीं. १८९
एवंच वंचक नव्हे, करि बहु कारुण्य, न छल, हरी तें,
प्रभुदृक् दासां पद दे, न सुधोदधिच्याहि अछ लहरी तें. १९०
दे प्रभुसि, कवींच्या सुख व्हाया बहु मानसां, बळी काय.[6]
सांगा देवावांचुनि पावे, बहुमान सांबळी[7] काय ? १९१
शुद्धा कीर्तिदुशाला[8] पावे, न कुकीर्तिकांबळीला जो,
ज्याचा श्रीश द्वारप तो मग सुतळांत कां बळी लाजो ? १९२
राज्यपदीं, स्वर्गपदीं, सत्यपदीं किति वृथा बसुनि फुगती !
मुक्तीहूनि शतगुणें बळिराज्याची अधोगतिहि[9] सुगती. १९३
बळिचें सत्व अतुळ कीं, दानीं घाली जरी सुकवि[10] मोडा,
दे शाप. दवचि[11] तो, परि न तदुत्साहाचिया सुकवि मोडा.[12] १९४

---

१. भक्ताधीन जो वामन त्याला. २. गाणारे. ३. ( सत् (सद्) + वारीं =) साधूंच्या समुदायांत — **पंत**. ४. कमी समजुतीचे लोक. ५. सोन्याच्या वर्णाचा पट धारण करणारा; पीतांबरधारी विष्णु. ६. तनु. देवाच्या कारणीं लाविली तरीच तनु सफळा — **पंत**. ७. देव ठेवण्याची संबळी ( पेटी ). ८. कीर्तिरूपी शालजोडी. ९. पाताळांत जाणें. १०. शुक्राचार्य. ११. वणवाच. १२. अन्वयार्थः— परि तदुत्साहाचिया ( त्या बळीच्या उत्साहाच्या ) मोडा ( अंकुरास ) न सुकवि ( वाळवी, शुष्क करी ).

सुयशांच्या[1] गुरुशापछळ दे दुर्वासयापरि[2], चयातें,[1]
श्रम[3] वरुनि शशिकळेसीं पावति दुर्वा सया परिचयातें.[4] १९५

सोडी पळहि न भगवान्, संरक्षायासि बळिस, दारा हो,
ज्याच्या पदीं मुनि म्हणति मन, कमळीं जेंवि अळि, सदा राहो. १९६

बळि निधिच, तया रक्षी जाणों यक्षचि[5] सदा गदापाणी,[6]
सद्भक्तद्वार प्रभु, मीन जसा सोडिना कदा पाणी. १९७

आपण होय घन प्रभु, निजभक्तिगुणें करी बळिस मोर,
काळव्याळ[7] पळे; यश-गात्याच्याही न ये कळि समोर. १९८

म्हणतां तुम्हींच[8] हरिचें हरिहूनि उणें वदों नका यश तें,
तेथें या आर्यांचीं बुध हो ! पुरतील दोन[9] काय शतें[9] ? १९९

---

१. ( सुयशांच्या चयातें = ) यशांच्या राशीतें–**पंत**. २. दुर्वासाप्रमाणें. ३. छेददवदाहादि - **पंत** ( तोडून घेणें व यज्ञादिकांत आहुति होणें इ. ). ४. अन्वयार्थः-( स्वतःला तोडून घेण्याचे, थंडीताप सोसण्याचे इ. ) श्रम वरुनि दुर्वा ( गणपतीच्या डोक्यावरील दूर्वा ) ( त्याच्या = भालचंद्राच्या ) शशिकळेशीं सया ( सख्या म्हणून ) परिचयातें पावति ( सहवास मिळवितात ). त्याप्रमाणें बळीला कांहीं श्रम सोसावे लागले तरी अखेरीस भगवत्कृपा होऊन त्याला 'सुतला' चें राज्य मिळालें व तो विष्णूचें सांनिध्यहि पावला. ५. कुबेराचा सेवक. ६. विष्णु. दुसरा अर्थ– गदा हातांत घेतलेला द्वारपाळ. ७. मृत्युरूपी सर्प. ( मोरपक्षी सर्पांना खाऊन टाकतो, असें म्हणतात. ) ८. तुम्हींच बुध हो ! ९. दोनशें. ( **पंतांनीं** मूळ पोथींत ४१ व्या गीतीनंतर एकदम ४३ वी गीति लिहिली आहे. म्हणून शेवटीं २०० गीतींची संख्या भरली. वास्तविक या प्रकरणांत १९९ गीति आहेत ).

33492

## (६) भक्तभूषण[1]

( वृत्त-स्रग्धरा )

अत्युग्र ब्रह्मशापादिकहि हरिजनां ताप नेदीच कांहीं,
जो कोणी देवदासछळक खळ तया रक्षिता अन्य नाहीं,
रक्षी साधूंचि, येतां शरण, निपटुनि त्यागितां उद्धतत्व,
ज्ञाते हें अंबरीषक्षितिपतिचरितीं पाहती शुद्ध तत्व. १

( वृत्त-शार्दूलविक्रीडित )

हाणी लात उरीं भृगु[2] द्विज तसा अन्याय तो पाहिला,
निर्दोषें जगदीश्वरें गुरुवरें विश्वंभरें साहिला.
साहेना परि सज्जनछळ, जरि ब्रह्मण्य देव क्षमी,
त्याचें गायिन सद्यश त्यजुनियां कार्यांतरें लक्ष मी. २

दुर्वासा[3] भगवान् करि छळ बळें, हें तत्व दावी जनीं
कीं माझीहि असी दशा हरिजनद्वेषें, धरा हें मनीं.

---

१. भक्तांतील भूषणभूत अशा अंबरीष राजाचें चरित्र यांत वर्णिलें आहे. यांतील पहिले तीन श्लोक प्रस्तावनात्मक असून त्यांत भगवद्भक्तांची थोरवी गाइली आहे. २. ब्रह्मा, विष्णु, महेश या त्रिमूर्तींपैकीं कोणाजवळ आत्यंतिक असा क्षमागुण आहे हें परीक्षण्यासाठीं भृगुनामक ऋषीनें विष्णूच्या वक्षः-स्थळावर लत्ताप्रहार केला, तरीहि विष्णूनें त्याला क्षमाच केली अशी कथा भविष्यपुराणांत वर्णिली आहे. **पंतांनीं** याच विषयावर 'भृगुचरित्र' नामक आख्यान स्वतंत्रपणें रचिलें आहे. तें याच पुस्तकांत पुढें दिलें आहे. ३. अत्रिमुनि व अनसूया यांचा पुत्र. हा अत्यंत कोपिष्ठ म्हणून प्रसिद्ध आहे. मूळशब्द– 'दुर्वासस्' प्रथमेचें एकवचन 'दुर्वासाः' **पंतांनीं** विसर्गाचा लोप करून 'दुर्वासा' असेंच प्रथमेचें एकवचन वापरलें आहे. जसें–चंद्रमस् = चंद्रमाः ( मराठीरूप चंद्रमा ).

दैवें भागवतीं विरोध घडतां त्याचीं धरा पावलें,
  संसारांत तरा, म्हणाल मजला खोटा म्हणा, पावलें. ३

---

पूर्वीं भूपति अंबरीष[1] रविच्या वंशीं महात्मा असे,
  धर्में राज्य करी, सदैव भगवद्भक्तांत भावें बसे;
भासे सिंहचि, संगरांत गमती तच्छत्रु राजे ससे,
  तो शांतांत[2], नितांतशांत कमळाकांतींच चित्तें वसे. ४
राजा साधुसमागमें समजला संसार निःसारसा,
  सेवी श्रीपतिच्या पदा, अळि जसा अत्यादरें सारसा;[3]
नामाची धरि कास, दास करुनी सद्भक्तिचा आसरा,
  प्राशी निर्मळ विष्णुचेंचि यश जें हांसे सुधेच्या सरा. ५
ज्यांमध्यें बहुदक्षिणा सुविधिवत् विप्रादिसंतर्पण
  प्रेमें यज्ञ करूनि सर्व करि ते श्रीविष्णुला अर्पण,
आंगें होउनि सत्तपोहुतवहीं[4] तो सर्वदा सर्पण,
  स्वच्छत्वें नृप जाहला सुमणिचा[5] जैसा नवा दर्पण.[5] ६
तो भूतीं समदृष्टि, साधुभजनीं राबे, सदा सांवरी
  आंगें दृग्विकळादिकांसि,[6] भर हा टाकी न दासांवरी.
सेवेवांचुनि आपुल्या न विषयीं याचें शरीर क्षण,
  श्रीशें जाणुनि हें सुदर्शन दिलें, त्याचें करी[7] रक्षण. ७

---

१. नाभाग राजाचा हा पुत्र. ईश्वरभक्ति व औदार्य यांविषयीं हा प्रसिद्ध आहे. यानें एका आठवड्यांत सबंध जग जिंकिलें होतें असें म्हणतात. २. शांत अंतःकरणाचा. ३. कमलाला. ४. सत् + तपस् + हुतवहीं = उत्तम तपोरूप अग्नींत. ५. सुमणिचा दर्पण = हिऱ्याचा आरसा. ६. आंधळे, पांगळे, बहिरे, मुके इत्यादिकांस. ७. याचा कर्ता 'तें सुदर्शनचक्र.'

(वृत्त–स्रग्धरा)

सोडीना सुव्रतें तो जसिं जलधिजलें तापलें याद[१] शीतें,
विष्णुप्रीत्यर्थ वर्षावधि[२] करुनि[२] करी साधनद्वादशीतें.[३]
गेला निर्विघ्न सिद्धिप्रति नियम, न त्या लागला शब्द, सारा
कीर्ति श्रीमाधवाच्या सतत परिसतां संपला अब्द सारा. ८

(वृत्त–शार्दूलविक्रीडित)

गोदानें शुभ साठिलक्ष नृप दे विप्रोत्तमाकारणें,
दे वाजी गजही, जयांसि हरिच्या[४] गावें हयें[४] वारणें.[४]
तर्पी ब्राह्मणवृंद, तृप्ति अतुळा दावी तयां अन्न ती
देवांलाहि न दे स्वयें अमृत, तें यातें करी सन्नती. ९
स्वाद्वन्नें[५] परमादरेंकरुनियां विप्रोत्तमां तर्पुनीं,
त्यांतें कांचनदक्षिणा सुवसनें सद्भूषणें अर्पुनीं,
आज्ञा घेउनियां व्रतोक्तनियमा रक्षावयाकारणें,
तो राजेंद्र करी उपक्रम सुखें साधावया पारणें. १०
तों, जो केवळ सर्वकालहि तपस्येसीं सुखें रातला,[६]
ज्याच्या उग्रपणा प्रणाम असकृत् कल्पानळें घातला,
जेणें शक्रहि[७] शिक्षिला जइं महा संपन्मदें मातला,
दुर्वासा भगवंत तो अतिथि त्या काळीं स्वयें पातला. ११

---

१. मत्स्यादि जलचर. २. वर्षावधि करुनि=वर्षाचा अवधि करून. ३. दशमीस एकवेळ हविष्यान्नभक्षण, एकादशी निश्चक्र (पूर्णपणें निरशनात्मक) आणि द्वादशीस सूर्योदयकालीं भोजन अशा विधीनें आचरिलेल्या व्रताला 'साधनद्वादशी' म्हणतात. ४. इंद्राच्या घोड्यानें (उच्चैःश्रव्यानें) व हत्तीनें (ऐरावतानें). ५. स्वादु + अन्नें = मिष्ट अन्नानें. ६. रत झाला. ७. दुर्वासाच्या शापानें इंद्राची सर्व संपत्ति समुद्रांत पतन पावली; ती त्याच्याच उःशापानें इंद्रास परत मिळाली, अशी कथा आहे.

( वृत्त - पुष्पिताग्रा )

मुनिस निरखितांचि होय दास । प्रमुदित, जेंवि मयूर तोयदास;
नमुनि बसविला वरासनींच । स्तवि नृप जेंवि उमावरास नीच. १२

( वृत्त–द्रुतविलंबित )

'अमृतसिंधु तुम्हींच विभो ! जनीं । जरि धरा न तुम्हीं चवि भोजनीं,
मदुदयार्थ अहो ! तरि जेमन । प्रभु ! करूनि सुखी करिजे मन.' १३

( वृत्त - वसंततिलका )

ऐसें हळूचि नृप जोडुनि हात याची,
ती आयके विनवणी मुनि हा तयाची;
स्नानार्थ जाय मग नायक तापसांचा
कृष्णेसि,[1] जी नुरवि लेशहि ताप साचा. १४

( वृत्त–हरिणी )

प्रथम अमृतीं[2] कालिंदीच्या[2] करी मतिमज्जन[3]–
स्तुतपद[3] मग ब्रह्मध्यानामृतीं अति मज्जन.[4]
उठविल[5] कसा सुप्त स्वांकीं महा अहि ? साधुनीं[6]
शुचिपण[7] दिलें तीर्थां गंगादिकांसहि साधुनी. १५

---

१. कृष्णवर्णा यमुनानदीला. २. कालिंदीच्या अमृतीं=यमुनेच्या पाण्यांत. ३. मतिमज्जनस्तुतपद = मतिमज्जनांनीं ( ज्ञानी लोकांनीं ) स्तुत आहेत पदें ज्याचीं असा दुर्वासा. ४. (१ . स्नान; (२) निमग्न होणें. ५. अन्वयार्थः– ( तो राजा ) स्वांकीं ( आपल्या मांडीवर ) सुप्त ( निजलेला ) महा अहि ( मोठा सर्प ) कसा उठविल ? मोठ्या सर्पाप्रमाणें क्रोधिष्ठ अशा दुर्वासाला राजा ध्यानापासून कसा उठवील ? ६. संतांनीं. ७. दुसरा पाठः – बळयश - **पंत.**

( वृत्त-पृथ्वी )

उशीर बहु लागतां नृपति पावला आधिला,[१]
म्हणे, 'नियतपारणासमय पाहिजे साधिला.
तपोव्रतजपक्रतुप्रमुख धर्मही साधुनी
मनेंहि न विलंघिली अतिथिसत्क्रिया साधुनीं.' १६

( वृत्त-द्रुतविलंबित )

परम संकट तें मन घाबरें । करि, म्हणोनि तया अनघा[२] बरें
श्रुतिमत द्विज सांगति, 'वारितें । पिवुनि हो स्थिर, हें अघ वारितें.' १७

( वृत्त-मालिनी )

अशन[३] न जळपानें होय, पीतांहि पाणी,
अनशनहि नव्हेचि, स्पष्ट हे वेदवाणी;
श्रुतिस अनुसरे जो त्यासि कोणी न दापी,
म्हणुनि मुनिमतें तो तोय राजा तदा पी. १८

( वृत्त-स्रग्धरा )

तों दुर्वासा करूनि स्नपन[४] जप बृहद्ध्यान[५] तत्काळ आला,
प्याला भूपाळ पाणी, त्यजुनि अतिथिला, यास्तव क्रुद्ध झाला,
अत्युष्ण श्वास टाकी, अहि खवळविला, मांत्रिकें तेंवि डोले,
तोले कल्पांतरुद्रासह[६] मग भगवान्, तो असें त्यासि बोले. १९

---

१. चिंतेला, मनोव्यथेला. २. निष्पापी अशा राजा अंबरीषाला. ३. भक्षण. ४. स्नान. ५. ब्रह्मध्यान. ६. कल्पान्तकाळींच्या क्रोधायमान शंकराबरोबर.

( वृत्त–पृथ्वी )

'अरे ! कुमति ! दुर्जना ! गुरु[1] अलंघ्य तें पारणें,
न मीं गुरु अलंघ्य, हें स्वमत या जनाकारणें
स्वयेंचि कळवावया प्रथम आदरें वाहिलें,
असें मग विलंघिलें; नवल आजि म्यां पाहिलें ! २०

( वृत्त–स्रग्धरा )

हा दुर्वासा अलंघ्य त्रिभुवनिं सकळां भूसुरांमाजि राया !
सत्कार प्राप्त झाला वहु बहुदिवसां ब्राह्मणा साजिरा[2] या,
आम्ही सेवानुरूप[3] त्वरितचि फळतों, त्या[4] वृथा वाद पांचां
देवांच्या सुप्रसिद्धां भजकजनतृषापूरकां पादपांचा. २१

( वृत्त–प्रहर्षिणी )

कर्माचा तुज परिपाक चाखवाया
आलों मीं निजपुरुषार्थ दाखवाया,
दुर्वासा अवगणिला[5] तुवांच शील–
भ्रष्टा ! न क्षतसुकृतायु[6] वांचशील.' २२

( वृत्त–स्रग्धरा )

ऐसें बोले प्रबद्धांजळिनरपतिला[7], क्षोभ त्या तापसाचा
सांगावा काय ! भासे निजमणिहरणें कोपला साप साचा;

---

१. मोठें. २. चांगला ( अर्थात् उपरोधानें ). ३. दुसरा पाठः– कर्मानुरूप - **पंत** ४. अन्वयार्थः– त्या देवांच्या सुप्रसिद्धां भजकजनतृषापूरकां पांचां पादपांचा ( वृक्षांचा ) ( आपल्या श्रेष्ठत्वाविषयींचा ) वाद वृथा ( आहे ). देवांचे पांचहि कल्पवृक्ष भजकांचे मनोरथ त्वरित पुरवितात, हें वर्णन आम्हां भूसुरांपुढें ( ब्राह्मणांपुढें ) व्यर्थ आहे. कारण आम्ही सेवानुरूप किंवा कर्मानुरूप फल त्यांच्याहिपेक्षां लौकर देतों. ( कल्पवृक्ष पांच आहेत. त्यांचीं नांवें:- मंदार, पारिजातक, संतान, कल्पवृक्ष, हरिचंदन ). ५. तुच्छ मानिला, अपमानिला. ६. ज्याचें पुण्य व आयुष्य नष्ट झालें आहे असा तूं. ७. हात जोडून नमस्कार करणाऱ्या ( अंबरीष ) राजाला.

दुर्वासा वज्रितापप्रद,[१] परि अनिळें वृक्षसा, कांपवीला
जेणें[२] तो कोप लज्जा जडभयदबळा त्या न दे कां पवीला ?[३] २३

( वृत्त–अनुष्टुभ् )

जटा तोडूनि हुंकारसुमहानाद सोडिला,
तोडावें जेंवि लीलेनें कंबळाच्या[४] दसोडिला.[५] २४

सुलभा भारभूता जी त्यजिली ते जटा किती ?
कोपी दुर्लभ कष्टेंही जोडिलें तेज टाकिती ! २५

( वृत्त–शालिनी )

झाली उग्रा त्या जटेचीच कृत्या[६] । धांवे खाया त्या नृपा विष्णुभृत्या,[७]
तों ती दुष्टा देखिली देवचक्रें। जैसी व्याळी स्वार्तिदा[८] पक्षिशक्रें.[९] २६

( वृत्त–स्रग्धरा )

ज्याचें शंभुस्वयंभुप्रभृति सुर यश प्राशिती पूत[१०] नाकीं,
त्या रामें ताटिका ती जसि, तसि अथवा माधवें पूतना कीं,
सद्बोधानें अविद्या जसि, तसिच महाभीतिदा विप्रकृत्या,[११]
जी उग्रा, विष्णुचक्रें त्वरित निवटिली[१२] ती तदा विप्रकृत्या.[१३] २७

---

१. इंद्रासही शिक्षा लावणारा. ( पृष्ठ १९० टीप- क्रमांक ७ पहा ). २. ज्या कोपानें. ३. अन्वयार्थः– तो कोप त्या जडभयदबळा ( पर्वत इ. जड वस्तूंना भय देणारें बळ ज्याचें अशा ) पवीला ( वज्राला ) लज्जा कां न दे ? ४. कांबळयाच्या. ५. लहानशा दशीला. ६. राक्षसी. ७. विष्णूच्या सेवकाला ( अंबरीषाला ). ८. आपल्या आश्रितांस पीडा देणारी. ९. पक्षींद्र गरुडानें. १०. पवित्र ( यश ). ११. पीडा देणारी. १२. नाहींशी केली. १३. विप्रानें ( दुर्वासानें ) निर्मिलेली राक्षसी.

( वृत्त–प्रहर्षिणी )

ऐसा हा बहुतचि विप्रकार[1] भारी। योजी जो हरिजनिं विप्र कारभारी,
त्या चक्र त्रिभुवनकंपदास दापी। जें सर्वाहितबळसंपदा[2] सदा पी. २८

( वृत्त–स्रग्धरा )

जैसें दावानळानें प्रखरतरबळें काननीं सापिणीचें,
चक्रानें भस्म सद्यः[3] करुनि उडवितां त्या महा पापिणीचें,
दुर्वासा भीति पावे बहुतचि, सहसा गर्व त्याचा गळाला,
सिंहत्रस्तद्विपेंद्रासम[4] मग भगवान् तो महात्मा पळाला. २९
होती अत्युग्र कृत्या परि करुनि तिचा घात, दावि प्रतापा
जेव्हां तें चक्र, पावे[5] बहुत निरखितां त्या तदा विप्र तापा,
प्राणत्राणार्थ धैर्य त्यजुनि मुनि पळे सत्तपःसंपदेतें
वेंची व्यर्थ क्षणांत, प्रभुजनिं रचिलें वैर तें कंप देतें. ३०

( वृत्त–भुजंगप्रयात )

पळे विप्र तों चक्र पाठीस लागे। भ्रमे सर्वदिङ्मंडळीं, फार भागे,
न सोडीच तें जेंवि केलें स्वकर्म। भ्रमे साधुवैरें न पावेचि शर्म. ३१

( वृत्त–मालिनी )

मग करुनि विचार ब्रह्मलोकासि गेला,
नमुनि विधिपदातें हस्त जोडूनि ठेला,
व्यसन सकळ सांगे, प्राणदानासि याची
सचकित परिसे तो प्रार्थना ती तयाची. ३२

---

१. अपकार. २. सर्व शत्रूंच्या शक्तिरूप संपत्तीला. ३. तत्काळ. ४. सिंहानें पीडलेल्या गजश्रेष्ठासारखा. ५. तदा त्या ( चक्रास ) निरखितां विप्र बहुत तापा पावे, असा अन्वय.

( वृत्त–वसंततिलका )

ब्रह्मा म्हणे, ' भगवदिष्टजनीं न घाला
तूं घालितासि, करितासि न या अघाला,
देतीं[1] तुला व्यसनसागरिं हात, पेंच
क्षिप्र स्वयें नुरवितींच, महा तपेंच. ३३
' विश्वांत मुख्य ' म्हणतां मजला जनाहीं,
तें काय गा ! परिसतां मज लाज नाहीं ?
ज्याच्या भयें धरितसे मणिसानु[2] कंप,
श्रीकांत तोचि विधिचा धणि सानुकंप. ३४

( वृत्त–स्रग्धरा )

आम्ही ज्याचें धरीतों, धरिति मनिं जसें सासवेचें सुना, भें[3]
त्याच्या मूर्तप्रतापें सदवननिपुणें[4] दुष्टकाळें सुनाभें[5]
जेव्हां हा क्षोभ केला तुजवरि, मज हें वाटतें फार भारी.[6]
क्रुद्ध झाल्या प्रभूचें मन वळउं शके कोण गा ! कारभारी ? ' ३५

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

ब्रह्मयानें शरणागताहि मुनिला नाहीं दिला आसरा,
लत्ता मारिल कामधेनु भगवद्भक्ताहिता[7] वासरा,[7]
वाटे सद्रिपुचा[8] न ताप हरिल श्रीशंभुचा[9] सासरा,[9]
तान्हेलाचि मरेल पावुनिहि तो जाणों सुधेच्या सरा.[10] ३६

---

१. देणारीं झालीं असतीं. ' देतीं ' चा कर्ता ' महा तपेंच ' २. रत्नमय शिखरें असलेला ( मेरुपर्वत ). ३. भय. ४. साधूंचें रक्षण करण्यांत कुशल अशानें. ५. सुंदर आहे नाभि ( मध्यभाग किंवा तुंबा ) ज्याची अशा सुदर्शनचक्रानें. ६. जड, अवघड, करण्यास कठिण. ७. भगवद्भक्तांचा द्वेष करणाऱ्या ( आपल्या वासरासहि ). ८. साधुजनांच्या शत्रूचा. ९. हिमालयपर्वत. १०. सरोवराला.

(वृत्त-स्रग्धरा)

दुर्वासा ब्रह्मलोकाहुनिहि परतला, तापला विष्णुचक्रें,
गेला मृत्युंजयाला शरण मग, जया सेविती योगिचक्रें,[1]
कैलासीं शंकराला नमन करि, म्हणे, 'ईश्वरा! आसरा हो,
वांचो त्वच्चिंतनार्थ द्विज, निजभजकांमाजि हा दास राहो.' ३७
त्या विप्राला म्हणे तो त्रिपुरहर, 'अगा! ऐक गा! बा! मला जे
प्राणी तापार्त कोणी स्मरति मनिं, न त्यां रक्षितां नाम लाजे,[2]
नाशावे तापपापप्रकर[3] भुज दहा[4] वाहतों याच काजा,
आम्हीं निःशेष वांछा पुरउनि म्हणतों आदरें याचका 'जा.' ३८

(वृत्त-शार्दूलविक्रीडित)

'रक्षावे शरणागत' व्रत असें माझें असे; लक्षिले
जे काळाकुळ जीव, ते सकळही तत्काळ म्यां रक्षिले,
मार्कंडेयकथा[5] तुझ्या श्रुतिपथा आली असावी. क्षण-
ध्यानस्तोत्रपरां जनां सुखवितें माझें कृपावीक्षण.[6] ३९

(वृत्त-स्रग्धरा)

या ऐशा रीति नीति श्रवण करुनियां सेवितां मद्यशाला,[7]
साधूंला अन्यवार्ता गमति सुमतिच्या[8] मोहका[8] मद्यशाला,[8]
यासाठीं तूं तपस्वी मुनि शरण महासंकटीं पातलासी,
'त्राहि त्राहीश' ऐसें म्हणुनि मज नमस्कारही घातलासी. ४०

---

१. योग्यांचे समुदाय. २. या द्वितीय चरणार्धाचा अन्वयः- त्यां न रक्षितां (आमचें) नाम लाजे. म्हणजे त्यांचें रक्षण न केल्यास आमच्या नांवाला कमीपणा येतो. ३. ताप आणि पाप यांचे समुदाय. ४. शंकराला दहा हात आहेत. ५. मार्कंडेय हा मृकंडु ऋषीचा पुत्र. शिवाच्या कृपेमुळें याला चौदा कल्प आयुष्य मिळालें, अशी कथा आहे. ६. कृपावलोकन. ७. माझ्या यशाला. ८. सुमतिच्या मोहका मद्यशाला=सद्बुद्धीला भुलविणारीं मद्यपानगृहें.

( वृत्त-स्वागता )

भस्म मीं करिन गा ! शतकोटी। काळदंडहि, किती शतकोटी ?[१]
वारणाप्रति[२] जसें हरिचक्र[३]। स्पष्ट हें मज तसें हरिचक्र. ४१

( वृत्त-मालिनी )

परिहरिन नताचे मीं स्वयें ताप सारे,
परि गुरु[४] अजिताचें[४] शस्त्र[४] हें[४] तापसा ! रे !
मज बळ न असे बा ! याचिया वारणासी,[५]
हरिवध हरिच्याही[६] होयिना वारणासी.[६] ४२

( वृत्त-अनुष्टुभ् )

करूनि काय जिंकील रविला काजवा रण ?
करील गजवक्त्राचें काय गा ! काज वारण ? ४३

( वृत्त-शार्दूलविक्रीडित )

आम्ही सर्वहि दास त्यास भजतों तच्छासनीं वागतों,
रक्षाया स्वजनांसि शक्तिधन त्या विश्वंभरा मागतों,
अस्मत्पालनलालनादि करितो स्नेहार्द्र तो बापसा,
त्याची ज्यावरि त्यावरीच करितों आम्हीं दया तापसा ! ४४

( वृत्त - पृथ्वी )

सुतासि गुरुच्या गृहा दवडितो जसा बाप, हा
तसा शिव न रक्षणीं पटु जह्मी, तह्मी बा ! पहा,
उपाय कथितों तुला व्यसन हें सराया, पदा
सुदर्शनधराचिया धरिं, हरील तें आपदा. ४५

---

१. वज्र. २. हत्तीला. ३. सिंहांचा समुदाय. ४. अजिताचें हें शस्त्र गुरु = विष्णूचें हें सुदर्शनचक्र फार भारी आहे. ५. निवारण करण्यास. ६. हरिच्याही वारणासी = इंद्राच्या सुद्धां हत्तीला—ऐरावताला.

(वृत्त – शिखरिणी)

'क्षमस्व श्रीजाने[1]!' म्हण, शरण जा त्याचि हरिला.
उदंडांचा तेणें प्रणति करितां ताप हरिला;
दयापीयूषाब्धि, प्रभुवर, जगद्भावन[2] मनीं,
न ठेवी दोषांतें, क्षमितिलक सद्भावनमनीं.' ४६

(वृत्त – स्रग्धरा)

सांगे नाम क्षुधार्ता सदयजन जसें आदरें अन्नदाचें,
कीं दावी वर्त्म[3] जैसें परम तृषित जो पांथ त्या सन्नदाचें[4],
वैद्याचें गेह रुग्णा सुमति कथि, तसें या द्विजा शंभु लावी,
वैकुंठाच्या पथीं कीं पुनरपि न[5] असी बुद्धि[5] त्याची भुलावी.[5] ४७
दुःखघ्नी ओषधी जी असि कथि भगवल्लोकपद्या[6] पिनाकी,
श्रद्धेनें सेविती हो! पिवुनि अमृतही, जीस अद्यापि नाकी;[7]
पावे, तीतें वरूनि, द्विज, अमित पितां दैत्यचक्रायु धाला
नाहीं कांहींच ज्याचा भुजभुजग, तया दिव्यचक्रायुधाला.[8] ४८

(वृत्त – अनुष्टुभ्)

पाहिला प्राशिता[9] दैत्यचक्रायु[9] धरणीतळीं,
भरिता[10] रक्तपूरें जो चक्रायुध[11] रणीं तळीं.[10] ४९

---

१. हे लक्ष्मीपते! (श्री आहे जाया ज्याची तो श्रीजानि). २. जग उत्पन्न करणारा. ३. वाट, मार्ग. ४. चांगल्या नदाचें. ५. बुद्धि न भुलावी= बुद्धिभ्रंश होऊं नये म्हणून. ६. विष्णुलोकाचा मार्ग. ७. देव. ८. अन्वयार्थः– द्विज (दुर्वासा) तीतें (भगवल्लोकपद्येस) वरूनि ज्याचा भुजभुजग (भुजरूपी सर्प) अमित दैत्यचक्रायु (अगणित दैत्यांच्या समुदायाचें आयुष्य) पितां कांहींच धाला (संतोषला) नाहीं तया दिव्यचक्रायुधाला (दिव्यचक्र म्हणजे सुदर्शन हेंच ज्याचें आयुध त्या विष्णूला) पावे. ९. दैत्यचक्रायु प्राशिता= दैत्यांच्या सैन्यांचें आयुष्य पिणारा. १०. तळीं भरिता=सरोवरें भरणारा. ११. सुदर्शनचक्रधारी विष्णु.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

गेला शरण वैकुंठीं हरितें, परि तें तया,
चक्र दे, वक्र देवाच्या भक्तीं म्हणुनियां, भया.[१] ५०
विप्र तो क्षिप्र, तोयासि मीनसा, प्रभुच्या पदा,
कवळी, जवळी प्रेमें ज्याच्या श्रीमधुपी[२] सदा. ५१
म्हणे, "करूनि त्वद्भक्तीं अपराध, पराभवा
पावलों; मज या ऐशा अक्षमा[३] रक्ष माधवा ! ५२
अमळा ! कमळाकेलिभवना[४] ! भवनाशना !
पावना ! पाव, नाशीं या व्यसनास सनातना ! ५३

(वृत्त – शार्दूलविक्रीडित)

दुष्टाही शरणागता अभय दे[५], पाहे[५] न तोटा, कवी[५];
त्वत्पादाब्जपराग, दुर्गुण असे जो, सर्व तो टाकवी;
तीर्थांची कुळदेवता त्रिभुवनख्याताहि गंगा सती
जी, धिक्कार करील काय शिवतां रथ्यांबु[६] अंगास ती? ५४

(वृत्त – शिखरिणी)

जरी साधुद्वेष्टा द्विज सकळलोकीं अधम हा,
तरी सत्कीर्तीचा क्षयकरचि याचा वध महा,
क्षमाशीळा ! देवा ! वद न कवणा मोह चुकवी ?
असें जो जाणोनि प्रभु करि कृपा तोचि सुकवी. ५५

(वृत्त-अनुष्टुभ्)

येती शरण जे त्यांचें करिती संत रक्षण,
जाणते न पडों देती या व्रतीं अंतर क्षण. ५६

---

१. अन्वयार्थः- परि तें चक्र देवाच्या भक्तीं (तो) वक्र म्हणुनियां तया भया दे. २. लक्ष्मीरूपी भ्रमरी. ३. अयोग्य अथवा उतावीळ अशा (मला). ४. लक्ष्मीचें क्रीडामंदिरच अशा ! ५. ज्ञाता. हा 'दे' व 'पाहे' यांचा कर्ता. ६. रस्त्यांतील पाणी.

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

वारावें निजचक्र, हें बहु मला देवा ! पहा भाजितें,
जें ब्रह्मण्य[1] शरण्य[2] हें यश तुझें, रक्षीं प्रभो ! आजि तें,
चित्तीं आणुनि दोष रोष न धरीं, विप्रास या वांचवीं,
भीताला अभयप्रदान करुनी सत्कीर्तिला सांचवीं. ५७

( वृत्त–दोहा )

तव नामाची पातकी जो धरितो नर कास,
म्हणति श्रुति 'पाहेचिना हो ! हरि ! तो नरकास.'" ५८

( वृत्त–शिखरिणी )

जयाच्या ठायींच स्थिर करुनियां संतत रती,
असारा संसाराप्रति बहु सुखें संत तरती.
मुकुंदाचे तो ते सुरतरुगुरू पाय नमुनी,
असें चक्रत्रासेंकरुनि वदला[3] काय न मुनी ? ५९

( वृत्त–अनुष्टुभ् )

भक्ताभिमानी भगवान् वदला तेंचि आयका,
करूनि नमन प्रेमें त्याचि लोकैकनायका. ६०

( वृत्त–स्रग्धरा )

"मीं भक्ताधीन, भक्त प्रिय मज, न तसें आवडे अन्य; काय
श्री ? जेथें हा न वाटे तदधिक मजला आपुला धन्य काय;[4]
माझी सेवाचि मोक्षाहुनिहि बहुमता ज्यांसि, जे अंतराय[5]
ध्यानीं होऊं न देति क्षणहि, बहु मला मान्य ते संतराय. ६१

---

१. ब्राह्मणाविषयीं दयाळु. २. रक्षण करण्यास समर्थ. ३. अन्वयार्थ:- मुनी काय न वदला ? म्हणजे सर्व कांहीं बोलला. ४. अन्वयार्थ:– जेथें मजला आपुला हा काय ( देह ) धन्य न वाटे, ( तेथें ) तदधिक श्री काय ? ५. अडथळा.

( वृत्त-मालिनी )

त्यजुनि धनसुतस्त्रीदेहगेहादि काम,
स्मरति मजचि, गाती नित्य माजेंचि नाम,
भजति भजनकामें जे मला त्यांसमान,
प्रिय इतर न; देऊं मीं न कां त्यांस मान ? ६२

( वृत्त-शार्दूलविक्रीडित )

भक्तीनें वश सत्पतीस करिती साध्वी, मला मज्जन.[1]
प्रेमांभोनिधि संत, त्यांत करितों मीं मीनसा मज्जन.[2]
त्यांला मींच, मलाहि तेच रुचले, ते हंस, मीं मानस,[3]
श्री त्याहींच मला, मदीय भजनें त्यांचें सुखी मानस.[4] ६३

( वृत्त-अनुष्टुभ् )

सर्वस्व मीं सज्जनांचें, माजें सर्वस्व सज्जन,
पावेन मीं, न पावेल कष्टीं मज्जन[1] मज्जन.[2] ६४
सुदासीं न उदासीन प्राकृतप्रभुही मनीं;
कसा दास प्रसादास माझा पात्र नव्हे जनीं ? ६५

( वृत्त-शार्दूलविक्रीडित )

लोकीं निःस्पृह मीं, सदा अजित मीं, चित्तीं उदासीन मीं,
स्वाधीन प्रभु हें खरेंचि, परि या भावें सुदासीं नमीं.
बापा ! प्रेमळसज्जनाशय[5] महागंभीर आवर्त[6] तो,
जैसें वर्तवितो तसेंचि पडला त्यामाजि हा[7] वर्ततो. ६६

---

१. माझे ( भक्त ) जन. २. स्नान, बुडणें. ३. मानससरोवर. ४ मन, अंतःकरण. ५. प्रेमळ अशा सज्जनांचा हेतु, मनोदय, विचार. ६. भोंवरा. ७. हा=मी विष्णु.

( वृत्त–स्रग्धरा )

साधूंचा त्याग अर्ध क्षणहि न करवे, आमुचे देव संत;
श्री दे सत्संग आम्हां, जसि करुनि कृपा काननां दे वसंत
संतांसीं वक्र जो तो खळ मळजळधी पावतो आपदेतें,
त्याला त्याचेंचि पाप प्रळयशतशत[1] ब्राह्मणा ! ताप देतें. ६७

( वृत्त–घनाक्षरी )

ते न जाणती मदन्य । मींहि न जाणें तदन्य
वर्णूं किती ? तैसे धन्य । तेचि एक पाहिले.
त्यांच्या गुणां नसे अंत । भक्तिज्ञानभाग्यवंत
दयाक्षमानिधी संत । माझ्या मनीं राहिले.
मींही नव्हें त्यांचें मोल । संतसिंधु बहु खोल
त्याहीं निंदकांचे बोल । तैसें म्यां न साहिले.
साधु बाप, साधु माय । साधु मंदारांचे राय
साधूंचे पवित्र पाय । आम्हीं माथां वाहिले. ६८

( वृत्त–पृथ्वी )

तुला विकळ पाहतां मम मन श्रमे घाबरें,
गमेल निजचातकव्यसन काय मेघा बरें ?
उपाय कथितों, करीं नमन त्याचि संता; पहा
चमत्कृति; हरील तो नृपचि सर्व संताप हा. ६९

( वृत्त–पुष्पिताग्रा )

हरिजनचि खरे सखे, दरा[2] हे । नुरविति, यां नमितां न खेद राहे,
न निववित[3] जरी पदीं नमीना ? । खळ म्हणुनि त्यजिती नदी न मीना ७०

---

१. लाखों प्रळयांपर्यंत. २. भीतीला. ३. अन्वयार्थः– जरी पदीं नमीना (तरी) न निववित (काय) ? अर्थात् आपल्या पायांशीं नम्र न झालेल्या दुष्टावरहि हरिजन उपकारच करितात.

( वृत्त–हरिणी )

चरण धरिले ज्यांहीं ते तों कधींहि न तापले,
कळकळविले सत्पादानीं न आश्रित आपले;
अमृतहि पितां न स्वास्थ्याला वरील गदी[1] क्षण,
त्रुटि[2] न भरतां नाशी सारेहि ताप सदीक्षण.[3] ७१

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

त्वां केला अभिचार[4] साधुपुरुषीं जो, तो तुला बाधला;
कोणालाहि निजेष्टलाभ न सदुच्छेदोद्यमें[5] साधला.
पाषाण स्वशिरीं पडेचि गगनीं मित्रासि[6] जो हाणिला,
कीं पाय ज्वलनीं जळेचि, हृदयीं हा भाव कां नाणिला? ७२

( वृत्त–अनुष्टुभ् )

साधूच्या[7] लंघनीं होतो नीचाचा घात रोकडा,
बोकडा मारक नव्हे मेरुचा काय हो! कडा? ७३

( वृत्त– स्रग्धरा )

होतोचि प्राप्त मृत्यु स्वभुजबळमदें लंघितां अर्णवातें,
पावे गर्वें उडे तो पतन, उडविलें ज्यापरी पर्ण वातें.
ज्या दुष्टें सज्जनांचा अकरुणहृदयें चिंतिला घात, 'लागा
पाठी, त्या खा' न साधू म्हणति, परि अघीं[8] तो मुखीं घातला गा! ७४

---

१. रोगी. २. क्षणाचा चतुर्थांश. ३. साधूंची दृष्टि. ४. जारण-मारणप्रयोग. ( येथें अंबरीषाच्या नाशार्थ कृत्या उत्पन्न करणें ). ५. साधूच्या नाशाच्या उद्योगानें. ६. सूर्याला. ७. दुसरा पाठः– थोराच्या–**पंत**. ८ पातकांनीं.

( वृत्त–अनुष्टुभ् )

विद्या तपस्या ज्या यांहीं भले ते विप्र तारिले;
खोटे, सुधामोहिनीहीं[1] दैत्य तेंवि, प्रतारिले.[2] ७५

( वृत्त–शिखरिणी )

तपश्चर्या विद्या अमृतभरिता शुद्धचरिता,[3]
खळा होती तापप्रद विषरसाच्याचि सरिता.
सतींचेंहि प्रेम स्वपतिवरि अत्यंत विटतें,
स्वयें अन्यायांतें करुनि विटवी दुष्ट विट[4] तें. ७६

( वृत्त–स्रग्धरा )

दुर्वासा मुनि हो ! मदुक्ति सरसा साक्षात् सुधेच्या नद्या.
सेवा, लेशहि पाप ताप न उरो, देवा ! तुम्हीं मान द्या.
प्रार्था त्या नृपसत्तमासि, 'चुकलों, रक्षीं' म्हणा, जा, जगा.[5]
तो रक्षीलचि, साधु लक्षिति निजापत्यापरी या जगा." ७७

( वृत्त–पृथ्वी )

असें प्रभु वदे, न दे अभय, अंबरीषाकडे
मुनि त्वरित जाय, त्या नृपतिच्याचि पायीं पडे.
द्विजें स्वपद वंदितां सुमति भूप तो लाजला,
तयाहुनि[6] तदद्भुतव्यसनपावकें[7] भाजला. ७८

---

१. अमृत आणि मोहिनी यांनीं. अमृतमथनानंतर विष्णूनें मोहिनीचें रूप घेऊन दैत्यांस फसविलें, ही कथा येथें लक्ष्य आहे. २. फसविले. ३. शुद्ध आचरणाच्या मनुष्यास. ४. जार. (तिसऱ्या व चौथ्या चरणांतील कथासंदर्भ लक्षांत येत नाहीं). ५. वांचा. ६. दुर्वासापेक्षां. ७. दुर्वासाचें अद्भुत संकट हाच अग्नि, त्यानें.

( वृत्त–वसंततिलका )

पाहोनि ताप बहुतापरि तापसाचा
पावे तयापरिस तो[१] परिताप साचा.
दे चक्र ताप पळमात्र तपोनिधीतें,
याच्या[२] तसा सुकठिना न तपोनि धीतें. ७९

( वृत्त–द्रुतविलंबित )

वरि दिसे मृदु मौक्तिक पोवळें । परि न लेश तदंतर कोवळें,
न तुळवे विधु अंकित तो मळें । सरस साधुमनें शुचि कोमळें. ८०

( वृत्त–स्रग्धरा )

मित्राप्तां[३] म्लानि देतो, जह्नि अमृतरसालागिं हा चांद वीतो;[४]
साधू तैसा कसा ? जो सुखउनि सकळ प्राणियां नांदवीतो.
साधूच्या दर्शनानें अशिवतिथि असी सर्वथा आढळेना,
साधूचें तेज रात्रिंदिव समचि, न तें सोडुनी त्या ढळेना. ८१
राजा[५] पाहोनि चक्रेंकरुनि अतिशयें ब्राह्मणा तापल्याला,
सर्वांगीं तप्त झाला. उतरुनि मुनिचा काय तो ताप त्याला !
वैकुंठाप्तासि जोडी कर, बहु विनवी कोपतां फार भारी
दासीं स्वामी, तयाला स्वपदर पसरी हा,[५] जसा कारभारी. ८२

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

'चक्रा ! तूं भगवत्प्रताप, ससुरा शक्रा तुवां रक्षिलें;
नक्राचेपरि[६] भक्तपीडनपरा वक्रा जना भक्षिलें.

---

१. अंबरीष. २. अन्वयार्थः–याच्या (दुर्वासाच्या) तपोनि (तपश्चर्या केल्यामुळें) सुकठिना धीतें (मनाला) तसा (ताप) न (झाला नाहीं). ३. सूर्याचे आप्त म्हणजे सूर्यकमलें, त्यांना. दुसरा अर्थ– मित्र आणि आप्त, यांना. ४. उत्पन्न करितो. ५. अंबरीष. ६. (गजेंद्रमोक्षाचे कथेंतील) नक्राप्रमाणें.

पीडा लेश नसोचि, या श्रुतिशुकीनीडा[1] मुनीला पहा.
ब्रीडाकारक विप्रगंजन[2] तुज क्रीडारिदर्पापहा[3] ! ८३

तूं गोब्राह्मणधर्मपाळक जगन्नाथप्रिय ख्यात कीं,
हें काय द्विजवर्यपीडन बरें ? दुष्कीर्ति या पातकीं.
हो अन्वर्थ[4] सुदर्शना ! मुनिवरीं, दासीं दया दाखवीं,
अत्यच्छस्वयशःसुधारस रसज्ञात्या जना चाखवीं. ८४

( वृत्त–पृथ्वी )

कुळोचित तपक्रतुव्रतजपद्विजोपासना
असेल घडली, मनीं जरि असेल सद्वासना,
तरि त्वरित विज्वर द्विज असो, दया लोभ या
नतीं करिं, हरीं प्रभुप्रहरणा ![5] दयालो ! भया. ८५

बुभुक्षितजना जसें रुचिकरेष्ट जें अन्न तें
असेल जरि अर्पिलें सबहुमान त्यां सन्नतें,
तरि त्वरित विज्वर द्विज असो, दया लोभ या
नतीं करिं, हरीं प्रभुप्रहरणा ! दयालो ! भया. ८६

कुळांत कुळदेवता जरि नसेल विप्राधिका,
असेल गुरुसत्क्रिया घडलि शुद्धिची साधिका,
तरि त्वरित विज्वर द्विज असो, दया लोभ या
नतीं करिं, हरीं प्रभुप्रहरणा ! दयालो ! भया. ८७

---

१. श्रुतिरूपी ज्या शुकी ( पोपटांच्या स्त्रिया ) त्यांचें निवासस्थान जो दुर्वासा याला ( या मुनीला ). २. विप्राला ( दुर्वासाला ) गांजणें. ३. लीलेनें शत्रूच्या गर्वाचें हरण करणाऱ्या ! ( चक्रा ! ). ४. अर्थाला अनुसरणारें. सु + दर्शन ( चांगलें आहे दर्शन ज्याचें ) या शब्दाच्या अर्थाप्रमाणें वागणारें. ५. प्रभूच्या ( विष्णूच्या ) अस्त्रा ! ( सुदर्शना ! ).

प्रजा जरि निजप्रजासम असेल म्यां लेखिली,
नसेल परसुंदरी जरि कुदृष्टिनें देखिली,
तरि त्वरित विज्वर द्विज असो, दया लोभ या
नतीं करिं, हरीं प्रभुप्रहरणा ! दयाळो ! भया. ८८
असेल जरि ईश्वर स्थिरचरीं बरा पाहिला,
नसेल अणुमात्रहि क्षणहि भेद म्यां साहिला,
तरि त्वरित विज्वर द्विज असो, दया लोभ या
नतीं करिं, हरीं प्रभुप्रहरणा ! दयाळो ! भया. ८९

( वृत्त-वसंततिलका )

गोविप्रदीनशरणागतयाचकां मीं
झालों असेन वश, तत्पर याच कामीं,
तैसाचि लुब्ध जरि सत्परिशीलनातें[1]
तूं दीनबांधव खरें करिशील नातें.' ९०

( वृत्त-स्रग्धरा )

रक्षाया ब्राह्मणातें सुकृत सकळही अर्पितां भूपशक्रें,[2]
पावोनि क्षिप्र शांतिप्रति अभय दिलें त्या द्विजा विष्णुचक्रें,
जें क्षीरांभोधिफेनामृतशुचि[3] दिधलें अंबरीषा नृपातें
श्रोत्या वक्त्या जनाही सुयश निववितें दावुनी सत्कृपा तें. ९१

( वृत्त-शिखरिणी )

छळी अन्यायेंचि प्रणति करितांही, तदपि त्या
भजे विप्रा, जैसा सुत, धरुनि माथां पद, पित्या;

---

१. साधूंच्या सेवेला. २. राजेंद्रानें ( अंबरीषानें ). ३. क्षीरसमुद्राचा फेंस व अमृत यांसारखें शुभ्र ( जें यश ).

पडे स्पर्शीं[1] भेदास्तव[2] जरि बळानें घण, मणी
करी स्वर्ण स्पर्शें, किमपि न महात्मा घणमणी.[3] ९२

( वृत्त–मंदाक्रांता )

श्रीरामाचा सुगुण निववी जेंवि गातां शिवाला,
श्रीदुर्वासा-मुनि बहु तसा साधुसंगें निवाला,
भेटे भूपाप्रति, अतिशयें तो करी प्रेम हर्षें,
'पादप्रक्षालन' नृप म्हणे जैं 'करूं दे महर्षे!' ९३

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

त्या भूपासि म्हणे मुनीश्वर, 'सुधा सेवूनि कां जीभली
ज्ञात्याची रसिकीं म्हणेल पुसतां गोडीस कांजी भली?[4]
साधूंची तसि कीर्ति, तत्सम दुजी नाहींच, जीवां[5] चवी
श्रोत्रीं दावुनि, दुःसहीं भवदवीं दग्धांसि जी वांचवी. ९४
लोकीं संत तुम्हींच धन्य, तुमचें न स्तोत्र, हें सत्य; या[6]
विप्राच्या[6] तुमचा अगाध महिमा आला नृपा! प्रत्यया.[6]
एकीं साधुजनींच शांति, करुणा, मैत्री, क्षमा, सन्मती;
मुक्तांचे, इतरत्र, राशि न, जसे रत्नाकरीं जन्मती. ९५

( वृत्त-स्रग्धरा )

साधूवांचूनि अन्य त्रिभुवनिं भुजगा[7] घातका[7] जीवदाना
कोण्ही देईल काय क्षण तरि? पुसतों सत्य कां जी! वदा ना?

---

१. स्पर्शमण्यावर, परिसावर. २. फोडण्याकरितां. ३. 'करूं न करूं' अशी शंका घेणारा. ४. अन्वयः– रसिकीं गोडीस पुसतां ज्ञात्याची जीभली ( जीभ ) सुधा सेवुनि कांजी ( पेज ) भली म्हणेल कां ? ५. अन्वय.– जी ( कीर्ति ) जीवां श्रोत्रीं चवी दावुनि दुःसहीं भवदवीं दग्धांसि वांचवी. ६. या विप्राच्या प्रत्यया = ह्या ब्राह्मणाच्या ( दुर्वासाच्या ) अनुभवास. ७. घातका भुजगा=घात करणाऱ्या सर्पाला.

देवूनि प्राणदान छळक सुखविला धन्य बापा ! मराया
होता योग्य स्वपापें तरिहि जिवविलें त्यांचि बा ! पामरा या. ९६

( वृत्त-शार्दूलविक्रीडित )

लागों देति विधीशविष्णु करितां नर्मीं न भद्र क्षण,[१]
त्यांचे स्यां पद वंदिले परि तिहीं केलें न मद्रक्षण;
साधो ! त्वां शरणागता मज महातापातुरा[२] रक्षिलें.
नाहीं मत्कृतपाप बा ! परहितोद्युक्ता ! तुवां लक्षिलें. ९७
तूं ब्रह्मण्य, शरण्य तूं, सदय तूं, सत्कीर्तिचा चांदवा[३]
लोकीं साधु तुम्हीं असाचि उभवा, प्राणी सुखें नांदवा,
आयुर्वृद्धि असो, वसो मनिं सदा भूतानुकंपा, दिलें
मातें तें इतरांहि द्या, यश भलें जन्मोनि संपादिलें.' ९८

( वृत्त-शालिनी )

ऐशी आशीर्वादपीयूषवृष्टी । केली विप्रें त्या नृपीं प्रेमदृष्टी;
राजा लाजे, शंभुला जेंवि नंदी । वारंवार श्रीमुनींद्रासि वंदी. ९९

( वृत्त-शार्दूलविक्रीडित )

राजा त्या मुनिला म्हणे, 'मज जडा देतां तुम्हीं थोरवी,
पादें[४] आपुलिया जसा विधुसि[५] कीं रत्नासि देतो रवी;
केला हा निजदास वासवनुता[६] सत्कीर्तिला[६] भाजन,[७]
स्वामी ! युष्मदुपासनेछु कवणा पावे न लाभा जन ? १००

---

१. अन्वयः– विधीशविष्णु नर्मीं भद्र करितां क्षण न लागों देति. २. मोठ्या संकटानें पीडलेल्याला. ३. चांदवा उभवा = चंद्र उभारा; ( सत्कीर्ति प्रकाशित ठेवा. ) ४. चरणानें, पक्षीं किरणानें. ५. चंद्राला. ( सूर्यापासून चंद्राला प्रकाश मिळतो, हा ज्योतिःशास्त्रीय सिद्धांत पंतांना माहित होता असें दिसतें ). ६. इंद्रानें स्तुति केलेल्या अशा 'सत्कीर्ति' ला. ७. पात्र, योग्य.

( वृत्त–पृथ्वी )

तुम्ही प्रभु जगद्गुरु स्वपददासमंदार, हा
जन स्तविल काय, या श्रुति म्हणेल 'मंदा! रहा,'
म्हणोनि तुमचा मला सुमहिमा न वाखाणवे,
प्रकूपखनका[1] जसा जलनिधी न वा खाणवे.' १०१

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

केला प्रार्थुनि तृप्त तो मुनि नृपें अत्यादरें जेमनीं,
होते सिद्ध पदार्थ, विप्रपतिच्या[2] आले मुखीं जे मनीं.
आज्ञा दे गुरुराज त्या नृपतिला जेवावया तो मग,
ब्रह्मण्याच्या सदनासि जाय भगवान् भास्वान्[3] जसा व्योमग.[4] १०२
वर्षानंतर[5] तापसेश्वर पुन्हां येतां गृहा पाहिला,
तावत्काळ उपोषित प्रभु जल प्राशूनियां राहिला,
आज्ञा घेउनि जेविला मग सुहृद्वर्गासवें तो भला,
ऐसा सन्नत अंबरीष सुयशें लोकत्रयीं शोभला. १०३

( वृत्त-गीति )

हें, प्रेमाश्रुस्नपितस्मितविकसितरम्यगल्ल[6], भागवत,
शुक गाय, भी जया अघ, जैसें स्वाहासुवल्लभा[7] गवत. १०४

---

१. मोठी विहीर खणणारास. २. अन्वयः-- विप्रपतिच्या जे मनीं ( होते ते ) मुखीं आले. म्हणजे त्याला इच्छाभोजन मिळालें, हा भाव. ३. सूर्य. ४. आकाशांत फिरणारा. ५. कारण, एक वर्षभर दुर्वासाच्या पाठीमागें सुदर्शन लागलें होतें. ६. प्रेमाश्रूंनीं भिजविलेले आणि मंदहास्यानें प्रफुल्लित होऊन रम्य झालेले ज्याचे गाल, ( असा शुक ). ७. स्वाहेच्या प्रिय पतीस म्हणजे अग्नीस.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

( वृत्त-पृथ्वी )

शुकद्विज[१] सुबुद्धि तो पढविलें[२] भलें बोलतो,
तदुक्तिरस सेवितां रसिक सर्वही डोलतो;
नव्हे नवल तें जगीं, नवल हें मयूरद्विजा[३]
दिली सुकविता पहा सदय साधुनीं हे निजा. १०५

( वृत्त-गीति )

श्रीमद्गुरुचरणांहीं केलें स्वस्तवपटूंत मुखर[४] मला,
कीं हाहि दास पावो, कोण न पावोनि हें स्वसुख रमला? १०६
दे[५] श्री पादाधःस्थां[६] पंकप्रभवांहि[७]; योग्य[८] सवित्या तें;
तरिच[९] म्हणति 'मित्र! जगद्बांधव! तुभ्यं नमोऽस्तु' कवि त्यातें. १०७
श्रीगुरुचरण अमृतघन, पंक[१०] प्रक्षाळिती, हरिति ताप[११],
सुखविति नता मयूरा, सुदिन करिति दुर्दिनासि[१२], ते बाप. १०८
संतांचें संतातें, गंगेचें तोय जेंवि गंगेतें,
म्यां अर्पिलें, वराया सुख, कल्पशतींहि जें न भंगे तें. १०९

---

१. राघूपक्षी ( दुसरा अर्थ–शुकाचार्य ). २. याचा कर्ता 'धन्यानें' पक्षीं 'व्यासानें.' ३. मयूरपक्ष्याला; पक्षीं, मी जो मोरोपंत ब्राह्मण, त्याला. ४. बोलका. ५. ह्याचा कर्ता 'सविता' अध्याहृत. ६. किरणांखालीं राहणाऱ्यांस, पक्षीं, नम्र असणाऱ्यांस. ७. चिखलांत उत्पन्न झालेल्यांसहि ( कमळांसहि ), पक्षीं दोषांपासून उत्पन्न झालेल्या हीन जनांसहि. ८. अन्वयः– तें सवित्या ( सूर्याला ) योग्य. ९. याचे ऐवजीं **पंत**लिखित दुसरा पाठ – 'भो! मित्र! जगद्बांधव! नमोऽस्तु ते, म्हणति तरिच कवि त्यातें.' १०. चिखल; पक्षीं, पाप. ११. उन्हाचा ताप; पक्षीं, मनस्ताप. १२. मेघांनीं व्याप्त दिवसास; पक्षीं, वाईट दिवसास.

केलें मला अलंकृत शुद्ध स्वयशेंकरूनि संतानीं,
जैसें श्रीमत्पितर स्वविभूषण अर्पिती स्वसंतानीं. ११०
हा ग्रंथ ‘ भक्तभूषण ’ कंठीं जे साधु यासि धरितील,
ते आत्मदर्शनीं अतिसस्पृह निःस्पृह जनासि करितील. १११

---

## ७. गोपीप्रेमोद्गार[१]

( गीतिवृत्त )

उद्धवजी ! विरहदवीं[२] पावतसे हानि रोप[३] हा काय.[४]
सांगसि,[५] पळांत शतदा म्हणवाया ‘ हा ! ’ निरोप हा काय ? १
प्राप्त न होइल आम्हांपासुनि तों साधुवाद[६] या योगा,[७]
याविषयीं तरि कांहीं तुझिया चित्तांत बा ! दया यो[८] गा ! २
श्रितसर्वेछितफलदा नंदसुताचीच होय जीभलता,[९]
ऐसें समजुनि, गोपी ठकलों, कीं दे पदार्थ जी भलता. ३
इछित नव्हतों आम्हीं गोपी, परि योग[१०] येर[११] हा, यास,
स्वप्नींहि न बहुमत जो, त्या कोण म्हणेल ये रहायास ? ४

---

१. हें प्रकरण श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधाच्या ४७ व्या अध्यायावरून **पंतांनीं** स्वतंत्रपणें रचिलें आहे. यांत गोपींनीं उद्धवाजवळ कृष्णाविषयीं काढलेल्या प्रेमोद्गारांचें वर्णन आहे. परंतु यांत अनुरागाऐवजीं त्यांचा रागच प्रकट झाला आहे. २. विरहाग्नीमध्यें. ३. रोपटें, लहान झाड. ४. देह. ५. याचें कर्म ‘ हा निरोप. ’ ६ स्तुति. ७. अन्वयः– आम्हांपासुनि तों ( तर ) या योगा ( कुब्जा व कृष्ण यांच्या योगाला–संबंधाला ) साधुवाद ( स्तुति ) प्राप्त न होइल. ८. येवो. ९. जीभरूपी कल्पलता. १०. कृष्णकुब्जायोग. ११. भलताच.

जो क्षीरार्थिजन, तया, क्षीर म्हणुनि, काय नीर अर्पावें ?
हा योग तेंवि वंचन, या योगेंकरुनि ज्यांसि[१] तर्पावें. ५
शठवदनातें लागुनि, बोलुनि बहु गोड, गोपिका फटवी,[२]
ठकली मुरलि, विराजे न वसंतें जेंवि सोडिली अटवी. ६
कुब्जेच्या भाग्याचा भारी भर, आजि आमुच्या सरला,
सरला असोनि आम्हीं वक्रा, वक्रा असोनि ती सरला ! ७
उद्धवजी ! केली कीं ती कुब्जा पूर्णकामना सजुनी ?[३]
त्यजुनि नवी, रसिकाच्या मैत्री येईल का मनास जुनी ? ८
नामें गुणेंहि मधुरा[४] हो, सर्वांची बरी पुरीव रती,
गोपींला कटुकी हो; ऐसा जाणों वरी पुरी वर ती. ९
जेणें माय[५] त्यजिली, दे बहु लालन करूनि उद्धव[६] जी,
त्या आम्ही कोण ? वृथा रुसतों, मुग्धा म्हणोनि उद्धवजी ! १०
आवडलें कुब्जोर[७] क्रीडाया, जेंवि तेंवि न रमोर,[८]
शुकदेव यश कथाया आधीं, मग लाविलाचि नर मोर. ११

---

१. ज्या गोपींस ( अध्याहृत ). २. फसवी. ( याचा कर्ता 'मुरली' ). ३. सजवून. ४. मथुरानगरी. ( ह्या गीतींतील पहिले तीन चरण मथुरानगरीला उद्देशून लिहिले आहेत ). ५. यशोदा. ६. उत्सव. ७. कुब्जेचें वक्षःस्थळ. ८. रमेचें ( लक्ष्मीचें ) वक्षःस्थळ.

# ८. गोपीगोडवा[१]

( गीतिवृत्त )

श्रीमद्गोपीवृंदप्रेमामृतसिंधुबिंदुलव[२] करितो
श्रवणीं शीतळ; सेवा अजि रसिकचकोर ! इंदु लवकरि तो. १

' मथुरेकडील कांहीं आयकिलें वृत्त सखि ! नव ? लटिक[३] तें
नोहे; बहु वदति सये ! सुज्ञजनमनीं खरें नवल टिकतें. ' २

' आलि ! कसें काय बरें ? वद, निववायासि आयकों देहा;
हृदयप्रियजनवार्ताश्रवणसुखेंकरुनि काय कोंदे हा. ' ३

' प्रियसखि ! लाजे जिह्वा; ज्याची पदधूलि सुर तदा सीसीं[४]
वाहत होते, त्यासीं[५] त्या मथुरेमाजि सुरत[६] दासीसीं.[७] ४

---

१. प्रिय मनुष्याचा विरह झाल्यावर त्याच्या स्तुतिपर काढलेल्या उद्गारांना 'गोडवे' म्हणतात. आपल्या प्रिय श्रीकृष्णानें कुब्जेला अंगसंग दिल्याचें वृत्त ऐकून गोपींच्या तोंडून संवादरूपानें निघालेले प्रणयकोपाचे उद्गार यांत आहेत. गोपींचा मत्सर, राग, निराशा व प्रेम या रूपानें सर्वसामान्य स्त्रियांच्या चार मनोवृत्तींच्या झगड्याचें उत्कृष्ट चित्र या काव्यांत **पंतांनीं** काढलें आहे. मूळ भागवतांतील दशमस्कंधांतील ४७ व्या अध्यायाचा यांस थोडाफार आधार आहे. ह्यांतील प्रसंग केवळ काल्पनिक असून 'केकावलि' प्रमाणेंच हें काव्य **पंतांच्या** उज्ज्वलप्रतिभेचें फल म्हणून अत्यंत महत्त्वाचें आहे. २. गोपीजनांच्या प्रेमामृतसागराच्या बिंदूचा अंश. ३ खोटें. ४. शीर्षीं; डोक्यावर (सीस=शीर्ष). ५ त्यास=श्रीकृष्णास. ६. अंगसंग. ( यानें क्रियापद 'घडे' हें अध्याहृत; कारण जेमुळें तें 'आली'च्या (गोपीच्या) मुखांतून बाहेर पडेनाच ). ७. कुब्जेबरोबर.

मेला[1] विधि ऐकवितो, सखि ! जें स्वप्नींहि नायकावेंच.
गलिततदधरामृतरसकणहि[2] जपुनि रसिकनायका ![3] वेंच. ५
उद्धव[4] कीं अनुसरला ! सखि ! आश्रित आश्रया न विटवीती,
यश[5] नाहींच करिल कीं ? किति शोषिल तो समुद्र, टिटवी ती !' ६
' बाई ! सत्य वदसि हें, प्रभु जन असतां कळंकही शोभे,
चंद्रचि पहा, जरिहि हा सक्षय सकळंक, दृष्टिही लोभे. ७
सखि ! आर्जवार्थ[6] गेला, घ्याया म्हणवूनि हा दयालु बरा,
उद्धव[7] पहा कसा, जो मोही कृतसाधुवाद या लुबरा ! ८
सभ्यावांचुनि[8] सदनीं सखि ! होता कोण झुरत सवतीचा ?[9]
सखि ! हाय ! काय अगणितपुण्यफल लहान सुरतसव[10] तीचा ? ९
या भाग्यावरुनि गमे, बहुतचि जन्मांतरीं करी सव[11] ती,
सवतीस दैव फळलें, हा व्रजसर्वस्व भोगि ती सवती.[12] १०

---

१. नायकांच्या तोंडांतला नेहमींचा तिरस्कारदर्शक हा शब्द आहे. २. तिच्या ( कुब्जेच्या ) अधरामृतरसाचा गळलेला कणसुद्धां. ३. गोपींनीं कृष्णाला औपरोधिक रीतीनें हें विशेषण लाविलें आहे. त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ- ' हे अरसिका ! कृष्णा ! ' ४. उद्धव हा श्रीकृष्णाचा आप्त व भक्त होता. तो सुद्धां ' होस हो ! ' म्हणूं लागला हें आश्चर्य ! असें गोपी म्हणतात. ५. ( कुब्जेशीं रत झाल्यामुळें कृष्णाचें ) यश ( ती कुब्जा ) नाहींच ( नाहींसें ) करिल कीं ? ( करील का ? तर नाहीं ). ६. सरळपणाकरितां. ( कंसमामाच्या निमंत्रणावरून कृष्ण मथुरेस गेला ). ७. अन्वयः- जो कृतसाधुवाद ( गोड बोलणारा ), लुबरा ( पुढें पुढें करणारा असा ) उद्धव या ( कृष्णाला ) कसा मोही, पहा ! ८. श्रीकृष्णाला उद्देशून ' सभ्य ' हें औपरोधिक विशेषण आहे. ९. सवतीच्या (कुब्जेच्या). १०. रतिक्रीडारूपी यज्ञ. ११. यज्ञ. १२. स्वतंत्रा-पंत.

मथुरापुरींत बरवी मेळविली रसिकनायिका कुब्जा;
पात्र प्रतिग्रहा[1] या तूं, द्राविड जेंवि, तंडुला[2] उब्जा. ११
मथुरे ! बहु अयश तुझें, वरिली तुजमाजि केशवें कुब्जा;
वाटे[3] या स्वपरिभवें, भेरी करवील इंदिरा न्युब्जा. १२
रुचवी[4] खोटा कामचि दृढरतिगुणपाशजनक कुब्जा या;
प्राची[5] जाया न रुचो हरिला[6] कुणपाशजनककुब्जाया.[7] १३
सखि ! माज्या हृत्सदनीं, रात्रिदिवस हेचि आठवण वागे,
ताप मनाची पुरवी, कक्षाची[8] जेंवि पाठ वणवा गे ! १४
अमृताचीच, सुतृषिता कृष्णा, आली[9] नवि प्रपा[10] दासी
कसि भजत धरुनि भजनीं तृष्णा आली न विप्रपादासी ![11] १५

---

१. (कुब्जारूप) दान घेण्यास. २. उब्जा तंडुला=साळी धान्य आधणाच्या पाण्यांतून काढून नंतर भाजून केलेल्या तांदुळाला. हे तांदूळ निःसत्त्व व बेचव असतात. ३. अन्वयार्थः– (कृष्णानें कुब्जेचा स्वीकार केल्यामुळें चिडून) या स्वपरिभवें (आपल्या अपमानाकडून) इंदिरा (कृष्णाची कीर्तिरूपी) भेरी (नौबत) न्युब्जा (कमी महत्त्वाची, खालच्या दर्जाची, अधोमुखी) करवील (असें) वाटे. (इंदिरेला या कृत्याचा अतिशय राग येईल हें तात्पर्य). ४. अन्वयार्थः– दृढरतिगुणपाशजनक (सुरताविषयीं दृढ पाश उत्पन्न करणारा) खोटा कामचि या (कृष्णाला) कुब्जा रुचवी (कुब्जेबद्दल आवड उत्पन्न करी). ५. पूर्वदिशा. ६. सूर्याला. ७. कुणप+अश+जन+ककुप्+जाया=प्रेतभक्षण करणाऱ्या नैर्ऋत्य राक्षसाची दिशारूप स्त्री (नैर्ऋती दिशा). हरिला (सूर्याला) सुंदर अशी पूर्वदिशा न आवडतां त्यानें ज्याप्रमाणें प्रेतभक्षक नैर्ऋत राक्षसाच्या दिशेला पत्करावें त्याप्रमाणें ही वरील गोष्ट झाली हा भाव. ८. वाळलेल्या गवताची. ९ सखी, मैत्रीण. १०. पाणपोई. ११. विप्र भृगु त्याचा पाद म्हणजे पदलांछन आहे ज्यास अशा कृष्णास. या अर्धाच्या अन्वयासाठीं **पंतांनीं** प्रत्येक शब्दावर अनुक्रमाचे आंकडे दिले आहेत. त्याप्रमाणें अन्वयः– 'विप्रपादासी भजनीं तृष्णा धरुनि कसि भजत न आली !' (तरच नवल !).

आठ[१] मण याम, आम्हां, तिस दावी[२] करुनि आठ वाल. वही,[३]
गौरीहरचि मनीं, नच सवतीचा विभव आठवा लवही. १६
कात्यायनी[४] द्रवेलचि, तीचा स्तव करुनि पाठ वाना कीं;
दासीहुनि काय उण्या ? वृत्त यशें भरुनि पाठवा नाकीं.[५] १७
तीकारणें[६] हरिस सखि ! बहुधा साधूनि दे वशीकरण,
दिव्यस्त्री भोगाया, पुरुषासचि म्हणति देव ' शीक रण. '[७] १८
बहुधा असेल कुब्जा दासी नामें, नसेल ती जात्या,[८]
विनयें बहु निववाया, नमिल, उभी नच बसेल ती ज्या[९] त्या. १९
सखि[१०] ! दासी सैरंध्री ती स्ववशा शिल्पकारिका होती;
प्रभुला रुचली चिमणी, बहु बरवी होय सारिका[११] हो ! ती. २०

---

१. आठ याम=आठ प्रहर=सबंध दिवस. २. दाखवी ( याचा कर्ता ' कृष्ण ' ). अन्वयार्थः– ( कृष्ण ) आम्हां आठ याम ( एक दिवस ) मण ( मणाइतका जड ) करुनि दावी ( आणि ) तिस आठ वाल ( तोळयाचा चाळीसावा भाग = अगदीं हलका ) करुनि दावी ). ३. बोहल्याभोवतीं अथवा गौरीहराजवळ गाडग्गीं रचून उतरंड करितात ती. ४. स्त्रियांची सौभाग्यदेवता, पार्वती. ५. स्वर्गांत. ६ तिला ( कुब्जेला ). ७. युद्ध. युद्धांत मृत्यु आला असतां पुरुषास स्वर्गप्राप्ति होऊन तेथें दिव्य वस्तु व अप्सरा भोगावयास मिळतात असें म्हणतात. स्त्रियांस युद्धाची जरूरी नाहीं. त्यांना वशीकरणानेंच इष्टपुरुष-प्राप्ति होते हा भाव. ८. जातीनें, शरीरानें. ९. उद्धवा - **पंत**. १०. अन्वयार्थः– ( हे ! ) सखि ! ती दासी ( कुब्जा ) स्ववशा ( इच्छेस येईल तशी वागणारी ) शिल्पकारिका सैरंध्री ( दुसऱ्याकडे जाऊन कौशल्याचीं कामें करणारी अशी ) होती. ११. मैना. ( समर्थाला चिमणी आवडली म्हणजे ती सारिकेच्या पदास पोंचते असा अर्थ ).

टाणेटोणे[1] शिकतों तरि सखि ! देतोंचि तीस उडवून;
सखि ! कोणालाहि किमपि, सुख चिर न मिळेचि सुकृत बुडवून. २१
दासी असो नसो परि जन कुब्जा म्हणति; काय ती कुबडी !
विदरीहि कामुका श्री;[2] घुबडाला काय नावडे घुबडी ? २२
होती पहिली कुबडी, बहुतचि केली[3] बरी परि सये ! ती,
शुभदैववृष्टि होतां, जनिस[4] फळें बहु वरीपरिस[5] येती. २३
हा[6] ऐसाही जन, न प्रियजनदर्शन, न मरण, तळमळतो;
तैसा कशास पदरीं घे प्रभुही वैरिचरणतळमळ[7] तो ? २४
निंदितजन होय मलिनपटसा शुचि, रजकसा[8] चिखळ मळतो,
तीर्थचि तीर्थीं मिळतां, जो गांवांतील दुष्ट खळमळ तो. २५
पूर्ण[9] लघुहि गुरुचि, सये ! वरिती घट गुरुहि बहु उणीव रिते;
महदाश्रय कीर्तिप्रद नसता तरि झटुनि कां गुणी वरिते ? २६

---

१. मंत्रतंत्र किंवा जादू. २. कामुका ( कामी पुरुषाला ) विदरीहि (कुरूप स्त्रीसुद्धां) श्री (=लक्ष्मीप्रमाणें दिसते ). ३. याचा कर्ता 'कृष्णानें' (अध्याहृत). ४. जन्मास. ५. वरी धान्याच्या लोंब्रापेक्षांहि. ६. हा ऐसाही जन = आमच्यासारखा सुंदर आणि शुद्ध जन म्हणजे आम्ही गोपी. ७. कंसाच्या तळव्यांचा मळ म्हणजे कुब्जा. या विशेषणावरून कुब्जेविषयीं गोपींचा तीव्र तिरस्कार व्यक्त होतो. ८. ( तो कृष्ण ) रजकसा ( =परटाप्रमाणें ) चिखळ ( चिखल=पाप ) मळतो ( मळून टाकतो-धुऊन टाकतो ). ९. अन्वयार्थः- सये ! पूर्ण लघुहि घट गुरुचि ( पाण्यानें भरलेले लहान घट गुरुचि = जडच होतात ); ( आणि ) रिते गुरुहि ( घट ) बहु उणीव वरिती. ( रिकामे मोठे घट हलकेच वाटतात ).

राधे ! साधे दैवें सर्वहि; तद्दत्त अंगराग मला
हेतु स्पष्ट तदद्भुतरूपा[1] तत्कामसंगरा गमला. २७
तरि अंगदान[2] आधीं बहु किंवा अंगरागदान वदा.
भक्तिच याला जिंकिल धरितांही संगरा[3] गदा नवदा. २८
सखि ! तरि हरि परिचर्याभक्ति करी हाचि[4], न जन चवकळती[5]
उष्णार्ता छायेची घडतां पळभरिहि भजन[6] चव कळती. २९
स्वकरें लेववुनि तिचे काढितहि असेल हा नग रतींत,
दासींत[7] यश हिमनगचि, कणसमचि असे लहान गरतींत.[8] ३०
अस्मत्कथा असो, ज्या त्या मथुरेंतील गुणवती महिला,
कुब्जातियशें लाजुनि, म्हणतचि असतील 'विवर दे' महिला.[9] ३१
तत्काळ विसर झाला, प्रेमरसें पूर्ण तो, कसा पहिला ?
त्या ती बेडी वेडी; या विश्वासूं नये जसें अहिला. ३२

---

१. अन्वयार्थः- तदद्भुतरूपा (त्या कुब्जेचें रूप दिव्य होण्यास) (आणि) तत्कामसंगरा (तिच्या रतियुद्धास म्हणजे कृष्ण तिच्याशीं रत होण्यास) तद्दत्त अंगराग (तिनें दिलेली उटी) (हाच) स्पष्ट हेतु मला गमला. कंसाकडे उटी घेऊन निघालेल्या कुब्जा दासीनें वाटेंत भेटलेल्या बलरामकृष्णांचे अंगास ती उटी लावली, ही कथा येथें अनुसंधेय आहे. २. श्रीकृष्णाला आम्हीं केलेलें शरीरसमर्पण. ३. अन्वयार्थः- (कृष्णानें) संगरा गदा धरितांही याला (त्याला) नवदा भक्तिच जिंकिल. भक्ताला मारण्याच्या हेतूनें कृष्णानें गदा उगारली तरी भक्तानें केलेली नवविधा भक्तिच त्याला (अखेर) जिंकील. ४. अन्वयार्थः- सखि ! तरि (म्हणूनच) परिचर्याभक्ति (सेवारूपीभक्ति) हरि हाचि (आपलासाच) करी. ५. न चवकळती=अनुभवून पहात नाहींत. ६. सेवन, अनुभव. ७. दासींबरोबर संबंध ठेवण्यांत. ८. गृहवतींबरोबर- कुलीन स्त्रियांबरोबर. ९. पृथ्वीला, 'दे माय धरणी ठाय' या म्हणीचें हें रूपांतर आहे.

बहु शत झटलों, सुदृढें प्रेमगुणें जो न गोंविला, सवती !
कुब्जे ! कोण म्हणेल स्नेहीं याच्या तगों विलासवती ? ३३
आम्हांसि आमुची बहु, तीची चिंता वृथाचि कां पडली ?
कवड्यांची न मिळावी, परि मणिमाळा पथींच सांपडली. ३४
चित्तीं क्षणक्षण मला, वाटे दासीस नच वरील हरी;
अमृताब्धिच्या, निजगुणें परिभूता करिल न चवरी,[2] लहरी. ३५
कुब्जा राणी हरिला, बहु कुब्जेलाहि आवडेल हरी;
लहरीस सिंधु संतत, सिंधुसहि सदैव आवडे लहरी. ३६
गोरी नसावि कुब्जा, बहुधा काळीच ती असावि खरी;
जेंवि घनतमी संगम; आंधार तरीच हा असा विखरी.' ३७
'हो[4] काळी कीं गोरी, तद्विषया श्रुत नसो मला वाणी;
तत्संग्रहें हरि तसा तापद, पाळुनि न सोमला[5] वाणी.[6] ३८
कुब्जा धन्या जैसी, आद्या[7] प्रभुचे[7] वरूनि पाय सती;
बहुधा क्षुधितां वाढी शतजन्में बहु करूनि पायस ती. ३९
सर्वाधरामृताच्या[8] वाटावी काय न रिपुसी पानें[8] ?
मुरली भली; मुखा या हे रस सेवूनि तरि पुसी[9] पानें.[9] ४०

---

१. हें विशेषण पुढील चरणांतील कुब्जे! या विशेषणाबरोबर घ्यावें. २. चवरी पांढरी असली तरी अमृतसमुद्राच्या शुभ्र लाटांची बरोबरी ती करणार नाहीं. ३. काळा मेघ व काळोखी रात्र यांचा. ४. येथून दुसऱ्या गोपीचें भाषण सुरू होत आहे. ५. एकनकारच्या विषारी क्षाराला. ६. वैश्यवृत्तीचा मनुष्य. ७. आदिनाथ शंकराचे. ८. अन्वयः– सर्वाधरामृताच्या पानें (ती कुब्जा) रिपुसी न वाटावी काय? श्रीकृष्णाच्या सर्व अधरामृताचें पान करणारी ती एकटी कुब्जा आम्हांला शत्रूसारखी न वाटावी काय ? ९. पुसी पानें = पानें पुसत होती. येथें 'पानें पुसणें' म्हणजे 'फसविणें' हा अर्थ घेऊं नये. तर श्रीकृष्ण गोकुळांत असतांना त्याचें अधरामृतपान करणारी मुरली जेव्हां जेव्हां

इचि[1] तसि तिचिहि[2] गति, करुनि परसर्वस्वापहार कल्याण[3] ?
भूतद्रोहिजनाश्वीं[4], घालीच विपत्प्रवीर[5] पल्याण.[6], ४१
'सखि ! ती सुखी असो गे ! श्रीकृष्णासीं करूनि केलीला,[7]
आम्हीं अशा दशेला पात्र दुरितपथ धरूनि केलीला.[8] ४२
वाटे श्रीसहि दुर्लभ पावे ती रूपभाग्य जें विदरी
केली प्रभुप्रसादें गुरु, गुहगुरुनें[9] वसोनि जेंवि दरी. ४३
दासी कुब्जा पहिली, होउनि विभुसीं रमे सती सरळी;
मोठें पुण्य ! मिळाली जी न प्राप्ता रमेस तीस रळी.[10] ४४
चिंता तत्प्रियचि सखी, हें तीसीं आमुचें असे नातें.
वसविल निजदयित-मनीं, ती अस्मत्प्रेम जें असेना तें. ४५
विपरीता गति होती, सखि ! जों जों भाग्य होय भरभरतें,
उलटी, नदीस आलें, जें मिळतां सिंधुतोय-भर भरतें. ४६

---

कृष्णमुखापासून दूर होई तेव्हां तेव्हां आम्हां गोपींना त्याच्या अधरामृताचा लाभ मिळे. एखाद्यानें गोरस पिऊन टाकलेलीं पानें चाटूनहि दुसरा एखादा थोडासा तृप्त होतो, त्याप्रमाणें मुरलीपासून दूर झालेल्या कृष्णमुखाच्या आस्वादानें आमच्या मुखाला तेवढें तरी समाधान लाभे असा अर्थ घ्यावा. परंतु आतां श्रीकृष्ण मथुरेस गेल्यामुळें तेंहि मिळत नाहीं, असें गोपी म्हणते.

१. मुरलीची. २. कुब्जेची. ३. याचें पुढें 'कसें होईल ?' हें क्रियापद घ्यावें. ४. प्राण्यांचा द्रोह करणारा जो मनुष्य तोच कोणी घोडा, त्यावर. ५. विपत्तिरूपी स्वार. ६. खोगीर, जीन. ( दुसऱ्याच्या सुखांत जो माती कालवतो त्याच्या मागें कुदशा लागते हा भाव ). ७. क्रीडेला. ८. अन्वयार्थ— दुरितपथ ( पापमार्ग— स्वपति सोडून कृष्णाच्या मागें लागलों हा मार्ग ) धरूनि केलीला ( केलेल्या, मिळविलेल्या ) अशा दशेला आम्ही पात्र ( आहों ). ९. कार्तिकस्वामीच्या पित्यानें म्हणजे शंकरानें. १०. थट्टामस्करी.

भगवत्पदाश्रिता ती सांभाळिल भरुनि[1] कां न दीनातें ?
स्वाश्रित नदीशताचें रक्षि दया करुनि कां नदी[2] नातें ? ४७
त्या श्रीपदाश्रितजनें कवणें कवण न कृतार्थ? सांगा तें,
शरणागतार्थ सादर शिबि[3] शिर वेंची, दधीचि[4] आंगातें. ४८
प्रियसखि ! असो सपत्नी नीचा, जाणोहि न जप तप दासी;
सेवादर बहु वाटे, श्री बसली तेंवि न जपत पदासी. ४९
जाची, सखि ! गासि तिचा सेवादर बहु म्हणोन हें मातें;
लोह रुचो प्रभुसि गुणें, त्यापरिस उणें म्हणो न हेमातें. ५०
अस्मत्सेवादर बहु दासीसेवादरापरिस न कसा ?
बकसा[5] जपला हा जन, दृष्टांत असे बरा परि सनकसा.[6] ५१
सोडुनि पति, सुत, गुरु, गृह, अशन, वसन, धर्म, नीति, भी, लज्जा,
तज्जात्युत्पळकोमळविमळचरणकमळसुभजनीं[7] सज्जा.' ५२
'सत्य वदसि तूं सखिये ! तेव्हांचें वृत्त गेह[8] भानाचें,[8]
येणें[9] श्रीदत्ताचें जैसें तैसेंचि देहभानाचें. ५३

---

१. स्वतः पूर्ण होऊन. २. गंगा-**पंत**. ३. इंद्र व अग्नि यांच्या सत्त्वपरीक्षेंत उतरलेला एक राजा. ४. वृत्रासुराला मारण्याकरितां लागणारें वज्र तयार करण्यासाठीं इंद्राला आपलीं हाडें देणारा ऋषि. ५. बगळ्याप्रमाणें. ६. ब्रह्मदेवाच्या पुत्रासारखा. एकाग्रचित्तानें परमेश्वराचें ध्यान करण्याबद्दल याची प्रसिद्धि आहे. ( बगळ्याच्या दृष्टांतापेक्षां सनकाचा दृष्टांत बरा, असें गोपी म्हणतात ). ७. तत्+जाति+उत्पल...इ. =त्या कृष्णाच्या, जाइचें फूल ( अथवा ) नीलकमल याप्रमाणें, कोमल अशा सुंदर पायांच्या सेवनांत. ८. भानाचें गेह=आठवणींचें स्थान. ९. अन्वयार्थ:— जैसें ( स्वैरसंचारी ) श्रीदत्ताचें ( त्याच स्थळीं पुन्हा ) येणें ( आगमन ) ( अनिश्चित ) तैसेंचि ( आमच्या ) देहभानाचें ( अनिश्चित असे ).

गीत परिसतांचि भुले मन, कीं तैसाचि आननीं कवळ,
जवळ क्षिप्र भिडावें प्राशाया अमृत जें मुखीं धवळ. ५४
हासति[1] सकाळ सासूबाई नाकीं तसी गमे बाळी;
हास्य[2] करी 'बंधु' म्हणुनि मातुळ जी कीं जसी रमे बाळी. ५५
तें कुंकुमा पद[3] नयन, सखि ! कज्जळ जें तया पद[3] कपाळ,
हा नाथा ! आम्हां जरि न प्रतिपाळिसि, दयापदक[4] पाळ.[5] ५६
स्मरवुनि, रिझवुनि, खिजवुनि विरह तुझा फार बायकां गांजी,
ती यां स्थिरता[6] आली, भजली मेर्वादि[7] नायकां[7] गा ! जी. ५७
दुःसह विरह; दयार्द्रें[8] सोडाया क्षण न तीसहि सकावें;
देवुनि उष्णीष[9] पुन्हा, कैसें, करितां[10] नतीस,[10] हिसकावें ? ५८
निववाऱ्या होत्या हो प्रभुजी ! दावून पाय या दासी,
जीवनदानें निववी घन बहु एका न काय यादासी ?[11] ५९

---

१. अन्वयार्थ :– सकाळ (सकाळीं) सासूबाई हासति तसी (त्याबरोबर) बाळी (कानांत घालण्याचा जिन्नस) नाकीं (नाकांत आहे असें) गमे (लक्षांत येई). २. अन्वयार्थ :– (कृष्णाच्या मुरलीरवानें आम्ही इतक्या बेहोष होत होतों) कीं, जी बाळी (अल्लड कन्या) जसी रमे (तशा आम्ही गोपी रममाण होऊन जो) मातुल (मामा, त्याला) 'बंधु' म्हणुनि (हाक मारतांच तो) हास्य करी. (मामा कोणता आणि बंधु कोणता एवढेंहि भान आम्हांस रहात नसे). ३. स्थान. ४. दयेचें ब्रीद. ५. संभाळ, राख. ६. (दगडासारखी) निश्चलता. ७. मेरु आदि (पर्वत-) श्रेष्ठांना. ८. अन्वयार्थ– (त्वां) दयार्द्रें तीसहि (कुब्जेलाहि) क्षण सोडाया न सकावें. कुब्जेवरील प्रेम कमी करावें असें आमचें म्हणणें नाहीं. पण आमच्यावरीलहि पूर्ववत् ठेवावें. ९. डोक्याला गुंडाळण्याचें वस्त्र; पागोटें. १०. नतीस करितां = नमन केलें असतां. ११ जलचराला; मत्स्याला. अन्वयार्थ :– घन जीवनदानें एका (च) यादासी निववी काय? न बहु ? त्याप्रमाणें तूं आम्हांवराहि दया कर.

दर्शन मात्र बहु सये ! कर जोडियलेचि अंगसंगातें;
भेटि असो, कीर्तिहि करि जें तापशमन, करी न गंगा तें. ६०
हरियशचि व्रजहृदया[1] धाम,[2] जसें तोय धाम[2] यादासी,
भजुनि हरि जनां पावो; हरिला ती, जेंवि नामया[3] दासी.[4] ६१
वाटे स्पर्शमणि प्रभु, जी कुब्जा काय ती पहार मला,
बहुकरुण सजुनि तीसीं, असतां श्री आयती[5], पहा रमला. ६२
प्रेमें दे गंध, तिसीं देव ब्रह्मांडभवनदीप रते,
प्रभुगुणगात्या[6] गरुडा व्याळीसी त्यजुनि भवनदी परते. ६३
सुकृतज्ञत्वादि गुणें अतुळें, बहु मानवेलचि रमा या;[7]
कुब्जेवरि करिल तिचा सिंचुनि बहुमान वेल चिर माया. ६४
सर्प जसा सदनांतुनि, चित्तांतुनि वैरभाव सखि ! जावा,
तेव्हां माने[8] तैसा, आतांहि सखा मुकुंद न खिजावा.[9] ६५
श्रीकुब्जे ! श्रीकृष्णा ! हा जन चुकला तुम्हांसि निंदून,
नमितों, क्षमा करा हो ! क्षमित्याचें यश नसेचि इंदून.'[10] ६६
गोपी विनवित होत्या, ऐसे गावून गोडवे दात्या,[11]
ज्याचें गातां लागे यश, अमृतापरिस, गोड वेदा त्या. ६७

---

१. गोकुळवासी सर्व लोकांच्या मनाला. २. विश्रांतिस्थान, राहण्याचें ठिकाण. ३. नामदेवाला. ४. जनाबाई. (या उपमेमुळें कालविपर्यासाचा दोष झाला आहे). ५. सहज मिळणारी. ६. अन्वयार्थ :– प्रभुगुणगात्या गरुडा (प्रभुगुण गाणारा हाच कोणी गरुड त्याला) भवनदी (संसाररूप नदी) व्याळीसी (गरुडाला पाहून सर्पीण ज्याप्रमाणें पळून जाते तशी) त्यजुनि परते. प्रभुभक्ताला संसारव्यथा बाधत नाहीं हा भाव. ७. देवास–**पंत**. ८. (आम्हांला) आवडे. ९. खिन्न व्हावा. १०. इंदु + ऊन = चंद्राहून (धवलत्वानें) कमी. ११. उदार अशा कृष्णाला.

प्रभुनें दिली द्विजां निजरसपाकांतील गोड वेद-वडी;
भक्तमयूरार्तीतें[1] प्रभुघन, गातांचि गोडवे दवडी. ६८

( वृत्त-इंद्रवज्रा )

हे गोडवे, नामहि गोडवाचि । ग्रंथा, तरे, जो जन गोड वाची,
वाचा, न वाचे तरि वाचवा जी ! । वैकुंठयात्रोचित[2] हाच वाजी.[3] ६९

---

## ( ९ ) भृगुचरित्र[4]

( वृत्त-रथोद्धता )

जी सुखप्रद सरस्वती धुनी[5] । सेविली सतत सर्व साधुनीं,
तत्तटीं करिति सत्र सन्मुनी । जे स्वकर्मरत नित्य जन्मुनी. १

( वृत्त-वसंततिलका )

मोक्षार्थ सत्र करिती ऋषि सर्व हो ! ते,
जेथें स्वयेंचि यजमानहि तेचि होते;
तेव्हां वितर्क[6] करि त्या मुनिची सभा जी !
जो[7] तत्क्षणेंचि भवबीजकणास भाजी. २

---

१. आर्ति = दुःख. २. वैकुंठाच्या यात्रेला योग्य. ३. घोडा. ४. मूळ भागवताच्या दशमस्कंधांतील एकोणनव्वदाव्या अध्यायांत 'भृगुचरित्र' वर्णिलें आहे. भृगु हा ब्रह्मदेवाचा पुत्र. त्यानें मुनींच्या विनंतीवरून ब्रह्मा, विष्णु, महेश यांची सत्त्वपरीक्षा केली. तींत विष्णु श्रेष्ठ ठरला असा कथाभाग यांत वर्णिला आहे. ५. नदी. सरस्वती ही नदी सांप्रत प्रयाग (अलाहाबाद) येथें गंगायमुनांच्या संगमांत गुप्तरीतीनें मिळाली आहे. म्हणूनच त्या तीर्थाला 'त्रिवेणीसंगम' असें म्हणतात. पूर्वी ही नदी दृश्य होती व तिचे कांठीं अनेक सत्रें झाल्याचें वर्णिलें आहे. ६. वाद, ऊहापोह, विचार. ७. वितर्क.

( वृत्त–शालिनी )

ब्रह्मा, शंभू, विष्णु, तीघे समर्थ । यांच्या दासा प्राप्त होती पुमर्थ;[1]
तत्तद्भक्तां भासती तेचि भारी । शैवां शंभू, वैष्णवां कैठभारी. ३

( वृत्त–इंद्रवज्रा )

तत्त्वें परी कोण बरा तिघांत ? । ज्याचें पदध्यान भवातिघात,[2]
सर्वांसही जो सुलभ स्वभावें । ज्याच्या हरे ताप निज स्वभावें. ४

( वृत्त–भुजंगप्रयात )

तराया भवाब्धींत अज्ञा नराशी । तिहीं प्रार्थिला श्रीभृगु ज्ञानराशी;
परीक्षा करायास तो सिद्ध झाला । जनीं सर्वही जाणती सिद्ध[3] ज्याला. ५

( वृत्त–उपजाति )

श्रीसत्यलोकाप्रति तो द्विजाती । गेला, न जेथें विषयेच्छु जाती;
करी परीक्षा भृगु तो पित्याची । न होय दुर्बुद्धि तथापि त्याची. ६

( वृत्त–द्रुतविलंबित )

स्तवन वंदन तो कवि धातया[4] । न करि जाउनि लोकविधातया,[5]
म्हणुनियां विधि तो बहु तापला । गणि मनीं अवमानचि आपला. ७

( वृत्त–भुजंगप्रयात )

विवेकेंचि[6] तो कोप, तापास वारी । करी शांत जैसें, स्वबापास वारी,
नमस्कार तों हस्त जोडूनि घाली । मनीं लाज तेव्हां विधीच्या निघाली.८

---

१. ( चारी ) पुरुषार्थ = धर्म, अर्थ, काम व मोक्ष. २. संसाराचा ( ऐहिक बंधनाचा ) पूर्ण उच्छेद. ३. दिव्य दृष्टीचा महर्षि. ४. ब्रह्मदेवाला. ५. सृष्टिकर्त्याला. ६. अन्वयार्थ:- जैसें वारी तापास शांत करी, ( तैसें ) विवेकेंचि तो कोप ( शांत करी ), ( आणि ) स्वबापास वारी (= निवारी ).

पहाया प्रभू योगियातापसाचा। क्षणें जो हरी चिंतितां ताप साचा,
परीक्षा कराया, पहायास भावा[१]। भृगू जाय जो भूरहा[२] यास[३] भावा.[४] ९

( वृत्त-स्रग्धरा )

'आला भेटावयाला मुनिवर भृगु हा सौहृदें भाउ मातें,'
सामोरा देव जातां, निरखि कुतुक तें दिव्यशोभा उमा ते.
इछीना हा शुचित्वें पितृवनवसतिप्रेतपालिंगनाशी[५],
ज्याचें[६] नेत्रें पहातां सुखशिशिर भवोग्रातपा लिंग नाशी. १०

( वृत्त-उपजाति )

तों बुद्धि जाली असि भूतपाची[७]। कीं "हा म्हणे 'मी निजभू तपाची.'
ज्येष्ठावमानीं रत हा असाधू। मरो क्षणें, शूळ[८] यशासि साधू." ११

( वृत्त-शार्दूलविक्रीडित )

ज्याणें हा मुनि पोटिसीं धरुनियां व्हात्रेंचि रोमांचित,
जो सर्वज्ञ, जनीं[९] पदाप्ति[९] करिता[९], सत्कर्म, सोमांचित,[१०]
तो कोपें विभुचा भुज, ज्वलदपांपित्तार्चिच्या[११] अग्रजा[११]
शूळा घे, बहु फारसें पटु पविछेदी[१२] असें अग्र ज्या. १२

---

१. भावा=भावाला, बंधूला. (भृगु हा शंकराचा भाऊ कसा तें पुढील श्लोक १४ मध्यें सांगितलें आहे). २. भूरहा ( भू म्हणजे सृष्टि व रह म्हणजे गुप्त बीज, विश्वाचें गूढतत्त्व, जो शंकर त्याला ). ३. यास=त्यास. ४. भावा=माना, समजा. ५. स्मशानांतील प्रेतांचा राजा जो शंकर त्याच्या आलिंगनाला. ६. अन्वयार्थः– ज्याचें ( ज्या शंकराचें ) सुखशिशिर ( सुख देणारें व थंड ) लिंग नेत्रें पहातां भवोग्रातपा ( संसाराच्या भयंकर तापाला ) नाशी. ७. भूत + प=( भूतपति ) जो शंकर त्याची. ८. ( माझा ) त्रिशूळ ९. लोकांना पदप्राप्ति ( =मोक्षपदाचा लाभ ) करून देणारा. १०. ( शीतल ) चंद्रानें युक्त. ११. ज्वलत् ( पेटणारा ) + अपांपित्त ( अग्नि ) + अर्चि ( ज्वाळा ). पेटणाऱ्या अग्नीच्या ज्वाळांच्या अग्रजाला ( मोठ्या भावाला = शूळाला ) येथें लखलखणाऱ्या शूळाचें साम्य धगधगणाऱ्या अग्निज्वाळेशीं केलें आहे. १२. इंद्राच्या वज्राचाहि छेद करण्यास समर्थ असें अग्र.

(वृत्त-शिखरिणी)

प्रगल्भा, मानाची वसति, गिरिजा आपण चितीं[1]
न भी वारायाला स्वसुखनिधिला आपणचि ती.
तिला आलिंगाया नवहि[2] भुज[2] जेव्हां सरसती,
न संकोचे, बोले शिवहृदयहारी सरस ती. १३

(वृत्त-शालिनी)

रक्षायाला तत्क्षणीं देवरा[3] हे । पायां लागे, तों उगा देव राहे;
तीणें शांतक्रोध तो शंभु केला । तोही तीच्या प्रेमभावीं भुकेला. १४

(वृत्त-शिखरिणी)

बुझायाला[4] गोत्रस्खलनिं जिस विश्वंभर नमी,
म्हणे जी कोपानें, 'परि नुति करा शंभर, न मीं;[5]'
स्वयें विप्रत्राणास्तव रमणपायांवर तनू
त्यजी ते, अक्रोधा करि भुवनपा[6] या वरतनू. १५
क्षणीं जीची दृष्टी सहज भुवनें शंभर विती,
सुखग्रासीं जी कीं निजभजकतोकां भरविती,
स्वयें विप्रत्राणास्तव रमणपायांवर पडे:
तदा[7] जाले लोकीं पद दशभुजांहीं वरपडे. १६

---

१. ज्ञानशक्ति. २. शिवाला दहा हात आहेत; परंतु एक शूळानें अडल्यामुळें त्यानें नऊ हातांनींच पार्वतीला आलिंगन दिलें. ३. दिराला (भृगुऋषीला). ४. नांव घेण्यांत झालेली चूक भरून यावी म्हणून. (येथील कथेचा पूर्वसंदर्भ लक्षांत येत नाहीं). ५. मीं न = मी तिकडे ढुंकूनहि पाहणार नाहीं. ६. विश्वपाळक शंकराला. ७. अन्वयार्थः- तदा लोकीं (शिवाचे) पद (पाय) (त्याच्याच) दशभुजांहीं वरपडे जाले. (वरपडे जाले = वर पडलेले झाले), तात्पर्य, पार्वतीला वर उचलण्यासाठीं शिवाचे हात पायांकडे गेले.

(वृत्त–द्रुतविलंबित)

त्यजि पदाप्रति ते अगजा[1] न, न। क्षण जिला स्मरलाहि गजानन[2],
विगतरोष करी पतिला सती। नुरवि हो! प्रभुकोपतिलास[3] ती. १७

(वृत्त–उपजाति)

चरित्र तें पाहुनि शंकराचें। सर्वांचिया त्या अभयंकराचें;
आसादिलें[4] त्या मुनिनें[5] लवानें[6]। वैकुंठ चित्तें[7] अतिपेलवानें. १८

(वृत्त–शिखरिणी)

रमोत्संगीं[8] ठेवी रसिक विभु सर्वोत्तम उसें,
तदंकाला मानी भुवनपतिचें चित्त मउसें.
मिषानें निद्रेच्या मुनिहृदयसद्मासुप[9] तिला
उशीला निंदूनी करि मुदित पद्मा सुपतिला. १९

(वृत्त-शार्दूलविक्रीडित)

होता जागविला जणों हरिजनें एकादशीकीर्तनें,
जाला श्रांत विशुद्धभक्तभजनप्रेमाचिया नर्तनें;
यासाठीं निजला उगाचि, करुनी लक्ष्म्यंक पल्यंकसा,
त्या सौख्यांत पदप्रहारविषयीं नि शंक हा[10] हो कसा? २०

(वृत्त–स्वागता)

कीर्तनीं स्वगुणकीर्तनगोडी। ती सुधेंत तंव केवळ थोडी;
स्वस्वरूपरुचिहेतुसमाधी[11]। तो न सुप्त हृतसर्वसमाधी. २१

---

१. पार्वती. २. त्यावेळीं प्रत्यक्ष मुलाची (गजाननाची) सुद्धां आठवण तिला झाली नाहीं. ३. शंकराच्या क्रोधाच्या लवलेशाला. ४. गांठिलें. ५. 'त्या मुनिनें' या ऐवजीं पंतलिखित दुसरा पाठ 'विप्रनृपें.' ६ क्षणार्धांत. ७. अतिशय कोमळ मनाचा जो (भृगु) त्यानें. ८. लक्ष्मीच्या मांडीवर. ९. मुनिजनांच्या हृदयरूप गृहांतील प्राणांचा स्वामी (अशा सुपतिला=विष्णूला). १०. भृगु. ११. आत्मस्वरूपाची गोडी चाखण्याचा ज्यांचा हेतु (असे जे योगी) त्यांचा समाधि (चिंतनाचा विषय) जो विष्णु तो.

( वृत्त-शिखरिणी )

करावा जागाही, परि बहु सती लाजवट ती,
मनीं, हीस प्रेमें कुलयुवतिलीला जवटती;[१]
प्रबुद्धांचा राजा कपटमयनिद्रा कवळितो,
करानें लोटावा, तरि विभु अणी[२] द्राक[३] वळतो.[३] २२
द्विजाचा लाभाचा समय अ-सुसंपाद[४] पळतो;
उभा आहे श्रीमन्मुनिवर पुढें पादपळ[५] तो.
पदस्पर्शें होता सदयविभुला जागर, तरी[६]
नसे, संकष्टाचा अपरिमित[७] तो सागरतरी.[८] २३

( वृत्त- भुजंगप्रयात )

न[९] आहे म्हणावा जरी देव जागा। कळेना; मना! वाद हा ठेव जा गा!
तुम्ही वर्ततां देव कैसा निजेला?। धरी तो बळें कौतुकानें निजेला. २४

( वृत्त-वसंततिलका )

'सर्वज्ञ[१०] विप्र मम सत्वपरीक्षणासी
आला चुकावुन, वदोनि परी क्षणासी;'[११]
हा यामुळें कुतुकराशि निजोनि घोरे,
तो[१२] विप्र केंवि निजसिद्धिपथीं निघो रे! २५

---

१. बिलगती. २. आणि, आणखी. ३. शुद्धरूप 'द्राक्'=लागलीच वळतो=कुशीला वळतो ( व झोपेचें सोंग करितो ). ४. अनायासें न लाभणारा. ५. पादपळ=पादपर=( विष्णूच्या ) पायाला स्पर्श करीत असलेला. ६. तरी नसे= भृगूनें पायाला स्पर्श केला तरी प्रभूला जागेपणा आला नाहीं. कारण तो संकष्टाचा सागरतरी अपरिमित ( अचिंत्य ) होय. ७. येथें **पंत**लिखित दुसरा पाठ-'न परिमित' असा आहे. ८. सागरांतील होडी ( प्रमाणें ). ९. हें म्हणणें कवीच्या मनाला व श्रोत्यांना अनुलक्षून आहे. १०. ह्या दोन चरणांत विष्णूच्या मनांतील बेत कवीनें सांगितला आहे. ११. योग्य वेळेला. १२. याचे मागें 'असें जर विष्णूनें केलं नसतें तर' हें वाक्य अध्याहृत समजावें.

( वृत्त-द्रुतविलंबित )

'कुतुकनिद्रित देव' असें खरें। वळखिलें हृदयीं मुनिशेखरें;
वदन पाहुनि तो भुलला, तरे। सुखह्रदीं न- न ते मुनिलात[1] रे! २६

( वृत्त-शार्दूलविक्रीडित )

पादांभोजरसासवें[2]करुनियां तो भूलला बाळक,
पायें जागविला, करा[3] समजुनी, लोकत्रयीपाळक;
किंवा पद्मनिवासिनी भृगुसुतावासार्थ[4] शुद्धा[5] पदा
लावी, तीर्थ करी, मुकुंदहृदया त्या भक्तचिंतास्पदा. २७

( वृत्त-भुजंगप्रयात )

स्वदासासि अक्लेशची दे वराशी[6]। तया श्रीवराशी शचीदेवराशी;[7]
उरीं तो करी साधु लत्ताप्रहार। तुटे तों गळांतीलही क्षिप्र हार. २८

---

१. भृगूनें विष्णूच्या हृदयावर लात=लाथ मारली; परंतु ती लात नव्हे- असें कवि आग्रहानें सांगतात. कारण काय, तर विष्णूचें वदन पाहून तो भृगु भुलला व सुखह्रदीं (आनंदाच्या डोहांत) तो पोहूं लागला. त्यावेळची मुनीनें पाय झाडून पाण्यांत मारलेली ही सुरळीच होय, असा कवीचा अभिप्राय आहे. (येथें 'सुखह्रदीं' या शब्दामुळें यतिभंग झाल्यासारखें वाटेल. परंतु 'प्र' व 'ह्र' या अक्षरांमागील अक्षरास विकल्पानें दीर्घत्व येतें असा नियम असल्यामुळें तो दोष येथें झालेला नाहीं). २. (विष्णूच्या) चरणकमलांतील रस (भक्तिरस) रूपी मद्य, त्याच्या योगानें. ३. (भक्तिरसमद्यानें उन्मत्त झाल्यामुळें पायालाच) हात समजून. ४. भृगुरूपी बालकाला वसतिस्थान मिळावें या हेतूनें. ५. (भृगूच्या) शुद्धा पदाला. ६. वर+आशी=उत्तम आशीर्वाद. ७. शची+देवर=इंद्राणीचा दीर (विष्णु), त्याला. वामनावतारांत विष्णु हा इंद्राचा धाकटा भाऊ (उपेंद्र) झाला होता. म्हणून तो इंद्राणीचा दीर होय.

( वृत्त-स्रग्धरा )

ज्याची भक्तिज्ञलोकीं[1] अमृतनिधि, अशा विश्वपाला तयातें,
मारी हो ! तो परीक्षेस्तव हृदयिं भृगू सत्तपा[2] लात यातें;
तों हा विप्रावमाना समजुनि उठला, तो गमे घाबरा हो !
'या सत्वें तूंचि देवीं स्वजनशिखिदयाकाळमेघा![3] बरा हो.' २९

( वृत्त-शिखरिणी )

जयाच्या पायाचा रज विभव होतो निज सुरां,
उठे पादस्पर्शें गडबडुनि हो ! तो निजसुरा.[4]
जयासाठीं योगी जन अनशनानें[5] तळमळे,
तयाचा विप्राच्या चरणनमनीं कुंतळ मळे. ३०

( वृत्त-पृथ्वी )

उठे, गडबडोनियां उतरुनी पलंगातळीं,
करी मुनिपदास तो विरज[6] आपल्या कुंतळीं.
नमस्करुनि आसनीं बसविला महा आग्रहें,
कृतार्थ भृगुला करी असकृदंघ्रियुग्मग्रहें[7]. ३१

( वृत्त-वसंततिलका )

'येणें तुजें न दिधलें मज होउं ठावें,
प्रत्युद्गमार्थ[8] पहिलें तुज हो ! उठावें.

---

१. पंडितांच्या समूहांत. याचे पुढें 'ख्याति आहे' असे शब्द अध्याहृत समजावे. २. उत्तम तप ज्याचें असा. ३. आपल्या भक्तरूपी मोरांना आनंद-विणाऱ्या दयेच्या काळया मेघा! (हा चरण कवीनें विष्णूला उद्देशून लिहिला आहे.) ४. अर्धवट झोंपेंत असलेला; निद्रालु (असें विष्णूचें नांव आहे). ५. उपासतापास करून. ६. धूलिरहित, स्वच्छ. ७. अनेक वेळां (त्याचे) दोन्ही पाय धरून; त्यांना मिठी मारून. ८. सामोरे येण्यासाठीं; स्वागत करण्यासाठीं (उठणें).

मराठी

माझा खराचि सदया ! अपराध राया !
तूं शांतिला क्षमचि सत्वपरा ! धराया. ३२

( वृत्त - शार्दूलविक्रीडित )

हें माजें हृदय प्रभो ! कठिन कीं, त्वत्पाद हे कोमळ,
स्पर्शानें तरि यांचिया मम हृदावासीं[1] न ठाको मळ !
ताता ! हें दुखलें असेल पद कीं, आज्ञा स्वदासा धुया
द्यावी, क्षाळुनि धन्य होइन जनीं मीं त्वत्पदा साधु ! या. ३३

( वृत्त - वसंततिलका )

क्षाळूनियां पद, कणा[2] अवनेजनाच्या[2],
घेईन, साधिन यशा अवनें[3] जनाच्या.
मातेंहि, मद्गतहि[4] साधुसभाजनातें,
तारीन हो ! करुनि साधुसभाजनातें.[5] ३४

( वृत्त - स्रग्धरा )

जालों मीं श्रीनिवास प्रभु तवचरणस्पर्शपूतांग[6] देवा !
चापा, चक्रा, भुजा वा बळ मुनिचरणद्वंद्व धूतां, गदे वा.
आधीं पूजा करूं दे, मग कर करणें सत्तमा ! ज्या निदेशा,[7]
जेणें घेऊनि आलें तुज भुवनगुरो ! चित्त माझ्या[8] निदेशा.[8] ३५
तीर्थाचें तीर्थकारी, इतर जळ नसे हें जसें पातकारी,[9]
हें पीयूषाभ[10] वारी,[10] भजकसुख,[11] पिपासोद्भव[12] क्षोभ[12] वारी.

---

१. हृदयरूपी घरांत; अंतःकरणांत. २. प्रक्षालनाच्या पाण्याच्या थेंबाला. ३. रक्षणानें. ४. माझ्यांतील; माझ्या अंतःकरणांतील. ५. साधूंच्या पूजनाला. ६. तुझ्या पावलाच्या स्पर्शानें पवित्र झालें आहे ज्याचें शरीर असा मी. ७. आज्ञेला. ८. माझ्याजवळ. ९. पापाचा शत्रु. १०. अमृतासारखें पाणी. ११. भक्तांना सुखविणारें. १२. तहानेनें ( भोगतृष्णेनें ) उत्पन्न होणारी मनाची तळमळ.

देती ऐश्वर्य भारी, भुवनमहित मीं या पदें कैटभारी,
हे माझी कीर्ति सारी, द्विजपदयुगळी सर्व संताप सारी. ३६

( वृत्त-शिखरिणी )

भवत्पादाब्जांचे दृढ वसति चित्तीं भरवसे,
बळें[1] या[1] घेवूनी अहिपति[2] शिरीं भूभर वसे,
भवत्पादार्चेनें सकळ सुरवृंदा महित मीं,
असें तापार्तांचा विधु, तरणि उद्दामहि[3] तमीं.[3] ३७
भवद्द्वंदापासीं[4] मम मन बसे वेचित रती,
भवाब्धीतें सारे द्विजचरणसेवेचि तरती.
तुम्हीं[5] स्वस्वाधीन क्षितिसुर तपस्वी जग वितां,
लया नेतां, कांहीं समय कुतुकानें जगवितां. ३८
तुम्हीं[5] त्रैलोक्याचे अभयसुखदेते, वसविते,
अविद्याध्वांताचे सदुदित धरादेव सविते;
भवन्माहात्म्याला अवधिच नसे शोधकमतें;
असें जाणायाला पदनमन हें बोधक मतें.[6], ३९

( वृत्त-वसंततिलका )

ब्रह्मण्य[7] देव हरि यापरि गोड बोले,
प्रेमेंकरूनि धृतसात्विकभाव डोले.
हातें हळूचि रगडी पद देव दोनी,
विप्राशि दुर्लभ असें सुख दे वदोनी. ४०

---

१. या बळें=या पायांच्या शक्तीमुळें. २. शेष. ३. अत्यंत गर्द अंधारांत. ४. आपल्या (पायांच्या) जोडीजवळ (द्वंद=द्वंद्व). ५. येथें दोन्ही ठिकाणीं पंतांनीं 'तुमीं' असें लिहिलें आहे. ६. मला, मातें. ७. शुद्धशील; ब्राह्मणाविषयीं दयाळु.

( वृत्त–द्रुतविलंबित )

करि करें मग साधु–सभाजन[1] । स्तविति ज्याप्रति साधुसभाजन;
करुनियां चरितें हरितो मला[2] । बहु भला गमतो हरि तो मला. ४१

( वृत्त–स्रग्धरा )

केलें ब्रह्मण्य देवें अतुळ कुतुक हें तारक श्रेष्ठ आजी,
आजा[3] धूतो पदातें, वर मुदितमनें घालिते नीर आजी.
नाहीं संकोच, पूजा गुरु[5] करि, बहुधा टाकिली लाज नातें.[6]
हें गातां शीघ्र तारी, परि बरि हरिची सत्वलीला जनातें. ४२

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

सारे सात्विकभाव या वसुमतीदेवास[7] झाले, तसे
जे तद्भक्त तदीय देहचि तशा त्या भूषणा लेतसे,[8]
तो श्रीकांतदयापयोद, मुनि तो भासे मयूराभ[9] रे !
प्रेमानें भरतें अनुक्षण[10] तदा तद्बाष्पपूरा भरे. ४३

( वृत्त–प्रहर्षिणी )

वंदी तो भृगु सकलक्षमानदातें[11] । दासांच्या सुरवरलक्षमानदातें[12]
गेला तो मुदित सरस्वतीस सत्रा । घेऊनी हरिगुणसद्रतींस[13] सत्रा.[14] ४४

---

१. भृगूचें पूजन. २. मलाला; पापाला. ३. विष्णु. ( भृगु ब्रह्मदेवाचा मुलगा आणि ब्रह्मदेव विष्णूचा मुलगा. म्हणून विष्णु भृगूचा आजा झाला ). ४. लक्ष्मी ( विष्णूची आजाची–पत्नी ). ५. वडिल. ६. नातवानें. ७. भूदेवास-ब्राह्मणास. ८. घालीत असे. ९. मोरासारखा. १०. क्षणक्षणीं. ११. सर्व क्षमेचा जो मोठा नद, त्याला. १२. लक्षावधि देवांप्रमाणें मान देणाऱ्याला. १३. प्रभुगुणांविषयीं खऱ्या प्रेमाला. १४. सतरा ( सतरा प्रकारच्या=अनेकविध रतींस ).

( वृत्त–पुष्पिताग्रा )

कथि भृगु हरिभक्तिमज्जनातें,
करिति मुनी सुखसिंधुमज्जनातें.
विधिजनिसहि[1] देति खेंव[2] सारे,
म्हणति, 'मुकुंद भजा, सुखें, वसा रे!' ४५

( वृत्त–मालिनी )

मुनि म्हणति, 'सदा जो मोक्षदाना विकाशी,
धरुं भवजलधींत त्वत्पदा–नाविकाशी.
करुं जप, तप, अर्चा, साधना, याजनाशी.
तुजविण हरि ! कैंची सद्गती या जनाशी ?' ४६

( वृत्त–भुजंगप्रयात )

मयूरेश्वरें वर्णिलें हें चरित्र । कराया मनोवाग्वपूतें पवित्र.
रसज्ञा जनाला नमस्कार आहे । कवित्वें न मद्बुद्धि गर्वासि वाहे. ४७
मनीं जो सदा देवदेवा जपे या । करावें न लागे तया वाजपेया.[3]
म्हणे योगियांचा पती सोम,'या गा । हरील, करा कासया सोमयागा![3]'
भुलावें स्वदेहा न सोपद्रवा[4] या । भजावा हरी कामकोप द्रवाया !
करा भक्तियोगीं सदायाम,[5] नाचा । सुखें,दोष नासे सदा या मनाचा.४९

———

१. ब्रह्मदेवाच्या मुलास = भृगूला. २. आलिंगन. ३. या नांवाच्या यज्ञाला. ४. ( स + उपद्रवा ) पीडेनें युक्त ( अशा स्वदेहाला ). ५. चांगला निश्चय, निर्धार.

## (१०) गिरित्रमोक्ष[१]

( वृत्त-स्वागता )

जो समर्थ भव[२] मोक्षक राया ! । साधु गाति भवमोक्ष[३] कराया;
तत्पदें नमुनि, सादर सारा[४] । कीर्ति गा; हरि असा दर[५] सारा.[५] १

( वृत्त-स्रग्धरा )

पूर्वी होता अमर्त्येतर[६] शकुनिसुत क्रूर, त्याची वृकाह्वा[७]
हिंस्रत्वें निर्दयत्वें 'त्यजुनि मद' म्हणे 'दूर' सिंहा, वृका 'व्हा.'
ऐसा अन्वर्थनामा, असुर, खळमणी, तो पथीं नारदास,
प्रेक्षी, वंदी, प्रबद्धांजळि विनवि, जणों तत्पदाधार दास. २

---

१. श्रीधरकविकृत 'शिवलीलामृता'च्या बाराव्या अध्यायांतील कथेच्या आधारानें या प्रकरणाला 'भस्मासुराख्यान' असें 'काव्यसंग्रहकार' व 'पांगारकर' म्हणतात; परंतु खुद्द **पंतांनीं** याला 'गिरित्रमोक्ष' (गिरित्र= शंकर + मोक्ष= सुटका) असेंच नांव दिलें आहे. मूळ भागवतांत या प्रकरणाला 'रुद्रमोक्षण' असें नांव आहे. ही कथा श्रीमद्भागवतांत स्कंध १०, अध्याय ८८ मध्यें मूळांत असून **पंतांनीं** ती 'मंत्रभागवतां'त दशमस्कंधांत आर्या १०६८ ते १०८९ मध्यें आणि 'कृष्णविजयां'त अध्याय ८८ मध्यें वर्णिली आहे. २. शंकर. ३. संसारापासून सुटका. ४. उत्तम. ५. सर्व भीति. ६. देवांहून अन्य; दैत्य, दानव. ७. 'वृक' ही संज्ञा; 'वृक' नांव. पुढील चरणांतील "म्हणे" या क्रियापदाचा कर्ता. या चरणाचा अन्वय असा– त्याची वृकाह्वा हिंस्रत्वें (व) निर्दयत्वें सिंहा (आणि) वृका म्हणे, "मद त्यजुनि, दूर व्हा." किंवा येथें 'सिंहा !' व 'वृका !' हीं दोन्ही संबोधनें मानलीं तरी चालतील.

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

देवर्षीस म्हणे, “ स्वपादविनतस्वांतप्रमोदावहा ![1]
तूतें या भुवनांत सर्व म्हणती, ‘ पापाटवीदाव[2] हा. ’
सर्वज्ञा ! हरितोसि संशय पळें, तो पाहिला[3] आजि तूं.
आम्ही वांछितसों, तुझ्या सुवचनें संदेहवृंदा जितूं. ३
देवर्षिप्रवरा ! असें पुसतसें कीं, विष्टपाचे[4] धणी
ब्रह्मेशाच्युत हे तिघे स्वभजकां देती सुखाची धणी.[5]
यांमध्यें परि आशुतोष[6] सुर तो कोण ? प्रभो ! हें तुम्हीं
सांगा, जी ! भवदंघ्रिला समजलों कामाप्तिचा हेतु मी. ” ४

( वृत्त–पृथ्वी )

वृकासुर असें पुसे, नमुनि, जोडुनीयां शया,[7]
क्षणांत समजे मनीं सुरमुनी तदीयाशया.
म्हणे मग तयासि तो, “ शकुनिनंदना ! हा बरा
विचार पुसिला, तरी भज सुखार्थ आशांबरा.[8] ५

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

होतो तुष्ट महेश अल्पचि गुणें तत्काळ दासांवरी.
भक्तांला स्वकरें सुतासम शिवाजानि[9] स्वयें सांवरी.

---

१. आपल्या चरणीं नम्र झालेल्याच्या मनास आनंद देणाऱ्या ! २. पापरूपी अरण्याचा वणवा. ३. तो तूं ( म्यां ) आजि पाहिला. कर्मणि प्रयोग. ४. विश्वाचे. ५. विपुलता. ६. तत्काळ संतुष्ट होणारा. ७. हाताला. ८. आशा + अंबरा = दिशा हेंच ज्याचें वस्त्र त्या दिगंबर शंकरास. ९. पार्वती आहे ज्याची जाया तो शंकर.

कोपेंही प्रभु हा तसाचि सहसा स्वल्पाहि दोषास्तव,
याच्या होय न कीर्तिचा तिळ सहस्रास्येंहि[1] शेषा स्तव. ६
बंदीच्या[2] परि[2] रावणें निशिचरें केला पद्माचा स्तव,
भोळा शंकर हा प्रसन्नचि तदा जाला तया यास्तव;
बाणेंही,[3] स्तवुनि, प्रहृष्ट करुनी, मागीतला हा वर,
'स्वामिन् ! मत्पुर रक्ष, हेंच मज दे; हो सिद्ध, पाहा वर.' ७
बाणाचें पुर रक्षिलें पुरहरें,[4] विश्वेश्वरें, श्रीहरें,
केलें तें वरदानवाक्यहि खरें त्या चंद्रमःशेखरें;[5]
तो दिक्तुंडहि पुंड खंडपरशुस्थानाचलोत्पाटनीं[6]
झाला सज्ज, परंतु देव निजला होता क्षमापाटनीं.[7] ८
भक्ताला अतितूर्ण शंकर सुधापूर्णेक्षणें पाहतो,
तद्वांच्छावर द्यावया, वरद तो त्याच्या पुढें राहतो,
त्याचा भार समस्तही स्मरहर स्वामी स्वयें वाहतो,
त्यापासूनि सुसंकटें घडति जीं, त्यांला सुखें साहतो. ९

(वृत्त-उपजाति)

त्या शाकुनेया[8] ! विभुला भजावें । घडेल हो सत्वर लाभ, जावें."
सांगोनि ऐसें हित त्या वृकास । गेला स्वयें नारद सावकास. १०

---

१. हजार मुखांनीं सुद्धां. २. भाटाप्रमाणें. ३. बाणासुरानें सुद्धां. ४. तारकासुराच्या तीन पुत्रांच्या तीन पुरांचा नाश करणाऱ्या शंकरानें. (येथें विरोधाभास आहे.) ५. चंद्र आहे ज्याच्या कपाळावर त्यानें, शंकरानें. ६. खंडपरशु+स्थान+अचल+उत्पाटनीं=शंकराचा कैलासपर्वत हालविण्याच्या कामांत. (खंडपरशु=शंकर). ७. क्षमारूपी नगरांत. येथें 'शिवाला क्रोध आला नाहीं' असें पर्यायानें सांगितलें आहे. ८. शकुनिपुत्रा !

( वृत्त–स्रग्धरा )

केदारीं[1] जाउनीयां मग असुर वृक स्वांगमांसासि होमी;
भेटेना देव तेव्हां, 'निज शिरहि' म्हणे, 'छेदितों आज हो! मीं'।
खंडाया मस्तकातें, स्वधितिस[2] दिवसीं सातव्या घे करानें,
कुंडापासूनि तेव्हां प्रकटुनि, सहसा वारिला शंकरानें. ११

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

ज्या काळीं करुणाब्धिधूर्जटिकरस्पर्शामृता लाभला,
तेव्हां तो परिपूर्णदेह पहिल्याहूनीहि जाला भला;
होता केवळ अस्थिशेष, हवनीं कापूनि घेतां पळा,[3]
तो केला क्षतहीनकाय[4] वरदें, लागों न देतां पळा. १२

मूर्धच्छेदनसाहसांतुनि बळें बाहेर तो काढिला.
मांसाच्या परिकर्तनेंकरुनियां होताचि जो कां ढिला,[5]
श्रीकंठ, त्रिजगच्छरण्य, वरद, प्रीतिप्रसन्नेक्षण,
श्रीमच्छंकर हें वदे, करुनियां तत्प्राणसंरक्षण. १३

'होतों मी वरद प्रसन्न सदयस्वांत प्रपन्नावरी,[6]
देतों शीघ्र वरासि धांवुनि सुखें, जो ज्याचि कामा वरी,
मांस छेदुनि होमिलें शिखिमुखीं[7], हें काय भक्ता! बरें?
आत्मा व्यर्थचि पीडिला, मजहि तां[8] केलें बहू घाबरें. १४

---

१. हिमालयावरील बद्रिकेदार या स्थानीं. २. कुऱ्हाडीला. ३. मांसाला. ४. ज्याच्या देहावरील जखमा नाहींशा झाल्या आहेत असा. ५. अशक्त–**पंत**. ६. शरणागतावर. ७. अग्निमुखांत. ८. त्वां. ( **पंतांनीं** 'त्वां' ऐवजीं 'तां' असा प्रयोग अनेक ठिकाणीं केला आहे ).

( वृत्त-शिखरिणी )

सकृन्नामोच्चारेंकरुनि[1] अथवा केवळ जळें,
फळें, पत्रें, पुष्पें, स्तवननमनें, कीं स्मृतिबळें,
भवांभोधीमध्यें मदुपनत[2] तो भाविक तरे;
किती घेती भावें मज विगतलोभा[3] विकत रे ! १५

( वृत्त-प्रहर्षिणी )

जो कांहीं असुलभ होय याहिमागें,
आतांही, पुढतिहि, तूं तयाहि मागें.
हें माझें वचन मनांत मान साचें.
सांगावें अभिमत[4] जें स्वमानसाचें.' १६

( वृत्त-मालिनी )

श्रवण करुनि ऐसें वाक्य, तो पंकराशी
असुर वृक म्हणे त्या दुर्लभा शंकराशी,
'स्वकर शिरिं जयाच्या मीचि ठेवीन लोकीं,
लव उशिर न होतां, तो मरावा त्रिलोकीं.' १७

( वृत्त-वसंततिलका )

लोकक्षयावह, भयावह, त्या खळानें
मागीतला वर असाचि विशृंखळानें;[5]
हांसोनियां, शिव 'तथास्तु' असें वदे तो,
जाणों सुधा विषधराप्रति[6] देव देतो ! १८

---

१. सकृत्=एकदांच नांवाचा उच्चार करून. २. माझ्याजवळ नम्र झालेला. ३. निर्लोभी अशा मला. ४. इष्ट, आवडतें. ५. उन्मत्तानें. ६. सर्पाला.

पीती यथेष्ट अमृतासि, तथापि नाकी,
जाले भयार्त विमनाचि[1], तथा पिनाकी.
हर्षे सुदुर्मति वृकासुर कामलाभें,
'नाहीं' म्हणे, 'सुरमृगैकवृका[2] मला भें' १९

( वृत्त–स्रग्धरा )

ऐसा तो पापरूपी, वृक[3], असुर, वरें वंचुनी लोकराया,
योजी तत्काळ चित्तीं समधिगतवराची[4] परीक्षा कराया,
केला संकल्प लोकत्रयसुभग शिवारत्न[5] त्याचें हराया,
धांवे ठेवावया तो स्वकर शिरिं, तदा भीति जाली हरा या. २०

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

जाळावा जरि लोचनानळकणें, दुष्कीर्ति भक्तक्षयें.
देयादेय नसे वदान्यगुरुला श्रीशंभुला निश्चयें.
दासापासुनियां पराभव बरा, मानूनि ऐसें, स्वयें
तो मृत्युंजय मन्मथांतक पळे जाणों तयाच्या भयें. २१

( वृत्त–पृथ्वी )

न सांवरति सर्वथा दशभुजाहि[6] देवा जटा;
वृषासहित राहिल्या चरण-पादुका वाजटा[7];
शिरःस्रजहि[8] धावतां त्वरित भंग पावे, गळे;
गळोनि पडले फणी पथिं भुजंगपावेगळे[9]. २२

---

१. विमनस्क, दुःखी, कष्टी. २. देवरूप मृगांच्या ( मृगांस मारणाऱ्या ) अद्वितीय लांडग्याला. ३. वृकासुराला हा वर मिळाल्यावर 'भस्मासुर' हें नांव प्राप्त झालें. ४. प्राप्त झालेल्या वराची. ५. पार्वतीरूपी रत्न. ६. दहा हात असलेल्या देवालाहि (शंकरालासुद्धां). ७. चटचट वाजणाऱ्या. ८. डोक्यावरील माळसुद्धां. ९. भुजंग पाळणाऱ्यापासून ( शंकरापासून ) निराळे.

( वृत्त–भुजंगप्रयात )

गळाल्या गळांतूनि रुद्राक्षमाला । नसे निर्भयस्थान रुद्रा क्षमाला[1].
पळे विष्टपीं[2] ऊघडा नागवा, जी ! पदालाचि मानी प्रभू नागवाजी ![3] २३

( वृत्त–स्रग्धरा )

काष्ठांचे[4] नाथ[4] सारे निरखुनि म्हणती, "हृत्तमाच्या[5] अहर्पा ![5]
बोलावें काय आम्हीं ? अजि अमृत कसें पाजितां दुष्ट सर्पा ?
ज्यांतें देतां वरांतें, खळमति धरिती ते महापाप दर्पा,
त्याचें कांहींच नाहीं स्मरण, अणि पुन्हां दुर्जनालाचि तर्पा !" २४
नाहीं[6] दुष्कीर्ति कांहीं, अलिकहगनळें[7] जाळितां दैत्यटोळा,
केला कीं या खळानें सुविमळमहिमा सर्वही आज गोळा.
ध्यानावांचूनि कीं हो न उघडि इलुसा[8] कामदाहोग्र[9] डोळा;
या औदार्यें सुरांचें घर बुडवितसे हा महाराज भोळा. २५
याणें देऊनि पूर्वीं प्रवरवर,[10] जनीं तर्पिला पंक्तितुंड,[11]
तो अंतीं श्रीमदानें निशिचर कुमती माजला फार पुंड.
कैलासाच्याचि जाला स्वभुजबळमदें सिद्ध उन्मूळनाला,
घाली हस्तासि[12] जैसा समद गजपती पद्मिनीमूळनाला.[13] २६

---

१. समर्थाला (रुद्राला)–**पंत**. २. विश्वांत. ३. हत्तीघोडे. ४. दिशांचे पति. ( काष्ठा = दिशा ). शंकर दिगंबर ( नागवा ) झाल्यामुळें दिक्पाल त्याला निरखून व त्याची कींव करून विचारतात हें साहजिकच होय. ५. हृदयांतील अज्ञानरूपी अंधकाराच्या सूर्या ! ( अहर् + पा ! = दिन + ईशा ! = सूर्या ! )– **पंत**. ६. देवांच्या मनांतील विचार श्लोकक्रमांक २५, २६, २७ यांत वर्णिले आहेत. ७. भालनेत्रांतील अग्नीनें–( अलिक=भाळ, कपाळ ). ८. एवढासा. ९. मदनाला जाळण्याइतका प्रखर. १०. उत्तम वर. ११. दशमुख रावण. ( पंक्ति = दहा ). १२. सोंडेला. १३. कमळाच्या आधारभूत देठाला.

ह्या तैसाचि स्वपादस्तवनतननर्ने[1] थेय्यतत्थेय्य नाचे.
जाला बाणासुराही वरद, पुरविलें इष्ट त्याच्या मनाचें.
पाळावें लागलें तत्पुर, मग सुटला स्वीय कैलासवास.
सांगावें स्पष्ट कोणीं हित अहित असें या जगद्वासवास?[2] २७

( वृत्त–शिखरिणी )

असें देव्र स्वांतीं वदति, मनिं कोपेंचि जळती,
जयीं भोळेनाथ त्रिनयन महाराज पळती,
सुचेना ती युक्ति, द्रुत हरिल जी संकट; पती[3]
दिशांचे[3] ते तूष्णी[4] सभयदय[5] साशंक टपती. २८

( वृत्त–स्रग्धरा )

निर्भीकस्थानकामें[6] पुरहर भुवनें हिंडला सर्व, आशा
नाहीं संपूर्ण झाली, म्हणउनि निरखी घाबरा शर्व आशा.[7]
श्वेतद्वीपासि गेला मग निगमनुत[8] त्र्यक्ष तों, भागला जो.
भक्तापासूनि जाला परिभव, म्हणुनी कां महाभाग लाजो? २९

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

आला धांवत तूर्ण तेथहि महा उत्पातकारी वृक,
जैसा वारणमारणस्पृह[9] हरी, किंवा मृगारी[1] वृक;[10]

---

१. आपल्या पायाच्या स्तवनांतील गाण्याच्या तालानें. २. जगत्+वासवास=जगदिंद्रास. ३. दिशांचे पति=दिक्पाल. ४. स्वस्थ, निमूट. ५. भय वाटून व (शिवाविषयीं मनांत) कींव येऊन. ६. निर्भयस्थलाच्या इच्छेनें. ७. दिशा. (निरोशेनें) आशा=दिशा निरखी). ८. वेदांनीं स्तविलेला. ९. हत्तीला मारूं इच्छिणारा. १०. हरिणांस मारणारा वृक (लांडगा)- **पंत.**

तों वेगें बटुवेष[1] शेषशयन श्रीकांत ये आडवा,
जो दुष्टां यम, सज्जनांस दसरा, दीपावळी, पाडवा. ३०

( वृत्त–द्रुतविलंबित )

अजिनदंडकमंडलुमेखळा- । कुशधर[2] द्विजबाळ गमे खळा.
पथि तयाशि[3] करूनि 'नमो' हरी । मधुरवाक्पटु तो, मन मोहरी. ३१

( वृत्त–स्रग्धरा )

"बैसावें शाकुनेया ! क्षणभरि, परमश्रांत जालासि, वाटे.
कां जालें दूर येणें ? बहुत लगबगां चालिलां फार वाटे.
आत्मा सर्वार्थदाता सकळबुधमतें पूरुषाला निकाम[4],
साधावें सर्व कांहीं, अनुदिन चतुरें यासि रक्षूनि, काम[5]. ३२
आलां अत्यंत दूर, श्रमउनि तनुला ज्या स्वकार्यानिमित्त,
सांगावें, हो ! विभो ! तें, श्रवणिं जरि मला योग्य मानील चित्त.
प्रायः स्वार्थाप्तिसाठीं वरिति निपुण ते लोक आप्ता सहाया[6].
बाळाच्या भाषणातें, नयपथनिपुणा ! प्रार्थितों मीं, सहा या." ३३

( वृत्त–शिखरिणी )

हराही[7] वंचाया बहुगति जया पाठ कवि तो
असाही जो कीं, त्या प्रभु कपटिभूपा ठकवितो.

---

१. श्रीधरस्वामिकृत 'शिवलीलामृता'च्या १२ व्या अध्यायांत विष्णूनें मोहिनीचें रूप धरलें असें वर्णन आहे. २. अजिन=मृगचर्म; मेखळा=कटिसूत्र; कुशधर=दर्भ धारण करणारा. ३. वृत्रासुरास=भस्मासुरास. ४. अत्यंत- पंत. ५. कार्य. ६. सहाया=मदत करणाऱ्या ( आप्ताला ). ७. अन्वयार्थः- जो तो ( वृक ) असाही कवि ( शहाणा ) कीं जया ( वृकाला ) हराही ( शिवालासुद्धां ) वंचाया ( फसविण्यासाठीं ) बहुगति पाठ ( अनेक युक्त्या अवगत होत्या ) त्या कपटिभूपा ( वंचकश्रेष्ठाला ) प्रभु ठकवितो.

हरीनें युक्तीनें पथिं शकुनिचा पाक[1] वळिला[2].

महापाशा[3] विस्तारुनि कपटरूपा[3], कवळिला. ३४

( वृत्त–वसंततिलका )

पीयूषवर्षिवचनें परिसोनि कानें,

होऊनियां श्रमविवर्जित, त्या वृकानें

सांगीतलें सकळ वृत्त बटुप्रती तें

जो ओपिला वर हरें भुवनप्रतीतें.[4] ३५

( वृत्त–स्रग्धरा )

सारें ऐकोनि वृत्त, स्मित करुनि, म्हणे, "दक्षशापें[5] पिसाचि[5]

जाला[5], वाचा तयाची निजमनिं गणितां काय अद्यापि साची ?

राहे प्रेतीं, पिशाचीं; गतविभव वसे नित्य नग्न श्मशानीं,

त्याचा विश्वास कैसा तुमि[6] दृढ धरिला शाहण्यांनीं अशांनीं ? ३६

---

१. पुत्र - **पंत.** २. अडविला– **पंत.** ३. कपटरूपा महापाशा = मायावी व लाघवी शब्दांचें जाळें पसरून. ४. विश्वख्यातें ( प्रतीत = प्रख्यात ) - **पंत.** ५. दक्षानें दिलेल्या शापानें वेडाच झालेला. ( एकदां भेटावयास गेलेल्या दक्षाला शिवानें उठून नमन केलें नाहीं, म्हणून दक्षानें त्याला शाप दिला होता. त्यामुळें शिव वेडापिसा झाला. पुढें एकदां दक्षानें यज्ञ केला, तेव्हां त्यानें शिवाला व सतीला बोलावलें नाहीं. तरीहि ती गेली. त्यावेळीं दक्षानें पुन्हा शिवनिंदा केली. म्हणून शिवानें आपल्या जटेंतून भैरव उत्पन्न करून त्याचेकरवीं दक्षाच्या यज्ञाचा नाश व दक्षाचा शिरश्छेद करविला ). ६. येथें **पंतांनीं** 'तुमि' असेंच निरनुस्वार लिहिलें आहे.

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

आहे विश्वगुरुत्रिनेत्रवचनीं विश्वास तूजा जरी,
ठेवावा स्वशिरीं तरी कर, परीक्षा हे करीं; साजरी.
होतां वाक्य मृषा,[१] वृषासन[२] रणीं त्वां दानवेंद्रें तदा
जिंकावा; भजकप्रतारक पुढें बोले न मिथ्या कदा." ३७
ऐसे भ्रामक रम्य बोल बटुचे तद्योगमायाबळें
हातोहातचि बुद्धिला भ्रमविती त्या दानवाच्या पळें.
मोहें मानुनि तें खरें, सुरगुरुद्रोही महापातकी,
ठेवी हस्त शिरींच, होय कुमती तो आपुला घातकी. ३८
हस्तस्पर्शविभिन्नमस्तकहि[३] तो दे भीति लोका; पवि–
छिन्नप्रोच्चनगासमान[४] पडतां सारी धरा कांपवी.
आनंदें सुर पुष्पवृष्टि करिती श्रीजानिच्या मस्तकीं,
गाती, नाचति, वर्णिती यश, पदें वंदूनियां हस्तकीं. ३९
ऐसें संकट वारिलें, मग हरी गेला महेशाकडे.
हें बोले, "जन जे विभो! विचरती पूज्यापुढें वांकडे,
ते होती निजभद्रजीवनयशस्नेहक्षयीं[५] कांकडे.
सर्वज्ञ प्रभुजी! तुम्ही हगिरडे[६] घेतां असे कां कडे?" ४०

---

१. खोटें. २. वृषभवाहन शिव. ३. (स्वतःच्या) हस्तस्पर्शानें चिरलें आहे मस्तक ज्याचें असा. ४. वज्रानें फुटलेल्या उंच पर्वताप्रमाणें. ५. आपलें मंगलमय जीवन व यश या स्वरूपाच्या तैलाच्या नाशाचे कामीं. ६. हा शब्द कवितेंत निर्मल वाटत नाहीं.

## उपसंहार

( वृत्त-शिखरिणी )

महेशाचें देवें त्वरित हरिलें संकट बटु-
स्वरूपें, हे लीला मधुर; अमृताचा रस कटू.
रसन्यूनाधिक्यग्रहणविषयीं जे जन पटू,
पिती श्रोत्रास्यें ते हरिजन सुधेला घटुघटू. ४१

( वृत्त-स्रग्धरा )

श्रीशानें संकटातें हरुनि सकरुणें, मुक्त केला गिरित्र;[1]
संसारारातिभीतिप्रति[2] परिहरितें हें हरीचें चरित्र.
गातां आकर्णितांही भवभय शमवी; यास्तव स्वादरानें
भावार्थें गाइलें; हो! सदुदितरत[3] जो, त्या मयूरेश्वरानें.[4] ४२

---

१. शंकर. २. संसारामध्यें निर्माण होणाऱ्या शत्रूंच्या भयाप्रत. ३. सत्पुरुषांच्या उपदेशामध्यें रममाण झालेला. ४. महत्वाचा शोध – या प्रकरणासाठीं **पंतांनीं** आर्यावृत्त (गीति नव्हे) योजून केलेला एक कागद सांपडला आहे. त्यावर पुढीलप्रमाणें आरंभ केला आहे: –

श्रीगणेशाय नमः ॥ पूर्वी होता दानव शकुनीचा पुत्र वृक बळी मोटा। तो नारदासि मार्गीं पाहुनि ऐसें पुसे खोटा ॥ १ ॥ देवर्षिप्रवरा असें पु......

या आरंभापेक्षां **पंतांनीं** प्रस्तुत प्रकरणास केलेली सुरुवात फारच हृद्य व काव्यमय आहे यांत शंका नाहीं.

# ५. ऐतिहासिक व्यक्ति

## ( १ ) अहल्यास्तवन[1]

( गीतिवृत्त )

श्रीहरिहरभक्ता तूं देवि ! अहल्ये ! वरा धराभूषा.[2]
पूषा[3] तुज साधु म्हणे. ख्याता तुजसम न बाणतनुभूषा.[4] १
देवि ! अहल्याबायी ! झालीस जगत्रयांत तूं धन्या.
न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या. २
जाणे, धर्म करीना, त्या स्तवितो कोण पंडितंमन्या ?
न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या. ३

---

१. शके १७१० ते १७१२ या कालांत **पंतांनीं** प्रयाग–काशी–गया ही त्रिस्थळी यात्रा केली. तेथून परत येतांना वाटेंत चोळीमहेश्वर येथें ते थांबले. तेथें अहल्याबाई होळकरीण या साध्वीचा मुक्काम होता. तिनें **पंतांची** कीर्ति अगोदरच ऐकली होती, म्हणून तिनें त्यांचेकरितां पालखी पाठवून त्यांना आपल्या भेटीस बोलाविलें. त्या समयीं **पंतांनीं** तिजवर केलेल्या स्तुतिपर आर्या येथें दिल्या आहेत. त्यांचा उपसंहार **पंतांनीं** ' विष्णुपदा ' ला उद्देशून केला आहे. याचेपूर्वीं रचिलेल्या ' गंगावकिलीं ' तहि **पंतांनीं** उदारधी व साध्वी अहल्याबाईबद्दल गंगामाइजवळ भीड खर्चिली आहे. ( पुढें दिलेल्या ' गंगावकीली ' मधील आर्या ९० पहा ) अहल्याबाईनें **पंतांना** आपल्या आश्रयास राहण्याविषयीं विनविलें. परंतु **पंतांचें** आपल्या यजमानांवर ( बारामतीकर जोशी यांजवर ) फार प्रेम असल्याकारणानें त्यांनीं ती विनंति मान्य केली नाहीं. २. पृथ्वीस शोभविणारी. ३. सूर्य. ४. बाणासुराची कन्या उषा ( बाणतनुभू+उषा ).

धर्मार्थ गोत्रजन्या[1], किंवा झालीस तूं धराजन्या.[2]
तुज देवि ! भेटली जी, सत्कीर्ति कधींच हे न राजन्या.[3] ४
न त्यजिसि नर्मदेतें; देवि ! तुझी हे बहुप्रिया आली.[4]
गंगेचीहि सखी हो, कीं उभयमनांत[5] सत्क्रिया आली. ५

## उपसंहार

( गीतिवृत्त )

श्रीविष्णुपदा ! स्तविली त्वद्भक्ता,[6] हें[7] तुलाहि मानावें.
विश्व जिला वानितसे, कां न मयूरेंहि तीस वानावें ? ६

---

१. पार्वती. ( गोत्र=पर्वत+जन्या=उत्पन्न झालेली ). २. सीता ( धरा=पृथ्वी ). ३. राजकुलोत्पन्न व्यक्तीला. ४. सखी; मैत्रीण. ५. नर्मदेच्या आणि गंगेच्या मनांत. ६. तुला भजणारी. ७. हें अहल्यास्तवन.

## ६. आत्मकथनपर

### ( १ ) आर्याकेकावलि[1]

श्रीरामा ! तूं स्वामी असती माझ्या शिरावरी जागा;
आम्हांसि तुझ्या पायांवांचुनि निर्भय नसे दुजा जागा.[2] १
बहु जन्म विसरलों तुज, परि तूं आम्हांसि विसरला नससी,
अंतर्बाह्य कृपाळा ! सर्वां जीवांसि वेष्टुनीं असती. २
कल्पद्रुम तूं रामा ! ज्याची जसि भावना तसा फळसी;[3]
भोगिति दुःखें जीव स्वगुणें, तूं निर्दयत्व नातळसी.[4] ३

---

१. या काव्याची रचना गीतिवृत्तांत आहे. परंतु **पंत** 'गीति' लाच 'आर्या' म्हणत असल्यामुळें याला 'आर्या केकावलि' म्हणतात. याशिवाय **पंतां**ची 'श्लोक–केकावलि' हें काव्य सुप्रसिद्ध आहे. याची रचना सरळ, सरस, सोपी असून प्रसाद, ओज व माधुर्य यांनीं ती परिपूर्ण आहे. लौकिकाची हानि करणाऱ्या अशा अकल्पित संकटामुळें गांगरून शरणागत व अनन्यगतिक होऊन **पंतां**नीं अत्यंत करुणस्वरानें केलेला परमेश्वराचा धांवा या काव्यांत आहे. त्यामुळें यांतील आर्तता हृदयद्रावक झाली आहे. **पंत**कृत सोप्या व स्वतंत्र काव्यांत याची गणना होते. यांतील आर्या १ ते ११३ मध्यें स्वोद्धाराविषयीं श्रीरामचंद्रास विनवणी; आर्या ११४ ते १२८ मध्यें लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, सीता, मारुति यांना प्रार्थना; आर्या १२९ ते १३५ मध्यें संतप्रभाववर्णन; आणि आर्या १३६ ते १७४ मध्यें श्रीपांडुरंगाच्या ध्यानाचें सुंदर कोटिक्रमयुक्त वर्णन, असे याचे भाग आहेत. शेवटला भाग अतिशय प्रसन्न मनानें वर्णिलेला असून संकटनिवारण झाल्यावर पंढरीस जाऊन पांडुरंगासमक्ष लिहिलेला दिसतो. २. स्थान. ( येथें 'जागा' शब्द पुल्लिंगी वापरला आहे ). ३. फळ देतोस. ४ स्पर्श न करिसी.

" सत्संगती धरावी, सच्छास्त्रश्रवण आदरेंचि करा, "
म्हणसी, " मग मीं बुडतां देइन भवसागरीं तुम्हांसि करा. "[1] ४
सत्योपदेशवाक्यें तुजीं असीं ऐकिलीं; परंतु मन
आटोपेना रामा ! म्हणुनि तुला करितसें सदा नमन. ५
आतां प्रभो ! दयाळा ! मज दीनावरि करूनियां करुणा
स्वपदाब्जीं मन्मानसभृंग रमो, उगउ दे कृपा–अरुणा. ६
नाहीं सहाय तुझिया नामाविण निपुण मज जगत्त्रितयीं;
त्वन्नाम भित्र जेव्हां, सत्संग घडे त्रिलोकमित्र तयीं. ७
म्हणउनि नाम तुझें या मुखांत राहो सदाहि मधुरतम,
रत मन जेथें मुनिचें ज्यांचें गेलें समस्त दूर तम.[2] ८
उद्धरिला जो पापी पुत्रमिषें नाम घे अजामिळ तो,
तारीं हाहि जन तसा, दंभेंहि जरी पदीं तुजा मिळतो. ९
अपराध फार केले, परि आतां हात जोडिले स्वामी !
करुनि दया तारावें; आवडि वाढो सदा तुझ्या नामीं. १०
सेवक तुजा म्हणवितों; ' श्रीरामा ! राघवा ! सख्या ! ' म्हणतों;
होसी उदास तरि हो, होत नसें मीं उदास आपण तों. ११
संसारसागरीं तूं तारक ऐसेंचि संत वदतात;
वदतां तदीय नामें देतो दासांस तो स्वपद तात. १२
ऐसें औदार्य तुजें प्रभुत्व करुणाकरत्व ऐकोनीं
आलों शरण स्वामी ! जोडुनियां हस्त मस्तकीं दोनीं. १३
पायें मज दीनाला रामा ! लोटूं नकोचि बा ! दूर.
उद्धरिले बहु पापी, याविषयीं तूं रघूत्तमा ! शूर. १४

---

१. हाताला ( हात देईन = साहाय्य करीन ). २. अज्ञान.

क्लेशाक्रांतस्वांत श्रीरामा ! तुज जरी न विसरेल,
तरि भय नसेचि कांहीं, साराही क्लेशतापहि सरेल. १५
आम्हांसि नाम मात्र क्लेशाब्धीमाजि नाव हें ठावें;
गावें तेंचि प्रेमें, स्वबिरुद रामा ! तुवांहि गांठावें. १६
केवळ भजनाचिकडे जरि ठेविसि दृष्टि तरि नसे थारा,
आपलिया थोरपणावरि ठेउनि दृष्टि दीन हा तारा. १७
स्वामी ! आम्हीं दुर्बळ, तूं रघुवीरा ! समर्थ, यासाटीं
देवुनि अभयकरातें ने स्वस्थानासि; शुद्ध यश थाटीं. १८
धाव समर्था ! सदया ! भवपंकामाजि बुडतसे गाय;
निकटस्था ! धर्मज्ञा ! कौतुक अद्यापि पाहसी काय ? १९
करुणाघन तूं माथां, जाळितसे मज मृगासि भववणवा;
वृष्टि न करितां, होतां उदास, हें योग्य तूज न सकणवा ! २०
संकट वारुनि रामा ! निजगुणकीर्तन करावया योजीं,
आपलिया थोरपणें रामा ! मजला स्वकिंकरीं मोजीं. २१
तूं जरि न पावसी तरि पाचारूं संकटांत मीं कवणा ?
श्रवणारूढ करुनि हे विनती, रक्षीं मला पदप्रवणा. २२
सीतापते ! रघुपते ! विश्वपते ! भूपते ! वदान्यपते[1] !
इंद्रादिकीर्ति तुझिया कीर्तिपुढें तुछ, सर्वथा लपते. २३
सोडविले सुर सारे रावणकारागृहांतुनीं देवा !
जे तत्सेव्यहि त्याची करीत होते तदाग्रहें सेवा. २४
देवस्त्रीही दासी केल्या होत्या दशाननें दुष्टें
त्या सोडवूनि त्यांचीं चित्तें केलीं तुवांचि संतुष्टें. २५

---

१. दात्यांत श्रेष्ठ अशा !

गंधर्वी तुज गावें, ते त्याणें लाविले निजस्तवना,
तवनामधारकांतें सोडविलें त्वां करूनियां अवना. २६
त्वच्चरणार्चनतत्पर मुनि वनवासी दशाननत्रस्त
त्यांस सुखविता जाला प्रभो ! तुजा अभयदानपटु हस्त. २७
त्वद्भक्त शुद्धकर्मा बिभीषण प्राज्ञ रावणें छळिला,
येतां शरण तुला, त्वां हृदयीं स्वभुजीं धरूनि आवळिला. २८
वाळीनें स्त्री हरिली, मारिल्ही आपणासि या त्रासें
सुग्रीव शरण आला तुज, तो त्वां रक्षिला अनायासें. २९
ब्रह्मादिकांसि दुर्लभ पदरज ज्याचा अलभ्य तूं ऐसा,
शबरी वर्णादिगुणें न बरी, तिस पावलासि तूं कैसा ? ३०
गुहनाम निषादपती स्वभक्तिसंपन्न त्यास बंधुपणें
त्वां मानिलें दयाळा ! दासांचे नाशितोशि ताप पणें. ३१
चरणविलोकनतत्पर वानर आप्तांत राघवा ! गणिले;
साधुद्वेषी जे जे कुळतरु त्यांचे समूलही खणिले. ३२
गौतमपत्नी गिळिली होती जे पापतापशापाहीं
ते उद्धरिली जैसी, मज निजकरुणालवें तशा पाहीं. ३३
रक्षोभीतीपासुनि[1] गाधिजमख रक्षिला जसा राया !
हो सिद्ध तसा संकट मज दीनाचेंहि आज साराया. ३४
दंडकवन खळ मर्दुनि निर्भय केलें जसें प्रतापानें,
गतभय हा शीघ्र करीं, जाला बहु विकळ विप्र तापानें. ३५
आलों म्हणुनि शरण तुज, सहजदयेचाचि पूर्ण सागर तूं,
तुजविण कवणा ठाईं तापोपशमार्थ आज सांग रतूं ? ३६

---

१. ( यज्ञाचा विध्वंस करणाऱ्या ) राक्षसांच्या भीतीपासून. ( " रक्षस् = रक्षः " नपुंसकलिंगी शब्दाचें प्रथमेचें एकवचन ).

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

तूं बाप, माय, बंधू, धणी, सुहृन्मित्र, जानकीजाने !
करुनि दया विलयाला अति सत्वर संकटास माज्या ने. ३७
श्रीरामा ! सुखधामा ! पावननामा ! स्वभक्तविश्रामा !
कामारिगीतकीर्ते ![1] करुणामूर्ते ! नको त्यजूं आम्हां. ३८
रामा ! धांव, रघुपते ! धांव, विभो ! धांव, राघवा ! धांव;
कौतुक काय पहासी, आळवितां यापरी तुजें नांव ? ३९
नांव तुजें नावचि या संसारांभोधिला तरायासी,
तें हृदयीं धरुनीही मीं कां अद्यापि सांग आयासी ? ४०
या दीनानें आतां पसरावा पदर सांग कोणाला ?
तूजा प्रताप बसला लपोन जाऊनि काय कोणाला ? ४१
जरि दास परानें हा अपराधावीण दंडिला, राज्या !
हें अश्लाघ्यचि तुजला, नृपनीति तुम्हीं मनीं विचारा ज्या. ४२
तुज दीनबंधु म्हणती, म्हणउनि मीं दीन मारितों हाका;
हा काय दीन लटिका ? जे कां निजबंधुता तुम्हीं टाका ? ४३
दीनास संकटीं जरि सहाय होशील योग्य हें तूतें;
आळस न करीं माज्या स्वरक्षणातें सुकीर्तिहेतूतें. ४४
दीनानें किति सद्गुणहीनानें विनविलें तुला आजी,
बा ! जीवदान दे गा ! प्रभो ! उपेक्षा करूं नको माजी. ४५
हृद्गत तुजला कळतें हृदयस्था ! राघवा ! जगज्जनका !
जन काय तत्व जाणे ? प्रभो ! उपेक्षा करूंचि आज नका. ४६
सर्वां लाभांहुनि बहु लाभ असे त्वत्पदांबुरुहभजनीं,[2]
मज नीतिज्ञा ! भजतां संकट न पडों दिजेचि अशुभ जनीं. ४७

---

१. मदनांतक जो शंकर, त्यानें गायिलेली ज्याची कीर्ति अशा !
२. तुझ्या पदकमलाच्या आराधनेमध्यें.

अन्याय लेश नसतां गांजिति उद्वृत्त[1] हें तुलाचि कळो;
किकळोनि सांगतों तुज, या दुःखें न मन आमचें विकळो. ४८
कळिमाजि क्षुद्र नृप प्रजेसि देती धनार्थ बहु ताप,
पापप्रसक्त लोभी न पाहती धर्म, माय कीं बाप. ४९
तूं परि सर्वांचा पति शासनकर्ता उपेक्षिसी कां हें ?
'साहें उगेंचि' म्हणसी, माझें बळ येथ काय तें पाहें. ५०
खळ जे हे सत्पीडक त्यांची तुज काय राघवा ! मीड ?
त्वद्दास तवसमक्षचि गांजिति, येणें कसी न ये चीड ? ५१
सिंहासमक्ष त्याच्या बाळाला जाचितील जरि कोले,[2]
तरि मग अशास 'पंचानन, मृगपति' कोण जाणता बोले ? ५२
अपराधी सेवक तरि दंडावा स्वामिनेंचि, हें युक्त
उक्त श्रवण करुनियां करिं मजला संकटांतुनीं मुक्त. ५३
श्रीरामचंद्र ! राघव ! रघुवीर ! असेंचि आळवीन तुला.
संकट वारुनि घडवीं माज्या हातूनि या महाक्रतुला.[3] ५४
एकान्तीं त्वन्नामें गायिन मधुरस्वरें स्थिरस्वांतें,
संकट वारुनि द्यावें हें मज वरदान जानकीकांतें. ५५
या संकटाबरोबर वारीं लोकेषणादि[4] अनिवार्य,
म्हणजे हा दास तुजा जाला लोकत्रयांत कृतकार्य. ५६
अन्नाछादन देतें दुसरें बा ! कोण सांग विश्वास ?
म्हणताति 'आयुरन्नं प्रयच्छति' प्राज्ञ, तेथ विश्वास. ५७

---

१. उद्धट, वाईट प्रवृत्तीचे लोक. २. कोल्हे. ३. मोठ्या यज्ञाला.
४. लोकेषणा = लोकांकडून बरें म्हणवून घेण्याची इच्छा.

त्वद्गुणकीर्तन करितां लज्जा हे पापिणी धरू न गळा;
हे ताटकांतका![1] हा परमार्थ इणेंचि बुडविला सगळा. ५८
तुजला धरीन हृदयीं म्हणजे लज्जा पळेलसें वाटे,
दाटेल प्रेम, तयीं शमेल ते ताटका-तसी वाटे.[2] ५९
खळ हांसतील तेंही सोसाया सहनशीलता द्यावी;
लावीन मस्तक तुज्या पदीं, तुजी भक्ति आत्मविद्या वी.[3] ६०
त्वद्गुणकीर्तन करितां स्तंभादिक[4] अष्टभाव[4] उपजावे,
जावे अनात्मधर्म, क्रोधादि मनोविकार वरजावे.[5] ६१
हा काम रामराया! पुरवावा, कल्पवृक्ष तूं साचा;
ज्ञाता सर्वगत प्रभु, आत्मा प्रिय निर्निमित्त दासाचा. ६२
मन हेंचि फार इछी कीं आतां सेवणें तुजे पाय,
तुजवांचुनि इतरांच्या भजनीं मजलागिं होय फळ काय? ६३
केलें म्यां मनुजांचें आर्जव, बहु चाटुकारही[6] जालों,
परि तेथ ताप पावुनि पुनरपि तुजलागिं शरण मीं आलों. ६४
प्रमदांत, पावुनीयां श्रम, दांत क्षुद्र विचकिती कीं जे
त्यांची तशाच लोकीं सेवा, तुजला न जाणतां, कीजे. ६५
दुर्व्यसनी धर्मरहित निरक्षर क्षुद्र त्यांसि मीं नमनें
करुनि श्रमीच जालों, आलों तुज शरण आज दीनमनें. ६६

---

१. ताटका राक्षसीला मारणाऱ्या! (हें विशेषण साभिप्राय आहे). २. वाटे-मध्यें. ३. विते, प्रसविते. ४. स्तंभादिक अष्टभाव पुढीलप्रमाणेः- स्वेद, वैवर्ण्य, वेपथु, स्तंभ, रोमांच, स्वरभंग, अश्रु आणि प्रलय. हे सात्त्विक विकार होत. ५. वर्ज करावे. ६. दुसऱ्याची उगीचच पोकळ स्तुति करणारासुद्धां.

रामा ! शत्रुभ्राता[1] आला तुज शरण त्यासि राज्यपद
लंकेचें अर्पियलें, कोण न वंदील तें तुजेंचि पद ? ६७
शरण तरी तुज यावें, नमन करावें तुलाचि सुज्ञानें,
गावे तुजेचि गुण बा ! सेवावें तुजचि मादृगज्ञानें.[2] ६८
म्हणवुनि तुमचें नामचि 'राम' असें हें मुखीं सदा राहो;
हा ज्ञानहीन दीन प्रसन्न होवूनि शीघ्र तारा हो ! ६९
प्रभुजी ! तुमचें सज्जन उदारपण वर्णितात बहुसाल,
सालसता मत्त्राणीं धरितां, शब्दांत सर्व गवसाल. ७०
आळचि घेवुनि मीं शिशु आळवितों, निष्ठुर त्वदुर[3], वाळीं;[4]
आळ निवारुनि मातें, आळस टाकूनि धांव, कुरवाळीं. ७१
पाळक तूं विश्वाचा, बाळक-सा तोंड पसरितों बा ! मीं,
व्याळकराळकठिनतर[5] काळ कसा वारिसी न हा ? स्वामी ! ७२
तूं करुणाघन रामा ! मीं चातक, पसरिलें असे आस्य;
नामामृतकण न मिळे, तरि लोकीं फार होतसे हास्य. ७३
विश्वैकमान्य दशरथ, कौसल्या वीरसू सती धन्या,
तत्पुत्र तूं रघुपते ! उपमा तुजला तुजी, नसे अन्या. ७४
ज्ञाता तूं, दाता तूं, त्राता तूं, वीर धीर भर्ता तूं;
जनपीडाहर्ता तूं श्रीरामा ! मुख्य विश्वकर्ता तूं. ७५

---

१. रावणाचा भाऊ, बिभीषण. २. मादृक् + अज्ञानें = माझ्यासारख्या अज्ञ माणसानें. ३. तुझें हृदय. ( त्वत् , त्वद् ) + उर ( उरस्, उरः, उर ) ४. सोडून दे. ५. भयंकर सर्पाहून अति कठिण.

ब्राह्मणरक्षणसक्षण[1] दक्षिण[2] अक्षीणसद्यशोधाम[3],
जलदश्यामल कोमल कलिमलहर हरमनोज्ञ रघुराम. ७६

सुरवरमुनिवरनृपवरनुतगुणगण[4] ! वरद ! परमसुखसदन !
त्रिभुवनसमवनपटुभुज[5] ! भवदवभयशमन[6] ! रुचिरतरवदन ! ७७

ऐसें गायिन तुजला, हा माजा काम पूरवीं वरदा !
हर दासाचें संकट रामा ! भवसिंधुमग्नजनकरदा[7] ! ७८

स्तुति करुनि तुजी तुजला आम्ही अज्ञान काय बा ! रिझवूं ?
गावुनि अमृतगुणातें हृदयींचे ताप आपुले विझवूं. ७९

शेषप्राचेतसमुनिपराशरव्यासनारदर्षिशुकीं
गातां गुण पार नसे, यांच्या येयील कोण अन्य तुकीं ? ८०

परि भावें गुण गातां प्रसन्न होतोस तूं असें ठावें
जालें सज्जनसंगें, प्रेम कसें तें मनांत सांठावें ? ८१

शाहणपणें न रिझसी, मूर्खपणें न खिजसी,[8] भले म्हणती;
प्रेमळ भलताहि असो, करिसी त्याची स्वसेवकीं गणती. ८२

होसी प्रसन्न भावें, देसी सर्वस्व आपुलें भजकां,
सत्संगीं बसतों मीं, न कळे इतुकेंहि राघवा ! मज कां ? ८३

संतांच्या वदनें मीं आयिकिलीं बा ! तुजीं जयीं चरितें
त्यजुनि विषय मन केलें भरावया गुणसुधा तयींच रितें. ८४

---

१. ब्राह्मणांचें रक्षण करण्याविषयीं सवड असलेला. २. सरळमनाचा समर्थ. ३. ज्याच्या सत्कीर्तीचें मंदिर जीर्ण नाहीं असा. ४. सुरश्रेष्ठ, मुनिश्रेष्ठ, नृपश्रेष्ठ यांनीं स्तविलेल्या गुणांच्या समुदाया ! ५. त्रिभुवनाच्या रक्षणाविषयीं समर्थ हात ज्याचे अशा ! ६. संसाररूप वणव्याच्या भयाचें शमन करणाऱ्या ! ७. भवसिंधूंत बुडालेल्या लोकांना हात देणाऱ्या ! ८. खिन्न होतोस; चिडतोस.

साकेतपते ! रामा ! नाकेशनुता ! त्वदीय गुण गातां
हाकेसरिसा येवुनि हा केवळ दीन उद्धरीं आतां. ८५

चापशरधरा धीरा आपद्ग्रस्तासि मज नको विसरूं,
या परम संकटीं मीं बा ! पदर दुज्यापुढें किती पसरूं ? ८६

आधार तूं जनाचा, बाधा हरणार एक तूं दक्ष
साधावया यशातें बा ! धांव, तुला नमस्कृती लक्ष. ८७

जळदनिभा ! बळसिंधो ! खळमथना ! सूर्यकुळमणे ! कृपण
मी विकळ जाहलों बहु; काय तुजें लोपलें दयाळुपण ? ८८

मज भणगाला वरदा ! वर जरि करुणा करूनि देशील,
तरि मानवती सज्जनमनें जयाला असेंचि दे शील. ८९

विश्व तुजा[1] ठायीं, तूं नामीं, तें नाम साधुच्याचि मुखीं,
तत्संग दे मला, मग गुंतेंना मीं कदापि तुछ सुखीं. ९०

लक्षापराध घडले, रक्षावें परि तुला शरण आलों;
दक्षाध्वरहरचिंत्या[2] ! दक्षा ! मीं मग्न संकटीं जालों. ९१

संग धरुनि विषयांचा भंगचि मन पावलें, परी न विटे;
साधुसमागमभेषज[3] साधुनि देशील तरिच मोह फिटे. ९२

चित्त अनावर रामा ! वित्तस्त्रीपुत्रचिंतनींचि रते,
मधुलिप्त[4] क्षुरधारा[5] चाटी ते जीभ तत्क्षणीं चिरते. ९३

निपटुनि विषय त्यजितां सुखमुख दृष्टी पडे, झडे ताप;
हें सत्य अत्यबाधित, तेथें संताप जे स्थळीं व्याप. ९४

---

१. तुझ्या. २. दक्षाच्या यज्ञाचा नाश करणाऱ्यानें ( शंकरानें ) चिंतन करण्यास योग्य अशा ! ३. भेषज=औषध. ४. मधानें माखलेली. ५. केस कापण्याच्या वस्त्र्याची कडा.

तनुनिर्वाहापुरता संग धरुनिही अनर्थ मज घडला,
सावध तऱ्ही निसरड्या मार्गीं विचकूनि दांतमुख पडला. ९५
शुद्धचरित्रा रामा ! युद्धपटुभुजा ! प्रबुद्धसेव्यपदा !
उद्धवनिधे ! दयाळा ! उद्धरिं मजला, नमीन तूज सदा. ९६
शर्वप्रियसच्चरिता ! सर्वजगत्पाळका ! अगा बापा !
पर्वसुधाकरकररुचिगर्वहरस्मितमुखा ![1] हरीं तापा. ९७
नाना भयें विलोकुनि पावतसे फार फार तनु कंपा;
शिर ठेविलें पदांवरि, उशिर न लावीं, करींच अनुकंपा. ९८
मन हें घातक वेडें विषयव्याळासवें[2] करी क्रीडा,
पीडाहि पावतें, परि सावध नोहे, न तें धरी व्रीडा. ९९
या कोटग्या मनाला विषयीं या काय वाटते गोडी !
खोडी तुज्या प्रतापावांचुनियां राघवा ! न हें सोडी. १००
बहुसंख्य चपळमर्कटकटकें आज्ञेंत वर्तलीं नीट;
वीट न धरशील तरी माझें मन काय तुजपुढें धीट ? १०१
श्रीसद्मीं पदपद्मीं होयिल मन भृंग, दाखवुनि पाहें;
लब्धसुदुर्लभविषय त्यजिल कसें ? बहु सतृष्ण सकृपा ! हें. १०२
दे अभयदान देवा ! सेवारत मीं तुजा विभो ! भाट;
त्यजितां अनादरानें करीन लोकांत फार बोभाट. १०३
त्वच्चरणाराधन मीं जाणत, नाहींच लेशही इतर;
नामचि गातों, येणें प्रसन्न होवूनि अभय तूं वितर. १०४
आहे प्रसाद मजवरि म्हणुनिच वदनासि येतसे नाम,
हें जरि मुखा न येतें, होता कैंचा मनासि विश्राम ? १०५

---

१. पौर्णिमेच्या चंद्रकिरणांच्या तेजाचा गर्व हरण करणारें हास्यमुख धारण करणाऱ्या ! २. विषयरूपी सर्पाबरोबर.

विकळमना मीं जें कीं वदलों त्याची करीं क्षमा आर्या!
जे सहनशील दक्षिण कृपाळु विश्वार्ह बुध तदाचार्या! १०६
दु:ख न रुचे, सुख रुचे, कर्मं करितां विवेकही न रुचे;
अमृतफळ कसे देतिल पल्लवपाणी स्वकीय विषतरुचे? १०७
हें सर्व सत्य तोंवरि जोंवरि तुज शरण पातलों नाहीं.
आतां थोरपणासचि आपुलिया मात्र राघवा! पाहीं. १०८
गंगेला जावुनियां गांवखरीचा[1] मिळे जयीं वोढा,[2]
तयिं ते न म्हणे, 'मागें, हा कश्मळ[3] शिवतसे, धरा वोढा.' १०९
तूं करुणाघन रामा! भक्तमयूरासि तूंचि सुख देशी,
सन्निधि असोनि बापा! न करीं या किंकरासि परदेशी. ११०
विश्वंभरा! भरवसा आहे या किंकरासि फार तुजा;
जें योग्य तें करावें दीनजनोत्धारणैकदक्षभुजा![4] १११
हा दीन रामनंदन चकोर, तूं चंद्रमा रमानाथा!
दे चित्तस्वास्थ्य बरें, गायीन तुज्या यशोंकिता गाथा. ११२
बहु गोड गुण तुजे ते ऐकावे आदरें स्वयें गावे,
यावेगळे मनोरथ नसती ते तूज काय सांगावे? ११३
सौमित्रे! मजविषयीं तूं आर्यप्रार्थना करीं कांहीं;
भक्ति तुजी श्रीरामीं, बहु कथिलें सत्यशील लोकांहीं. ११४
श्रीभरता! राघवपदलाभरता! अग्रजासि तूं विनवीं,
मज दीनाला रक्षुनि साधावीं सद्यशें असींच नवीं. ११५
शत्रुघ्ना! भगवज्जनशत्रुघ्ना! राघवासि हें कळवीं.
माझें भवभय सारें रामनिदेशेंकरूनियां पळवीं. ११६

---

१. गांवाबाहेरच्या प्रदेशांतील. २. ओढा. ३. घाणेरडा, पापी. ४. दीन जनांचा उद्धार करणें याच एका कामांत प्रवीण असलेले बाहु धारण करणाऱ्या!

माते ! सीते ! बायी ! प्रार्थावें नृपतिला तुवां आंगें;
सुखदुःख तुला ठावें; मजविषयीं उचित तें स्वयें सांगें. ११७
भगवद्भक्त हनूमन् ! साधो ! साधो यश प्रसिद्ध तुजें;
मजसाठीं रामाचे पाय धरीं निजशिरीं प्रतापि भुजें. ११८
आंगें रिपुबळहर्ता, बाहुबळें ब्रह्मगोळ–उद्धर्ता
तूं मारुते ! पुमर्था देशी रघुवीरसेवनसमर्था ! ११९
अद्भुत चरित त्रिजगीं लोकोद्धारार्थ करि सुखें विभु जें,
तें त्वच्चरितसखें बा ! त्वांही केलें चरित्र तेंवि भुजें. १२०
मजहूनि भक्त माझा समर्थ हें आपणांस वांचविलें,
त्वां संकटीं असें शुचिजनास कथुनि स्वतत्व सूचविलें, १२१
मद्भक्तिचे स्वरक्षक भक्त भले हे धरासुता–शोध
त्वां केला, वांचविली हा कुशळांलागिं सुचविला बोध. १२२
तूं तो राघव, राघव तो तूं, तुम्हांत[1] तों नसे भेद;
सप्रेम भक्त देवचि, विधुप्रसादीं[2] समान[2] दृग्वेद.[2] १२३
आयास मदुद्धरणीं लेश नको, सुलघु मीं सदंघ्रिरज;
द्रोण नव्हें, अचळ नव्हें, सहस्रमित ज्यांत तुल्य सिंह गज. १२४
जेथ तुम्ही तेथुनि मज पहा कृपामृतरसार्द्रदृष्टीनें,
हृतनिर्मितसृष्टीनें, शरणागतमरुसुधौघवृष्टीनें. १२५
दृष्टिमृगी ही तुमची राघवपदरागमोहिता आहे,
मज वीतरागरंका निजसुखभरमंथरा कसी पाहे ? १२६

---

१. 'तुम्हांत' या मराठी शब्दांत 'तु' वर जोर द्यावा लागतो. असे अपप्रयोग **पंतांच्या** काव्यांत कोठें कोठें आढळतात. २. चंद्र आणि त्याचा प्रकाश यांचें ज्ञान नेत्रांना सारखेंच होतें, त्याप्रमाणें देव आणि भक्त यांमध्यें अभेद असल्यानें ते दोघे एकसारखेच आहेत.

मन मात्र मला अणुला, स्मरो, तरो तेव्हड्याचि तद्यत्नें;
अणु परमाणुचि तारू हृत्पदिंचा हें किजे कुशलरत्नें. १२७
मी विषयपिंड परवश घरोघरीं मर्कटांस आप्त गणीं.
म्हणुनि तरि तुल्य[1] भावें[1] पाहें,[1] न तरी त्यजीं गतासुगणीं.[2] १२८
संतांसि तरी प्रेरा, जडतारक ते तुम्हांहुनी न उणे,
भूतीं बहु सदयहृदय, पावविती सहज अखिल आत्मखुणे. १२९
भूतें भगवंतचि ते संतचि, परि यांत किति निजीं लग्न ?
दिसती गृहस्थवेषें, परि सम्यक्न्यासपदसुखीं[3] मग्न. १३०
कोण्ही श्रीमन्नारदशुकादिकविमुनिपराशरव्यासीं
हरिगुणसुधाकणाहीं जनसिंचनिं पडियलें सुहव्यासीं. १३१
या चातकलक्षाचें सारस्वत तेंचि जीवन प्राज्य,
इतरहि जीवन इतरां, हे भीक बरी, नको बुचें राज्य. १३२
संतीं पंडितपंतीं अंतीं खंतींत चित्त या धरिजे.
कीं देवा ! सरसनिरस न पाहतां सकट शरण उद्धरिजे. १३३
हेचि अविद्या लंका, तेथ अहंकार दशमुख क्षुद्र;
याचें दहन विखंडन जडजीवोत्धरणपटु सितसमुद्र. १३४
संत भगवंत साचे, परि भगवंतापरीस हे थोर,
हे आंगें अंधाची यष्टी होताति थोर बहु थोर.[4] १३५

---

१. (मर्कटा) समान समजून पहा. २. (तसें जर तुला समजावयाचें नसेल तर) मृतजीवांच्या समूहामध्यें (मला त्यजीं = टाकून दे) ३. (संन्यास-ग्रहणानें मिळणाऱ्या) मोक्षपदाच्या सुखामध्यें. ४. थुवर. या नांवाच्या वनस्पतीचीं झाडें कुंपणाला उपयुक्त असतात.

कलिमाजि पुंडरीकक्षेत्रीं[1] सितपक्षकार्तिकाषाढीं
संत अमृतरस पाजुनि म्हणती, ' घे, हे प्रपा, रहा, वाढीं. ' १३६
नीलमणिद्युतिभावितपीयूषरसऱ्हद प्रसन्न बरा,
ताप शमे, तृप्ति गमे, चित्त रमे उपरमे, सुसेव्य खरा. १३७
वैकुंठचि हें विठ्ठलपदमंडित पुंडरीकसुक्षेत्र,
तेथें हरिगुणकीर्तन, येथेंही तेंच साश्रुजननेत्र. १३८
वृध्द तपस्वी पितृपदसेवनसर्वस्व पुंडरीकमुनी
पितृभक्ति पूर्णकाम श्रीरामा दावितो उभा करुनीं. १३९
गुरुसेवा सद्विद्या पढवाया राम पातला बहुधा.
येणें प्यालेहि सुधा, सुचला हितमार्गही सुधाच बुधा. १४०
आपण सेवा घेउनि पितृचरणीं जोडिली पुन्हा वेडी,
हा पितृभक्त रघूद्वह[2], कृष्ण नव्हे, वुद्धि नायके वेडी. १४१
रामत्रय त्यांमध्यें मध्यम तो राम मी, असें हातें
धरुनी नितंबबिंबा दावी खुण रामचंद्र, पाहा तें. १४२
वृत्ति यदृच्छालब्धें करा, स्मरा मज, धरा तनुसि हातीं;
मग मी आलिंगाया उभाच हें सुचवितो वुधव्रातीं. १४३
' मध्यें[3] कर ' मी म्हणतां, नरलोकीं सत्क्रिया समाधानें
करुनी अन्नोदक द्या भूतीं आर्तीं, स्वसिद्धि या दानें. १४४
विरहें करक्रियांच्या अकर्तृता पूर्णकामता सुचवी,
करुणोत्कंठा दीनप्रोत्धारीं हें उभ्यापणीं रुचवी. १४५

---

१. पंढरपुरांत. २. रघूचा पुत्र– रामचंद्र. ३. अन्वयार्थः– ' मध्यें कर ' ( असें ) मी म्हणतां ( त्रैलोक्यांतील मध्यस्थानीं असणाऱ्या ) नरलोकीं समाधानें सत्क्रिया करुनी आर्तीं भूतीं अन्नोदक द्या ( म्हणजे ) या दानें स्वसिद्धि ( होईल हा भाव ).

तूं तों येथेंचि उभा, अंतीं आम्हांसि ठेविशी कोठें ?
तरि आपल्या सख्याला ' पोटीं ' म्हणतो न बोलतां ओठें. १४६
भक्तप्रेमाचा मीं परम भुकेलों असें, असें कळवी
कटिवरि कर ठेउनियां उभा, खरा तर्क हा, न दुर्बळ वी. १४७
विषय पहातां सादर तरि जातों म्हणुनियां उभा रुसतो,
हितबोधग्रहणास्तव करुणाब्धि क्षोभला मला दिसतो. १४८
मी साक्षी, या सर्वीं अखंड दंडायमान, लिप्त नसें,
शरणागतास भेटें उभाउभीं कळवितो स्वतत्व असें. १४९
प्रेमळ भक्तांहीं मज भेटावें कडकडूनि पोटभरी,
कटिं कर ठेवुनि भीमातटीं उभा शुद्धभक्त्यधीन हरी. १५०
होती कैवल्याची कळिकाळीं लूट, जे असी न कधीं
मागेंहि गोप्रतारीं जाली सरयूंत एकवेळ तधीं. १५१
सर्वस्वदान केलें पात्रीं, क्षेत्रीं स्वमूर्तिसर्वस्व
न सरे अनंत लुटितां, सत्धन सदधीन लुटितसे विश्व. १५२
हे इंद्रनीळमणिच्या कांतिरसाचीच वोतिली मूर्ति
मन तृणकण लिगटतसे, तुम्हीं बरी पाहिली खरी पूर्ती. १५३
हा विठ्ठल ठक, ठकिले ठक, ठक[१] पडलें ठकांसि जें हरि तो.
नामचि देतो दाउनि निजार्थ, जनसंचितार्थ संहरितो. १५४
यासहि नामा ठकडा भेटे, मग यासि ठकविलें तेणें
सद्गुण गाय, सुनिपुणें वेधियला कृष्णसारसा जेणें. १५५
ऐसे भगवत्तत्पर सदयहृदय संत पंत भेटावे,
ते सच्छिक्षादाते मुमुक्षुबुद्धीसि होति नेटावे. १५६

---

१. ' ठकांसि जें ठक ( संकट ) पडलें ( तें दूर करण्यासाठीं ) तो हरि नामचि दाउनि निजार्थ देतो ' असा अन्वय.

सत्धृदयवशीकरण श्रीमत्सीतानिवास या मनुनें[1]
त्याच्या जपीं असावें निरत सदा मीं सचित्तवाक्तनुनें. १५७
हे भरतसुमित्रात्मज ! हे सीते ! माय ! आयका विनती,
सिकवा साधुजनाला कैसी शरणागतें करावि नती. १५८
तुंम्हीं[2] वसिष्ठगाधिजमुनिमुखसच्चरणसेवनोद्युक्त
गुरुजनभजन शुभ जनीं शिकवा, होयीन भवभयोन्मुक्त. १५९
श्रीमंदिर-इंदीवर हें भ्रमरहित[3] प्रसिद्ध तीर्थतटीं,
वृत्धांसि गमे सरयूनिकट वुभा राम निहितपाणिकटी. १६०
अंभोदसंनिभ सुभग भाविकजनभव्यभाग्यभर भोळा
भासे उभा शुभाशय शयविधृतनितंबबिंब[4] हरि डोळां. १६१
निजपदजलजभजकजन जगांत बहु पूज्य हरिसि कीं शिव ते.
प्रत्युत्थान दिलेंसे गुरुतर्कपदा अशा मती शिवते. १६२
श्यामळ विमळज्योति स्वयंप्रभ प्रकट चित्र तम हरितें;
करितें तर्क असा मन, पतंग शमती विलोकितां हरितें. १६३
ताप शमे, तम नाशे, या तेजें हें विलक्षण प्रकट;
वर्णे सुनीळ उज्वळ मनःपतंगासि जीववी निकट. १६४
हा अवधूत विलक्षण सपरिग्रह[5] आणिखी उदासीन,
याणें या सत्क्षेत्रीं नाम्याची सोडिलीहि दासी न. १६५
हा बाळक नंदाचा वसुदेवाचा खरा दशरथाचा
कोणेक विरळ यातें वदती तत्वज्ञ पति अनाथांचा. १६६

---

१. मंत्रानें. २. पृष्ठ २६४ वरील टीप क्र. १ पहा. ३. भ्रम+रहित=भ्रमशून्य; भ्रमर+हित=भुंग्यांना हितकारक. ४. हातांनीं धरलें आहे (आपलें) नितंबबिंब ज्यानें असा. ५. सपत्नीक.

हा सुमणि मनश्चुंबक विष्टपचिंतामणी विषघ्नमणी
स्पर्शमणी अमृतमणी सुरमणि चूडामणी मणींद्रधणी. १६७
हा कल्पपादपाचा रोपा लसलसित कोंवळा सोपा,
याच्या हृदयीं आहे खोपा,[१] घेतात हंस सुखझोंपा. १६८
गोरा नंद, यशोदा गोरी, वसुदेव दशरथहि गोरा;
तत्सुत काळा कां तूं? भोळे जन ठकविसी हृदयचोरा! १६९
काळा कां हें कळलें मजला, तूं नीळकंठकंठमणी,
भोळ्या शिवें दिलें तुज पुंडरिकातें रिझोनि साधुपणीं. १७०
तूं सोय जाणसी बहु, दीनांचा सोयरा खरा सुभगा!
राखिसि लाज जनाची, हें संसारांत जोडिलें शुभ गा! १७१
जीवोत्धारीं करुणा, श्रुतिनिष्ठांचीहि भीड वागविशी;
वेषान्तरें कळित बहु जन तारिसि, साधनीं न भागविशी. १७२
तूं सज्जनशुकपंजर कंजरमणवंशमणि[२] वतंसपद
खळशमन बळशमनशरकरहर[३] हरहृदयहर विरक्तपद. १७३
भक्तमयूरदयाघन तूं रामा! भवदवार्तविश्रामा!
साष्टांग नमन तुजला भुजलालितनिजजना! गुणग्रामा! १७४

---

१. झाडाची ढोली. २. पाण्यांत उत्पन्न होणाऱ्या कमळांना प्रिय जो सूर्य त्याच्या कुळामध्यें श्रेष्ठ. ३. येथें हस्तदोषानें 'हरहर' असा शब्द निरर्थक पडला आहे. त्यामुळें दोन मात्रा अधिक होतात.

## ( २ ) रामरीति

( गीतिवृत्त )

श्रीहरिदास न चुकती, जें कोठें न्यून किमपि, करितात,[१]
दृग्दोषभीत मिरविति रुचिर शिशुसि सजुनि काय तरि तात ![२]　१
अमृतात्यधिकरसभरित चरित प्रभुचें जयांत तें वस्तु,
नच सकळ जनां दाविति, भाग्यवती जेंवि; सुगुण हा अस्तु.　२
श्रीज्ञानदेवरचिता[३], नच विसरति रसिक जे अतिज्ञाते;
मानससरोवराला हंस जसे करुनियां प्रतिज्ञा ते.　३
सदभंग-गातया[४] बहु मधुरहि परवच रुचेल कां ? बा ! हो !
कोण म्हणेल अमृतफळभुङ्मत[५] गोमंतकस्थ आंबा हो ?　४
श्रीवामन[६] वेणुचि, जन किति जेणें मोहिला, परस्वामी;[६]
तद्ग्रंथज्ञ बुध म्हणे, 'कां इतरा आतळों[७] परस्वा[८] मीं ?'　५
ज्या श्रीमदेकनाथश्रीमुक्तेश्वरकवींद्रकृत ओंव्या,
त्या अन्या कृति, माता सोडुनि, दाया, न बाळका होव्या.[९]　६

---

१. याचेमागें 'तें पूर्ण' हे शब्द अध्याहृत घ्यावेत. २. अन्वयार्थः– दृग्दोषभीत ( दृष्टिदोषामुळें घाबरलेल्या, पण ) रुचिर ( सुंदर ) शिशुसि ( त्याचा ) काय ( देह ) सजुनि तरि ( तर ) तात मिरविति ! ( ही सामान्यजनांची रीतिच आहे ). ३. याचेपुढें 'श्रीज्ञानेश्वरी ग्रंथाला' हे शब्द अध्याहृत घ्यावेत. ४. साधूंचे ( किंवा चांगले ) अभंग गाणाऱ्याला. ५. अमृतफळ खाणाऱ्याला मान्य. ६. परस्वामी श्रीवामन= श्रेष्ठ स्वामी वामनपंडित कवि. ७. स्पर्श करों. ८. दुसऱ्याच्या धनाला. ९. अन्वयार्थ :– त्या माता सोडुनि, बाळका दाया ( तशा सुरसिकास ) अन्या कृति, न होव्या.

हिंदुस्थानी भाषा ग्वालेरी गोड तीहि पंजाबी,
सुरसिक कवि म्हणति इची तूंचि श्रीकृष्णपादकंजा[1] बी. ७
श्रीसूरदासतुलसीदासकबीरादिसुकविकवनातें
सोडुनि, लावील कवण रसिक दुजाशीं रिझोनि नव नातें? ८
करिती जे पावुनि हरिदत्ता प्रतिभामहावरा[2] कवन,
त्यां परकाव्य तरि म्हणो, सदुपवनकरा[3] 'पहा' वराक[4] वन. ९
ज्यां वाजले यशांचे साधुकवींच्या सदैवहि नगारे,
तन्निरतांसि म्हणेल, 'क्षणहि कवन नव न, दैवहि न, गा! रे!' १०
ज्याची छाया निववी जैसा तैसाहि होय सुतरुच तो,
परलोककामुकाला बहु नृपपुत्रापरीस सुत रुचतो. ११
हरिभक्ता हर कीं हरभक्ता हरि नाठवे तसें एका
भजतो त्या ग्रंथ दुजा, नच चातकखग वळे परा[5] सेका[5]. १२
श्रीहरिहरभक्त जसे उभयत्र सुभक्तिचीच चव घेती,
उभयग्रंथीं ऐसी रीति भले जाणती, न अवघे ती. १३
निंदिति न मुखें किति, परि निंदा चित्तांत, कर्म फटकळ तें,
श्रवणीं जृंभान्यस्तुतिवार्ताद्युदयेंकरूनि अटकळतें. १४
घेती सर्वत्र मधुप रस कीं हरिभक्त साधु सुरसिक ते,
असते रसज्ञ, अमृतीं नच रमते, साधुसूक्ति सुर सिकते. १५
दिसति, म्हणवितिहि, भगवद्भक्ति-रसिक साधुजन निपट थोडा,
अगणित असति, सुमुख शुचिलक्षणसंपन्न थोडका घोडा. १६

---

१. श्रीकृष्णाच्या पदकमलाला. २. दिव्य दृष्टिरूपी मोठ्या वराला. ३. उत्तम बाग करणाऱ्याला. ४. ओसाड; दुर्दैवी. ५. ( मेघाशिवाय ) इतर जलसिंचनाला.

पुष्ट करावें अन्यग्रंथा सुरसें जसें सुता रोडा,
ऐसा हरिहरभक्तांवांचुनि विश्वांत शोधितां थोडा. १७
प्रतिभारूपा आज्ञा दिधली ज्या किंकरा[१] हरें अजितें,
सजितें जना अरसिका, तत्कवन नवा[२] हया[२] तसें अजि तें. १८
ग्रंथ भिडसराचे,[३] हरि न वदुनि, देतां न दान, वरि, पोहे
कवि म्हणति, 'रीति तव तव भक्तींच परी न दानवरिपो ! हे.' १९
चरणीं समर्पिलें तें हृदयीं होऊनि बहु समुद्धरिसी,[४]
न करिसि अनादर कधीं देउनि सद्यश जडा समुद्धरिसी.[५] २०
गोपांच्या बाळांहीं प्रेमें जें काय तुज दिलें उष्टें,
तें सेवुनि तोषविले ते बहुतचि वत्सलें तुवां तुष्टें. २१
ऐकों, देव पुढें करमुख तूं उष्टयासि करिसि बा ! हर्षें,
तैं कोंदे वपु, ढेंकर देसी, चातक जसाचि दे वर्षें.[६] २२
बा ! तुज समर्पिला जो गिळिला उगळूनि[७] तोहि सुग्रास,
तूं परमसदय करिसी गोपींसीं श्रीविलासभुग्रास.[८] २३
तूं 'यत्करोषि'[९] ऐसें वदलासि, दिलें तयासि, मन पार्थें,
कवि वाङ्मयें तपें तुज अर्पिति तीं जाहलींच अनपार्थें.[१०] २४

---

१. सेवकाला. २. नवा हया=नव्या घोड्याला. ३. भिडस्थ अशा सुदामदेवाचे पोहे श्रीकृष्णानें आवडीनें स्वीकारले या कथेकडे कवीचें लक्ष आहे. ४. समुद्+हरिसी=आनंदानें हरण करतोस. ५. उद्धार करतोस. ६. जलवर्षावानें. ७. तोंडांतून बाहेर काढून. ८. श्रीविलासभुक्+रास=लक्ष्मीशीं क्रीडा करणारा (तूं गोपींशीं) रास (-क्रीडा) करतोस. ९. (श्रीमद्भगवद्गीता अध्याय ९ श्लोक २७ पहा). १०. अन्+अप+अर्थें=अविफलार्थें; व्यर्थ नव्हेत अशीं.

'देवा! तूं भावाचा' म्हणती त्वद्भक्तजनकवि 'भुकेला,'
भिल्लें प्रसन्नमुख जळपळदानें[1] स्कंदजनक[2] विभु केला. २५
त्वच्चरणार्पित अहितहि महित[3] हित महाप्रसादता पावे,
अग्न्यर्पितें विषेंही तप्त निवावे, कधीं न तापावे. २६
ज्यांची श्रुतिमति वाणी त्वत्कीर्तीची अधीनता पावे,
ते निजसार्थक्याच्या चिंतेनें तों कधीं न तापावे. २७
तूं भगवान् हरि कीं हर भजनोत्साहा न तानवदशील,[4]
म्हणसी सर्वा दीना भिवुनि भवा[5] 'हा!' नता न वदशील. २८
घे ती नवी जुनीही विधु[6] दे ज्या काय मानव दशीला,[7]
देवा! तूं कृपण असें आपुलिया विधुसमा न वद शीला. २९
प्रेमें तुजला होतें बा! सुपदार्थासमान वाईट,
रुचली तुलाचि, रुचती बा! दीनाही न मानवा ईट. ३०
तापस-तर्पण[8] केलें जें त्वां सेवूनि शाकपत्रास,
वाटे पावे कल्पुनि सर्वामृतदान नाकप[9] त्रास. ३१
भक्तार्पित कनककुसुम[10] तें साक्षात्कनककुसुम[11] भव मानी,
हेंच यशस्कर, सुज्ञ प्रभु तुछ पदार्थही न अवमानी. ३२

---

१. पाणी आणि मांस यांच्या दानानें. २. स्कंद = कार्तिकस्वामी, त्याचा जनक = शंकर. ३. पूज्य. ४. लघुत्व देण्याचा स्वभाव असलेला. (तानव+द+शील). ५. संसाराला. ६. चंद्र. ७. वस्त्राच्या टोंकाच्या सुताला (मूळशब्द 'दशा' स्त्रीलिंगी) (अमावास्येनंतर दिसणाऱ्या बाल चंद्राला नव्या–जुन्या वस्त्राची दशा अर्पण करण्याची चाल आहे). ८. तपस्वी दुर्वास ऋषीची तृप्ति. (पांडव वनवासांत असतां दुर्वास त्यांचें सत्त्व पहाण्यासाठीं आला तेव्हां). ९. स्वर्गाधिपति इंद्र. १०. धोतऱ्याचें फूल. ११. मूर्तिमंत सोन्याचें फूल.

चाखुनि रस तुज भोळ्या शबरीनें जीं समर्पिलीं बदरें,  
देवा ! तीं अमृतफळाहुनि बहु मानूनि घेतलीं पदरें. ३३  
म्हणसी सेवुनि दीना दासाचे मंद बोल कानाहीं:–  
‘ ऐसा कश्यप दशरथ शौरि तथा नंद बोलका नाहीं. ’ ३४  
निश्वास वेद ज्याचे ऐसा सर्वज्ञ तूं, तुला रुचतें  
जरि न स्तवन भलतसें तरि कवणा नीट तें कसें सुचतें ? ३५  
यास्तव रचुनि दयास्तव[1] सुजना दे ती तव प्रिया लिहुनीं,  
दास अधिक दासाहुनि जाणे न प्रियसखी प्रियालिहुनीं[2] ३६  
त्वद्भक्त शिरोनि तव स्तवनीं कवनीं रसासि चाटुनि घे,  
तदितर[3] जो जन भोजनकरकामें भाजनांत[4] चाटु[5] निघे.[5] ३७  
ग्रंथीं शिरुनि ढवळुनि, न सेविति साराहि नर विलासा जे,  
विरसा[6] चपळा[7] तन्मतिरीति सखी काय न रविला[8] साजे ? ३८  
खळ बोधिला हरिजनें, तो तातें बाळ भरविला साचा,  
आंत न नेचि हितकरहि दुष्कृत कळिकाळभर विलासाचा. ३९  
स्वज्जन म्हणे, ‘ जना ! रे श्रीपतिचे शर्मकर विलास वदा, ’  
पुत्रांसि साहुकारें[9] जेंवि कथुनि धर्म करविला सवदा.[10] ४०  
सुजनांत ऐकत करुनि आवश्यक कर्म नर विलास वसे,  
स्पष्ट करावे लागति त्या दुसरे धर्म न रविला सवसे.[11] ४१

---

१. करुणास्तोत्र. २. आवडत्या सखीहून. ३. त्या भक्ताहून इतर. ४. ( भोजनाच्या ) भांड्यांत. ५. चाटु निघे=मनाला संतोष उत्पन्न करून घेतो. ६. ( १ ) मतिपक्षीं ‘ निराशेला ’; ( २ ) रवीपक्षीं ‘ रसहीनतेला. ’ ७ ( १ ) मतिपक्षीं ‘ दुराचारिणी ’; ( २ ) रवीपक्षीं ‘ चांचल्ययुक्त. ’ ८. रवी=दहीं घुसळण्याचें काष्ठयंत्र. ९. सावकारानें. १०. खरेदी-विक्री; व्यापार–व्यवहार. ११. यज्ञासारखे.

सुरस हरिविलासाचा कीं घे कळिकाळ हरविलासाचा,
पण लीलापूर्व करुनि तेणें कळिकाळ हरविला साचा. ४२
त्वच्चरितांतिल देवा! त्वद्भक्तमनांत न रस नाचावे,
साधूंत सर्व मायिक[1] म्हणुनिहि कीं धृष्ट न रसना चावे. ४३
रीति तुतें तीच भजे बहु मिळवाया यशास साधूंतें;
जें साम्य साधिलें श्रुतिशास्त्रांहीं मीं कशास साधूं तें? ४४
तूं स्वगुणें करिसि जसी तसिच करी सर्व पापहानि खळ,
कीं साधुसमचि परहितकर हा बा! सर्वपा! पहा निखळ.[2] ४५
जैसी सिंधुवधू[3] ती धूती तैसीच पापराजि[4] भली,
गंगा तेंवि तव जना प्राप्त खळाची न बा! परा जिभली. ४६
देवा! निरामय[5] सुखी शतवत्सर सर्व खळ असावेच,
न प्रार्थितां नच करिल पंकाचा तीर्थजळ-असा वेच.[6] ४७
हरिभक्त असे हरिजन तैसे हरिदास सर्वही ऐसे,
यापरि कसें तरि तुझें नाम मुखीं, त्यांसि नरक बा! कैसे? ४८
त्वन्निंदक तरति तमीं[7] सन्निंदक हेच सांग कां बुडती?
तरि सत्कीर्ति जसी हरिकीर्ति तसी मीं म्हणोनि कां उडती? ४९
'मीं साधु एक' म्हणसी नच दाखविसि क्रियेंतही भेद,
त्वन्निंदकसन्निंदकफळभेदचि वाढवी मनीं खेद. ५०
संसाररीति गणिका[8] जसि तसि हरिभक्तसाधुरीति सती,
निंदीना कां? देवा! ठावी तीची न माधुरी तिस ती. ५१
हरिदासातें निंदिति हरिदास, नव्हे नवीच हे रीति,
गोपी अंगुलि मोडिति कुब्जेवरि, शुक कवीच हेरी[9] ती. ५२

---

१. कपटमय, मिथ्या. २. शुद्ध. ३. गंगा – **पंत**. ४. पापपंक्ति.
५. रोगरहित. ६. खर्च. ७. दुःखांत. ८. वेश्या. ९. निरखून पाही.

हरिभक्ता कर्म ठकवि निंदिति हरदास कर्मठ कवीतें,
दोष कळोनिहि रुचतो, प्रबळ प्राचीन कर्म ठकवीतें. ५३
सगुणपरा निर्गुणपर निंदिति, निर्गुणपरा सगुणपर ते.
रामा ! कृपाकटाक्ष न योजिसि जों स्पष्ट तों न गुण परते. ५४
निंदेनें मन माझें श्रीगिरिशाचें जसें न तापावें,
श्रीरामा ! कीं भलत्या त्वद्दासाचें तसें नता पावें. ५५
पाहुनि बळिस न दितिच्या साहे सन्मतिहि अदिति सुतपातें,[१]
तसिच अदितिच्या पाहुनि देवा ! तुजलाहि न दितिसुतपातें. ५६
जो सप्रसाद यातें नच साहे विप्रसाद[२] या लोकीं,
सर्वज्ञा किंचिज्ज्ञस्वजयार्थी विप्रसा दयाळो ! कीं. ५७
श्रीरामा ! जाणसि जरि तरिहि तुज निवेदितोंचि मद्रीती,
माझा[३] ठाईंच बरी मज हे मद्रांत[४] जेंवि मद्री[५] ती ५८
धातूंत जसें हाटक[६], नाटक वर सर्व सुप्रबंधांत,[७]
तें अरसिकांत संप्रति निष्फळसें मुकुर[८] जेंवि अंधांत. ५९
रस न समजति, म्हणविती रसिक, म्हणुनि चित्त बहुत हळहळतें.
जें तन्निंदक भाषण होतें कर्णांत तप्त हळहळ तें. ६०
थोराहीं स्तविले कवि, तन्निंदा तिळहि सोसवत नाहीं.
मज सुरस ग्रंथाहीं, वृत्तिपरा जेंवि सोस वतनाहीं. ६१
ज्या सेतुनें भवनदी वाहुनि संसारखेदभार तरे,
धर्मार्थकाममोक्षप्रतिपादन ज्यांत वेद भारत रे ! ६२

---

१. उत्तम तपातें. २. ज्याचेवर प्रसाद ( कृपा ) नाहीं, असा. ३. माझ्या. ४. मद्रदेशांत. ५. मद्रदेशस्थ स्त्री. ६. सोनें. ७. उत्तम काव्यांत ( ' काव्येषु नाटकं रम्यं ' ). ८. आरसा.

त्याला कैसे करितां इतरपुराणांसमान किति ह्रास ?
चित्तांत आवरावा म्हणतों रे ! हा मुकुंद इतिहास. ६३
श्रीमद्रामायण जें कोणी कांहीं म्हणेल जरि त्यातें,
त्यातें राक्षस म्हणतों मीं सन्मार्गांत विघ्नकरित्यातें. ६४
श्रीमद्भागवत मला निज पूर्वजपुण्यचरितसें वाटे.
तत्कथितात्मनिधानालाभें कंठ क्षणक्षणीं दाटे. ६५
श्रीविष्णुपुराणाची श्रीभागवतें तसीच गति केली.
वृंदावनें जसी श्रीसाकेताची[1] प्रसिद्धि मृदु ठेली. ६६
सद्व्यसनीं वेंचावें आयुष्य नसेचि भरवसा याचा;
झालों जीर्ण तरि मनीं आहे रसिकांत भर वसायाचा. ६७
त्वत्प्रीत्यर्थ तवसुगुणमयचि करुनि कवन वेचितों देहा.
उत्साह त्वत्कीर्तनरस चित्ता नवनवेचि तों दे हा. ६८
समजुनि घ्यावी वळवुनि सेवेनें सुरसिका बिहारी ती,
म्हणतो अद्यापि तसी वेडा भूसुर सिकावि हा रीती. ६९
श्रीरामा ! बहु गोडचि मजला जैसें दुकाळल्या सर्व.
कोठें मिळतें, कैंची शक्ति धरिन मीं मनांत कां गर्व ? ७०
श्रीरामा ! न तुजपुढें म्यां दीनें दीनरीति बोलाव्या.
योग्य तुझीच तुजपुढें सुसभा परिसोनि जीस डोलाव्या. ७१
शांति नसे, श्रीरामा ! हें विनवायासि बोलिलों देवा !
श्रीपद या ठेव शिरीं किंवा म्हण निजजनांसि तरि ' ठेवा. ' ७२
श्रीरामा ! सर्वांच्या रीतींत तुझीच सुमहिता रीती;
तत्काळ नता सर्वा एकहि नेछूनि सुमहि तारी ती. ७३

---

१. श्री अयोध्येची.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 33422 वि: ......

सुगळीं[1] बिभीषणीं जी दाखविली सर्वही परि सुरीती,
हे सुविरक्ता भुलवी नच परममनोहरा परि सुरी[2] ती. ७४
रामा ! बहुतांसि तुझी बहु दावुनि रीति कोवळीक वळी,
जैसी निज बाळातें हृदयाची माय कोवळी कवळी. ७५
आवडल्याहि न मागे, संकोच धरूनि, पावणा शेंगा[3]
तो जड; रसिका ! आर्या या पाठ करूनि पावणाशें[4] गा. ७६
मज अभिमान नसे, म्यां रामपदाच्याचि वाहिल्या आणा.[5]
आर्या मनीं[6] सुजन हो ! श्रीरामपदींच वाहिल्या आणा.[6] ७७
जीभ विनिव, तीकरवीं प्रभुचे गुण सबहुमान वानीव.
तापत्रयें भवीं या बा ! तापें न बहु मानवा ! नीव. ७८
श्रीगौरीहि म्हणे, ' मजहुनि पटु मत्कांतभक्तितें वरिती,
विषयीं सज्ज न सज्जन मज्जन[7] मज्जनकनुतयशीं[8] करिती. ७९
कागद होति यमाचे करितांचि यथामति स्तवन कोरे,
सत्यचि हें, बा ! श्रोत्या ! चित्तांत म्हणों अतिस्तव नको रे ! ' ८०
गुरु म्हणति, ' करीतचि जा प्रभुचाचि यथामति स्तव, न राहो;
येथेंचि अघहतिस्तव[9] सक्त[10] रतिस्तव गतिस्तव नरा ! हो. ८१
करितां खशाबशा[11] स्तव होसिलचि जनीं महायशा बास[12]
म्हणतिल सज्जन भगवद्भजनीं होउनि सहाय ' शाबास ! ' ' ८२

---

१. सुग्रीवीं. २. अप्सरा; देवता. ३. करंज्या. ४. पाऊणशें, पंचाहत्तर. ५. शपथा. ६. मनीं आणा = मनांत आठवा. ७. स्नान, बुडी मारणें. ८. मत् + जनक + नुत + यशीं = माझ्या पित्यानें (हिमालयानें) स्तविलेला जो शंकर त्याच्या यशामध्यें. ९. पापनाशनाकरितां. १०. आसक्त, निमग्न, अधीन. ११. कसाबसा, कोणत्याहि तऱ्हेचा. १२. बस्स; पुरेसा.

स्तव शिकत्या उचित जवळि करुनि सदा सदय सत्सभा टपणें,
हे वर्ण्यांचि; न वर्णूं पशुतेस्तव सुरभिवत्स भाटपणें. ८३
साधुसभेनें नाहीं कोणाचा कोण उद्भव[१] पुरविला ?
अन्य किति ? ईत आल्या वाटेल स्वीय शुद्ध वपु रविला. ८४
हे[२] म्हणति,[२] ' नंदनींचे[३] पुरिव विषयिकामराशि, शोभ, लते ![३]
भुलिव स्वौदार्ययशें मंदारा पामरा शिशो ![४] भलते.' ८५
तसि हे जसि रामपदीं झाली गुणसुखनि जानकी रमती
ईत म्हणेल इरा हे, ' मजला दे सुख निजा न कीरमती. ' ८६
वर्णिति साधुसभेची बहु सोडुनि गर्व सुरसभा रीती,
आम्हांहूनि शतगुणें देणारी सर्व सुरस भारी ती. ८७
जसि सत्सभा न भुलवी कृष्णा दावूनि वदन राधा या,
हे म्हणति, ' ये सुखें धा; बा ! इतरालाहि वद नरा ! धा या.' ८८
साधुसभा जेंवि असी कोणीहि नरा सभा समहिमा न,
ईस न भजतां फिरतां क्षोणीहि न रासभासमहि[५] मान. ८९
हे पटु कळंकरूपा क्षाळाया इंदुपातका नांदे,
बा ! या अमृतनदीचा एक तरी बिंदुपात कानां दे. ९०
तितुकी सत्कृति कैंची ? जो कोणी अश्वमेधयाजी[६] या
श्रितसत्सभांसि म्हणती हरिहर, ' तुमचाचि वेध या ! जी ! या !' ९१
जी सत्सभेसि अनता[७] जनता[८], सोडूनि परिस[९], भागावी.
साधूंची सुज्ञानें बहु हरिहरकीर्तिपरि सभा गावी. ९२

---

१. आनंद, मनोरथ. २. ही साधुसभा म्हणत्ये. ३. नंदिनींचे लते != इंद्राच्या बागेंतील कल्पलते ! ४. बालस्वरूपिणी अशा कल्पलते ! ५. गर्दभाप्रमाणें सुद्धां. ६. अश्वमेध करणारा. ७. नम्र नव्हे अशी. ८. जनसमुदाय. ९. स्पर्शमणि.

सत्कारिला इणें जो तो रंकहि सुरवरासि सत्कार्य.
किंबहुना श्रीहरिहर आंगें करितिल जपोनि तत्कार्य. ९३
तुळितां देवसभांसीं सुयशें होवूनि तदधिका राहे,
करिलचि पणांत कुतुकें त्यांतें गोवूनि तदधिकारा हे. ९४
जें भाट[1] सत्सभेचें झालें नच तोंड हिमटवाणी[2] तें,
मनुजा ! म्हणेल लटिकें हें, तरि तत्काळ चिमट[3] वाणीतें. ९५
श्रीसत्सभा भगवती प्रेमें शरणागतासि आपंगू,
पावेलचि अत्युत्तम गतिस सुखें जरि मयूर[4] हा[4] पंगू. ९६
आपंगिलोंचि आहें साधुसभेनें तरीच गा ! याची
मति झाली श्रीहरिहर-तज्जनचरितें बरीच गायाची. ९७
दावुनि इणें दिला धरि वदनिं धुतां दास हरि लगामातें,
जो वदला विधिस, 'मम स्मरण सकळ मोह हरिल; गा ! मातें.' ९८
कळवित आली हितकर मार्ग, पुढेंही जनास कळविल या,
पातक नेइल हरिहरचरणीं लावुनि मना सकळ विलया. ९९
अतिदुर्लभा प्रसादामृतनिधिच्या भक्ति नउ जरी लहरी,
प्रणतकुरीतिस काय प्रकटुनि पदशक्ति न उजरील[5] हरी ? १००
भक्तमयूरें वंदुनि कळविलि करुणाघनास तुज रीती.
कुब्जेसि तसीच तुझी प्रणतकुरीतिस दयाचि उजरीती. १०१
हा ग्रंथ 'रामरीति' च, यांत श्रीरामरीति सारा[6] जी !
याच्याहि व्याख्यानें सुरसिक हो ! स्वाधिभीति सारा[7], जी. १०२

---

१. स्तुतिपाठक. २. कंजुष. ३. चिमटून-दाबून टाक. ४. हा मयूर-मी मोरोपंत. ५. नीट करील. ६. उत्कृष्ट. ७. दूर करा.

तीं आगळें[1] असें हें आर्यांचें मधुर एक शत गावें,
याचें गायन जोंवरि तोंवरि तरि किमपि दुःख न तगावें. १०३

---

## ( ३ ) सन्मनोरथराजि[2]

( गीतिवृत्त )

श्रीरामासि भजावें भक्तें म्यां जेंवि तेंवि संतातें,
राजासि उपासावें, तैसेंचि जनें प्रधानपंतातें.[3] १
व्रतिबाळाचें कल्पुनि विधुचें रविचें जसें चिरागमन
धरि उत्सवदिवसाचें,[4] बहु धरु माझें तसेंचि राग, मन. २

---

१. तिहींनीं अधिक असें. २. सत् (सन्)+मनोरथ+राजि=सज्जनांच्या मनोरथांची म्हणजे त्यांना आवडणाऱ्या गोष्टींची माला असें या काव्याचें नांव आहे. याच्या प्रत्येक पद्यांत भगवद्भक्तांच्या हृद्गत विचारांचें प्रतिबिंब चांगलें उमटलें आहे. त्यामुळें हें काव्य प्रेमळ, सरळ आणि चित्ताकर्षक असें उतरलें असून उपमादि अलंकारांनीं मंडित आहे. ३. पेशव्यांतें. ( या पुस्तकांतील "नाममाहात्म्य" प्रकरणांतील पृष्ठ ४४ वरील आर्या क्र. ९९ मध्यें **पंतांनीं** 'प्रधानपंत' ( पेशवे ) यांच्या नांवाचा उल्लेख केला आहे ). ४. अन्वयार्थ :- जसें विधुचें रविचें चिरागमन ( पावसाळ्यांतील मेघाच्छादनामुळें पुष्कळ दिवसांनीं येणें, दर्शन देणें, तसें एखाद्या ) उत्सवदिवसाचें ( चिरागमन ) कल्पुनि व्रतिबाळाचें ( व्रत धारण करणाऱ्याचें, ब्रह्मचाऱ्याचें ) मन बहु राग ( प्रीति ) धरि, तसेंचि माझें ( मन बहु राग ) धरु. व्रती नियमी लोकांना पावसाळ्यांतील चंद्रसूर्याच्या दर्शनाप्रमाणें एखादा उत्सव आनंददायक वाटतो; तसाच एखादा उत्सव मलाहि अतिशय उत्साहदायक वाटो, असें **पंत** म्हणतात.

कर्णयुगांत भरावें जें हरि ! हरिजनयश प्रचुर म्यां तें,
जैसा दोंदीं कोंदी गुर्जरदेशस्थ विप्र चुरम्यातें.[1] ३
हा हो सुतृप्त राघवनामें, सारेंचि[2] जेंवि तेलिंगा,
शीला जपो, बहु जपति जैसे अय्याख्य[3] साधु ते लिंगा. ४
म्यां लावावी हरिहरकीर्ति सुवीरें जसी सडक[4] डावीं.[5]
गोवर्धनीं घनघटा[6] तसि मजवरि अरिचमू[7] कडकडावी.[8] ५
मतिची पडो हरिगुणीं, पतिकंठीं मिठि जसी सुदारांची,
नुच्चारू परमर्मा, जीभ नकारा जसी उदारांची. ६
सत्संगतीं असावा प्रेमा, ग्रीष्मीं जसा असे व्यजनीं.[9]
रम्यहि अभक्त हो मज, मधुपा[10] चंपक जसा असेव्य, जनीं. ७
स्त्रीस जसें न त्यजवे केलें उच्छिष्ट मांजरें दुभतें,
सद्भजन दूषिलें जह्वि दुष्टें, मद्बुद्धि न त्यजू शुभ तें. ८
काव्य करावें म्यां, नच वचकावें,[11] दूषितो परि लघूस.
न करावें काय सदन कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस ? ९

---

१. एक प्रकारच्या पक्वान्नाला. खुसखुशीत हरोळया चुरून त्यांवर तूपसाखर घालून केलेल्या लाडवाला ‘ चुरमा ’ किंवा ‘ चुटिया चुरमा ’ म्हणतात. २. सार नांवाच्या पातळ पदार्थानें. तेलंगणांतील लोक खमंग, खुसखुशीत व रुचिकर ‘ सार ’ बनवतात अशी त्यांची ख्याति आहे. ३. अय्या नांवाचे; ( लिंगायत लोक चांदीचें शिवलिंग गळयांत घालतात ). ४. पैज. ५. डावामध्यें. ६. मेघांची माला. ७. ( कामादि विकाररूपी ) शत्रूंची सेना. ८. कडकड आवाज करीत चवताळून यावी. ९. पंख्याचे ठिकाणीं. १०. फुलांतील मध चाखणाऱ्याला; भ्रमराला. ११. भिऊन वागावें.

हा सांजलि[1] हो भजनीं, योग्य मखीं युक्त कर[2] सदर्भ[2] कसा !
मद्ग्रंथ गुरुप्रिय हो, अप्रौढहि उक्तकर[3] सदर्भक-सा.[4] १०
मातेतें त्यजुनि पळहि जाय न भलतीकडे जसें बाळ,
सत्संगति सोडुनि, मन नच जावु, तसेंचि घेउ हें आळ.[5] ११
गुरुभक्ति ते स्वमाता, भावू सत्संग, विषय तो बावू.
भावू[6] माजें मानसबाल श्रीरामकीर्तितें खावू. १२
कांपावें मन कुजनीं, वृद्धपणीं कांपतें जसें शिर तें,
सत्संगींच शिरावें, बाळ जनन्यंचळीं[7] कसें शिरतें. १३
मद्ग्रंथ असावा बुधजनबहुमत जेंवि शंभुवृषभांड,[8]
अर्थें पूर्ण असो मम वच सत्पूजार्थ जेंवि वृषभांड.[9] १४
पूज्य असो मतिस तसा जन जैसा जड[10] अशक्त जामाता,[11]
सद्दृष्टि या जनीं अवलोकुनि लाजोत साधु ज्या माता. १५
मज आपणांत मिळउनि द्यावें सुविशुद्धयश बुधानें तें,
तोयासि आत्मदानें जें अमृतभुगाननीं[12] दुधा नेतें. १६
नच सोडावें नारायणनामानें कदापि हें वदन,
मेल्याही लोभ्याच्या चित्तें सोडूं नये जसें सदन. १७

---

१. अंजलि जोडून. २. सदर्भ कर = दर्भयुक्त हात. ३. सांगितल्याप्रमाणें करणारा; आज्ञापालक. ४. सद्+अर्भक–सा=उत्तम मुलासारखा. ५. लळा, हट्ट. ६. मानो, समजो. ७. आईच्या लुगड्याच्या पदरांत. ८. शंकराच्या बैलाचा ( नंदीचा ) अंड. ( नंदीच्या अंडाला स्पर्श करून मग शिवलिंगदर्शन घेण्याची प्रथा आहे ). ९. वृष + भांड = विष्णु + पात्र = देवपूजापात्र. १०. मूर्ख. ११. जांवई. १२. अमृतभुक् + आननीं = देवांच्या मुखामध्यें.

सद्गुजन न त्यजावें, बहुकष्टीं संकटीं जसें वतन,
सूक्त[१] करावें तैसें जैसें तपकीरतत्परें जतन. १८
भाग्यवतीला दुर्बळकन्या तसि सत्सभेसि हे उक्ति,
व्हावी पारिपाल्या[२] कीं घेती शिशुचीहि जाणते युक्ति.[३] १९
पांचाळिकाविवाहीं[४] जैसें पिशुनीं[५] तसें असो रुसणें,
समयीं आपन्नजनीं द्यावें, सुप्रिय जनीं जसें, उसणें. २०
मम मति सदुक्तिस भुलो, त्या मुरलीला जसीच ती राधा,[६]
प्रभु मुनिसुतासि[७] न म्हणे काय अधिष्ठुनि[८] पयोधितीरा धा?[९] २१
प्रेमें नवीं नवीं तीं माझ्या रसनेसि सुकविकुलगीतें[१०]
गीतें यावीं, येती माहेरीं जेंवि बहुत[११] मुलगीतें. २२
हो सत्करप्रसादें कुब्जा तैसी मदीय मति सरळी,
खळकृतनिंदा सुखदा हो श्यालकृता[१२] जसीच मतिस रळी.[१३] २३

---

१. (१) केळीचें वाळलेलें सोपट; (२) चांगलें बोललेलें; सुभाषित. २. पालन करण्यास योग्य. ३. 'बालादपि सुभाषितं ग्राह्यं' असें संस्कृतवचन आहे. ४. लहान मुलींच्या खेळांतील बाहुलीच्या विवाहांत. ५. दुष्टांचे-चहाडखोरांचे ठायीं. ६. वृषभानुकन्या. श्रीकृष्णावर हिचें अनन्यसाधारण प्रेम होतें. ७. उपमन्यूला. (हा व्याघ्रपाद नामक ऋषीचा ज्येष्ठ पुत्र. याच्या आईनें गरीबीमुळें याला पाण्यांत पीठ कालवून तें दूध म्हणून दिलें होतें. तेवढ्यावरून यानें रागानें आणि त्राग्यानें अरण्यांत जाऊन शंकरास प्रसन्न करून घेतलें व त्याजकडून क्षीरसागराचें आधिपत्य मिळविलें, अशी कथा आहे). ८. बसून. ९. तृप्त हो. १०. उत्तम कवींच्या समुदायानें गाइलेलीं (गीतें). ११. पुष्कळ (गीतें). 'सीतागीत,' 'सावित्रीगीत' आणि 'रुक्मिणीहरणगीत' हीं पंतकृत स्त्रीगीतें प्रसिद्धच आहेत. १२. मेहुण्यानें केलेली. १३. थट्टामस्करी.

ज्या उक्तीतें समयीं अर्थी जाणोनि दान साधु करी
गोडीनें सेवावी ती म्यां क्षुधितें जशीच माधुकरी.[१] २४
साध्वाशीनें[२] न ढळों द्यावा हा[३], सुमतिनें जसा पदर,
सेवावें रसिकें वच याचें[४] श्रीराघवें जसें बदर. २५
सद्दृष्टि आदरू मज, वत्सा जसि गाय आदरि द्रवुनी,
हा आर्त म्हणो न पदीं, हेमंतीं जेंवि 'हा!' दरिद्र उनीं. २६
बोलूनि डोलवू हा[५], डोलवितो जेंवि रसिकशिर कीर,[६]
मग चिंता काय? जडा वाटो याची सदुक्ति किरकीर. २७
म्यां नच घ्यावें म्हणतां? धरूं वच? मोडुनि नको टर, न गा तें?
खग कनकपंजरा बहु मानी सोडुनि न कोटरनगातें.[७] २८

---

१. मूळचा अर्थ 'मधुकर' म्हणजे 'भ्रमर' तत्संबंधिनी 'वृत्ति'. (या फुलावरून त्या फुलावर उडून त्यांतील मध गोळा करणाऱ्या भ्रमराप्रमाणें घरोघर अन्नाकरितां फिरून जमविलेला शिधा. म्हणजेच 'माधुकरी' असा अर्थ झाला). २. साधु+आशीनें. ('आशिस्' किंवा 'आशी' हे शब्द स्त्रीलिंगी आहेत). ३. मी मोरोपंत. ४. या मोरोपंताचें. ५. मी मोरोपंत. ६. पोपट. ७. कोटर+नगातें=घरटें असलेल्या वृक्षाला. या संबंध गीतीचा अन्वयार्थः- [वरील गीतींत सांगितल्याप्रमाणें कीराचें=पोपटाचें बोलणें ही किरकीर वाटणाऱ्या जडाला=मूढाला उद्देशून **पंत** म्हणतातः- ] म्यां (परमेश्वराचें नांव) नच घ्यावें (असें तुम्ही) म्हणतां? (हें तुमचें) वच धरूं? (मान्य करूं? कारण तें) मोडुनि (उलंघून) टर (उपहास, फजिती) नको (असेल तर) तें न गा? (तें गाऊं नको? परंतु असें होणें कधींच शक्य नाहीं. तें नांव मी गाणारच. कारण कीर=पोपट) खग (पक्षी) कोटर+नगातें (आपलें घरटें असलेल्या वृक्षाला) न सोडुनि (त्याग न करून) कनकपंजरा (सोन्याच्या पिंजऱ्याला) बहु मानी. (आपल्या ओबडधोबड निवासस्थानीं राहून सोन्याच्या पिंजऱ्याला बहु मान देतो; त्याची स्तुति करतो. पण आपलें स्वत्व सोडीत नाहीं).

साध्वीला जें कांहीं कांतप्रिय[1] तेंचि कार्य[1] होय जनीं,
स्वाहाधवानभिमतीं[2] आग्रह काशास आर्य हो ! यजनीं ?[3] २९
निश्चय करुनि, न मागें तिळही ठेवी पतिव्रता चरण,
भगवद्भजनीं माझी तैसीच करू मति व्रताचरण. ३०
लागाव्या गोड तशा हृदयाला ज्या परें दिल्या गाळी,[4]
बाळें देतां हर्षें नसतां आठवुनि अश्रुतें गाळी. ३१
हरिकीर्तिगीति जी म्यां देवा ! व्हावें कुरंग[5] रे ! तींत,
लोळावा हा सत्पदधूळींत जसा तुरंग[6] रेतींत. ३२
बहु साधूक्त[7] रुचावें, लोभिप्रभुला जसें चहाडाचें,
मज अन्यकळत्राचें स्पर्शन विटवू[8] जसेंच हाडाचें. ३३
वत्स जसा स्तन्यातें[9] सादर पीतो धरूनि आम्यातें,[10]
जें साधुमुखोद्गत यश तैसें प्यावें करूनि आ म्यां तें. ३४
हरिकीर्तनीं शिरावें, धनिकगृहीं जेंवि जपुनि चोरानें,
न उठावें बहुकार्यें, बहुभारें जेंवि कुचर ढोरानें. ३५
संसारदुःख विसरवु सत्पद्धति[11] मतिस, जेंवि काय घडी,
वरमायेसि विसरवी चवरंग, गुलाल, चवर, पायघडी.[12] ३६

---

१. कांतप्रिय कार्य=पतीला आवडणारें आणि करावयास योग्य असें. २. स्वाहा+धव+अनभिमतीं=स्वाहेचा पति जो अग्नि त्याला अप्रिय असणाऱ्या. ३. हवनामध्यें. ४. शिव्या. ५. हरिण (हरिणाची गानलोलुपता प्रसिद्ध आहे). ६. घोडा. ७. साधूचें वचन. ८. विटाळ करो; दूषित करो. ९. दुग्धाला. १०. आईच्या स्तनाला. ११. सज्जनांनीं आचरिलेला मार्ग. १२. अन्वयार्थ :- जेंवि चवरंग, गुलाल, चवर, पायघडी वरमायेसि (विवाहीं) घडी (घटिकाभर) काय (देह) विसरवी, (तेंवि) सत्पद्धति मतिस संसारदुःख विसरवु. ज्याप्रमाणें लग्नसमारंभांत चवरंग, गुलाल, चवर, पायघडी इत्यादि मान मिळाला असतां

निजदेहगेहभान प्रभुभक्तांच्या कधींहि मेळांत[1]
मज कीर्तनीं नसावें, जैसें शिरतां मुलास खेळांत. ३७
म्यां कीर्तना टपावें, मार्जारें सर्वदा जसें दुग्धा;
मन्मति विनयादिगुणां वाहो, प्रेमें नगा[2] जसी मुग्धा.[3] ३८
प्रिय हरिजन[4] हो जैसा आला माहेरचा बहायाला,[5]
स्त्रीजन जसा विवाहा, जावें म्यां सज्जना पहायाला. ३९
हृदय हरिजना कांता सतिनें उघडें करूनि ओपावें,[6]
सद्विरहीं बहु देहीं गोपीचित्तें तसेंचि कोपावें. ४०
हो नियति[7] बहुमता मम मतिस, कुलवतीस जसि सदा श्वश्रू,
स्पर्शावें गुरुजनपद शिरें, जसें गर्विजनकरें श्मश्रु.[8] ४१
स्वप्रियलब्धरसकथन करिति स्वसखीजनीं जसी बाळा,
प्रेमळ जनीं कथू निजसुख रसना स्तवुनि आपल्या भाळा.[9] ४२
कीर्तन असो मतिस बहुमत, जैसें स्त्रीस हळदकुंकु तरी;
स्वामिपुढें करु रसना चाटु[10] पदीं पडुनि जेंवि कुं कुतरी. ४३
साधूक्ति बहुमता मज हो, धनिकजनास जेंवि याद-वही,[11]
कीं ज्यासि सुधा स्पर्शे त्या न विषाचाहि दे भया दव[12] ही. ४४

---

वरमातेला घटकाभर स्वदेहाचा विसर पडतो ( आपण कोण आहों आणि कोण नाहीं याचें भान रहात नाहीं ), त्याप्रमाणें सज्जनांनीं आचरिलेल्या मार्गानें जाणाऱ्या मनुष्याच्या मनाला संसारदुःखाचा विसर पडो.

१. मेळाव्यांत, समुदायांत. २. अलंकाराला, दागिन्याला. ३. तरुण स्त्री. ४. ईश्वरभक्त. ५. बोलावणें करावयाला. ६. द्यावें, अर्पण करावें. ७. नशीब. ८. दाढी, मिशी. ('श्मश्रु' शब्द संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे). ९. नशीबाला. १०. मनाला संतोषकारक भाषण; लाडीगोडी. ११. स्मरणपुस्तिका. १२. अग्नि.

उलटा आंत, स्पष्ट व्यवहार दहांत दाखवी सुलटा,
मन्मति हो तैसी परपुरुषासक्ता[१] सदा जसी कुलटा.[२] ४५
जैसें अंधें वृद्धें नसतां गतिहेतु हस्तकीं यष्टी,
तैसें व्हावें सज्जनसंगतिवांचुनि उदंड म्यां कष्टी.[३] ४६
आवडि असो कथेची, जसि बाळा फाल्गुनांत पुनिवेची,[४]
संतीं वेचावें धन, तापसजन तप जसें तपुनि वेची. ४७
मणिकनकभूषणाहुनि सुबहुमता स्त्रीजना गळसरी[५] ती,
हो तसि सदुक्ति या; हा दावू एकचि जसा पळस[६] रीती. ४८
रंगावें सद्वचनें मतिनें, चूर्णें[७] जसेंचि हळदीनें,
भजन न सोडावें म्यां, जेंवि कधीं कर्षकें[८] न हळ[९] दीनें.[८] ४९
द्यावा कर्मारंभीं नामातें, जेंवि मान वडिलातें;
जनमतचि करावें, जें स्त्रीमत करि जेंवि मानव ढिला[१०] तें. ५०
हळुहळु झडो अहंता सन्नमनीं, वार्धकीं जसी शेंडी;
केंडू[११] विवेक विषया, निस्पृह जन वस्तुतें जसा केंडी. ५१

---

१. दुसऱ्या पुरुषावर भाळलेली, ( पक्षीं, श्रेष्ठपुरुषावर =पुरुषोत्तमावर = विष्णूवर अनुरक्त झालेली ). २. वेश्या. ३. अन्वयार्थः– जैसें अंधें वृद्धें गतिहेतु ( चालावयास कारणीभूत होणारी ) यष्टी ( काठी ) हस्तकीं नसतां उदंड ( पुष्कळ ) कष्टी व्हावें, तैसें म्यां सज्जनसंगतिवांचुनि (पुष्कळ कष्टी व्हावें). ४. (फाल्गुनांतील) पौर्णिमेची; शिमग्याची. ५. स्त्रियांचें मंगलसूत्र ओवलेलें एक कंठभूषण. ६. वसंत ऋतूंत लाल फुलांनीं बहरणारा वृक्ष. [ कोठेंहि गेलें तरी पळसाला पानें तीनच, ( मनुष्यस्वभाव सारखाच असावयाचा ) ही एकच रीति मीं दाखवावी, असें **पंत** म्हणतात ]. ७. चुन्याच्या योगानें. ८. दीनें कर्षकें=गरीब शेतकऱ्यानें. ९. नांगर. १०. बाईलबुद्धया. ११. निंदा करो; निर्भर्त्सना करो.

दु:संगा–आधींच स्वांतें[1] सत्संनिधान[2] सेवावें,
जेंवि अशुचितेपूर्वी[3] श्रवणीं यज्ञोपवीत ठेवावें. ५२
हरिहरिजनाश्रय बरा, होतें बहु तदितराश्रयें भंड,[4]
लागुनि असमर्थाच्या कासेला वस्त्र पावतें दंड.[5] ५३
ज्यांत न हरिहरिजनयश ऐसें जें काय कीर्तनीं गान
तें अलवण[6] भोजनसें नच सेउत आर्तबाळसे कान. ५४
कीर्तनरुचि तसि वाढो खाजवित्याची जसीच कंडू कीं,
वाढे विषयरति विटीं,[7] गर्जनरुचि जेंवि वृष्टिमंडूकीं.[8] ५५
वरि संकोच असावा, आंत बहुत कृष्णकीर्तनीं काम;
गुरुजनसमक्ष पतिचें घेतां आर्याग्रहें[9] जसें नाम. ५६
माझी श्रुति[10] साधूंच्या सर्वहि सेवूनि साजु[11] कवनींचें,
सेवुनि सेळी[12] साजे, जेंवि शिळें आणि साजुक[13] वनींचें. ५७
एक तरि साधुचा म्यां पळभरि तरि पाय[14] काय[14] दाबावा,
ज्या काळ म्हणे, 'केला आपण रक्षार्ह कायदा बावा !' ५८

---

१. मनानें, अंतःकरणानें. २. साधुजनांचें सांनिध्य. ३. अशुद्ध (अपवित्र) होण्यापूर्वी. (ब्राह्मणादि त्रिवर्गानें मलमूत्रविसर्जनापूर्वी जानवें कानावर गुंडाळावें, अशी धर्माज्ञा आहे). ४. फजीती. ५. शिक्षा; फाटलेल्या वस्त्राची शिवण. ६. अळणी, मीठ नसलेल्या पदार्थांचें. ७. जार पुरुषाचे ठिकाणीं. ८. पावसाळ्यांतील बेडकांत. ९. आर्यस्त्रियांच्या आग्रहामुळें. १०. कान. ११. साजो; शोभो. १२. शेळी. १३. ताजें. १४. साधुचा काय (देह) (किंवा त्याचा) एक तरि पाय पळभरि तरि म्यां दाबावा.

'कवि' म्हणति यद्रजोर्थ स्वविभव सव्योमयान वेचावा[1]
यद्वाहकें म्हणावें तक्षकसे कोटि, वानवे, चावा. ५९
जी सत्पदभुक्त कुसुममाळा भव्यासि भालदोरी[2] ती
सुकवींस पुसे, 'ऐशा कोठें आहेत काय हो ! रीती ?' ६०
साधुपदासि जपावें बहु देवाला जपे जसा गुरव,
मज सन्निदेश[3] भुलवू, भुलवितसे जेंवि रंकुला[4] सुरव.[5] ६१
हरिजन म्हणोत, 'नातें जडलें आंगासि जेंवि आवाळूं,[6]
कां बा ! आम्हीं खोटे म्हणुनि तुज करावयास 'आ' वाळूं ?' ६२
प्रभुसि[7] जसि पिशाच्यांची[8], मानो साधुसि तसीच मत्सेवा,
सद्दृष्टि म्हणेलचि, 'ये, काढूं दे देवतटिनि ![9] वत्से ![9] वा.' ६३

---

१. सान्वयार्थ स्पष्टीकरण:- यद्रजोर्थ (ज्याच्या चरणरजाकरितां भक्तानें) सव्योमयान (विमानासह) स्वविभव (आपलें वैभव - आपला धनसंचय) वेचावा (खर्च करावा; आणि) यद्वाहकें (ज्याच्या वाहकानें—जो ज्याला पालखींतून, मेण्यांतून, डोलींतून वाहून नेतो त्या नेणाऱ्यानें निंदकांना उद्देशून) म्हणावें (कीं, तुम्ही मला परीक्षितिराजाप्रमाणें) कोटि तक्षक-से चावा; वानवे. (चालेल, आवडेल, त्यानें माझी वाखाणणीच होईल, परंतु मी गुरुसेवा सोडणार नाहीं) (त्याला) 'कवि' (साधु) (असें लोक) म्हणति. [ येथें 'सव्योमयान स्वविभव हीं पदें चिंत्य आहेत. 'विमानयान' हें केवळ स्वर्गीय देवतांचें वाहन होय. मृत्युलोकांतील महाराजाधिराजांनाहि तें केव्हांच उपलब्ध नव्हतें. श्रीमंतीचें अधिकतम निदर्शन करतांना 'गजान्त लक्ष्मी' असें म्हणतात. येथें लौकिकार्थानें 'शिबिका' (पालखी, मेणा, डोली) हें वाहन धारण करण्याइतकें ऐश्वर्य, असा अर्थ घ्यावा ]. २. दृष्टिबाधा होऊं नये म्हणून मंत्रविलेली - भारलेली - हातांत बांधण्याची दोरी. ३. साधूंची आज्ञा. ४. हरिणाला. ५. चांगला स्वर. ६. वाळूक, अवाळूं, शरीरावर उमटलेला मांसाचा गोळा. ७. शिवाला. ८. भूतगणांची. ९. अन्वयार्थः- सद्दृष्टि म्हणेलचि, '(हे !) वत्से ! वा देवतटिनि ! (गंगे ! याच्यावर = मोरोपंतावर कृपादृष्टि न फेकतां इकडे) ये. (हा = मोरोपंत साधूची सेवा करण्यांत असाच काळ) काढूं दे.

सत्पदरेणुहुनि अधिक मणिचिंतामणि सुरद्रु न गमावे.
सन्नतमतिमहिलांगीं[1] नवनव सेवाधिकारनग[2] मावे. ६४
पावावें हरिजनपदसंगा व्हायासि पारद[3] स्वा मीं,
पुसतां मग कथिलचि बा ! हा तव गुरुबंधु नारदस्वामी. ६५
सद्गजनें पोसावें प्रेमचि, सधनें जसें स्वतुंद[4] रसें,[5]
वाटावें इतराचें कामिजना[6] परकळत्र[7] सुंदरसें. ६६
चंद्रींच्या अमृतातें सेवायाचें सदार सिकला जो
मज, तो चकोर[8] पाहुनि सत्कीर्तिरता सदा रसिक लाजो. ६७
श्रीमद्विष्णुजनाहीं केला स्वक्रोधकामलय[9] ज्यांहीं
हा दास न निववावा जरि तरि ते नाग[10] कां मलयजांहीं ?[11] ६८
ताप शमाया अलिनीं[12] नलिनीं[13] म्यां सत्पदींच लोळावें,
पोळावें चातकमन न दवीं; जलदें[14] द्रवोनि ओळावें. ६९
हा कवि मयूर हर्षें सद्घन पाहोनि सरस[15] नाचावा,
अतिविस्मयें म्हणावें, ' खळ हो ! निंदूनि न रसना चावा. ' ७०

---

१. साधूंपुढें नम्र झालेल्याच्या बुद्धिरूपी स्त्रीचे अंगीं. २. सेवा करण्याचा अधिकार हाच कोणी अलंकार. ३. पलीकडच्या तीरास लावणारा. ४. आपलें पोट. ५. अन्नांतील सहा प्रकारच्या रसांनीं. ६. कामुक पुरुषाला. ७. दुसऱ्याची स्त्री. ( ' कलत्र ' शब्द संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे ). ८. या नांवाचा पक्षी. कमलपत्रावर पडलेले चंद्रकिरण चाटून हा आपली उपजीविका करतो, असा कविसंकेत आहे. ९. आपल्या रागाचा व विषयवासनेचा नाश. १०. सर्प. ११. चंदन वृक्षांनीं, किंवा मलयमारुतांनीं. १२. भ्रमरांनीं, भुंग्यांनीं. १३. कमलाचे ठिकाणीं. १४. मेघानें. १५. रसयुक्त, सजल.

### उपसंहार

( वृत्त-गीति )

‘ सन्मतमनोरथां ’ची सुमणींची जेंवि तेंवि हे ‘ राजी[1] ,’
रामसुत मयूर म्हणे, ‘ सर्व रसिक हो ! द्रवोनि हेरा[2] जी ! ’ ७१

---

## ( ४ ) ‘ संशयरत्नावली ’च्या पूर्वींची काव्य-लहरी[3]

( वृत्त-शिखरिणी )

अहो ! दत्तात्रेय ! प्रतिदिन नवें रूप धरितां,
पृथग्रूपें भिक्षाटनहि करवीरांत करितां,
सदा जातां-येतां बहु परिचितें याचि अयनें
न कां केलीं माझीं सफळ पळ अद्यापि नयनें ? १
कथा होती नित्य प्रहरभरि रात्रौ दिवसही,
करीं माळा, तोंडीं हरि, करिंहि गीतामृत-वही;

---

१. माळ, पंक्ति. २. पहा. ३. कोल्हापुराजवळील मुक्काम नृसिंहवाडी येथील दत्तभक्त नारायणमुनि हे **पंतां**चे समकालीन होत. त्यांनीं केलेले अनेक सिद्धिचमत्कार त्यांच्या चरित्रांत समाविष्ट आहेत. त्यांची समाधि नृसिंहवाडीस असून समाधिशक १७२७, सोमवार, चैत्र अमावास्या असा आहे. म्हणजे **पंतां**चे मागें अकरा वर्षें हे हयात होते. अशा थोर दत्तभक्तावर **पंतां**ची भक्ति जडली व त्यांच्या भेटीची तळमळ त्यांना लागून राहिली. त्या तळमळीच्या पोटींच पुढील नऊ ‘ काव्यलहरी ’ **पंतां**नीं लिहिल्या. शेवटची लहरी गीति-वृत्तांत असून ती पुढील ‘ संशयरत्नावली ’मध्यें क्रमांक १४ वर पुनरपि प्रकट झाली आहे. यावरून पन्नास गीतिवृत्तांत **पंतां**नीं रचलेल्या ‘ संशयरत्नावली ’स ‘ नारायणमुनीं ’च्या भेटपरिचयाची आतुरताच कारणीभूत आहे असें निःसंशय वाटतें.

असा साधू नारायण मुनिहि नांदे निकट कीं
दिसे[1] पाण्यामध्यें[1] कलि खळ महादेवकटकीं. २

( वृत्त-स्रग्धरा )

येथें यावें कथेला मळमळित वृथा ये तसा निश्चयानें,
सौरभ्यें भृंग पद्मीं, प्रभुहि वश किजे सद्गृहें प्रेमगानें;
या तारा, आज आहे सुदिवस तुमची कीर्ति गातो, पहा जी !
ऐसी केली असेल प्रभुसि विनवणी या सख्यानेंचि माजी. ३
तेव्हां देवा ! तुम्हांला निजहितवचनें भीड साची पडावी,
या द्वारें निश्चयानें मज तयिंच भवत्पादसेवा घडावी;
हा तों स्वप्नांत अर्ध क्षण तरि घडला योग अद्यापि नाहीं,
प्रायः प्रारब्धभोग प्रबळ, न सरला; शेष आहेचि कांहीं. ४
वाटे ऐकोनि सद्यः स्वजनवश तुम्हीं सिद्ध जालां असाल,
प्रेमाचे जे भुकेले चरणचि उठतां तेथ कैसे बसाल ?
भीमें तेव्हां म्हणावें बहु उचित चला दावितों वाट या हो !
तान्हेला वत्स दैवें दिवस न सरतां गायिचें थान लाहो. ५

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

हा नारायण शुद्ध साधु बहुता दीनांवरी वोळला;
मोरांच्या विपिनीं जसा घन सुधाबिंदूत्करीं घोळला;
एणें दृष्टिस घातले बहु तुज्या संसाररोगी बळें;
पातीं सज्जन आणिखी कृपण जे तीं त्यामध्यें[2] बोंबळें. ६
पूर्वीं जेंवि सुरर्षिनें ध्रुव पथीं कीं शंकरें हा जसा,
येणेंचि स्वकृपारसें वळविलें या तामसा राजसा;

---

१. मूळप्रतींत हे दोन शब्द दोनदां लिहिले गेले आहेत. २. ‘ त्यामध्यें ’ हा शब्द वृत्ताच्या चालीवर म्हणतांना ‘ त्यामधें ’ असा उच्चारावा.

हा नारायण जाणतो सकळही तद्वृत्त साचें, बसे,
ज्यापासीं तव दास त्यावरि तुझा दृक्पात झाला असे. ७
दत्तात्रेय म्हणे अहो ! कपिपते ! मी याचिसाठीं वश,
स्वांगें साधुजनासि जाणसिहि कीं गातोसि तूं मद्यश;
साधू ज्यावरि सुप्रसन्न असती आम्ही तया धावुनी,
भेटावेंचि, नुपेक्षिजे शिशु जया प्रत्यक्ष बाधा उनीं. ८

( वृत्त-गीति )

कळवाया मत्कर्मं धर्मं कीं दाविली असेल वही;
त्वद्दृष्टिपुढें राहे ऐसा पापांत त्या नसे लवही. ९

## ( ५ ) संशयरत्नावली[1]

( वृत्त-गीति )

उठतां[2] बहु त्वरेनें 'कोठें जातां ?' असें तुम्हां देवी[3]
पुसती झाली जाणों, पुसतां, ज्ञाता पुढें न पद[4] ठेवी. १

---

१. परमेश्वरानें आपला उद्धार करावा, म्हणून **पंतां**नीं त्याचा धावा केला. त्याबरोबर तो धावत यावयाचा; असें असून त्याला यावयास उशीर कां लागला असावा याबद्दल **पंतां**चे मनांत अनेक संशय उत्पन्न झाले. त्याच 'संशयरूपी रत्नांची माला' **पंतां**नीं येथें गीतिवृत्तांत गुंफिली आहे. **पंतां**नीं रचलेल्या स्वतंत्र काव्यांत याला निःसंशय वरचें स्थान आहे. **पंत**लिखित 'संशयरत्नावली'च्या दोन प्रति उपलब्ध आहेत. त्यांपैकीं एका प्रतींतील मूळावर पाठांतराचें व भावबोधक टीपांचें जणूं कलम केलेलें दुसरें मूळ अशा स्वरूपांत दुसरी प्रत आढळते. दुसरी प्रत त्या मानानें शुद्ध व स्वच्छ आहे. वरील दोन्ही प्रतींची तुलना करून तींतील **पंतलिखित पाठ, टीपा व स्पष्टीकरण हीं येथें समाविष्ट केलीं आहेत.** त्यामुळें 'संशयरत्नावलीं'तील संशयास्पद स्थळांवर बराच प्रकाश पडतो. २. ( या प्रकरणांतील सर्वच टीपा खुद्द **पंतां**च्या हातच्या आहेत ). पर्यंकावरून. ३. लक्ष्मी. ४. पुसल्यावरि गेल्यास कार्यसिद्धि नाहीं असें जाणोनि.

किंवा नारद आला आलापीत स्वकीय सच्चरितें,
प्रेमळजनगीत तुम्हां हरि ! हरिणापरिस बहुत वश[1] करितें. २
कीं माझें[2] दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें,
शरणागतभयशमना ! यास्तव येणें तुझें नसे घडलें. ३
किंवा† मजहुनि दुसरा कोण्ही बहु दीन[3] दास आढळला,
तच्छुभदैवसमीरें त्यावरि करुणाघन प्रभू वळला. ४
अथवा येतां झालां तन्मय शिवतांडवांत कैलासीं,
केला‡ असेल गरुडें गर्व पुन्हां काय त्याचि बैलासीं ? ५
बहुधा बळिचें द्वार क्षणभरिही सोडितां न ये देवा.
न चुकावी छळपापप्रायश्चित्तार्थ साधुची[4] सेवा. ६
प्रायः सुमुहूर्तांचा[5] शोध करायासि लागला वेळ.
होय[6] महत्कार्य परि प्रभुचा तों नित्य सहज हा खेळ.[7] ७
किं§ मीं§ भागवतांचा भाग[8] असें आणिलें मनीं स्वामी !
हें सत्यचि, परि कैंचा हा भेद प्रभुवरा! तुझ्या धामीं ?[9] ८

---

१. निजगुणगीतश्रवणीं कांहींच भान नसतें. २. आपला समूळोच्छेद न व्हावा म्हणोनि. ३. परमार्ताकडे आधीं जावें उचित. ४. सज्जन सेवेनें प्रसन्न होतो, अपराध क्षमा करितो. ५. शुभलग्नीं समर्थ महत्कार्य सुहृद्दर्शनादि करितात. ६. आमच्या दृष्टीनें. ७. खेळास मुहूर्त पाहणें नलगे. ८. सज्जनांहींच आधीं वळावें तसें वर्तावें. ९. साधु आणिखी तुम्हीं एक असें आम्हांस कळतें; कोण्हीतरी तारा.

† **जाणों** कविलिखित पहिल्या प्रतींतील पाठ. ‡ **समशीळ घृत घृतासीं मिळतां निवडे न तैल तैलासीं** प. पा. § **वाटे** प. पा.

किंवा† चुकतें† कांहीं† स्तवनीं तेणेंचि मागुती बससी,
तरि हें मन्मूर्खत्व[1] प्रभु ! तूं दोषज्ञ[2] तन्हि तसा नससी. ९
किंवा‡ तुज‡ एकाकी पाहुनि खळ दैत्य आडवे झाले ?
फुटतां सागर सिकतासेतूंचें[3] काय त्यापुढें चाले ? १०
किंवा§ तुज गुंतविलें भजकीं परि ते दयार्द्र या रंकीं,
उद्धरित्यासि न सज्जन गुंतविती गाय[4] कष्टतां पंकीं. ११
हरि[5] हर[5] म्हणतों यावें कोणें यद्दास्य[6] पथिकरहि तो घे,
जपतों[7] अन्योन्याच्या कार्या जपतां जसे तुम्हीं दोघे. १२
केली असेल निद्रा, कानीं गेली असेल ही हाक,
तो समय होय हो भवदन्यप्रभुकोपजिष्णुचा[8] नाक.[8] १३
कीं¶ कळवाया¶ कर्में¶ धर्मे[9] तुज दाविली असेल वही,
त्वद्दृष्टिपुढें[10] राहे ऐसा पापांत त्या नसे लवही. १४
मीं द्विजराज[11] मयूरत्राण न केलें अशी धरो लाज,
प्रस्थानीं परि गरुडें सिद्ध असावेंचि[12] लागतां काज. १५
देवर्षिपितृमनुष्याद्यमितांचें ऋण न फेडिली कवडी,
हें सत्य परि प्रभु अभिमानें[13] सवदा न हातिंचा दवडी. १६

---

१. हा संदेह वृथा. २. दोषग्राहक नव्हेस गुणग्राहक महापंडित तूं. ३. ते काय तुछ तुजपुढें. ४. स्वकार्य सहज घडतां कोण खोळंबा करील साधु. ५. एकाचा भक्त नव्हें. ६. जो धणी तो जपतो असें जरि म्हणाल. ७. तुम्हांत भेद नाहीं म्हणोनि दोघांसही भजतों. ८. निद्राभंगें प्राकृत कोपतात तूं न तसा. ९. सेवकधर्म होय. (पृष्ठ २९२ वरील टीपक्रमांक ३ पहा). १०. तो उपकारचि. ११. राजानें प्रजा न रक्षिली तरि लज्जा पावावीच. १२. कांहीं असो सेवकें स्वधर्म सर्वथा चालवावा. १३. थोरपणास्तव बहुमूल्य देवोनि घेणें तें घ्यावेंच प्रभूचित.

† **भासेनासे कांहीं** प. पा. ‡ **काय तुला** प. पा.
§ **म्हणतों** प. पा. ¶ **कळवाया मत्कर्में** प. पा.

अथवा स्वस्थ असासि कीं घेतों तें नाम, रक्षणीं शूर,
हें सत्य परि प्रबळहि बळ दुर्बळ जरि रणीं धणी दूर. १७
कीं भीतो, भ्रान्त वृथा, मृगजळमग्नासि काय तारावें ?
म्हणतां असें कसें ? शिशुभय जाया बागुलासि[१] मारावें. १८
कीं कांहीं व्रतनियमीं बोलों चालों नये असें झालें.
तरि दीनरक्षणाहुनि अधिक फळव्रत कधीं मना[२] आलें ? १९
कीं न श्रवणीं गेली ही माझी हाक हा कसा तर्क,
कसि[३] गुरुजनीं सतीची? शिवला ज्या कुमुदिनीस[४] असदर्क.[४] २०
कीं हाक ऐकतांचि प्रभुला हा रक्षणार्हसें वाटे,
वाटे[५] या दुःशीलग्रीष्मीं नवनवदयानदी आटे. २१
कीं पावावें समयीं सदयमनांतूनि योजिलें जरि तें,
तरि जेंवि रुक्मिणीचें चिंता माझें अधीर मन करितें. २२
किंवा पुराणपुरुषा ! संप्रति बहु भागलासि या कामीं,
तुज नीज[६] लागली तों सजलों[७] मारावयासि हाका मीं. २३
किंवा बरी परीक्षा केल्यावांचूनि न प्रसाद करा,
तरि वरि तसाचि आंतहि उगाळितां कोळसा प्रयास† करा.[८] २४

---

१. लटिक्याही भयासि तात वारितो तसें करावें. २. ... रितों अत्युत्तम म्हणोन धरिलें होतें तें कधीं टाकिलें. ३. गुरुसमीप सभेंत अस्पृश्या सती राजसुता पतिसमक्ष वस्त्रमोक्षणीं मोटी हांक कसी मारील तसी ऐकिली माझी कां न ऐका. ४. कुमुदिनी अर्क म्हणतां मृदुत्व उग्रत्व दिसतें तेणें व्याकुळता. ५. प्रतिक्षणीं स्वनामोच्चारध्वनिश्रवणीं दया करावीसें म्हणतां परंतु दुराचार सुटेनात म्हणोनि दया करितां करितां राहतां ग्रीष्मांत नदी वाटेंतच आटती तसी मजकडे येतां दया सरते. ६. निद्रामुखीं प्रबोध दुष्कर. ७. सिद्ध झालों. ८. श्रममात्र लाभ नाहीं.

† **न लाभ**. प. पा.

कीं धाडिलें पुढें निजनाम करो सर्व सिद्धता आधीं,
ऐसें प्रभो ! म्हणावें तरि तुमचीं चरणसारसें[1] साधीं.[1] २५
कीं आर्जविला नामप्रतिनिधि हा अमृत उधळितो स्वैर,
न[2] पुसे, न भी, न ऐके, यास्तव दोघांत लागलें वैर. २६
कीं संप्रति अभय दिलें कळिला चालावया बरें राज्य,
परि कोण प्राणिसदय[3] सिंपील बळें दवानळीं आज्य ? २७
किंवा म्हणसि ' समर्थोहं कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं,'
दीनावनाविणें क्षण देयिल दयिता[4] दया कसी वर्तूं ? २८
कीं अक्षक्रीडेनें हरिलें मन सर्व कार्य जी चुकवी,
तरि बद्धमूळ एकचि भजदवनव्यसन वर्णिती सुकवी. २९
कीं वैकुंठीं पुष्कळ भक्त तिळ स्थळ नसे नसावेंचि,[5]
वसवा पुरें[6] ' पुरे ' कां म्हणतां ? धनवंत कण[7] कसा वेंची ! ३०
कीं बहुकाळ विसरला फारचि संकोचला सखा लाजे,
येत असेल हळूहळु‡ म्हणुनचि‡ एकहि न पादुका वाजे. ३१
कीं श्रीभुजबंधांतुनि व्हावें त्वां मुक्त म्यांहि तेव्हांचि.
स्त्रीजित नसोनि होत्ये स्त्रीची समजाविसीच केव्हांची ! ३२
कीं नामस्पर्शमणि स्पर्शे परि काय करिल ? खापर मी;
सदयहि घालील कसा दुर्दैवाला सुखीं सखा परमीं ? ३३

---

१. स्वल्पप्रेमेंच सुखी होतात. २. बद्धमूळ प्रधान स्वामीस मानीत नाहीं. ३. **सत्वपाळक** इति वा पाठः. ४. स्त्री स्वाधीनपतिका वर्तविती तसें पती वर्ततो. ५. असेंच भरलें असेल भरावें हेंच उत्तम. ६. शाखानगरें रचावीं तेथें भक्त ठेवावे; स्थळसंकोचें धनत्याग नीतिविरुद्ध. ७. मोटा साहुकारही धान्यकणातें लंघीत नाहीं मस्तकीं उंचलून ठेवितो तुछ म्हणत नाहीं तेणें कल्याणच होतें.

‡ **हळूच प्रभुची** प. पा.

कीं प्रथम मदपराधें तारूं§ ना§ म्हणुनि वाहिल्या आणा,
प्रभुजी ![1] पुरे प्रतिज्ञा, भारतरणवृत्त तें मनीं आणा. ३४
कीं याचकांसि देतां सरल्या चाऱ्हीहि मुक्तिधनराशी,
भक्तिच मज द्या, द्यावें देवांला अमृत, योग्य न नराशी.[2] ३५
कीं जरि म्हणाल, 'असतां जन्मशुचि स्वपदनीरजा मिळतो,'
तरि झकवितां मला अजि, चुकला नव्हताचि कीं अजामिळ तो. ३६
कीं हो कळानिधि द्विजराज नको[3] ज्यासि लागला डाग,
तरि काय प्रभुवर्या ! चुकला तुमचा गुरू[4] महाभाग ? ३७
कीं वाटलें खळाला मुक्ति न द्यावी जसी सुधा सर्पा,
तरि घ्या[5] अघादिकांच्या[5] द्या सुवरा भक्ति मात्र मज अर्पा. ३८
कीं अकृपा नावडती आवडती स्त्री कृपा तिचें प्राज्य
लोकत्रयांत देवा ! पहिलीचें[6] काय एक मीं राज्य ? ३९
कीं[7] गमलें जऱ्हि आधीं म्हणतो 'दावा स्वपाद, या' लोभी.
जातां वांछिल जें जें तें द्यावें हे मुधा[8] दयाळो ![8] भी[8] ४०
कीं[9] आजकाल ज्याचा त्याणें अधिकार घेतला रागें,
तरि हें अश्रद्धेय, प्रभ्वंतर ऐकिलें नसे मागें. ४१

---

१. दासापासीं चालत नाहीं. २. जें ज्यासि योग्य तें त्यासि द्यावें. ३. आपणास. ४. श्रीशशिशेखर. ५. दिली कन्या फिरोन घेऊं नये दुसरिसि देवूं नये. ६. अकृपेचें राज्य मी मात्र कीं काय? ७. चरण दाखवायास या म्हणतो पण लोभी आहे काय मागेल तें कळेना गेल्यावर न देतां थोरपणास श (रम) म्हणोनि भीत असाल तरि भय लटिकें धरूं नको भेटि मात्र पाहिजे तीच द्यावी. ८. लटिका दयाळु भीतो खरा भय धरीना भीतोसि तरि मुधा दयाळो भी योग्यच आहे इति कोपोक्तिरियं. ९. जगद्रक्षणाधिकार निघाला काय म्हणोनि पावेनास.

§ **तारीना** प. पा.

कीं भेटि बहुदिसां, भय भेटाया दीनबंधुला[१] वाटे,
तरि भेटावें विधिनें,[२] गेले, जातातिं साधु या वाटे. ४२
कीं स्त्रीपूर्व शिखंडी त्यातें समरांत भीष्म पाहेना,
मींही पहिला पापी तैसें करितां सुकीर्ति राहेना. ४३
कीं धर्मसंकटीं बळ न चले, ऐसें म्हणों नको, पार्थ
ब्राह्मणकार्य[३] कसें करि, वदतों प्रीत्यर्थ हें न कोपार्थ.[४] ४४
कीं भीसी मज एका उत्धरितां लागतील फार झटें,
तरि कोण्हाहि न कळतां न्यावा झांकूनि दास पीतपटें. ४५
कीं लक्षभोजनापरि केला संकल्प संपला देवा !
तरि दाते क्षुद्रिकळां मग न म्हणति काय ? 'या, बसा, जेवा.' ४६
कीं एक मींच उरलों पापी हें बीज ठेविलें जतन,
वतन[५] स्वकीय मज कां करितें त्वन्नाम मंगळायतन ? ४७
कीं कार्यबहुत्वें तुज फावेना यावया जगत्पाळा !
तरि रूप द्या दुजें, ती विद्या[६] कंठीं वसे जसी माळा. ४८
कीं मागें गुप्त उभा असिसि प्रेमें उभारुनीं बाहे,
तरि काय बाळकाचे तूं सादर बोल ऐकसी बा ! हे ? ४९
कीं स्वस्तवनीं लाविसि आधीं करुनीं कवि प्रपन्नास;
तरिच अशा करि आर्या आर्यांत मयूर विप्र पन्नास. ५०

---

१. बहु काळें भावू भावास भेटला तरि नाश होतो. २. विधिनें भेटतां नाश नाहीं उभयत्रही बरें. ३. इंद्रप्रस्थीं. ४. कोपावेंसें हें नव्हे वचन. ५. निजवृत्तिस्थळ. ६. योगमाया.

## ( ६ ) अश्वधाटीदशक[१]

कांतारवासि ![२] प्रशांताप्त[३] तूं सन्निशांता ![४] रमाप्राणकांता ! नृपा !
श्रांताधिकोत्तापतांतावरी[५] आज दांता ![६] करीं पातकांता ![७] कृपा.
प्रांतासि[८] लावीं[८] स्वकांतावना ![९] चित्तकांताकृते ![१०] वित्तकांतापरा[११]
स्वांतास या चीर्णवांताशना[१२] अप्रशांता मथीं सुप्रशांता ! परा ! १
वाचाळ मीं नीट पाचारितों धीट याचा न ये वीट साचा हरी !
खोटा जरी मीं चखोटामधें[१३] तूंचि मोठा, कृपेचा न तोटा घरीं.
दाता सुखाचा, सदा तारिता आपदा ताप हे एकदा तापटीं[१४]
या संतसेवाह्वया[१५] संपदा दे, भयासंग[१६] नाशील या संकटीं. २

---

१. 'अश्वधाटी'ला 'मंदारमाला' असेंहि म्हणतात. याच्या प्रत्येक चरणांत सात 'तकार' व शेवटीं एक 'गुरु' अक्षर मिळून एकूण २२ अक्षरें असतात, व यति ४,६,६,६ या अक्षरांवर असतो. या वृत्तांत **पंतां**नीं दहा कविता रचिल्या आहेत म्हणूनच याला 'अश्वधाटीदशक' म्हणतात. २. हे अरण्यामध्यें राहणाऱ्या ! ३. अत्यंत शांत असा हितकर. ४. साधूंचें गृह अशा ! ५. श्रमले आणि अतिशय तापले असे जे मरणोन्मुख झालेले त्यांवर. ६. हे जितेंद्रिया ! ७. पातकांचा नाश करणाऱ्या ! ८. प्रांतासि लावीं म्हणजे सीमाप्रदेशाच्या बाहेर घालव. ९. आपल्या स्त्रीचें रक्षण करणाऱ्या ! १०. चित्ताला सुंदर आकृति ज्याची अशा ! ११. संपत्ति व स्त्री यांविषयीं आसक्त असलेल्या (स्वांतास =माझ्या मनाला ). १२. आचरिलें आहे वांताचें ( ओकलेल्याचें ) अशन ( भक्षण ) ज्यानें अशा ( स्वांतास ). १३. स्वच्छ व निर्मळ असलेल्यांमध्यें. १४. घालवून टाक. १५. संतसेवा नांवाची ( संपदा ) ( **पंत**लिखित मूळपाठ 'संतसेवाभिधा' ). १६. ( भय + आसंग ) भीतीचा संसर्ग.

दीनानुकंपानदीना ![1] मुकुंदा ! महीनायका ! ज्ञानहीना मला
तारावया ताप, वारावया पाप, नारायणा ! तूंचि सारा भला.
पायांवरी मस्तका या समर्पूनि 'बा ! ' या म्हणें[2], 'रामराया ! सदा
ठेवा पदीं या, नुठे वारितां, यास देवा ! तुम्ही द्याल सेवा कदा ?'
वाणीमधें प्रेमवाणी[3] नसो, चापपाणी ! तुझीं कीर्तिगाणीं बरीं;
आणी क्षणामाजि पाणीच नेत्रांत, आणीख ते काय वाणी हरी ?
खाणी सुखाची पुराणीं मुनीहीं पुराणी[4] गुणश्रेणि[5] जाणीतली;
हाणी[6] न जीमाजि, न्हाणी सुधा, जेथ[7] हाणी[8] भवागासि[9] खाणी भली.
व्याधादिकांलाहि तत्काळ संसारबाधा निवारूनि संतारिलें;
आधार दीनासि तूं, पाहिजे शीघ्र बा ! धावुनीं दुःख संहारिलें;
साधावया कीर्तिनौका समुद्रा, अगा ! धातया ![10] दास तारावया
माधामपादा ![11] उठावें त्वरेनें विराधापहा ![12] ताप वारावया. ५
मीं नेणतें बाळ, कारुण्यदुष्काळ केला तरी काळ कंठूं कसा ?
घेतों, पदीं भाळ ठेवूनि, सांभाळ, ऐसी सदा आळ, जैसा पिसा.
लोकैकवीर ! क्षमाधारधी ! रक्ष माधीश ![13] मीं रक्षणार्ह स्वयें
तूं आमच्या पक्षसंरक्षणीं दक्ष, वंदूं तुला लक्षदा निश्चयें. ६

---

१. दीनांविषयीं असलेल्या दयेच्या समुद्रा ! २. 'म्हणें' याचा कर्ता 'मीं.' ३. प्रेमाची कमतरता. ४. जुनाट. ५. गुणांची पंक्ति. ६. हानि. ७. "जेथ हाणी" यांबद्दल **पंत**लिखित दुसरा पाठ "मुक्ति राणी". ८. हाणून टाकी. ९. संसाररूप वृक्षाला. १०. हे विष्णो !, हे रामचंद्रा ! ११. लक्ष्मीचें स्थान असलेले ज्याचे पाय अशा हे रामा ! १२. विराधनामक राक्षसाला मारणाऱ्या ! १३. हे लक्ष्मीपते !

क्षोभास पावे मन द्रव्यदारात्मजागारसंसारलोभास्तव[१]
हो भाग्य इंद्राहुनि प्राप्त, सर्वाप्त वाटे करूत स्वशोभा स्तव
भो ! भानुवंशावतंस ![२] प्रभो ! ग्रासितो काळ सर्वांसि बोभाटतों,
जों भाव पायीं न; तूझ्या सुखी कोण होईल झाला न जो भाट तों? ७
मानापमानीं समाना धरा वृत्ति माना सदुक्तीसि मानायका !
कां नाठवा? पाळका! नारदादीड्य[३] कानांत ध्या कीर्ति, कां नायका?
वाना गुणांतें, भवा नाशितें, श्रीभवा ![४] नागपाचें[५] जिवा नांव रे !
नानामतें या मना नाडिती, सज्जना नातळे यातना, नावरे. ८
जों काम चित्तांत तों काय भेटेल तो कालकंठाप्त[६] लोकास या ?
ओकापरी[७] या न ओका[८] गणा, कष्ट हो, कां म्हणे देव 'ओ' कासया?
तोकावरि प्रेम होकारितां, स्थान शोका मिळे, हे अहो ! कामना
ठोका बरी; लेश धोका नसे, नाम घोका, भवीं द्या बुडों कां मना ? ९
कारुण्यपीयूषमेघा ![९] मयूर श्रमे घाबरा यासि सांभाळिसी,
विश्वंभरा ! तूंचि विश्वास या पूर्ण विश्वास देवूनियां पाळिसी;
दासांसि दे भीति, दर्पालया[१०] काळसर्पा लया नेसि वीनध्वजा ![११]
गावें तुला लोकशंका उपेक्षूनि लंकाप्रदा ! शुद्धवेदाध्वजा ! १०

---

१. द्रव्य, स्त्री, पुत्र, घर अशा संसारलोभाकरितां. २. सूर्यवंशांतील श्रेष्ठ अशा ! ३. नारदादींनीं गाइलेली. ४. **पंत**लिखित दुसरा पाठ 'श्रीधवा !' ५. नागनाथाचें- शंकराचें. ६. शंकराचा आप्त; श्रीरामचंद्र. ७. ओकारीप्रमाणें. ८. ग्हाला. ९. करुणामृतमेघा ! (हे श्रीरामचंद्रा !) १०. गर्वाचें घर अशा काळसर्पाला. ११. गरुडध्वजा ! विष्णो ! (गरुड हा सर्पांचा शत्रु होय. हें विशेषण येथें सार्थ योजिलें आहे).

## (७) गंगावकीली[१]

(गीतिवृत्त)

श्रीगंगे ! करुणावति ! वरदे ! परदेवते ! सदाधारे !
बहु वात्सल्य तुझें कीं, मजहि म्हणसि, 'मदमृतें[२] सदा धा[३] रे !' १
गंगे ! कविवर वर्णिति तुझिया अत्यंत पावना शीला.
लीलालेशें काढिसि कामाख्या प्रणतहृद्गता कीला.[४] २
भागीरथि ! जीव तरति शतशः, कलि जरिहि पापयुग माते.[५]
जे तुज भजति प्रेमें, पावति तुझिया सुखेंचि उगमा ते. ३
'गंगे ! गंगे !' म्हणतां, प्रणतां निर्दोष करिसि सदये ! तें
जें दुर्लभ, तव तीरीं नीरीं[६] त्यजितांचि देह, पद येतें. ४

---

१. शके १७१० ते १७१२ या कालावधींत **पंतां**नीं प्रयाग, काशी, गया ही त्रिस्थळी यात्रा केली. तेव्हां काशीक्षेत्रस्थ जगन्माता गंगानदी व गयाक्षेत्रस्थ विष्णुपद ( भगवान् विष्णूचें उजवें पाऊल ) या दोन देवतापुढें **पंतां**नीं आपले यजमान, आप्तेष्टमित्र इतकेंच काय, तर बारामतिस्थ अखिल जनवृंद यांचा उद्धार करण्याविषयीं अत्यंत आर्ततायुक्त स्वरांत विनवणी केली. तिलाच 'वकीली' म्हणतात. त्यांनीं केलेल्या दोन वकील्या येथें अनुक्रमानें दिल्या आहेत. त्यांवरून **पंत** केवळ स्वोद्धाराविषयींच आतुर झालेले नव्हते, तर त्यांच्या सहवासांतील यच्चयावत् जनांचाहि उद्धार त्या त्या देवतांनीं करावा असें त्यांस मनापासून वाटत होतें असेंच सिद्ध होतें. 'गंगावकीलीं'तील क्रमांक १०२–या आर्येंत म्हटल्याप्रमाणें 'पांडुरंगरायें' आज्ञापिल्यावरून **पंतां**नीं केलेली वकीली अभिजात, अभिनव व अभिराम असून 'उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम्' या उक्तीची द्योतक आहे. यावरून **पंत** केवळ पुराणिकच नव्हते, तर त्रिस्थळी यात्रेंत असतांहि स्वकीयांचें स्मरण करून त्यांच्या उद्धाराबद्दल वकीली करण्याचें शास्त्रोक्त पांडित्यहि त्यांचे अंगीं होतें असेंच म्हणावें लागतें. २. माझ्या पाण्यानें. ३. तृप्त हो. ४. खिळयाला. ५. माजे. ६. पाण्यांत.

स्वर्गीं जें नामाचें,[1] कोणीहि न भजुनि जन निवाला तें
खंडीहि न द्यावें; तव अमृताच्या[2] त्यजुनि जननि ! वालातें.[2] ५
हरिहरनाम तसें, तव जळहि जना दे विमान वेगानें
मज-ऐशासहि, ज्याच्या सज्जनशत देवि ! मानवे गानें. ६
श्रीबाबूरायाचा[3] ज्येष्ठ तनय सनय[4] कृष्णराय शतें
सुकवींच्या वर्णावा. गंगे ! दे जें विशुद्ध या यश तें. ७
श्रीबाबूरायाचा पुत्र पहा पांडुरंगराय कवी.
देवि ! भगीरथनंदिनि ! तात तसा, स्वयश हाहि आयकवी. ८
श्रीआबूरायाचा[5] जो नंदन नीलकंठराय, सदा
गंगे ! मुदित असो; या वर्णूत द्विज यथेष्ट पायसदा.[6] ९
यांच्या मातांसि पहा, ज्यां नाई आबयी असें म्हणती.
प्रणती करितों गंगे ! न करीं साधारणांत तूं गणती. १०
यांचे आश्रित, सेवक, गुरु जे, तत्कामना पुरो, हित हो.
गंगे ! म्हणतीस, 'सुखी व्हा. या, यजमान हो, पुरोहित हो !' ११
अभिमानी स्वजनाचे हे, हा यांचा सुदंडक[7] विराजे.
गंगे ! यांतें दर्शन दे; यश गातिल उदंड कविराजे. १२

---

१. नांवाचें अमृत म्हणजे खरें अमृत नव्हे. २. अमृताच्या (पाण्याच्या किंवा खऱ्या खऱ्या अमृतरसाच्या) वालातें=लहान बिंदूला. (वाल म्हणजे सोनें-चांदी तोलण्याचें एक वजन. तोळयाचा चाळीसावा भाग). ३. बाबूराय म्हणजे बाबूजी नाईक बारामतीकर जोशी होत. हे **पंतां**चे यजमान. यांच्या नांवाचा उल्लेख **पंतांनीं** 'आर्याभारतां'त कर्णपर्वाचे व स्वर्गारोहणपर्वाचे शेवटीं आणि 'गंगावकीली' व 'विष्णुपदवकीली' येथें कृतज्ञतापूर्वक केला आहे. ४. नीतिमान्. ५. श्रीबाबूरायाचा धाकटा बंधु आबूराय. ६. दूध देणाऱ्याला. ७. चांगला मार्ग, रीति, चाल.

गंगे ! बाबूरायप्रभु भक्त तुझा; तदीय जन सर्व
तारावे; बहुत भली तूं, म्हणुनचि, तुज शिरीं धरी शर्व.[१] १३
तारीं, यांच्या वाहति जे दाजीप्रमुख[२] कार्यभारा, हे
आर्य तव भजक गंगे ! सर्वत्र तशीच आर्यभा[३] राहे. १४
देवि ! भिकंभट्ट तुला भेटाया योग्य, तूंचि या आण.
जाण सदाशिवभट्टहि साधु, तयाचें करीं परित्राण. १५
त्वां वासुदेवभट्टहि गंगे ! ओढुनि बळेंचि आणावा,
न्हाणावा, त्याचा शिशुभाव, निजहि मातृभाव जाणावा. १६
गंगे ! तुज जो स्मरतो, संपन्नचि जीव तो शुचि तपानें.
विठ्ठलभट्ट निवाया तव अमृताच्या असे उचित पानें.[४] १७
जो श्रीमदुपाध्याय श्रीधर, शीतोष्णवृष्टि साहेल,
राहेल परि गृहींच, द्युनदि ![५] तुज तुज्या वरेंचि पाहेल. १८
गंगे! भाऊभट्ट त्वद्भक्त चिरायु साधु सुत पाहो.[६]
याच्या, त्वद्दर्शनफळ जैसें, तैसेंचि हेंहि[७] सुतपा हो. १९
तुज पांडुरंगशास्त्री पुनरपि पावावया उचित माते !
कीं जे ज्ञाते म्हणती, 'ब्रह्मरसचि' तव जळा शुचितमा ते. २०
पुरवू नाम तुझें, जें गंगे ! वांछील बाजि जोशी, तें.
ध्यानीं प्रवाह राहो, निववि गुणें नेत्रराजि[८] जो शीतें. २१

---

१. शंकर. २. हे दाजीबा बाबूरायांचे मुख्य कारभारी होते असें दिसतें. ३. आर्यांची प्रभा. ४. प्राशनानें; पिण्यानें. ५. हे स्वर्गीय सरिते ! हे गंगे ! ६. भाऊभट्टाला 'चिरायु, साधु' असा पुत्र होवो. ७. पुत्रप्राप्तीचें सुद्धां. (याच्या सुतपा=चांगल्या तपश्चर्येला त्वद्दर्शनफळाप्रमाणेंच पुत्रप्राप्तीचेंहि फळ लाभो). ८. डोळयांची जोडी.

गंगे ! भगवति ! दर्शन दे, राघोपंत जो भिडा, याला.
कलिकर्म काय ? न शके क्षण तुजसीं काळही भिडायाला. २२
गंगे ! आरोग्य बरें दे, नाना नाम परचुरा, याला.
याच्या अहितकरांतें[1] लाव कसी शीघ्र कर चुरायाला. २३
सफळा उक्ति करीं, सुत देउनि विठ्ठलदिवाकरा माजी.
गंगे ! सत्पुत्र भवीं हित, जेंवि तमीं दिवा करामाजि. २४
विष्णुपदि ![2] श्रीविष्णुस्मरणीं रत सर्वदा निळोबा, हें
समज, न मज चेंगट म्हण, तुज यश तत्तारणें मिळो, बाहें.[3] २५
मुद्गलभट्टाचें जें दुःख, हरावें समूळ आधीं तें.
'गंगे ! गंगे ! गंगे !' म्हणत्यांच्या हरिसि तूंचि आधींतें.[4] २६
शिवरामभाउला तूं गंगे ! माते ! म्हणोनि 'ओ' पावें.
दुःख भवींचें नुरवीं, त्वां शुभदर्शन म्हणोनि ओपावें.[5] २७
किति राघोबा जोसी सोसील विपत्ति ? अधनता खोटी.
गंगे ! दे सुख याला; कीर्ति तुझी दीनरक्षणें मोटी. २८
तारिसि कीं, तुज येती, पाहुनि पापार्त मानवां, कीव.
साधुपुढें तरि गंगे ! मूढांची धरुनि मान वांकीव. २९
श्रीगंगे ! लांचीव[6] स्वगुणीं, विषविषयसक्त आंचीव,
करुनि कृपा, वांचीव प्राणी जड, पुण्य-कीर्ति सांचीव. ३०
द्युनदि ! तुज तुझी म्हणती, 'अमृतें सर्वत्र देवि ! वर्ष' दया.
गोविंदराय हास्यप्रद, तव दर्शन असोचि हर्षद या. ३१

---

१. अहित करणाऱ्यांना; शत्रूंना. २. गंगेची उत्पत्ति विष्णूच्या डाव्या पायाच्या आंगठ्यांतून झाली आहे म्हणून तिला 'विष्णुपदी' म्हणतात. ३. बोलाव. ४. दुःखांना. ५. द्यावें. ६. लंपट कर.

गंगे ! तुज पाहुनि, जें दुःख, त्यागूत एकबोटे तें.
बहुभारार्त जन जसा, उतरूनि शिरावरील मोटेतें[1]. ३२
देवि ! बिसोबाबापू, तत्सुत, तद्बंधु, सर्वहि तरावे.
इतरा[2] वेद तुजपरि न गाति; तुवां सर्व अर्थ वितरावे.[3] ३३
देवनदि ! करू आळस न भिकाजीरामचंद्र तो याया.
म्हणसी तूं सर्वांस, 'प्राशा अमृतोत्तमा स्वतोया, या.' ३४
गोपाळभट्ट साधु श्रीभागीरथि ! मिळो तया वित्त.
तळमळ न करी कोणा सुज्ञाचें, तुज पहावया, चित्त ? ३५
जो शेंबेकर राघोपंत, तयाच्या सुतांसि तूं नेटें
भेटें श्रीविष्णुपदि ! त्वन्नामें या भवार्णवीं बेटें. ३६
गंगे ! असें करीं कीं, गतिस सदाशिव रहाळकर पावे.
तव नयनें दोषतरुहि, जेंवि अतिहिमें टहाळ[4], करपावे. ३७
आणिकहि कांहीं आइक; आइ ! करावाचि मान्य हा शब्द.
करुणाकटाक्ष तव हो गाडगिळीं, जेंवि चातकीं अब्द[5]. ३८
त्वां कृष्णभट्ट वैष्णव सुखवावा द्युनदि ! आसरा याचा
ब्रह्मण्य, अनादरितां ब्राह्मण, लौकिक[6] न हा सरायाचा. ३९
गंगे ! रागें भरसिल, कां भारी मानिसील या कार्या ?
दीनोद्धारीं हरिहरसमशीला तूंचि सन्नुता[7] आर्या. ४०

---

१. ओझ्याला. २. 'वेद तुजपरि इतरा न गाति' असा अन्वय. ३. द्यावे. ४. झाडाच्या ओल्या फांद्या. ५. मेघ. ६. 'तुझा अलौकिक होईल', असा इषारा पंतांनीं गंगेला दिला आहे. त्याबद्दल ती रागावेल कीं काय ? असा प्रश्न तिला विचारून तिच्या कार्याची महती पुढील गीतींत वर्णिली आहे. ७. साधूंनीं स्तविलेली.

वेदांतश्रवणनिरत निर्मळमति विश्वनाथसुत तात्या.
त्वद्दृष्टिनें मिळावी संतति, कीर्तिहि जगांत सुतता[१] त्या. ४१
हरिभक्त सदावर्ती[२] मारडकर योग्य तुज पहायास.
गंगे ! गोविंदपदीं हे कृतपण[३] वित्त शिर वहायास. ४२
भागीरथि ! करुणावति ! मैनासुत बाळ आण, तारचि तो.
अंजळि, दास तुजपुढें हा, तव माहात्म्य जाणता, रचितो. ४३
गंगे ! देवि ! दुणाखे भव्यगुणा, खेदनाशका, तीरा
पावोत, तुझ्या नीरा सेउत, जें प्रिय शिवा महाधीरा. ४४
बहिरोबादादा हे गातात सदुक्ति रामदासाच्या.
गंगे ! तुजहुनि न उण्या त्या, स्वाश्रितसर्वकामदा साच्या. ४५
साधु महादेवतनय राघोबा, रामदास, जनदास,
तव ओघास विलोकुनि, नाचो जैसा मयूर वनदास.[४] ४६
गंगे ! दारिद्र्य श्रम देतें गोपाळनायका, याचें
अघ नाशीं स्वस्मरणें, हें वाक्य नव्हेचि[५] नायकायाचें.[५] ४७
गंगे ! भुजंगनायक काय करिल ? यासि तूंचि आण कसी !
श्रीविष्णुपदि ! प्रभु तूं, मज तुजला घालवेल आण[६] कसी ? ४८
कृष्णद्विज करदीकर,[७] याची निष्ठा सदाशिवीं मोटी.
याचा उद्धार किती ? गंगे ! तारिसि असे सदा कोटी. ४९

---

१. अतिशय विस्तृत. २. कोरड्या अन्नाचें छत्र ( सत्र ) चालविणारा. ३. ज्यांनीं प्रतिज्ञा केली आहे असे ( हे मारडकर ). ४. मेघाला. ५. नायकायाचें नव्हेचि=( तूं ) आयकायाचें नाहींस असें नव्हे म्हणजे तूं ऐकावेंच असें तें आहे. ६. शपथ. ७. 'करदीकर' या शब्दांतील 'र' वर अनुस्वार दिलेला नाहीं. त्यामुळें खरें आडनांव 'करंदीकर' कीं 'करदीकर' हें कळण्यास मार्ग नाहीं.

गंगे ! बहु काय वदों ? बहु कष्टी दीन देवबा होतो.
त्यातें समीप सत्वर दीनांचा बंधु देव बाहो तो. ५०
जो बाबुरायकृष्ण, श्रीगंगे ! बहु गरीब हा, याला
भेटुनि, कृतकृत्य करीं; तव कीर्तिच बहु बरी व्हायाला. ५१
गंगे ! दोष हरावा त्वां, राघोपंत कोतवाल जो,
भवजलधि गिळिसि; तुज, जळकण गिळितां, कां न तो तवा[1] लाजो?
गंगे ! तव भव्य तटीं पावो आचार्य आवजी वास.
त्वत्पुण्यदृष्टि होतां, येतो यायास आव[2] जीवास. ५३
दहनें 'कोण प्रतिभट ?[3]' ऐसें म्हणतां, म्हणेल 'ओ' घास.[4]
परि अघनगलक्ष[5] तुझ्या ऐकायाहि न शकेल ओघास. ५४
द्युनदि ! जिभेतें म्हणतों, 'उपकार सुपुण्य परिस ये ! राहें.
वद 'गंगा गंगा' कीं अधिक स्वदुरुक्तिपरिस[6] येरा हें.' ५५
प्राकृतजनसंकोचहि, न शकें वारावयासि रसना मीं.
बहु नाहीं काय तुझ्या गंगे ! तारावयासि रस नामीं ? ५६
रसना साध्वी, मान्या; संकोच असाधु; या उडीव सये !
मम यजमानजना म्हण, 'मत्तीरीं, जों असे कुडी, वस, ये.' ५७
श्रीभागीरथि ! यावें धांवत संतान तें तमरसाचें.[7]
पान, स्नान घडो तव तीर्थाचें हरियशासम रसाचें. ५८

---

१. भाकरी, पोळी इ. भाजण्यासाठीं केलेलें पसरट, वाटोळें, लोखंडी पात्र. २. उत्साह. ३. विरुद्ध बाजूनें लढणारा शत्रु. ४. गवत. ५. पापाचे लक्षावधि पर्वत. ६. आपण केलेल्या दुर्भाषणापेक्षां. ७. 'तमरस' हें आडनांव असावें.

गंगे ! तूंचि भवार्णवमग्नांचे पूर्ण करिसि काम तरी.[1]
तो चिमणाजीपाठक पाठ करू तव सहस्रनाम तरी. ५९

बारामतीपुरीचा तव वेंकटराय देशमुख दास.
पात्र करीं गंगे ! जें तव दर्शन, याचि परम सुखदास. ६०

देशमुख श्रीबाबूरायप्रिय, शूर, मान्य मायाजी.
तत्पुत्रांतें गति मति दे ती, देयील न भ्रमाया जी. ६१

बारामतिस्थ जे, त्यां पाळीं तूं सर्व देशपांड्यांतें.
जगदंबे ! जंतूंतें जपसि, तसी पक्षिणी न आंड्यांतें. ६२

अमरनदि ! देशपांड्या बापू हा पूत तोय तव सेवू.
स्नाताची अन्यत्र क्षणही, स्वर्गं त्यजूनि, न वसे वू.[2] ६३

मुक्त करावे गंगे ! त्वां जे बारामतींत कुलकरणी.
पतितोद्धृति हे पाडी द्युनदि ! तुझी बहु बुधांसि भुल करणी. ६४

बारामतीपुरीचे जे पाटिल, चौगुले, तदघ भंगे,
रंगे स्वस्मरणीं तरि तच्चित्त सदा, असें करीं गंगे ! ६५

तव तीर्थीं स्नान करुनि, गंगे ! पितरांसि उद्धरु चिमाजी.
लोक म्हणोत कसें तरि; तुज तों वाटेल शुद्ध रुचि माजी. ६६

सिंपी मैराळ, ढबू हे साधु स्वप्रसूंसि[3] घेवूत;
येवूत श्रीगंगे ! वत्स तसे तव पयासि सेवूत. ६७

श्रीगंगे ! त्वां द्यावें दर्शन, जो हैदरा सुभाना, त्या.
हें उचित होय, माता तूं, प्राणी बाळ, या शुभा नात्या. ६८

---

१. होडी, नौका. २. डोक्यांत होणारी 'ऊ'. ३. आपल्या आयांना.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय.

जो 'राम–कृष्ण' ऐसें देवि ! पह्राडे म्हणे सदा सांजे,
तो साधु शिवा पाहो तव चरण उपेक्षिती न दासां जे. ६९
गंगे ! तूं कल्पलता देसी पुरुषार्थ, न करितां वाणी,[1]
वाणीव्यय[2] कां न करूं ? तारीं सिदराम–आदि ते वाणी. ७०
गंगे ! त्वां तारावे कुंभार, सुतार, परिट, लोहार.
'जोहार'[3] म्हणायाचा जो, प्रभुचा होय देवि ! तो हार. ७१
गंगे ! सद्गति सर्वां हैबतरायादि बाबराला हो.
खळ हांसोत मज; भले म्हणतिल, 'घेतोसि बा ! बरा लाहो.' ७२
बारामतींत वसती जे, तारावेचि देवि ! तेलिहि ते.
जड जरि हेय,[4] पुराणीं तरि कां हरिकीर्ति सेविते, लिहिते ? ७३
उद्धरिले सगरसुत ब्रह्मद्वेषी सहस्र जे साठ.
पाठ अघाची पुरविसि. हे विद्या देवि ! तुज बरी पाठ. ७४
काय महत्त्व कबीरीं हरिभक्ति न दे सुरापगे ! यवनीं ?
त्वत्सेवनेंचि पावो स्थिति शक्राच्या सुराप[5] गेय[6] वनीं. ७५
तुज भेटोनि निवावे गंगे ! शेटे, महाजनहि[7] सारे.
दीनांसि तूंचि म्हणसी, 'शक्राधिक, भजुनियां मज, दिसा रे !' ७६
अर्थिप्रार्थित पुरतें, आश्रय करितांचि कल्पवल्लीला.
तव यश काय वदावें ? देवि ! तुझ्या शेषतल्पवल्लीला.[8] ७७

---

१. कमतरता; उणेपणा. २. शब्दांचा खर्च. ३. अंत्यजांनीं म्हणावयाचा रामराम. ४. त्याज्य, दूर करण्यास योग्य. ५. मद्यपी. ६. वर्णनीय. ७. व्यापारी, वाणी इत्यादिसुद्धां. ८. शेषावर निजणाऱ्या विष्णूच्या लीलांसारख्या लीला (क्रीडा).

मद्गुरुपुत्र **स**दाशिव, **य**ज्ञेश्वर, यांसि भेट दे. यश तें,
जें शुचि. निवविसि गंगे ! तूंचि स्वजना अदेय[1] देयशतें.[2] ७८
वरशील[3] सहाध्यायी[4] साधु **स**दाशिव तयासि तूं गंगे !
दर्शन दे. द्रवसिल तरि, विघ्न न करितील सर्वथा दंगे. ७९
श्रीविठ्ठलभजनाचा बहु **का**शीनाथ साधु या लाहो.
श्रीगंगे ! प्राप्त तुला, इतरां तव पाथसा[5] धुयाला, हो. ८०
गंगे ! देवि ! **वि**ठोबा**दा**दा श्रीविष्णुभक्त, शिवशील;[6]
एतद्गीतहरियशःश्रवणें काशीसमेत निवशील. ८१
याचा परम प्रेमळ नंदन **मै**राळ तो तथापि कसा
येतो ? जो पंढरपुरचूतवनीं[7] करितसे कथा पिकसा.[8] ८२
हरिजनसंग तुज रुचे गंगे ! सादर अशांसि पाचार.[9]
साचार[10] कथारस घे, प्राज्य[11] स्वाश्रितजनाहि हा चार.[12] ८३
तीर्थपद श्रीविठ्ठलमूर्ति स्थापूनि आदरें भजतो,
श्रीगंगे ! **गो**सावी **गो**विंद गमेल दूर कां मज तो ? ८४
जो **अ**मरसिंह[13] **जा**धव, या धवल प्राज्य यश जसें माते !
तोकहि[14] लोकहितावह दे, जें शिवभक्तिच्या रसें माते. ८५

---

१. देण्याला योग्य नाहीं असें. २. देण्याला योग्य अशा शेकड्यांनीं. ३. उत्तम स्वभाव असलेला. ४. एकाच वेळीं एकाच वर्गांत शिकणारा, गुरुबंधु. ५. पाण्यानें. [ 'पाथस्' (पाणी) या संस्कृत शब्दाची तृतीया विभक्ति ]. ६. कल्याणकारी स्वभावाचा. ७. चूतवनीं=आंब्राईमध्यें. ८. कोकिळासारखा. ९. पाचारण कर; बोलाव. १०. खरोखर. ११. पुष्कळ. १२. पाज. १३. छत्रपति शिवाजी महाराजांचे मातामह लखूजी जाधव, त्यांचा पणतु धनाजी जाधव. त्याचा नातु अमरसिंह. यानेंच **पंतां**ची काशीयात्रा निर्विघ्नपणें घडवून आणली. ( ' विष्णुपदवकीली ' आर्या क्र. ३ पहा ). १४. मूलसुद्धां ( अमरसिंहाला पुत्रसंतान नव्हतें, तें दे, असें **पंत** गंगेला विनवून सांगत आहेत ).

गंगे ! संदर्शन दे श्रीविष्णुस्वामिभक्त नानातें.[1]
जग तोक, माय तूं, हें पूर्ण करु मनोरथासि या नातें. ८६
यावे, प्रभुप्रतापा[2] करुनि पुढें, तुज नमावया फडके.[3]
गंगे ! तव तेजें तों विघ्नांचें उर कठोरही तडके. ८७
व्हावे कृतार्थ गंगे ! यावे पूजावया तुला रास्ते.[4]
'हा !' स्तेनासि म्हणविते 'पाठिव निजदूत' परचमूशास्ते.[5] ८८
यावे द्युनदि ! खळांतें श्रीमाधवराय[6] पेशवे[6] दमुनी.
व्हावे श्रीरामजयें हृष्ट जसे सर्व देश, वेद, मुनी. ८९
देवि ! अहल्याबायी[7] यावी भेटावयासि सत्वर ती.
तूं पुण्यकीर्ति, हेही; गंगे ! दोघीजणीहि सत्वरती.[8] ९०
सद्गति जडांसि, गंगे ! संपत्ति क्षेत्रवासि विप्रकुळा;
तुजला कीर्ति मिळेल, प्रीति हरिहरांसहीं, न जीस तुळा. ९१
भगवति ! भगवद्भक्तश्रीधरहृदयांत न व्यथा राहो.
ब्रह्मकुटुंबशतभरणभव-ऋणभर[9] हरुनि, भव्य थारा हो. ९२

---

१. हे नाना फडणीस पेशव्यांचे मंत्री होत. २. पेशव्यांचा प्रताप. ३. हे हरिपंततात्या फडके. ४. हे पेशव्यांचे सरदार. ५. अन्वयार्थ– स्तेनासि 'पाठिव निजदूत' (असें सांगून त्याला) 'हा !' (हायहाय !) म्हणविते (म्हणविणारे) परचमूशास्ते (शत्रुसैन्याचें पारिपत्य करणारे) रास्ते गंगे ! तुला पूजावया यावे (व) कृतार्थ व्हावे. ६. हे सवाई माधवराव पेशवे होत. ७. ही अहल्याबाई होळकरीण होय. (हिच्या स्तवनपर **पंत**कृत आर्या पृष्ठ २५०–२५१ वर दिल्या आहेत). ८. सात्त्विक गुणांचे ठायीं आवड असणाऱ्या. ९. शंभर ब्राह्मणकुटुंबांच्या पोषणामुळें झालेल्या कर्जाचा भार.

द्यावी सद्गति गंगे ! त्वां माझ्या अग्रजासि,[1] जो भावें
तुज भेटे; स्त्रीपुत्र त्यागुनि, जेथें अवश्य लोभावें. ९३
देवि ! मम पितृव्यांचे[2] सुत सुतरां[3] कष्टपात्र रक्षावे.
लक्षावे मात्र तुझ्या दृष्टीनें, सर्व दोष भक्षावे. ९४
गंगाधर, नारायण, मन्मातुळपुत्र[4] जे, तदानयनें[5]
गंगे ! कुळ तारावें; निववावीं तापलीं सदा नयनें. ९५
मद्बंधूंचे माझे तारावे श्वशुर, मेहुणे, साडू.
धाडू चित्त तुजकडे गंगे ! नच मोह मज्जना नाडू. ९६
मम बाळमित्र सर्वहि गंगे ! तूं अच्युतप्रमुख तारीं.
वारीं संसारभ्रम, सारीं प्राचीन पातकें सारीं. ९७
बाबूराय तव सुतचि, न शकें तत्प्रेमवर्णना तुंडें.
कुरवाळीं तदपत्यें; भरुत यशें साधुकर्ण नातुंडें. ९८
'श्रीगंगे ! उरलेही वांचीव क्षुधित जीव, सत्रप[6] ते'
म्हणति असें, जेउनि जे स्वजनान्नार्थी, न होति सत्रप[7] ते. ९९

---

१. मोठ्या भावाला. (याचें नांव 'सोनोपंत' होतें). २. चुलत्यांचे. ३. सुतराम्, अगदीं, निश्चितपणें. ४. (हे) माझ्या मामाचे मुलगे; माझे मामेभाऊ. ५. त्यांना (येथें काशीक्षेत्रांत) आणून देण्यानें. ६. सलज्ज. ७. अन्नछत्र घालणारे. अन्वयार्थः– जे स्वजनान्नार्थी (आपल्या लोकांसाठीं अन्नाची याचना करणारे स्वतः पोटभर) जेउनि 'श्रीगंगे! उरलेही क्षुधित जीव वांचीव, ते सत्रप' (सलज्ज आहेत) असें म्हणति, ते सत्रप (अन्नछत्र घालणारे) न होति. (स्वतःची तुंबडी भरून खऱ्या गरजू लोकांच्या रक्षणाचें काम दुसऱ्यावर सोंपवून टाकणाऱ्याला मोठेपणा प्राप्त होत नाहीं, हें तात्पर्य).

देवि! तव पयें[1] प्रमुदित बहु सुरभीतनुभवापरिस[2] मोर.[3]
हा स्वजनाच्या मागे, या तुझिया अनुभवा परि समोर.[4] १००

तुज ऐकविलि मयूरें सर्वजनहितोदया स्तवनवाणी.
हें द्याया आहेस प्रभु[5]; करिशिल देवि! यास्तव न वाणी.[6] १०१

जी पांडुरंगरायें[7] दिधली, या सुयश दे वकीलीला.
ऐकोत तुझ्याहि सुखें श्रीगौरी, अदिति, देवकी लीला. १०२

( वृत्त–इंद्रवज्रा )

त्वां दीन गंगे! अति धन्य केला। ध्यातां तुज श्रीपतिकन्यके़ला.[8]
तूं जेंवि दीनासि असी महातें[9]। लोकीं न देणार असीम[10] हातें. १०३

( वृत्त–स्वागता )

तारिले अघ निवारुनि गंगे!। सर्व दास, मज पावनता[11] तें
दाखवू चरित; कीर्ति करावी। सर्वदा समज, पाव नतातें. १०४

( वृत्त–इंद्रवज्रा )

केली तुवां ख्याति महानदीनें। कीं मानिला स्वर्ग लहान दीनें.
शंभुत्व विष्णुत्वहि अर्पितीस। ज्ञानामृतें जंतुसि तर्पितीस. १०५

---

१. पाण्यानें ( पक्षीं दुधानें ). २. कामधेनूच्या वत्सासारखा. ३. (मी) मोरोपंत. ४. अन्वयार्थः- परि हा ( मी मोरोपंत ) स्वजनाच्या ( माझ्या आप्तेष्टांच्या ) या ( तुझ्या पाण्यानें प्रमुदित होण्याच्या ) अनुभवा ( प्रात्यक्षिकाकरितां ) तुझियासमोर मागे ( मागतो; याचना करतो ). ५. समर्थ. ६. कमतरता. ७. पंतांचे यजमान बाबूजी नाईक बारामतीकर यांचे हे चिरंजीव. यांनींच पंतांना प्रयाग, काशी, गया या यात्रांस पाठविलें. ८. विष्णूच्या कन्येला ( गंगानदी ही विष्णूच्या पायांपासून उत्पन्न झाली आहे. म्हणूनच तिला 'विष्णुपदी' म्हणतात. मागें गीतिक्रमांक २५, ३६, ४८ पहा ). ९. आनंदाला. १०. अमर्याद. ११. शुद्धपणा.

( वृत्त–शिखरिणी )

कळाविद्या जाणे, स्तुति करि रसें तो कवि नवी;
तदन्य, प्रेमें जो प्रिय तुज जसें तोक,[1] विनवी.
स्तवें भंगे गंगे ! दुरित, समजे हा तव दया.
'न भीं' ऐसें 'चित्तीं' तरि, नुचलितां हात, वद या. १०६

( गीतिवृत्त )

जो सज्जनरंजन सुत दादा[2] मार्गांत पावला मरण,
स्मरण धरूनि करावें गंगे ! त्वां तद्भवव्यथाहरण.[3] १०७

( दोहावृत्त )

काढीं जो नतजनमनीं दुःसह तो भवकील.[4]
द्युनदि ! मयूरयशोधनीं हा[5] कृतलोभ[6] वकील. १०८

( गीतिवृत्त )

गुरु माझे श्रीराम, श्रीमत्केशव, गणेश, हरि, चवघे.
यांचा प्रसाद वदला, 'गंगामृत पी यथेष्ट, बरि चव घे.' १०९

---

१. बालक. २. पंतांचे बरोबर काशीयात्रेस निघालेला हा बिचारा 'दादा' वाटेंतच स्वर्गवासी झाला असावा. त्यालाहि पंतांनीं श्रद्धांजलि वाहिली आहे. ( 'विष्णुपदवकीली' आर्याक्रमांक २० पहा ). ३. त्याच्या संसारदुःखाचें निरसन. ४. संसाररूपी खिळा. ५. भवकील. ६. लोभाविषयीं उत्कट इच्छा धारण केलेला.

## (८) विष्णुपदवकीली[1]

(गीतिवृत्त)

श्रीविष्णुपदा! आलों शरण तुतें, भिवुनि काळसर्पा, या.
कैचें शुचि धन? न शकें तुज तुळसीदळहि एक अर्पाया. १
श्रीपांडुरंगरायें[2] मज तुज वंदावयास पाठविलें.
'तारिति साधु,' असें म्यां, त्या प्रभुनेंही मनांत आठविलें. २
श्रीविष्णुपदा! आला मज घेवुनि अमरसिंह[3] हा राजा.
यश जोडुनि म्हणणारा, 'रे! रुचसि जडा! न रत्नहारा! जा.' ३
श्रीविष्णुपदा! वाटे, त्वदितर जें काय, तें असार मला.
जडही तुज पावोनि, ब्रह्म जसें आयतें, असा रमला. ४
श्रीविष्णुपदा! होती वंदुनि बहु धन्य हे तुला जीव.
यापरिच पाव; सकळहि सद्गतिचे अन्य हेतु लाजीव. ५
विष्णुपदा! तूं मूर्त त्रिजगत्कल्याण संततोदार.
जो तुज पावे, पाहे इतर प्रभुचें न संत तो दार. ६

---

१. पृष्ठ ३०४ वरील 'गंगावकीली'च्या टीपेंत सांगितल्याप्रमाणें गया-क्षेत्रांतील विष्णुपदासमोर उभें राहून सर्वांच्या उद्धाराविषयीं सर्वांच्या तर्फें **पंतांनीं** ही वकीली लढविली आहे. 'गंगावकीली' व 'विष्णुपदवकीली' यांतील नामावलींवरून **पंतांचा** आप्तेष्टवर्ग व मित्रपरिवार किती मोठा होता, याची यथार्थ कल्पना येते. २. श्रीपांडुरंगराय हे **पंतांच्या** यजमानांचे—बाबूजी नाईक जोशी बारामतीकरांचे— चिरंजीव. यांच्या नांवाचा उल्लेख 'गंगावकीलीं'त आर्याक्रमांक ८ व १०२ मध्यें आला आहे. ३. हा लखूजी जाधवाच्या वंशांतील. याच्याच बरोबर **पंतांनीं** त्रिस्थळीयात्रा केली. ('गंगावकीली आर्या क्र. ८५ पहा).

विष्णुपदा ! त्वां केले पितरांचे अनृण,[१] शरण जे आले;
झाले विघ्नव्याकुळ; विधिचें[२] बळ न तिळ तुजपुढें चाले. ७
श्रीबाबूरायप्रभु[३] माझा अत्यंत सदय अन्नद हा.
अर्थिजना न म्हणों दे तैसें तप्तास जेंवि सन्नद[४] ' हा[५] ! ' ८
श्रीगायत्रीगंगागीतासिद्धेश्वरैकभक्तातें
या विष्णुपदा ! मुक्ति न वरिल कसी गुरुपदाब्जसक्तातें ?[६] ९
परि याच्या उद्देशें विष्णुपदा ! पिंड अर्पिला भावें.
तव अर्चनीं यश जनें, सुक्षीरीं[७] जेंवि सर्पि[८] लाभावें. १०
स्मरती ताईबाई,[९] पुण्ययशीं धरुनि लोभ, विष्णुपदा.
सुखवीं. जो तुज भजतो, होतोचि सुपात्र तो भविष्णुपदा.[१०] ११
कमळाबायी[११] सदया जननीजननीति आश्रितीं दावी.
बा ! विष्णुपदा ! तीतें, करुनि कृपा, भेटि सर्वथा द्यावी. १२
दे नीलकंठराया[१२] दर्शन, देवूनि पुण्ययश गाया.
विष्णुपदा ! म्हणसि जना, 'करितों सर्वांहि सिद्धि वशगा,[१३] या.' १३
ऋण कृष्णराय[१४] नेवू, तुजला वाहोनि पिंड, विलयातें.
विष्णुपदा ! नमन तुझें संसारवनीं न हिंडविल यातें. १४

---

१. ऋणमुक्त. २. नशिबाचें. ३. हे पंतांचे यजमान ( ' गंगावकीली ' आर्या क्र. ७ पहा ). ४. चांगला नद ( मोठ्या नदीचा पुल्लिंगीवाचक शब्द ). ५. ' हायहाय ! ' ६. गुरुचरणकमलीं जो रत त्यातें. ७. उत्तम दुधांत. ८. तूप. ९. बाबूरायाची पहिली बायको. १०. भावी ( स्वर्गींच्या ) पदाला. ११. बाबूरायाची दुसरी बायको. १२. नीलकंठराय हा बाबूरायाचा औरस व आबूरायाचा दत्तक पुत्र, त्याला. १३. स्वाधीन. १४. बाबूरायाच्या पुत्राचें नांव.

श्रीपांडुरंगराय[१], प्रेक्षुनि तुज, या जगांत हो धन्य.
श्रीविष्णुपदा ! व्हावें यासि यश जसें, तसें नको अन्य. १५
श्रवणीं प्रेमाश्रु जया येती, तो फार आठवे **दा**जी.[२]
या गति दे विष्णुपदा ! पावावी करुनि पाठ वेदा जी. १६
शुचि सुव्रत जो, ज्याची तीच अनुद्वेगहेतु[३] मुद्रा जी,
श्रीविष्णुपदा ! तारीं तो सज्जन विष्णुभक्त **रु**द्राजी. १७
श्रीविष्णुपदा ! येवुनि **आ**बाजी **वें**कटेशसुत पाहो.
याचा तव सत्कारें कुळकर्ता सुप्रसन्न सुतपा हो. १८
न कधींच करी, रोषें सुजनाचे तिळहि गाल फुगती, तें
श्रीविष्णुपदा ! पावो तो **छो**टेलाल साधु सुगतीतें. १९
यात्रा असे कपाळीं, हें केलें स्ववच सत्य **दा**दानें.[४]
विष्णुपदा ! तो निववीं, जें देसी अमृतदान, या दानें. २०
श्रीविष्णुपदा ! बापा ! पापा हरिसी, निवारिसी तापा.
जो **आ**ठवला **आ**पा, या पाव प्रार्थुनि स्वयें मापा.[५] २१
निववी दामोदरसा **दा**मोदर साधुमन, असा रसिक
तारीं. विष्णुपदा ! जो न सिके, 'न' म्हणे परा, 'असार सिक.' २२
तारीं **प्र**भाकरातें, वरिच दिसे, यन्मनीं न राग वसे.
श्रीविष्णुपदा ! सद्यश बहु, ऐशा तारितां नरा, गवसे. २३

---

१. बाबूरायाच्या पुत्राचें नांव. २. बारामतीकर जोशांचा मुख्य कारभारी. ३. सुखाला कारण अशी. ४. ('गंगावकीली' पृष्ठ २१७ वरील आर्याक्रमांक १०७ पहा). ५. लक्ष्मीपतीला.

रखुमाबायी भक्ता, परि तुज पावावया नसे शक्ता;
विष्णुपदा ! तारावी. तारिसि तत्र कीर्ति हे जगीं व्यक्ता. २४

श्रीदत्तात्रेयातें आराधुनि, तेंचि पावला नाम.
विष्णुपदा ! मुक्तचि तो तुज भेटावा असा असो काम. २५

दे दर्शन विष्णुपदा ! मज सांगे सन्मुहूर्त आबा[1] या.
कीं विष्णुभक्तसदनीं सिद्धींतें कथिसि नित्य राबाया. २६

श्रीविष्णुपदा ! प्रेमें माता म्यां जीस मानिलें आहे,
पाहो तुज ती अंतीं, संतीं स्मरिलें स्मरो, तरो बा ! हे. २७

तोया याद[2] वराया ज्या प्रेम्या धरितसे, भला भजनीं
तो[3] या यादवराया प्राप्त असो, कीं दुजा न लाभ जनीं. २८

विष्णुपदा ! मानवती त्र्यंबकरायासि लोक संसारी.
हें न बहु, मानवावे ज्यांच्या हृदयांत शंभु, कंसारी. २९

श्रीविष्णुपदा ! सांग स्वामीतें, ‘ बहु सुखी विसोबा हो. ’
कीं प्रभु म्हणतो, ‘गज-सा सुयशस्कर आर्त[4] जन दिसो, बाहो ![5] ’
विष्णुपदा ! दाखीव स्वभजनपथ वासुदेवकृष्णातें.
पावो, जेंवि अजामिळ पावे, अथवा सुदेव[6] कृष्णातें. ३१

---

१. पंतांचा भाऊ. २. जलचर प्राणी. ३. प्रेमा. ४. पीडित. ५. (प्रभु आपल्या बाहूला म्हणतोः–) ‘बाहो !’ (हे हाता !) गज-सा आर्त जन (तुला) दिसो, ( त्याला हात देणें=मदत करणें, तुला ) सुयशस्कर.’ किंवा दुसरा अर्थ–आर्त जन गज-सा दिसो; ( तो तुला ) बाहो, ( बोलावो ) ( हें ) सुयशस्कर. (येथें दोन्ही अर्थ लावीत असतां गजेंद्रमोक्षाची कथा दृष्टीपुढें आणली पाहिजे.).
६. रुक्मिणीची पत्रिका घेऊन श्रीकृष्णाकडे गेलेला सुदेव नांवाचा ब्राह्मण.

विष्णुपदा ! म्हण, पावुनि मज, "बापूभक्त जामदारा 'गा.' "
कीं म्हणसि 'त्यजुनि' प्रभुनामकथासक्त 'जा' मदा रागा.[1] ३२

प्रभुगुरुसेवासादर बहु आबाजी, तसाच गंगाजी.
विष्णुपदा ! गति यांला दे ती, पावे कधीं न भंगा जी. ३३

तूतें, गुणरत्नांचा कमळाकरनाम जो डबा, पूजी.
विष्णुपदा ! जोडुनि दे, वांछी तत्पुत्र जोड बापू जी. ३४

अर्थिजना मागाया बहु उत्सव कर्णकीर्ति दे. मग या
रामसुता[2] विष्णुपदा ! देयील असी सुबुद्धि कां न गया ? ३५

विष्णुपदा ! दे दर्शन पुनरपि, करुणा करूनि, बाबातें.
हा बा ! तेंवि करितसे प्रेम, करी जें द्रवोनि आबा तें. ३६

सद्बुद्धि बाळ राघव सुरसिक हे कीर्तनीं सदा सक्त.
तारावे विष्णुपदा ! संसारीं तारिले जसे भक्त. ३७

श्रीहरिदास सदाशिव तारीं, पावो कधीं न साधि[3] लया.
विष्णुपदा ! म्हण, 'भुक्तिहि, मुक्तिहि होवुनि अधीन, साधिल या.'

जो श्रीपतिर्नीराजी नीराजी[4] विष्णुतें सदा भावें,
व्हावें तत्र दर्शन या, संसारीं यासि सर्वदा पावें. ३९

---

१. अन्वयार्थः– विष्णुपदा ! मज पावुनि ( प्रसन्न होऊन ) " बापूभक्त जामदारा 'गा' " ( असें मला ) म्हण; कीं ( कारण तो ) प्रभुनामकथासक्त ( असल्यामुळें त्याला ) 'त्यजुनि जा' ( असें तूं ) मदा रागा ( मद व राग या दोन शत्रूंना ) म्हणसि. ( तेव्हां त्याची स्तुति करावयास तूं मला सांगितलेंस तरी हरकत नाहीं ). २. रामचंद्राच्या पुत्राला (मला मोरोपंताला). ३. दुःखी. ४. ओवाळी.

हें पुण्यकार्य[1] नेलें सिद्धिस **गंगाधरें पराडकरें**.
सत्पुरुष अशक्ताची काय प्रक्षाळिती न राड[2] करें ? ४०

प्रेमें घेवुनि आले साधु **जगन्नाथपंत** जे **कुंटे**,
योग्यचि हें, जन्ममरण सत्पुरुषाच्या अनुग्रहें खुंटे. ४१

सन्मित्रपुत्र **विठ्ठल**, आर्यांच्या सेवनीं जया गोडी.
श्रीविष्णुपदा ! यावरि करुणा करुणालया ! नसो थोडी. ४२

तूतें भजुनि निवावा **राम**, **जगन्नाथपुत्र** हा दुसरा.
प्रेमें सेवूनि निवे हंस जसा नित्य मानसा सुसरा.[3] ४३

सेवी **अनंतभट्ट**, श्रेष्ठा जी वाट ती. सखेदास
या रक्षीं विष्णुपदा ! कीं प्रभुला वाटती सखे दास. ४४

हरिभक्तांहीं केलें प्रकट श्रीहरिकथेंत जें उक्त,
त्या पुण्यें विष्णुपदा ! बहुधा करणार तूं मला मुक्त. ४५

आप्तें नेलें, लात्री, श्रीगंगेसीं यदस्थिरज[4] नातें.
उत्तम लोकीं मिळतें त्या पाप्याही पद स्थिर जनातें. ४६

तारावे उपकर्ते, जे सज्जन **विठ्ठलादि** गोसावी.
पोसावीं निज बाळें, विष्णुपदा ! लंघनेंहि[5] सोसावीं. ४७

या भव्या[6] हेतु[6] तुझें आयकिलें परम भव्ययश कानें.
त्वदनुग्रहपक्षीश्वर[7] उडवावा काय कर्ममशकानें ?[8] ४८

---

१. त्रिस्थळीयात्रेस आणण्याचें पवित्र काम. २. घाण, चिखल. ३. चांगल्या सरोवराला. ४. ज्याच्या हाडाचा कण. ५. उपोषणेंसुद्धां. ६. भव्या हेतु= कल्याणाला कारण असें. ७. पक्षीश्वर=गरुड. ८. मशकानें= चिलटानें.

मैराळ बहु प्रेमळ विष्णुपदा ! विष्णुकीर्ति जो गातो.
स्वप्रियभक्त करावा, आहे सद्भक्तिकीर्तिजोगा[1] तो. ४९

माझ्या सद्गुरुवंशीं झाले आहेत पुरुष, होतील.
विष्णुपदा ! म्हण, ' यांच्या श्रीगुरु कर्णांत अमृत ओतील. ' ५०

वैरागी हरिदास, प्रेमळ जो नित्य सत्कथाच वदे.
विष्णुपदा ! हा तारीं; यासि सुधेहूनि सत्कथा चव दे. ५१

नारोपंत, त्र्यंबकपुत्र महादेवपंत, हे दास
विष्णुपदा ! पावावे संसारीं सर्वथा न खेदास. ५२

श्रीविष्णुपदा ! सदया ! व्हावीच तुझी कृपा कृपारामीं.
दीनोद्धारीं प्रभुला बहु सुख, जैसें नृपा नृपारामीं.[2] ५३

तारावे विष्णुपदा ! मजवरि सुस्नेह करिति जे सिंपी.
घन चातकीं करि दया, परि अमृतें[3] देश सर्वही सिंपी. ५४

जो मोरापा सद्गुण मैराळप्रमुख जे तया भ्राते,
रामोपासक सर्वहि तारावे हरिपदा ! दयाभ्रा ! ते. ५५

विष्णुपदा ! तुज पूजुनि, पुष्कळ सुख बाळ हेंदरा लाहो.
द्याया समर्थ न नता या संसृतिजाळ हें दराला हो.[4] ५६

श्रीविष्णुपदा ! पावुनि तुज भिवजी खोत हो तसा पाळी
निजधर्म,[5] म्हणे ' हरिहरि, ' तारावा, जेंवि सांवता माळी. ५७

---

१. चांगली भक्ति आणि कीर्ति हीं मिळण्याला पात्र असा. २. राजाचे बागेंत ( नृप+आरामीं ). ३. पाण्यानें. ४. अन्वयार्थः– या नता ( बाळ हेंदराला ) हें संसृतिजाळ ( संसाररूपी जाळें ) दराला ( भीतीला ) द्याया समर्थ न हो. ५. ' निजधर्म पाळी तसा हो ' असा अन्वय.

विष्णुपदा ! यश घेसी, म्हणुनि तुज प्रार्थितों उदारा ! मीं.
तव **कोंडदी**क्षितीं हो, **राजा**रामीं कृपा, **उदा**रामीं. ५८

हरिदास **महा**देव, प्राकृत ते लोक म्हणति वेडा या.
याचें श्रीविष्णुपदा ! तूंचि प्रभु दुःखदैन्य फेडाया. ५९

प्रेमें हरिहरनामें बहु गातो नालबंद **सं**भाजी.
विष्णुपदा ! याची हे वृत्ति बरी, स्पर्शली न दंभा जी. ६०

विष्णुपदा ! म्हणतो ' हरिहर ' **कृ**ष्णा **गौं**ड, या नता पावें.
भगवन्नामनिरत जो, तेणें तापत्रयें न तापावें. ६१

जे **राम**जी, **उदा**जी, ते विष्णुपदा ! सुखी करावेच,
प्रभुपासीं शब्दाचा दीनाच्या पालनीं बरा वेच. ६२

ज्या **बा**बूरायाची, तत्पुत्रांचीहि साधली सेवा,
विष्णुपदा ! ' तारावे ते सर्वहि ' विनिव तूं असें देवा. ६३

विष्णुपदा ! तारीं, जो स्मरतो सप्रेम हरिस खाटिक तो.
कष्टीं न टिके दीनाजवळ इतर, एक परि सखा टिकतो. ६४

विष्णुपदा ! न विटसि वर बहु दीनें मागतां, गळां पडुन.
कीं प्राकृतही मानी बाळाचें मागणें पिता कडु न. ६५

बहु उपकारी **नरसोबा**बाजी, यासि पाव विष्णुपदा !
दे मोक्षपदचि याला, सदया ! देवूं नकोचि जिष्णुपदा.[१] ६६

मातेहूनि बहु दया केली, आदर वरूनि, **आ**कानें.[२]
विष्णुपदा ! तारीं, गुण घ्यावेचि इचे, करूनि आ, कानें. ६७

---

१. ( दुसऱ्यांनीं ) जिंकण्याच्या स्थानाला. २. आका हें **पंतां**च्या वडिल बहिणीचें नांव.

वदला प्रसन्न चित्तें, साहित्य करूनि, बंधु आबा ‘ जा. ’
विष्णुपदा ! तारावा, याची सगुणा असीच बा ! भाजा.[१] ६८

मीं जरि अशक्त, निर्धन, कोपी, तरि बहु भली रमा भार्या.[२]
ईतें सद्गति दे तूं ; हेचि करी प्रथम बोध या[३] कार्या.[३] ६९

मज संरक्षित आले संभाजी, शंभु, साधु केदारी.
विष्णुपदा ! तारावे हे, देउनि यांसि बोध खेदारी.[४] ७०

भरवहनें वृषभांचें[५] जैसें, बहु दुःख तेंवि भोयांचें;[६]
श्रीविष्णुपदा ! ऐसें जें दैन्य, उडीव तें विभो ! यांचें. ७१

जो विष्णुकीर्तनातें बहु जोडी, लुब्ध जन जसा हेमा,[७]
नेमा न चुके, तारीं, विष्णुपदा ! विष्णुभक्त तो खेमा. ७२

भ्रात्यांसि मज अपत्यें, जेंवि दहांचीं, तशींच आहेत.
पुरवीं, विष्णुपदा ! रत व्हावीं हरिगुणरसींच, हा हेत. ७३

विष्णुपदा ! तारावा त्वां केशवपंत, जेंवि सुत तातें.
कर्तव्यचि सर्वज्ञा, जेणें होय स्वकीर्ति सुतता,[८] तें. ७४

विष्णुपदा ! तुज नमुनिहि मोरो मल्हार बहुत कष्टतसे.
शरणागत जे, त्यांचे त्वां केले काय न हुत[९] कष्ट तसे ? ७५

---

१. भार्या. २. येथें **पंतांनीं** आपलें कौटुंबिक चित्र फारच यथार्थतेनें रंगाविलें आहे. ३. या कार्या= यात्रेस निघण्याचे कामीं. ४. खेदनाशक. ५. बैलांचें. ( मुक्या प्राण्यांबद्दल **पंतांची** केवढी ही सहानुभूति ! ) ६. पालखी, मेणा, वगैरे वाहणाऱ्यांचें. ( श्रमजीवी लोकांच्या दुःखांबद्दल **पंतांची** केवढी ही कृतज्ञता ! ). ७. सोन्याला. ८. चांगली विस्तृत. ९. दग्ध.

ज्यांसि दिलें दर्शन ते मुक्तचि, उरलाहि सर्व तारावा.
बारावा[1] अकरावा[1] हो[1] विष्णुपदा ! गदाधि[2] वारावा. ७६

श्रीविष्णुपदा ! दर्शन देवुनि, ज्याचे निवारिले दोष,
चुकतां, विरक्ति विषयीं दे बा ! सदया ! करूं नको रोष. ७७

श्रीविष्णुपदा ! वर्णिति तुज बहु सत्कवि मुखें वदान्यातें.[3]
कीं भक्तमयूराभ्रा ![4] म्हणसी 'जें प्रिय, सुखें वदा, न्या तें.' ७८

विष्णुपदा ! तारावे जांवाई, सर्व मामक[5] व्याही;
हव्या[6] हीना यांच्या सांग[7] करू विष्णुनाम, कव्याही.[8] ७९

विष्णुपदा ! दांडेकर केशव, करुणा करूनि, लक्षावा.
बा ! तुज पदर पसरितों भवसिंधुनिमग्न दीन रक्षावा. ८०

श्रीविष्णुपदा ! सदया ! वरदा ! प्रणताखिलामरद्रो ![9] हें
कवि कथिति, भस्म होतो षडरिगण, स्मर जसा हरद्रोहें.[10] ८१

विष्णुपदा ! सुखवावे गाणारे कीर्ति, जेंवि भाट तसे.
वाटतसे प्रभुसि असें; प्रेमें कंठांत बाष्प दाटतसे. ८२

सुकवि कथिति कीं, सर्व प्रणतांचें इष्ट विष्णुपद वीतें.[11]
किंबहुना भव्याच्या पावे, तुज नमुनि, जिष्णु[12] पदवीतें. ८३

---

१. कुंडलींत अकराव्या स्थानाचा ग्रह अनुकूल व बाराव्या स्थानाचा ग्रह प्रतिकूल असतो, असें फलज्योतिषी समजतात. 'बारावा अकरावा हो' म्हणजे प्रतिकूलपणा टाकून तूं अनुकूल हो, असा अर्थ. २. रोगव्यथा. ३. उदार अशा तुला. ४. भक्त जो मयूर त्याच्या मेघा ! ५. माझे. ६. देवांस दिलेल्या (वस्तु हीन असल्या तरी). ७. सर्वांगपूर्ण. ८. पितरांस दिलेल्याहि. ९. सर्वशरणागतांच्या कल्पवृक्षा ! १०. शिवाचा द्वेष केल्यामुळें. ११. प्रसवितें; देतें. १२. इंद्र; अर्जुन.

विष्णुपदा ! हर्षविती प्रभु त्यातें, कीर्ति गाय जो भाट.
जरि काय न हर्षविला, करितो भलता दहांत बोभाट. ८४

श्रीविष्णुपदा ! देसी प्रणतांतें सुवर नित्य नव लक्ष.
धवल क्षयरहित तुझें यश, ऐसा शारदेंदु न वलक्ष.[1] ८५

करिति तुझ्या नीरा[2] जन नीराजन,[3] गुरु म्हणोनियां गाती,
त्यां गति गंगा दे, जी न मिळे योगा करूनि यागा, ती. ८६

श्रीविष्णुपदा ! पावे तुज जो, त्याला नसे उणें कांहीं.
त्वत्तीर्थधरें[4] जीं जनवृंदें, न महेशसीं गुणें कां हीं ? ८७

विष्णुपदा ! दीनातें पावसि, तैसेंचि तूं सदा पावें.
मज अनुमोदन दिधलें ज्याहीं, त्यांतें यमें न दापावें. ८८

सर्व मनोरथपूरक, जें जोडावें जगांत जन्मुनि, तें
विष्णुपदा ! सद्धन तूं , बहु संमत नारदादि सन्मुनितें. ८९

विष्णुपदा ! वदशील ' व्रत माझें मुख्य होय रे ! वा ! हें.
उद्धरितों, सर्वप्रिय करितों, न सखे, न सोयरे बाहें. ' ९०

विष्णुपदा ! ' या हो ! या ' ऐसें पावावया यशा बाहूं.
त्वां न वळवितां, म्हणतिल विषयरतमति प्रजा कशा ? बा ! 'हूं.' ९१

तुज विष्णुपदा ! श्रीकरपल्लवसंलालिता[5] असो नमन.
तूतें सोडुनि, पळही माझें विषयीं कधीं वसो न मन. ९२

---

१. शुभ्र. २. पाण्याला. ३. पूजन. ४. तुझें तीर्थ धारण करणारीं (प्राशन करणारीं ). ५. लक्ष्मीच्या नाजूक हातांनीं ज्याचें लालन केलें आहे, अशा !

त्रिष्णुपदा ! त्वां दर्शन दिधलें, गणिलें न कर्म फटकळ[1] तें.
अज्ञ जनासहि करुणाक्षांत्यादिगुणें[2] प्रभुत्व अटकळतें. ९३

षडरिमदा मोहगदा[3] हरुनि, सदा करिसि मुदित साधुसदा.
विष्णुपदा ! अमृतनदा ! वदान्यवर[4] म्हणसि तूं 'न हंत[5] वदा.' ९४

त्रिष्णुपदा ! तूं प्रभुसीं स्वाश्रितसंसारकंपदा ![6] तुळसी.[7]
कीं वाहिली तुला ती देती पुरुषार्थसंपदा तुळसी. ९५

नमनें तोखे[8] दास, श्रीविष्णुपदा ! धरील जो भावा,
न मनें तो खेदास स्थळ होय, यशें जगांत शोभावा. ९६

विष्णुपदा ! साङ्ग करीं, केलें पिंडप्रदान[9] तुजवरि, तें,
मन तूतें, धन्य करिसि, हें ऐकुनि साधुकथित गुज, वरितें. ९७

विष्णुपदा ! तव संश्रित गोकुळजीप्रमुख जो गयावळ[10], तो
मुदित असो, कीं प्रणतीं दीन जनीं करुनियां दया, वळतो. ९८

श्रीविष्णुपदा ! द्यावें सद्यश तुज हेचि ठावकी[11] लीला.
मीं पांडुरंगराया[12] आलों मागोनि या वकीलीला. ९९

---

१. ओंगळ, दुष्ट, नीच. २ दया, क्षमा इत्यादि गुणांमुळें. ३. मोहरूपी रोगाला. ४. दात्यांतील श्रेष्ठ असा तूं. ५. हायहाय ! ६. आपल्या आश्रितांच्या संसाराला थरकांप देणाऱ्या ! ( विष्णुपदा ! ) ७. बरोबरी करतोस. ८. आनंद पावतो. ९. आपल्या जनकादि आप्तेष्टांना स्वर्गप्राप्ति व्हावी म्हणून गयाक्षेत्रांतील श्रीविष्णुपदावर भाविक लोक श्राद्धविधिपूर्वक 'पिंडप्रदान' करितात. म्हणून या स्थानाला 'पितृगया' म्हणतात. 'मातृगया' हें क्षेत्र सौराष्ट्रांतील सिद्धपूर स्टेशनजवळ आहे. १०. गयाक्षेत्रांतला उपाध्याय, ११. ठाऊक, माहित. १२. ( याच प्रकरणांतील क्रमांक २ ची आर्या पहा ).

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

शरणागतें मयूरें विष्णुपदा या समर्पिल्या आर्या.
जेंवि प्रसादतुळसी, भगवद्भक्ता जना सदा धार्या[1] १००

## ( ९ ) आशंसाष्टक[2]

( औपच्छंदसिकवृत्त )

तवपादसरोरुहीं स्वचित्तभ्रमरातें रस चाखवूनि गोवूं,[3]
तुज भक्त तुजे सदैव गाती, मृग आम्हीं गुणगीतसक्त होवूं. १
मज वाटतसे, सभाग्य, मोठे भगवद्भक्त तयांत म्यां, जुडावें;
तदधीन तुज्या यशःसुधेचा ऱ्हद[4] गंभीर, तयामधें बुडावें. २
तुज वर्णिति संत संगमुक्त प्रकृतिप्रेमळ, तद्गुणीं शिरावें,
तुजिया गुणसागरांत माजें मन हें सैंधव[5] माधवा! विरावें. ३
गमतें भगवज्जनप्रसंगें मज, टाकून गृहादिलोभ, जावें;
करुणावरुणालया! मुकुंदा! तुजला सादर सर्वदा भजावें. ४
तुजला 'रघुनाथ! रामचंद्र! प्रभुजी!' यापरि नित्य आळवावें,
मन चंचळ हें, त्वदंघ्रिपद्मीं[6] जडतां, न क्षणमात्र चाळवावें. ५
मन हें विषयीं उडीच घाली, विष हें जाणुनि यावरी विटावें,
तव कीर्ति उदार कामधेनू, तिस मीं, होवुनि वासरूं, चिटावें.[7] ६

---

१. धारण करण्यास योग्य. २. आशंसा = इच्छा, मनोरथ. या अष्टकांत पंतांनीं आपल्या सदिच्छा व्यक्त केल्या आहेत. अर्धसमवृत्तांपैकीं हें एक असून याला 'माल्यभारा' असेंहि नांव आहे. याचें लक्षण पुढीलप्रमाणें:- पहिल्या व तिसऱ्या चरणांत अकरा अक्षरें असून स, स, ज, ग, ग असे गण आणि दुसऱ्या व चौथ्या चरणांत बारा अक्षरें असून स, भ, र, य असे गण असतात. ३. गुंतवूं, रमवूं. ४. डोह, सरोवर. ५. सिंधु (समुद्रा) पासून उत्पन्न झालें तें सैंधव; मीठ. ६. तुझ्या चरणकमलीं. ७. चिकटावें, बिलगावें. (दुसरा अर्थ- आचळांतून दूध येईनासें होईपर्यंत थेंबथेंब ओढून प्यावें.).

तुज एक अनेकभूतभेदीं[1], घटतोयार्क[2] अशापरी, पहावें;
भजकार्पित[3] भुक्तपादराज[4] तुलसीदाम शिरीं सदा वहावें. ७
त्रिजगन्नयनप्रमोदहेतु[5] त्वदुदारांघ्रिसरोज[6] म्यां नमावें;
भ्रमरत्व[7] धरूनियां रमावें; स्वसुखें[8] त्या भुवनत्रयीं न[9] मावें.[9] ८

## (१०) स्मरणी[10]

(सारंगवृत्त[11])

श्रीविठ्ठला ! 'साधुवृंदांत दे वास,' हें मागतों बा ! तुला देवदेवास.
यावें मुखाला सदाही तुझें नाम, चित्तीं नसो पांडुरंगा ! दुजा काम.[12] १
श्रीज्ञानदेवा ! तुझ्या सर्व ओवीस गातो, म्हणे, 'तूंचि विश्वास होवीस;'
जैसी श्रुति, स्पष्ट तैसी तुजी उक्ति, देती समस्तां जडांलाहि हे मुक्ति. २
बा ! नामदेवा ! तुजे साजिरे बोल, वित्तेशसंपत्ति यांचें नव्हे मोल;
येतोचि[13] हे ऐकतां विठ्ठला डोल,[13] सद्वृंद होतेंचि सेवावया लोल. ३

---

१. अनेक भूतांच्या भिन्नत्वामध्यें. २. मडक्यांतल्या पाण्यांतील सूर्य. (निरनिराळ्या मडक्यांतील पाण्यांत प्रतिबिंबरूपानें अनेकविध भासणारा सूर्य वस्तुतः बिंबरूपानें एकच असतो; त्याप्रमाणें भिन्नभिन्न भासणारीं भूतें वास्तविक तुझींच = एकाच परमेश्वराचीं आहेत असें मीं समजावें). ३. भक्तानें अर्पिलेलें, वाहिलेलें. ४. (तुझे) श्रेष्ठ पाय ज्यानें सेविले आहेत असें (तुलसीदाम). ५. तिन्ही जगांच्या डोळ्यांच्या आनंदाचें कारण. ६. तुझे उदारचरणरूपी कमळ. ७. येथें **पंत**लिखित दुसरा पाठ 'मधुपत्व' असा आहे. ८. आत्मानंदानें, ब्रह्मानंदानें. ९. न मावें = मावूं नये. १०. स्मरणी=परमेश्वराचें स्मरण पुनः-पुनः करण्यासाठीं हातांत धरण्याची माळ; जपमाळ. ईश्वर, साधुसंत यांचीं नांवें, चरितें व वचनें यांचीच जपमाळ एकसारखी **पंतां**नीं घेतली होती असें या प्रकरणावरून वाटतें. ११. या वृत्ताच्या प्रत्येक चरणांत चार 'त' गण असून एकूण बारा अक्षरें असतात १२. इच्छा. १३. डोल येतो म्हणजे (विठ्ठल) डोलूं लागतो.

बापा तुकोबा ! अभंगीं तुझ्या भक्तिवैराग्य, अन्यत्र ऐसी नसे शक्ति;
केली समस्तीं जनीं त्वां दया फार, दावीं मलाही भवाम्भोधिचा पार. ४

बा ! एकनाथा ! दयाळूंत तूं थोर, दीना जनाचाचि भारी तुला घोर;[१]
त्वां अंत्यजाचें कडे घेतलें पोर; तारीं, जसे कोटि, तैसाचि हा मोर. ५

दत्ता ! तुजी कीर्ति गायीन मीं गोड; सत्ता[३] करीं[३] सत्य,[३] मत्ताप हा खोड;
मत्तारिषड्वर्ग[४] बा ! एकदा मोड, लत्ता हरी कालियाची कसी खोड ?[५] ६

श्रीपुंडरीका ! जगीं एक तूं धन्य, भक्तांत न त्वत्सम श्रेष्ठ बा ! अन्य;
केला उभा देव तारावया अज्ञ, या त्वत्प्रतापासि गाती महायज्ञ. ७

बा ! नारदा ! फार दास स्वयें मुक्त केले तुवां, मान्य देवा तुझें उक्त;
ते नावडावे मना भोग, जे भुक्त; तारीं दयाब्धे ! मला, हें तुला युक्त.
बा ! मारुते ! प्रेम रामीं तुझें फार, सीतेसि शोकाब्धिचा दाविला पार.
माहात्म्य, रामायणीं वर्णिलें सार, ऐकोनियां प्रार्थितों, 'दीन हा तार.'
श्रीरामनामा ! तुझा अद्भुत व्याप; आम्हां अनाथांसि तूं माय, तूं बाप.
कर्णींहि येवूनि संहारिसी पाप, बाधों न देसी कधीं लेशही ताप. १०

श्रीसाधु हो ! द्या यशोवर्णनीं धीर, हा बोलवावा दयेनें जसा कीर.[६]
याला म्हणा आत्मदासांत 'ये, सीर;' पावो पर क्षिप्र मोहाब्धिचें तीर.
बा ! सद्गुरो ! इष्टदात्यांत तूं शूर, राहों न देता[७] तमातें,[८] जसा सूर;[९]
गातां भवभ्रांतितें घालिसी दूर, वाहो मयूरावरि त्वद्दयापूर. १२

---

१. काळजी, चिंता, वेध. २. मोरोपंत. ३. सत्ता करीं सत्य = आपलें सामर्थ्य खरें करून दाखव. ४. उन्मत्त अशा कामक्रोधादि सहा शत्रूंचा समुदाय. ५. रग, रेंच, आग. ६. राघु, पोपट. ७. देणारा. ८. काळोखाला. ९. सूर्य.

## उपसंहार

( गीतिवृत्त )

श्रीरामाचे करिती जैसे अहितांसि भल्ल[1] भस्म रणीं,
श्लोक तसे तेरा[2], हे धरुत रसिक विष्णुवल्लभ स्मरणी. १३

---

## ( ११ ) प्रांत-प्रार्थना[3]

( गीतिवृत्त )

दुग्धादिस्वरसें[4] बहु पोषण केलें सदैव, गाई ! हो !
गोमयदानें[5] अंतीं मज दीना उद्धराचि आई ! [6]हो ! १
विश्वंभरे ![7] क्षमे ![8] तूं देउनि शयनार्थ दर्भ, कामातें
या पुरवुनियां, अंतीं देवि ! करीं धन्य अर्भका मातें. २

---

१. बाण. २. उपसंहार धरून तेरा श्लोक. ३. इहलोकाच्या शेवटच्या सीमेवरून मरणकाळीं केलेली ही विनवणी आहे. आपला अंतकाळ समीप आला आहे असें जाणून **पंतांनीं** आपल्या आप्तेष्टादि सर्वांस अखेरच्या कर्तव्यकर्माबद्दल जाणीव करून दिली आणि निरवानिरव केली, ती या प्रकरणांत अत्यंत हृदयद्रावक रीतीनें प्रकट झाली आहे. गोमाता, भूमाता, तुळसी, गंगा, गीता, रामनाम, हरिहरनाम, भक्तजन यांना त्यांनीं अत्यंत करुणरवानें विनविलें आहे आणि त्यांनीं जन्मभर केलेल्या उपकारांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण केलें आहे. हेंच **पंतांचें** अखेरचें काव्य. एवढें करून **पंत** श्रीरामस्वरूपीं विलीन झाले. या प्रकरणाच्या दोन प्रति उपलब्ध आहेत. पैकीं एक प्रत खुद्द **पंतांच्या** हातची कांपऱ्या कांपऱ्या अक्षरांनीं लिहिलेली असून दुसरी प्रत कोणींतरी सुबोध व सुंदर अक्षरांनीं लिहिलेली आहे. ४. दूध, दहीं, ताक, लोणी, तूप हे आपले रस देऊन. ५. शेण देऊन. ६. ' आई ! ' हा शब्द गाईला उद्देशून लावल्यानें प्रेमळपणाच व्यक्त झाला आहे. ७. विश्वाचें पोषण करणाऱ्या ! (हे पृथ्वि !). ८. क्षमाशीले ! ( हे पृथ्वि ! ).

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक 22672 दि: ...

माते ! तुळसि ! असो तव दळ[१] वदनीं; मूळमृत्तिका[२] भाळीं;[३]
प्राणावसानसमयीं,[४] इतुकीच दया करूनि, सांभाळीं. ३
जो शुचि, सुगुण, अदेय, प्रभु मन घालुनि सुखांत तो याची;
गंगे ! न[५] मगें[५] अणिका, कणिकाचि पडो मुखांत तोयाची. ४
सर्वहि उपाय दुष्कर, करिती ज्यांतें जपोनि योगी ते.
अंतीं सुश्लोक तुझा थोडासा तरि मुखासि यो[६] गीते ! ५
अंतीं हें आस्य[७] वसिव, जेंवि दशरथास्य रामनामा ! तें.
त्वत्कामनाचि वाढो; न स्पर्शो अन्य कामना मातें. ६
श्रीनारायणनामा ! भवदाश्रित जन सुखें अजा[९] मिळतो;
बा ! घ्यावें तुज अंतीं, म्यां, जैसा घे मुखें अजामिळ[१०] तो. ७
श्रीशिवनामा ! बा ! त्वां रसनेला लाविलीच चट सारें.[११]
परि अंतीं जप,[१२] केलें कारुण्य वृथा बुडेल चटसारें.[१३] ८
श्रीहरिहरनामें हो ! सर्व तुम्ही एक, गुह्य हें संतीं
कथिलें; यास्तव भलतें[१४] माज्या या आननीं वसो अंतीं. ९
कंठीं जडोनि वसतें, मरणीं प्रियबाळ पळतसे दूर;
न तसें नामा ! व्यसनीं प्रह्लादमुखीं तसेंचि तूं शूर. १०

---

१. पान. २. (तुळशीच्या) मूळांतील माती. ३. कपाळावर. ४. प्राण जाण्याच्या वेळीं. ५. न मगें = (मी) मागत नाहीं. ६. येवो. ७. मुख. ८. तुझा आश्रित (नामभक्त). ९. ज्याला जन्म (व मरण) नाहीं अशाला; परमेश्वराला. १०. शूद्र स्त्रीशीं रत झालेला एक कान्यकुब्ज (कनोज देशांतील) ब्राह्मण. मरणसमयीं पुत्राच्या मिषानें 'नारायण' हें ईश्वराचें नांव त्याच्या मुखीं आलें; त्यावरून विष्णुदूतांनीं त्याचा उद्धार केला, अशी कथा आहे. ११. गोडीनें. १२. लक्ष ठेव; संभाळून घे. १३. सगळें; अवघें. १४. (मला) पाहिजे तसें.

भगवज्जन हो ! वंदुनि पदर पसरितों, असोंचि द्या स्मरण;
तरण[1] तसें मज पाजा, श्रीहरिहरनाम, पातल्या मरण. ११

हरिहर जपति व्यसनीं; जपत्यांतें[2] संकटांत अगतींतें[2]
तत्तुल्यें तन्नामें व्रत चालवितील कां न मग तीं तें? १२

मोहाया न करावा प्रांजलि[3] जो मीं मयूर या मज र[4]
आप्तमुदिर[5] हो ! सुखवा हरिनामांचा करूनियां गजर.[6] १३

त्रैलोक्यपावनत्वें भगवज्जनमंडळीच गंगा हो ![7]
यास्तव, अंतीं माज्या प्राप्त इचें संनिधान अंगा हो.[8] १४

तुमची दृष्टि सुधेची वृष्टि करी, पाप–पादरज नाहीं.
जेंवि तुम्हीं, दीनांचा नच केला तेंवि आदर जनाहीं. १५

सुखवाया आपुलिया दीनावनसादरा[9] मना, मातें
द्या हा वर, ' घालावा म्यां अंतीं साद[10] रामनामातें. ' १६

केलें तुम्हांसि तुमच्या नामसख्यालाहि जें विनिवणें हो !
न गडबडाया, या भवद्भयवच[11], घटासि जेंवि निवणें,[12] हो. १७

---

१. कांजी; दुखणेकऱ्यास देतात ती पेज. २. अगतींतें जपत्यांतें = अगतिक होऊन ध्यान करणाऱ्यांना. ३. बद्धांजलि. हात जोडून विनवणी करणारा. ४. रडणें; शोक. ५. आप्तजनरूपी मेघांनो ! ६. घोष; गर्जना; मोठा आवाज. ७. अहो ! ८. होवो. ९. दीनांचें रक्षण करण्याविषयीं सद्भाव असणाऱ्या (मनाला). १०. हाक मारण्याचा आवाज; आरोळी. ११. तुमचें अभयवचन. १२. घट सुस्थिर राहण्यासाठीं त्याखालीं ठेवावयाचें गवताचें (दोराचें, सुंभाचें, सोपटाचें इ. चें) वेटोळें.

## उपसंहार

( गीतिवृत्त )

तारितिलचि मज[1] अंतीं प्रार्थित गोप्रमुख[2] सर्व; या सतरा
आर्याहि जना म्हणतिल ' जन्माच्या मृत्युच्या भयास तरा.' १८

---

१. मला ( मोरोपंताला ). २. गाय, पृथ्वी, तुलसी, गंगा, गीता, ( राम, नारायण, शिव, हरिहर इ. ) भगवन्नामें, भगवज्जन आदिवरून.

# ७. अभंग व पदें [1]

## (१) अभंग

### अभंग १ ला

तूं मळों नेंदिसि महानदीनातें[2] ।
'लहान' दीनातें । न म्हणसी ॥ १ ॥
तुझ्या पुण्यजळीं जो करी मज्जन[3] ।
तयातें 'मज्जन'[4] । म्हणे विष्णु ॥ २ ॥
दया कादंबिनी[5] सर्वदा समोर ।
सर्व-दास-मोर । नाचविसी ॥ ३ ॥

### अभंग २ रा

'शिव' म्हणे जो तो पतितपावना ! ।
अतितपा वना । न जातांहि ॥ १ ॥
'तुं कासी तुं भुक्ति[6] देसी अंतीं मुक्ति' ।
साधुची हे उक्ति । विश्वेश्वरा ! ॥ २ ॥

---

१. **पंतांचे** संग्रहांत या प्रकरणाची जी मूळप्रत सापडली ती जाड व ठसठशीत अक्षरांत दुसऱ्या कोणींतरी लिहिलेली अशी आहे. सदरहु लेखकाला संस्कृत व्युत्पत्तिशास्त्राचे, शुद्धलेखनाचे व गायनांतील तालसुरांचे नियम फारसे माहित नसावेत, असें वाटतें. त्यामुळें त्यानें कोठें कोठें जे प्रमाद केले आहेत, ते तसेच छापणें आम्हांस भाग पडलें. त्यांचा निर्देश त्या त्या ठिकाणीं आम्हीं केला आहे. २. महानदीचें नातें. ३. स्नान, आंघोळ. ४. माझा जन; आपला आप्त. ५. कृपेची मेघमाला. ६. येथें "तुं कासी तुं भुक्ति" हे शब्द "तुंकासी (तुकोबाला) तुं भुक्ति" असे जोडून लिहून **पंतांनीं** शब्दार्थ-चमत्कृति दाखविली आहे.

विश्वाचा[1] पाळका ! चित्ताचा[1] चाळका ! ।
उद्धरीं बाळका । या मयूरा ॥ ३ ॥

## अभंग ३ रा

प्रसन्न तूं देवा ! काळभैरवा ! हो ! ।
काळ वैर वाहो । नसे भय ॥ १ ॥
कळिकाळावरी तुझी आहे सत्ता ।
दंडिसी तूं मत्ता । सुरेशाही[2] ॥ २ ॥
शरणागत हा मयूर हें जाण ।
करीं परित्राण । कृपासिंधो ! ॥ ३ ॥

## अभंग ४ था

मुक्तिपुरी श्रेष्ठ, पाव देवि ! काशि ! ।
भाव दे विकासि । निजवासी ॥ १ ॥
शरण्ये ! उपेक्षा न करीं दीनाची ।
नदीनें मीनाची[3] । न करावी ॥ २ ॥
शरणागत हा मयूर ब्राह्मण ।
दयेनें या म्हण । 'स्वस्थ राहें' ॥ ३ ॥

## अभंग ५ वा

राहोनियां संतापासीं । संतापासीं[4] भांडती ॥ १ ॥
पावे तोष तोक[5] थानीं । तो कथानीं पावती ॥ २ ॥
रामतोयदासमोर[6] । दास-मोर नाचती ॥ ३ ॥

---

१. शुद्धरूपें – विश्वाच्या, चित्ताच्या. २. इंद्राला सुद्धां. ३ माशाची. ४. संतापाबरोबर. ५. लहान मूल. ६. राम हाच मेघ त्याच्यासमोर.

## (२) पदें

### पद १ लें

जो मुनींस दे सुखधणी[१] । धणी तो माझा रघुवर धणी ॥ ध्रु० ॥
मथुनि ताटिका, कौशिक-मुनि-मख[२] रक्षुनि लेंकुरपणीं ।
भर्ग-चाप भंगूनि जानकी प्रणिली[३] लेंकुर[४]-पणीं[४] ॥ १ ॥
जनकाज्ञेहुनि राज्यरमाही मानुनियां ठेंगणी ।
सपत्नीक सानुज विपिनातें नृपधानीसें[५] गणी ॥ २ ॥
खरप्रमुख नक्तंचर[६] खरतरशरें वधुनियां रणीं ।
शिवा-गृध्र-बलिभुगादिकांचीं[७] घडवी जो पारणीं ॥ ३ ॥
युवतिचोर दशवदन थोर जो प्रबळ सकळ-खळ-मणी ।
मथुनि पुत्रमित्रांसह जेणें सोडविली स्वरमणी ॥ ४ ॥
ज्याची पदयुगली जन शोक-द्रुम[८] आमूलहि खणी ।
मयूराशि घन, चकोराशि विधु, अशि सुखदा देखणी[९] ॥ ५ ॥

### पद २ रें

रामा ! पाव रे !
काय अंतर जाहलें तवपादपंकज-सेवनीं ? ॥
कां त्यजिलें वनीं ? अघ न ममावनीं ॥ ध्रु० ॥

---

१. सुखाची विपुलता. २. विश्वामित्र ऋषीचा यज्ञ. ३. शुद्धरूप—परिणिली ( परि + नी = लग्न करणें ) वरिली; विवाहविधीनें स्वीकारली. ४. लेंकुर ( = दुस्तर - **पंत** ) + पणीं = दुस्तर प्रतिज्ञांनीं. ५. राजधानीसारखें. ६. नक्तंचर = राक्षस. ७. कोल्हीं, गिधाडें, कावळे इत्यादिकांचीं. ( बलिभुज्—क्—ग् = कावळा ). ८. लोकांचा शोकरूपी वृक्ष. ९ सुंदर. ( या लहानशा पदांत संबंध रामायण मनोहर रीतीनें गुंफिलें आहे. **पंतां**चें हें 'एकपदी रामायण' म्हणण्यास हरकत नाहीं ).

पाहतां तुज पक्ष्म-पात[१] गमे मनीं पविपात-सा[२] ।
जीवनघात-सा । विधिरिपुता[३] तसा[३] ॥ १ ॥
स्वांगनावन काय दुर्घट ? लोकरक्षण-दीक्षिता ! ।
तूं खळ-शिक्षिता । सकळ-परीक्षिता ॥ २ ॥
भक्त-कल्पतरो ! तुझी युवती न वृत्तिस पावली ।
तरि ब्रिरुदावली[४] । व्यर्थ वहावली ॥ ३ ॥
तापलें विरहाग्निनें बहु या श्रमासि नसे तुला[५] ।
उचित न हें तुला । सत्सुखहेतुला[६] ॥ ४ ॥
प्राणनाथ ! विभो ! स्वयें वधितासि तूं मजला जरी ।
ते गति साजरी । हे न दशा बरी ॥ ५ ॥

## पद ३ रें

हें काय नृपा ? ॥ ध्रु० ॥
मज कलुष नसतां रजक-बोलें त्यजिलि भजक-वरदा ! सर्व-कृपा ! ॥१॥
जन-कर्सि[७] उतरतां कनक निंदिल कोण ? मन कसेंहि न धरि त्रपा ?[८]
चरण न होतां तुझे शरण, पावेन वनिं मरण सकळ-भुवनपा ! ॥३॥
प्राणपते ! न करुनि त्राण, मोडिली पुराणगुण-कीर्ति-रस-प्रपा ॥४॥

## पद ४ थें

नंदनंदन ! नंदपाऽऽनंदकंद[१०] ! सुखकंद !
कंदर्पदर्पोपहास्या[११] ! ॥ ध्रु० ॥

---

१. डोळ्यांच्या पापण्या मिटणें=झांकणें. २. वज्राघातासारखा. ३ ब्रह्मदेवाबरोबरचें शत्रुत्व, त्याप्रमाणें. ४. ब्रीदाची माला. ५. तुलना. ६. चांगल्या सुखाला कारण होणारा असा जो तूं त्या तुला. ७. लोकांच्या परीक्षेमध्यें. ८. लज्जा. ९. प्रपा=पाणपोई. १०. नंद ज्यांचा पालक आहे अशांच्या आनंदकंदा ! ११. मदनाच्या गर्वाला तुच्छ लेखणाऱ्या !

दीन-मतिहीन-पदलीन-जन-मीन-जल[1] ! पीनभुज[2] !
वीनरथ[3] ! सर्वभूपा ! ॥
दुग्धघटभुग्धरणिधृग्धरणदग्ध ! सुविदग्ध !
मलदिग्धवपु ! मुग्धरूपा[4] ! ॥ १ ॥
अभ्रनिभ ! वि-भ्रमण ! शुभ्रगुण-विभ्रम ! नदभ्रकरुण !
भ्रमविनाशदक्षा[5] ! ॥
कामजनकामलसुधामय ! भवामयहरामरप !
रामसुत–कल्पवृक्षा[6] ! ॥ २ ॥

---

१. दीन, मतिहीन, पदलीन जनरूपी मत्स्यांना जलाप्रमाणें जीवनाधार असणाऱ्या ! २. पुष्ट बाहु धारण करणाऱ्या ! ३. गरुड (वि=पक्षी+इन=श्रेष्ठ) हेंच ज्याचें वाहन अशा ! ४. या चरणाचा पदच्छेद व अर्थ असा:-दुग्धघटभुग् ! + धरणिधृग्धरणदग्ध ! +सुविदग्ध ! +मलदिग्धवपु ! +मुग्धरूपा ! =दुधाचे हंडे पिणाऱ्या ! (गोवर्धन) पर्वत धारण केल्यानें शिणलेल्या ! अत्यंत शुद्ध अशा ! ( गोकुळांत बालपणीं) मातीनें माखलेलें शरीर धारण करणाऱ्या ! सुंदररूप धारण करणाऱ्या ! (अशा नंदनंदना ! ) ५. या चरणाचा पदच्छेद व अर्थ असा:– अभ्रनिभ ! +वि-भ्रमण ! + शुभ्रगुणविभ्रम ! + न-दभ्र–करुण ! + भ्रमविनाशदक्षा ! = मेघाप्रमाणें श्यामल अशा ! पक्ष्यावरून (गरुडावरून) भ्रमण करणाऱ्या ! उज्ज्वल गुणांनीं विलसणाऱ्या ! अतिशयदयाशील अशा ! भ्रांतीचा नाश करण्यांत दक्ष असणाऱ्या ! ( अशा नंदनंदना ! ). ६. या चरणाचा पदच्छेद व अर्थ असा:-कामजनक !+अमलसुधामय ! +भवामयहर ! + अमरप ! + रामसुतकल्पवृक्षा ! = प्रद्युम्नाच्या ( मदनाच्या ) पित्या ! शुद्ध अमृतमय अशा ! संसाररूपी रोग हरण करणाऱ्या ! देवांचा अधिपति अशा ! रामसुताच्या ( मोरोपंताच्या ) कल्पवृक्षा ! (अशा नंदनंदना ! )

## पद ५ वें

हें काय वृषा ! ? ॥ ध्रु० ॥
सत्यवचन सरस त्यजुनि वदनें नित्य वदसि किति मृषा ! ॥ १ ॥
रोषकलुषित सदोष मनि धरिसि योषिदधररसतृषा[१] ॥ २ ॥
रामसुत–विभुची नामसुधा नको, सकाम पिसि विषयविषा[२] ॥ ३ ॥

## पद ६ वें

केलें पावन सदया ! रामा ! रे ! रामा ! रे ! सुखधामा ! रे ! ॥ध्रु०॥
पातक-पर्वत पवि-पदपद्मा[३] ! उद्धरिलें घनश्यामा ! रे ! ॥ १ ॥
स्वांतीं संतत चिंतित होतें पूरविलें मनःकामा रे ! ॥ २ ॥
मद्देहोपलसंस्पर्शारुण[४] जाला पद गुणग्रामा ! रे ! ॥ ३ ॥
अशनीं पानीं शयनीं गमनीं स्वमनीं गाइन नामा रे ! ॥४॥
प्राणविसांवा तूं करुणाब्धे ! बोले गौतमवामा[५] रे ! ॥ ५ ॥

## पद ७ वें

हे माधवाची लीला । नाशिते कलीला ॥ ध्रु० ॥
गोपी–गवळी लाधले पाद-युगळीला ॥ १ ॥
मारी हृत्स्थळीं लाविता पूतना सळीला[६] ॥ २ ॥
अघाच्या[७] गळीं लागुनी क्षणीं निर्दाळीला ॥ ३ ॥
धरि मुरलीला, धेनु चारि हरेळीला[८] ॥ ४ ॥

---

१. तरुणीच्या अधरामृतप्राशनाची तहान. २. विषयरूपी विषाला. ३. पातकरूपी पर्वताला वज्राप्रमाणें असें पदकमल धारण करणाऱ्या ! ४. माझ्या देहरूपी शिळेला स्पर्शानें अरुण करणारा ( ज्याचा पद = पाय झाला अशा हे गुणनिधे ! ). ५. अहल्या. ( शिलारूपी अहल्येचा रामपदस्पर्शानें उद्धार झाल्यावर तिनें केलेली ही रामस्तुति आहे ). ६. स + लीला = लीलेनें, सहज. ७. अघ नांवाच्या राक्षसाच्या. ८. हिरवळीला, हिरवें गवत उगवलेल्या शेतांत.

मुखीं कवळीला, बक उभाचि फाळीला[1] ॥ ५ ॥
मर्दूनी बळीला, दुष्ट काळीय वाळीला[2] ॥ ६ ॥
अद्री उन्मूळीला, व्रजसप्ताह पाळीला ॥ ७ ॥
दावाग्नी गिळीला, ब्रह्मा जोडी अंजळीला ॥ ८ ॥
लाऊनि कळीला, काळयवन जाळीला ॥ ९ ॥
धरूनी मौळीला[3], कंस क्षितीं आफळीला ॥ १० ॥
वस्त्रें पांचाळीला, दिलीं दुःखें नीचाळीला[4] ॥ ११ ॥
पार्थ सांभाळीला, अश्वदेहही चोळीला ॥ १२ ॥
यमाच्या आळीला, नेलें पापमंडळीला ॥ १३ ॥
पादकमळीं लाविलें, रामसुताळीला[5] ॥ १४ ॥

### पद ८ वें

हें गोपाळाला रुचे ॥ ध्रु० ॥
यज्ञस्त्रीचरुचे[6] ग्रास भक्षावे चारुचे[7] ॥ १ ॥
कीजे[8] स्वस्तरुचे[9] परी[9] काम वंदारुचे[10] ॥ २ ॥
श्रीकुचा गुरुचे धर पार्थाच्या वारुचे[11] ॥ ३ ॥

---

१. चिरून-फाडून टाकला. २. घालवून लावला. ३. मस्तकाला. ४. नीचांच्या पंक्तीला. ५. रामसुत मयूरादिकांना. ६. चरुचे = शिजविलेल्या भाताचे. ७. चारु = सुंदर. ८ ( पूर्ण ) केले जावे. ९. स्वस्तरुचे परी = ( स्वर्गांतील ) कल्पवृक्षाप्रमाणें. १०. वंदनशीलाचे. ११. अन्वयार्थः– श्रीकुचा ( लक्ष्मीच्या स्तनाला - स्तनाहून ) गुरुचे ( गुरु = श्रेष्ठ असलेल्याचे ) पार्थाच्या वारुचे ( अर्जुनाच्या घोड्याचे, लगाम ) धर ( धरणें, हें गोपाळाला रुचे ). लक्ष्मीच्या स्तनस्पर्शाहून अर्जुनाच्या घोडयांचा स्पर्श ( विष्णूला = ) श्रीकृष्णाला जास्ती सुखप्रद वाटत होता. पहाः– 'सुखद स्पर्श श्रीच्या, बहुधा न हयांसम, स्तनाचा या । हें यश गावुनि, शिवसा, लागेल सुधी समस्त नाचाया ॥ ( आर्याभारत, द्रोणपर्व १० : ४६ ).

आणावे गुरुचे गृहीं भारेही दारुचे[१] ॥ ४ ॥
मयूरेश्वराचे ताप हरावे भीरुचे ॥ ५ ॥

## पद ९ वें

त्या मुरलीच्या गानें ॥ ध्रु० ॥
विद्ध मन्मथानें, होतां जाती अपथानें[२] ॥ १ ॥
बाळें पीतां थानें, गोपी लोटिती हाथानें ॥ २ ॥
नाहीं केलीं पानें, वासुरांच्या कळपानें ॥ ३ ॥
गाई रोमंथा[३] नेणती गातां विरथानें[४] ॥ ४ ॥
जलद-प्रभानें[५] गेलीं मयूराचीं[६] भानें ॥ ५ ॥

## पद १० वें

गोपाळ बाळ पुरविल काम मनींचा ॥ ध्रु० ॥
पीताभवस्त्र,[७] वह्नी[८] पीता,[८] गोपाळ-गो-गोपी-तारकांघ्रि,[९] वनींचा[८] १

१. लांकडांचे. २. अमार्गानें; भलत्याच वाटेनें. ३. रवंथाला. ४. विरक्तानें. ऐहिक बंधनांपासून मुक्त जो श्रीकृष्ण त्यानें. ५. (प्रभान = तेज). (१) जलदप्रभान + एं = मेघाच्या तेजानें; (२) जलदप्रभ जो त्यानें = मेघाप्रमाणें तेजस्वी अशा श्रीकृष्णानें. ६. (१) मोराचीं; (२) मोरोपंताचीं. ७. पिवळें तेजस्वी वस्त्र धारण करणारा; पीतांबरधारी. ८. वनींचा वह्नी पीता = वनांतील वह्नि पिणारा. व्रजवासी लोकांच्या रक्षणार्थ श्रीकृष्णानें अरण्यांतील दवाग्नि एकदां गिळिला होता, अशी कथा आहे. ९. तारकांघ्रि = मुक्ति देणारे ज्याचे पाय असा, श्रीकृष्ण.

आजानुबाहु[1] व्रजीं, आजाच्या[2] विश्वाऽऽदर्श[2],आजा[3] नारदमुनीचा.[3]
राधापती, मुनिवराधार, मुक्ति देणारा, धाम[4] उमाजानीचा[4] ॥३॥
क्षीराचा तस्कर, पक्षीराज-वाहन, साक्षी रामतनु-जनीचा[5] ॥ ४ ॥

## पद ११ वें

याला तुं आवरावें ॥ ध्रु० ॥
लोणी चोरुनि खातो कोणी नसतां गृहीं,
न मिळतां, मुलांसचि कुटी ॥ १ ॥
सोडी निद्रित-वस्त्रें, फोडी गोरसपात्रें,
कीर्ति मोटी, मूर्तिच धाकुटी ॥ २ ॥
आळींत असी अरवाळी[6] करूनि रागें
आपणचि चढवि भ्रुकुटी ॥ ३ ॥
गाई राखेना कां ? अगाई ! जाउनि वनिं
मयूरशिखंडकमुकुटी[7] ॥ ४ ॥

## पद १२ वें

परब्रह्म[8] खाजवीतें वाजी ॥ ध्रु० ॥
उच्छिष्टें काढी, सांभाळी लुगडीं, भक्षी इलुसिच भाजी ॥ १ ॥

---

१. उभा राहिला असतां गुडघ्यास सहज पुरण्याजोगा लांब हाताचा ( मनुष्य ). २. आजाच्या विश्वा आदर्श = वसुदेव व नंद हे कश्यपमुनीचे अंशावतार होत. म्हणून कश्यप हा श्रीकृष्णाचा आजा होय. त्याचें जें विश्व ( सृष्टि ) त्यामध्यें आदर्श असा. ३. नारदमुनीचा आजा = नारदाचा बाप ब्रह्मदेव; त्याचा बाप विष्णु. म्हणून विष्णु ( = श्रीकृष्ण ) हा नारदमुनीचा आजा होय. ४. उमाजानीचा (शंकराचा ) धाम = विश्रांतिस्थान असा श्रीराम = श्रीकृष्ण. ( 'धाम' शब्द संस्कृतांत नपुंसकलिंगी असूनहि येथें यमकानुप्रासासाठीं पुल्लिंगी वापरला आहे ). ५. रामसुत मयूराचा. ६. खोडी. ७. मोराचीं पिसें ज्याच्या मुकुटांत आहेत असा. ८. परमात्मा श्रीकृष्ण.

म्हणेना ऐसें कीं श्रुतिमुनिवरमान्या पदवी माजी ॥ २ ॥
मोर घना कीं सेवक राजा; म्हणतें[१] भजकाला 'जी!' ॥ ३ ॥

## पद १३ वें

अगइ! असुख रचीतो। असु खरचीतो[२] नंद ॥ ध्रु० ॥
कोण्ही प्रत्याख्यान[३] न करिती। बल्लव केवळ मंद ॥ १ ॥
क्रूरचि मेला! काढुनि नेतो। व्रजसुख-वल्ली-कंद ॥ २ ॥
आम्हां कृष्ण, मयूरां घन कीं। जेंवि पिकां[४] माकंद[५] ॥ ३ ॥

## पद १४ वें

उभउनि शम[६] लहरींतें। शमल[७] हरीतें नाम ॥ ध्रु० ॥
अमृत गमे पहिला महिलांचा[८]। तोचि महाविषदाम[९] ॥ १ ॥
तीर्थ सुतीर्थचि, लोचन-जलकण। मुखलाला[१०], लव घाम ॥२॥
अभ्र मयूरा नाचवि तैसें। जपत्या[११] नुरवुनि काम ॥ ३ ॥

## पद १५ वें

धन्य धन्य धन्य तुकावाणी ॥ ध्रु० ॥
अमृतरसाची क्षितिवरि साची। सिंधुचि ज्याची वाणी ॥ १ ॥
डोलवितोचि जडा अजडाही। प्रभुच्या वेणूवाणी ॥ २ ॥
मोरां घनीं, श्रोत्यां ज्याचे। अभंगिं नाहीं वाणी[१२] ॥ ३ ॥

---

१. याचा कर्ता 'परब्रह्म'. २. खर्च करतो. ३. प्रत्यवाय, अडथळा, विरोध. ४. कोकिळांना. ५. आम्रवृक्ष. ६. शांत. ७. पाप. ८. ('महिलांचा' याचेपुढें 'सहवास' असा शब्द अध्याहृत घ्यावा). ९. महाविषाचें दावें, सांखळी. १०. तोंडांतली लाळ. ११. जपणाऱ्याला. (हरीचें नाम काम नुरवुनि नाचवि). १२. कमतरता.

## पद १६ वें

अहो! अहो! प्रभुजी! पळभरि रहा! ।
उद्धरिले बहु, एकचि उरलों दीन, मजकडे पहा! ॥ ध्रु० ॥
तडतड तोडिति, करिति विकळ खळ कामादिक वृक सहा ।
गृहगहनीं भ्रमलों तापत्रय-वणवा दुःसह महा ॥ १ ॥
पंकपतितधेनूद्धरणाला संमति देतिल दहा ।
शरणागतविकलोद्‌धृतिकृति वर म्हणती महिमावहा[१] ॥ २ ॥
अजि! करुणाघन! साहेल कसा भक्त मयूर विरहा? ।
सर्व-पतित-पावन हें अपुलें बिरुदहि त्यजितां? अहा! ॥ ३ ॥

## पद १७ वें

गावा हो! राम गावा हो! ॥ ध्रु० ॥
लावा भजनींच चित्त, लावा[२] श्येनासि[३] तसा
न्हावा काळा न जीव बावा! हो! ॥ १ ॥
यावा सद्बोध मनीं, यावांचुनि पहा सूक्ति–
नांवाच्या पुढें काय नावा हो!? ॥ २ ॥
हा वारिद शमवी भवदावाश्रित-मयूरास
भावाच्या बळें असे ठावा हो! ॥ ३ ॥

## पद १८ वें

सदया मुकुंदा आराधा ॥ ध्रु० ॥
नाठवि, नमितां पद, अपपूर्वा[४] ।

---

१. मोठेपणा उत्पन्न करणारी (कृति). २. एक प्रकारचा पक्षी. ३. ससाणा पक्ष्याला. ४. पूर्वींच्या दुष्कृत्यांना.

अस्मरण प्रणामाया राधा[1] ॥ १ ॥
प्रेमें केली गोपीही कीं ।
पात्र सुखा ज्या श्री त्या राधा ॥ २ ॥
भक्तमयूरप्रियघन म्हणतो ।
'रे ! जन ! हो ! यशा प्या सारा धा' ॥ ३ ॥

## पद १९ वें

वर असा विभो ! दे कीं 'वत्सा ! गा मल्लीला' ॥ ध्रु० ॥
पदवी श्रीची गोपिकांला ।
वैकुंठाची दिधली बल्लव-पल्लीला[2] ॥ १ ॥
तुझ्या कीर्ति-मात्रेपुढें ।
न पुसे कोण्ही धन्वंतरिनें खल्लीला[3] ॥ २ ॥
भक्तमयूरघना ! जावा न ।
सुरद्रुमयाचक नीचांच्या गल्लीला ॥ ३ ॥

## पद २० वें

गुण ज्यांत राघवाचे ते बोल बोल ॥ ध्रु० ॥
सर्व प्रेमळ हृदयांत जेणें भरे बळ,
नयन-युग न सोडी ओल ॥ १ ॥
भक्त-मयूरचि या घना ध्याती,
खरे खळ-नाग[4] होति ज्यापुढें फोल ॥ २ ॥

---

१. हा चरण मूळांत असाच लिहिलेला आहे. त्यामुळें अर्थ लागत नाहीं. २. गवळयांच्या गांवाला, गोकुळाला ३. खलली आहे तिला; खलून ठेवलेल्या ( मात्रेला ). ४. खळरूपी सर्प ( मयूर हा सर्पभक्षक आहे ).

## पद २१ वें

नेति सारीं भोंदुनियां कर्माचि जोड ॥ ध्रु० ॥
संत राघव-गुण-मय पाशें ।
आळपिति कंठ, वदति बहु गोड ॥ १ ॥
राम हा मंत्र फुंकिति कानीं ।
लागली हे यांस बहुत काळ खोड ॥ २ ॥

## पद २२ वें

ईश्वरि! हे ! परमेश्वरि! संसृति-सागर-सेतु तुझीं चरितें ॥ध्रु०॥
ब्रह्मवधोद्यतमधुकैटभ-वध-यश दिधलें हरितें ।
आइुनि जें स्तवितांचि सुदुस्तर साध्वस[1] संहरितें ॥ १ ॥
दैत्य-लुलाय तुला यवस[2] ज्वलनासि तसा अरि तें ।
होउनि साह्य यशोलव देइल, देइल न प्रभुचें अरि[3] तें ॥२॥
कुंभचि शुंभ, करील दृगंचल[4] सिंधुचतुष्क[5] रितें ॥
भक्त-मयूर-सुधा प्रगटे, तव विश्व तुझा[6] करितें ॥ ३ ॥

## पद २३ वें

हरिसीं न कोण्ही तोलावा ॥ ध्रु० ॥
प्रभु हरि कीं प्रभु साधु गरुड-सा ।
अन्य फुगे महत्त्वें तो लावा[7] ॥ १ ॥

---

१. भय. २. गवत. ३. (सुदर्शन) चक्र. ४. दृक् (दृग्) + अंचल = दृष्टीचें टोंक. ५. चारी दिशांचे समुद्र. ६. याचेपुढें 'स्तव' हा शब्द अध्याहृत घ्यावा. ७. एक पक्षी.

याच्या तैसा परचरितांहीं ।
सत्कविंचा न मूर्धा डोलावा ॥ २ ॥
अपराधें पितरांच्या न टिके ।
जो करुणामृताचा वोलावा ॥ ३ ॥
जेंवि मयूर-प्रिय मेघ, दुजा ।
श्यामहि न प्रवीणें बोलावा ॥ ४ ॥

## पद २४ वें

सदया ! प्रभो ! तूं हो पावें ॥ ध्रु० ॥
जन्मापासुनि चुकतचि आलों ।
कीं जड मीं , न सुज्ञें कोपावें ॥ १ ॥
मदधिकदीना प्रेम दिल्हें जें ।
तेंचि मला सुदीना वोपावें ॥ २ ॥
भक्तमयूर असें जन म्हणती ।
त्वद्यशें न रामा ! लोपावें ॥ ३ ॥

## पद २५ वें

सादर राम-नाम गा ! गा ! गा ! ॥
रामनाम श्रेयोधाम, सफळ करि काम। पुसी स्वयें घाम ॥ध्रु०॥
मनुनायक[1] हें अघ वारी । गति दायक सर्वेहि तारी ॥
हितराय, परां शिव-सायकसें, बहु 'हाय!' म्हणवि, करि घाय उरीं॥१॥

---

१. मंत्रांमध्यें श्रेष्ठ.

शिव यास जपे बहु भावें । कपि दास म्हणे, ‘ मज पावें ’ ॥
सुखरास–द, सप्त-द[1], वास-द[2], दुर्गुण-घास-दव[3], स्वजनास जपे॥२॥
फळ यागशताधिक देतें । ‘ नच भाग ’ म्हणे, ‘ भर घेतें ’ ॥
जरि आग[4] घडे, धरि राग न, दे परभाग, परम-अनुरागनिधि ॥ ३ ॥

## पद २६ वें

नाम निगमशतसार[5] ॥ ध्रु० ॥
तारित आलें, तारितसे हें । तारिलहि पुढें फार ॥ १ ॥
यातें धरिती कंठीं प्रेमें । कवि न मणींचा हार ॥ २ ॥
जेंवि मयूरा जलधर, तप्तां । जीवां करितें गार ॥ ३ ॥

## पद २७ वें

वेणु ऐका हो ! प्रिय सखि ! या हो ! वनीं वाजतो ।
झडकरि निघुनि निरखुं हृदयदयित
सकळ-पशुप-कुळ-राज तो ॥ ध्रु० ॥
सदन सुखपद न, मदन-कदन करि,
देह विरह–दवि भाजतो ॥
निववील जिववील वरिल करिल हित ।
सितरुचिनुत[6] यशें साजतो ॥ १ ॥

---

१. दान, पुण्य, विद्या, वक्तृत्व, काव्य, आर्जव, शौर्य हीं सप्त कीर्तिलक्षणें देणारें. २. प्रभुपद-सहवास देणारें. ३. दुर्गुणरूपी गवताला अग्नीप्रमाणें असणारें. ४. अपराध. ५. शेकडों वेदांचा अर्क. ६. चंद्रानें स्तविलेल्या (यशानें).

(मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत.

व्हावा मयूर-चातक हा जन,
हरि करुणाघन गाजतो ॥
अमळ कमळ अमळ[1] त्यजुनि, मधुप,
वरुनि कुटजसुम,[2] लाजतो ॥ २ ॥

## पद २८ वें

करुणाघना ! त्वां पाळावें ॥ ध्रु० ॥
लीलेनें कीं बहु उद्धरिले ।
या पतिता न दीना गाळावें ॥ १ ॥
आहेसि प्रभु, बंधु म्हणविसी ।
संकट हें नतांचें टाळावें ॥ २ ॥
पातक घातक बा ! न उरों दे ।
खांडव तसें हें जाळावें ॥ ३ ॥
भागवतांहीं नच या दीना ।
भक्तिरसानभिज्ञा पाळावें ॥ ४ ॥
भक्त मयूर असें म्हणतो कीं ।
'कां मळलें न बाळ क्षाळावें ?' ॥ ५ ॥

## पद २९ वें

मुरली ! प्रभावें तूं मोटी ॥ ध्रु० ॥
सर्वां नोहे, प्रभु वश केला ।
एकीनें स्वभावें, तूं मोटी ॥ १ ॥
भक्तमयूर-घन प्रभु झाला ।
वश भलत्या न भावें, तूं मोटी ॥ २ ॥

---

१. अंमळ, थोडावेळ. २. कुड्याचें ( नीरस ) फूल. ( हें भ्रमराला आवडत नाहीं. )

## पद ३० वें

पट्टु हो ! उदारा रामा गा ! ॥ ध्रु० ॥
चित्तीं वांछित जें कांहीं तें ।
कल्पतरु स्वयें हा, या मागा ॥ १ ॥
केवळ जड जो त्यासि म्हणे प्रभु ।
'तारिन मीं, सदा घे नामा, गा !' ॥ २ ॥
क्षण सोसीना स्वाश्रितदुःखा ।
श्रीहर तो जसा त्या कामा[1] गा ! ॥ ३ ॥
भक्तमयूर-प्रिय-घन शुद्धें ।
लाजवितो यशस्वः स्वामागा[2] ॥ ४ ॥

## पद ३१ वें

हृदया ! स्मर श्रीभर्गातें ॥ ध्रु० ॥
याच्या भजना सोडुनि इच्छिति ।
मंदचि न प्रबुद्ध स्वर्गातें ॥ १ ॥
करिल कृपा कीं प्रभु न करिल हें ।
बा ! नलगे पुसावें गर्गातें ॥ २ ॥
निश्चित देतो पुरुषार्थांच्या ।
दादुनि हा स्वदासा वर्गातें ॥ ३ ॥
भक्त-मयूर-प्रियकर करितो ।
हा त्रिजगल्लयावनसर्गातें[3] ॥ ४ ॥

---

१. मदनबाधेला. २. हा चरण मूळांत असाच लिहिला आहे; त्यामुळें अर्थ लागत नाहीं. ३. त्रिभुवनाचा क्षय, रक्षण व उत्पत्ति यांना.

## पद ३२ वें

दिधलें सुख श्रीरंगानें ॥ ध्रु० ॥
दिति-दनु-नंदन मंद, न सन्मत। तन्मत-वाक्-चमुच्या भंगानें ॥ १ ॥
भूतदयापर परम-प्रेमळ। सज्जन जे तयांच्या संगानें ॥ २ ॥
भक्तमयूरप्रिय करुणाघन। सच्चरित-व्रजानें स्वंगानें ॥ ३ ॥

## पद ३३ वें

प्रभु तो वहातो वेणूतें ॥ ध्रु० ॥
ब्रह्म-शिवादिहि वाहति माथां। यच्चरणांबुजांच्या रेणूतें ॥ १ ॥
स्मरतां प्राण-व्यसनीं धाउनि। उद्धरि जो कपूर्वा-रेणूतें[1] ॥ २ ॥
धातुमयूरछदगुंजा[2] धरि। भू भय जें म्हणे हे नेणू तें[3] ॥ ३ ॥

## पद ३४ वें

न पहावे बाई! या मज कुंजा ॥ ध्रु० ॥
निर्ववित होत्या दृष्टीतें त्या। झाल्या तापद गुंजा ॥ १ ॥
दाहकता गोवृंदा आली। जैसी पावक-पुंजा ॥ २ ॥
मुकुट मयूराच्या पिछांचा। मोहितसे जसा मुंजा ॥ ३ ॥

## पद ३५ वें

दाशरथे! ऐसेचि करीं पदपद्मीं पावन पापी ॥ ध्रु० ॥
वासराधिपति-कुलतिलका!, हरिनीलनवाभ्रश्यामा!।
आसरा जयश्रीकीर्तिप्रति, अकुतोभय तूं रामा! ॥

---

१. कपूर्वा रेणूतें = करेणूतें = (इंद्राच्या हत्तीला = गजेंद्राला, ऐरावताला.). २. सुवर्णादि धातु, मोरपिसें व गुंजा. ३. अन्वयार्थः— हे भू म्हणे, 'जें भय तें नेणू' (पृथ्वी निर्भय झाली हा भाव).

अमलातुल-सद्गुण-धामा !, शमलापह ! शोभननामा ! ।
न मला नमीं, शीलनिधे ! मीं पापी ॥ १ ॥
तोकाला माय, मयूरा जैसी नवनीरद-माळा ।
लोकाला कीर्ति तुझी हे तैसी सुखवू नरपाळा ! ॥
शमवीं भव-दाव-ज्वाळा, रमवीं स्वयशें सुरबाळा ।
भ्रमवीं खळ, एक जगीं हो चापी ॥ २ ॥

## पद ३६ वें

म्हणति कविराज, "परम-विष विषयचि,
मरे दशमुख न पंचमुख-लेख[1] ॥ ध्रु० ॥
ध्यावा भक्तमयूरदया-मेघ रामचि, न विषय ;
खोटा होय न, साच लेख मना ! विधिलेख " ॥ १ ॥

## पद ३७ वें

जाले वेडे पाहुनियां रामास मोर ॥ ध्रु० ॥
बोलति, डोलति, नाचति, आंगीं ।
भरे बळ या स्वरगा[2] रामासमोर ॥ १ ॥

## पद ३८ वें

न भुलें सुरसदना, कीं । सुरस-द[3] नाकीं हेंच ॥ ध्रु० ॥
नामरता अंधाहि न लागे । मार्गीं कांटा ठेंच ॥ १ ॥
अमृतें मुकले, स्वहिता चुकले । उकले नामें पेंच ॥ २ ॥
भव-भुजगाचा नाममयूर- । ध्यानें[4] उतरे रेंच ॥ ३ ॥

---

१. लेख = देव. २. स्वर्गांतील कल्पवृक्ष अशा. ३. सुरस + द = चांगला रस देणारें. ४. ईशनामरूपी मयूराच्या ध्यानानें. ( सर्प व मोर यांचें शत्रुत्व सुप्रसिद्धच आहे ).

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

## पद ३९ वें

सख्या ! रामहरे ! कृष्णहरे ! बोल बरें ॥ ध्रु० ॥
दुस्तरा भवार्णवासि सर्वपूर्वजांसमेत ।
या कलींतही सुखेंचि विघ्न लाजवूनि तरें ॥ १ ॥
भव्य धाम रामनाम काम पूर्ण तूर्ण करी ।
तारिले अनेक जीव कीं कथूनि हेंचि हरें ॥ २ ॥
नाम-मेघ-सक्त भक्त मोर यासि हर्ष थोर ।
होय हृदय अमळ अमळ, शमल[1] नुरे मान खरें ॥ ३ ॥

## पद ४० वें

धणी सकल-तरणि-कुलज-नृपति-मुकुटमणी ॥ ध्रु० ॥
परम-सदय-हृदय-वरद दुरित-जलधि-पतित-करद ।
शतमख-मुख-विजर-दरद-खचर-निकर-प-वरफणी[2] ॥ १ ॥
असुहृदनुजनमन[3] मात्र करुनि होय भवपात्र
शरण आलियासि जो न पूर्वकर्म किमपि गणी ॥ २ ॥
भक्त मोर ज्यासमोर नटति निवुनि अमितसुखें
सजल-जलद-नील विमल-शील मुख्य वर्ण्य गणीं ॥ ३ ॥

## पद ४१ वें

सुख जें खरें, तें नामानें ॥ ध्रु० ॥
न बहु-तुरग-गज-रत्नविराजित । मणि-कांचन-मय धामानें ॥ १ ॥
वृद्धपणीं नवसानीं झाल्या । न कुमाराच्या धामानें[4] ॥ २ ॥

---

१. पाप. २. इंद्रप्रमुख देवांना भीति देणाऱ्या राक्षससमुदायाच्या अधिपतीला (दंश करणारा) असा सर्प. ३. शत्रु आणि सेवक यांचें मन. ४. तेजानें.

न स्वर्गींच्या गानें पानें । सुर-पुष्पांच्या दामानें ॥ ३ ॥
भक्तमयूर म्हणे रसने ! हें । सत्य म्हणावें रामानें ॥ ४ ॥

## पद ४२ वें

भजना साधु निघे तो साधुनि घेतो नाम ॥ ध्रु० ॥
मर्दी लीलेनें अहितातें । पुरवी सर्वहि काम ॥ १ ॥
सकळ-पुमर्थ-प्रद हें सकळां । सुलभ न ऐसा राम ॥ २ ॥
भक्त मयूर म्हणे हें प्रभुला । रुचलें न असें साम ॥ ३ ॥

## पद ४३ वें

( गझल[1] )

रसने ! न राघवाच्या । थोडी यशांत गोडी ॥ ध्रु० ॥
निंदा-स्तुती जनाच्या । वार्ता वधू-धनाच्या ।
खोटया व्यथा मनाच्या । कांहीं न यांत जोडी ॥ १ ॥
साधूंचिया सदातें[2] । सुख देतसे सदा तें ।
श्रवणीं सुधा, मदातें । जोडूनि हात, सोडी[3] ॥ २ ॥
विनवी मयूर भावें । 'सखि ! हेंचि नित्य गावें ।
मजला द्रवोनि पावे[4] । दुसरें न बंध तोडी ' ॥ ३ ॥

---

१. गजल - गझल हें फारसी भाषेंतील वृत्त पंतांनीं मराठींत आणून पुढील रचना केली आहे. २. सभेला; समुदायाला. ३. अन्वयार्थ - ( राघवाच्या यशाच्या ) श्रवणीं (ऐकल्यानंतर) सुधा ( आपणच अधिक मधुर आहोंत या आपल्या ) मदातें हात जोडून ( त्याला = मदाला ) सोडी. ४. 'पावे' याचा कर्ता 'राघवाचें यश' अध्याहृत.

## पद ४४ वें

हृदया ! बरें विचारीं । नाम स्मरें, न तापें ॥ ध्रु० ॥
भगवान् अजामिळाला । नामें गजा मिळाला[१] ।
गणनातिगें गिळाला । नामप्रताप पापें[२] ॥ १ ॥
ज्याचे मनांत थारे । वधिले अराति[३] सारे ।
प्रभुच्या असें न बा ! रे ! । केलें रणांत चापें ॥ २ ॥
नामींच भाव राहो । दुष्कर्म-पंक वाहो ।
सौख्या मयूर लाहो । जें मोजवे न मापें ॥ ३ ॥

## पद ४५ वें

रघुवीरा ! रामा ! तूं हितकारी ॥ ध्रु० ॥
तुजवांचुनि भव-पारावारीं कोणी अन्य न तारी ॥ १ ॥
उद्धरली पद-पद्म-रजें जी शाप-शिळा मुनिनारी ॥ २ ॥
वधिले राक्षस लीलेनें जे वज्रधरासहि भारी ॥ ३ ॥
दिव्य विमानीं वाहुनि नेली स्वपदीं नगरी सारी ॥ ४ ॥
भक्तमयूर-मनस्तापातें त्वद्गुण-वारिद वारी ॥ ५ ॥

## पद ४६ वें

सकरुण रामनाम हें, तारुनि पतित, सद्यशें साजे ॥ ध्रु० ॥
मुक्ति सुखें भजकांप्रति दे तें । साधन सकळ या सदा लाजे ॥ १ ॥
पात्र अपात्र असें निवडीना । ज्यास परम रंक कीं राजे ॥ २ ॥
भक्त-मयूर सुखें नटती ते । सेविति अतिहिता घना या जे ॥ ३ ॥

---

१. या चरणाचा अन्वयः- भगवान् नामें अजामिळाला (आणि) गजा (गजाला = गजेंद्राला) मिळाला. २. अन्वयार्थः- नामप्रताप (नामप्रतापानें) गणनातिगें (गणना करण्याच्या मर्यादेबाहेर गेलेलीं) पापें गिळाला (गिळलीं). ३. शत्रु.

## पद ४७ वें

गा हो ! गा हो ! रामाचीं नामें ।
रामाचीं नामें, धर्माचीं दामें । शर्माचीं धामें ॥ ध्रु० ॥

सकळवेद-शास्त्र-सत्पुराण-सारें ।
हरिति कीर्तनेंचि संचिताघ सारें ।
हृदय अर्पिलें जयांसि दग्धमारें[1] ।
कुमतिसहित दमुनि अहित, करिति महित निज जन ॥ १ ॥

असति तन्त्रकथित मंत्र सप्त कोटी ।
चुकलिया जपांत होति हान मोटी ।
वदति साधु हे तदीय रीति खोटी ।
म्हणति सुकवि न मुख सुकवि जरिहि चुकवि जडपण ॥ २ ॥

अमृत-गर्व सर्व खर्व निपट केला ।
इहीं कीर धीर-गीत गतिस नेला ।
स्तविल काय हा मयूर मधुरतेला ? ।
इतरमनुनिं जपुनि जपुनि वपु निरसति न पटुही ॥ ३ ॥

## पद ४८ वें

रसने ! वद नामातें । वदना ! मातें तार ॥ ध्रु० ॥
गोरस-मधुरस-इक्षुरस-सुधारस-नवरसहि न सार ॥ १ ॥
तळमळसी, मळसी तरि कां हे वेडेवेडे-चार ? ॥ २ ॥
भक्त-मयूरकृपाघन राघव उघडिल मुक्तिद्वार ॥ ३ ॥

---

१. ज्यानें मदन जाळला, अशा शंकरानें.

## पद ४९ वें

न रुचो भवन मनाला, भव-नमनाला लाग ॥ ध्रु० ॥
कज्जल-निलयीं शिरतां लागे, कुशलालाही डाग ॥ १ ॥
दक्ष अभक्त बुडाला व्यसनीं, करितांहि महायाग ॥ २ ॥
भगवद्भक्ता षड्रिपु भीती, जेंवि मयूरा नाग[1] ॥ ३ ॥

## पद ५० वें

पावेन परम-हितातें, परमहितातें[2] आज ॥ ध्रु० ॥
सर्वगुरूत्तम वाटे मजला भोजपति महाराज ॥ १ ॥
जालों मीं कृतकृत्यचि कांहीं नाहीं उरलें काज ॥ २ ॥
क्षयभय दुर्बळ मोह पळाया बांधिल बळकट माज ॥३॥
दुखणें घेउनि मांडिल माझा विधि चिंतेची बाज ॥ ४ ॥
क्रूरहि अक्रूरहि मज म्हणतां धरिलचि माया लाज ॥५॥
द्विजनिकरीं प्रभु जेंवि मयूरा मजहि म्हणेलचि साज ॥ ६ ॥

## पद ५१ वें

पसरीं पदरा जीवा ! पदराजीवा[3] याच ॥ ध्रु० ॥
रज गुरु, चिंतामणि लघु, मग किति । माणिक आणिक पाच ? ॥१
हेचि चुकविती या लोकींचे । परलोकींचे जाच ॥ २ ॥
वर्षाकाळमयूर तसा हो । नित्यप्रमुदित, नाच ॥ ३ ॥

---

१. पदक्रमांक २८ मधील टीपक्रमांक ४ पहा. २. पर + महितातें = अतिशय सुप्रसिद्ध अशाला. ३. ( भगवंताच्या ) पदकमलाला.

## पद ५२ वें

नतमुख सुकवितिलक से[1] पाय ॥ ध्रु० ॥
शरणागत-भय-हरण।वांचुनि । याला करणें काय ? ॥ १ ॥
अपराधातें घालिल पोटीं । न असा बाप न माय ॥ २ ॥
यांच्या कीर्तीचें देवांची । करिलचि गायन गाय ॥ ३ ॥
या निजभक्तमयूरघनांचा । न जगीं महिमा माय ॥ ४ ॥

## पद ५३ वें

जन्मुनि सन्मुनि सर्वहि धन्यचि त्यांतहि भीमरथीवासी ॥ध्रु०॥
यद्गुश नित्य उभाचि जया विधि, शेष मुखें वासी ।
ज्यासि उपासिति सिद्धि-रमालघिमादि[2] सदा दासी ॥ १ ॥
स्वाश्रम-दर्शन-कीर्ति विकासुनि लाजविली काशी ।
ज्यांत अगाध अपार अनंत सुसौख्यसुधाराशी ॥ २ ॥
वेधिलि ज्या सुजनें बहु सृष्टि जसी मधूनें मासी ।
नाचवितो निववूनि जना घन जेंवि मयूरासी ॥ ३ ॥

## पद ५४ वें

यापरि पाव नता, जय पावनताश्रय-पाद-रजा ! बापा ! ॥ध्रु०॥
ऐकुनि हें बहु मानिल देवनदी न निजा आपा ।
होइल धाक, विपाक[3] सुदु:सह सर्व महापापा ॥ १ ॥
ओसणतील[4] सतीहि ' करा मजलाहि शिळा, शापा ' ।
गातिल साधु कवींद्र तुझ्या जयशालि भुजा चापा ॥ २ ॥

---

१. उत्तम कविश्रेष्ठासारखे ( पाय ). २. लघिमादि = लघिमा + आदि = अष्टसिद्धींपैकीं एक सिद्धि आदि करून. ३. परिणाम. ४. आग्रह करतील.

हर्षद हो बहुवर्ष, दयामृत वर्ष, हरीं तापा ।
चंपक हो अयशो-भ्रमरासि, मयूर खळा सापा[1] ॥ ३ ॥

## पद ५५ वें

जोलों[2] धन्य भुवनीं जाये ! हो ! । लोकीं सुख न समाये हो ! ॥ध्रु०॥
धांवत आला सामोरा तो बहु दूर श्रीजानी[3] हो ! ।
धरिलें मजला हृदयीं स्त्रीकुच-कुंकुम-सुभग-भुजानीं[4] हो ! ॥ १ ॥

स्वकरें माझे चरण क्षाळुनि त्या अवनेजनपाथा[5] हो ।
गंगाजनकपदांगुष्ठानें[6] ओढविला निज माथा हो ! ॥२॥

कथिलें गुरुकुळवृत्त, कथा बहु वदला खसुखें गोडा हो ! ।
तुळितां त्यांशीं अमृतरसातें, तेथ मधुरिमा थोडा हो ! ॥ ३ ॥

मीं लज्जेनें न दिले, मग ते आपण शोधुनि पोहे हो ! ।
भक्षुनि जाला फार सुखी तो, प्रभु परि उद्धत नोहे हो ! ॥४॥

नीजविलें मज निजपर्यंकीं, केली स्वकरें सेवा हो ! ।
पावित येउनि आज्ञा देतां रोदन आलें देवा हो ! ॥ ५ ॥

करुणाघन हरि भक्तमयूरीं फारचि सादर आहे हो ! ।
दासांच्या योगक्षेमातें आंगें आपण वाहे हो ! ॥ ६ ॥

---

१. पदक्रमांक ३८ मधील टीपक्रमांक ४ पहा. २. श्रीकृष्णकृत सत्काराचें सुदामदेवानें केलेलें हें वर्णन आहे. ३. लक्ष्मीपति, भगवान् विष्णु = श्रीकृष्ण. ४. रुक्मिणीच्या स्तनांवरील केशरानें सुशोभित अशा बाहूंनीं. ५. पादप्रक्षालनाच्या पाण्याला. ६. गंगोत्पत्ति करणारा ज्याच्या पायाचा आंगठा, अशा श्रीविष्णूनें = श्रीकृष्णानें.

## पद ५६ वें

बंधो[1] ! लाभ जाला मोटा हो ! । मिथ्यावादी खोटा हो ॥ध्रु०॥
सहसा तूजें दर्शन होतां प्रियसुहृदा ! भूदेवा ! हो ।
गमलें चुकला तो सांपडला, आनंदाचा ठेवा हो ! ॥१॥
भक्ताहुनि मज दुसरें कांहीं नाहीं प्रिय या लोकीं हो ! ।
माझा प्रेमा दासीं तैसा मातेचाहि न तोकीं हो ! ॥ २ ॥
तुझिया अंगस्पर्शें जालीं शीतळ माझीं गात्रें हो ! ।
तुज पाहुनि नेत्रें हीं सखया ! परम सुखाचीं पात्रें हो ! ॥ ३ ॥
हे पोहे मज विश्वात्म्याला देती तृप्ति अपारा हो ! ।
माजाठाई सखया ! तूजी ऐसिच भक्तिकृपा राहो ॥ ४ ॥
भक्तें अल्पहि देतां मजला प्रेमें फार्हि होतें हो ! ।
फार अभक्तार्पित अल्प गमे, वाटे हृदय न हो तें हो ! ॥५॥

92043
REFBK-0012753
REFBK-0012753
क्रम 33692 वि: ...
क्र 9548 नों० दि० 23-77

१. श्रीकृष्णाचें सुदामास अनुलक्षून हें भाषण आहे.